अनुक्रमणिका.

भाग १ ला.

पौर्वात्य लोकांचीं लग्नें.

आशिया—(हिंदुस्थान-महाराष्ट्र)

(गुजरात, पंचमहाल, काठेवाड.)

(सिंध.)

(पंजाब.)

(गोमांतक.)

लंका.

ब्रह्मदेश.

(हिंदीचीन, सयाम, मलाया, मलयद्वीपसमूह.)

(ऑस्ट्रेलिया.)

(जपान, चीन, चिनई तार्तरी, तिबेट.)

(अफगाणिस्तान, इराण, अरबस्तान, तुर्कस्तान)

आफ्रिका.

भाग २ रा.

पाश्चात्य लोकांचीं लग्नें.

प्रस्तावना.

"उपक्रमोपसंहारौ हेतुस्तात्पर्यनिर्णये ।"

वधूवरपरीक्षा या ग्रंथाविषयीं दोन शब्द.

श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड यांनी गेल्या सालीं कै. वा. विद्वद्वर्य **रा. सा. शंकर मोरो रानडे** बी. ए. ह्यांच्या प्रमुखतेखालीं एक कमीटी नेमून त्यांजकडून **'वधूवरपरीक्षा'** नांवाचा ग्रंथ तयार करविला. तो छापून प्रसिद्ध झाला आहे. त्यांत लेखकांनीं प्राचीन व लोकमान्य ग्रंथांतील जागोजाग आधार देऊन विषयाचें प्रतिपादन पद्धतशीर, सविस्तर आणि फारच नामी केलें आहे. वधूवरपरीक्षा कशी करावी, तें सदरहू ग्रंथावरून सांगोपांग रीतीनें समजून येईल; व तेणेंकरून तो समाजास पुष्कळ उपयुक्त होईल, ह्यांत शंका नाहीं. एकंदरींत आमच्या विद्याभिलाषी व समाजहितेच्छु महाराजांनीं ह्या ग्रंथानें महाराष्ट्र वाङ्मयास जें पुष्टीकरण केलें, व समाजावर जे उपकार केले, त्याबद्दल महाराज खरोखरच लोकादरास व अभिनंदनास पात्र आहेत, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

प्रस्तुत ग्रंथासंबंधीं श्री. महाराजांची प्रथम कल्पना व आज्ञा.

वधूवरपरीक्षेच्या पुढील पायरी **लग्नविधि व सोहळे** ही होय; आणि ह्या विषयावरही मराठींत ग्रंथ व्हावा, ह्या प्रथम कल्पनेचें श्रेय आमच्या कल्पक अशा महाराजांकडेच आहे. त्यांनीं गेल्या नवंबर महिन्याच्या आरंभीं ह्मणजे **श्री. युवराज फत्तेसिंगराव दादासाहेब** ह्यांच्या लग्नापूर्वीं सुमारें तीन महिने हा ग्रंथ लिहिण्याविषयीं आज्ञा केली.

श्रीमंतांचा मूळ उद्देश, तो साधण्याची अशक्यता, व प्रसंगोचित केलेलीं दोन लघु पुस्तकें.

राजवाड्यांत प्रतिवर्षी जीं धार्मिक व इतर कृत्यें करण्यांत येतात, तीं कोणत्या उद्देशानें व कशा रीतीनें करावयाचीं, आणि त्यांच्या संबंधानें कोणकोणत्या कारखान्यानें काय काय तजविजी ठेवाव्या, वगैरे माहिती देणारें **ऐनेराजमेहेल** अथवा **राजवाडादर्पण** ह्मणून एक सरकारी पुस्तक आहे. त्याच्या धर्तीवरच **लग्नविधि व सोहळे** हा ग्रंथ रचावा, ह्मणजे त्यावरून राजघराण्यांत होणाऱ्या लग्नकार्यांतील एकंदर धार्मिक विधि व देशाचारांसंबंधीं साधार व सोपपत्तिक माहिती मिळेल, तसेंच त्यांजविषयीं सारासार विचार करितां येईल, व शिवाय लग्नप्रसंगीं नोकरचाकरांस आपापलीं कर्तव्यें बिनचूक बजावण्याला तें एक मार्गदर्शक होईल, असा प्रस्तुत पुस्तक तयार करविण्यांत श्रीमंतांचा मूळ हेतु होता. परंतु, ग्रंथलेखनाची आज्ञा झाल्यापासून तों लग्नतिथीपर्यंतच्या स्वल्प अवधींत अनेक कारणांस्तव असा ग्रंथ होणें दुरापास्त झालें. तेव्हां आह्मीं प्रसंगोचित अशीं दोन लघुपुस्तकें लिहून तीं श्री. **युवराजांच्या** लग्नसमयीं छापून प्रसिद्ध करविलीं. त्यांपैकीं एक " लग्नविधि व सोहळे " ह्याच नांवाचें असून त्यांत सामान्यतः येथील राजघराण्यांत होणाऱ्या विवाहासंबंधीं धार्मिक विधि व देशाचार ह्यांचें वर्णन केलें होतें; आणि दुसऱ्यांत श्री. छोटेमहाराजांच्या लग्नाचा एकंदर कार्यक्रम होता.

मूळ उद्देशांत बदल करण्याला श्रीमंतांचें अनुमोदन, त्यांनीं दर्शविलेली सीमा व तदनुरूप ग्रंथरचना वगैरे.

पुढें लग्नोत्सव आटोपल्यानंतर आह्मीं पुनः मूळ ग्रंथरचनेकडे वळलों. परंतु, ऐनेराजमेहेलच्या नमुन्याप्रमाणें रचना करणें प्रशस्त वाटेना. कारण, तशा रीतीनें लिहिलेलें पुस्तक एका संस्थेस, आणि तिच्याही कांहीं विवक्षित लोकांसच उपयुक्त झालें असतें. शिवाय, प्रसंगानुसार श्रीमंतांची आज्ञा जरी एका व्यक्तीपुरती अथवा एका संस्थेपुरतीच असली, तरी तिचा लाभ केवळ त्या व्यक्तीस अगर संस्थेसच न देतां—शक्य असल्यास—तो बहुजनसमुदायासही अवश्य देत जावा, अशी महाराज सरकारांची एक कायमची व स्तुत्य आज्ञा आहे. सबब, तिला अनुसरून ग्रंथाची

आहेत, त्या केव्हांही चुकत नसतात. तथापि, आपल्या ज्ञानाची गति पोहोंचे-पर्यंत मनुष्यानें चौकसपणानें वागत असावें, हें चांगलें. आणि ह्याच उद्देशानें आगाऊ सुमुहूर्तावर कार्य करण्याचा परिपाठ आमच्या दूरदर्शी पूर्वजांनीं ठेविला आहे.

ही पर्यायेंकरून करण्याची चाल तिचा संकल्प, व उद्देश.

वचनसुपारी:—ही केवळ स्थलपरत्वें करण्यांत येते. तिचा प्रचार सार्वत्रिक दिसत नाहीं. कारण, पुढें सांगितलेल्या वाग्दानाप्रमाणें हा कांहीं धर्मशास्त्रविहित विधि नव्हे. शिवाय, वचनसुपारी ह्मणून जें कृत्य करण्यांत येतें, तें वाग्दानप्रयोगाचें एक अंगच होय. दोहोंमध्यें अनुक्रमें "वरविवाहांगभूतं कन्यानिरीक्षणं करिष्ये" व "वाग्दानांगभूतं कन्यानिरीक्षणं करिष्ये" असे संकल्प असतात. त्यांत मुख्य कटाक्ष कन्यानिरीक्षणावर असून तो उभय कृत्यांत सामान्य आहे. सबब, धर्मशास्त्रविहित वाग्दानविधि हा जसा केलाच पाहिजे, तशी वचनसुपारी करण्याची ह्मणजे आवश्यकताच आहे, असें नव्हे. मग ती स्थलपरत्वें तरी कां केली जावी, हा प्रश्न साहजिकच पुढें येतो. त्याचें समाधान असें आहे की, ती केल्यानें उभय कुटुंबांमध्यें पुढें होणाऱ्या शरीरसंबंधाची लोकांत प्रसिद्धि होते; व तेणेंकरून, ज्योतिष्यानें दिलेला लग्नमुहूर्त जर बऱ्याच अंतरावर असेल, तर सोयरिकीबद्दल एकवार झालेला निश्चय मध्यंतरीं डळमळूं नये, ह्मणून त्यास एक प्रकारचें पुष्टिकरण होतें. अशा हेतूनें ती करण्याची चाल स्थलपरत्वें आणि विशेषतः बडोदें शहरीं पडली आहे. सबब, तिच्यासंबंधीं माहितीची आवश्यकता वाटल्यावरून ती ह्याखालीं दिली आहे.

कृत्याचें वर्णन.

वरपक्षाची इष्टशिष्ट मंडळी वाजत गाजत कन्येच्या घरी जातात, व तेथें वरपित्याकडून पूर्वोक्त संकल्पानें कन्यानिरीक्षणाच्या अंगभूत असें वरुणाचें व गणपतीचें पूजन यथाविधि करवितात. नंतर सौभाग्यद्रव्यादिकांनी मुलीचें पूजन करवून तिला साडी, चोळी व साकरपुडा देववितात. मग सुवासिनी स्त्रिया मुलीस घरांत नेऊन ती साडीचोळी नेसवितात,

व मुंडावळ बांधून पूर्वस्थलीं आणून बसविल्यावर वरुणगणपतीला आणि कन्येला 'औक्षण' करितात (ओंवाळितात). हें झाल्यावर जोशीबोवांनी लग्नपत्रिका तयार करून आणिलेली असते, तिचें वरपित्यानें पूजन करून जोशीबोवांस गंध लावून यथाशक्ति दक्षिणा द्यावयाची. नंतर ज्योतिषी पत्रिका वाचून लग्नापर्यंत करावयाच्या निरनिराळ्या मंगलकृत्यांचे मुहूर्त सांगतात. तें झाल्यावर वरपक्षाचे उपाध्याय उभयपक्षांकडील निमंत्रित ब्राह्मणांस (भिक्षुकांस) गंध लावून यथाशक्ति दक्षिणा देतात, व सर्व मंडळीस हारतुरे, गुलाब, अत्तर, पानसुपारी वाटिल्यानंतर वरपक्ष मिरवत मिरवत आपल्या घरीं परत जातो.

ही वचनसुपारी लग्नाच्या पूर्वी सवडीप्रमाणें केव्हांही केली असतां चालते.

लग्नसाहित्य, व रुखवताचें वर्णन.

लग्नसाहित्य:—बहुतकरून व्यावहारिक रीतीनें वधूवरपक्षांत अनुक्रमें 'नारळ' व 'साकरपुडा' होऊन लग्न ठरलें, अथवा निदान तिथिनिश्चय झाला, म्हणजे दोन्हींकडे लग्नसाहित्य करण्याला सुरवात होते. साहित्यापैकीं इतर कोणताही जिन्नस बाजारांतून आणण्यापूर्वी शकुन म्हणून हळद (हळकुंडें) व कुंकू विकत घेऊन नंतर इतर सामान खरेदी करण्याची रूढि आहे. हळद आणिली, म्हणजे दिनशुद्धि पाहून ज्यांना सासूसासरे व पुत्रसंतति आहे, अशा पांच सुवासिनींस बोलावून आणितात; व त्यांस घरांतील सुवासिनी स्त्रिया हळदकुंकू आणि हातीं वरासें अथवा साकर देऊन त्यांच्या मदतीनें ती हळकुंडें कुटून दळितात. ही कृत्यें करितांना त्या स्त्रिया मुखांनीं मंगल गीतें गातात. ह्याप्रमाणें हळद तयार झाल्यावर मेतकूट, भाजणी, आगटीची कणी, वडे, पापड, सांडगा, कुरडया, चिकवडे, तिळवडया, मिरबोंडें, वगैरे बरेच दिवस टिकणारे व सोंवळ्याचे पदार्थ हळू हळू तयार करून ठेवितात. पुढें लग्नतिथि असजशी जवळ येऊं लागते, तसतसे गहुले, शेवया, मालत्या, फणोले, नखोले व आंब्याचा मोहोर वगैरे खिरीचें बळकट शकून ठेवितात. नंतर लग्नमुहूर्तास केवळ

दोन तीन दिवसांचा अवधि राहिला, ह्मणजे आपल्या ऐपतीप्रमाणें पक्वान्नें करावयास लागतात. ही पक्वान्नें ह्मणजे करंजा, अनारसे, चिरोटे, गुरवळ्या, तारफेण्या, मांडे, वगैरे पदार्थ होत. याशिवाय 'रुखवत' ह्मणून कांहीं विशेष पदार्थ आहेत, ते अवश्य केलेच पाहिजेत. ते असे कीं, २५ सुपाऱ्या, २५ हळकुंडें (लेंकुरवाळीं ह्म० ज्यांवर लहान लहान गांठी आहेत अशीं) २५ खारका, २५ बदाम, व २५ शेवखंडें ह्यांचे गुळाच्या चांचणींत लाडू बांधावयाचे. पण ते अशा रीतीनें कीं, प्रत्येक जिनसेचे पांच लाडू होऊन त्या प्रत्येक लाडूंत त्या जिनसेची संख्या पांचच असावी. ह्याच प्रमाणें डाळें, चुरमुरे, साळीच्या व जोंधळ्याच्या लाह्या, गव्हांचे व तांदळांचें तुपांत भाजलेलें पीठ (ह्म. गुळपापडी) ह्या जिनसांचेही गुळाच्या चांचणींत प्रत्येकी पांच पांच मोठाले लाडू करितात. ह्या सर्व लाडूंना कच्च्या सुताचें एक एक आडवें व उभें वेष्टन देऊन ठेवितात. खेरीज, वर सांगितलेल्या करंजा वगैरे पक्वान्नांतूनही प्रत्येक पदार्थ पांच पांच संख्येनें रुखवताकडे घेण्याची चाल आहे. हें रुखवत बहुधा वधूपक्षाकडेच करावें लागतें. तथापि, ज्या ब्राह्मण लोकांत वराकडून वधूकडे 'तेलफळ' नेण्याची चाल आहे, त्यांच्यामध्यें तेलफळाबरोबर नेण्यासाठीं तें वरपक्षाकडेही करण्याचा मार्ग आहे. रुखवत तयार झालें, ह्मणजे लग्नाच्या पूर्वीं निदान एक दोन दिवस तें निरनिराळ्या ताटव्यांत किंवा पात्रांत घालून एके ठिकाणीं मांडून ठेवितात; व तें पाहण्याकरितां, घरांतील स्त्रिया आपल्या नातलगांतील वयोवृद्ध बायकांस व मैत्रिणींस मुद्दाम हौसेनें बोलावितात. कारण, तें त्यांच्या सुगरीणपणाचें व आगत्याच्या करतुकीचें एक प्रदर्शनच असतें!

गुंडावळी. घरांत रुखवत तयार होऊं लागलें, ह्मणजे वधूच्या मुहूर्तापैकीं कोणी चतुर आणि हौशी तरुणी, टाकणा, वेलदोडे, व लहान लहान जायफळें ह्यांना सोनेरी वर्ख लावून त्यांच्या, व तिळांच्या हलव्याच्या गुंडावळी (गुंड ह्म० टोंकें व आवळि ह्म० तार=गुंडावळी ह्म० टोंकांस

बांधण्याचे सर) ओंवण्याच्या कामांत गढून गेलेल्या असतात. त्या ओंवून तयार झाल्यावर पटवेकऱ्याकडे पाठवून रेशमांत आणि कलाबतूंत झोंकदार अशा पटवून आणितात; व योग्य प्रसंगीं नवऱ्यामुलाच्या डोकीस बांधण्याकरितां त्याच्या पोषाकासोबत जपून ठेवितात.

गृहमंडन.

गृहमंडन.—वर सांगितल्याप्रमाणें स्त्रिया लग्नाचें साहित्य वगैरे तयार करीत असतां उभयपक्षाची हौशी पुरुष मंडळी आपआपलीं घरें शृंगारून तीं सुशोभित करण्याच्या खटपटींत असतात. भिंतीस सफेता व रंग देणें, त्यांवर तऱ्हेतऱ्हेच्या वेलबुट्या व चित्रें काढणें, दरवाजास रंग देऊन त्यावर मंगलमूर्ति—गणपतीचें चित्र काढणें, तोरण बांधणें, अंगणांत आणि बैठकीच्या जागेवर छतें व झालरी लावणें, आरास करणें, तसबिरी व आरसे लावणें, जमीनी चोपून चटचटींत व झाडून सारवून साफ करणें, बिछायत व रोषनाई ह्यांची व्यवस्था करणें, वगैरे कामें मोठ्या झपाट्यानें चालू होतात. तसेंच जांवई आणि सर्व मानकरी ह्यांचे पोषाक, मंगलवाद्यें, कागदीबाग व नक्षत्रमाळा, चौरी, अबदागीर, विड्याचीं पानें, फुलांचे हार, तुरे, मुंडावळी, दारूकाम, हिलाल व मजूर इत्यादि लग्नप्रसंगीं लागणाऱ्या सर्व वस्तूंची आयत्या वेळीं हरकत पडून घोंटाळा न व्हावी, आणि पैशाचा अपव्यय न व्हावा, म्हणून अनुभवी मनुष्यें त्यांची आगाऊपासून तजवीज करून ठेवितात.

मंडप घालण्याचा उद्देश, काल व स्थलवर्णन.

मंडपः—लग्नादि मंगलकार्यांत कांहीं धार्मिक विधि करण्यासाठीं, आणि बहुजनसमाजाचें व्यवस्थेशीर रीतीनें आदरातिथ्य करितां यावें म्हणून, मंडप घालण्याची चाल फार प्राचीन काळापासून चालत आली आहे. दळणें, कांडणें, तेल लावणें, पक्वान्नें तयार करणें, चोळ्या शिवाय इतर वस्त्रें शिवणें, मंडप व बहुलें घालणें, हळद कुटणें, इत्यादि कृत्यें, हीं विवाहाचीं अंगकर्में मानिलीं आहेत. हीं सर्व कर्में इष्टपरिणामक व्हावीं, एतदर्थ तीं विवाहलग्नावर करावीं, मग त्यासाठीं चंद्रबळ पाहण्याचें कारण नाहीं, मात्र तीं लग्नापूर्वीं

तिसऱ्या, सहाव्या, किंवा नवव्या दिवशीं करूं नयेत, असें ज्योतिःशास्त्रांत सांगितलें आहे. यावरून मंडप हा केव्हां तरी भलत्या वेळेस घालितां येत नाहीं. त्यासाठीं सुमुहूर्त पहावा लागतो, ही गोष्ट लक्ष्यांत येईल. आतां तो कसा घालावा, याविषयीं वसिष्ठस्मृतींत वर्णन दिलें आहे, तें असें:—

"षोडशारत्निकं कुर्याच्चतुर्द्वारोप शोभितम् ।
मंडपं तोरणे र्युक्तं तत्र वेदिं प्रकल्पयेत् ॥"

ह्मणजे, तो चौरसचौरस सोळा अरत्नि* असावा, त्याला चारही बाजूस चार शोभिवंत दरवाजे असावे, त्या दरवाज्यांवर महिरपा अथवा कमानी कराव्या, आणि अशा मंडपामध्यें वेदी अथवा बहुलें घालावें असें प्रमाण सांगितलें आहे. आतां इतकी प्रशस्त जागा नसल्यास हा मंडप बारा किंवा आठ चौरस हात घालावा, अशीही सवलत दिली आहे.

"अष्ट हस्तं तु रचयेन्मंडपं वा द्विपद् करम् ।"

मूळ उद्देशाचा विपर्यास.

परंतु, अनेक कारणांस्तव अशा रीतीनें मंडप घालणें, लोकांना साधत नाहीं. ते बहुतकरून आपआपल्या फुरसतीप्रमाणें व जागेच्या अनुकूलतेप्रमाणें व्यावहारिक रीतीनें मांडव घालितात; आणि सुमुहूर्तानें देवप्रतिष्ठा बसवितांना त्या तयार असलेल्या मांडवांत विधिपूर्वक एक स्तंभ रोंवितात. या स्तंभास 'मुहूर्तमेढ' अशी संज्ञा आहे; व तो रोंवण्याच्या विधीला 'स्तंभरोपण' असें ह्मणतात. हा विधि वर सांगितल्याप्रमाणें सुमुहूर्तावर मंडप घालण्याऐवजी करण्यांत येतो.

स्तंभरोपण.

प्रथमतः ज्या मुहूर्ताला जी दिशा उक्त असेल, त्या दिशेस एक खळगा करितात. नंतर एका बांशाला पिकल्या फडक्याच्या चिंधीनें एक गवताची पेंडी बांधितात. त्या चिंधींत सुपारी व हळकुंड बांधिलेलें असतें. अशा रीतीनें मंडपस्तंभ तयार केल्यावर तो वरील खळग्यांत उभा करून व त्याची यथाविधि पूजा वगैरे संस्कार करून नंतर तो तेथें पुरून ठेवितात. कोठें कोठें तर हा स्तंभ खळग्यांत पुरण्याऐवजी

* कोंपरापासून करंगळीच्या टोकापर्यंत जो लांबी, तिला अरत्नि असें ह्मणतात.

नुसता एखाद्या खांबाशी बांधण्यांत येतो. असो. त्या त्या पक्षाला सोडून कर असा मंडप घातल्यावर वधूकडील मंडपांत वेदिका—बहुलें—घालण्यांत येतें.

वेदिका (बहुलें):—पूर्वी घराच्या अंगणामध्यें चौकोनी व उंच अशी एक बैठक करण्याचा रिवाज असावा, असें दिसतें. ह्या बैठकीस संस्कृत भाषेमध्यें 'वितर्दि' अथवा 'वेदिका' असें ह्मणतात. कांहीं धार्मिक व मंगलकृत्यांसाठींही वेदिकेचा उपयोग सांगितला आहे. त्याचा उद्देश असा दिसतो कीं, तीं कृत्यें आणि त्यांचे कर्ते उच्च पदावर असल्यानें सहज अवलोकनांत यावे, व पहाणारांच्या मनांत त्यांजविषयीं आदर किंवा कौतुक वाटावें. लग्नकार्यांत वधूच्या घरीं अंगणामध्यें वर सांगितल्याप्रमाणें मांडव घालून त्यांत वधूवरांस होमाच्या वेळीं जोडप्यानें बसण्याकरितां वेदिका तयार करावी लागते. अर्थात् ती अग्निसहित असावयाची. अग्नीला संस्कृतांत 'बहुल' अशी संज्ञा आहे. त्यावरून बहुलासहित बसावयाची जी वेदिका, तिला मराठींत 'बहुलें' अथवा 'बोहलें' ह्मणण्याचा परिपाठ पडलेला दिसतो.

वेदीची उपपत्ति व उद्देश.

बहुलें घालणें, हें विवाहाचें एक अंगभूत कर्म असून तें केव्हां घालावें याविषयीं माहिती वर इतर अंगकर्मांबरोबर सांगितली आहे. सबब, ती येथें पुनः सांगण्याचें प्रयोजन नाहीं. आतां तें कसें असावें, येवढाच प्रश्न राहतो. त्याचें वर्णन धर्मशास्त्रांत केलें आहे तें असें:—

वेदी घालण्याचा काळ.

हस्तोच्छ्रितां चतुर्हस्तैश्चतुरस्रां समंततः ।
स्तंभैश्चतुर्भिः सुश्लक्ष्णां वामभागे तु सद्मनि ॥
समां तथा चतुर्दिक्षु सोपानै रुपशोभिताम् ।
प्रागुदक् प्रवणां रंभा-स्तंभ-हंस-शुकादिभिः ॥
चित्रितां मंकितां कुंभैः विहितैस्तोरणांकुरैः ।
शृंगारपुष्पनिकरैः वर्णकैः समलंकृताम् ॥
चित्रार्थीर्विचित्रैः पुष्पैः स्त्रीभिर्दीपैर्मनोरमां ।
वादित्रनृत्यगीताद्यैः हृदयानंदिनीं शुभाम् ॥
एवं विधां मारुह्येन्मिथुनं साग्निवेदिकाम् ।
हस्तोच्छ्रयाः नारदस्मृतिः

शोधक अशा कांहीं ग्रंथकारांनी लग्नाची व्याख्या, तें करण्याची आवश्यकता, व एकंदर जगांतील लग्नसंस्थेची पूर्वपीठिका सांगितली आहे. ते ह्मणतात, स्त्री आणि पुरुष हीं मानव जातीचीं विभक्त अशीं दोन अंगेंच होत. त्यांच्या शारीरिक अपेक्षा दूर व्हाव्या, त्यांजमध्यें पूर्ण नीतिमत्ता असावी, त्यांना संसार सरळ आणि चांगल्या रीतीनें करितां यावा, आणि कित्येक सामाजिक व धार्मिक कर्तव्यें करण्याला त्यांची एकमेकांस अवश्य ती मदत मिळावी, ह्यासाठीं त्यांचा संयोग होणें जरूर आहे. । संयोग रूढि आणि शास्त्र यांच्या अनुरोधानें करणें, ह्याला लग्न असें ह्मणतात. बाळपणापासून वृद्धावस्थेपर्यंत गृहसंबंधी प्रत्येक प्रकारचें सुख मिळण्याला लग्न हें एक साधन आहे. मनुष्यजातीचें संरक्षण होण्याला, तिजमध्यें उदात्त मनोवृत्तींचा उदय आणि त्या वृत्तींची वृद्धि होण्याला, व तेणेंकरून मानव जातीचें कल्याण होण्याला लग्न करण्याची आवश्यकता आहे. तें केल्यानें स्त्रीपुरुषांना फार महत्वाचे हक्क प्राप्त होतात, तें केल्यानें अबलांची नीच दास्यापासून सुटका होते, व त्या स्वातंत्र्यगिरीच्या उंचावरील पायऱ्या क्रमाक्रमानें चढूं लागतात. ह्यावरून लग्नसंबंध हा किती महत्वाचा आहे त्याविषयीं कल्पना करितां येईल.

पाश्चात्य ग्रंथकारांनी केलेली लग्नाची व्याख्या व ह्या संस्थेची आवश्यकता.

आतां, हा संबंध प्राचीन काळीं कसा घडून येत होता, व पुढें सुधारणेचा सूर्य जसजसा उदयाचलावर येऊं लागला, आणि अज्ञानांधकाराचें निवारण झालें, तसतसे तो संबंध घडवून आणण्याच्या प्रकारांत काय काय फेरफार झाले, ते कांहीं ग्रंथकार ह्याप्रमाणें सांगतात. फार प्राचीनकाळीं विवाहविधि मुळींच अस्तित्वांत नव्हता. वाटेल त्या स्त्रिया वाटेल त्या पुरुषाशीं, व वाटेल ते पुरुष वाटेल त्या स्त्रियांशीं कांहीं एक भेदाभेद मनांत न आणितां व्यवहार करीत असत. सारांश, त्यावेळीं अनियमित जाति (tribes) विवाह प्रचारांत होता असें ह्मणतां येईल. अर्थात् त्याकाळीं अमुक मुलाचा जनक

लग्नाच्या कल्पनेची उत्पत्ति व तिची वृद्धि वगैरे.

असमर्थाच आहे, असें निश्चयात्मक सांगणें शक्य नव्हतें; आणि हा अनियमित जातिविवाहाचा स्वाभाविक परिणाम होय. त्यामुळें मुलांचें पालनपोषण करणें हें काम केवळ स्त्रियांकडे आलें, व तें त्यांच्यानें पुरतें होत नसे. इतकेंच नव्हे, परंतु उदरनिर्वाहाच्या दगादगीमुळें त्या लवकरच टेकीस येऊन अकालीं मरण पावूं लागल्या. पुरुषांना गृहकृत्यांत स्त्रियांची जी मदत लागते, ती मिळत नसे. ह्या दुष्परिणामांचें कारण कित्येक पुरुषांस कळूं लागल्यावर ते स्त्रियांशीं आपला संबंध बराच काळपर्यंत ठेवूं लागले; व तसें करण्याला त्यांना केव्हां केव्हां आपल्या बलाचाही उपयोग करावा लागे. पुढें दिवसानुदिवस अशा दीर्घसंबंधाची उपयुक्तता लोकांस कळूं चालली; व त्याविषयीं जसजशी त्यांच्या मनाची खातरी होत गेली, तसतसा स्त्रीपुरुषांचा दीर्घसंबंध प्रचारांत आला. तथापि, अनियमित जातिविवाहाचें अवलंबन करणारांची संख्या बरीच मोठी होती; व त्या लोकांस त्या विवाहाचे दुष्परिणाम भोगावे लागत असत. जेव्हां जेव्हां दुष्काळ पडून अन्न दुर्मिळ होई, तेव्हां तेव्हां अनियमित विवाहाच्या स्त्रियांना चरितार्थ चालविणें मोठें कठिण पडे. त्यामुळें स्त्रीवर्गाच्या जीविताची असारता वाटूनच कीं काय, स्त्रियांना मुली झाल्याबरोबर त्यांनी त्यांची हत्या करण्याची तोड काढिली! त्यायोगानें अर्थातच स्त्रियांची संख्या कमी होत चालली, व एका स्त्रीला अनेक पती स्वीकारण्याचा प्रसंग आला. ही अनियमित जातिविवाहांत सुधारणा होण्याची पहिली पायरी होय. कारण कीं, एकाच स्त्रीला बहुभर्तें असले, म्हणजे संततीचें जनकत्व कोणास द्यावें, तें निश्चयानें सांगतां येत नाहीं. तेव्हां वारसाईचा हक्क साहजिकच स्त्रीकडे जातो. मग तो हक्क आपणांस मिळावा म्हणून एका जातींतील पुरुष अन्य जातींतील स्त्रिया हरण करण्यास प्रवृत्त होत असत.

पुढें, वर सांगितलेल्या पद्धतींतील अनिश्चितपणा कांहीं अंशीं दूर करून वारसाईचा हक्क पुरुषजातीस मिळावा, व तो कांहींतरी नियमित असावा, याकारितां अनेक बंधूंनीं एकाच स्त्रीशीं लग्न

जातिविवाह.

ह्यावरून हा लग्नचिठ्ठ्या पाठविण्याचा रिवाज फार प्राचीनकाळापासून चालत आला आहे, हें सिद्ध होतें. गांवांतील इष्टमित्रांच्या घरीं निमंत्रणार्थ अक्षत फिरविली जात असे. परंतु, हल्लीं छापखाना व टपाल हीं साधनें स्वस्तीं

ह्या रूढींत हल्लीं झालेली सुधारणा.

झाल्यानें ह्या लग्नचिठ्ठ्या सुंदर 'टाइपां' त सोनेरी किंवा लाल शाईनें छापवून त्या गांवांतल्या गांवांतही टपालाच्या शिपायांमार्फत फिरविण्यांत येतात. त्यामुळें अक्षत फिरविण्यास लागणारा वेळ व श्रम बहुतेक वांचले; व ती पद्धतीही हळू हळू मागें पडत चालली आहे. चिठ्ठ्या सोनेरी किंवा लाल शाईत छापिल्या गेल्या, ह्मणजे त्यांजवर कुंकुमाच्या पाण्याचा शिडकाव करण्याचीही जरूर नसते. सुमुहूर्तानें एक चिठ्ठी प्रथम देवास अर्पण करून बाकीच्यांवर पत्ते लिहून त्या टपालाच्या पेटींत टाकिल्या, कीं काम झालें. मग अक्षत ही फक्त देवांस व गांवांतील निकट संबंधी व विशेष आगत्याच्या लोकांसच देण्यांत येते.

कुंकुमपत्रिकेमध्यें वधूवरांच्या पित्यांचीं किंवा त्यांच्या पुरस्कर्त्यांचीं, व वधू-

वर्णन.

वरांचीं नांवें, लग्नाची वेळ, आणि ठिकाण असून तें मंगल कार्य सिद्धीस नेण्यासाठीं सकुटुंब सहपरिवार निमंत्रण केलेलें असतें.

अक्षतः—तिथिनिश्चय झाला, ह्मणजे उभयपक्षांमध्यें सोयरीक पूर्णपणें

उपपत्ति व उद्देश.

ठरली, त्या बाबतींत आतां कांहीं उणीव राहिली नाहीं, अशी साधारणतः खात्री होते. मग ती पूर्ण जमली ह्मणून लोकांत व्यक्त करण्याला कांहीं प्रत्यवाय नसतो. सबब, ती 'अक्षत' रूपानें प्रसिद्ध करण्याची रूढि पडली असावी, असें वाटतें. कारण, 'अक्षत' हा शब्द पूर्णतादर्शक होय, व ती देण्याचा उद्देश इष्टमित्रांस लग्नाचें निमंत्रण करावें एवढाच आहे.

ही अक्षत लग्नाच्या पूर्वदिवशीं, किंवा उभयपक्ष श्रीमान् असून

अक्षतीचा काल.

गांवांत त्यांच्या इष्टमित्रांचा बराच मोठा समुदाय असल्यास लग्नाच्या कित्येक दिवस आगाऊही दिल्याचीं उदाहरणें

आहेत. मात्र ती देणें सुरू केल्यापासून लग्नमुहूर्त विषम दिवशीं येऊं नये, येवढें धोरण ठेवावें लागतें.

उभयपक्ष मोठ्या थटानें मिरवत मिरवत श्रीगणपतीच्या मंदिरास किंवा

अर्पण.

गांवांतील प्रमुख देवालयास जातात. तेथें गेल्यावर प्रत्येक पक्षाचे उपाध्याय, त्या पक्षाचें जें पुरस्कर्तें दंपत्य असेल त्यांकडून नारळ, विडे, (१ विडा=२ पानें व १ सुपारी) व दक्षिणा देवापुढें ठेवून नंतर चांदीच्या वाटींत कुंकवानें लाल केलेले तांदूळ* ह्मणजे 'अक्षत' असते, ती देवास देववितात. ती देतांना अमुकाची मुलगी व अमुकाचा मुलगा ह्यांचें अमुक सुमुहूर्तावर लग्न आहे, तरी आपण सकुटुंब सहपरिवार येऊन कार्यसिद्धि करावी, असें ह्मणावयाचें.

अशा रीतीनें उभयपक्षांनी देवांस अक्षत दिल्यावर सर्व मंडळी देव-

इष्टमित्रांस अक्षत देण्याची पद्धति आणि विधानें.

दर्शन घेऊन आपापल्या घरीं जातात. नंतर ज्या त्या पक्षाचे पुरस्कर्तें (स्त्री व पुरुष) स्वकीय इष्टमित्रांच्या घरी अक्षत देण्याची तजवीज लावितात. मात्र पुरुषांस पुरुषांनीं व बायकांस बायकांनींच अक्षत देण्यांत येते. देवांस अक्षत देतांना जें वाक्य वर सांगितलें, त्याचीच आवृत्ति सर्व ठिकाणीं अक्षत देतांना करावी लागते. मात्र पुरुष पुरुषांस मोघम कार्यसिद्धीसाठीं किंवा फार तर पानसुपारीसाठीं बोलावितात. पण स्त्रियांचें स्त्रियांस बोलावणें केवळ व्यावहारिक आणि तपशीलवार असतें. त्या "घाणा भरायला, उष्ट्या हळदीला, रुखवत पहायला, मिरवायला व हळदीकुंकवाला आगत्य आगत्य या" अशासारखें विधान करितात.

---

* अक्षतीसाठीं तांदुळाचा उपयोग करण्यांत येतो. ह्याचें कारण असें आहे कीं, इतर धान्यांस किड्यांनीं कोरिल्यामुळें जशीं क्षतें पडतात, तशीं तांदुळांस पडत नाहीत.

लग्नांसाठीं प्रसिद्ध आहे. केवळ पाश्चात्यांतच काय, परंतु पृथ्वीच्या पाठी-वर ज्या ज्या लोकांतील विवाहसंस्था ही वधूवरसंमतीच्या, व्यावहारिक कराराच्या, किंवा उभय तत्त्वांवर स्थापिलेली आहे, तिला बळकटी आणि शाश्वती बेताबाताचीच दिसून येते; आणि ह्यावरून असें व्यक्त होतें कीं, जर लग्नसंबंध बळवत्तर आणि चिरस्थायी व्हावा अशी इच्छा असेल, तर त्याला केवळ विकारवश झालेल्या वधूवरांच्या संमतीपेक्षा, अथवा नश्वर अशा व्यावहारिक करारापेक्षां कांहीं तरी लोकोत्तर बंधनाची आवश्यकता आहे; आणि तें लोकोत्तर बंधन धर्मा-शिवाय दुसरें कोणतेंच नाहीं. प्रौढविवाह, वधूवरसंमति, ह्या गोष्टी चांगल्या व आवश्यक तर खऱ्याच. परंतु त्या अप्रधान आहेत. लग्नसंबंधांत प्राधान्य हें प्रगल्भ आणि उदात्त अशा धर्मविधीसच असलें पाहिजे; व तें आमच्या अप्रतिम विद्वान् आणि अत्यंत सूक्ष्म विचारी पूर्वजांनीं आमच्या लग्नांत ठेविल्यामुळेंच आमचे संबंध जगांतील अन्य लोकांसारखे लेंचेपेंचे होत नाहींत. ते लोकोत्तर दृढ व चिरस्थायी असतात. अतएव आह्मी अविचारानें इतरांचें अनुकरण करून आमच्या लग्नसंस्थेच्या अत्यंत मजबूत अशा पायास धक्का पोहचेल अशी कोणतीही गोष्ट करूं नये. तो पाया आहे तसाच कायम ठेवून मग अन्य बाबतींत योग्य वाटतील त्या सुधारणा कराव्या, अशी आमची सविनय सूचना आहे. आतां सुधारणा करण्यायोग्य अशा अन्य बाबती कोणत्या आहेत, तें ठरविण्याचें काम समाजधुरीणांचें व सुज्ञ जनांचें आहे; व त्यांच्या कार्यांत त्यांस मदत करावी अशा बुद्धीनें आह्मी जगांतील पुष्कळ लोकांच्या लग्नविधि व सोहळ्यांचा हा ग्रंथ त्यांस सादर केला आहे.

मिळालेल्या मदतीबद्दल संतोषप्रदर्शन.

प्रस्तुत ग्रंथाच्या कामीं आह्मी मुद्दाम मदतीसाठीं मागून घेतलेले रा. रा. चंद्रशेखर शिवराम गोऱ्हे यांचा आह्मांस चांगला उपयोग झाला आहे. सदरहू तरुण गृहस्थ एक होतकरू मराठी लेखक व कवि आहेत, आणि त्यांनीं अश्रांत परिश्रम करून आह्मांला प्रत्येक बाबतींत संतोषकारक साहाय्य केलें आहे. येवढें येथें नमूद केल्यावांचून रहावत नाहीं.

महाराजाभिनंदन व ईशप्रार्थना.

शेवटी आमचे विद्याभिलाषी व समाजहितेच्छु **श्रीमंत सरकार सयाजीराव महाराज गायकवाड** यांनीं बहुजनसमुदायास एका महत्वाच्या सामाजिक विषयाचा ऊहापोह, व सारासार विचार करण्यास प्रस्तुत ग्रंथरूपी जें साधन दिलें, त्याबद्दल आह्मी महाराजांचे प्रेमपुरःसर अभिनंदन करितों. आमचे लोकप्रिय महाराज दीर्घायु व सुखी होवोत! आणि ते महाराष्ट्रवाङ्मयाची, समाजहिताची, व स्वदेशकल्याणाची उत्तरोत्तर अभिवृद्धि करण्यास आह्मांला असेंच सदैव प्रोत्साहन देवोत! अशी त्या सर्वशक्तिमान् परमेश्वरापाशीं आमची अनन्यभावें प्रार्थना आहे.

बडोदें, ऑक्टोबर.
सन १९०४.

ग्रंथकार.

लग्नविधि व सोहळे.

भाग १ ला.

पौर्वात्य लोकांचीं लग्नें.

ल ग्न हें मानवी चरित्रांत एक मोठें स्थित्यंतर करणारें, आणि

कृत्य होय. तें केल्यानें मनुष्य संसारपाशांत बद्ध हो

वरील जबाबदारीची मर्यादा पूर्वापेक्षां अनेक पटीनें वा

ह्मणजे, तो अविवाहित असतांना त्याचे विचार आणि कृ

उपोद्धात.

बहुतकरून त्याच्या स्वतःपुरती–एका व्यक्तीपुरती–अस

इतरांविषयीं तो फारशी दरकार करीत नाहीं, व ती क

त्याला वस्तुतः कारणही दिसत नसतें. सबब, त्याच्या बोलण्या चा

एक प्रकारची बेपर्वाई दृष्टीस पडते. त्यांतून त्याला चांगलेसें शिक्षण

नसलें, व प्रसंगवशात् कोणी शास्ता नसला, ह्मणजे तारुण्याच्या

सदसद्विवेकबुद्धीचा लोप होऊन त्याच्या विचारांस अनीतीचें बळ

ण्याचा फार संभव असतो. अर्थात् त्याचे दुर्विचार त्याला दुराचारा

करितात; आणि मग तो मनुष्य आपल्या संगतीनें पुष्कळ वेळां

घडविण्याला कारणीभूत होती. निदान आजकालच्या मन्वंतरांत असा प्रकार घडून येईल हें पूर्वीं जाणूनच कीं काय, आमच्या धर्मशास्त्रकारांनीं

> " अनाश्रमी न तिष्ठेत दिनमेकमपि द्विजः ।
> आश्रमेण विना तिष्ठन् प्रायश्चित्तायते हि सः ॥ "
> " अविप्लुतब्रह्मचर्यो लक्षण्यां स्त्रियमुद्वहेत् ।"

इत्यादि वचनें लिहून ठेविलीं आहेत.

सदव, ब्रह्मचर्याश्रम संपल्यावर अथवा योग्य वयांत आल्यावर पुरुषाचा विवाह करावा हा मार्ग उत्तम होय. ती झाल्यानें त्याच्या विचारांस आणि वर्तनास चांगली दिशा लागण्याची आशा असते. त्याचा स्वभाव दिवसेंदिवस सौम्य होत जातो. प्रेम, विनय, भूतदया, परोपकारबुद्धि, इत्यादि उच्चप्रतीचे मनोविकार त्याच्या ठायीं जागृत होतात. आपलें जन्म केवळ आपल्याकरितांच नव्हे, त्यापासून इतर पुष्कळांना ...योग होण्यासारखा आहे, आपलें कुटुंब, आपला समाज, आपलें राष्ट्र, ...आपली पुढील पिढी, ह्यांच्यासंबंधानें आपल्या माथीं कांहीं कर्तव्यकर्में ...लीं आहेत, व तीं आपण केलीं पाहिजेत; सारांश, आपण आपल्या राष्ट्राचे घटकावयव आहोंत, इत्यादि उदात्त कल्पना विवाहित पुरुषाच्या डो... घोळूं लागतात. मग साहजिकच त्याला जगाची चाड वाटूं लागते. ...र्वांशींच फटकून वागत नाहीं. अर्थात् तो एक घरभारी अथवा गृहस्थ ... जातो. पुरुषाप्रमाणें स्त्रीच्या चरित्रांतही विवाहामुळें स्थित्यंतर होत ... तिचा उच्छृंखलपणा कमी होतो. ती मर्यादशील बनते. प्रेम, वात्सल्य, आदर, सहनशीलता, इत्यादि उच्च व कोमल मनोविकार तिच्या ठायीं प्रगट होतात. आपलें पालनपोषण करणारा, आणि आपल्या हरएक सुखासाठीं व कल्याणासाठीं रात्रं... टणारा जो आपला पति, त्याजवर अकृत्रिम प्रेमभाव ठेवणें, ...ण्यापिण्याची उत्तम व्यवस्था ठेवून त्याचा श्रमपरिहार करणें,

...त हो-
...तर.

मर्यादा वाढवावी, असें आह्मांस वाटलें; आणि ज्याअर्थी श्री. युवराजांच्या लग्नाचें मंडपोद्वासनही होऊन गेलें होतें, त्याअर्थी आमच्या संकेताला समाजहितेच्छु अशा श्रीमन्महाराजांचें पूर्ण अनुमोदन मिळालें. इतकेंच नव्हे, परंतु त्यांनीं स्वतः ह्या ग्रंथाची उपयुक्तता व्यापक होण्याजोगी त्याची सीमाही आह्मांस काढून दिली! नंतर त्या सीमेस अनुसरून ग्रंथ रचण्याच्या उद्योगास लागलों; व परमेश्वरकृपेनें तो शेवटास जाऊन आज वाचकांस सादर केला आहे. विषयविस्तारामुळें ग्रंथ पुरा होण्याला विलंब लागला; पण तसें होणें अगदीं साहजिक होय. तत्रापि, **श्रीमंत महाराजप्रभृति** आमचे वाचकजन त्याबद्दल आह्मांस उदारबुद्धीनें क्षमा करतील, व हंसाप्रमाणें पक्षपातबुद्धीनें ह्यांतील गुणक्षीर तेवढेंच ग्रहण करतील अशी आशा आहे!

ग्रंथाचें स्वरूप.

ह्या ग्रंथाचे **पौर्वात्य लोकांचीं लग्नें** आणि **पाश्चात्य लोकांचीं लग्नें** असे दोन भाग केले आहेत. पैकीं पहिल्या भागांत आशिया आणि आफ्रिका ह्या दोन खंडांतील, आणि दुसऱ्या भागांत यूरोप व अमेरिका ह्या दोन खंडांतील भिन्न भिन्न लोकांच्या लग्नांविषयीं माहिती दिली आहे. उद्देश असा कीं, लग्नसंस्थेचें स्वरूप जगांतील कोणकोणत्या लोकांत कसकसें आहे तें कळून यावें. ह्मणजे, कोणत्या लोकांत लग्न हा एक धार्मिक विधि अथवा संस्कार समजून केला जातो, कोणत्या लोकांत त्यास कायदेशीर करार असें समजतात, व कोणत्या लोकांत तें वरील दोन्ही प्रकारांहून कांहीं निराळ्याच स्वरूपाचें आहे, तें समजावें. तसेंच, सोहळे अथवा देशाचार हेंही लग्नकार्याचें एक अंगच होय. सबब, त्यासंबंधानें जेवढी माहिती उपलब्ध झाली, तेवढी दिली आहे. तिच्या योगानें वाचकांचें मनोरंजन होईल, आणि नानालोकांच्या चालीरीतींचें व रुचिवैचित्र्याचें अवलोकन, हा जो आजकाल सार्वविषयक शिक्षणाचा (liberal education) एक भाग समजला जातो, त्याचा त्यांस अनायासें लाभ होईल, अशी आशा आहे.

ग्राह्याग्राह्य विचार.

प्रस्तुत ग्रंथाचा विषय विशेष मतभेदाचा व रुचिवैचित्र्याचा असल्यानें त्यांतील प्रत्येक गोष्टीच्या ग्राह्याग्राह्यतेसंबंधीं आमचीं एकट्याचीं मतें सर्वमान्य होतील असें मुळींच नाहीं. सबब, तीं प्रकट करण्यांतही अर्थ नाहीं. तत्रापि, ग्रंथांतील एकंदर लग्नविधि व सोहळ्यांचें स्थूलमानानें व प्रांजलपणें अवलोकन करितां आह्मांला आमच्या लग्नासंबंधीं ज्या कित्येक गोष्टी वस्तुतः ग्राह्य, किंवा अग्राह्य व सुधारणा करण्यायोग्य दिसून येतात, त्या सांगतों.

आमच्या लग्नसंस्थेचें श्रेष्ठत्व, आणि तिचें सर्वस्व.

आमच्या अप्रतिम विद्वान् आणि अत्यंत सूक्ष्मविचारी पूर्वजांनीं आमच्या लग्नसंस्थेचा पाया जितका खोल आणि जितका मजबूत घातला आहे, तितका खोल आणि तितका मजबूत पाया जगांतील इतर कोणत्याही लग्नसंस्थेचा दिसून येत नाहीं. अर्थात् आमची लग्नसंस्था जगांतील इतर सर्व लग्नसंस्थांपेक्षां जितकी विशेष पायाशुद्ध आहे, तितकीच ती विशेष चिरस्थायी आहे, विशेष उन्नत आहे, आणि विशेष उदात्तही आहे.संसारसंबंधीं एकंदर सुखें प्राप्त व्हावीं, धर्म, अर्थ आणि काम हे तीन पुरुषार्थ साधावे, इष्ट मित्र, अतिथि, अभ्यागत, पशु, पक्षी, इतकेंच नव्हे, परंतु आपापल्या कर्माच्याठायीं बद्ध होत्साते पिपीलिकादि अत्यंत सूक्ष्म कीटक, जे या पृथ्वीच्या पाठीवर संचार करितात, त्या सर्वांना सुख व्हावें, वेदविहित यज्ञयागादि पुण्यकर्में करितां यावीं, सारांश, धर्माची आणि प्रजेची अभिवृद्धि होऊन पुत् नामक नरकापासून मुक्तता व्हावी, आणि उभय कुलांतील बारा बारा पितरांचा उद्धार व्हावा, हे आमचे लग्न करण्याचे उद्देश आहेत. ह्यांतच आमच्या लग्न करण्याच्या आवश्यकता आहेत. ह्यांतच आमच्या लग्नाचा करार आहे. ह्यांतच आमच्या वधूवरांची संमति आहे. किंबहुना आमच्या लग्नसंस्थेचें सर्वस्व ह्यांत आलें आहे! ह्या करारानें व ह्या संमतीनें झालेला लग्नसंबंध अल्पस्वल्प कारणांवरून तटातट तोडितां येत नाहीं. इतका तो बळकट्तर होतो; आणि ह्याच कारणास्तव आह्मी आमची लग्नसंस्था जगांतील इतर सर्व लग्नसंस्थांपेक्षां श्रेष्ठ ह्मणून तिचा गौरव करीत आहों.

हल्लींचे विवाह-प्रकार.

आमच्या धर्मशास्त्रांत १ ब्राह्म, २ दैव, ३ आर्ष, ४ प्राजापत्य, ५ आसुर, ६ गांधर्व, ७ राक्षस, आणि ८ पैशाच असे आठ प्रकारचे विवाह सांगितले आहेत. परंतु त्यांपैकीं आज मितीस ब्राह्म आणि आसुर हे दोनच प्रकार विशेषेंकरून पाहण्यांत येतात. खालच्या वर्गाच्या कित्येक लोकांत गांधर्व, राक्षस, व कांहीं मिश्र पद्धतींचें अवलंबन केलें जातें. परंतु अशा पद्धतींनीं होणाऱ्या लग्नांची संख्या ब्राह्म आणि आसुर विवाहांच्या संख्येइतकी भरणार नाहीं असें आह्मांस वाटतें. आठही प्रकारच्या विवाहांत ब्राह्मविवाह हा सर्वोत्कृष्ट ह्मटला आहे. धर्मशास्त्राप्रमाणें पाहूं जातां, ह्या विवाहांत कन्यापित्यानें वरास आपल्या घरीं बोलावून त्यास आपली कन्या यथाशक्ति अलंकृत करून वर सांगितलेल्या उद्देशानें दान करावयाची असते. परंतु, आजकाल जे ब्राह्मविवाह होतात, ते कांहीं तऱ्हेवाइकच असतात! त्यांना ऋणकोनाम कन्यापिता व धनकोनाम वरपिता ह्या मारवाडी देवघेवीचें स्वरूप असतें! अमुक हुंडा दिलाच पाहिजे, अमकी करणी केलीच पाहिजे, इतक्या जेवणावळी द्याव्या लागतील, इतक्या असामींचा जाण्यायेण्याचा खर्च द्यावा लागेल, इत्यादि अटी वरपक्षाकडून कन्यापक्षास घालण्यांत येतात; आणि हा प्रकार जुन्या, अशिक्षित, व न सुधारलेल्या लोकांपेक्षां नव्या, सुशिक्षित, व सुधारक ह्मणविणारांमध्येंच फार दिसून येतो. त्यांच्यांत हुंड्याचें मान मुलांच्या परीक्षा उतरण्यावर चढत जातें! आणि तें येथपर्यंत कीं, त्याच्या पायीं कित्येक मुलींचे बाप कायमचे कर्जबाजारी होऊन संसारसुखास आंचवतात! अशा रीतीनें केवळ आपमतलबावर नजर ठेवून धर्मनियमांस आणि त्यांतील उदात्त तत्त्वांस हरताळ फासणें, व तीही आपणास सुशिक्षित आणि सुधारक ह्मणविणारांनीं फासणें, हें त्यांस मोठें लाजिरवाणें होय! हल्लींच्या ब्राम्हविवाहाच्याच उलट आसुर विवाह असतो. गरीबीमुळें किंवा द्रव्यलोभामुळें पुष्कळ गृहस्थ आपल्या मुली चांगल्या वयांत येईपर्यंत वाढवितात, आणि नंतर त्यांच्या वयाच्या व रूपाच्या मानानें जे कोणी जास्त पैसे देतील, अशा गरजू, उतारवयाच्या, कुरूप, किंवा गुणहीन मनुष्यांस त्या

देऊन टाकितात ! आपला तळिराम गार करण्यापुढें आपल्या मुलींच्या कल्याणाची मुळींच क्षिति न बाळगणारे निर्दय आणि अधम लोक हिंदु समाजांत कांहीं थोडे नाहींत. ते आणि त्यांचें कर्म हीं दोन्हीं आमच्या धर्मशास्त्रानें तर निंद्य ह्मटलींच आहेत; परंतु कित्येक समाजहितेच्छु कवींनीं देखील त्यांवर नाटकें रचून आबालवृद्धांकडून त्यांची निंदातिरस्कृति करविली आहे. तत्रापि तेणेंकरून कन्याविक्रयाची चाल बंद पडली, अथवा निदान कमी तरी झाली, असें अनुभवास येत नाहीं ! प्रांजलपणें ह्मटलें असतां, ज्यांत कन्येचा केवळ लिलांव केला जातो, असा आसुरविवाह जितका निंद्य आहे, तितकाच वर सांगितलेला मारवाडी देवघेवीचा ब्राह्मविवाह देखील निंद्यच होय. परंतु आमचे सुधारणाप्रिय देशबांधव जेव्हां त्या विवाहाचा अपकर्ष आणि ह्या विवाहाचा उत्कर्ष करण्यास प्रवृत्त होतात, तेव्हां त्यांची सुधारणा आपमतलबाची आहे, पक्षपाताची आहे, अथवा मारवाडी काव्याची आहे, असे ह्मटल्यावांचून राहवत नाहीं !

बालविवाहासंबंधी उद्गार.

लग्नासंबंधानें जगांतील पुष्कळ लोकांच्या रीतीभाती आह्मीं अवलोकन केल्या; आणि प्रस्तुत ग्रंथावरून त्या आमच्या वाचकांनाही दिसून येतील. परंतु एकंदरीनें पाहतां, विशेष खेदास्पद आणि लक्ष्यांत घेण्यासारखी गोष्ट अशी कीं, बालविवाहाचा घातक प्रघात जितका हिंदुस्थानांत आहे, तितका इतर फारच थोड्या देशांत आढळून येतो. भरतखंडाबाहेर पाऊल टाकिलें, कीं कांहीं तुरळक अपवाद खेरीज करून बहुतेक देशांतील वधूवरें प्रौढावस्थेस आलेलीं दिसतात; आणि लग्नसोहळा हा बहुधा त्यांच्या संयोगारंभाचाच सोहळा असतो ! आमच्या आणि परकीयांच्या रीतिरिवाजांत मोठा ढळढळीत भेद दाखविणारी ही एक गोष्ट होय; आणि तिच्या विषयीं आस्थापूर्वक विचार केला असतां फारच विषाद उत्पन्न होतो ! बालविवाहापासून आमच्या समाजाचें व आमच्या देशाचें केवढें भयंकर नुकसान होत आहे, ह्या विषयींची चर्चा कांहीं थोडी थोडकी झाली नाहीं. त्या संबंधानें मोठमोठ्या शहरीं अनेक

वेळां जाहीर सभा भरल्या, कडाक्याचे वादविवाद झाले, वर्तमानपत्रें व मासिकें ह्यांचे शेंकडों रकाने चिकार भरून निघाले, आणि स्वतंत्र पुस्तकेंही पण प्रसिद्ध झालीं.* आतां कोणतीही गोष्ट होण्याची बाकी ह्मणून उरली नाहीं. अखेरीस हा विषय ऐकण्याचा किंवा लिहिण्याचा वीट देखील आला! परंतु बालविवाह करण्याचा वीट मात्र आह्मांला अझून येत नाहीं! शिव शिव! काय ही घातक रूढि आमच्या हाडांमासांत खिळली आहे! तिच्या प्रतिकारार्थ येवढे जरी उपाय केले, तरी तिच्या वज्रलेपास ह्मणून भंग नाहीं! आमच्या देशबांधवांनीं हें पक्कें समजून ठेवावें, कीं जोंपर्यंत बालविवाहाचे दुष्परिणाम डोळ्यांसमोर धडधडीत दिसत असतां आपण त्यांकडे दुर्लक्ष करीत आहोंत, जोंपर्यंत आपण ह्या क्षयाची प्रतीति पहात आहोंत, जोंपर्यंत ही घातक रूढि एकदम झुगारून देण्याचें आपणांला धैर्य नाहीं, आणि जोंपर्यंत आपली गृहस्थिति सुधारण्यापुरताही आपणांत मगदूर नाहीं, तोंपर्यंत आपणांला स्वातंत्र्याची आशा करणें नको! स्वातंत्र्य मिळविण्याला आपल्या पायांवर उभे राहण्याची ताकत लागते,—मणगटांत जोर असावा लागतो. मोठमोठ्या शहरीं सालोसाल जत्रा भरविल्यानें आणि वाक्पांडित्याच्या केवळ शुष्क गर्जना केल्यानें त्यांतून समाजोन्नतीचा किंवा स्वातंत्र्याचा एक बिंदूही प्राप्त होणें नाहीं. समाजसुधारणा आणि स्वातंत्र्य ह्या गोष्टी तोंडाच्या नव्हत! हाताच्या आहेत. आणि जोंपर्यंत बालविवाहामुळें आमच्या होतकरू पिढीनें आपले हात जमिनीस टेंकले आहेत, तोंपर्यंत त्यांच्या मानेवरील पारतंत्र्याचें जोखड मानेवरच राहील!

---

* आमच्या समाजहितेच्छु **श्रीमंत गायकवाड सरकारांनीं** नीतिधैर्यास जागून निदान आपल्या प्रजेच्या कल्याणापुरताच कां होईना, पण ह्या घातक बालविवाहास प्रतिबंधक असा कायदा देखील केला आहे. जनहितार्थ त्यांनीं घालून दिलेलें हें उदाहरण स्तुत्य व अनुकरणीय होय. वस्तुतः आपलें हिताहित कशांत आहे, तें लोकांनीं समजून असल्या बाबतींत सरकारास कायदा करण्याचा प्रसंगच आणूं नये, हें चांगलें. परंतु ज्या अर्थी ते जाणून बुजून आपल्या अवनतीस प्रवृत्त होतात, त्याअर्थी त्यांस सक्तीनें उन्नतीकडे वळविणें, हें जनहितकारी व दूरदर्शी राजास भाग पडतें! व त्यांत राजाचा मुळींच दोष नाहीं.

वधूवरांच्या पत्रिका व मुहूर्त पाहण्याविषयीं.

आतां पत्रिका व सुमुहूर्त पाहणें ह्या दोन गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. सबब, तत्संबंधीं थोडेंसें दिग्दर्शन करितों. सोयरीक जमविण्यासाठीं मुलामुलींच्या पत्रिका पाहण्याची चाल हिंदू, जैन, व पारशी ह्या लोकांत तर आहेच; परंतु ती क्वचित् रोमन कॅथलिक पंथाच्या ख्रिस्ती लोकांतही आढळून येते. (उदाहरणार्थ पहा, 'सीरियाच्या ख्रिस्ती लोकांची लग्नरीति.' पान ४६३ कलम २.) वधूवरांच्या पत्रिका मिळाल्याखेरीज त्यांचें लग्न लावण्याला हरकत आहे, अशी वर सांगितलेल्या लोकांची समजूत आहे. हा विषय ज्योतिःशास्त्राचा आहे, व तें शास्त्र अनुभवसिद्ध आहे असें ह्मणतात. त्याच्या साहाय्यानें मनुष्याच्या जीवनचरित्रांत काय काय गोष्टी केव्हां आणि कशा घडून येतील ह्यासंबंधी अनुमानें काढितां येतात. मागील अनुभवांवरून कोणत्याही भावी गोष्टींची अगाऊ अटकळ बांधून तीप्रमाणें सावधगिरीनें वागणें, हा मानवी ज्ञानाचा उत्तम उपयोग होय. परंतु अटकळ बिनचूक उतरली, तरच ती बांधण्यांत हशील आहे; व ती तशी उतरावी एतदर्थ, ती ज्या साधनांनीं बांधावयाची, तीं साधनें अगोदर बिनचूक आहेत अशी खात्री असली पाहिजे. ज्या पत्रिकांवरून वधूवरांच्या भावी चरित्रांचें ठोकळ अनुमान बांधण्यांत येतें, त्या पत्रिका अगदीं अचूक आहेत अशी खात्री क्वचितच असते. अर्थात् त्यांवरून वर्तविण्यांत येणारी भविष्येंही क्वचितच बरोबर उतरतात. मग असल्या अविश्वसनीय पत्रिकांवर सर्वस्वी विश्वास ठेवण्यांत अर्थ तो काय? बरें, पत्रिका पाहिल्याच पाहिजेत, असा आमच्या धर्मशास्त्राचा आग्रह दिसत नाहीं. उलट, शास्त्रानें "**शुद्धगोत्रकुलादिभिर्गुणयुतां कांतां वरश्चोद्वहेत्।**" अशी मोकळीक दिली आहे. मग पत्रिका पाहण्याचा उपटसूळ खांद्यावर कां घ्यावा तें समजत नाहीं! ह्या संबंधानें दुसरा आक्षेप असा कीं, ज्यावेळेस ज्योतिःशास्त्र अस्तित्वांत आलें, त्यावेळच्या ग्रहमानांत व हल्लींच्या ग्रहमानांत पुष्कळ तफावत पडला असला पाहिजे. परंतु आमचें ज्योतिःशास्त्र मात्र अद्यापि जसेंच्यातसें निश्चल आहे! तेव्हां चल अशा ज्योति (अर्थात् ग्रह) आणि निश्चल असें शास्त्र ह्यांचा मेळ बसावा कसा? जर त्या शास्त्राच्या साहा-

ल्यानें बिनचूक अनुमानें निघावीं अशी इच्छा असेल, तर त्या शास्त्रास आतां चाळन देणें जरूर आहे; आणि जोंपर्यंत त्यास चाळन देणारा प्रति **भास्कराचार्य** आमच्यांत निर्माण होत नाहीं, तोंपर्यंत अत्यंत जीर्ण झालेल्या ज्योतिःशास्त्राशीं खोट्यानाट्या पत्रिका पडताळीत बसण्यांत आणि कुडमुडे जोशी जें भविष्य वर्तावितील त्यावर सर्वस्वीं भिस्त ठेवून चालण्यांत कांहीं एक हांशील नाहीं. ह्यावरून ज्योतिःशास्त्र, ज्योतिषी, व पत्रिका ह्यांची आह्मीं निंदातिरस्कृति करितों असें मुळींच समजूं नये. ह्या सर्वांविषयीं आमच्यांत पूज्यबुद्धि आहे. आमच्या ह्मणण्याचा भावार्थ येवढाच कीं ज्योतिःशास्त्र ताजें झळझळीत पाहिजे, ज्योतिषी आपल्या विद्येंत निष्णात व बिनचूक भविष्य वर्तविणारे पाहिजेत, आणि पत्रिका अनुमानधक्यानें केलेल्या नकोत, तंतोतंत खऱ्या पाहिजेत. त्या तशा नसल्यामुळें हल्लीं पुष्कळ लग्नें पत्रिका पाहून केलीं असतांही तीं शुभपरिणामक होत नाहींत. तसेंच पत्रिका न पाहतां प्रीतिविवाह ह्मणून करण्यांत आलेलीं पुष्कळ लग्नें इष्ट परिणामक दिसून येतात. त्यामुळें पत्रिका पाहून लग्नें लावण्याच्या रिवाजाविषयीं मन साहजिकच द्विधा होतें. ह्या अविश्वसनीय पत्रिका न जमण्याच्या अडचणीमुळें कित्येक वधूवरें सर्वथा अनुरूप असून त्यांचीं लग्नें होत नाहींत, व केवळ पत्रिका जमतात ह्या सबबीवर कित्येक रत्नें कोंबड्याच्या गळ्यांत बांधलीं जातात! सबब, ज्या पत्रिकांसाठीं असले विजोड जोडप्यांत येतात, ज्या पत्रिकांसाठीं कित्येक जोडपीं एकमेकांविषयीं जन्मभर नाखूष ठेविलीं जातात, त्या पत्रिका निदान ज्योतिर्विद्येचें पुनरुज्जीवन होईपर्यंत तरी तशाच गुंडाळून ठेवाव्या, आणि लग्नें जमविण्याच्या कामीं त्यांचें उगीच थोतांड माजवूं नये, असें आमचें मत आहे.

मुहूर्ताविषयीं.

सुमुहूर्तावर अथवा शुभ दिनीं लग्न लावण्याची चाल हिंदू, जैन, शीख, पारशी, मुसलमान, चिनी व जपानी लोक, प्राचीन ग्रीक व रोमन, वगैरे पुष्कळ लोकांत पाहण्यांत येते. परंतु त्यासंबंधानें आमच्यांत जेवढी चिकित्सा करितात, तेवढी कोणांतही करीत नाहींत. लग्न शुभपरिणामक व्हावें, हा मुहूर्त पाहण्याचा मूळ उद्देश आहे, व तो केव्हांही वावगा ह्मणतां येणार नाहीं. परंतु पुष्कळ वेळां असा बनाव बनून

येतो, कीं जोशीबोवांनीं उत्कृष्ट ह्मणून नेमून दिलेल्या लग्नतिथीस कार्य करणारांचीं मनें उदास, व मुद्रा खिन्न झालेल्या दिसतात. मुहूर्तमार्तंडाचा प्रकाश किंवा मुहूर्तचिंतामणीची कांति त्यांच्या चेहऱ्यावर मुळींच व्यक्त होत नसते! मग पंचांग चुकीचें असो, जोशीबोवांची गैरसमज असो, वा अन्य कोणतेंही कारण असो. परंतु अशी स्थिति होते खरी! तेव्हां अर्थात् असें ह्मणणें ओघालाच येतें, कीं दिवसाचें मांगल्य हें केवळ मनाच्या प्रसन्नतेवर आणि मांगल्यावर अवलंबून आहे. ज्या दिवशीं मनाला आनंद व उत्साह वाटेल, तो दिवस मंगलच होय. इतकेंच नव्हे, पण त्या दिवशीं जें जें कृत्य करावें, तें तें लग्नासारखेंच मंगल वाटतें. मग अशा दिवशीं लग्न कां करूं नये बरें?

आमच्या सर्वोत्कृष्ट लग्नपद्धतींतील कित्येक व्यंगें! मंत्रांची अगम्यता, व अप्रयोजकता.

आतां, कालमानामुळें आमच्या सर्वोत्कृष्ट लग्नपद्धतींतही कांहीं व्यंगें दिसून येतात! तथापि, त्यांजकडे आमचे वेदशास्त्रसंपन्न आणि इतर सुशिक्षित व सारासार विचार करणारे देशबांधव कांहीं लक्ष्य देतील, तर तीं व्यंगें सहज दूर होण्यासारखीं आहेत. पैकीं पहिलें आणि ढळढळीत व्यंग ह्मटलें, ह्मणजे लग्नविधींतील मंत्रांचें अर्थ न समजणें हें होय. सदरहू मंत्र आमच्या विद्वान् पूर्वजांनीं प्राचीन कालीं प्रचलित असलेल्या संस्कृत भाषेंत ग्रथित केले आहेत. ही भाषा हल्लीं व्यवहारांत नाहीं; व तिचें शिक्षण फक्त विश्वविद्यालयांतील परीक्षा उत्तीर्ण होण्यापुरतेंच दिलें घेतलें जातें. तेव्हां ही भाषा चांगल्या रीतीनें समजणारे लोक शेंकडा दोन तरी निघतील किंवा नाहीं, ह्याची वानवाच आहे. कोणत्याही स्त्रीपुरुषांना जन्मपर्यंत एकमेकांच्या बंधनांत घालणारा लग्नविधि किती महत्वाचा असतो, तें निराळें सांगावयास नकोच. परंतु तो विधि संस्कृतांत असल्यानें व त्याचे सांगते आणि कर्ते हे सारेच केवळ प्राकृत जन असल्यानें तो विधि नुसता खटपटपंचीप्रमाणें अज्ञानपूर्वक सांगितला व केला जातो. लग्नाच्या निर्विघ्नतासिद्ध्यर्थ करण्याचें ईश्वराचें आवाहन व प्रार्थना, कन्यादानसंकल्प, प्रतिग्रहादिकांची विधानें, वधूवरांचीं परस्पराभिवचनें, इत्यादि भाग ह्मणजे

सोपानकरणं पश्चिमभागे उपरि, चतुर्दिक्षु वा अधो, यथाचारम् ।
सोपानातिरेकेण चतुर्हस्ता चतुरस्रा । इति विवाहवेदी ॥

प्रयोगरत्नाकर:

ह्मणजे बहुलें (वधूच्या) घराबाहेर डाव्या बाजूस घालावें. त्याची उंची एक हात व लांबीरुंदी अनुक्रमें चारचार हात असावी. अर्थात् तें चौरस असावें. हस्तप्रमाण सांगितलें, तें वराच्या हाताचें घ्यावें. तथापि, तें मिळविण्याइतका अवकाश नसल्यास घरांतल्या घरांत वधूच्या हाताचें प्रमाण घेतलें तरी चालेल. हें प्रमाण फक्त ब्राह्मण वर्णाकरितांच आहे. क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र वर्णाकरितां दिलेल्या प्रमाणांतून अनुक्रमें दोन, तीन व चार अंगुळें कमी करावींत. बहुल्याचा पृष्ठभाग सपाट असावा. त्यास पायऱ्या कराव्या. त्या करण्याचे दोन पक्ष आहेत; एक तर पश्चिम दिशेला वरच्या अंगास कराव्या; (व हाच प्रकार बहुधा पाहण्यांत येतो,) किंवा चारी दिशांस खालच्या बाजूस कराव्या. पायऱ्या करण्यासाठीं जी जागा लागेल, ती वर सांगितलेल्या मापाखेरीज घ्यावी. मतलब हा कीं, त्यामुळें बहुल्याच्या विहित प्रमाणामध्यें कमीपणा येऊं नये. तें कायम रहावें. बहुल्याचा पृष्ठभाग पूर्वोत्तर किंचित् सखल ठेवावा. ह्या प्रमाणें तें तयार झालें, ह्मणजे त्याच्या चारी कोनांस चार सुशोभित स्तंभ रोंवून त्यास मंगल पल्लवांच्या महिरपा व केळीचे खांब लावावे. नंतर त्या खांबांजवळ रंगविलेले, आणि वर हंसशुकादिकांचीं चित्रें काढिलेले मातीचे कुंभ (घया) रचावे. पाण्यानें भरलेला सुवर्णकलश, आणि पुष्पगंधादि सुगंधि द्रव्यें, ह्यांनीं तें बहुलें शोभिवंत केलेलें असावें; व त्या सभोंवतीं मंगलवाद्यें वाजत असतां, नृत्यगीत चाललें असतां, ब्राह्मणांचे पवित्र आशीर्वाद होत असतां व 'औक्षण' करणाऱ्या सुवासिनींच्या दीपांनीं त्यास मनोहर स्वरूप प्राप्त झालें असतां, त्या अग्नियुक्त वेदिकेवर अथवा बहुल्यावर वधूवरांनीं आरोहण करावें. धर्मशास्त्रकारांनीं असें ह्या बहुल्याचें वर्णन केलें आहे.

वेदीवर्णन.

आतां, सर्वसाधारण लोकांस वरील वर्णनाप्रमाणें बहुलें तयार करण्याची अनुकूलता असते असें नाहीं. कित्येक वेळां तर जमीनीवर हळदीचें बोहलें काढून त्याचरच कार्यभाग करून घेतला जातो! वरील वर्णन सर्वोत्कृष्ट बहुल्याचें असून तें येथें केवळ नमुन्यादाखल दिलें आहे.

सामान्य लोकांची वेदी व वधूवराचें वेदीवर आरोहण.

कुंकुमपत्रिका:—तिथिनिश्चय झाल्यावर आपल्या इष्टमित्रांपैकीं जे कोणी दूर अंतरावर बाहेर गांवीं रहात असतील, त्यांना योजिलेल्या ठिकाणीं लग्नाच्या वेळीं येतां यावें, अशा उद्देशानें निमंत्रणें करावयाचीं असतात. त्यासाठीं जीं पत्रें तयार करितात, त्यांस लग्नचिठ्या, मूळचिठ्या, किंवा कुंकुमपत्रिका असें ह्मणतात.

उद्देश.

पूर्वी हीं पत्रें हातानें लिहून त्यावर केशराच्या किंवा कुंकवाच्या पाण्याचा शुभसूचक शिडकाव करून नंतर तीं बाहेरगांवीं जासुदाबरोबर पाठविण्याचा रिवाज होता. अशा कुंकुमपत्रिका श्रीव्यंकटेशाच्या लग्नसमयीं सर्व देवादिकांस निमंत्रण करण्याकरितां पाठविण्यांत आल्या होत्या, असा भविष्योत्तर पुराणाच्या दहाव्या अध्यायांत दाखला सांपडतो. तसेंच, दमयंतीच्या स्वयंवरकालींही ह्या लग्नपत्रिका पाठविण्यांत आल्या होत्या, त्याचें वर्णन रघुनाथपंडितांनी केलें आहे, तें असें:—

कुंकुमपत्रिकेच्या रूढीचें प्राचीनत्व.

दिंडी.

नगर सारें शृंगारविलें तैसें।
भूमि-लोकीं वैकुंठ दिसे जैसें॥
लिखित पाठविलें सकळ नृपां कैसें।
तुह्मीं यावें श्री स्वैंवरासि ऐसें॥ १३७॥
निषध-राजासी लिखित पाठवी तो।
प्रति-द्वीपीं भू-पतिसही लिहीतो॥
अशा यत्नीं लागला नृप अहो तो।
पुढें परिसा वृत्तांत कसा होतो॥ १३८॥

करण्याची चाल सुरू झाली. त्यायोगानें प्रथमत: जातींतल्या जातींत मुलगी निश्चित करून तिच्याशीं विवाह करण्याचा प्रघात पडला.

स्त्रियांवरील मालकीचा हक्क कुटुंबसंस्थापना व एकपत्नीकत्व.

नंतर कांहीं कालानें जी वस्तु ज्या जातींत असेल, त्याजातीचीच तिजवर सत्ता आहे अशा कल्पनेचा उदय होऊन तिचा पगडा जन-समाजावर बसला. तसेंच पूर्वी ज्या वस्तू मिळविण्यासाठीं शारीरिक सामर्थ्याचा उपयोग करावा लागे, त्या आतां विनिमयाच्या तत्त्वावर संपादन कराव्या, असें लोकांस वाटूं लागलें. ह्या दोन नवीन कल्पना अस्तित्वांत आल्यामुळें साहजिक रीतीनें पत्नी संपादन करण्याच्या पद्धतींतही बराच फेरफार झाला. प्रथमत: स्त्री ज्या जातीची असेल, त्या जातीच्या पुढारी पुरुषाची तिजवर सत्ता आहे, असें मानण्यांत आलें. पुढें कुटुंबसंस्था अस्तित्वांत आल्या. तेव्हां स्त्रियांवर त्यांच्या कुटुंबांतील सर्वांत वडील पुरुषांची, व नंतर अनुक्रमें पतीची मालकी आहे, असें सर्वांना वाटूं लागलें. त्यायोगानें अर्थातच अन्य जातींतील स्त्रियांचा अपहार करण्याची दुष्ट चाल बंद पडली; आणि लोक स्वजातीच्या निरनिराळ्या कुटुंबांतील स्त्रिया विनिमयानें घेऊन त्यांच्याशीं विवाह करूं लागले. नंतर अनेक स्त्रियांचें पोषण करणें कठिण वाटून बरेच पुरुष एकपत्नीक राहूं लागले.

प्रीतिविवाहाचा प्रारंभ.

पुढें सुधारणेची जसजशी प्रगति होत चालली, आणि शास्त्र व तत्त्व-ज्ञान ह्यांच्या शिक्षणानें लोकांचीं मनें संस्कृत होऊन नव्या नव्या उदात्त कल्पना त्यांच्या डोक्यांत येऊं लागल्या, तसतसें स्त्रियांना योग्य तें स्वातंत्र्य देणें, व त्यांचें सर्व प्रकारें संरक्षण करणें, हें पुरुषांचें एक कर्तव्यकर्म आहे, असें त्यांस वाटूं लागलें. स्त्रीपुरुषांनी आपापल्या पसंतीप्रमाणें अनुक्रमें पतिपत्नीची निवड करून त्यांच्याशीं लग्नें केलीं, तर त्यांची जीवनयात्रा अधिक सुखावह होऊन ती निर्विघ्न रीतीनें पार पडेल, अशी लोकांत समज आली. परस्प-रांच्या प्रीतीनें झालेला विवाह चिरस्थायी व उभयपक्षीं श्रेयस्कर होईल असें त्यांना कळूं लागलें; व तेणेंकरून समाजामध्यें प्रीतिविवाह रूढ झाला.

हल्लींच्या सुधारलेल्या पाश्चात्यांची करार व संमतिमूलक लग्नें.

हल्लींच्या सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांत लग्न हें नेहमीं वधुवरांच्या संमतानें होतें, व तें त्यास बंधनकारक असून कबूल आहे, असें दर्शविण्याकरितां त्या उभयतांकडून देवळांत एक प्रकारचा साधा विधि करवितात; किंवा सरकारी अंमलदारासमक्ष साक्षीदार ठेवून त्यांस लग्न करावें लागतें, आणि तें झाल्यावर त्याची नोंद ठेवण्यांत येते. पाश्चात्य जनसमाजांत वधूवरसंमति आणि त्यांचा करार हीं विवाहाचीं दोन प्रधान अंगें मानिलीं जातात; आणि धार्मिकविधि हा केवळ त्या कराराचें उपांग होय, असें समजून तो करण्यांत येतो, वा येतही नाहीं. अर्थात् उभयपक्षांच्या संमतीला आणि त्यांच्या कराराला जें महत्व आहे, तें लग्नविधीला नाहीं, हें स्पष्ट होतें.

करार व संमतिमूलक लग्नावरील आमचा आक्षेप. व तात्पर्य निर्णय.

परंतु ह्यावर आमचा मोठा आक्षेप आहे. तो असा कीं, जर पाश्चात्य वधूवरें प्रौढवयस्क असतात, लग्नापूर्वी तीं एकमेकांचा परिचय आणि प्रेम संपादन करण्यांत कित्येक दिवस घालवितात, उभयतांस परस्परांच्या स्वभावांची ओळख होते, तीं अन्योन्यांस प्राणांहून प्रिय वाटतात, लग्न करण्यास उभयतांची पूर्ण संमति असते, आणि तीं परस्परांच्या बंधनांस जर आपल्या राजीखुषीच्या व अक्कलहुशारीच्या करारानें समजून उमजून बद्ध होतात, तर मग त्यांच्या लग्नसंबंधाला शाश्वती कां नसावी? अल्पस्वल्प कारणांवरून एकमेकांनीं एकमेकांस तडातड काड्या मोडून देण्यास कां प्रवृत्त व्हावें? आणि पाश्चात्य न्यायाधीशांपुढें राजीनाम्याच्या खटल्यांच्या (Divorce Cases) नित्य नव्या राशी कां पडाव्या? सूक्ष्म दृष्टीनें ह्यांतील इंगित पाहूं गेलें असतां, पाश्चात्य लग्नसंस्थेचा पाया कचा आहे, ही गोष्ट निर्विवाद सिद्ध होते. तारुण्याच्या जोमांत विकारवश झालेलीं पुष्कळ वधूवरें परस्परसंमतीच्या पांघरुणाखालीं चोरून लग्न लावण्यास प्रवृत्त होतात. **इंग्लंड व स्कॉटलंड** ह्यांच्या सरहद्दीवर **ग्रेटनाग्रीन** म्हणून एक खेडें आहे. तें तर अशा चोरीमारीच्या

अक्षतीची मिरवणूक काढण्याचे दोन मार्ग आहेत. कित्येक ठिकाणीं आपापल्या घरच्या देवांस अक्षत दिल्यावर प्रत्येक पक्षाची

मिरवणुकीची पद्धति.

स्वतंत्र मिरवणूक निघते; व कित्येक ठिकाणीं वधूकडील स्त्री-पुरुष मंडळी मिरवत मिरवत वरपक्षाकडे जाऊन त्यांच्या-बरोबर आपली मिरवणूक काढितात. पहिल्यापेक्षां दुसरा मार्ग अधिक चांगला दिसतो. कारण, दोन्हीकडील मंगलवाद्यांचे ताफे, व उंची पोषाक केलेला स्त्रीपुरुषांचा भव्य समुदाय एकत्र चालल्यानें मिरवणूक मोठी व प्रेक्षणीय होते. शिवाय उभयपक्षांस एकमेकांचें आगत्य जास्त दिसून येतें. विशेषेंकरून नवरामुलगा परगांवचा असल्यास दुसऱ्याच मार्गाचें अवलंबन करितात. त्याप्रमाणें ठरलें असतां वधूपक्षाची स्त्रीपुरुष मंडळी मिरवत वरगृहीं आल्यावर अरसपरस हळदीकुंकूं व पानसुपारी देतात. ह्या प्रसंगीं सुपारी कातरलेली न देतां सगळी देण्याचा रिवाज आहे. पानसुपारी झाल्यानंतर उभयपक्षाची वर सांगितल्याप्रमाणें एकत्र मिरवणूक निघते.

घाणा.—दळणें, कांडणें, इत्यादि कोणताही संस्कार करण्यासाठीं एखाद्या वस्तूचें जें प्रमाण एके वेळीं घेण्यांत येतें, त्यास

व्याख्या.

घाणा असें ह्मणतात.

लग्नादि मंगलकार्यांत देवतांस वाहण्यासाठीं किंवा आचारपरत्वें अंगास लावण्यासाठीं वधूवरांकडे 'चिकसा' ह्मणून एक सौभाग्य

उद्देश.

द्रव्य तयार करण्यांत येतें. त्यांत मुख्य पदार्थ ह्मणजे गहूं* व जोंधळे हीं दोन धान्यें होत. शिवाय, त्यांत थोडी हळद व कपुरकाचरी इत्यादि कुटून तयार केलेला सुगंधि मसालाही घालितात. चिकशाचे गहूं व जोंधळे कांडून व दळून त्यांचें पीठ करावयाचें असतें. ह्मणून लग्नदिवशीं प्रातःकाळीं त्यांचा घाणा भरावा लागतो.

---

* आचारपरत्वें गव्हांच्या जागीं तांदूळही घेण्याची चाल आहे.

बिजवरांच्या बायका नसून ज्यांना पुत्रसंतति आहे, अशा पांच सुवासिनी स्त्रिया घाणा भरण्याकरितां लागतात. त्या, वधू अथवा वर ह्यांना मदतीला घेऊन मंगलगीतें गाऊन घाणा भरितात. तो असा कीं, पिवळ्या वस्त्राच्या दोन चिंध्या घेऊन त्यांत प्रत्येकीं एकेक सुपारी व ढेकुरवाळें (ह्मणजे ज्याच्यावर ल्हान ल्हान गांठी आहेत असें) हळकुंड बांधितात. नंतर त्या दोन चिंध्यापैकीं एकीनें दोन मुसळें एकाशीं एक बांधितात. ह्या मुसळयुग्मास सुवर्णालंकारानें व आम्रपल्लवानें अलंकृत करण्याची चाल आहे. हें झाल्यावर दुसऱ्या चिंधीनें जात्याचा गळा व खुंटा ह्या सभोंवतीं वेष्टन देऊन त्यास गांठ मारितात. मग एका वेळूच्या दुरडींत पांच शेर गहूं व जोंधळे घेऊन ते त्या मुसळयुग्मानें हळू हळू कांडितात. कांडितांना वधूच्या अथवा वराच्या मंगलकार्यास अनुलक्षून पांच ओंव्या गातात. त्यानंतर ती धान्यें पूर्वोक्त रीतीनें ओंव्या गाऊन वर सांगितल्याप्रमाणें पिवळ्या फडक्यानें बांधिलेल्या जात्यानें दळतात, ह्मणजे घाणा भरणें झालें. हें कृत्य बहुतकरून लग्नदिवशीं प्रातःकाळीं उभयपक्षांकडे करण्यांत येतें. कारण, तें करण्याला लग्नमुहूर्त लागतो, ह्मणून वर सांगितलेंच आहे. घाणा भरणाऱ्या सुवासिनींस हळदीकुंकूं व साकरविडे देण्याची चाल आहे. पुढें मंगलकार्य संपेपर्यंत घरांत दळणें किंवा कांडणें हे संस्कार बंद ठेवून जात्यास व उखळमुसळांस विश्रांति देण्यांत येते. कारण, आगाऊ साहित्य तयार करितांना त्यांजपासून पुष्कळ काम घेतलेलें असतें.

(मार्जिन: वर्णन.)

उष्टी हळद:—लग्नदिवशीं वधूपक्षाकडे वर सांगितल्याप्रमाणें घाणा भरणें झाल्यानंतर तीन पाट एकाशीं एक लावून ओळीनें मांडितात; व त्यावर बनात अंथरून तिच्यावर नागमोडीच्या आकाराचा गव्हांचा चौक घालितात. नंतर त्या तयार केलेल्या आसनांवर वधूला आणि तिच्या मातापितरांस अथवा कन्यादान करणाऱ्या दंपत्यास बसवून त्या तिघांना सुवासिनी स्त्रिया मंगलवाद्यें वाजत असतां सुवासिक तेल लावितात;

(मार्जिन: वधूस हळद लावणें.)

आणि वधूच्या अंगास*पाण्यांत कालविलेली सुगंधि द्रव्ययुक्त हळद लावून मग त्या त्रिवर्गास मंगलस्नान घालण्यांत येतें. तें झाल्यावर वधूची मातापितरें अथवा कन्यादान करणारें दंपत्य रेशमी वस्त्रें व अलंकार परिधान करून व कपाळीं मंगलसूचक कुंकुमतिलक लावून मंडपांत पुण्याहवाचन वगैरे विधि करण्यास बसतें. ह्या जोडप्याच्या उजव्या बाजूस वधूलाही आणून बसवितात. ह्या वेळीं तिनें विवाहाला अनुरूप असा मांगलिक आणि विशिष्ट वेश धारण केलेला असतो. सबब, सर्व प्रकारच्या वाचकांस हिंदु व विशेषतः ब्राह्मणवधूची कल्पना येण्यासाठीं येथें तिचें थोडेसें वर्णन करणें जरूर आहे.

वधूचें वर्णन.

सुवासिक तेल, हळद, व उटणीं लावून अभ्यंगस्नान केल्यामुळें तिचीं सर्व गात्रें स्निग्ध व मनोहर दिसत असतात. तिनें एक पिव-ळें वस्त्र कासोटा न घालितां परकराप्रमाणें परिधान केलेलें असतें. ह्यास पटवस्त्र किंवा अष्टपुत्री असें ह्मणतात. अंगांत त्याच रंग[illegible] वस्त्राची चोळी गांठ न देतां उलटी घातलेली असते. तुळतुळीत काळाभोर असा केशपाश पाठीवर मोकळा सोडलेला असतो. [illegible] वाचा मळवट भरून डोकीस पुष्पांच्या व स्थलपरत्वें इत[illegible] मुंडावळी बांधिलेल्या असतात. हातांत लग्नचुडा ह्मणजे सर्व [illegible] बांगड्या असतात. गळ्यांत त्याच रंगाचे गळेसर सोन्याचे मणि व [illegible] सहित ओंवून घातलेले असतात; व पायांत आंगठ्याजवळच्या बो[illegible] चांदीचीं जोडवीं (लहान लहान वेढीं) आणि करंगळीजवळच्या बोटां[illegible] 'विरूद्या' नांवाचीं भूषणें घातलेलीं असतात. ह्याप्रमाणें तिनें आनखशि-खांत मंगलवेष धारण केलेला असतो.

वरास उष्टी हळद लावणें.

अशा वधूला समागमें घेऊन तिचें दान करणारें दंपत्य पुण्याहवाच-नादि विधि करण्यासाठीं आपल्या मंडपांत बसलें, ह्मणजे वधूपक्षाच्या कित्येक सुवासिनी स्त्रिया वधूस

* स्थलपरत्वें ह्या प्रसंगीं मातापितरांसही हळद लावण्याची चाल आहे.

लावून अवशिष्ट राहिलेली **उष्टी हळद** व सुवासिक तैलादि मंगल द्रव्यें एका तबकांत घेऊन वाजत गाजत वरगृहीं जातात. तेथें गेल्यावर पूर्वोक्त रीतीनें बनातीवर गव्हांचा चौक घालून तयार केलेल्या आसनावर नवऱ्यामुलास बसवून त्यास त्या स्त्रिया मंगलवाद्यें वाजत असतां सुवासिक तेल, वधूची उष्टी हळद, व इतर सुगंधि द्रव्यें लावून मंगलस्नान घालितात. नंतर वरपक्षाच्या सुवासिनी स्त्रिया उष्टीहळद घेऊन आलेल्या वधूकडील सुवासिनींस हळदकुंकूं पानसुपारी वगैरे देतात; ह्मणजे त्या वाजत गाजत वधूगृहीं परत जातात, आणि इकडे वरगृहीं वराचीं माता-पितरें मंगलस्नान करून, रेशमी वस्त्रें व अलंकार परिधान करून, कुंकुम तिलक लावून वरासह आपल्या मंडपांत पुण्याहवाचनादि कृत्यें करण्यास बसतात. ह्या समयीं वरानें रेशमी पीतांबर व अलंकार परिधान केलेले असतात, व कपाळीं कुंकुवाचा मळवट भरून फुलांच्या आणि स्थलपरत्वें इतर ...कारच्या मुंडावळी बांधिलेल्या असतात.

...र्वदिनकृत्य:—वर सांगितल्याप्रमाणें वधूवरांचीं मातापितरें ... आपापल्या संस्कार्य अपत्यांस ह्मणजे ज्यांचा विवाह व्हाव-...ाचा त्या वधू किंवा वरास बरोबर घेऊन स्वकीय मंडपांत ...वाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध, ग्रहमख व मंडपदेवताप्रतिष्ठा ...ार्मिक विधि करितात. ते करण्याचा सामान्य उद्देश, देवता, ग्रह ... पितर संतुष्ट व्हावे, व त्या सर्वांच्या कृपाप्रसादानें योजिलेलें मंगलकार्य ...विघ्नपणें पार पडावें असा असतो.

विवाहपूर्वदिन-कृत्य अशी सं-ज्ञा पडण्याचें कारण.

त्या सर्व विधींचीं संक्षिप्त वर्णनें यथाक्रमानें पुढें दिलीं आहेत. हीं सर्व कृत्यें बहुतकरून लग्नाच्या पूर्व दिवशींच करण्यांत येतात; आणि ह्मणूनच त्या सर्वांस 'विवाहपूर्वदिनकृत्य' अशी सर्वसाधारण संज्ञा आहे. तथापि, कचित् प्रसंगीं कांहीं तशीच अडचण आली, तर हीं कृत्यें विवाहदिवशीं प्रातःकाळीं घाणा भरून वधुवरांस हळद लाविल्यानंतरही केलीं जातात.

वरपक्षाची मंडळी वधूच्या घरीं आल्यावर वधूचा पिता किंवा घरांतील पुरस्कर्ता त्यांना स्वागतपूर्वक बैठकीवर बसवितो. नंतर त्याच बैठकीवर गाशा किंवा गालिचा अंथरून त्यावर नागमोडीच्या आकृतीचा गव्हांचा चौक घालून मागच्या बाजूस लोड ठेवून पूर्वाभिमुख असें एक विशिष्ट आसन तयार ठेविलेलें असतें, त्यावर चांगलीं वस्त्रें परिधान केलेल्या आणि अलंकारांनीं मंडित अशा वधूस आणून बसवितात. तिचा पिताही तिच्या जवळच बसतो. मग वराचा पिता वधूच्या समोर बसून तिच्या हातांत विडा (दोन पानें व एक सुपारी) आणि नारळ देऊन श्रीगणपति व कुलस्वामी यांचें स्मरण करून सर्वांसमक्ष वराच्या गोत्रप्रवरांचा आणि नांवाचा उच्चार करितो, व अशा वर्णनाच्या वराची भार्या होण्याकरितां अमुक गोत्रप्रवरांची व अमुक नांवाची ही कन्या आह्मी ‘ वृणीमहे ’ ह्मणजे पसंत करून तिची मागणी करितों, असें ह्मणतो. नंतर कन्येचा पिता घरांत जाऊन ती कन्या देण्याविषयीं आपल्या भार्येची व बांधवांची संमति विचारून बाहेर येतो, व सर्वांसमक्ष ‘ वृणीध्वम् ’ ह्मणजे स्वीकारा ! असें ह्मणतो. याचप्रमाणें वरपित्यानें आणखी दोन वेळ त्या कन्येची सर्वांसमक्ष मागणी करावयाची व त्यास कन्यापित्यानें मोठ्यानें ‘ प्रदास्यामि ’ ह्मणजे ‘देतों’ असें तीन वेळां प्रतिवचन द्यावयाचें.

(वर्णन व मागणें.)

हें झाल्यावर वराच्या पित्यानें त्या कन्येचें गंधाक्षत, साडीचोळी, सोन्याची सरी, साकरपुडा, व तांबूलपुष्पादिकांनीं समंत्रक पूजन करून स्त्रियांकडून तिची ओंटी भरवावयाची.

(कन्यापूजन वगैरे.)

पुढें कन्येचा पिता त्या कन्येला आपल्या डाव्या बाजूस बसवून आपण पूर्वाभिमुख बसतो; व देशकालाचें स्मरण करून माझ्या कन्येच्या भावी विवाहाचें अंगभूत असें जें वाग्दान, तें मी करितों, अशा संकल्पानें गंधापासून दक्षिणेपर्यंत श्रीगणपति-वरुणांचें पूजन करितो. तें झाल्यावर वराच्या पित्यास आपल्या ठिकाणीं

(वाग्दानसंकल्प व व्याहीपूजन.)

बसवून व आपण त्याच्या समोर पश्चिमाभिमुख बसून त्याची गंधतांबुलादिकांनीं पूजा करितो. त्याचप्रमाणें वरपित्यानेंही कन्या देणाराचें पूजन करावयाचें.

वाग्दान.

नंतर कन्येच्या पित्यानें पांच हळकुंडें व पांच सुपाऱ्या घेऊन त्यांवर गंधाक्षत घालून वराच्या गोत्रप्रवरांचा उच्चार करून त्यांमध्यें उत्पन्न झालेला अमक्याचा पणतू, अमक्याचा नातू, अमक्याचा मुलगा व अमक्या नांवाचा जो हा वर त्यास, अमुक गोत्रप्रवरांमध्यें उत्पन्न झालेली, अमक्याची पणती, अमक्याची नात, अमक्याची मुलगी व अमुक नांवाची ही कन्या, मी ज्योतिष्यानें सांगितलेल्या मुहूर्तावर देव, अग्नि आणि ब्राह्मण यांच्या समक्ष देईन.§ मात्र तो वर धर्मशास्त्रांत सांगितलेल्या दशदोषांपैकी कोणत्याही दोषानें* युक्त नसेल तर देईन, अशा अटीवर त्या कन्येचें वाग्दान करून त्या सुपाऱ्या व हळकुंडें वरपित्याच्या पदरीं ‘ तदस्तु मित्रावरु० ’ या मंत्रानें बांधावयाची. आणि त्यांच्या गांठीवर गंधाक्षत घालावयाची.

---

§ अव्यंगेऽपतितेऽक्लीबे दशदोषविवर्जिते ।
इमां कन्यां प्रदास्यामि देवाग्निद्विजसंनिधौ ॥

* “ दूरस्थाः कुष्ठिनो मूर्खा मोक्षमार्गानुसारिणः ।
शूरा अंधा निर्विण्णा दशदोषयुता वराः ॥
तथा षंढाश्च पतिताश्चक्षुश्श्रोत्रविवर्जिताः ।
वर्जनीयाः प्रयत्नेन कन्यादाने न संशयः ॥

संस्काररत्नमालायाम्.

अर्थात् १ दूर राहणारे, २ कोड असलेले, ३ मूर्ख, ४ मोक्षमार्गास लागलेले, ५ शूर (लढवय्ये), ६ अक्षरशत्रु, ७ विवाहाविषयीं पराङ्मुख झालेले, तसेच षंढ (नपुंसक), ९ जातिभ्रष्ट झालेले आणि १० डोळे व कान इत्यादि अवयवांनीं अपंग असलेले असे दहा प्रकारचे दोषी वर सांगितले आहेत. ते कन्यादान करणारानें अवश्य वर्जावे. त्यांना कन्या देऊं नये, असें संस्काररत्नमालाकार म्हणतात.

त्याचप्रमाणें वरपित्यानेंही हळकुंडें व सुपाऱ्या प्रत्येकीं पांच पांच घेऊन

वाग्निश्चय.

अमुक गोत्रांमध्यें उत्पन्न झालेला, इत्यादि वर्णनाचा अमुक नांवाचा वर यास कन्या देण्याचा आपला निश्चय दृढ असू द्या, असें कन्यापित्यास सांगून तीं हळकुंडें व सुपाऱ्या त्याच्या पदरीं बांधून त्यांच्या गांठीवर गंधाक्षत घालावयाची. नंतर कन्यापित्यानें वरपित्यास उद्देशून पुढील श्लोक ह्मणावयाचा:-

" वाचा दत्ता मया कन्या पुत्रार्थे स्वीकृता त्वया ।
कन्यावलोकनविधौ निश्चितस्त्वं सुखी भव ॥"

भावार्थ:-मी वचनेंकरून दिलेली माझी मुलगी आपण आपल्या मुलासाठीं स्वीकारिलीत. आतां कन्या पाहून नक्की करण्याचें आपलें काम झालें. आपण खुशाल असा. यावर उलटपक्षीं वरपिता कन्येच्या पित्यास उद्देशून खालीं दिलेला श्लोक ह्मणतो:-

" वाचा दत्ता त्वया कन्या पुत्रार्थे स्वीकृता मया ।
वरावलोकनविधौ निश्चितस्त्वं सुखी भव ॥ "

भावार्थ:—आपण वचनेंकरून दिलेली आपली मुलगी मी माझ्या मुलासाठीं स्वीकारिली. आतां वर पाहून तो नक्की करण्याचें आपलें काम झालें. आपण खुशाल असा. वरपित्याच्या स्थानीं वराचा पुरस्कर्ता भाऊ किंवा मित्र असेल, तर त्यानें भ्रात्यासाठीं किंवा मित्रासाठीं कन्येचा स्वीकार करितों असें ह्मणावयाचें, हें निराळें सांगणें नकोच.

हें झाल्यावर ब्राह्मणांनीं "शिवा आपःसंतु" इत्यादि मंत्र ह्मणून "एतद्वः

आशीर्वाद व शचीपूजन.

सत्यमस्तु ! " ह्मणजे हें तुह्मां दोघांचें बोलणें खरें होवो ! असा आशीर्वाद द्यावयाचा; व ' समानीव आकृतिः' आणि " प्रसुग्मंता धियसानस्य० " असे आणखी दोन मंत्र ह्मणावयाचे. ते ह्मणणें झाल्यावर, एका पात्रांत धुतलेले तांदूळ घालून त्यावर शचीचें (इंद्राणीचें) आवाहन करून तिची कन्येच्या पित्याकडून षोडशोपचारें पूजा करवितात; व कन्येकडून अशा अर्थाची प्रार्थना करवितात कीं,

"हे सर्व देवांमध्यें श्रेष्ठ अशा इंद्राच्या प्रिय स्त्रिये! देवी इंद्राणी! तुला माझा नमस्कार असो! तुझ्या कृपेनें माझा विवाह निर्विघ्न होऊं दे! आणि मला भाग्य, आरोग्य व पुत्रलाभ दे!

सांगलिक. कन्येनें वर सांगितल्याप्रमाणें इंद्राणीची प्रार्थना केल्यानंतर सुवासिनी स्त्रिया मंगलवाद्यें वाजत असतां श्रीगणपतिवरुणांस व कन्येला नीरांजनानें ओंवाळितात.

लोकसत्कार वगैरे. इकडे ब्राह्मणांस व इतर मंडळीस उभयपक्षांच्या पुरस्कर्त्यांकडून गंध दक्षिणा, पुष्पगुच्छ, गुलाब, अत्तर व पानसुपारी देण्यांत येते; तिकडे सुवासिनी स्त्रियांसही हळदींकुंकू व पानसुपारी देऊन त्यांच्या ओंट्या भरितात. हीं कृत्यें होत असतां वैदिक ब्राह्मण "हिंकृण्वती०" इत्यादि सौभगाय पदान्ता षट् वेदमंत्रांनीं आशीर्वाद देतात. ते झाल्यावर नवऱ्या मुलाकडून वाग्निश्चयासाठीं आलेली मंडळी मिरवत मिरवत आपल्या घरीं जाते.

सोयरिकीची मोडतोड. याप्रमाणें वाग्निश्चय झाल्यानंतर कांहीं अनिवार्य कारणावांचून उभय पक्षांत ठरलेली सोयरीक मोडत नाहीं. तीं अनिवार्य कारणें कोणतीं तें सांगण्याचा प्रकृत पुस्तकाचा उद्देश नव्हे. सबब, तीं येथें दिलीं नाहींत.

उत्पत्ति, उद्देश वगैरे. **गडगनेर.**—ह्या चालीची सोपपत्तिक माहिती आह्मांस उपलब्ध झाली नाहीं. कित्येक लोक तिच्या नांवाचा 'गढंगनेर' असा उच्चार करितात, येवढ्यावरून तिच्यासंबंधें कोणी मनास वाटेल तसें तर्काचें सूत कातीत बसतात. परंतु, प्रचलित रूढि आणि त्यांचा तर्क ह्यांमध्यें फारच विसंगतता दिसून येते. त्यांच्या ह्मणण्याचा इत्यर्थ असा आहे कीं, गडगनेराचा उद्देश देवाला पक्वान्नमहानैवेद्य करावा असा आहे. पण पक्वान्नमहानैवेद्य अन्य पुष्कळ प्रसंगीं करण्यांत येतो. मग त्यास गडगनेर कां ह्मणूं नये? तसेंच गडगनेर ह्मणून कित्येक ठिकाणी जें कृत्य केलें जातें, तेंच इतरत्र 'केळवण' ह्मणून करितात. त्या केळवणाचाही समर्पक उद्देश

जोंपर्यंत कळला नाहीं, तोंपर्यंत तेंही गडगनेराप्रमाणेंच भ्रांतिमूलक वाटतें. प्रचलित रूढीकडे पाहतां आमच्या मतें हीं दोन्ही कृत्यें सामान्यतः लग्नादि मंगलकार्याच्या वेळीं केवळ अभिनंदनार्थ केलेलीं दिसतात. लग्नप्रसंगीं वराकडे आणि वधूकडे आपापल्या इष्टमित्रांसह मेजवान्या होतात, व वधूस किंवा वरास आणि त्यांच्या मातापितरांना पोषाक वगैरे देतात. हें कृत्य सांप्रत वरील दोन्ही नांवांनीं प्रसिद्ध आहे. वधूवरपक्षांच्या पुरस्कर्त्यांचा चालता काळ असला, ह्मणजे त्यांच्या इष्टमित्रांकडूनही त्यांना सदरहू रीतीनें मोठ्या थाटाचे गडगनेर करण्यांत येतात; व त्यांची परंपरा बरेच दिवसपर्यंत लग्नाच्यापूर्वी व मागूनही चालू रहाते. जे इष्ट मित्र मागून गडगनेर देतात, त्यांचा उद्देश, वधूवरें आणि त्यांच्या पक्षाची प्रमुख मंडळी ह्या सर्वांस एकसमयावच्छेदानें मेजवानी व पोषाक वगैरे देण्याचा असतो. शिवाय, कन्यादान करणाऱ्या स्त्रीपुरुषांस लग्नानंतर कन्येच्या घरीं अन्नपानादि व्यवहार निषिद्ध मानिला गेला आहे. परंतु, लग्नानंतर वरपक्षाच्या इष्टमित्रांच्या घरीं गडगनेर झाला, ह्मणजे त्या सर्वांस एका पंक्तीचा लाभ घेतां येतो. मागून गडगनेर करण्यांत एवढा हेतु विशेष असतो.

सीमांतपूजन.—कन्येच्या पित्याला कांहीं कारणामुळें आपली मुलगी परगांवीं देण्याचा प्रसंग पुष्कळ वेळां येतो. असें असलें, ह्मणजे बहुतकरून वरपक्षानें लग्नाकरितां वधूच्या गांवीं जावें, असा परिपाठ आहे. पूर्वी प्रवास करण्याला आगगाडीचें साधन नव्हतें, व अझूनही तें देशाच्या कित्येक भागांत नाहीं. अशा टापूमध्यें लग्नाचें वऱ्हाड एका गांवाहून दुसऱ्या गांवीं जावयाचें झालें, ह्मणजे बैलगाड्या, घोडीं, वगैरे सरंजामानिशीं वऱ्हाडी प्रवास करीत जातात. ते वधूच्या गांवाच्या सीमेजवळ आले, ह्मणजे एखाद्या मनुष्यास वधूच्या घरीं वर्दी देण्यासाठीं पुढें पाठवितात. वर्दी मिळतांच कन्येचा पिता आपल्या इष्टमित्रांस घेऊन त्यांना सीमेपर्यंत सामोरा येतो. तेथें उभयतां व्याही (वधूचा बाप

प्राचीन रूढि.

आणि वराचा बाप) एकमेकांस आलिंगन देऊन भेटतात. नंतर त्या ठिकाणींच कन्येच्या पित्यानें वराचें पादप्रक्षालनपूर्वक वस्त्रादिकांनीं पूजन करावयाचें. अशी वास्तविक मूळची रूढि आहे; आणि ह्मणूनच सीमेच्या अंताच्या ठायीं करावयाच्या ह्या पूजनास 'सीमांतपूजन' असें अन्वर्थक नांव पडलें आहे. आतां प्रथमतः सीमांतपूजनांत कोणकोणतीं कृत्यें केलीं जातात, तीं सांगून नंतर ह्या रूढीचा मूळचा उद्देश काय असावा, आणि हल्लीं त्याचा कशा रीतीनें विपर्यास झाला आहे, त्यासंबंधानें चार शब्द लिहूं.

कृत्यांचें वर्णन.

आरंभीं कन्येची मातापितरें गणपतिवरुणांचें पूजन करून नंतर वराचे पाय धुतात; व गंधापासून त्याची पूजा करितात. गंधाच्याऐवजीं त्याच्या कपाळीं बहुधा कुंकवाचा मळवट भरून वर तांदळांच्या अक्षता चिकटवितात. नंतर रेशमी किनारी धोतर किंवा सुरवार ह्मणजे पायजामा नेसण्यास देऊन एखादा उंची कापडाचा अंगरखा, शेला व पागोटें (बांधून तयार ठेविलेलें) देतात. ह्याप्रमाणें वरानें पोषाक केल्यावर त्याच्या पागोट्याच्या बिर्नीवरून पुष्पाच्या व स्थलपरत्वें केवडाच्या मुंडावळी बांधतात. कन्येचा पिता श्रीमान् असल्यास ह्या प्रसंगीं व्याह्यांसही शेला पागोट्याचा पोषाक देतो. तिकडे कन्येची माता विहिणीचे (वरमाता) व इतर मानकरिणींचे पाय धुवून त्यांस हळदीकुंकूं व यथाशक्ति खण किंवा चोळ्या लुगडीं वगैरे देणगी देऊन ओंट्या भरिते. नंतर स्थळपरत्वें वरपक्षाच्या स्त्रियांस पोहे, गूळ, साकर किंवा साकरपुडे व शिधा देण्याचाही रिवाज आहे. तो दिल्यावर नवऱ्या मुलास स्त्रियांमध्यें आणून त्याजकडून कांहीं अल्पाहार करवितात. मग कन्या पक्षाचे उपाध्याय, जे कोणी भिक्षुक ब्राह्मण असतील त्यांस गंध (पाण्यांत कालविलेल्या कुंकवाचा टिळा) लावून भूयसी दक्षिणा देतात; सर्व मंडळीस हार, पुष्पगुच्छ, गुलाब, अत्तर, पानसुपारी, वांटण्यांत आल्यावर नवऱ्या मुलास पायांत घालण्यास चर्मी जोडा देऊन त्यास अश्वारूढ करितात, आणि अग्रभागीं मंगलवाद्यें वाजवीत, रात्रीचा समय असल्यास मशाली

पेटवून, अतसबाजी उडवीत, मोठ्या थाटानें वरवऱ्हाडयांना गांवांत घेऊन जातात. वऱ्हाडी परस्थळकर असल्यानें गांवांत त्यांना राहण्यासाठीं एखादी प्रशस्त व सोइस्कर जागा कन्येच्या पित्यानें आपल्या ताब्यांत अगोदरच घेऊन ठेविलेली असते. तिला 'जानवसघर' (जन+वास+गृह=जानवसघर ?) असें ह्मणतात. वऱ्हाड्यांसुद्धां नवरामुलगा मिरवत मिरवत गांवांत येऊन जानवसघराच्या दरवाज्याजवळ उतरल्यावर कोणी सुवासिनी स्त्री त्याजवरून दहींभात उतरून टाकिते. नंतर वर आणि वऱ्हाडी जानवसघरांत जाऊन उतरतात. मग कन्यापक्षाची मंडळी त्यांच्या जेवणाखाणाची वगैरे व्यवस्था लावून आपल्या घरीं परत जाते. स्थलपरत्वें ह्या प्रसंगीं कन्येच्या घरीं फराळाचें तयार करून तें वाजत गाजत जानवसघरीं आणून वरवऱ्हाडयांस पाटरांगोळ्या करून फराळ वाढण्याचा रिवाज आहे. हें झालें, ह्मणजे सीमांतपूजन सांगोपांग आटोपलें.

आपल्या हिंदूधर्मामध्यें अतिथिसत्काराचें फार माहात्म्य सांगितलें आहे.

ह्या रूढीचा मूळचा उद्देश.

आपले इतिहास, आपली पुराणें, जागोजाग आतिथ्याच्या वर्णनांनीं भरलेलीं आहेत. तीं वाचिलीं किंवा ऐकिलीं असतां आपल्या पूर्वजांना अतिथीविषयीं केवढा पूज्यभाव होता, तें सहज कळून येईल. वर सांगितलेली सीमांतपूजनाची रूढि, ही त्या आतिथ्यास अनुसरूनच पडलेली दिसते. आपल्या कन्येला वरण्यासाठीं दूर अंतरावरून प्रवास करीत येणारा परस्थळचा वर, हा आपला अतिथि आहे, विष्णुरूप आहे, असें समजून हिंदू कन्येचा पिता गांवाच्या सीमेपर्यंत जाऊन त्याचें वर सांगितल्याप्रमाणें पूजन व सत्कार करितो. कारण, प्रवासानें थकलेला आणि मलिन वेश झालेला वर एखाद्या अनोळखी वाटसराप्रमाणें गांवांत येऊं देणें, हें हिंदू कन्येच्या पित्याला आणि त्याच्या गृहस्थाश्रमाला अगदीं अनुचित आहे. त्या वराचें पूर्वी सांगितल्याप्रमाणें आतिथ्य अवश्यमेव झालें पाहिजे, आणि याच उद्देशानें सीमांतपूजनाची रूढि अस्तित्वांत आली आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

मूळ उद्देशाचा विपर्यास.

वरील रूढीचा मूळचा उद्देश वास्तविक रीतीनें स्तुत्य आहे. परंतु, हल्लीं पहावें तों त्याचा अगदींच विपर्यास झालेला दिसतो. मूळ शब्दाचे ब्राह्मणांमध्यें 'सीमंतपूजन,' 'श्रीमंतपूजन,' 'सीमंती' किंवा ' श्रीमंती, आणि अन्य जातींत ' शेवंतीपूजन ' किंवा ' शेवंती ' असे अपभ्रंश झाले आहेत ! शब्दाची जर ही दशा, तर मग अर्थाची आणि उद्देशाची काय विचारावी ! नवरानवरी एकाच गांवांत किंबहुना जवळ जवळ रहात असलीं, तरी देखील हें कृत्य पुष्कळ वेळां केलेलें पाहण्यांत येतें. दोन्हीं पक्षांचे पुष्कळसे स्त्रीपुरुष एखाद्या देवळांत किंवा सार्वजनिक जागेंत एकवटून श्रीमंतीची एकच गर्दी उडवून देतात ! स्त्रिया ओंट्या भरण्याकडे मणोगणती खोबरें पस्त करितात, व पुरुष, पोषाक, भूयसी अथवा पुष्कळशी दक्षिणा, रोषनाई, अतसबाजी, वगैरे बाबतींत करवेल तितका खर्च करून लग्नाची रकम फुगवितात. आतां, ते जें करितात ते ' श्रीमंती 'ला कदाचित् योग्य ह्मणतां येईल. परंतु आपणांमध्यें श्रीमंती राहिली नाहीं, व जें वस्तुतः करावयाचें, तें **सीमांतपूजन** असून त्याचा उद्देश अशी विनाकारण श्रीमंती करणें, हा नव्हे; तो याहून फार निराळा व स्तुत्य आहे. परंतु आपण त्याकडे न पाहतां केवळ अंधपरंपरेनें जाऊन स्वतःस कर्जाच्या खाड्यांत पाडून घेत आहोंत, असा विचार फारच थोडे करितात, व त्याप्रमाणें वागणारा तर विरळाच असतो !

लग्नमुहूर्तांचे प्रकार.

वरप्रस्थान*—लग्नमुहूर्त तीन प्रकारचे असतात. दिवा, गोधूळ किंवा गोरज, आणि रात्री. त्यांपैकीं दिवा मुहूर्त, हा ब्राह्मणवर्णानें विवाह करण्याला फारच प्रशस्त मानिला आहे. कारण, त्या मुहूर्तांत ब्राह्मणांचें मुख्य आराध्य दैवत जो सूर्य,

---

* वाङ्निश्चयानंतर आणि वरप्रस्थानापूर्वी देशस्थ, कऱ्हाडे, वगैरे कित्येक ब्राह्मणजातींत वराकडून वधूकडे तेलफळ नेण्याची चाल आहे. ह्या तेलफळांत मुलीच्या अंगास लावण्यासाठीं सुवासिक तैलादि मांगलिकद्रव्यें, तसेंच तिला साडी, चोळी, ओंटी भरण्यासाठीं गहूं किंवा तांदूळ, लेंकुरवाळीं ५ हळकुंडें, ५ सुपाऱ्या, नारळ, ५ फळें (लिंबें डाळिंबें इत्यादि), हळदीकुंकू, मुंडावळी आणि वर सांगितल्याप्रमाणें रुखवत वगैरे सामान असतें. तें वराकडील सुवासिनी वाजत गाजत वधूकडे घेऊन जातात, व मोठ्या समारंभानें तिला देतात.

त्याच्या समक्ष लग्न लागतें, व नंतर वधूवरांस त्याचें दर्शन घेतां येतें. सबब, विशेषतः ब्राह्मणांनीं संकटसमय खेरीज करून दिवा मुहूर्तावरच लग्न लावावें, असें धर्मसिंधूंत आणि ग्रन्थांतरींही सांगितलें आहे. तथापि, दिवा मुहूर्त कित्येक कारणांनीं सोइस्कर पडत नाहीं. वधूपक्षाकडील स्त्रीपुरुषांना आपलीं नित्यकर्में घाईनें आटोपून मुहूर्त साधण्याकरितां त्याला बराच अवकाश राखून वरास मूळ जावें लागतें. वरपक्षाचीही तारंबळ उडते. अशा सबबीनें दिवा मुहूर्त फारकरून पत्करिला जात नाहीं. गोरज किंवा रात्रींच्या मुहूर्तापूर्वी इतर कृत्यें सावकाशपणें करण्याला वेळ मिळतो. शिवाय, या मुहूर्तांत रोषनाई वगैरे करितां येतें, व तेणेंकरून लग्नसमारंभ मोठा प्रेक्षणीय होतो. अशा कारणांस्तव पुष्कळ लग्नें गोरज मुहूर्तावर मुद्दाम लावण्यांत येतात. सबब, आपणही 'महाजनो येन गतः स पंथाः' या न्यायानें गोरजमुहूर्ताचेंच अवलंबन करूं.

मूळाची मिरवणूक.

वधूपक्षाकडे लग्नदिवशीं दुपारीं (घरच्या गडगनेराचीं) स्त्रीपुरुषांचीं जेवणीं झाल्यावर ते लग्नसमारंभाची सर्व तयारी करून ठेवितात; आणि सायंकाळ होण्यापूर्वी चांगले पोषाक करून वराला मूळ जाण्याची मिरवणूक काढितात. अग्रभागीं* तासेवाजंत्र्यांचे ताफे वाद्यें वाजवीत चालतात. त्यांच्यामागें वरास बसविण्याचा घोडा§ नामी गाशा वगैरे घालून चालवितात. सदरहू मिरव-

---

* श्रीमंतांच्या घरचें लग्न असल्यास तासे वाजंत्र्यांच्या ताफ्यापुढें दोनचार खानदानी अश्वरत्नें सुंदर जरतारी जीनें आणि अलंकार घालून नाना प्रकारच्या चालीवर ठुमकत चालविण्याचा रिवाज आहे. ह्या घोड्यांचे लगाम मोतद्दार धरून चाललेले असतात, व घोड्यांवर कोणीही स्वारी केलेली नसते.

§ दक्षिण प्रांतीं ह्या घोड्यांपुढें कारागिरांनी रंगी बेरंगी कागदांचे केलेले फुलझाडांचे ताटवे आणि वेली ज्यांस अनुक्रमें 'बाग आणि दीपमाळा किंवा नक्षत्रमाळा म्हणतात, त्या चालविण्याचा प्रघात आहे. तसेंच,

वधूपक्षाचा पुरस्कर्ता श्रीमान् व हौशी असल्यास ह्या बगीच्याच्या अग्रभागीं नायकिणीसही मिरवत नेतो.

पुढांत ह्या घोड्यावर वधूचा धाकटा भाऊ किंवा एखादा अल्पवयस्क निकट संबंधी चांगला पोषाक करून बसविण्याचा रिवाज आहे. त्याच्या मागें मजूराच्या डोक्यावर एखाद्या परातीमध्यें वरास देण्याचा पोषाक व्यवस्थेनें मांडून तो मिरवत नेतात. ह्या पोषाक नेणाऱ्या मजूराजवळच एखादी सुवासिनी मोलकरीण हातांत हातव्याचें ताट घेऊन चालत असते. ह्या ताटांत हळद घालून पिंवळ्या केलेल्या कणकीचे दोन मोठाले दिवे, तेल व काळ्या फडक्याचे कांकडे घालून ते ठेविलेले असतात. तसेंच एक तेलाचें भांडें व पिंवळ्या केलेल्या जोंधळ्याच्या अक्षता असतात. नंतर सुवासिनी स्त्रिया शेले किंवा शाली पांघरून हातांत रुखवताच्या छत्रड्या घेऊन मिरवत चालतात, व त्यांच्या मागून चांगले पोषाक केलेला पुरुषसमुदाय जात असतो. त्यांत फारकरून कोणाचींही वस्त्रें निवळ काळ्या रंगाची असत नाहींत. कारण, तो रंग मंगळ प्रसंगीं वर्ज्य समजला जातो. अशा मिसलीनें ही वधूपक्षाची मंडळी मिरवत मिरवत वराच्या घरीं किंवा जानवसघरीं त्यास लग्नाला नेण्यासाठीं मूळ येतात. ते वराच्या मुक्कामांत दाखल झाले, ह्मणजे स्त्रिया घरामध्यें जाऊन बरोबर आणिलेलें रुखवत एके जागीं व्यवस्थेनें मांडून बसतात, व पुरुषवर्ग मंडपांत किंवा दिवाणखान्यांत वरपक्षानें त्याच्यासाठीं घालून ठेविलेल्या बैठकीवर सत्कारपूर्वक बसविण्यांत येतो.* ह्या बैठकीवर वरास पूर्वाभिमुख असतां येईल अशा रीतीनें एखादा गाशा किंवा गालिचा अंथरून त्याच्यावर शाल्हांचा चौक घालितात, व मागील बाजूस तकिया किंवा लोड ठेवून त्याच्या मध्यभागीं वरास आणून बसवितात. ह्या प्रसंगीं वरानें रेशमी किनारी कोरें धोतर परिधान केलेलें असतें. अंगांत एखादा उंची कापडाचा लाल किंवा पांढरा शुभ्र अंगरखा घातलेला असतो. डोळ्यांत

---

* नाचणारी नायकीण बरोबर असल्यास ह्या ठिकाणीं वरपूजा व पानसुपारी होई-पर्यंत तिचा नाच उभा करितात.

काजळ घालून उजव्या गालावर मध्यभागीं त्या काजळाचें एक गालबोट लाविलेलें असतें, आणि कपाळीं कुंकवाचा मळवट भरून डोक्यास तांबड्या रंगाचें पागोटें फुलांच्या व स्थलपरत्वें बेगडाच्या मुंडावळीसहित घातलेलें असतें.

वराची पूजा व प्रस्थान.

अशा रीतीनें बसलेल्या वरासमोर कन्येचीं मातापितरें किंवा कन्यादान करणारें दंपत्य वरास देण्याच्या पोषाकासहित व पूजा साहित्यासहित येऊन बसतें. नंतर कन्यापक्षाचे उपाध्याय आपल्या यजमानांस डोळ्याला पाणी लावण्यास सांगतात. ह्याला नेत्रस्पर्श अशी संज्ञा आहे. हा नेत्रस्पर्श करविण्याचा उद्देश इतकाच कीं, येथें सभेमध्यें श्रीगणपतिवरुणांची आणि विष्णुस्वरूपी वराची पूजा करावयाची असते. सबब, तत्पूर्वी शरीरशुध्यर्थ व आचमनाऐवजीं नेत्रस्पर्शाची योजना केलेली आहे. असो. यजमानांनीं त्याप्रमाणें नेत्रस्पर्श केल्यावर उपाध्याय त्यांजकडून प्रथमतः गणपतिवरुणांचें यथादेशकालोचित पूजन करवितात, व तें झाल्यावर वराची गंधाक्षतेपासून पूजा करवून त्यास बरोबर आणिलेला पोषाक देववितात. हा पोषाक दात्याच्या शक्तीप्रमाणें धोतरजोडा, अंगरखा, शेला, मुंडावळीसहित बांधून तयार ठेविलेलें पागोटें, आणि चर्मीजोडा इतका असतो.* वरानें तीं वस्त्रें परिधान केल्यावर त्याच्या हातीं सोनेरी वर्ख लाविलेलें किंवा साधें श्रीफळ देऊन त्यास घरामध्यें देवांस आणि वाडवडिलांस नमस्कार करण्यासाठीं पाठवितात. इकडे लागलीच उभयपक्षाकडून सर्व मंडळीस हारतुरे, गुलाबअत्तर, व पानसुपारी वाटण्यांत येते. (ह्या प्रसंगीं देखील वर अक्षतींत सांगितल्याप्रमाणें सुपारी सगळी वाटण्याचा रिवाज आहे. नवरामुलगा घरांत आल्यावर त्यास अगोदर रुखवत मांडिलें असेल, त्या ठिकाणीं घेऊन येतात. तेथें कन्येची माता किंवा कन्यादान करणारी स्त्री त्याचे पाय धुवून त्यास लव-

* कोकणामध्यें सीमांतपूजनाच्या वेळीं पोषाक दिल्यावर पुन्हां ह्या प्रसंगीं तो देण्याची ऐपत नसल्यास त्याऐवजीं नुसतें श्रीफळ दिलें असतां चालतें.

वतांपैकीं कांहीं पदार्थ चाखविते.* कोणाकोणांत ह्या समयीं चकचकीत रांगोळ्या घालून पाटपानें मांडून नवरा मुलगा, त्याचीं भावंडें, मित्रमंडळी आणि वरमाता ह्या सर्वांना पंक्तीस बसवून फराळ घालितात; आणि नंतर नवऱ्या मुलाकडून तस्तांत हात धुववून त्यास विडा देतात. ह्या विड्यांत एक रुपया घातलेला असतो. वरानें तो विडा कांहींसा चांवून तस्तांत थुंकावयाचा. अर्थात् रुपया तस्तांत पडतो. मग तो वधूपक्षाची कोणी स्त्री काढून घेऊन आपल्या जवळ ठेविते. आणि पुढें लग्न लागल्यावर विहिणीस (वरमातेस) भोजनाची अक्षत द्यावयाची तेव्हां तिला देते. पण हा प्रकार ओंगळ आहे. बहुतकरून ह्या समयीं वरास एक मोठा बोंडविडा—ज्यांत केवळ तांबूलाचीच द्रव्यें आहेत असा—चांवावयास देतात. तो त्यानें वधूच्या घरास जाईपर्यंत आपल्या मुखांत चर्वण करीत असावें, आणि पुढें तिच्या दरवाज्याजवळ उतरल्यावर मोलकरिणीनें त्याच्या पायांवर पाण्याची धागर ओतिली, ह्मणजे थुंकून टाकावा, असाच रिवाज पाहण्यांत येतो. असो. बायकांमध्यें नवऱ्यामुलाची वर सांगितलेलीं कृत्यें आटोपलीं, ह्मणजे त्याकडून देवांस आणि सर्व वाडवडिलांस नमस्कार करवून व पायांत चर्मी जोडा घालवून त्याला घराच्या दरवाज्याजवळ आणितात. स्थलपरत्वें ह्या वेळीं शुभ शकुनासाठीं दरवाज्यापाशीं कोणी पुत्रवती सुवासिनी स्त्री उभी करण्याची चाल आहे. मंगलवाद्यें वाजत असतां नवरा मुलगा त्या स्त्रीचा शकुन घेऊन घोड्यावर बसतो; आणि वधूच्या घरीं लग्नाला जाण्याकरितां मिरवत निघतो. ह्या मिरवणुकीस **दरभस्थान** असें ह्मणतात; व त्याची सर्व मिसळ वर सांगितलेल्या मूळाच्या मिरवणुकीप्रमाणेंच असते. नवऱ्या मुलाचा घोडा चालूं लागतांच त्याच्या दोहों बाजूंस दोन मजूर चालत

---

* स्थलपरत्वें हा अल्पाहार झाल्यावर सर्व रुखवतावरून एक वस्त्र घालून त्यावर नवऱ्यामुलाकडून दुधाची गुळणी टाकविण्याची चाल आहे. तिचा हेतु सर्व रुखवत वरानें उच्छिष्ट केलें,—उपभोगिलें,—असें प्रदर्शित करण्याचा दिसतो. कारण, तें त्याच्यासाठींच केलेलें असतें.

असतात. त्यांपैकीं एकानें वराच्या डोक्यावर सांवली करण्यासाठीं अबदागीर धरिलेला असतो, व दुसरा चौरी घेऊन ती मक्षिकानिवारणार्थ त्याजवरून वारीत चालतो. नवऱ्या मुलाच्या पाठीमागें हातव्याचें ताट धारण करणारी मोलकरीण त्या ताटांतील दिवे लावून जोंधळ्यांच्या अक्षता मधून मधून त्याजवर टाकीत चालते. ह्याचा उद्देश वरास दृष्टीची बाधा न व्हावी येवढाच आहे. तिच्यामागें उभयपक्षांचा स्त्रीपुरुषसमुदाय मोठ्या थाटानें मिरवत चालतो. स्त्रीसमुदायाच्या अग्रभागीं नवऱ्यामुलाची कुमारिका अथवा सुवासिनी असलेली बहीण, किंवा तशीच कोणी आप्त तरुणी हातांत एक जलपूर्ण कलश घेऊन चालत असते.* ह्या कलशास कुंकवाचीं बोटें लाविलीं असून त्याच्या तोंडावर आम्रपल्लव आणि श्रीफळ ठेविलेलें असतें. हा कलश धारण करणाऱ्या तरुणीस 'करवली' असें ह्मणतात. हा शब्द हिंदुस्थानी भाषेंतील 'करावाली' (करा ह्म० कलश + वाली ह्म० धारण करणारी) ह्याचा अपभ्रंश आहे. तथापि, तो वधूवरांच्या सखीजनांस साधारणपणें लावण्यांत येतो. असो. वरप्रस्थानाची मिरवणूक रस्त्यांतून जातांना जेथें जेथें ह्मसोबा वगैरे उपदेवतांचीं स्थानें लागतील तेथें व चतुष्पथावर कांहीं बाधा न व्हावी, एतदर्थ वरावरून नारळ ओंवाळून ते फोडून टाकण्याचा रिवाज आहे.† तसेंच समयाची अनुकूलता असल्यास ह्या मिरवणुकीपुढें जागोजाग नळे, चंद्रज्योति वगैरे दारूकाम सोडीत जातात. नवरामुलगा मिरवत मिरवत वधूच्या दरवाजापाशीं येतांच त्याजवरून कोणी सुवासिनी स्त्री दहींभात उतरून टाकिते; व मोलकरीण

* कोंकणस्थांत हिच्या शेजारीं दुसरी एक सुवासिनी हातांत प्रज्वलित असलेला लामणदिवा घेऊन चालत असते.

† कोंकणांत नवरामुलगा गांवाच्या वेशीजवळ आला, ह्मणजे वेसकर (महार) असतो तो आपली काठी आडवी धरून त्यास वाटेंत आडवितो. तेव्हां त्याच्या मानाबद्दल एक रुपया द्यावा लागतो. नवऱ्यामुलाच्या आईस डोलींतून मिरवत नेतात. वधूगृहीं पोहोंचल्यावर डोलीवाल्यांस त्यांच्या मानाबद्दल रुपया दिल्याखेरीज ते वरमाईस खालीं उतरूं देत नाहींत.

त्याच्या पायांवर पाण्याची धागर ओतितें. * तिला वर पक्षाकडून मानाबद्दल चोळांलुगडें देण्याची चाल आहे. हें कृत्य झाल्यावर नवऱ्या मुलास शृंगारलेल्या मंडपामध्यें किंवा दिवाणखान्यांत प्रमुख स्थानीं नेऊन बसवितात; व उभयपक्षाचे स्त्रीपुरुष त्यांच्यासाठीं तयार केलेल्या जागेंत मोठ्या सन्मानानें बसविण्यांत येतात. अनुकूलता असल्यास ह्या प्रसंगीं कलावंतिणीचें नृत्य किंवा गायन सुरू करितात. उभय पक्षाची इष्टशिष्ट मंडळी ह्याप्रमाणें बसली असतां कन्यापिता घरांत जाऊन आपल्या पत्नीसहित स्नान करून सुंदर रेशमी वस्त्रें परिधान करून व शुभसूचक कुंकुमतिलक लावून वराला मधुपर्कपूजेकरितां बोलावून आणवितो.

[illegible]पर्काची [illegible]ता.

मधुपर्क.—वर सांगितल्याप्रमाणें नवरामुलगा नवऱ्यामुलीच्या मंडपांत येऊन दाखल झाला, ह्मणजे हिंदूधर्मशास्त्राप्रमाणें **स्नातक**[¶] या नात्यानें किंवा विष्णुस्वरूपी वर या नात्यानें तो मधुपर्क सत्काराला पात्र असतो; शिवाय, मधुपर्कपूजा ही कन्या

---

* कोंकणस्थांत वधूची मावशी वरावरून पंचारती ओंवाळिते. तिलाही मानाबद्दल रुपया द्यावा लागतो.

¶ प्राचीनकाळीं मौंजीबंधन झाल्यावर जे ब्राह्मणवर्णाचे ब्रह्मचारी गुरूच्या घरीं वेदाध्ययन करावयास रहात असत, त्यांचे दोन वर्ग होते. एक **नैष्ठिक** व दुसरा **उपकुर्वाण**. पैकीं नैष्ठिक ब्रह्मचारी पहिल्या आश्रमाचा काल संपला, तरी गुरूंच्या घरीं राहून आश्रम व अध्ययन जारी ठेवीत होते. [illegible] जे उपकुर्वाण असत, त्यांचा सदरहू आश्रमानंतर गृहस्थाश्रम स्वीकारण्याचा उ[illegible]माचा काल संपला, ह्मणजे गुरूंच्या आज्ञेनें दुसरा आश्रम स्वीका[illegible]. उपकुर्वाणानें तो केला, ह्मणजे त्याला स्नातक [illegible] ह्मणजे धर्मशास्त्राप्रमाणें ब्रह्मचर्याश्रम संपवून गृहस्थाश्रम स्वीका[illegible] ब्राह्मण.

मधुपर्क करण्याला ज्या व्यक्ति पात्र मानिलेल्या आहेत त्यांत या[illegible] गणना आहे.

"स्नातक उपस्थित राज्ञश्चाचार्यश्वशुरपितृव्यमातुलानाम् (मधुपर्क[illegible]
गृह्य[illegible]

ह्मणजे स्नातक, राजा, आचार्य (धर्मगुरु), सासरा, पितृव्य, आणि [illegible] घरीं आले असतां त्यास मधुपर्क द्यावा.

दानविधींचें एक अंग मानिलें आहे; ह्मणून कन्या मागण्यासाठीं आलेल्या वरास दात्यानें मधुपर्क अवश्य करावा लागतो.

मधुपर्कद्रव्यें.

दहीं आणि मध हीं दोन द्रव्यें एकत्र कालविलीं, ह्मणजे जें मिश्रण तयार होतें त्यास मधुपर्क असें ह्मणतात; व बहुतकरून हेंच मिश्रण मधुपर्कासाठीं घ्यावें लागतें. आतां, तें वराच्या सत्कारार्थ त्याकडून प्राशन करविण्याचें जें विधान आहे तें सांगतोः—

मधुपर्कविधि.

प्रथमतः वरानें आपला पोषाक काढून हातपाय धुवून वधूच्या घरामध्यें जेथें लग्नसंबंधीं विधि सांगण्याकरितां उभयपक्षांचे उपाध्याय, व वैदिक ब्राह्मणांचा समुदाय बसलेला असतो, त्या ठिकाणीं जाऊन पूर्वाभिमुख पाटावर बसावयाचें. नंतर वर सांगितल्याप्रमाणें कन्येचीं मातापितरें किंवा कन्यादान करणारें दंपत्य वरांतून स्नान वगैरे करून वराच्या समोर जवळ जवळ दोन पाट मांडिलेले असतात त्यांवर पश्चिमाभिमुख बसतें. (कन्यादान करणाराच्या पत्नीनें पतीच्या उजव्या बाजूस बसावयाचें. तसेंच, ह्या प्रसंगीं मंगलस्नान केलेली, अलंकारमंडित, नवें वस्त्र नेसलेली, अंगांस सुगंधि द्रव्यें लाविलेली, मुंडावळी, पुष्पमाला धारण केलेली, व भोजन करून तृप्त झालेली वधूही वराच्या समोर एका पाटावर पश्चिमाभिमुख बसवावी, असें सूत्रकार सांगतात. परंतु, वाग्निश्चयाचे वेळीं वरानें, आणि ह्या प्रसंगीं वधूनें उपस्थित असण्याची चाल हल्लीं कोठेंच दिसून येत नाहीं. असो.) ह्या ठिकाणीं मधुपर्कपूजेचें सर्व साहित्य उपाध्यायांनीं तयार करून ठेविलेलें असतें.* कन्यादान करणारा यजमान पत्नीसहित आसनावर येऊन बसला,

* हें साहित्य ह्मणजे, स्वच्छ उदकानें भरलेलीं,—पाय धुण्यासाठीं एक, अर्घ्याला एक, मंत्रपूर्वक तीनवेळां आचमनें करण्यासाठीं एक, व मंत्ररहित आठवेळा आचमनें करण्यासाठीं एक,—अशीं चार पात्रें, मधुपर्काचें पात्र, कांस्यपात्र, धेनु, आणि विष्टर, ह्मणजे पंचवीस दर्भांचीं अग्रें खालीं करून डावे हाताकडे पीळ घातलेली दोरी, ह्या वस्तु होत.

ह्मणजे उपाध्याय विधि सांगण्यास आरंभ करितात. प्रथमतः 'यजमानानें आचमन व प्राणायाम करून देशकालाचा उच्चार करावयाचा. नंतर,

"कन्यार्थिने गृहागतायास्मै स्नातकाय वराय कन्यादानांगभूतं मधुपर्कं करिष्ये ।"

ह्मणजे (माझी) कन्या मागण्याकरितां घरीं आलेल्या या स्नातक वराची कन्यादानास अंगभूत अशी मधुपर्कपूजा करितों, असा संकल्प करावयाचा. मग 'विष्टर' घेऊन वरास बहुमानपूर्वक 'विष्टरो विष्टरो विष्टरः' ह्या मंत्रानें तो बसण्यासाठीं द्यावयाचा. तो वरानें आपल्या हातानें घेऊन किंवा हातानें न घेतां पायानेंच अलीकडे करून

अहं वर्ष्मसजातानां विद्युतामिव सूर्यः । इदं तमधितिष्ठामि यो मा कश्चाभिदासति ॥

ह्या मंत्रानें त्यावर बसावयाचें. मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, ज्याप्रमाणें सूर्य सजातीय तेजोगोलांना आपल्या प्रकाशानें लोपवून टाकितो, त्याप्रमाणें जो कोणी माझा प्रतिस्पर्धी असेल, त्याच्या समान हा विष्टर आहे असें समजून मी ह्यास पादाक्रांत करून बसतों ! [मात्र बसतांना विष्टराचीं अग्रें (शेंडे) उत्तरदिशेकडे करून बसावें, असें विधान आहे.] नंतर दाता, पाय धुण्याच्या पाण्याचें भांडें घेऊन 'पाद्यं पाद्यं पाद्यं' असें ह्मणून तें वराच्या हातांत देतो, व तें फिरून परत घेऊन आपल्या पत्नीच्या हातीं देतो. तिनें त्यांतील पाणी वराच्या अनुक्रमें उजव्या व डाव्या पायावर घाल[illegible] वयाचें; व दात्यानें त्याचे पाय "अस्मिन् राष्ट्रे" इ० मंत्रांनी धु[illegible] वस्त्रानें पुसावे, अशी चाल आहे. (पाद्य ह्मणजे पाय धुण्याच्या[illegible] वराकडून अगोदर स्वीकार केला जातो ह्यावरून व मंत्रार्थावर[illegible] वरानें पाय स्वतः धुवावे, असें दिसतें. परंतु ते पूजा करणार[illegible] धुवावे, असें प्रयोगांत सांगितलें आहे. तें केवळ उपचारार्थ अ[illegible] सत्कारार्थ असेल असें वाटतें.)

नंतर एका भांड्यांत पाणी ठेविलेलें असतें, तें घेऊन वरानें मंत्रविरहित आचमन करावयाचें. तें झाल्यावर दात्यानें अर्घ्यामध्यें पाणी, गंध, पुष्प (दूर्वा) व सुपारी घालून " अर्घ्यमर्घ्यमर्घ्यं प्रतिगृह्यताम् ।" असें ह्मणून तो वराच्या ओंजळ मध्यें सोडावयाचा. मग एक स्वच्छ उदकानें भरलेलें पात्र घेऊन तें " आचमनीयमाचमनीयमाचमनीयं प्रतिगृह्यताम् " ह्या मंत्रानें वरापुढें आचमन करण्यासाठीं ठेवावयाचें. वरानें त्यांतील थोडें उदक हातावर घेऊन " अमृतोऽपस्तरणमसि । " हा मंत्र ह्मणून प्राशन करावयाचें, व दुसऱ्या शुद्ध उदकानें मंत्ररहित आचमन करावयाचें. हें झाल्यावर कन्यापित्यानें मधुपर्काचें पात्र आपल्या हातांत घेतलें असतां वरानें " मित्रस्य त्वा चक्षुषा प्रतीक्षे" ह्मणजे " मी तुला सूर्याच्या नेत्रांनी पहातों," अर्थात् त्याच्याप्रमाणें मीही वाटेल ती वस्तु दृग्गोचर करूं शकतों, अशा भावाच्या मंत्रानें त्या पात्रांतील मधुपर्क पहावा. मग कन्यापित्यानें तें पात्र " मधुपर्को मधुपर्को मधुपर्कः ।" असा मंत्र ह्मणून वराच्यापुढें न्यावें. वरानें " देवस्य त्वा सवितुः " हा मंत्र ह्मणून तें पात्र आपल्या हातीं घ्यावयाचें. ह्या मंत्राचा भावार्थ असा आहे कीं, (हे मधुपर्का!) मी तुला उदार अशा सूर्याच्या अनुमोदनानें, अश्विनीकुमारांच्या बाहूंनीं आणि पोषक अशा तेजोगोलांच्या करांनीं ग्रहण करितों. नंतर " मधुवाता ऋतायते० " हे मंत्र ह्मणून हातांतील मधुपर्काकडे पहावयाचें; व तो डाव्या हातीं घेऊन उजव्या हाताच्या आंगठ्यानें व अनामिकेनें तीन वेळां प्रदक्षिणेप्रमाणें ढवळून ' वसवस्त्वा० ' ह्या मंत्रानें किंचित् पूर्वेकडे टाकावयाचा. तसेंच ' रुद्रास्त्वा० ' म्हणून दक्षिणेकडे, ' आदित्यास्त्वा० ह्मणून पश्चिमेकडे, आणि ' विश्वेत्वा० ' ह्मणून उत्तरेकडे टाकावयाचा; व " भूतेभ्यस्त्वा भूतेभ्यस्त्वा भूतेभ्यस्त्वा " ह्या मंत्रानें पात्रांतील मध्यभागाचा थोडा मधुपर्क घेऊन तीन वेळां वर उडवावयाचा. हें झाल्यावर मधुपर्कपात्र खालीं भुईवर ठेवून त्यांतील थोडासा भाग हातावर घेऊन " विराजो दोहोसि० " ह्या मंत्रानें तो प्राशन करावयाचा. मग शुद्ध उदकानें आचमन करून फिरून

मधुपर्काचा थोडासा भाग हातावर घेऊन " विराजो दोहमशीय " असें ह्मणून प्राशन करावयाचा; व फिरून आचमन करून " मयि दोहः पद्यायै विराजः " या मंत्रानें आणखी किंचित् पिऊन शुद्ध उदकानें आचमन करावयाचें. ह्याप्रमाणें तीन वेळां मधुपर्कपान झालें ह्मणजे, पात्रांत त्याचा जो शेष भाग राहील, तो वरानें उत्तराभिमुख होऊन ब्राह्मणास द्यावा असें विधान आहे. पण ब्राम्हणास उष्टें खावयास देणें हें व्यवहाराला विरुद्ध दिसतें, सबब, अवशीष्ट भाग पाण्यांत टाकून देण्याचा प्रघात आहे. नंतर वरानें आचमनाचें पाणी हातावर घेऊन " अमृतापिधानमसि " या मंत्रानें प्राशन करून दुसऱ्या स्वच्छ उदकानें आचमन करावयाचें. मग आचमनाच्या पात्रांतील सर्व उदक "सत्यं यशः श्रीर्मयि श्रीः श्रयताम्।" ह्या मंत्रानें पिऊन शुद्ध उदकानें दोन आचमनें करावयाचीं. हा विधि झाल्यावर प्राचीन काळीं वराच्या आतिथ्यासाठीं उत्तर दिशेस बांधून ठेविलेली गाय वरास निवेदन करून मारण्याचा प्रघात होता. परंतु, पुढें गोवध बंद झाल्यावर ती गाय न मारितां सोडून देण्याविषयीं वरानें कन्यापित्यास उपदेश करण्याची चाल पडली. हल्लीं कोणी वरास प्रत्यक्ष गाय निवेदनही करीत नाहींत, व त्याला ती न मारण्याविषयीं उपदेश करण्याचें वस्तुतः प्रयोजनही राहत नाहीं. तथापि, कन्यादान करणारा गाईच्या ऐवजीं यथाशक्ति निष्क्रय द्रव्य घेऊन तें " गौर्गौर्गौः " ह्या मंत्रानें वरास निवेदन करितो. नंतर वरानें

माता रुद्राणां दुहिता वसूनां स्वसादित्यानाममृतस्य नाभिः ।
प्रनुवोचं चिकितुषे जनाय मा गामनागामदितिं वधिष्ट ॥ ॐ उत्सृजत ।

हा मंत्र ह्मणून त्या निष्क्रय धेनूचा उत्सर्ग करण्यास सांगावया[illegible] मंत्राचा अर्थ असा आहे कीं, जी धेनु मरुत् नामक देवतांची मात[illegible] वसूंची कन्या, व आदित्याची भगिनी आहे, जिचें घृत यज्ञ[illegible] देवांस प्राप्त होतें, अतएव जी सर्व देवांची अदितीसारखी माताच[illegible] अजरामरत्व देणाऱ्या यज्ञाला मुख्य साधन आहे,–सबब हे ज्ञानवान्[illegible]

तुला मी असें सांगतों कीं,—अशा ह्या निरपराध धेनूचा वध करूं नको. हिला सोड!

वर सांगितलेला मधुपर्कविधि आटोपल्यावर कन्यापित्यानें वराची गंध, अक्षत, पुष्पादिकांनीं पूजा करून त्यास यज्ञोपवीतें (जानवीं) व यथाशक्ति वस्त्रें आणि आंगठी वगैरे अलंकार देण्याची चाल आहे.

वरास वस्त्रालंकारदान.

मधुपर्कासाठीं दहीं व मध ह्यांचें मिश्रण करून तें घ्यावें लागतें, ह्मणून वर सांगितलें आहे. परंतु, प्रसंगोपात्त हीं दोन्हीं द्रव्यें मिळण्याजोगीं नसल्यास दह्याचे ऐवजीं दूध किंवा पाणी व मधाचे जागीं तूप किंवा गूळ असला तरी चालतें.

मधुपर्कद्रव्यांचे पर्याय.

जेव्हां वधूचा पिता आणि वर ह्या उभयतांच्या शाखा भिन्न असतात, तेव्हां मधुपर्क कोणत्या शाखेच्या वेदमंत्रांनीं करावयाचा यासंबंधानें साहजिक अडचण पडावयाची. तिच्या प्रतिकारार्थ ज्या शाखेचा वर असेल त्याच शाखेच्या वेदमंत्रांनीं मधुपर्क करावा, कन्यादान करणारा भिन्न शाखेचा असला तरी हरकत नाहीं, असें गृह्यपरिशिष्टांत सांगितलें आहे.

भिन्नशाखीय वराचा मधुपर्क.

येथें इतकें सांगितल्यावांचून रहावत नाहीं कीं, लग्नमुहूर्त नजीक येऊन ठेपल्यावर नवरामुलगा वधूच्या घरीं आला, तर मधुपर्क करण्याला अवकाश नसतो. मग अगोदर लग्न लावून घेतात व नंतर मधुपर्क करितात. असा प्रकार पुष्कळ वेळां पहाण्यांत येतो. पण तो फारच गौण आहे. कारण, त्यांत विधि संगतवार रहात नाहीं. मधुपर्काचा मूळ उद्देश, तो कन्यार्थी वर घरीं येतांच करावा असा आहे, असें संकल्पावरून स्पष्ट दिसतें. त्या उद्देशाचें ह्या प्रकारानें अतिक्रमण केल्यासारखें होतें.

लग्नानंतर मधुपर्क व त्याचें गौणत्व.

उद्देश.

गौरीहरपूजा–पूर्वोक्त विधिविधानानें वराची मधुपर्कपूजा होत असतां वराबरोबर मिरवत आलेल्या तापक्षाच्या सुवासिनी स्त्रिया घरांत वधूची ओंटी भरण्याकरितां जातात. ह्या समयीं वधू आपणाला निरंतर सौभाग्य प्राप्त व्हावें, व शिवपार्वतीच्या दंपत्याप्रमाणें आपल्यालाही पतिसमागमें पूर्ण सुखाचा लाभ व्हावा, अशा उद्देशानें गौरीहराची पूजा करीत बसलेली असते.

उपसाहित्य.

गौरीहरपूजा, शचीपूजा, आणि आंबा शिंपडणें, हीं कृत्यें बहुधा एकाच ठिकाणीं केलीं जातात. सबब, त्या सर्वांच्या उपसाहित्याचें वर्णन एकसमयावच्छेदानें देणें सोइस्कर वाटल्यावरून तें हाखालीं दिलें आहे.

गौरीहरवर्णन.

घरांतील पश्चिमाभिमुख भिंतीस चुना देऊन त्यावर हिरव्या रंगानें एक आंब्याच्या झाडाचें चित्र, व त्यावर एका बाजूस सूर्याची व दुसऱ्या बाजूल चंद्राची प्रतिमा काढितात. ह्या चित्राखालीं जमिनीवर दगडाचा पाटा किंवा स्थलपरत्वें लांकडी पाट मांडितात. ह्या पाटाच्या चारी कोपऱ्यांस सफेता दिलेली व गेरूनें चित्रविचित्र केलेलीं मातीचीं बोळकीं प्रत्येक कोपऱ्याला पांच पांच उतरंडीसारखीं रचून त्यांना चौफेर कच्च्या सुताचें वेष्टन देतात. पाटासभोंवतीं रंगवल्ली काढिलेल्या असतात; व त्या पाटाच्या किंवा पाट्याच्या मध्यभागीं तांदळांच्या राशीवर गौरीहराच्या प्रतिमा ठेवितात. ह्याच ठिकाणीं एका पात्रांत तांदळांच्या ढिगावर शची ह्मणजे इंद्राणीची प्रतिमाही पूजनार्थ ठेविलेली असते. ह्या प्रतिमांच्या पुढें सफेता देऊन गेरूनें चित्रित केलेला एक वेडा. (मातीचा कुंभ) कानोडा ठेवून त्यामध्यें दीप लाविलेला असतो. गौरीहराच्या प्रमुखत्वामुळें ह्या सर्व उपसाहित्यास गौरीहर अशीच संज्ञा पडली आहे. गौरीहरासन्मुख एक पाट मांडून त्यावर वधू पूर्वाभिमुख बसून गौरीहराची व शचीची पूजा करीत असते. ह्यावेळीं तिनें पूर्वी सांगितल्याप्रमाणेंच विवाहाला अनुरूप असा मांगलिक आणि विशिष्ट वेश धारण केलेला असतो.

देवताराधन व ओंटी.

ती वधू गौरिहर आणि शची ह्यांची यथाविधि पूजा केल्यावर पूर्वी वाग्दानांत सांगितलेल्या 'देवींद्राणि०' ह्या श्लोकानें शचीची प्रार्थना करून अखंड सौभाग्याच्या प्राप्तीसाठीं तिन्ही देवतांचे हात जोडून आराधन करीत बसलेली असते. तिची वरपक्षाच्या सुवासिनी स्त्रिया ओंटी भरितात. बहुतकरून हें कृत्य होत आहे तोंच लग्नमुहूर्त नजीक आल्यामुळें तिचा मामा तिला विवाहाला नेण्यासाठी येतो.

लग्नसमयीं नवरानवरीचें वर्णन.

लग्नः—वराची मधुपर्क पूजा आटोपल्याबरोबर दोन पाट समोरासमोर मांडून त्यावर तांदळांच्या राशी घालितात; आणि त्या राशीवर कुंकवाचीं स्वस्तिकें (卐 अशा आकृति) काढितात. मग त्यांपैकीं एका पाटावरील स्वस्तिकावर नवऱ्यामुलास हातांत पुष्पहार देऊन उभा करितात. त्याच्या पुढें एक वस्त्र आडवें धरितात. ह्या वस्त्राच्या दोन्ही बाजूला मध्यभागीं कुंकुवाचीं स्वस्तिकें काढिलेली असतात; आणि त्यांचे वरच्या बाजूचे कोंपरे, दोन गृहस्थ दक्षिणोत्तर दिशांस एकमेकांसमोर उभे राहून आपल्या हातांनीं धरितात. ह्या वस्त्राच्या दशा हमेषा उत्तर दिशेकडे करण्याचें धोरण ठेवावें लागतें. असो. नंतर वधूचा मामा तिला घरांतून आपल्याकडेवर घेऊन येतो; आणि त्या वस्त्रापलीकडच्या पाटावरील कुंकवाच्या स्वस्तिकावर तिला उभी करून तिच्या हातीं पुष्पहार देतो; याप्रमाणें तीं वधूवरें एकमेकांसमोर जवळ उभीं असतां त्यांच्या परस्पर दृष्टीला मध्यभागी धरिलेल्या त्या वस्त्राचाच काय तो प्रतिबंध होतो; आणि ह्मणूनच त्या वस्त्रास (अंतर्=मध्य,+पट=वस्त्र) अंतःपट असें ह्मणतात. अर्थात् हा अंतःपट वधुवरांचें लग्न लागण्याला अद्यापि कांहीं अंतर आहे—वेळेचा अवधि आहे—असें दाखविण्याच्या उद्देशानें धरिला जातो, व तें अंतर संपतांच तो काढून घेतात. ह्मणजे लग्न लागलें. अंतःपट हा वास्तविक शब्द, 'अंतरपाट' अशा अपभ्रंशानें लोकांत रूढ आहे.

वर सांगितल्याप्रमाणें नवरानवरी लग्नासाठीं उभीं राहिलीं. ह्मणजे नवऱ्याकडील करवल्या त्याच्या मागें व नवरीकडील करवल्या तिच्या मागें हातांत पाण्यानें भरलेले कलश व दिवे घेऊन उभ्या राहतात. तसेंच वराचा मामा वरामागें व वधूचा तिच्यामागें उभा राहून ते त्या उभयतांस आपापल्या इष्ट व कुलदेवतांचें स्मरण करण्यास सांगतात. आचारपरत्वें ह्या प्रसंगीं वधूवरांच्या वस्त्रांच्या पदरीं जिरें व साखर बांधण्याची चाल आहे. प्रत्येक पक्षाकडील सुवासिनी स्त्रियांचा समुदाय हातांत तांदळांच्या किंवा आचारपरत्वें जोंधळ्यांच्या अक्षता घेऊन त्या वधूवरांवर मधून मधून टाकण्यासाठीं या स्थलीं उभा असतो.

त्यावेळची कांहीं परिस्थिति.

याप्रमाणें व्यवस्था होत असतां तिकडे लग्नघटिके जवळ बसलेले ज्योतिषी (जोशीबोवा) मंगलाष्टकें ह्मणण्याला सुरवात करितात. हीं मंगलाष्टकें साधारणतः स्तोत्रांसारखीं असून त्यांत निरनिराळ्या देवता व महानद्या ह्यांचें नामस्मरण व मंगल करण्याविषयीं त्यांची प्रार्थना आहे. तीं ज्योतिषी उच्च स्वरानें करितात. प्रत्येक मंगलाष्टकाच्या आरंभी व शेवटीं "सावधान! शुभमंगल!", किंवा "सुमुहूर्त" असें एक जागृतिदायक विधान किंवा सूचना असते. तिचा हेतु इतकाच दिसतो कीं, नेमिलेला मुहूर्त जवळ जवळ येत आहे, सबब सर्वांनीं सावध असावें. कोणत्याही कारणानें तो शुभ मुहूर्त टळला जाणार नाहीं, अशाविषयीं दक्षता ठेवावी. पाण्यानें भरलेल्या गंगाळ्यांत जोशीबोवांनीं घटका टाकिलेली असते. ती इयत्तेप्रमाणें भरतांच ज्योतिषी मंगलाष्टकें ह्मणण्याचें बंद करून पुढील श्लोक ह्मणतातः—

मंगलाष्टकें व टाळी.

"तदेव लग्नं सुदिनं तदेव । ताराबलं चंद्रबलं तदेव ।
विद्याबलं दैवबलं तदेव । लक्ष्मीपते ! तेंऽघ्रियुगं स्मरामि ॥"

ह्मणजे, हे लक्ष्मीपते ! तुझ्या पायांचें स्मरण करितों. तें स्मरण, हीच उत्तम लग्नवेळा, हाच उत्तम दिवस आणि हीच नक्षत्रांची, चंद्राची, विद्यांची व दैवाची उत्तम अनुकूलता होय ! हा श्लोक संपण्याबरोबर टाळ्यांच्या

व मंगल वाद्यांच्या गजरांत वधूवरांमध्यें धरिलेला अंतःपट उत्तरेच्या बाजूचा मनुष्य आपल्याकडे चट्‌कन् काढून घेतो. त्यासरशीं वधूवरें आपल्या हातांत एकत्र करून दिलेलें गूळजिरें व तांदूळ परस्परांच्या मस्तकांवर घालितात; व प्रथमतः वधू आपल्या हातांत असलेला पुष्पहार वराच्या गळ्यांत घालिते. नंतर वर आपल्या हातांतील पुष्पहार वधूच्या गळ्यांत घालितो. ह्या समयीं त्यांस परस्परांकडे प्रेमभावानें पहाण्यास सांगतात. नंतर वधूच्या करत्र्या तिच्या डोळ्यांस आणि वराच्या करत्र्या त्याच्या डोळ्यांस कलशांतलें पाणी लावितात; व कलश (करे) आणि दिवे यांची उभयपक्षांत अदलाबदल करितात. घरांत गेल्यावर त्यांचे त्यांनीं करेदिवे फिरून परत घ्यावयाचे.

लोकसत्कार.

वधूवरांतील अंतःपट काढिला जाऊन टाळी वाजतांच लग्नसमारंभासाठीं जमलेल्या गृहस्थांस उभयपक्षांकडून हार, तुरे, गुलाब, अत्तर व पानसुपारी वांटण्यांत येते. भिक्षुक वर्गांत ह्याशिवाय भूयसी दक्षिणा वांटतात. ह्या दक्षिणेसंबंधीं साधारणतः असा नियम आहे कीं, वधूपक्षाकडून जी दक्षिणा देण्यांत येईल, तिच्या दुप्पट वरपक्षानें द्यावयाची. याप्रमाणें गृहस्थ व भिक्षुक ह्या दोन्ही वर्गांस पानसुपारी व दक्षिणा देण्यांत आल्यावर ते हळू हळू उठून घरांतील वधूवरांचें दर्शन घेऊन आपल्या घरीं परत जाऊं लागतात. दर्शन घेण्याचें कारण इतकेंच कीं, तीं उभयतां लक्ष्मीनारायणस्वरूप आहेत असें समजतात. नंतर उभयपक्षांकडून सर्व नोकरचाकर, गडीमाणसें, ह्यांनाही पानसुपारी व मानाची बिदागी देण्यांत येते. लग्नसमारंभासाठीं आला, आणि पानसुपारी मिळाली नाहीं, असा मनुष्य क्वचितच चुकून रहात असेल. स्त्रियांमध्यें हार वांटण्याची चाल दिसत नाहीं. स्वल्पस्वल्प तुरे वांटण्यांत येतात. तथापि, त्यांजमध्यें हळदीकुंकूं, पानसुपारी देणें व ओंट्या भरणें, यांचें माहात्म्य विशेष असतें. हीं कृत्यें आटोपल्यावर लग्नघरची बरीच गर्दी कमी होते, नंतर व्याही [वरपिता] आणि विहीण [वरमाता] हीं अनुक्रमें कन्येच्या पित्याचा व मातेचा निरोप घेऊन आपल्या घरीं परत जातात.

धर्मशास्त्रमतें लग्न कोणतें? व त्याचे आवश्यक विधि.

कन्यादान—वर लग्नप्रकरणामध्यें ह्मटलेंच आहे कीं, नेमिलेल्या सुमुहूर्तें येण्याबरोबर वधूवरांमधील अंतःपट दूर करितात, त्यांजकडून एकमेकांच्या मस्तकांवर अक्षत वगैरे टाकवितात, गळ्यांत पुष्पमाळा घालवितात, व त्यांना परस्परांकडे प्रेमभावानें पाहण्यास सांगतात. ह्या सर्व कृत्यांचा अर्थ, वधूवरांनीं एकमेकांस प्रत्यक्ष पाहून वरिलें, व तीं व्यवहारानें एकत्र केलीं येवढाच समजावयाचा; आणि वस्तुतः हीं कृत्यें हल्लीं हिंदू लोकांमध्यें कुमारिकेनें पुरुषाला वरण्याची जी पद्धति आहे—जो आचार आहे—त्याचींच द्योतक होत. नवरानवरीकडून तीं करण्यांत आलीं, ह्मणजे उभयतांचें 'लग्न लागलें' असें ह्मणतात. तथापि, त्यांतून कोणतेंही कृत्य त्या वधूवरांना धर्मशास्त्राच्या दृष्टीनें पुरेसें बंधनकारक नसतें. कन्येच्या पित्यानें किंवा पालकानें कन्या वराला यथाविधि दान केल्याशिवाय, आणि वधूवरांनीं विवाहहोम व सप्तपदी हे विधि केल्याशिवाय, ती वधू त्या वराची पत्नी झाली, असें धर्मशास्त्र कबूल करीत नाहीं. सबब, पूर्वोक्त आचारानें लागलेल्या लग्नाला धर्मतः जास्त बळकटी येण्यासाठीं अनुक्रमें कन्यादान, विवाहहोम, आणि सप्तपदी, हीं कर्में करावीं लागतात. ह्यांतील प्रत्येक कर्म वधूवरांस उत्तरोत्तर जास्त बंधनकारक होत जातें; आणि शेवटचें सप्तपदी हें कर्म आटोपलें, ह्मणजे त्यांचें लग्न पूर्ण होऊन तीं परस्परांशीं कायमचीं बांधलीं जातात. ह्याच कारणास्तव हिंदूंच्या विवाहांत केवळ धार्मिक विधीलाच विशेष महत्त्व आहे; किंबहुना धर्म हा त्यांच्या विवाहाचा पायाच आहे असें ह्मणतात, तें यथार्थ होय. असो. आतां कन्यादान, विवाहहोम आणि सप्तपदी, हे विवाहाची सांगता करणारे महत्वाचे विधि क्रमानें सांगतों.

कन्यादानाचें उदक.

हें करण्यासाठीं प्रथमतः पाणी मंत्रांनीं सिद्ध करावें लागतें. यास्तव वधूपक्षाचे उपाध्याय वराच्या उजव्या हाताकडे उत्तराभिमुख बसून आपल्यापुढें थोडेसे दर्भ अंथरितात. ते अशा रीतीनें कीं, त्यांचीं अग्रें पूर्वेकडे किंवा पश्चिमेकडे अथवा उत्तरेकडे

व्हावीं. नंतर त्या दर्भांवर तीर्थोदकानें* किंवा तें मिळण्याजोगें नसल्यास स्वच्छ पाण्यानें भरलेलें ताम्रपात्र ठेवून त्यांत साळी आणि जव वाढून बाहेरच्या बाजूनें तें पात्र गंध व पुष्पमालादिकांनीं सुशोभित करितात. नंतर थोड्याशा दूर्वा व आम्रपल्लव घेऊन त्यांनीं त्या भांड्याचें तोंड झांकितात, व "आपोहिष्ठा" इत्यादि नऊ मंत्रांनीं तो कलश अभिमंत्रण करून ठेवितात. ह्मणजे त्यांतील उदक कन्यादानाला योग्य होतें.

कन्यादानसंकल्प व उद्देश.

मग कन्यापित्यानें वराच्या उजव्या हाताकडे आपण व आपल्या उजव्या हाताशीं आपली स्त्री अशा रीतीनें उत्तरेकडे तोंड करून शेंडीस गांठ देऊन बसावयाचें; आणि आचमन प्राणायाम व देशकालाचें स्मरण करून हातांत दर्भ अक्षत व पाणी घेऊन खालीं लिहिल्याप्रमाणें संकल्प करावयाचा:—

"मम समस्त पितॄणां निरतिशयसानंदब्रह्मलोकावाप्त्यादिकन्यादानकल्पोक्तफलावाप्तये अनेन वरेणास्यां कन्यायामुत्पादयिष्यमाणसंतत्या द्वादशावरान्द्वादशपरान्पुरुषान्पवित्रीकर्तुमात्मनश्च लक्ष्मीनारायणप्रीत्यर्थं ब्राह्मविवाहविधिना कन्यादानमहं करिष्ये।"

---

* विवाहाचें ठिकाण एखाद्या तीर्थाच्या कांठीं असल्यास कन्यादानासाठीं लागणारें तीर्थोदक आयत्या वेळेवर आणवितात. तें आणण्याची चाल अशी आहे कीं, नवऱ्या मुलांच्या आप्तांमध्यें जें जोडपें प्रथमवर अथवा पहिल्या विवाहाचें असेल, त्यांच्या पदरास गांठ देऊन नवऱ्याच्या हातांत पाणी आणण्याकरितां तांब्या देतात, व त्यांना वाजत गाजत तीर्थावर पाठवितात. त्यांजबरोबर वधूपक्षाच्या करवल्याही गमतीनें जातात. तीर्थांतून तांब्या भरून घेऊन तो खालीं न ठेवितां नवऱ्यानें आपल्या हातांत अधर धरून आणावयाचा, व उपाध्यायांच्या हातीं द्यावयाचा. ह्मणजे ते त्यासाठीं अंथरलेल्या दर्भांवर तो ठेवितात. ह्या पाण्यास शारंगपाणी अशी संज्ञा आहे. कारण, 'शारंग', किंवा अगदीं बिनचुक ह्मटलें असतां 'सारंग' हें मेघाचें नांव आहे; आणि मेघोदक अधर असून सर्वदा पवित्र मानिलें आहे. त्यावरून ह्या पवित्रोदकाला 'शारंगपाणी' ह्मणत असतील असें वाटतें. याप्रमाणें शारंगपाणी आणिलेल्या दंपत्यांनीं परस्परांचीं नांवें घेतल्याखेरीज करवल्या विनोदार्थ त्यांच्या पदरांची गांठ सोडीत नाहींत.

ह्मणजे, अत्युत्तम आनंद देणाऱ्या ब्रह्मलोकाची प्राप्ति होणें हें जें कन्यादानाचें फल, तें माझ्या सर्व पितरांस मिळावें यासाठीं, आणि ह्या वरापासून ह्या कन्येच्या ठायीं जी संतति होईल तिच्यासुद्धां तिच्या आई-बापांच्या कुळांतील प्रत्येकी बारा बारा मिळून पंचवीस पिढया पवित्र होण्याकरितां, व लक्ष्मीनारायणांच्या प्रीत्यर्थ, ब्राह्म नांवाच्या विवाहविधीनें मी कन्यादान करितों.

असा संकल्प झाल्यावर कन्यापित्याकडून पुढें सांगितलेले मंत्र ह्मणवितात:—

" कन्यां कनकसंपन्नां कनकाभरणैर्युताम् ।
दास्यामि विष्णवे तुभ्यं ब्रह्मलोकजिगीषया ॥
विश्वंभरः सर्वभूताः साक्षिण्यः सर्व देवताः ।
इमां कन्यां प्रदास्यामि पितॄणां तारणाय च ॥

ह्मणजे, ही धन आणि सुवर्णालंकारांनीं युक्त अशी कन्या, मी ब्रह्मलोकाची प्राप्ति करून घेण्याच्या इच्छेनें तुला (वराला) विष्णूप्रमाणें समजून देतों. सर्व जगास व्यापून राहणारा परमेश्वर, पंचमहाभूतें, आणि सर्व देवता ह्यांना साक्षी ठेवून पितरांच्या उद्धारासाठीं ही कन्या तुला देतों.

कन्यादान.

नंतर उपाध्याय एक कांशाचें भांडें जमीनीवर ठेवून त्यावर नवऱ्या मुलास दोन्ही हाताची ओंजळ करण्यास सांगतात. त्याच्या ओंजळीवर नवऱ्या मुलीची ओंजळ ठेवितात, व कन्यादान करणाऱ्या दंपत्यास आपापल्या जागीं उभें करून नवरीच्या ओंजळीवर तिच्या बापास ओंजळ करण्यास सांगतात. अशा रीतीनें जमीनीवरील कांस्यपात्रावर अनुक्रमें नवरा, नवरी, आणि तिचा बाप, ह्यांच्या एकावर एक ओंजळी धरिल्या गेल्या, ह्मणजे पूर्वी कन्यादानासाठीं मंत्रून ठेविलेला पाण्याचा तांब्या कन्येच्या आईच्या हातीं देऊन तिला आपल्या पतीच्या ओंजळीमध्यें त्या तांब्यांतील पाण्याची बारीकशी संतत धार धरण्यास सांगतात. अर्थात् तिनें ओतिलेलें पाणी कन्यापिता,

कन्या, आणि वर ह्यांच्या अंजळींतून खालीं कांस्यपात्रांत पडावें, अशी योजना असते. पाण्याची धार सुरू होतांच "कन्या तारयतु" "पुण्यंवर्धताम्" इत्यादि मंत्र ह्मटल्यानंतर कन्यापित्यानें आपल्या गोत्राचा व नांवाचा उच्चार करून पूर्वी संकल्पांत जो उद्देश सांगितला आहे, त्यासाठीं अमुक गोत्रांत उत्पन्न झालेल्या, अमुक नांवाची माझी कन्या आपली स्त्री करूं इच्छिणाऱ्या विष्णुरूपी ह्या वराला अमुक गोत्रांत उत्पन्न झालेली, अमुक नांवाची, पतीची इच्छा करणारी, लक्ष्मीरूपिणी ही माझी कन्या, हिच्याठायीं या वरानें प्रजा उत्पन्न करावी याकरितां देतों. हिचा आपण (वरानें) स्वीकार करावा. असें ह्मणून आपल्या उजव्या हातानें दर्भ, अक्षत व पाणी वराच्या हातावर सोडावयाचें; आणि या कन्यादानाच्या योगानें प्रजापति ब्रह्मदेव तृप्त होवो! असें ह्मणावयाचें. वरील प्रार्थना ऐकून वरानें "ओम् स्वस्ति" ह्मणजे बरें-ठीक आहे. अशा अर्थाचें विधान करावयाचें. ह्याप्रमाणें 'कन्या तारयतु०' येथपासून वरानें 'ओम् स्वस्ति' ह्मणेपर्यंत सर्व विधानें आणखी दोन वेळ करावीं लागतात.

कन्याप्रतिग्रह.

नंतर नवऱ्यामुलानें नवरीच्या उजव्या खांद्याला आपल्या उजव्या हातानें स्पर्श करून कांहीं मंत्र ह्मणावयाचे असतात. त्यांचा भावार्थ असा आहे कीं, कन्यादान करणारा हाच कोणी एक ब्रह्मदेव आहे. तो हें कन्यारूपी द्रव्य, प्रतिब्रह्मदेव असा जो मी, त्या मला देता झाला. कन्यादानाचें फळ मिळावें, ही दान देणाराची इच्छा; आणि लग्न करून पुरुषार्थ साधावेत, ही दान घेणाराची इच्छा आहे. तेव्हां एक इच्छा दुसऱ्या इच्छेला देती झाली. ह्मणून दान देणारा कन्यापिता नव्हे, व घेणारा मी वरही नव्हे. तर, देणारी इच्छा आणि घेणारीही इच्छाच आहे. हे ब्रह्मदेवा! यापुढें माझा मनोरथ पूर्णतेस ने. हे वधू! भावी संसारसुखाच्या इच्छेनें प्रेरणा केल्यामुळें त्या इच्छेसाठीं ह्मणून मी तुझा स्वीकार करितों. माझ्या स्वतःसाठीं नव्हे. हे संसारसुखेच्छे! वधूरूपी हें द्रव्य तुझेंच आहे. वधू! तूं वृष्टीसारखी आहेस. ह्मणजे वृष्टि जशी धान्यादि सर्व पदार्थ उत्पन्न

करणारी आहे, तशी तूंही सर्व मनोरथ पूर्ण करणारी आहेस. अतएव, आकाशासारखा हा दाता वृष्टितुल्य जी तूं त्या तुला देवो-दान करो; आणि पृथिवी समान जो मी, तो तुझा स्वीकार करो.

वरील आशयाचा मंत्र ह्मणून झाल्यावर कन्यापित्यास उद्देशून वरानें सांगावयाचें कीं, धर्म आणि प्रजा ह्यांच्या सिद्धीकरितां मी ह्या कन्येचा स्वीकार करितों.

कन्यादानानंतरचा कांहीं विधानें व त्याबरोबर देण्याचा इतर दानें वगैरे.

तदनंतर कन्यापित्यानें वरास उद्देशून अशा अर्थाचें विधान करावयाचें कीं, हे वरा! गौरीसारखी ही कन्या यथाशक्ति अलंकृत करून अमुक नांवाच्या तुला दिली आहे. हिचा अंगिकार कर. तसेंच कन्येला अनुलक्षून ह्मणावयाचें कीं, देवि कन्ये! तूं माझें अधःपातापासून रक्षण करण्यासाठीं माझ्यापुढें, दोहोंबाजूस व पाठीमागें निरंतर देवता रूपानें रहा. तुझ्या दानानें मी मोक्ष पावेन. नंतर फिरून वरास सांगावयाचें कीं, हे वरा! माझ्या वंशांत उत्पन्न झालेल्या ह्या कन्येचें आठ वर्षें पालन केलें, आणि ती आज तुला दिली आहे. ही तुझा पुत्रपौत्रादि वंश वाढविणारी होईल. धर्म, अर्थ, व काम ह्या तिन्हा पुरुषार्थांच्या बाबतींत त्वां हिचें अतिक्रमण न करावें. ह्यावर, 'मी अतिक्रमण करणार नाही.' असें वरानें उत्तर द्यावयाचें. मग केलेल्या कन्यादानाची सांगता व्हावी, यासाठीं दात्यानें वरास यथाशक्ति दक्षिणा द्यावी. तसेंच पाणी पिण्याची भांडीं, [तांब्या पंचपात्री वगैरे] जेवणाचें ताट, गाय, हैस, घोडा, हत्ती, सेवक, भूमि, अलंकार, इत्यादि आपल्या सामर्थ्याप्रमाणें त्या त्या वस्तूचा संकल्प करून ती वरास द्यावी. विशेष माहितीसाठीं वराला देण्याच्या कित्येक वस्तूंचे संकल्प त्यांच्या अर्थासहित ह्याखालीं दिले आहेत.

१ तांब्यापंचपात्रीचा संकल्पः—

परापवादपैशून्यादभक्ष्यस्य च भक्षणात् ।
उत्पन्नपापं दानेन ताम्रपात्रस्य नश्यतु ॥

दुसऱ्यांचे अपवाद उघडकीस आणण्यापासून झालेलें व अभक्ष्य पदार्थांच्या भक्षणापासून झालेलें पाप या ताम्रपात्राच्या दानानें नाहींसें होवो!

२ जेवणाच्या ताटाचा संकल्पः—

यानि पापान्यकाम्यानि कामोत्थानि कृतानि च ।
कांस्यपात्रप्रदानेन तानि नश्यंतु मे सदा ॥

न समजून घडलेलीं व जाणून केलेलीं पापें या कांस्यपात्रदानानें नाहींशीं होवोत!

३ गाईचा संकल्पः—

यज्ञसाधनभूता या विश्वस्याघौघनाशिनी ।
विश्वरूपधरो देवः प्रीयतामनया गवा ॥

जिच्यापासून घृतादि उत्पन्न होतें, म्हणून जी यज्ञाचें मुख्य साधन आहे, व जी जगाचीं सर्व पापें नाहींशीं करिते, अशी ही धेनु आहे. हिच्या दानानें स्थावरजंगमात्मक-विश्वरूप-जो देव तो तृप्त होवो!

४ म्हशीचा संकल्पः—

इंद्रादि लोकपाला[illegible]षी शुभा ।
महिषासुरस्य जननी [illegible]सदा ॥

इंद्रादि अष्ट लोकपालांची जी पट्टा[illegible] महिषासुर दैत्याची माता ती माझे सर्व मनोरथ पूर्ण करो!

४ दासीचा संकल्पः—

इयं दासी मया तुभ्यं श्रीवत्स प्रतिपादिता ।
सदा कर्मकरी भोग्या यथेष्टं भद्रमश्नुते ॥

हे विष्णुरूपी वरा! ही दासी मी तुला दिली आहे. हिच्याकडून नित्य गृहकृत्यें करून घेऊन हिचा उपभोग घे; आणि हिचें यथायोग्य पालन कर.

५ भूमीचा संकल्पः—

सर्वसस्याश्रया भूमिर्वराहेण समुद्धृता ।
अनंतसस्यफलदा अतः शांति प्रयच्छ मे ॥

जी सर्व प्रकारच्या धान्यांना आश्रयभूत आहे, जिला विष्णूनें वराहावतारीं दाढेनें वर उचलून धरिली, आणि जीपासून अपरिमित धान्यें व फळें उत्पन्न होतात, अशी ही भूमि तुला दिल्यापासून मला शांति मिळो!

६ शय्येचा संकल्पः—

अशून्यं शयनं नित्यमनूनां श्रियमुन्नतिं ।
सौभाग्यं देहि मे नित्यं शय्यादानेन केशव ॥

हे केशवा! (विष्णुरूप वरा!) ही (पलंगबिछान्यासहित) शय्या मी तुला देतों. हिच्या योगानें मला निरंतर विपुल संपत्ति, उत्कर्ष आणि सौभाग्य दे.

७ अंगठीचा संकल्पः—

हिरण्यगर्भसंभूतं सौवर्णं चांगुलीयकम् ।
सर्वप्रदं प्रयच्छामि प्रीणातु कमलापतिः ॥

ब्रह्मदेवापासून उत्पन्न झालेलें, सुवर्णघटित, आणि सर्व मनोरथ पुरविणारें असें हें अंगुलीयक (आंगठी) मी तुला देतों; ह्यानें लक्ष्मीपति विष्णु तृप्त होवो!

८ कुंडलादि कर्णभूषणांचा संकल्पः—

क्षीरोदमथने पूर्वमुद्धृतं कुंडलद्वयम् ।
श्रियासह समुद्भूतं ददे श्रीः प्रीयतामिति ॥

पूर्वी समुद्रमंथन केल्यानंतर त्यांतून लक्ष्मीसह निघालेलें हें कुंडलद्वय लक्ष्मी प्रसन्न व्हावी एतदर्थ देतों.

दिव्याचा (समई वगैरे) संकल्पः—

देवदेव नमस्तुभ्यं सहस्रार्कसमद्युते ।
दीप्तिदीपप्रदानेन स मे विष्णुः प्रसीदतु ॥

सहस्रावधि सूर्यांच्या तेजाप्रमाणें ज्याचा प्रकाश आहे, अशा हे देवाधिदेवा दीपा! तुला नमस्कार असो. प्रज्वलित असा जो तूं त्या तुझ्या दानें करून भगवान् विष्णु मजवर प्रसन्न होवो.

१० घराचा संकल्पः—

इदं गृहं गृहाण त्वं सर्वोपस्करसंयुतम् ।
तव विप्र प्रसादेन ममास्त्वभिमतं फलम् ॥

हे विप्रा, संसारांत उपयोगी पडणाऱ्या सर्व साहित्यानें युक्त असें हें घर तूं घे, आणि संतुष्ट हो! तुझ्या प्रसादानें मला इष्टफलाची प्राप्ति होवो!

दानें देण्याघेण्याचें काम आटोपलें, ह्मणजे वराकडून कन्येच्या उजव्या कुशीस ' यत्कक्षीवांसं० ' या मंत्रानें स्पर्श करवितात. नंतर उपाध्यायांनीं पूर्वी मंत्रून ठेविलेलें उदक एका कांशाच्या भांड्यांत ओतून तें आणखी ' अनाधृष्टं० ' या मंत्रानें अभिमंत्रण करितात. मग त्या उदकांत सुवर्ण, दर्भ, दूर्वा व उंबराचे ताजे कोंवळे पल्लव घालून त्या उदकानें वधूवरांस ' आनः प्रजां जनयतु० ' ' समुद्रज्येष्ठा० ' 'आपोहिष्ठा० ' व ' देवस्यत्वा० ' ह्या मंत्रांनीं अभिषेक करितात. अभिषेकाच्या द्रव्यांत सुवर्ण प्रमुख असल्यानें ह्या अभिषेकास **सुवर्णाभिषेक** अशी संज्ञा आहे.

सुवर्णाभिषेक.

सुवर्णाभिषेक झाल्यावर वधूवरांस एकमेकांसमोर बसवून त्यांच्या गळ्याभोंवतीं व कंबरेभोंवतीं दुधांत भिजवून दुहेरी केलेलें कच्चें पांढरें सूत, ' परित्वागिर्वणो० ' ह्या मंत्रांनीं गुंडाळितात. चार किंवा पांच वेष्टनें झालीं, ह्मणजे कंठाचें सूत वधूवरांस उठवून खालीं जमिनीकडून काढितात. कंबरेचें सूत वरून ह्मणजे डोक्याकडून काढितात. नंतर त्या सुतास कुंकुम लावून पीळ घालितात, व त्यांत हळकुंड आणि लोंकर बांधून त्याचीं दोन कंकणें तयार करितात. त्यांपैकीं कंठसूत्राचें कंकण वरानें वधूच्या डाव्या हाताच्या मणगटास ' नीललोहितं० ' ह्या मंत्रानें बांधावयाचें; व कटिसूत्राचें कंकण त्याच मंत्रानें वधूनें वराच्या उजव्या मणगटास बांधावयाचें. ह्या कृत्यास अनुक्रमें **सूत्रवेष्टन** आणि **कंकणबंधन** असें ह्मणतात. समंत्रक सूत्रवेष्टन हें वधूवरांच्या खऱ्या लग्नाचें द्योतक आहे; व कंकणबंधन हें वधूपक्षीं तिच्या स्वजनांची वृद्धि दाखवितें; आणि वरपक्षीं तो इतःपर संसारांत बद्ध झाला असें दाखवितें.

सूत्रवेष्टन व कंकणबंधन.

कंकणें बांधिलीं गेल्यावर वधूवरांचें आयुष्य वाढविणारा **अक्षतारोपणाचा** विधि करितात. त्यासाठीं एका पात्रांत शुभ्र तांदूळ आणि दुसऱ्या पात्रांत दूध व तूप एकत्र करून घेतात. नंतर

अक्षतारोपण.

वधूवरांकडून आपापले हात स्वच्छ धुववितात. मग वरानें वधूच्या अंजलींत तें एकत्र केलेलें दूधतूप दोन वेळां थोडथोडें वाढून त्यावर कांहीं तांदूळ घालावयाचे, आणि फिरून त्या तांदळांवर दोन वेळां किंचित् दूधतूप ओतून तिचा अंजलि तसाच असूं द्यावयाचा. हीच क्रिया कन्यापित्यानें किंवा कोणीं इतरानें वराच्या अंजलीमध्यें करावयाची. नंतर उभयतांच्या अंजलींतील तांदळांवर सुवर्ण ठेवून वधूचा अंजलि वराच्या अंजलीवर ठेवितात, व 'कन्या तारयतु०' इत्यादि पूर्वोक्त मंत्र ह्मणतात. मग कन्येस उठवून तिच्याकडून 'भगो मे कामः समृध्यताम्' ह्या मंत्रानें अंजलींतील अक्षता वराच्या मस्तकावर टाकवितात; आणि वराकडून त्याच्या अंजलींतील अक्षता 'यज्ञो मे कामः समृध्यताम्' ह्या मंत्रानें वधूच्या मस्तकावर घालवितात. ह्याचप्रमाणें आणखी दोन वेळां वधूवरांचे अंजलि तयार करवून त्यांतील अक्षता वधूकडून वराच्या मस्तकावर अनुक्रमें 'श्रियो मे कामः समृध्यताम्' व 'प्रजा मे कामः समृध्यताम्' ह्या मंत्रांनीं, व वराकडून वधूच्या मस्तकावर अनुक्रमें 'धर्मो मे कामः समृध्यताम्' व 'यशो मे कामः समृध्यताम्' ह्या मंत्रांनीं घालविण्यांत येतात. ह्याप्रमाणें तीन वेळां अक्षतारोपण झाल्यावर हाच सर्व विधि फिरून एकवार अमंत्रक करविण्यांत येतो. त्यांत फरक इतकाच कीं, पहिल्या खेपेस वरानें वधूचा आणि कन्यापित्यानें वराचा अंजलि तयार केला, तसा ह्यावेळेस न करितां व्युत्क्रमानें वधूकडून वराचा आणि कन्यापित्याकडून वधूचा अंजलि तयार करवितात, व वराचा अंजलि वधूच्या अंजलीवर ठेवून 'कन्या तारयतु०' इ० सहा मंत्रांनीं अभिमंत्रित करून प्रथमतः वराकडून वधूच्या मस्तकावर, अशा व्युत्क्रमानें, परंतु पूर्वीच्याच मंत्रांनीं अक्षता घालवितात. नंतर फिरून एकदां प्रथम सांगितलेल्या क्रमानें उभयतांचे अंजलि तयार करवून ते मंत्राशिवाय एकेकदां परस्परांकडून एकमेकांच्या मस्तकावर टाकवितात. हें झाल्यावर क्रमानें नवरानवरीकडून त्यांच्या मस्तकावरील पुष्प त्यांजकडून घेववून तें दूधतुपाच्या मिश्रणांत बुडवून त्यानें एकमेकांच्या कपाळीं तिलक करवितात. आणि पर-

स्परांकडून एकमेकांस पुष्पहार घालवितात. म्हणजे अक्षतारोपणाचें कृत्य आटोपलें.

वधूला वस्त्रदान व मंगलसूत्र-बंधन.

तदनंतर वधूला पूर्वाभिमुख बसवून वरपक्षाच्या सुवासिनीहस्तें तिला एक नेसण्याचें रेशमी वस्त्र (पैठणी इत्यादि) आणि एक रेशमी जरीकिनारी चोळी, व मणिमंगलसूत्र* गळेसरासहित देतात. मग तिला घरांत नेऊन§ तीं वस्त्रें परिधान करवून आणितात, व फिरून पूर्वस्थळीं बसवितात. नंतर वरानें तें मंगलसूत्र घेऊन इष्टदेवतेचें स्मरण करून वधूच्या गळ्यांत आपल्या हातानें बांधावयाचें; व बांधितांना पुढील मंत्र म्हणावयाचा:—

---

* हें मंगलसूत्र भावीण, कसबीण, वगैरे कोणा एखाद्या जन्मसुवासिनींकडून ओंविलेलें असतें. मतलब हा कीं, तिच्याप्रमाणें वधूही जन्मपर्यंत सौभाग्यवती रहावी.

§ बहुत करून सर्व ब्राह्मणांत अशी चाल आहे कीं, विहिणी (वरमाता) वरप्रस्थानाच्या मिरवणुकीबरोबर वधूगृहीं जाण्यासाठीं मिरवत येतात. परंतु, त्या वधूच्या घरांत प्रवेश न करितां एखाद्या शेजाऱ्याच्या घरीं बसून राहतात. कारण, त्यांस 'सुनमुखा'चा सोहळा केल्यावांचून सुनेचें तोंड पहावयाचें नसतें! लग्न लागल्यानंतर ह्या जागेंतून त्या कोणालाही न विचारितां मुकाट्यानें आपल्या घरीं रुसून परत जातात. मग वधूची आई कित्येक स्त्रियांस बरोबर घेऊन वाजत गाजत विहिणींची समजूत करण्यासाठीं जाते; व सामर्थ्याप्रमाणें कित्येक वस्तु देऊन त्यांची समजूत घालून त्यांस मोठ्या मानपानानें परत आणिते. ह्यावेळीं विहिणी (वरमाता) आपल्याबरोबर एक साकरपुडा व सुनेच्या गळ्यांत घालण्यासाठीं एखादा दागिना (चीरमाळ, पुतळ्याचीमाळ वगैरे) घेऊन येत असतात. वधूगृहाच्या दरवाज्याशीं येतांच त्यांना ओलांडून जाण्यासाठीं तांदुळांच्या धुवणाचे पाट सोडिलेले असतात. तसेंच कारल्याच्या वेलाखालून जाण्याची योजना केलेली असते. मग विहिणी त्या वेलाखालून धुवणी ओलांडून घरांत जातात, तेथें कन्येच्या आईनें दिलेलें हिरवें लुगडें नेसतात, भेटवकन्याचा रुपया घेतात, आणि वर सांगितल्याप्रमाणें वधू पैठणी नेसण्यासाठीं घरांत येतांच तिला कुंकूं लावून तिच्या तोंडांत खडीसाकर व गळ्यांत तो सुवर्णालंकार घालून मग तिचें मुख निरखून पाहतात. हा सोहळा झाला, म्हणजे मग विहिणींना वधूगृहीं वाटेल तेव्हां येतां येतें; व तिचें तोंड पाहण्याचीही मोकळीक होते. परंतु हे प्रकार आतां बरेच मागें पडत चालले आहेत.

"मांगल्यतंतुनानेन भर्तृजीवनहेतुना ।
कंठे बध्नामि सुभगे सा जीव शरदां शतम् ॥"

म्हणजे हे पतिव्रते! पतीच्या (अर्थात् माझ्या) जीवनाला कारण असें हें मंगलसूत्र मी तुझ्या गळ्यांत बांधितों. तूं माझ्यासहित शंभर वर्षें सुखानें नांद.

वधूस अलंकारदान आशीर्वाद व लक्ष्मी पार्वती, शची व दाक्षायणी ह्यांचें पूजन.

मंगलसूत्र बांधून झाल्यावर 'आयुष्यं वर्चस्यं०' ह्या सूक्तानें वधूस वराकडून यथाशक्ति अलंकार घालवितात. मग एका पात्रांत पांच सुपाऱ्या हळकुंडें व आचारपरत्वें खारीकही ठेवून उपाध्याय वधूवरांकडून 'गणानांत्वा०' व 'आतून इंद्र०' ह्या दोन मंत्रांनीं त्या पात्रांत गणपतीची यथाविधि पूजा करवितात. ती झाल्यावर गणपतीच्या संतोषाकरितां ब्राम्हणांस यथाशक्ति दक्षिणा देववितात. मग त्या पूजा केलेल्या सुपाऱ्या पुरोहित वधूवरांच्या अंगावरील वस्त्रांच्या पदरीं बांधितात; आणि 'नीललोहितं०' ह्या मंत्रानें त्या उभयतांच्या अंगावरील वस्त्रांचे पदर एकत्र करून त्यांस गांठ देतात. नंतर कन्येचीं मातापितरें आणि इतर वृद्ध सुवासिनी वधुवरांच्या कपाळीं अक्षता लावून त्यांस आशीर्वाद देतात. पुढें उभयतांकडून सौभाग्यादि प्राप्तीसाठीं महालक्ष्मी, पार्वती, व शची ह्यांचें पूर्वोक्त विधीनें पूजन करवून त्या देवतांच्या संतोषार्थ वधूकडून सुवासिनींस वायनें देववितात. नंतर त्यांजकडून देशकालस्मरणपूर्वक विवाह झाल्यापासून चार दिवस पर्यंत विवाहव्रताचें आचरण करण्याविषयीं संकल्प करवून प्रथम दिवशीं तीं उभयतां वधूवरें रोहिणी व सोम (चंद्र) आहेत, अशा भावनेनें त्यांजकडून दाक्षायणीची पूजा करवितात. म्हणजे कन्यादान व त्याचीं एकंदर अंगभूत कर्में आटोपलीं.

वधूवरांचें वेदीवर आरोहण व होमसंकल्प.

विवाहहोम—कन्यादानांगभूत कर्में समाप्त झालीं, म्हणजे वरानें वधूचा हात धरून तिला विवाहहोमाकरितां घरांतून मंडपांतील वेदीजवळ आणावयाची. वधू लहान असल्यास तिच्या पक्षाच्या स्त्रिया ह्या समयीं विनोदार्थ वराकडून तिला कडेवर घेववितात. असो.

वेदीजवळ गेल्यावर वरानें आपण तिजवर चढून पाटावर पूर्वाभिमुख बसावयाचें. नंतर उपाध्याय वधूला वेदीच्या पश्चिमेकडून यावयास सांगून उत्तरेच्या बाजूनें तिला वर घेतात; आणि वराच्या उजव्या हातास बसवितात. वेदीवर आल्यापासून तिनें बोलूं* नये असा शास्त्रार्थ आहे. तथापि, न बोलण्याविषयीं कोणाही हिंदु वधूला सांगण्याचा प्रसंग क्वचितच येतो. कारण, ती जात्याच विनयवती असते. आपल्या पुरुषाशीं तर काय, परंतु त्याच्या समक्ष इतर आप्तस्वकीयांशींही ती सहसा भाषण करण्यास धजत नाहीं. असो. नंतर वरानें आचमन व देशकालाचा उच्चार करून खालीं दर्शविल्याप्रमाणें संकल्प करावयाचा:—

प्रतिगृहीतायामस्यां वध्वां भार्यात्वसिद्धये
गृह्याग्निसिद्धये च विवाहहोमं करिष्ये ।
तदंगं स्थंडिलोल्लेपनाद्याग्निप्रतिष्ठापनांतं करिष्ये ।

म्हणजे, दान घेतलेल्या ह्या वधूच्या ठायीं भार्यात्व अर्थात् पत्नीपणा येण्यासाठीं व गृह्याग्नि सिद्ध होण्यासाठीं मी विवाह होम आणि त्याचीं अंगभूत स्थंडिल लिंपण्यापासून अग्निप्रतिष्ठेपर्यंत जीं कर्में तीं करितों. यावरून होम करण्याचा उद्देश व्यक्त होत आहे. मग त्याप्रमाणें करावयाचें.

उपराह्निल वगैरे.

स्थंडिलाच्या पश्चिमेस लहान मोठा असे दोन दगड (बहुतकरून पाटा वरवंटा सहाणं वगैरे,) ठेवितात. ईशान्येस भाताच्या राशीवर पाण्यानें भरलेला एक कलश ठेवितात. त्यावर आम्रपल्लव ठेवून तो गंधपुष्पादिकांनीं सुशोभित करितात. स्थंडिलाच्या उत्तरेकडील बाजूस पूर्वपश्चिम तांदळांचे सात लहान लहान ढीग घालितात. नंतर वराच्या हातांत दोन समिधा देऊन देशकालाचा उच्चार करवून अन्वाधानापासून आघारापर्यंत कर्म करण्याविषयींचा संकल्प करवितात. शिवाय, तीनवेळ अग्निपवमानासाठीं, एकवेळ अग्नि व प्रजापति ह्या देव-

---

* ' नियमितवाचं वधूमानीय ।' सूत्रकारः

तांसाठीं आज्यानें व अर्यमाग्नि, वरुणाग्नि, पूषाग्नि आणि प्रजाप्रति ह्या देवतांसाठीं लाह्यांनी व शेषद्रव्यानें स्विष्टकृत् अग्नि इत्यादि देवतांसाठीं होम करितों, असा संकल्प करवितात. स्थंडिलाच्या उत्तरेस पात्रें मांडितांना त्यांमध्यें एका सुपांत साळीच्या लाह्या घालून तें सूप ठेवितात. आज्याधिश्रयणापर्यंत कर्म आटोपल्यावर लाह्यांसहित आज्याला (तुपाला) तीनवेळ पर्यग्निकरण करितात. व आज्योत्पवन झाल्यानंतर तीन वेळ लाह्यांस प्रोक्षण करितात. वधूला आपल्या हातानें वराच्या उजव्या हातास स्पर्श करण्यास सांगतात, आणि वराकडून आघार होम करविल्यावर मुख्य होम करवितात. त्यांतील महत्वाच्या मंत्रांचा अर्थ ह्याखालीं देत आहों.

मुख्य होमाचे मंत्रार्थ.

हे पवित्ररूप अग्ने ! तूं आमचीं आयुष्यें रक्षितोस. तूं आह्मांला अन्न आणि बल हीं दे; आणि आह्मांला पीडा करणारे राक्षस आह्मांपासून दूर असतांच त्यांस मार.

ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र व अंत्यज ह्या पांच वर्णांस इच्छिलेलें फळ देणारा असल्यामुळें त्यांचा आप्त झालेला, सर्व कर्मांचा साक्षी, सर्वांस पवित्र करणारा, यज्ञादि कर्में करण्यासाठीं ऋत्विजांनी पुढें स्थापिलेला, व दैवादिक ज्याची स्तुति करितात, अशा पवमानसंज्ञक अग्नीपाशीं आम्ही धनादिक मागतों.

हे अग्नि ! तूं चांगलीं कर्में करणारा आहेस. तूं आमचेठायीं उत्तम पराक्रम व तेज हीं ठेव. तसेंच द्रव्य व पुत्र यांची समृद्धि आणि गोमहिष्यादि पशूंची वृद्धि कर.

हे हविर्भाग सेवन करणाऱ्या अग्नि! तूं ज्याअर्थी कन्येचा अर्यमा ह्मणजे दाता आहेस, व वेद न जाणणाऱ्यांना न समजणारें 'वैश्वानर' असें गुप्त नांव धारण करितोस, आणि हे अर्यमाग्नि ! तूं वधूवरांस एक विचारानें वागणारीं करितोस, त्याअर्थी तूं सर्वांचा मित्र आहेस. तुझी चांगल्या प्रकारें स्थापना करून आज्यादि द्रव्यांनी तुला प्रदीप्त करितात-

लाजाहोम अश्मारोहण अग्निप्रदक्षिणा वगैरे.

इत्यादि अर्थपर पांच मंत्रांनीं होम करणें झाल्यावर वरास उठवून वधूसन्मुख पश्चिमेकडे तोंड करून उभा करितात; आणि पांचही बोटांसह वधूचा उताणा उजवा हात त्याजकडून उजव्या हातानें धरवितात; व पुढील आशयाचा मंत्र ह्मणवितात. हे स्त्रिये! तूं मला पति करून माझ्या संगतीं राहून वृद्धावस्था संपादन करणार आहेस. ह्मणून तुला सौभाग्य प्राप्त होण्याकरितां मी तुझा हात धरितों. भग अर्यमा, सविता, व पूषा या चार देवांनीं गृहस्थाश्रमांतील सर्व कर्मे चालविण्याकरितां तुला माझ्या स्वाधीन केली आहे. नंतर त्यास पूर्ववत् बसावयास सांगून वधूला उभी करितात, व तिच्याकडून तिचे दोन्ही हात स्वच्छ धुववितात; आणि तिला दोन्ही हातांची ओंजळ करावयास सांगून त्या ओंजळींत स्रुव्यानें किंचित् तूप टाकितात. मग तिचा भाऊ किंवा त्याच्या ऐवजीं कोणी निकटसंबंधी असेल त्याकडून सुपां-[illegible] दोन वेळ एकेक मूठभर लाह्या घेववून त्या [illegible]तात; व सुपांतील आणि ओंजळींतील लाह्यांवर वराकडून अभिघार करवितात. नंतर वरानें 'अर्यमणंनुदेवं०' ह्या मंत्रानें उभें राहून आपल्या दोन्ही हातांनीं वधूचा अंजलि धरून त्याच्या शेवटाकडून किंवा बाजूनें आंतील लाह्या होमांत घालावयाच्या. त्या मंत्राचा [illegible] असा आहे कीं, देदीप्यमान् अर्यमा नांवाचा अग्नि, ज्याला आजपर्यंत [illegible] वधूंनीं हविर्द्रव्यानें संतुष्ट केलें, तो ह्या वधूचें आई, बाप, बंधु [illegible]कांवरील प्रेम कमी करवून त्यांच्या कुळांतून हिला मुक्त करो; आणि [illegible] आई, बाप, बंधु इत्यादिकांवर हिचें प्रेम वाढवून माझें कुळ न सोडितां [illegible] अनुरक्त होऊन राहण्याची हिला बुद्धि देवो! ह्या होमास लाजाहोम [illegible] लाह्यांचा होम] अशी वास्तविक संज्ञा आहे. परंतु, अज्ञलोक अप[illegible] त्याला 'लज्जा होम' असें ह्मणतात; आणि हा होम वधूनें केल्यावर [illegible] लाज उत्पन्न होते, असा अज्ञानमूलक तर्क करीत असतात. [illegible] वस्तुतः उद्देश काय आहे, तो मंत्रार्थावरून स्पष्ट होत आहेच. सबब,

त्यासंबंधानें जास्त लिहिण्याची जरूर नाहीं. असो. नंतर अग्रभागीं वर आणि त्याच्या पाठीमागें वधू अशा क्रमानें वराकडून वधूचा हात धरवून पाट्या वरवंट्याखेरीज होमपात्रें, उदकुंभ आणि अग्नि ह्या सभोंवतीं त्या उभयतांकडून ‘अमोहमस्मि०’ ह्या मंत्रानें प्रदक्षिणा घालवितात. त्या मंत्राचा अर्थ असा आहे कीं, हे स्त्रिये! मी सामवेदरूप आहे, आणि तूं ऋग्वेदरूप आहेस; तसाच मी आकाशरूप आहें, व तूं पृथिवीरूप आहेस. आपण उभयतां ह्या अग्नि व ब्राह्मणांसमक्ष विवाह करूं, प्रजा उत्पन्न करूं, आणि रूपशीलादिकांनी एकमेकांस आवडतीं होऊन शंभर वर्षें निर्मल मनानें—आनंदानें—राहूं. हें झाल्यावर वधूस दोन्ही पाय पाट्यावर ठेवून उभें राहण्यास सांगतात. ती तसें करितांना वरानें ‘इममश्मान०’ हा मंत्र ह्मणावयाचा. त्याचा अर्थ असा. हे वधू, तूं ह्या पाषाणावर चढ, आणि हा पाषाण जसा घट्ट आहे, तशी तूं मनानें घट्ट हो; व जे तुझें अहित करणारे असतील त्यांना आपल्या सद्वर्तनानें वश कर. नंतर पुनः पूर्वोक्त उपस्तरणादि करून वधूच्या अंजळींतील लाह्या ‘वरुणंनु०’ ह्या मंत्रानें होमांत घालून मागील प्रमाणेंच ‘अमोहमस्मि०’ ह्या मंत्रानें प्रदक्षिणा करावयाची; व ‘इममश्मान०’ ह्या मंत्रानें तिला फिरून पाट्यावर उभी करावयाची. पुन्हां पूर्वोक्त पद्धतीनें ‘पूषणंनु०’ ह्या मंत्रानें लाह्या होमांत घालून ‘अमोहमस्मि०’ ह्या मंत्रानें प्रदक्षिणा व ‘इममश्मान०’ ह्या मंत्रानें तिला पाट्यावर उभी करावयाची. ‘वरुणंनु०’ आणि ‘पूषणंनु०’ ह्या मंत्राचा अर्थ ‘अर्यमणंनु०’ मंत्राचा जो अर्थ वर सांगितला आहे त्याप्रमाणेंच आहे. फरक ह्मणून इतकाच कीं, ‘वरुणंनु’ ह्या मंत्रांत वरुणनामक अग्नीची आणि ‘पूषणंनु०’ ह्यांत पूषाग्नीची प्रार्थना आहे. असो. ह्याप्रमाणें तीन वेळां समंत्रक लाह्यांचा होम, अग्निप्रदक्षिणा व दगडावर चढणें हीं कृत्यें झालीं ह्मणजे वरानें पूर्वस्थलीं बसून लाह्यांचें सूप आपल्याकडे तोंड होईल असें धरून त्यांतील सर्व लाह्या ‘प्रजापतयेस्वाहा’ ह्मणून होमांत घालावयाच्या. ह्यावेळीं प्रदक्षिणा व अश्मारोहण ह्यांचें कारण नाहीं.

ह्यासमयीं वधूच्या ज्या बंधूनें किंवा आप्तानें तिच्या अंजलींत पूर्वी प्रमाणें लाह्या घातल्या असतील त्यास वरपक्षानें एक पागोटें देण्याची चाल आहे. ह्या पागोट्यास कानपिळ्याचें पागोटें असें ह्मणतात. कारण, तें मेहुण्यानें नवऱ्यामुलाचा कान पिळल्यावर द्यावयाचें असतें!

कानपिळा.

सप्तपदी—जो आपल्या समागमें सात पावलें चालला, तो आपला सखा झाला अशी समजूत आहे. कारण, सख्याचे सात धर्म आहेत. ते बरोबर चालतांना प्रत्येक पावलास उत्पन्न होतात; आणि ह्मणूनच सख्याला संस्कृतांत 'सातपदीन' अशी संज्ञा आहे. आतां हे धर्म कोणते, ते पुढील मंत्रार्थावरून ध्यानीं येतील.

उपपत्ति.

होमाच्या उत्तरेस तांदळांच्या सात राशी (लहान लहान ढीग) ठेवितात, ह्मणून वर सांगितलें आहे. त्या राशीवरून वधूस चालवावयाची. प्रत्येक राशीवर वधूनें आपला उजवा पाय ठेविला, ह्मणजे वरानें अनुक्रमें 'इषएक०' 'ऊर्जेद्वि०' 'रायस्पो०' 'मायोभ०' 'प्रजाभ्यः०' 'ऋतुभ्यः०' आणि 'सखासप्त०' हे मंत्र ह्मणावयाचे. त्यांचा क्रमशः अर्थ खालीं लिहिल्याप्रमाणें:—

मंत्रार्थ.

(१) हे वधू! तूं माझ्या बरोबर एक पाऊल चाललीस, तेव्हां तुझें माझें सख्य झालें. ह्मणून तूं मला अन्न देणारी (स्वयंपाक करून अन्न पुरविणारी) हो. आणि मला अनुकूळ वाग. आपण उभयतां बहुत पुत्र पावूं. ते आ[illegible]चे पुत्र दीर्घायु होवोत!

(२) हे वधू! तूं माझ्या बरोबर दोन पावलें चाललीस. तूं माझें बळ वाढीव. ('मला अनुकूळ वाग' येथपासून पुढील मजकूर प्रत्येक मंत्रांत सारखाच असल्यानें दर खेपेस त्याची पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं. तो वर एकदा सांगितलाच आहे.)

(३) तूं तीन पावलें चाललीस, ह्मणून माझें धन वाढविणारी हो.

(४) तूं चार पावलें चाललीस, याकरितां सुख वाढविणारी हो.

(५) तूं पांच पावलें चाललीस, ह्मणून संतति वाढविणारी हो.

(६) तूं सहा पावलें चाललीस, ह्मणून सर्व ऋतूंमध्यें प्राप्त होणारे ते ते भोग देणारी हो.

(७) येवढा वेळपर्यंत तूं माझ्याबरोबर सात पावलें चाललीस, यामुळें तुझें माझ्याशीं सख्य दृढ झालें.

[illegible] स्त्रीपुरुषांचें सख्य किती दृढ होईल त्याचें अनु- [illegible] येण्यासारखें आहे. असो. नंतर वधू आणि वर [illegible] मस्तकांचा स्पर्श करवितात; आणि पूर्वोक्त [illegible] उदक वधूवरांच्या मस्तकावर 'शांतिरस्तु०' [illegible] तात.

[illegible] बसवून स्विष्टकृत् होम, विभूतिधारण ह्मणजे [illegible] लावणें, इत्यादि कृत्यें करून होमविधि [illegible]. नंतर उभयतांच्या वस्त्रांची गांठ सोडून [illegible] यास सूर्याचें, आणि गोरज किंवा रात्रीच्या [illegible] अरुंधती आणि सप्तऋषि ह्यांचें वधूवरांकडून [illegible] 'जीवपत्नी प्रजां विंदेय' म्हणजे माझा पति [illegible] प्राप्त व्हावी, असें मी इच्छितें. असें म्हण- [illegible] ी मोकळीक आहे. ह्या दिवसापासून विवा- [illegible]

[illegible]—सप्तपदी झाल्यानंतर वधूवरें लग्नदिनकृत्यांतून [illegible] ळीं होतात. मग नवऱ्यामुलाचीं भावंडें, समवयस्क इष्ट मित्र व करवल्या ह्यांच्यासह वधूवरांना फराळ (किंवा भोजन) [illegible] लितात. त्याच्या पंक्तीची मिसळ बहुतकरून अशी असते कीं, समोरा- समोर पाटांच्या दोन रांगा मांडून प्रत्येक रांगेपुढें पानापुरती जागा सोडून

गुलाल व रांगोळ्या घालितात. नंतर प्रत्येक पाटापुढें एक एक केळीचें पान किंवा त्याच्या अभावीं पत्रावळ मांडितात. दोन रांगांपैकीं एकीच्या एका टोंकाला काटकोनाप्रमाणें दोन पाट मांडून तेथें नवरानवरीला 'सांगत' बसण्याची योजना केलेली असते. ह्या ठिकाणीं जें पान किंवा पत्रावळ मांडिली असेल, तिचा वरच्या बाजूचा अर्धभाग सोडून देऊन खालच्या अर्धावर एक चांदीचें ताट आणि उजव्या बाजूस तूप व खिरी वगैरे पातळ पदार्थांसाठीं दोन पासून पांच सहा पर्यंत चांदीच्या वाट्या ठेवितात. इतर पात्रांजवळ वाट्यांऐवजीं द्रोण ठेवितात. पात्रांवरून चटण्याकोशिंबरीपासून तों वरण, भात, तुपापर्यंत सर्व पदार्थ फारच शिस्तवार वाढण्यांत येतात. एकंदर दक्षिणी ब्राह्मणांत ह्या संबंधानें जी व्यवस्था व टापटीप असते, तशी इतर कोणत्याही लोकांत आढळून येत नाहीं. मुसलमानांची बैठक आणि आमची पंगत ह्या दोन्ही गोष्टी सर्वोत्कृष्ट आणि अनुकरणीय असल्याबद्दल प्रसिद्ध आहेत. असो. पात्रें वाढून तयार झालीं, ह्मणजे जांवईबोवाप्रभृति मंडळीस पाय धुण्यास व जरूर असल्यास सोंवळें होण्यास सांगतात. त्या-प्रमाणें ते सिद्ध होऊन आले, ह्मणजे वधूपक्षाकडील कोणी पोक्त मनुष्य जांवईबोवांस व इतर मंडळीस स्वागतपूर्वक यथाक्रमानें पाटांवरून बस-वितो. बहुतकरून नवऱ्यामुलाच्या उजव्या बाजूस त्याचीं भावंडें, मेहुणे, वगैरे मानकऱ्यांस बसवून, नंतर इतरांस खालीं बसवितात. ह्यावेळीं पुरुष मंडळी फारशी नसल्यास समोरच्या पंक्तीस क्वचित् सोंवळ्याओंवळ्याच्या करवल्यांनांही बसवितात. सर्व मंडळी आपापल्या जागेवर बसली, ह्मणजे सासू किंवा कन्यादान करणारी स्त्री जांवयास तुपाचें आपोशन देण्यासाठीं हातीं भांडें घेऊन त्यांच्या पात्रासमोर येते. परंतु जांवईबोवांस आंगठी मिळाली नसल्यास तिच्यासाठीं ते रुसून बसतात. आपोशन घेत नाहींत. मग त्यांना सासू आंगठी देते; किंवा ती देण्याचें सामर्थ्य नसल्यास कोणी पोक्त गृहस्थ त्यांची समजूत घालून त्यांजकडून आपोशन घेववितो. जांवई फराळास प्रारंभ करितांच सर्व मंडळी फराळ करूं लागतात. तिकडे

वाजंत्री मंगलवाद्यें वाजविण्यास सुरुवात करितात. जांवयांच्या व इतर मान-कऱ्यांच्या पात्रांसमोर खास मानाखातर पांचपांच किंवा सातसात वातींच्या समया (अलीकडे समयांच्या ऐवजीं मेणबत्या लाविलेल्या दिवालगिऱ्या किंवा शामदानें) व अगरबत्या लावून ठेवितात. ह्या आदरसत्काराची आणि वाढण्याची धांदल चालू असतां कोणी स्त्री नवऱ्यामुलीस कडेवर घेऊन येऊन, किंवा ती मोठी असल्यास तिला हातीं धरून आणून जांव-याच्या डाव्या बाजूच्या पाटावर त्यांच्या सांगत फराळास बसविते. मग कर-वल्या नवऱ्यामुलास नवरीला भात कालवून देण्यास सांगतात, आणि नवरा-नवरीनें एकमेकांस घांस घालावे, ह्मणून त्यांच्यामागें सारखा तगादा सुरू करितात. सुमारें अर्धा फराळ झाल्यावर नवरा करवल्यांच्या इच्छेप्रमाणें नव-रीचें नुसतें नांव घेऊन तिला एखाद्या पक्वान्नाचा घांस घालितो. आपल्या मुलीचें होत असलेलें कौतुक पाहण्यासाठीं सासूबाई दारापाठीमागें उभ्या असतात. त्यांना हा प्रकार पाहून जो आनंद होतो, तो काय सांगावा! नव-ऱ्यानें घांस घातल्यावर नवरीची पाळी येते. परंतु ती चट्कन् घांस देत नाहीं. कारण, तिला नुसतें नवऱ्याचें नांव घेऊनच घांस घालावयाचा नसतो. सर्व मंडळीस चांगल्या रीतीनें ऐकूं येईल येवढ्या मोठ्यानें, व एखाद्या चटकदार उखाण्यासहित नवऱ्याचें नांव घेऊन तिला त्यास घांस देण्यास सांगतात. ती लाजून दोन्ही गुडघ्यांत खालीं मान घालून बसते, व पुष्कळ आढेवेढे घेते. परंतु, घांस दिल्यावांचून तिला सुटकाच नसते. तिचें कौतुक पहाण्यासाठीं घरांतील जीं पोक्त पोक्त स्त्रीपुरुषें तिजपाशीं उभीं असतात त्यांचा, आणि विशेषतः करवल्यांचा तिच्यामागें विनोदपूर्वक सारखा तगादा लागतो. तेव्हां निरुपाय होऊन ती कांहींशी भीत भीत, लाजत लाजत, व आपल्या नवऱ्याच्या तोंडाकडे चोरून पहात पहात पात्रांतील एखाद्या पक्वान्नाचा तुकडा मोडून हातीं घेते, व पुन्हां थांबते; करवल्या तिच्या कानाशीं कांहीं कुजबुजतात; व तिला हातांनीं ढोसून प्रोत्साहन देतात. शेवटी ती मोठा हिय्या करून "महादेवाच्या पिंडीला चंदनाचा

सुवास **राव बसले जेवायला राणी घालते घांस*" अशा सारखा एखादा उखाणा पुटपुटत नवऱ्यास चट्कन् घांस घालिते, व मोठ्या लगबगीनें उठून जाऊं लागते. परंतु विनोदी मंडळी 'आह्मांला बरोबर ऐकूं आला नाहीं' अशा सबबीवर तिला फिरून पाटावर बसवितात, आणि तिच्याकडून आणखी एखाददुसरा घांस देववितात. असो. घांस देऊन नवरी उठून गेल्यावर जामातप्रभृति मंडळींना पक्कानें व इतर शेलके पदार्थ आग्रह कर-करून वाढितात. मग 'भट्ट जेवूनी तट्ट फुगले' ह्या ह्मणीप्रमाणें फराळ-किंवहुना भोजन-आटोपल्यावर पुरुषांस विडे, गुलाब, अत्तर व पानसुपारी देण्यांत येते; आणि स्त्रियांस विडे, हळदीकुंकूं, वगैरे देतात नंतर जांवईबोवा आपल्या एखाददुसऱ्या समवयस्क मित्रासह सासुरवाडीसच राहतात;§ आणि करवल्याप्रमुख बाकीची वरपक्षीय मंडळी मशालीच्या उजेडाखालीं वाजत गाजत वरगृहीं परत जाते. मात्र करवल्या जातांना गौरिहराजवळील एखादें भांडें चोरून नेण्यास चुकत नाहींत! असें करणें हा त्यांचा हक्कच आहे असें त्या समजतात.

सुपाऱ्याखेळणें, विड्या तोडणें, व मंगलस्नान—हे सोहळे लग्नाच्या दुसरे दिवशीं सकाळीं वधूच्या घरी करण्याची चाल आहे; व ते स्त्रियांच्या प्रमुखत्वाखालीं होतात. त्यासाठीं वधूपक्षाच्या करवल्या वाजत गाजत वरगृहीं जाऊन तत्पक्षाच्या करवल्यांस बोलावणें करितात. मग त्या तरुण स्त्रिया खेळण्यासाठीं सुपाऱ्या व तोडण्याच्या विड्यांचें साहित्य बरोबर घेऊन वधूपक्षाच्या करवल्यांसह मिरवत मिरवत वधूगृहीं येतात.

(सुपाऱ्या खेळण्यासाठीं वराकडील करवल्यांस बोलावणें, व खेळण्यास बसणें.)

---

* हे उखाणे घालण्यांत अलीकडे स्त्रियांनीं आपली फार प्रगति करून घेतली आहे!

§ वधूप्रवेश होईपर्यंत वरानें श्वशुरगृहींच वास करावा अशी रीति आहे. तिचें वस्तुतः कारण असें दिसतें कीं, त्यास गृहाप्रति आणि वधू त्यांच्या सहित सुमुहूर्तानें आपल्या घरीं जावयाचें असतें. तो मुहूर्त आल्यावेरीज जातां येत नाहीं.

अशारीतीनें उभयपक्षांकडील तरुणी खेळण्यासाठीं एकवटल्यावर त्यांची गजबज काय विचारावी! तिनें तें लग्नघर अगदीं दणाणून जातें. असो. मग नवऱ्यामुलास पोषाक करून दिवाणखान्यांतील किंवा मंडपांतील बिछायतीवर लोडाशीं बसवितात; व त्याच्या सन्मुख वधूला बसवितात. वरपक्षाच्या करवल्या त्याच्या बाजूस आणि वधूपक्षाच्या तिच्या बाजूस बसतात; व सुपाऱ्या खेळण्यास आरंभ होतो.

एकीबेकी.

प्रथमतः वरानें सुपाऱ्यांची कांहींएक संख्या आपल्या उजव्या हातांत घेऊन मूठ वळवून ती बिछायतीवर नवऱ्यामुलीसमोर पालथी धरावयाची; आणि नवरीला अनुलक्षून 'एकी का बेकी?' असें विचारावयाचें. एकीचा अर्थ विषम संख्या व बेकीचा अर्थ सम संख्या होय. ह्या प्रश्नास नवरीनें आपल्या कल्पनेप्रमाणें दोहोंपैकीं कांहीं तरी एक उत्तर द्यावयाचें. जबाब मिळतांच वरानें मूठ उघडून सुपाऱ्या खालीं ठेवावयाच्या. त्या लागलींच तत्पक्षाची प्रमुख करवली मोजून पहाते. नवरीनें विषम संख्यादर्शक 'एकी' सांगितली असेल, आणि सुपाऱ्यांची वास्तविक संख्या जर बेकी ह्मणजे सम निघेल, तर नवरी हरली असें समजून त्या सुपाऱ्यांच्या संख्येइतक्या दुसऱ्या सुपाऱ्या वधूपक्षानें वरपक्षास द्याव्या लागतात. परंतु, जर वधूच्या उत्तराप्रमाणें मुठींतील सुपाऱ्यांची संख्या 'एकी'च ह्मणजे विषम भरली, तर नवरामुलगा हरला असें समजून त्या सुपाऱ्या वधूपक्षाच्या करवल्या जिंकून घेतात. ह्याप्रमाणें अरस परस कांहीं वेळपर्यंत खेळ चालतो.

सुपारी लपविणें.

नंतर वधूवरांनीं आपापल्या वस्त्रांत, चट्कन् न सांपडेल अशी एकेक लहान सुपारी लपवून ठेवावयाची; व ती वधूची वरानें आणि वराची वधूनें शोधून काढावयाची. ह्याला 'सुपारी लपविणें' असें ह्मणतात.

सुपाऱ्या खेळण्यापैकीं वरील दोन्ही प्रकार झाल्यानंतर कांहींवेळ विडया तोडण्याची गम्मत चालते. 'विडया तोडणें' ह्मणजे नागवेलीच्या पानाची वळकटी वळून ती वरानें आपल्या पुढील दांतांत न तुटेल अशा रीतीनें दाबून धरावयाची; आणि तिचा थोडासा भाग बाहेर असूं द्यावयाचा. नंतर वधूनें उठून वराजवळ जाऊन तो बाहेरील भाग आपल्या पुढील दांतांनीं तोडून टाकावयाचा. ह्याच रीतीनें वधूच्या तोंडांत विडी देऊन ती वरानें तोडावयाची. नागवेलीच्या पानांखेरीज खोबऱ्याच्या बारिक बारिक काचऱ्याही विडया ह्मणून उभयतांकडून तोडवितात.

विडया तोडणें.

वर सांगितलेले खेळ, हे केवळ विनोदार्थ खेळण्यांत येतात; व ते खेळणें किंवा न खेळणें हें बहुधा वराच्या वयमानपरत्वें अभिरुचीवर आणि हौशीवर अवलंबून असतें. त्यांत कोणताच प्रकार निंद्य अथवा श्लाघ्य दिसत नाहीं. सबब, त्या संबंधानें आह्मी कांहींच लिहूं शकत नाहीं.

सुपाऱ्यांच्या खेळावर अभिप्राय.

हे खेळ झाल्यावर नवरानवरीस मंगलस्नान घालण्याचा रिवाज आहे.* त्यासाठीं चौकांत दोन चौरंग एकमेकालगत मांडून त्यांच्या चारी कोंपऱ्यांस चार भांडीं ठेवितात. ह्या भांड्यांतून थोडथोडा गुलाल आणि थंड पाणी घालितात. त्यास 'कळसवणी' (कळस=कलश+पाणी) असें ह्मणतात. सदरहू सर्व भांड्यांच्या गळ्यांभोंवतीं पांढऱ्या रंगाचें कच्चें सूत गुंडाळितात. मंगलवाद्यें वाजत असतां घरांत वधूवरांस पाटांवर जोडप्यानें बसवून करवल्या त्यांच्या अंगांस सुवासिक तेल व अरगजा, मसाला, वगैरे सुगंधी उटणीं लावितात; आणि मग वर सांगितल्याप्रमाणें तयार करून ठेविलेल्या चौरंगांवर त्यांनां बसवून उष्णोदकानें मंगलस्नान घालितात. तें चाललें असतां मध्यंतरीं उभयतां-

मंगलस्नान.

* कोठें कोठें कंकण सोडण्यापूर्वी वधूवरांना स्नान घातल्यानें त्यांच्या अंगास लागलेली हळद ओघळते, अशा समजुतीनें कंकण सुटेपर्यंत त्यांना स्नान घालीत नाहींत, अथवा कपडेही देत नाहींत. पण हा प्रकार गलिच्छ आणि निंद्य होय. त्यापेक्षां वरील चाल चांगली व अनुकरणीय आहे.

करून एकमेकांच्या अंगावर गुळण्या टाकवितात, व पूर्वोक्त विडया तोडवून आणि कळसवणी ओतून फिरून उष्णोदक घालितात. अशारीतीनें मंगलवाद्यांचे सुस्वर, आणि करवल्यांचे हास्यविनोद, ह्यांच्या मिश्रध्वनीमध्यें वधूवरांचें हें मंगलस्नान होतें, व तें झाल्यावर जांवयास करवल्या व इष्टमित्रांसह पूर्वोक्त रीतीनें फराळ घालितात. ह्याप्रमाणें हे सर्व सोहळे कंकण सुटेपर्यंत प्रत्यहीं सकाळीं वधूच्या घरीं करण्यांत येतात.

तोंडधुणें साहित्य व समारंभ.

तोंडधुणें—लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं सकाळीं नवरानवरीचे वरील सोहळे आटोपल्यानंतर वधूपक्षाच्या स्त्रिया वरगृहीं वरमातेच्या तोंडधुण्याचें सामान वाजत गाजत नेतात. ह्या सामानांत ऊन पाण्यानें भरलेली घागर, गंगाळें, चौरंग, तस्त, लोटी किंवा तपेली, पाय घांसण्याची वज्री, जिभली, हळदीकुंकवाचें तबक, करंडा, फणी, भांगसळ, आरसा, दांतवणाची कळी, पायांतील व डोक्यांतील फुलें, चोळीचा खण किंवा आयती शिवून तयार केलेली चोळी, वगैरे वस्तु असतात. हें सामान वधूपक्षाच्या स्त्रिया वरमातेकडे घेऊन आल्या, ह्मणजे विहिणीस चौरंगावर बसवून तिचे पाय कन्येच्या मातेनें बरोबर आणिलेल्या ऊन पाण्यानें धुवून वज्रीनें घांसावयाचे, व फिरून उष्णोदकानें धुवून आपल्या नेसल्या वस्त्राच्या घोळानें पुसावयाचे. नंतर विहिणीस तोंड धुण्यास देतात. तें असें कीं, दांत घांसण्यास साकर, ते कोरण्यास लवंगा, (ह्या क्वचित् चांदीच्याही बनविलेल्या असतात,) व गुळण्या करण्यासाठीं दूध द्यावयाचें. हें औपचारिक तोंड धुणें झाल्यावर मर्जी असल्यास वरमाता आपल्या दांतांस दांतवण लावून फिरून एकदा उष्णोदकानें तोंड धुते.* नंतर कन्येच्या मातेनें तिच्या केंसांवरून फणी व भांगसळ

---

* ह्याच प्रसंगी वधूची आई विहिणीला (वरमातेला) 'आंबवण' नांवाचें एक लांबलचक गाणें ह्मणून तिची खुषामस्करी करण्याच्या उद्देशानें कोंडा, पेंड, भाजीचे देंठ व तुकडे वगैरे पदार्थांचें एक मिश्रण आणि कांहीं शिधा देत असते ! शिध्याचें असो; परंतु, आंबवण ह्मणून जें कांहीं देतात, तें गाई, ह्मशी, इत्यादि गुरांचें खाद्य होय. माणसाचें नव्हे ! तत्रापि, ह्या गुरांचा मान विहिणीस मिळाला, ह्मणजे त्या सुप्रसन्न असतात ! लग्न सोहळा चार दिवस चालला, तर चारही दिवस वधूच्या मातेनें विहिणीला तोंडधुणें व आंबवण हें आणलेंच पाहिजे. त्यावाचून चालत नाहीं !

फिरवून तिला हळदकुंकू देऊन पायांतील व डोक्याचीं फुलें व चोळी देऊन नमस्कार करावयाचा; आणि तोंडधुण्याचें सर्व सामान तिच्या स्वाधीन करून द्यावयाचें. हें कृत्य झाल्यावर वधूपक्षाकडील प्रमुख स्त्रीनें किंवा वधूच्या मातेनें वरमातेस विनयपूर्वक निमंत्रण करावयाचें कीं, आज तिकडे सर्व मानकरिणी व इष्टमैत्रिणी घेऊन जेवावयास यावें.* याप्रमाणें स्त्रियांनीं स्त्रियांस व पुरुषांनीं वरपक्षीय पुरुषांस भोजनाची अक्षत देण्याची रीती आहे. ही भोजनाची अक्षत तोंड धुण्याच्या प्रसंगींच दिली पाहिजे असें कांहीं नव्हे. पण त्यावेळेस देणें सोइस्कर पडतें ह्मणून दिली जाते, इतकेंच.

व्याह्यांची पंगत.

जेवणावळीः—वर सांगितल्याप्रमाणें नवरानवरीचें मंगलस्नान होऊन त्यांचा फराळ झाल्यानंतर वधूपक्षाची कांहीं स्त्रीपुरुष मंडळी वरपक्षाच्या स्त्रीपुरुषांस भोजनाचें बोलावणें करण्याकरितां वाजत गाजत जाते. वरपक्षाची मंडळी समंजस असली, तर हें बोलावणें येतांच भोजनास जातात. परंतु, अशा सुमनुष्यांचा योग क्वचितच येतो. बहुतकरून दोन दोन तीन तीन बोलावणीं येईपर्यंत वधूपक्षाला त्रासविल्यावांचून वऱ्हाडी घरांतून निघतां निघत नाहींत! हा एके अर्थी वधूपक्षाचा छळ करणेंच होय. निदान, ज्यांच्या घरीं जेवावयास जावयाचें, त्यांच्याशीं अशी वागणूक करणें, हें माणुसकीला शोभत नाहीं. परंतु, आमच्यामध्यें अशारीतीनें वागण्यांतच कित्येकांना भूषण वाटतें! ही शोचनीय स्थिति केव्हां सुधारेल ती सुधारो! केवळ आळसामध्यें—गमण्या-खालीं—वेळ घालवून सोयऱ्यांकडील अन्न शिळें होण्याच्या बेतांत आलें, ह्मणजे वऱ्हाडीमंडळ भोजनास जातें! प्रथमतः पुरुष जेवावयास बसतात.

---

* ह्याच समयीं, रुखवताच्या प्रसंगीं नवऱ्यामुलानें विड्याबरोबर जो रुपया तस्तांत थुंकून टाकिलेला असतो, व जो वधूपक्षाची स्त्री त्यांतून काढून घेऊन आपल्या जवळ ठेविते ह्मणून वर सांगितलें आहे, तो रुपया वरमातेला देतात. पण ही चाल सार्वत्रिक नव्हे.

त्यांच्या पंक्तीची मिरवल अशी असते कीं, जांवयाच्या उजव्या हाताकडे त्याच्या पक्षाचे मानकरी यथाक्रमानें बसावयाचे. जांवयास तुपाचें आपोशन देणें, जेवण सुरू होतांच मंगलवाद्यें वाजविणें, अगरबत्त्या लावणें, नवऱ्या-मुलापुढें समई लावणें, नवरीला आणून त्याच्यासंगतीं जेवावयास बसविणें, घांस घालणें, वगैरे सर्व प्रकार पूर्वी सांगितल्या प्रमाणेंच समजावा. बहुतेक मंडळींचे अगोदर सडकून फराळ झाले असल्यामुळें आणि भोजनास अति-काळ झाल्यामुळें ह्या वेळीं कोणासही चांगलीशी भूक असूं शकत नाहीं. मग विनाकारण आग्रह करून एकमेकांच्या पात्रांत पक्वान्नें वाढवून व त्यांची नासाडी करण्यांत बराच वेळ घालवून ही पुरुष मंडळी दुपारचे तीन चार किंवा कित्येकवेळां सायंकाळचे पांच वाजतांही जेवून उठलेली पाहण्यांत आली आहेत! असो. भोजनोत्तर सर्वत्रांस, लावून तयार ठेविलेले विडे, हारतुरे, गुलाबअत्तर, व पानसुपारी वाटण्यांत आल्यावर* पुरुष मंडळी घरीं परत जाते. त्यानंतर विहिणींच्या पंक्तीची तयारी!—

विहिणींची पंगत.

ह्या पंक्तीची रचना पुरुषांच्या पंक्तीप्रमाणेंच असते. भेद इतकाच कीं, जांवयाच्या उजव्या हाताकडील हारबंद पाटांवरून वरमाता व इतर मानकरिणी स्त्रिया यथानुक्रमें बसतात; विहिणींच्या पात्रापुढें समई अगरबत्त्या व शेणाच्या दीपमाळेवरून कांद्याच्या वर्तुलाकार गाभ्यांतून दिवे लावितात. तसेंच भोजन होत असतां वधूपक्षाक-डील एक अगर अनेक स्त्रिया "नाहिं मनिंची हौस पुरलि। सखे ग॥" ह्या ध्रुव-पदाचें 'वरमाय' नांवाचें एक लांबलचक गाणें आहे, तें पंक्तींत बसून म्हणतात. ह्या पंक्तींत वरपक्षाच्या स्त्रियांच्या गळ्यांत कांदे, बटाटे, वांगीं, ह्यांच्या चकत्या आणि वडे ह्यांच्या विचित्र माळा करून घालणें, त्यांच्या पाटाखालून जोडे लपवून ठेवणें, वगैरे नाना प्रकारचे निंद्य विनोद पाहण्यांत येतात. त्यांत एक प्रकार तर अतिशय बीभत्स व तिरस्करणीय असून तो बहुधा सार्वत्रिक आहे. तो असा कीं, उभयपक्षांकडील उच्छृंखल स्त्रिया एकमेकांच्या व्यंगांस उद्देशून

---

* कोणाकोणांत ह्या बैठकांमध्यें नवरानवरीकडून विडया तोडविण्याचा प्रघात आहे.

कांहीं मर्मभेदक उखाणे घालितात. ह्याचा परिणाम कित्येक वेळां इतका घडतो कीं, वरमाताप्रभृति वरपक्षाच्या स्त्रिया रुसून पंक्तींतून उठून जातात, व सर्व मेजवानीचा बेरंग होतो! तसेंच उलट पक्षीं कित्येक वेळां "खाणें थोडें आणि मचमच फार" ह्या ह्मणीप्रमाणें वरमाता किंवा तत्पक्षाच्या प्रमुख स्त्रिया क्षुल्लक बाबतींवरून कांहीं तरी कुसपट काढून पंक्तींतून मोठ्या तोऱ्यानें उठून जातात; आणि आपल्या बोलण्यानें व कृतीनें वधूपक्षाच्या प्रमुख स्त्रियांचीं मनें दुखवितात. हे शोचनीय प्रकार पाहिले, ह्मणजे आमच्यांत स्त्रीशिक्षणासंबंधानें असलेली उदासीनता व उणीव मनास फारच जाणवते! असो. विहिणींची पंगत धडपणीं निभावल्यास त्या जेवून उठल्यावर त्यांना तोंड धुण्यासाठीं पूर्वोक्त रीतीनें साकर, लवंगा, व दूध देण्याची चाल विकल्पानें आढळते. नंतर विडे, हळदीकुंकूं, तुरे, गुलाब, अत्तर व पानसुपारी दिल्यावर त्या स्वकीयांसह घरीं परत जातात. वर सांगितल्याप्रमाणें तंटे व रुसवे झाल्याकारणानें विहीणींची पंगत कित्येकवेळां अपरात्रीं उठलेली पहाण्यांत आहे!

चाकरमाणसांस जेवणावळ.

ह्यानंतर उभयपक्षांकडील चाकरमाणसें वगैरे परिजनांस जेवणावळ देतात. अशारीतीनें झालीचा मुहूर्त असेल तेथपर्यंत वधूपक्षानें प्रत्यहीं मेजवान्या द्याव्या लागतात. तथापि, त्यासंबंधानें बहुधा लग्नापूर्वी ठराव झालेला असतो, व त्याअन्वयें मेजवान्या दिल्या जातात.

जेवणावळीसंबंधानें एक सूचना.

हल्लींच्या परिस्थितींत ज्यांना लग्नसोहळा चार चार दिवस लांबविण्याची ऐपत आहे, असे लोक फार नाहींत. बहुधा एक दोन दिवसांत कार्य उरकून घेणारांची सख्याच विशेष झाली आहे. हा परिणाम दुर्दैवानें देशास दारिद्य आलें त्याचा होय. तथापि, वाचकांस आमची अशी एक सूचना आहे कीं, ज्यांना ज्यांना ईश्वराच्या दयेनें अझून चार चार मेजवान्या देण्याइतकें ऐश्वर्य असेल, त्यांनीं आपल्या सोयऱ्यांचीं मनें वळवून, त्यांपैकीं

एखादी मेजवानी आपल्या मंगलकार्याच्या स्मरणार्थ गरीब, दुर्बळ, आणि अनाथ लोकांस अवश्य द्यावी. त्यांत अशा देशबंधूंना अंशतः मदत केल्यासारखें होईल; आणि केवळ सोयऱ्यांची मर्जी संपादन केल्यानें जें श्रेय मिळावयाचें त्यापेक्षां ह्यांत किती तरी पटीनें अधिक श्रेय मिळेल.

सूनमुख—ऐरिणीदान अथवा **झाल** हा विधि होण्यापूर्वी वधूला अलंकार घालण्याचा एक सोहळा आहे. त्यास 'सूनमुख' असें ह्मणतात. तो करण्यासाठीं वधूकडून वरगृहीं सूनमुखाचें निमंत्रण जातें. मग तत्पक्षीय स्त्रीपुरुषें आपल्या ऐपतीप्रमाणें अगाऊ तयार करून ठेविलेले दागिने घेऊन मिरवत मिरवत वधूगृहीं येतात. दागिने घालण्यासाठीं बरोबर सोनार न्यावा लागतो. त्यास सूनमुख झाल्यानंतर वधूपक्षाकडून शिधा व यथाशक्ति पागोटें देण्यांत येतें. वरपक्षीय मंडळी वधूगृहीं आली, ह्मणजे वरमातेनें वधूस बहुल्यावर नेऊन तिची सालंकृत वेणी घालावयाची. नंतर तिचें तोंड स्वच्छ धुवून व पुसून तिला काजळकुंकू करावयाचें. नंतर तिला नवीन साडी व चोळी परिधान करवून मंडपांत स्त्रीसमुदाय बसला असेल तेथें आणावयाची. तेथें सोनार हजर असतो. प्रथमतः वरानें वधूच्या केशांवरून केवळ उपचारार्थ चांदीचा भांगसळ व चांदीची फणी फिरवून तिच्या नाकांत नथ घालावयाची. नंतर पायांतील व हातांतील दागिने सोनाराकडून घालवितात. ह्यासमयीं सालंकृत वधूला वरमातेनें आपल्या मांडीवर घेऊन तिच्या तोंडांत खडीसाखरेचे खडे घालून नंतर तिचें मुख निरखून पहावयाची चाल आहे. ह्मणून ह्या कृत्यास सूनमुख असें ह्मणतात. तें झाल्यावर वधूवरांस मंडपांत एकेस्थळीं पाटांवर किंवा बिछायतीवर बसवितात. नंतर कन्यापित्यानें **ऐरिणीदान** ह्मणजे **झाल** द्यावयाची. तिचा विधि पुढें लिहिल्याप्रमाणें:—

सूनमुखाचें वर्णन.

ऐरिणीदान—हा केवळ लोकाचार असून तो 'झाल' ह्या संज्ञेनें प्रसिद्ध आहे. ज्योतिषी यांच्या संमतीप्रमाणें ही झाल लग्नदिवशी, दुसऱ्या दिवशीं, किंवा चवथ्या दिवशीं देण्यांत येते. तिचा मुहूर्त

झालीचा मुहूर्त.

बहुधा रात्रीं दिलेला पाहण्यांत आहे. मात्र त्यांत पूर्व रात्रीं किंवा उत्तर रात्रीं असे दोन भेद आहेत. तथापि, लग्नाच्या चवथ्या दिवशीं रात्रीं भद्रादि कुयोग असतां ऐरिणीदान दिवसांही द्यावें असें सूत्रकार सांगतात.

उपपत्ति व उद्देश.

झाल देण्यासाठीं एका विशिष्ट आकाराचा वेळूचा हारा तयार करण्यांत येतो. वेळूला संस्कृतांत 'वंश' असें नांव आहे. सबब, ह्या हाऱ्यास 'वंशपात्र' असें ह्मणतात. शिवाय, झाल ही वंशाच्या अभिवृद्धीकरितांच द्यावयाची असते. ह्मणून ती देण्याचें जें साधन, तेंही वंशाचेंच असावें, अशी योजना आहे. असो.

उपसाहित्य.

ह्या वंशपात्रांत मध्यभागीं सर्व पदार्थ वाढिलेलें असें एक पात्र—पत्रावळ—ठेवितात. खेरीज त्यावर पांच पुरणाच्या पोळ्या, पांच कच्चे पापड, पापड्या, व शेवया इतके पदार्थ मुद्दाम ठेवावे लागतात. ह्या पात्राच्या सभोंवतीं हळद घालून पिंवळ्या केलेल्या कणकीचे लहान लहान पंधरा दिवे ठेवितात, व एक तसाच पण आकारानें मोठा दिवा मध्यभागीं ठेवितात. तसेंच वेळूच्या लहान लहान सोळा सुपल्या वायनें देण्याच्या साहित्यासह त्या वंशपात्राजवळ ठेवितात. त्यांस ऐरिणी असें ह्मणतात.

ऐरिणीदान-विधि वगैरे.

कन्येच्या पित्यानें झाल देण्याच्या दिवशीं उपोषण करून व सायंकालीं अथवा झाल देण्याच्या पूर्वी स्नान करून पत्नीसह मंडपांत पूर्वाभिमुख बसावयाचें; आणि देशकालाचा उच्चार करून विवाहाचें सर्व फळ आपणांस मिळावें याकरितां, वराचे आईबाप व तत्पक्षीय मंडळी यांचें यथाशक्ति पूजन करितों, अशा अर्थाचा संकल्प करावयाचा. मग सुवासिक द्रव्यें, वस्त्रें, अलंकार, इत्यादि वरपक्षीयांस द्यावयाचें. तदनंतर फिरून देशकालाचा उच्चार करून श्रीउमामहेश्वरांची प्रीति व्हावी, व केलेलें कन्यादान पूर्ण होऊन वंश वाढावा, यासाठीं मी ऐरिणीचें पूजन करितों, व वरमातेस ती दान करितों;" अशा अर्थाचा संकल्प करावयाचा. नंतर 'ऐरिणित्व०' इत्यादि ११ मंत्र ह्मणून नाममंत्रानें किंवा 'कद्रुद्राय' व 'गौरीर्मिमाय०' या मंत्रांनीं त्या ऐरिणीवर

उमामहेश्वरांची षोडशोपचारें पूजा करावयाची. ती झाल्यावर हें ऐरिणीनामक वंशपात्र उमामहेश्वरांच्या संतोषाकरितां आपणांस देतों, अशा अर्थाचा संकल्प करून वरमातेच्या हातावर उदक सोडून दानसांगतेसाठीं तिला यथाशक्ति दक्षिणा द्यावयाची. ह्यावेळीं वरमातेस एक चोळी व लुगडें देण्याची चाल आहे. त्यास 'मांडीचेपणें' असें ह्मणतात. नंतर 'वंशोवंशकर:श्रेष्टो०' इत्यादि श्लोक ह्मणावयाचे, आणि तें वंशपात्र वरपक्षीय मुख्य मुख्य स्त्रिया व पुरुष यांच्या मस्तकावर ठेवावयाचें; पुढें कन्येला वरपित्याच्या मांडीवर बसवून 'अष्टवर्षात्वियं०' या श्लोकानें कन्येचें इत:पर स्नेहानें पालन करण्याविषयीं वरपित्याची प्रार्थना करावयाची. हाच प्रकार कन्येला वरमातेच्या व इतर प्रमुखांच्या मांडीवर बसवून पुन: पुन: करण्यांत येतो. तो झाल्यावर वधू-कडून ब्राह्मणांस वर सांगितलेलीं सोळा सौभाग्यवायनें देववितात. ह्मणजे ऐरिणीदानविधि आटोपला. तो झाल्यावर सुवासिनी स्त्रिया 'आंबा' हें गाणें ह्मणून वधूकडून कुंकवाच्या पाण्यानें आंबा शिंपवितात.* (पहा गौरीहरपूजा पान ४६.)

वरात—संस्कृतभाषेंत समुदायाला 'व्रात' असें ह्मणतात. त्या शब्दाचा अपभ्रंश होऊन मराठींत त्याचें 'वरात' असें रूप झालें आहे. तथापि, व्रात शब्दाप्रमाणें वरात ही संज्ञा सामान्यत: कोण-त्याही समुदायास न लावितां तिचा पारिभाषिकशब्दासारखा उपयोग करण्यांत येतो. लग्नकार्यांत झालीसंबंधीं सर्व कृत्य आटोपून उभय-पक्षांकडील वऱ्हाडी नवरानवरीस घेऊन वधूप्रवेशाकरितां समुदायानें मिरवत मिरवत वरगृहीं जाऊं लागले, ह्मणजे त्यांच्या समूहास 'वरात' ही संज्ञा देण्यांत येते. वरातीचा मुख्य उद्देश वरानें वधूसह आपल्या घरीं परत

उपपत्ति व उद्देश.

---

* आंबा शिंपतांना वधू आपला डावा पाय वराच्या उजव्या मांडीवर, आणि डावा हात त्याच्या पागोट्यावर ठेवून त्याजपाशीं उभी राहून उजव्या हातानें नागवेलीच्या किंवा आंब्याच्या पानानें पूर्वोक्त आंबा शिंपिते. आंबा शिंपणें झाल्यावर जांवई आपल्या सासऱ्याच्या देव्हाऱ्यांतून अन्नपूर्णा वगैरे एखादी देवमूर्ति उचलून घेतो, आणि वधू पक्षाच्या वाडवडिलांस नमस्कार करून वरातीसाठीं तयार होतो.

यावयाचें असा आहे; व त्यावरून तो शब्द 'आवर्तन'—ह्मणजे परतणें—ह्या संस्कृत शब्दापासून झाला असावा असेंही कोणी म्हणतात.

मिरवणुकी-विषयीं.

वरातीच्या मिरवणुकींत वधूवरांस कोणत्याही स्त्रीवाचक वाहनावर आरूढ करून नेण्याचीचाल आहे. (उदाहरणार्थ, पालखी, हत्तीण, घोडी, गाडी, वगैरे). कारण, वधूनें पुरुषवाचक वाहनावर बसणें प्रशस्त मानीत नाहींत. ह्या मिरवणुकीची सर्व मिसल वरप्रस्थानाच्या मिरवणुकीप्रमाणेंच असते. मात्र तिच्यासंबंधीं सर्व व्यवस्था व खर्च वरपक्षाकडून करण्यांत येतो; व ती हमेषा रात्रींच निघते.

उपपत्ति वगैरे.

वधूप्रवेश—वधूवरें वरातीनें मिरवत वरगृहाच्या दरवाजाजवळ आलीं, ह्मणजे त्या उभयतांस वाहनावरून उतरून त्यांजवरून दृष्टीच्या प्रतिकारार्थ दहींभात ओंवाळून टाकितात; व मंगलवाद्यें वाजत असतां त्यांजकडून जोडप्यानें घरांत प्रवेश करवितात. ह्या कृत्यास वधूप्रवेश अशी संज्ञा आहे. वस्तुतः प्रवेश करणारें वधू आणि वर असें दंपत्य असतें. मग त्यांच्या प्रवेशास केवळ वधूप्रवेशच कां ह्मणावें ? वधूवरप्रवेश कां ह्मणूं नये ? अशी शंका येण्याचा संभव आहे. त्याचें समाधान असें कीं, वधूचा आपल्या सासरच्या घरांत मोठ्या समारंभानिशी सुमुहूर्तानें हा प्रथमच प्रवेश असतो. तिच्या आगमनांत जो नवेपणा आहे, तो वराच्या आगमनांत नाहीं. सबब, येथें प्रवेशाचें प्राधान्य वधूकडे आल्यानें ह्या कृत्यास वधूप्रवेश असेंच ह्मणतात.

तत्संबंधीं रूढि.

घरांत शिरतांना उंबऱ्याजवळ तांदूळ भरून एक माप ठेविलेलें असतें. तें नवरीनें आपल्या उजव्यापायानें लवंडून देऊन मग पुढें जावें अशी चाल आहे. तिचा हेतु असा दिसतो कीं, वधू ही गृहलक्ष्मी आहे. तेव्हां तिनें घरांत पहिलें पाऊल ठेवण्याबरोबर त्याच्या प्रभावानें जिकडे तिकडे धनधान्याच्या राशी पडाव्या—समृद्धि व्हावी. पण हें सामर्थ्य—हा महिमा—आमच्या आजकालच्या गृहलक्ष्मींत दिसत नाहीं.

इतकें आमचें पुण्य नष्ट झालें आहे! सबब, आतां वरील चालीनें कृत्रिमसमृद्धि मात्र दाखविण्यांत येते! असो. पुढें त्या जोडप्यास देवघरांत नेऊन देवाच्या पायां पडवितात. तसेंच सर्व वाडवडिलांस नमस्कार करवितात, व नंतर माजघरांत किंवा मंडपांत जेथें महालक्ष्मी मांडिली असेल, तेथें आणून तिच्या सन्मुख नवऱ्याच्या उजव्या बाजूस नवरी अशा रीतीनें त्यांस पाटांवर एकमेकांशेजारीं बसवितात.

उद्देश व ह्या प्रसंगीं करण्याच्या रूढींचें वर्णन.

लक्ष्मीपूजन—तदनंतर त्या उभयतांकडून वरील प्रसंगाची अधिदेवता जी महालक्ष्मी, तिचें अप्राप्तलक्ष्मीच्या प्राप्त्यर्थ व प्राप्तलक्ष्मीच्या चिरकाल संरक्षणार्थ यथाविधिपूजन करवितात. तें झाल्यावर लक्ष्मीपुढें तांदुळांच्या लहान लहान राशी घातलेल्या असतात, त्या नवऱ्यामुलीस आपल्या हातानें चांचपून पाहण्यास सांगतात. एका राशीच्या पोटीं कांहीं अलंकार घालून ठेविलेला असतो, तो तिला सांपडतो. मग वरमाता तिला 'काय सांपडलें' ह्मणून विचारते. त्याचें उत्तर तिनें द्यावयाचें कीं, 'रत्नहार सांपडला.' हें कृत्य अप्राप्तलक्ष्मी प्राप्त झाल्याचें द्योतक ह्मणून करण्यांत येत असावें, असें वाटतें. असो. नंतर वरमाता एका चांदीच्या वाटींत दूध व साकर घालून तें प्रथमतः थोडेसें वरास पाजिते, व त्यास विचारिते की, 'बाबा घाला!' त्याचें उत्तर त्यानें असें द्यावयाचें कीं, 'लक्ष्मी घेऊन घरा आला.' नंतर बाकीचें दूध सुनेस पाजून वरमाता विचारिते 'बाई घाली.!' ह्मणजे तिनें ह्मणावयाचें कीं, 'सोन्याच्या पावली घरा आली.'

उद्देश व वर्णन.

चूलभाणस—वर सांगितलेला प्रकार आटोपल्यावर वरमाता सुनेस कडेवर घेऊन (किंवा ती मोठी असल्यास तिला हातीं धरून) स्वयंपाकघरांत नेते; व तेथें तिला आपल्या घरांतील चूल, व भाणस ह्मणजे ताक करण्याचें पात्र दाखविते. त्याचा उद्देश असा कीं, ती वधू आपल्या मुलाची गृहिणी होऊन घरीं नव्यानें आली आहे,

सबब, गृहिणीचीं मुख्य कर्तव्यें जीं पाकनिष्पात्ति करणें, व गोरसाची सर्व प्रकारें उत्तम व्यवस्था ठेवणें, तीं आजपर्यंत आपण केलीं, व तीं इतःपर आपल्या पुत्राच्या गृहिणीनें करावीं, ह्मणून त्यांचीं साधनें जीं चूल व भाणस तीं तिला दाखवून द्यावयाचीं. अर्थात् एका चूलभाणसानें सर्व संसार सासूनें सुनेस सुप्रीत केला, असें समजावयाचें. हें कृत्य कोणास बावळी व यःकश्चित् वाटेल. परंतु, तें केवळ्या उदात्त कल्पनेवर बसविलें आहे पहा!

धडोत व पदर देणें—कोणीही कन्या, कुमारिका असतांना तिची साडी नेसण्याची पद्धति बहुधा अशी असते कीं, तें सर्व वस्त्र कंबरेभोंवती गुंडाळून त्याचा शेवटचा पदर कटिपश्चात् भागावर आणावयाचा; व त्या पदराचीं दोन टोंकें दोन्हीबाजूंनी पुढें घेऊन निऱ्यांच्या पोटीं ठेवून नंतर त्या निऱ्यांची तेथल्या तेथें एक लहानशी वळकटी (परवंट) करावयाची; आणि मग कासोटा घालावयाचा. अर्थात् साडीचा एक पदर सर्व कटिपश्चात् भागास व्यापून कासोट्याखालीं रहातो, व पोटावर परवंट ह्मणजे निऱ्यांची एक लहानशी वळकटी होते; आणि ह्मणूनच साडी नेसण्याच्या ह्या पद्धतीला 'परवंटाची साडी' अशी बायकांची परिभाषा आहे.

कुमारिकेचा वेश.

परवंटाची साडी नेसण्यांत कंबरेपासून वरील भाग चोळीशिवायकरून उघडा रहातो. तो लहान मुलींचा वाईट दिसत नाहीं. तथापि, मुली वयांत येऊं लागतांच त्यांनीं परवंटाची साडी नेसणें अप्रतिष्ठित दिसतें. सबब, त्यांचीं लग्नें झाल्यावर पुढें वयमानपरत्वें त्यांना विनयानें वागण्याचा मोळा लागावा, ह्या उद्देशानें त्यांजकडून आमच्यांतील प्रौढ स्त्रियांच्या रिवाजाप्रमाणें पदर घेऊन साडी नेसण्याचा क्रम सुरू करितात. साडी नेसण्याच्या ह्या पद्धतीस 'पदराची साडी' अशी परिभाषा आहे. पहिलींत आणि दुसरींत भेद ह्मणून इतकाच कीं, प्रथम कुमारी असतांना जो पदर

पूर्वींच्या वेशांतील व्यंग, व पदर देण्याचा उद्देश.

कटिपश्चात् भागावर असे, तो आतां भार्यात्व प्राप्त झाल्यावर बाहेर काढून अनुक्रमें डावा खांदा, डोकें आणि उजवा खांदा ह्यावरून पुढें वक्षस्थलावर घ्यावयाचा. ह्या रीतीनें सर्वांग झांकलें जाऊन आमच्या हिंदू स्त्रीचा आकार मर्यादशील दिसतो; व त्यावरून लग्न झालेली मुलगी तेव्हांच ओळखितां येते.

वधूप्रवेश होऊन लक्ष्मीपूजन आटोपलें, ह्मणजे वरपक्षाची मंडळी नव्या नवरीचें आपल्या आवडीप्रमाणे एक 'सासरचें नांव' ठेवीत असतात. तें ठेवितांना आपल्या लौकिकाप्रमाणें तिला नेहमीं नेसण्याजोगें एक लुगडें व चोळी देतात. ह्यास 'धडोत' अशी संज्ञा आहे. धडोतीचें लुगडें नेसवितांना वर सांगितल्याप्रमाणें तिला पदर देतात, आणि तिचें नांव ठेवितात. नंतर त्या नांवानें जमलेल्या मंडळीस साकर आणि विडे वांटितात. तेणेंकरून तिच्या विशेषनामाची प्रसिद्धि होते. येथून पुढें त्या मुलीला मर्यादेनें पदर घेऊन साडी किंवा लुगडें नेसावें लागतें.

(नांव ठेवणें, धडोत व पदर देणें.)

झेंडा.—झेंडा हें यशःप्राप्ति झाल्याचें चिन्ह आहे. नवऱ्यामुलानें नवरी निर्विघ्नपणें मिळवून घरीं आणिली, ह्मणजे योजिलेल्या मंगलकार्यांत आपणांस यश प्राप्त झालें असें समजून, वरपक्षाची मंडळी त्यासंबंधानें आपला आनंद प्रदर्शित करण्याच्या उद्देशानें लग्नाचीं मुख्य अंगें जीं वधू आणि वर त्यांचा झेंडा नाचवितात. तो असा कीं,

(उद्देश.)

वाजंत्र्याच्या ताफ्यांपैकीं अथवा ज्यास झेंडा कसा नाचवावा तें माहीत आहे असा कोणीही सशक्त पुरुष, कंबर बांधून मंडपामध्यें उभा राहतो. नंतर त्याच्या एका कडेवर नवरा व दुसऱ्या कडेवर नवरी ह्या प्रमाणें त्या नवीन जोडप्यास बसवितात. मग झेंडा ह्मणून एक गाणें आहे, तें वाजंत्री आपल्या सनईतून वाजवितात, व तें संपेपर्यंत नवरानवरीस कडेवर घेतलेला मनुष्य त्या गाण्याच्या तालसुरावर नाचतो.

(वर्णन.)

हें कृत्य चालू असतां वरपक्षाचा कोणी मनुष्य वधूवरांवरून भंडार अथवा गुलाल उधळितो. झेंडा नाचविणाऱ्या मनुष्यास व वाजंत्र्यांस तत्प्रीत्यर्थ यथाशक्ति बिदागी व पानसुपारी देण्याची चाल आहे.

वधूपक्षाचा सत्कार, वधूला तिच्या सासूसासऱ्यांच्या स्वाधीन करणें व पाठराखणी.

झेंडा नाचवून झाल्यावर उभयतां नवरानवरीस जोडप्यानें आणून पुरुष मंडळीमध्यें प्रमुखस्थानीं बसवितात. नंतर वरपक्षाकडून वधूचा पिता व इतर मानकरी मंडळी ह्यांना शिष्टसांप्रदायाप्रमाणें शेलापागोट्याचा पोषाक देण्यांत येतो. परंतु, हा पोषाक कोणीही घेत नाहींत. स्वीकारार्थ त्यास नुसता हस्तस्पर्श मात्र करितात, म्हणजे झालें. कारण, हिंदुधर्मशास्त्राप्रमाणें दान केलेल्या कन्येच्या घरचा अन्नपानापासून कोणत्याही वस्तूचा प्रतिग्रह कन्येच्या वाडवडिलांस करितां येत नाहीं. असो. हा आहेर—सत्कार—झाल्यावर सर्व मंडळीस वरपक्षाकडून हारतुरे, अत्तरगुलाब, पानसुपारी वांटण्यांत येते. तिकडे घरांत वरपक्षाच्या सर्व स्त्रिया वधूपक्षाच्या सर्व स्त्रियांस हळदीकुंकू तुरे, गुलाब, अत्तर, व पानसुपारी देतात. कन्येच्या आईला वरमाता अत्यंत आग्रह करून एक चोळीलुगडें देते; व तें तिला तेथेंच परिधान करण्याविषयीं विनंति करिते. ह्या लुगड्यास 'पोटझांकणें' अशी बायकांची परिभाषा आहे. ह्याप्रमाणें वधूकडील स्त्रीपुरुषांचा सत्कार करण्यांत आल्यावर तीं परत जाण्यासाठीं निघतात. जातांना कन्येची आई गहिंवरून आपल्या डोळ्यांत आंसवें आणून मुलीच्या तोंडावरून मोठ्या वात्सल्यानें हात फिरविते, व तिचा हात तिच्या सासूच्या हातांत घालून विहिणीला मोठ्या करुणस्वरानें म्हणते:—" संभाळा हो हिला! तुमच्या ओटींत घातली आहे. आतां हिच्यावर माझी सत्ता राहिली नाही! तुमची आहे. हिला वागवून घ्या. येवढंच माझं पदर पसरून मागणं आहे!" वरमाता तिचें सांत्वन करिते. तथापि, ती मुलीकडे वळून तिलाही म्हणते:—" बेटा, हा तुझ्या सासूबाई आहेत. ह्यांचं ऐकत जा बरं. हट्टतट्ट करूं नको. ह्यांच्या आज्ञेत वाग. येऊं मी आतां!!" असें

म्हणून ती विहिणींचा व मुलीचा स्फुंदत स्फुंदत मोठ्या कष्टानें निरोप घेते, व जाऊं लागते. पुढें तिच्यानें बोलवत नाहीं. हा प्रसंग तिला दुःसह वाटतो. असो. तिच्या मागून वधूपक्षाच्या स्त्रियाही विहिणींचा निरोप घेऊन जाऊं लागतात. स्त्रीवर्ग पुढें झाला, म्हणजे त्याच्या मागून कन्येचा पिता व तत्पक्षाची इतर पुरुष मंडळीही वरपित्याचा निरोप घेऊन जाऊं लागतात. ह्या वेळीं कन्यापिताही साश्रु होऊन वरपित्यास “ मुलीला संभाळा ! आपल्या पदरांत घातली आहे !” वगैरे विनंति करितो. वरमाता कन्येच्या मातेचें आणि वरपिता कन्यापित्याचें सांत्वन करीत दरवाज्यापर्यंत त्यांस पोंचविण्यास जातात. नंतर तेथून वधूपक्षाची मंडळी मशालीच्या उजेडांत वाजत गाजत, परंतु जड पावलांनीं, व सद्गदित अंतःकरणांनी, घरीं परत जाते ! वधूची करमणूक करण्यासाठीं व नवीन सासुरवास तिला एकदम जाणवूं नये म्हणून तिच्या सुहृदांपैकीं कोणी स्त्री तिजपाशीं ‘पाठराखणी’ राहते.

कृत्यें, त्यांची अन्वर्थक संज्ञा वगैरे.

चातुर्थीकर्म.—ह्यांत गृहप्रवेशनीय होम, व कंकण सोडणें, हीं कृत्यें येतात; व तीं वस्तुतः विवाहाच्या चवथ्या दिवशीं करावयाचीं असल्यानें त्यांस ‘ चातुर्थीकर्म ’ अशी अन्वर्थक संज्ञा आहे. तथापि, विवाहकार्य चार दिवसपर्यंत लांबविण्याची ऐपत नसल्यानें हीं कृत्यें बहुधा लग्नाच्या दुसऱ्या दिवशींच केलेलीं पुष्कळ वेळां पाहण्यांत येतात. तसेंच हीं कृत्यें वास्तविक रीतीनें म्हटलें असतां वरानें आपल्या घरीं गेल्यानंतर तेथें करण्याचीं आहेत. परंतु, हल्लीं तीं श्वशुरगृहींच करण्याचा सांप्रदाय पडला आहे. असो. तीं कर्मे येणेंप्रमाणें:—

उद्देश, विधि आणि त्यांतील मंत्रांचे अर्थ.

वधूवरांनीं वेदीवर पूर्वोक्त रीतीनें जोडप्यानें बसून वरानें आचमन व देशकालाचा उच्चार करून ‘ मम विवाहाग्नेर्गृह्यत्वसिद्धिद्वारा श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थं गृहप्रवेशनीयहोमं करिष्ये. ’ ह्याप्रमाणें उपाध्यायांनीं सांगितलेला संकल्प करावयाचा. अर्थात् ह्या होमाचा उद्देश, विवाहाग्नि, जो पूर्वीं श्वशुरगृहीं सिद्ध कर-

ण्यांत आला, त्यास वरानें आपल्या घरीं गृह्यत्व आणावें असा आहे. ह्या होमाच्या वेळीं वधूला वराच्या उजव्या हाताकडे एक बैलाचें ताजें चामडें केंस वर करून व मान पूर्वेकडे करून अंथरून त्यावर बसवावी, असें प्रयोगांत सांगितलें आहे. परंतु, तसें करणें कांहींसें विचित्र आणि ओंगळ दिसतें, ह्मणून त्या चर्माऐवजीं हल्लीं लोंकरीच्या आसनाचा व पुष्कळ वेळां तर केवळ पाटाचाही उपयोग केलेला दिसतो. असो. नंतर वधूनें वराच्या उजव्या हातास आपल्या उजव्या हातानें स्पर्श करावयाचा; आणि वरानें अग्निस्थापनादि सर्व कर्म करून पूर्वांग होम करावयाचा; व तो झाल्यावर प्रधान होम करावयाचा. त्यांतील कित्येक महत्वाच्या मंत्रांचा अर्थ जिज्ञासु वाचकांकरितां खालीं देत आहों:—

(१) ब्रह्मदेव आह्मां उभयतांपासून सुसंतति उत्पन्न करवो. अर्यमा ह्मणजे सूर्य आह्मांस पुष्कळ आयुष्य देवो. हे वधू! तूं मनामध्यें अगदीं खिन्न न होतां माझ्या घरीं चल; व माझ्या घरची धनीण होऊन माझ्या इष्टमित्रांस व सेवकांस सुख दे; तसेंच मी पाळिलेल्या जनावरांचें पोषण करून त्यांनांही सुख देणारी हो.

(२) हे वधू! तूं विचारपूर्वक सर्वांशीं समदृष्टीनें वाग; व ज्यापासून मला दुःख होईल असें कृत्य न करितां सुखानें नांद; ह्मणजे त्यापासून तुझें कल्याण होईल. माझ्या पाळिलेल्या जनावरांस वेळच्या वेळीं खाणेंपिणें घाळून संतुष्ट ठेव. आपलें मन चंचल होऊं देऊं नको; म्हणजे तूं सर्वांस प्रिय व कीर्तिमान् होशील. तुझ्या पोटीं पराक्रमी पुत्र होवोत. तूं यज्ञयागादि देवकर्में करण्याची इच्छा धर.

(३) हे इंद्रा, तूं ह्या वधूला सुपुत्र होतील असें कर. हिला ऐश्वर्य प्राप्त होईल असें कर. हिच्या ठायीं माझ्यापासून दहा पुत्र होतील, असें कर. ह्मणजे ते दहा व मी—पति—अकरावा (झाल्यानें माझें कुटुंब मोठें होईल.)

(४) हे वधू ! सासऱ्याची उत्तम प्रकारें सेवा करून त्याला आवडती हो, व त्यापासून बहुमान पाव; आणि नणंदा व दीर ह्यांची मर्जी संपादन करून त्यांनाही आवडती हो.

सदरहू अर्थाच्या चार मंत्रांनीं अग्नीस तुपाच्या चार आहुति दिल्यावर जें तूप शेष राहील तें वरानें आपल्या बोटानें घेऊन स्वतःच्या व वधूच्या हृदयाला लावावयाचें. तें लावितांना जो मंत्र ह्मणतात, त्याचा अर्थ खालीं लिहिल्याप्रमाणें:—

हृदयास तूप लावणें व तत्संबंधीं मंत्राचा अर्थ.

(५) सर्व देव आमच्या मनांतील सर्व क्लेश नाहींसे करून लौकिक संपादन करण्याविषयीं व वेदांत सांगितलेलीं यज्ञयागादि कर्में करण्याविषयीं आमच्या मनांस प्रवृत्त करोत. उदकें हीं त्यांस सन्मार्गाला लावोत. तसाच वायु आह्मांस एकमेकांच्या ठायीं अनुरक्त करो. ब्रह्मदेव आम्हां उभयतांचें एकमत करो; व देवी सरस्वती ही आम्हांला परस्परानुकूल वागण्याची बुद्धि देवो.

हें झाल्यावर हात धुवून वरानें स्विष्टकृत् आदि बाकीचें कर्म करून होम समाप्त करावयाचा. मग वधूवरांच्या हातांत पूर्वी जीं सुताचीं कंकणें बांधिलीं असतात, तीं उपाध्याय त्यांजकडून यथाविधि सोडवितात; व त्यांना पुत्रवती सुवासिनी स्त्रियांकडून मंगळवाद्यें वाजत असतां औक्षण करवितात. नंतर वरानें ब्राम्हणांस यथाशक्ति दक्षिणा देऊन संतुष्ट करावें; व त्यांचे आशीर्वाद घेऊन उभयतां वधूवरांनीं आनंदांत असावें.

होमसमाप्ति, कंकणें सोडणें, मांगलिक,वगैरे.

हें चातुर्थीन्हिक मध्यरात्रीनंतर करूं नये, असें शास्त्रकारांनीं सांगितलें आहे. सबब, गोरज किंवा रात्रीच्या मुहूर्तावर लग्न लावून कार्य एका रात्रींत आटोपावयाचें असल्यास वरील कर्म दुसऱ्या दिवशीं सकाळीं करण्यांत येतें. नाहींपेक्षां तें लग्नाच्या चौथ्या दिवशीं सकाळीं करितात.

वरील कर्म करण्याचा काल-निर्णय.

देवकोत्थापन व मंडपोद्वासन—कार्यारंभीं ज्याप्रमाणें विधिपूर्वक मंडप व देवप्रतिष्ठा केली, त्याचप्रमाणें कार्यांतीं देवक उठवून मंडप सोडून टाकण्यांत येतो.

वर्णन.

उक्त दिवशीं यजमान स्नान करून आपल्या पत्नीसह बसून देशकालोच्चारपूर्वक संकल्प करितात; आणि सर्व स्थापित देवतांचें पूजन करून विसर्जनाचा मंत्र म्हणून देवतांस उठवितात. नंतर मंडपाच्या खांबांस बांधिलेल्या, व देवकाच्या सुपांत मांडिलेल्या सूत्रवेष्टित पानांच्या गुंडाळ्यांस तैलाभ्यंग करून उष्णोदकानें स्नान घालून त्या सोडितात. नंतर स्वस्तिवाचन अथवा पुण्याहवाचन होतें. ब्राम्हण यजमानास अभिषेक करितात. तो झाल्यावर वर सांगितलेलीं गुंडाळ्यांचीं पानें सुपांत घालून त्यांवर पाणी शिंपडतात, व त्यांनी पत्नीसह यजमानाचें अभिषिंचन करितात. नंतर सर्व देवतांची परत जाण्याविषयीं प्रार्थना करण्यांत येते. ब्राम्हण त्या देवतांस स्वस्थ असा! व पुनः या! असें म्हणतात. मग यजमान आपले हात जोडून डोक्यावर ठेवून प्रति सहा सहा महिन्यांनीं माझ्या घरीं अशींच शुभकार्यें व्हावीं! अशी ब्राम्हणांची प्रार्थना करितात; व ब्राम्हण तसें होवो! म्हणून आशीर्वाद देतात. नंतर त्यांची गंधाक्षतादिकांनीं पूजा करून व दक्षिणा देऊन त्यांचा संतोष व आशीर्वाद घेण्यांत येतो. हें कृत्य आटोपल्यावर मंडप सोडून टाकितात.

अनुष्ठानसमाप्ति—इतका कार्यभाग झाल्यावर पूर्वी त्याच्या सिद्ध्यर्थ बसविलेलें अनुष्ठान यथाविधि समाप्त करण्यांत येतें.

वरातजेवण.

वरातजेवण—वरातीनें वधूवरें वरगृहीं आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं वरपक्षाकडे दोन्ही बाजूच्या इष्टमित्रांस एक मोठी मेजवानी होते. तिला **वरातजेवण** असें म्हणतात. ह्या मेजवानीच्या दिवशीं सकाळीं वधूवरांस जोडप्यानें मंगलस्नान घालण्याची चाल, व रात्री गोंधळ घालण्याची चाल विकल्पानें आढळते.

गोंधळ—कुलदेवताच्या कृपेनें इष्टकार्य निर्विघ्नपणें शेवटास गेलें, म्हणजे नंतर त्या देवतांच्या प्रीत्यर्थ गोंधळ घालण्याचा रिवाज कित्येक कुटुंबांतून आहे.

उद्देश.

ह्या गोंधळांत जगदंबेची दिवटी तेवत ठेविलेली असते. कोठें तिच्या सन्मुख एखाद्या चौरंगावर तांदुळांची रास घालून त्या राशीवर देवीची प्रतिमाही ठेवितात. हें कृत्य लग्नमंडपांतच करण्यांत येतें; व तें लग्नाचें एक अंगभूत उपकार्य मानिलें जातें. दक्षिणेंत ह्या गोंधळांचा रिवाज पुष्कळ कुटुंबांतून आहे. सबब, तिकडे गोंधळ घालण्यावर उपजीविका करणारा गोंधळी म्हणून एक जगदंबेच्या उपासकांचा स्वतंत्र वर्गच आहे. सदरहू लोक मंजरी व तुणतुणें वाजवून त्यावर अंबेच्या, मल्हारिमार्तंडाच्या व इतर ऐतिहासिक सत्पुरुषांच्या वर्णनांचे मोठे रसभरित पोवाडे म्हणत असतात.

वर्णन.

देवदर्शन—गोंधळ घालून कुलदेवतांची स्तुति झाल्यावर वधूवरांच्या पदरांस गांठ मारून त्यांना जोडप्यानें देवदर्शन करवितात. वस्तुतः म्हटलें असतां लग्न झाल्यावर त्यांस कुलदेवतांच्या मूळ स्थानावर नेऊन तेथें त्यांजकडून वर सांगितल्याप्रमाणें जोडप्यानें पायां पडवावें, असा मूळचा उद्देश आहे. ह्या कृत्यास 'ओहर पायां पडणें' अशी लौकिकी परिभाषा आहे. ['ओहर' हा वधूवर ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे.] परंतु, असें करणें लागलीच शक्य नसतें. सबब, त्यांस आपल्या घरीच कुलस्वामींच्या पायां पडवितात.

मूळ उद्देश.

पायघड्या, रासन्हाणें, मांडवपरतणें, इ०—वराकडे वरातजेवण झाल्यावर कन्यापक्षाकडे **मांडवपरतणें** होतें. लग्नसमारंभाचा हा शेवटचा दिवस असतो. त्याच्या पूर्वरात्रीं नवरीची आई नवऱ्याच्या आईस व तत्पक्षाच्या इतर मानकरिणींस आपल्या घरीं न्हावयास बोलाविते; व **पायघड्यांचा** समारंभ होतो. नवऱ्याच्या घरच्या विहिणीप्रभृति बायका पांढरीं पातळें

पायघड्या व रासन्हाणें.

नेसून नवरीच्या घरीं जाण्यास वाजत गाजत मिरवत निघतात. घरांतून निघाल्यापासून रस्त्यावर परीट पायघड्या घालितो, व त्यावरून नवऱ्याची आई व इतर मानकरिणी चालतात. नवरीच्या घरीं जाण्यास मुद्दाम लांबचा रस्ता योजिलेला असतो. कारण, विहिणींची अशारीतीनें मिरवण्याची हौस पुरी झाली पाहिजे. वाटेमध्यें चालून जणूं काय थकल्या म्हणून त्या मधून मधून थांबतात! थांबल्यावर त्यांस चौरंगावर बसवितात, व गव्हांनारळांनीं त्यांच्या ओंट्या भरितात. वाटेंत वरचेवर त्यांजवर गुलाल उधळीत असतात. तेणेंकरून सर्व बायका नवरीच्या घरीं पोहोंचेपर्यंत रंगून लाल भडक होतात. नवरीच्या घरीं पोंचल्यावर सर्वांस त्यांच्या इच्छेनुरूप बांगड्या भरितात. नंतर त्यांच्या आंगास सुवासिक तेल, उटणीं, मसाले, अरगजे इ० लावून ऊन पाण्यानें त्यांस न्हावयास घालितात. वरील समारंभावरून यास रासन्हाणें अशी संज्ञा आहे. या समयीं वरमातेला पाण्याच्या गंगाळ्यांत एक रुपया टाकावा लागतो. हा रुपया पाणी घालणारी स्त्री घेते, किंवा श्रीमंतांच्या घरीं शागीर्द ब्राम्हण असल्यास तो घेतो. कन्येची आई हौशी असल्यास ती चौकांत झोंपाळा टांगून त्यावर विहिणीस बसवून, हळू हळू झोंका देत तिला मनमुराद ऊन पाण्यानें न्हाऊं घालिते. या वेळींही कन्येकडील कित्येक स्त्रिया पूर्वोक्त "नाहिं मनिंची हौस पुरलि । सखे ग ॥ या ध्रुवपदाचें गाणें म्हणतात. हा सर्व सोहळा आटोपण्यास सारी रात्र संपून दोन तास दिवस येतो!

मांडवपरतण्याच्या पगती वगैरे.

दोनप्रहरीं नवरीकडे नवऱ्याकडील सर्व स्त्रीपुरुषांस व उभयपक्षांच्या इष्टमित्रांस एक मोठी व शेवटची मेजवानी होते. तीस मांडवपरतणें असें म्हणतात, तींत करंज्या आणि पाटवड्या हे दोन पदार्थ अवश्यमेव लागतात. भोजनोत्तर व्याहीप्रभृति मानकऱ्यांस पोषाक व सर्वत्रांस रीतीप्रमाणें विडे, हारतुरे, अत्तरगुलाब, व पानसुपारी देऊन त्यांच्या अंगावर गुलाल किंवा केशराचा रंग टाकितात. नंतर ही पुरुष मंडळी वाजत गाजत घरीं परत जाते; व

इकडे वधूगृहीं फिरून पाटरांगोळ्या करून मोठ्या थाटानें विहिणींची पगंत भोजनास बसते. भोजनोत्तर सर्व स्त्रियांस हळदीकुंकूं, विडे, तुरे, वगैरे वांटितात, आणि विहिणी व इतर प्रमुख मानकरिणी ह्यांना यथाशक्ति चोळ्या, लुगडीं, किंवा खण देऊन त्यांची मानपानानें बोळवण करण्यांत येते. नंतर उभयपक्षांच्या चाकरमाणसांसही जेवणावळ देतात. ह्मणजे कार्य संपलें.

नवरानवरींचीं न्हाणीं.

पुढें नवऱ्याच्या घरीं लग्नाच्या आठव्या व सोळाव्या दिवशीं नवरानवरींचीं आठन्हाणें व सोळन्हाणें होतात; व नवरीच्या घरीं दसन्हाणें व तेरन्हाणें होतात. त्याचा प्रकार मागें ७१-७२ पानांत सांगितल्याप्रमाणेंच समजावा.

कुटुंबवृद्धीचा एक तोडगा.

लग्नसमारंभ संपल्यावर बहुल्याभोंवतालच्या वया (पहा—पान १९) बायका काढून घेतात, व बहुलें तसेंच ठेवून त्यावर वेल लावितात. ह्याचा उद्देश असा असतो कीं, वेल वाढतील तसें नवरानवरीचें कुटुंब वाढावें.

ह्याप्रमाणें देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांमध्यें लग्नासंबंधीं निरनिराळे विधि व सोहळे करण्यांत येतात. सदरहू लोक खेरीज करून दक्षिणी ब्राह्मणांत वेद आणि शाखापरत्वें जे पोटभेद आहेत, त्यांच्यांतील विवाहपद्धतीही बहुशः अशीच आहे. आतां, विधींतील कित्येक मंत्र व सोहळ्यांतील कित्येक कृत्यें कांहीं अंशीं भिन्न आहेत. परंतु, साधरणतः पद्धति सारखीच. सबब, त्यांच्या लग्नांचा हवाला आह्मीं वरील लग्नावर सोंपून आतां ब्रह्म—व प्रार्थना—समाजाच्या सुधारलेल्या लग्नपद्धतीकडे वळतों.

ब्रह्म-आणि प्रार्थना-समाजांचे लग्नविधि.

मुखोद्गार.

हे सांगण्यापूर्वी येथें प्रस्तावनेदाखल चार शब्द नमूद केले असतां ते अप्रासंगिक होणार नाहींत, अशा समजुतीनें तसें करण्याविषयीं आम्हीं वाचकांची परवानगी घेतों.

हिंदुस्थान देश इंग्रजांच्या अमलाखालीं गेल्यावर प्रथमत: आम्हांस त्या लोकांची भाषा शिकणें प्राप्त झालें. इंग्रजी भाषा कळूं लागतांच अवाढव्य अशा पाश्चात्यज्ञानभांडाराची किल्ली आमच्या हातीं आली. आमचे देशबंधु त्या भांडाराच्या निरनिराळ्या भागांतून मनसोक्त संचार करूं लागले. तेणेंकरून पाश्चात्य धर्म, तत्वज्ञान, नीति, रीतिरिवाज, इत्यादि नानाप्रकारच्या विषयांवरील सर्वोत्कृष्ट ग्रंथांशीं त्यांचा बराच परिचय झाला; व त्या त्या विषयाच्या नवीन कल्पना त्यांच्या डोक्यांत घोळूं लागल्या. त्यामुळें साहजिकच त्यांच्या मूळच्या बहुतेक आचारविचारांत कमजास्त प्रमाणानें क्रांति घडून आली. कित्येकांच्या धर्मविषयक मतांस नवीन वळणें लागलीं, व त्यांनीं आपापल्या मतांच्या नव्या संस्था निर्माण केल्या. उदाहरणार्थ ब्रम्हसमाज, प्रार्थनासमाज, इत्यादि. ह्या संस्थांच्या जन्मतिथि शोधून काढण्यास बहुतकरून एकोणविसाव्या शतकापलीकडे जावें लागणार नाही. अर्थात् त्यांचीं मतें अद्यापि ताजीं आहेत. सबब, त्या मतांपैकीं जीं ह्या ग्रंथाच्या मर्यादेंत येण्यासारखीं दिसलीं, त्यांचा जिज्ञासु वाचकांसाठीं येथें मुद्दाम समावेश करीत आहोंत. प्रथमत: ब्रम्हसमाजांतलि लग्नविधि सांगून नंतर प्रार्थनासमाजांतील लग्नविधीकडे वळूं.

ब्राह्मसमाजांतील लग्नविधि.

लग्नाचा करार. (वाग्निश्चय.)

विवाहाविषयीं उभयतां वधूवरांचा निश्चय झाला, म्हणजे एखाद्या शुभ दिवशीं उभय कुटुंबांच्या इष्टमित्रांसमोर त्यांचीं अभिवचनें होतात. हा प्रसंग वधूच्या घरीं होतो. विवाहकालीं वधूवरांस काय काय देणग्या व अलंकारभूषणें द्यावयाचीं त्याविषयीं सर्व ठराव ह्याच प्रसंगीं करण्यांत येतात, व कारणपरत्वें ते ह्या वेळींच कागदावर नोंदण्यांत येतात. नंतर लग्नसंमतीदाखल वधूवरें एकमेकांस आपआपल्या प्रेममुद्रिका देतात. म्हणजे वाग्निश्चय झाला.

वाग्दानानंतर-ची स्थिति.

वाङ्निश्चयविधि हा विवाहाप्रमाणेंच पवित्र मानण्यांत येतो. तथापि, विवाहविधि झाल्याशिवाय मात्र वधूवरांनीं पतिपत्नींच्या संबंधानें राहणें प्रशस्त मानीत नाहींत.

वधूवरांचें अ-भ्यंगस्नान व मेजवान्या.

लग्नतिथीच्या पूर्वी वधूवरांस आपापल्या घरीं मंगलवाद्यें वाजत असतां व स्त्रिया मंगलगीतें गात असतां अभ्यंगस्नान घालून सुंदर वस्त्राभरणें परिधान करवितात. अभ्यंगें स्नानाच्या दिवशीं नवरा आपल्या इष्टमित्रांसह नवरीच्या घरीं भोजनास जातो; व ह्या दिवसापासून लग्नदिवसापर्यंत उभय कुटुंबांत विशेष ऐक्य व प्रेमभाव वाढविण्यासाठीं एकमेकांच्या घरीं भोजनास जातात.

लग्नाची तयारी.

विवाहसमारंभासाठीं वधूवरांचीं घरें झाडून सारवून व रंगरोगण देऊन सुशोभित करितात. विवाह वधूच्या घरीं किंवा प्रार्थनामंदिरांत होतो. लग्नतिथीला विवाहस्थान फुलांच्या माळा, वृक्षपल्लवांचीं तोरणें, झाडांच्या कोंवळ्या फांद्या, वेलीं व अन्य निशाणें ह्यांनीं शोभिवंत करितात. घरांत जागा प्रशस्त नसली, तरच लग्नमंडप देऊन तो सुशोभित करावयाचा. नाहींपेक्षां मंडपाची जरूर नाहीं.

विवाहदिनीं वराचे आप्त व इष्टमित्र त्याच्या घरीं जमून त्यास सुंदर वस्त्रांनीं भूषित करून हत्ती, घोडा, पालखी, रथ, अथवा

वरप्रस्थान.

म्याना ह्यापैकीं कोणत्याही वाहनारूढ करून वाजत गाजत वधूच्या घरीं नेतात. मिरवणुकीची मिसल पूर्वोक्त ब्राह्मण लोकांतील मिरवणुकीच्या मिसलीप्रमाणेंच समजावी. गाड्याघोड्यांची योजना पुरुषांच्या मागें केली आहे. येवढाच विशेष आहे.

वर दरवाज्याशीं येतांच वधूचा बाप व इतर मंडळी त्यास सामोरे जाऊन त्याचें आगतस्वागत करितात; आणि शिष्टमंडळी बसली असेल तेथें प्रमुख स्थानीं त्यास नेऊन बसवितात.

वरस्वागत.

विवाहविधीची सर्व तयारी झाली असें पाहून वधूचा बाप जमलेल्या शिष्टांस उद्देशून म्हणतो,– " महाराज, माझी प्रिय कन्या, कुमारी * * * इचा श्री * * * यांजशीं आज या शुभदिनीं विवाह करण्याचें योजिलें आहे, त्यास आपली अनुज्ञा असावी. " त्यास जमलेली मंडळी " स्वस्ति, स्वस्ति, स्वस्ति. " असें तीनदां अनुमोदन देतात.

लग्नाची अनुज्ञा मागणें.

वधूवरांस बसविण्याचें स्थान ' उपासकां 'च्या ' वेदी ' समोर जमीनीपासून अमळ उंच असतें, व त्यावर सुंदर सतरंजी किंवा गालिचा घालून आणि सभोंवतीं फुलांच्या माळा लावून तें सुशोभित केलेलें असतें. वर सांगितल्याप्रमाणें शिष्टांनी अनुमोदन दिलें, ह्मणजे वरास त्या स्थानीं नेऊन बसवितात. त्याच्या सन्मुख ' कुमारी ' चा पिता किंवा पालक बसतो. नंतर ' वरण ' ह्मणजे वराचा सत्कार करण्यांत येतो. तो असा कीं,

बैठकीविषयीं.

कुमारीचा पिता अथवा पालक एका लहान ताटांत सुवासिक फुलें, अत्तर, गुलाब, चंदन, इत्यादि सुगंधि द्रव्यें घालून तें ताट आपल्या उजव्या हातांत धेऊन वरास मोठ्या नम्रतेनें ह्मणतो,– "महाराज, ह्या अर्घ्याचा आपण स्वीकार करावा."

अर्घ्यसत्काराची रीति.

वरः—ह्या अर्घ्याचा मी स्वीकार करितों.

कुमारीपिताः—महाराज, ह्या विवाहवस्त्रांचा आपण स्वीकार करावा.

वरः–ह्या विवाहवस्त्रांचा मी आभारपूर्वक स्वीकार करितों.

कु० पिताः—हें सुवर्णांगुलीयक आपण स्वीकारावें.

वरः—मी ह्याचा प्रेमपूर्वक स्वीकार करितों.

ईश्वराचें ध्यान, व वधूवरसंमति

हें झाल्यावर नवरा प्राप्त झालेलीं वस्त्रें घेऊन एखाद्या खोलींत जातो, व तीं परिधान करून बाहेर येतो. नंतर उपाध्याय त्यास ईश्वराचें ध्यान करण्यासाठीं एकांत स्थलीं बसवितात. तें आटोपलें, ह्मणजे पुन्हां त्यास विवाहस्थानीं आणून बसवितात. मग सुंदर वस्त्रालंकारांनीं सजविलेल्या वधूस बाहेर आणून वेदीसमोर विवाहस्थानीं वराच्या सन्मुख बसविण्यांत येतें; व उपाध्याय वधूवरांची 'संमति' घेतात. ती पुढें सांगितल्याप्रमाणें:—

प्रथमतः ते वरास विचारितात,—

"श्रीमन् * * * श्रीमती * * * यांजशीं विवाह करण्याविषयीं आपली संमति आहेना ?

वर—होय महाराज, माझी पूर्ण संमति आहे.

नंतर ते वधूसही विचारितात,—

श्रीमती * * * श्रीमन् * * * यांजशीं विवाह करण्याविषयीं आपली संमति आहेना ?

वधू—होय महाराज, माझी पूर्ण संमति आहे.

कन्यादानरीति.

हा प्रकार आटोपल्यावर कुमारीचा पिता तिला वराच्या स्वाधीन करितो. त्याची पद्धति अशी:—

पिता—सर्वज्ञ सर्वसाक्षी सर्वांतर्यामी परमेश्वराच्या साक्षीनें आज शके * * वर्षाच्या * * महिन्याच्या * * तिथीस * * रोजीं माझी प्रिय कन्या श्रीमती * * ही, श्रीमन् * * यांचे प्रपौत्र * * ह्यांचे

पौत्र, आणि * * ह्यांचे पुत्र, ह्यांच्या स्वाधीन विवाहपूर्वक करितों. आज पासून इचें सर्वस्वी रक्षण करण्याचा अधिकार यांचा आहे.

वर—सर्वसमर्थ सर्वहृदयदर्शी परमात्म्याच्या साक्षीनें **श्रीमती** * * जी * * यांची प्रपौत्री व **श्रीयुत** * * यांची प्रियतम कन्या होय, तिचा मी मोठ्या प्रेमानें अंगिकार करितों. सर्व प्रकारें इचें रक्षण करण्यास परमेश्वर मला सामर्थ्य देवो !

पिता—धर्म, ज्ञान, अर्थ, आणि काम, इत्यादि कोणत्याही गोष्टींच्या संबंधानें आपण इची उपेक्षा करूं नये. हिचें ऐहिक व पारमार्थिक कल्याण होईल, अशारीतीनें इजशीं आपण सर्वदां वागावें.

वर—अशाच प्रकारें मी इजशीं सर्वदा वागेन.

पिता—**श्रीमन्** * * ही माझी प्रियकन्या आज या सुमंगल समयीं विवाहविधिपूर्वक आपल्या स्वाधीन केली आहे. तिजबरोबर माझ्या सामर्थ्यानुरूप हे अलंकार आणि या संसारोपयोगी वस्तु आपणांस देतों. यांचा आपण स्वीकार करावा.

वर—या सर्वांचा मी कृतज्ञतापूर्वक स्वीकार करितों. स्वस्ति.

हा प्रकार झाला, म्हणजे कन्यादान आटोपलें.

तदनंतर उपाध्याय वधूवरांस परस्परांचा उजवा हात धरण्यास सांगतात.

पाणिग्रहण, व करार.

त्यांनी तसें केल्यावर उपाध्याय शुभ्र पुष्पांची एक माळा घेऊन ती मंगलवाद्यांच्या गजरांत वधूवरांच्या हस्तयुग्मासभोंवती गुंडाळितात; व तिची दोन शेवटें घेऊन त्यांची गांठ मारितात. ही सुमनमाला वधूवरांचें प्रेमबंधन, आणि तिचा ग्रंथि हा त्या उभयतांचा प्रेमग्रंथि मानिला जातो. त्या प्रेमबंधनाचा अर्थ व त्याचें महत्व उपाध्यायांनी वधूवरांस स्पष्ट करून सांगितल्यावर ते त्या दोघांकडून मोठ्या गंभीर वाणीनें पुढील वचनें वदवितात.

वर—**श्रीमती** * * आज या शुभदिनी परमेश्वरासमक्ष मी तुजशी विवाह करितों. आज पासून तूं माझी धर्मपत्नी आहेस.

वधू—श्रीमन् * * आज या शुभदिनीं परमेश्वरासमक्ष मी तुह्मांशीं विवाह करितें. आजपासून तुह्मी माझे धर्मपति आहां.

वर—संपत्तीमध्यें व विपत्तीमध्यें, सर्व प्रकारच्या सुखदुःखांत, हरएक प्रकारच्या रोगक्लेशांत, मी तुला कदापि अंतर देणार नाहीं.

वधू—संपत्तीमध्यें व विपत्तीमध्यें, सर्व प्रकारच्या सुखदुःखांत, हरएक प्रकारच्या रोगक्लेशांत, मी तुह्मांस कदापि अंतर देणार नाहीं.

वर—माझें अंतःकरण सर्वकाळ तुझ्या ठायीं राहो; तुझें अंतःकरण सर्वकाळ माझ्या ठायीं राहो; आणि आपणां उभयतांचीं अंतःकरणें परमेश्वराच्या ठायीं राहोत.

वधू—माझें अंतःकरण सर्वकाल तुमच्या ठायीं राहो, तुमचें अंतःकरण सर्वकाल माझ्या ठायीं राहो, आणि आपणां उभयतांचीं अंतःकरणें परमेश्वराच्या ठायीं राहोत.

वर—मी सर्वस्वी तुझा, तूं सर्वस्वी माझी, आपणां उभयतांच्या प्रेमांत कधींही विपर्यास न होवो.

वधू—मी सर्वस्वी तुमची, तुह्मी सर्वस्वी माझे, आपणां उभयतांच्या प्रेमांत कधींही विपर्यास न होवो.

ह्याप्रमाणें विवाहबंधनाचें कृत्य उरकल्यावर वधूवरांकडून परमेश्वराची प्रार्थना करविण्यांत येते. ती खालीं लिहिल्याप्रमाणेः—

ईश्वराची प्रार्थना.

वर—परमात्मन्! हें प्रेमबंधन तूं पवित्र कर. तें कदापि शिथिल होऊं देऊं नकोस!

वधू—परमात्मन्! हें प्रेमबंधन तूं पवित्र कर. तें कदापि शिथिल होऊं देऊं नकोस!

ही प्रार्थना संपल्यावर वधूवरें खालीं बसतात; व हें सर्व कृत्य होत असतां मंगलवाद्यें वाजत असतात.

थोडया वेळानें जिकडे तिकडे शांतता झाल्यावर उपाध्याय त्या नूतन दंपत्यास एक उपदेशपर व्याख्यान देतात. तें बहुधा ठरीव आहे. तथापि, त्यांतील कल्पना अर्वाचीन असून त्यांचें तात्पर्य सर्वसाधारण वाचकांस ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. शिवाय, केवळ हितवाद या नात्यानें तें पुष्कळ अविवाहित आणि विवाहित तरुणांस उपयुक्त होईल. सबब, तें आम्हीं येथें घेत आहोंत.

उपदेशाविषयीं

वधूवरांस उपदेश—वर सांगितल्याप्रमाणें वधूवरांनीं परमेश्वरप्रार्थना केल्यानंतर धर्मोपदेशकांनीं त्यांस पुढें लिहिल्याप्रमाणें उपदेश करावयाचाः—

वधूवरांस उपदेश.

" हे नूतन विवाहित वधूवरांनों, दयामय परमात्म्याच्या कृपेनें त्याच्या समक्ष तुह्मीं उभयतां विवाहबंधनानें बद्ध झालां आहां. आजपर्यंत तुह्मीं स्वतंत्र होतां. परंतु आतां तसें नाहीं. आजपासून तुह्मांपैकीं प्रत्येकास दोघांची चिंता आहे तुह्मां उभयतांचीं शरीरें भिन्न आहेत, तरी तुमचें मन एक असलें पाहिजे. तुह्मां उभयतांमध्यें कोणत्याही प्रकारचा भिन्नभाव होतां कामा नये. "

" विवाह हें संसारमंदिराचें द्वार होय. तें ओलांडून आज तुह्मीं संसारांत प्रवेश केला आहे. संसार, हें परमात्म्याचें वसतिस्थान होय. ह्यामध्यें आपले सर्व आचारविचार पवित्र राखा. विचारी व अनुभवी पुरुषांनीं ह्या संसारास भयाण रानाची उपमा दिली आहे. ती यथायोग्य आहे. या रानाचा मार्ग फार बिकट आहे. तो आक्रमीत असतां फार सावध राहिलें पाहिजे. इहलोकच्या क्षणिक सुखसंपत्तीच्या मोहास वश होऊन सर्व सुखांचा दाता जो परमेश्वर त्यास विसरूं नका. त्याच्या ठायीं भक्तिभाव वाढवून त्याची कृपा संपादन करा. परस्परांच्या ऐहिक सुखाप्रीत्यर्थ जसे रात्रंदिवस झटाल तसेच,–किंबहुना त्याहूनही अधिक,–पारलौकिक कल्याणाच्या कामीं सतत जागृत रहा. संसारसंबंधीं लहान मोठें कोणतेंही कार्य कर्तव्य झालें, तरी तें परमेश्वराच्या नांवानें करा. त्याचें स्मरण केल्यावांचून कोणत्याही कार्यास हात घालूं नका.

ब्रह्मनिष्ठो गृहस्थः स्यात् तत्त्वज्ञानपरायणः।
यद्यत्कर्म प्रकुर्वीत तत् ब्रह्मणि समर्पयेत् ॥

ह्मणजे–संसारी गृहस्थानें सर्वदा ब्रह्मनिष्ठ राहून तत्त्वज्ञानाविषयीं फार आतुर असलें पाहिजे. जें कांहीं कर्म तो करितो, तें त्यानें परमेश्वराच्या ठायीं समर्पण करावें. हें दिव्य वचन आपल्या हृत्पटलावर लिहून ठेवा. त्याचा विसर पडूं देऊं नका. त्याजप्रमाणें वागण्यास भिऊं नका. "

" तुमचें सर्व परमेश्वरास अर्पण करा. ह्मणजे सर्व अरिष्टांपासून तो तुमचें संरक्षण करील. तुमचें गृह परमेश्वराचें पवित्र मंदिर होय, हा भाव अंतःकरणांत निरंतर जागृत ठेवा. जेणेंकरून ह्या पवित्र ब्राह्म धर्माचे गौरव होतील, अशारीतीनें सतत वागा. "

वरास बोध—"श्रीमन् * * परमेश्वरानें ही कोमल अबला आज तुमच्या स्वाधीन केली आहे. ही तुमची धर्मपत्नी होय. हिचें तुह्मी सर्व प्रकारें रक्षण करा. तिला सर्वदा संतुष्ट ठेवा. तिच्या ऐहिक व पारलौकिक सुखास जपा. अंतःकरणांत दुष्ट वासनांचा प्रवेशही होऊं देऊं नका. संसारांत सर्व प्रसंगीं आपलें चित्त स्थिर राहूं द्या. त्याच्या ठायीं चंचलता उत्पन्न होऊं देऊं नका. कितीही मोह प्राप्त झाला, तरी कामक्रोधादि दुर्वृत्तींच्या पाशांत सांपडूं नका. ह्या आपल्या प्रिय भार्येस धर्मज्ञान देऊन सन्मार्ग दाखवा, म्हणजे ती तुमचें अनुगमन करील. संसाराचीं सर्व कृत्यें ऐक्यभावानें व एकमतानें करा. तुमची धर्मपत्नी हेंच तुमच्या ऐहिक सुखाचें मुख्य स्थान होय. अतएव तिजशीं सदैव प्रेमानें वागा, आणि तिला इहलोकीं व परलोकीं शाश्वत सुखाची अधिकारीण करा. "

वधूस बोध—श्रीमती * * आज तुम्हाला परमेश्वरानें पतीच्या स्वाधीन केलें आहे. स्त्रियांना इहलोकीं पतीहून दुसरें कोणीही अधिक प्रिय नाहीं. म्हणून पतीची आज्ञा पालन करणें, त्यास नेहमीं संतुष्ट राखणें, आणि त्याजवर अकृत्रिम प्रेम करणें, हेंच इहलोकीं तुमचें श्रेष्ठ कर्तव्य. तें केल्यानें तुमचें कल्याण होईल, हें लक्ष्यांत ठेवा. कठोर भाषणानें, अथवा

उण्या उत्तरानें पतीचें अंतःकरण दुखवूं नका. ज्या स्थितींत परमेश्वर ठेवील त्या स्थितींत परम संतोष मानून पतीबरोबर आनंदानें संसार करा. सर्वदा पतीच्या हितास जपा. त्याच्या मर्जीबाहेर वागूं नका, व त्याच्या प्रातीबाहेर खर्च करूं नका. आपलें मन, वाणी आणि क्रिया सर्वकाल पवित्र राखा. निरंतर धर्माचरण करून पतीचें कल्याण करा."

ह्याप्रमाणें बोध केल्यावर उपाध्यायांनीं वधूवरांस खालीं लिहिल्याप्रमाणें आशीर्वाद द्यावयाचेः—

आशीर्वादरांत.

"हे नूतनविवाहित वधूवरांनों, दयामय परमात्मा तुमच्या संसारांत तुह्मांस सुख व शांति यांचा सदैव अनुभव देवो! तुमचें गृह पवित्र करो! तुमचा संसार मंगल करो! तुमच्याद्वारें ह्या पवित्र ब्राह्मधर्माचा निरंतर गौरव होईल, असा कल्याणकारक आशीर्वाद तुह्मां उभयतां पतिपत्नींस देवो!

ब्रह्मकृपाहि केवलम्!

वरील आशीर्वचन संपल्यावरोबर उपाध्यायांनीं व त्यांच्याबरोबर जमलेल्या सर्व मंडळींनी **"ब्रह्मकृपाहि केवलम्"** ह्या वचनाचा घोष करावयाचा; व नंतर प्रसंगास अनुरूप असें एखादें संगीत ह्मणून शेवटीं सर्वांनी—**"शांतिः शांतिः शांतिः"** असें त्रिवार ह्मणावयाचें, ह्मणजे हा ब्रह्मसमाजाचा लग्नविधि समाप्त झाला.

लग्न नोंदणें.

पुढें विवाहित दंपत्याच्या मुलांबाळांस सर्व प्रकारचे हक्क मिळावेत, व त्यांस कोणत्याही प्रकारची अडचण येऊं नये, येवढ्याकरितां झालेला विवाह सरकारी कायद्याप्रमाणें नोंदवून घ्यावा, असें सदरहू समाजाच्या अध्वर्यूंचें सांगणें आहे.

भिन्नवर्णांचें लग्न व पुनर्विवाह यांस संमति.

ह्या समाजांत जातिभेद मुळींच नाहीं. परमेश्वर मनुष्यमात्राची प्रेममयी माता आहे. अतएव प्रत्येक पुरुष आपला बंधु, व प्रत्येक स्त्री आपली भगिनी, असा मंगलभाव अंतःकरणांत सदैव जागृत ठेवून प्रत्येकानें वागावयाचें आहे; आणि ह्याच मता-

घ्या अनुरोधानें "विवाह अथवा लग्नसंस्कार" संबंधीं नियमांत सदरहू समाजाच्या अग्रणींनीं एक कलम घातलें आहे. त्यांत ते म्हणतात कीं, एखाद्या विवाहसंबंधापासून भिन्न वर्णाचे ऐक्य होऊन परमेश्वराच्या पवित्र धर्माचा प्रसार होण्याचा संभव आहे, असें मुलामुलींच्या आईबापांस विवेकपूर्वक वाटत असल्यास त्यांनीं मुलगामुलगी धर्मनियमाप्रमाणें उपवर होण्याचे पूर्वी वाक्‌निश्चयविधि करण्यास हरकत नाहीं. परंतु, हा वाक्‌निश्चय मुलें सज्ञान अवस्थेंत आल्याशिवाय सहसा करूं नये, आणि त्यांचा विवाह व्हावयाचा तो ती वयांत आल्याशिवाय कधींही होऊं नये." त्याचप्रमाणें भर तारुण्यावस्थेत स्त्रीस वैधव्य अथवा पुरुषास विधुरदशा प्राप्त झाल्यास त्या स्त्रीला अथवा पुरुषाला पुनर्विवाह करण्याला मोकळीक आहे. असो. आतां आपण प्रार्थनासमाजाची लग्नपद्धति कशी काय आहे ती पाहूं.

प्रार्थनासमाजाचा लग्नविधि.

सदरहू समाजाच्या अध्वर्यूंनीं हा विधि पुढें लिहिल्याप्रमाणें सांगितला आहे:—

पुण्याहवाचन करण्याबद्दल संमति.

पुण्याहवाचन—विवाहाच्या दिवशीं किंवा पूर्वदिवशीं प्रातःकाळीं वधूच्या पित्यानें अथवा जो कोणी कन्यादाता असेल त्यानें, व वरानें अथवा त्याच्या पित्यानें आपआपल्या घरीं पुण्याहवाचन करावें. त्याचा प्रकार असा:—

यजमानांचें मंगलस्नान, व परमेश्वराचें स्मरण.

कन्यादाता व त्याची पत्नी यांनीं आपल्या घरीं, व वरानें किंवा वरपिता आणि त्याची पत्नी यांनीं आपल्या घरीं स्नानें करून मंगलवस्त्रें परिधान करून आचार्यासमोर आसनावर बसावें, आणि मंगलविधाता जो परमेश्वर त्याचें स्मरण व ध्यान करावें, तें असें:—

यो देवोऽग्नौ योऽप्सु यो विश्वं भुवनमाविवेश ।
य ओषधीषु यो वनस्पतिषु तस्मै देवाय नमो नमः ॥

ह्मणजे, जो देव अग्नीच्या ठायीं, जो जलाच्या ठायीं, आणि जो सर्व विश्वामध्यें प्रविष्ट झाला आहे, जो ओषधींमध्यें व जो वनस्पतींमध्यें आहे, त्या देवास मी वारंवार नमस्कार करतों.

य एष सुप्तेषु जागर्ति कामं कामं पुरुषो निर्मिमाणः ।
तदेव शुक्रं तद्ब्रह्म तदेवामृतमुच्यते ॥
तस्मिँल्लोकाः श्रिताः सर्वे तदु नात्येति कश्चन ।
एतस्माज्जायते प्राणो मनः सर्वेन्द्रियाणि च ।
खं वायुर्ज्योतिरापः पृथिवी विश्वस्य धारिणी ॥
भयादस्याग्निस्तपति भयात्तपति सूर्यः ।
भयादिन्द्रश्च वायुश्च मृत्युर्धावति पञ्चमः ॥

ह्मणजे, सर्व प्राणी गाढ निद्रेंत असतां जो विश्वात्मा जागृत असून आपल्या इच्छेप्रमाणें उत्पत्ति करीत असतो तोच देव; तेंच शाश्वत ब्रह्म; सर्व विश्व त्याचाच आश्रय करून राहिले आहे; त्याचा अतिक्रम करावयास कोणी समर्थ नाहीं. त्याजपासून प्राण, मन, व सर्व इंद्रियें, तसेंच आकाश, वायु, तेज, जल, आणि सर्वांचा आधार अशी जी पृथ्वी, हीं सर्व झालीं. त्याच्या भयेंकरून अग्नि तापद होतो, त्याच्या भयेंकरून सूर्य तापद होतो, त्याच्या भयेंकरून मेघ जलाची वृष्टि करितो, वायु वाहतो, आणि मृत्यु आपला व्यापार करितो.

सर्वदा सर्वकार्येषु नास्ति तेषाममंगलम् ।
येषां हृदिस्थो भगवान् मंगलायतनं हरिः ॥

ह्मणजे, सर्व मंगलाचें अधिष्ठान असा जो परमेश्वर, तो ज्यांच्या हृदयांत स्थित आहे, त्यांस सर्व कालीं सर्व कार्यांत मांगल्य प्राप्त होतें.

सर्वेषु कालेषु समस्तदेशेष्वशेष कार्येषु तथेश्वरेश्वरः ।
सर्वैः स्वरूपैः स्तुतिमाननादिर्ममास्तु मांगल्यविवृद्धये हरिः ॥

ह्मणजे, अनाद्यनंत सर्वेश्वर परमात्मा, ज्याची भक्तांनीं अनेक प्रकारें स्तुति केली आहे, तो सर्व कार्यांमध्यें, सर्व कालीं आणि सर्व स्थलीं आम्हांस मांगल्यवृद्धिकारक होवो !

नमस्कार, उपासना, पुण्याहवाचनें यांचा संकल्प आणि कृत्य.

ह्यानंतर 'सर्वेश्वरायनमः' 'जगदीश्वरायनमः' 'परमेश्वरायनमः' इत्यादि नांवांनीं देवास नमस्कार करावयाचे. ते झाले, ह्मणजे ईश्वराचें स्मरण संपलें. पुढें श्रीभरद्वर्षे येथपासून संकल्प करून भावी विवाहाच्या अंगभूत जी ब्रह्मोपासना व पुण्याहवाचन तें करितों, असें ह्मणावयाचें. ब्रह्मोपासनेचा प्रकार आहे तो असाः—

ॐ सत्यं ज्ञानमनंतं ब्रह्म । आनंदरूपममृतं यद्विभाति ।
शांतं शिवमद्वैतम् । शुद्धमपापविद्धम् ॥

ज्यानें आह्मांस निर्मिलें, जो आमचें पालन करितो, व आह्मांस सर्व सुखें देतो, जो आमच्या जीवनाचें जीवन व जो सर्व कल्याणाचा निधि, ज्याच्या प्रसादानें शरीर आणि मन, ज्याच्या प्रसादेंकरून बुद्धि व बळ, ज्याच्या प्रसादेंकरून ज्ञान व धर्म, हीं प्राप्त झालीं आहेत, जो आमचें शरीर, मन व आत्मा यांस सर्व प्रकारच्या विघ्नांपासून सर्वदा रक्षितो, जो सर्व प्रकारें आह्मांस आधार, आमचा सुहृत्, आमचा पिता, सत्यस्वरूप, ज्ञानस्वरूप, अनंतस्वरूप, परब्रह्म, तो आनंदरूपानें, अमृतरूपानें प्रकाशमान आहे. तो शांत, मंगल, अद्वितीय आहे. आह्मीं आपल्या आत्म्यास त्या अद्वितीय मंगलस्वरूपाच्या ठायीं एकचित्तानें व प्रीतिपूर्वक स्थिर करूं.

नमस्ते सते ते जगत्कारणाय ।
नमस्ते चिते सर्वलोकाश्रयाय ।
नमोऽद्वैततत्त्वाय मुक्तिप्रदाय ।
नमो ब्रह्मणे व्यापिने शाश्वताय ॥ १ ॥
त्वमेकं शरण्यं त्वमेकं वरेण्यम् ।
त्वमेकं जगत्पालकं स्वप्रकाशम् ।
त्वमेकं जगत्कर्तृपातृप्रहर्तृ ।
त्वमेकं परं निश्चलं निर्विकल्पम् ॥ २ ॥
भयानां भयं भीषणं भीषणानाम् ।
गतिः प्राणिनां पावनं पावनानाम् ।
महोच्चैः पदानां नियन्तृ त्वमेकम् ।
परेषां परं रक्षणं रक्षणानाम् ॥ ३ ॥
वयं त्वां स्मरामो वयं त्वां भजामो ।
वयं त्वां जगत्साक्षिरूपं नमामः ।
सदेकं निधानं निरालम्बमीशम् ।
भवाम्भोधिपोतं शरण्यं व्रजामः ॥ ४ ॥

ह्मणजे, जगताचें आदिकारण व सत्यस्वरूप जो तूं त्या तुला नमस्कार. सर्व लोकांचा आश्रय व ज्ञानस्वरूप जो तूं त्या तुला नमस्कार. अद्वितीय असें ज्याचें स्वरूप, व मुक्ति देणारा जो तूं, त्या तुला नमस्कार. सर्वव्यापी व शाश्वत असें जें तूं ब्रम्ह त्यास नमस्कार. १ तूंच एक रक्षणकर्ता, तूंच

एक श्रेष्ठ, तूंच एक जगाचा पालक, व तूंच स्वतंत्र ज्ञानशक्तिसंपन्न तूंच एक जगाचा कर्ता, रक्षिता, व शास्ता. तूंच एक अत्यंत श्रेष्ठ, स्थिर, व विकल्परहित. २ भयांचें भय, व भयंकरांस भयंकर तूं. प्राण्यांची गति तूं. पवित्रांमध्यें पवित्र तूं. महान् अशीं जीं पदें त्यांचा एक तूंच नियंता. श्रेष्ठांमध्यें तूं श्रेष्ठ. रक्षणकर्त्यांमध्यें तूं रक्षणकर्ता. ३ असा जो तूं, त्या तुझें आह्मी स्मरण करितों, आह्मीं तुझें पूजन करतों, आम्ही जगाचा साक्षी जो तूं, त्यास नमस्कार करतों. तूंच एक सत्य, ठेवा, स्वतंत्र, नियंता, भवसागरांत तारणारी नौका, व रक्षणकर्ता, त्याप्रत आम्ही येतों.

ध्यान व प्राथर्ना.

ह्याप्रमाणें ब्रह्मोपासना झाल्यावर सर्वव्यापी, विश्वाचा प्रकाशक, जगाचा उत्पन्नकर्ता, असा जो परम देव त्याच्या सर्वोत्तम ज्ञानशक्तिरूप तेजाचें ध्यान करावयाचें; व तो (परमदेव) आमच्या बुद्धीस प्रेरणा करो! अशी त्याजपाशीं प्रार्थना करावयाची. तदनंतर आणखी एक परमेश्वरप्रार्थना आहे ती अशी:—

आणखी एक प्रार्थना.

हे जगदात्मन्! तूं आमच्या जीवनाचें जीवन व आमचा शाश्वत सखा आहेस. तूं आह्मां सर्वांचें प्रेम आपल्या ठायीं लावून घे. तसेंच तुजला जें प्रिय तें करण्याविषयीं आह्मांस सदा असा उत्साह दे कीं, सर्व अवस्थांमध्यें व सर्व प्रसंगीं आह्मीं तुझा महिमा गाऊं, आणि आमच्या सर्व जीवनाचें लक्ष्य तूं आहेस, हें सर्व ध्यानांत ठेवून, सर्व संसारकृत्याचें अनुष्ठान करूं. हे नाथ, जिच्या योगें सर्व हृदय व मन तुजला अर्पण करून तुझें कार्य करावयास समर्थ होऊं, अशी शुभ बुद्धि व असें धर्मबळ आमच्या ठायीं उत्पन्न कर.

आशीर्वाद मागणें व पुण्याह वाचन.

ही प्रार्थना झाल्यावर यजमानानें शिष्टापाशीं '**सौमनस्यमस्तु**' इत्यादि आशीर्वाद मागावे. त्यांचा अर्थ असा कीं, आपल्या मनाची प्रसन्नता असो, सुखरूपपणा असो, संकट नसो, दीर्घायुष्य, कल्याण, शांति, पुष्टि, व संतोष असो, त्यास शिष्टांनीं

' तसें असो ! ' असें ह्मणावें. ह्मानंतर यजमानांनीं पुण्याहवाचन करावयाचें त्याचा प्रकार पुढें लिहिल्याप्रमाणें:-

यजमान—भवद्भिरनुज्ञातः (पुण्यं) पुण्याहं वाचयिष्ये। म्हणजे, आपल्या आज्ञेनें मी हा दिवस मंगलकारक (पवित्र) होवो असें म्हणवितों.

शिष्ट—वाच्यताम्। म्हणजे ' म्हणवा ! '

यजमान—

सविता पश्चात्तात्सविता पुरस्तात्सवितोत्तरात्तात्सविताधरात्तात् ॥
सविता नः सुवतु सर्वतातिं सविता नो रासतां दीर्घमायुः ॥

ह्याचा अर्थ, जगत्स्रष्टा परमात्मा आपल्या पाठीमागें आहे, पुढें आहे, वर आहे, खालीं आहे, सर्व जें जें अभिलषित आहे, तें तें तो आम्हांस देवो. दीर्घ आयुष्य देवो. नंतर **शांतिरस्तु। पुष्टिरस्तु।** इत्यादि आशीर्वचनें मूळच्या वैदिक विधीप्रमाणेंच मागावयाचीं. परंतु त्यांत **वेदसमृद्धिरस्तु। शास्त्रसमृद्धिरस्तु।** इत्यादिकांच्या ऐवजीं फक्त **धर्मसमृद्धिरस्तु** । असें सामान्य आशीर्वचन मागितलें आहे. असो. सर्वांचा अर्थ असा कीं, शांति असो. पुष्टि असो. संतोष असो. वृद्धि असो. विघ्न नसो. आयुष्य असो. आरोग्य असो. कर्म मंगल होवो. कर्माची समृद्धि असो. धर्माची समृद्धि असो. संकटाचा नाश होवो. जें पाप त्याचा नाश होवो. जें श्रेय तें असो. श्रीपरमेश्वराच्या प्रीतीकरितां, मी जो कुटुंबवान् व महाजनांना नमस्कार करून त्यांचा आशीर्वाद संपादूं इच्छिणारा, त्या मला हा दिवस पुण्यकारक होवो, असें आपण म्हणावें. त्यास शिष्टांनीं **ॐपुण्याहं।** म्हणजे हा दिवस पुण्यकारक होवो ! असा आशीर्वाद द्यावयाचा. नंतर यजमानांनीं शिष्टांपाशीं स्वस्ति म्हणजे चांगलें व ऋद्धि म्हणजे समृद्धि मागावयाची व ती त्यांनीं द्यावयाची. त्यानंतर यजमानांनीं फिरून एकदा परमेश्वराची प्रार्थना करावयाची ती अशी:—

जगच्चालक प्रभो ! या संसारांत आम्हांस सदाचरणानें वागण्याविषयीं प्रेरणा करून आमच्या हातून आमचीं सर्व कर्तव्यें घडविणारा तूंच आहेस. आमची शक्ति अति अल्प. ह्यामुळें कोणतेंही कार्य आम्हीं आपल्या साम-

र्थ्यानें पूर्ण करण्यास शक्तिमान् होत नाहीं. याकरितां दयामय पित्या ! आम्हीं हें जें मंगलकार्य आरंभिलें आहे, त्यास तूं साहाय्य होऊन तें निर्विघ्नपणें सिद्धीस जाईल असें कर. अशी आमची तुजपाशीं प्रार्थना आहे. ही प्रार्थना व एकंदर पुण्याहवाचन **ॐ शांतिः शांतिः शांतिः ।** ह्या मंत्रानें समाप्त करावयाचें.

लग्नाची तयारी, व लग्नरीति.

तदनंतर वृक्षपल्लवांनीं व पुष्पमालादिकांनीं सुशोभित केलेल्या विवाहमंडपांत रात्रीचा समय असल्यास सर्वत्र चांगला प्रकाश होईल इतके दीप लावून विवाहकार्यार्थ आलेल्या इष्टजनांकरितां उत्तम प्रकारचीं आसनें घालून एका बाजूस पुरुष व एका बाजूस स्त्रिया बसतील अशी व्यवस्था करून मध्यें कन्यादानाचें स्थान तयार करावयाचें. आचार्याकरितां उंच वेदी अथवा आसन करून तिच्या समोर कन्यादात्यानें बसावयाची जागा करावयाची. त्या जागेच्या दोन हातांकडे समोरासमोर तोंडें करून वधूवरांस बसण्याची जागा करावयाची. त्यानंतर वर वधूगृहीं प्राप्त झाला, म्हणजे त्याचें स्वागत करून त्यास वस्त्रालंकारादि जें देणें असेल तें द्यावयाचें, व थोडें मिष्टान्न खाण्यास किंवा शर्करायुक्त दूध पिण्यास देऊन मुखप्रक्षालन झाल्यावर त्यास त्याच्या आसनावर आणून उभें करावयाचें; व त्यासमोरील आसनावर सालंकृत कन्येला आणून उभी करावयाची. लग्न लावण्याचा प्रकार प्रार्थनासमाजाव्यतिरिक्त अशा ब्राम्हणांच्या रीतीप्रमाणेंच आहे. सबब, त्याची येथें पुनरुक्ति करण्याचें कारण नाहीं.

उपासना.

लग्न लागल्यावर कन्यादात्यानें त्या कन्येच्या सुखसंपत्तीकरितां, धर्माच्या अभिवृद्धीकरितां, व परमेश्वराच्या संतोषाकरितां ब्राम्हविवाह विधीनें तिचें दान करितों, व त्या दानाच्या अंगभूत व आरंभीं करण्याची जी परमेश्वरोपासना ती करितों, असा संकल्प करावयाचा. आरंभीची उपासना पुढें लिहिल्याप्रमाणें:—

एको देवः सर्वभूतेषु गूढः सर्वव्यापी सर्वभूतान्तरात्मा ॥
कर्माध्यक्षः सर्वभूताधिवासः साक्षी चेता केवलो निर्गुणश्च ॥ १ ॥

म्हणजे, एक देव सर्व भूतांच्या ठायीं गुप्त आहे. तो सर्वव्यापी, सर्व भूतांचा अंतरात्मा व जे सर्व व्यापार होतात त्यांचा तो नियंता आहे. सर्व भूतें त्याच्या ठायीं वास करितात. तो सर्वसाक्षी, सर्वांस चैतन्य देणारा, अद्वितीय, आणि आकारादि बाह्यगुणरहित असा आहे.

सर्वेन्द्रियगुणाभासं सर्वेन्द्रियविवर्जितम् ॥
सर्वस्य प्रभुमीशानं सर्वस्य शरणं सुहृत् ॥ १ ॥

म्हणजे, सर्व इंद्रियांच्या सामर्थ्याच्या योगें होणारें ज्ञान त्याला होतें. तथापि, सर्व इंद्रियांनीं विरहित तो आहे. सर्वांचा प्रभु, सर्वांचा राजा, सर्वांचा मोठा रक्षणकर्ता, सर्वांचा प्रिय करणारा सखा तोच आहे.

सपर्यगाच्छुक्रमकायमव्रणमस्नाविरं शुद्धमपापविद्धम् ।
कविर्मनीषी परिभूः स्वयंभूर्याथातथ्यतोर्थान्
व्यदधाच्छाश्वतीभ्यः समाभ्यः ॥

म्हणजे, तो सर्वांस वेष्टून आहे, तो दीप्तिमान् आहे, त्याला शरीर नाहीं, त्याला क्षत नाहीं, त्याला शिरा नाहींत, तो शुद्ध आहे, त्याला पापाचा स्पर्श नाहीं, तो सर्वसाक्षी आहे, तो सर्वज्ञ आहे, तो सर्वांत श्रेष्ठ, तो स्वतःसिद्ध व तो यथायोग्य रीतीनें अनंत वर्षेपर्यंत राहणारी सर्व व्यवस्था करिता झाला.

एष सर्वेश्वर एष भूताधिपतिरेष भूतपालः ।
एष सेतुर्विधरण एषां लोकानां संभेदाय ॥

म्हणजे, हा सर्वेश्वर सर्व भूतांचा अधिपति, सर्व भूतांचा पालनकर्ता, व ह्या लोकांत व्यवस्था रहावी, गोंधळ होऊं नये, म्हणून त्यांस आधारभूत हा सेतु आहे.

हे परमेश्वर ! आज या शुभकार्याकारणें या ठिकाणीं बंधुभगिनीसहित आम्हीं एकत्र मिळालों आहों. तूं मंगलदाता, आम्ही तुजवर संपूर्ण भरंवसा ठेवून अशी प्रार्थना करितों कीं, तूं प्रसन्न होऊन आम्हांस मंगल फल दे.

तूं संसारसेतुस्वरूप आहेस. आम्हीं तुला शरण येतों. हे विश्वपति, तूंच मनुष्यास उत्पन्न केलेंस, बाल्यावस्थेमध्यें तूं स्नेहानें त्याचें लालनपालन करितोस, तसेंच उत्तरोत्तर वयानें जसा त्याजला मोठा करितोस त्याच प्रमाणें आत्म्यास ज्ञान व धर्म इहींकरून उन्नत करितोस. योग्य वयांमध्यें स्त्रीपुरुषांस एकत्र करून विवाहसंबंधानें तूं बद्ध करितोस. तसेंच त्यांजमध्यें विशुद्ध प्रेम उत्पन्न करून प्रपंचांत त्यांस परस्परांचे साहाय्यकारी करितोस. तूं कुलदेवता होऊन कुटुंब्रांचे ठायीं वास करितोस, आणि सतत सुख आणि शांति ह्यांची वृष्टि करितोस. तूं जसें मंगलमय अशा साधारण नियमांनीं या असीम विश्वराज्याचें शासन करितोस, तसेंच मधुर धर्मनियमांनीं प्रतिकुटुंब्राचें रक्षण करितोस. हे जगदीश्वर ! अपार तुझी करुणा ! तुझ्या मंगलभावास अंत नाहीं. तूं अनुपम प्रेमानें संसाराची मंगलसिद्धि करितोस. ह्या संबंधानें तुझें अनुकरण करण्यास आह्मांस सामर्थ्य दे. आमचा प्रत्येक सांसारिक संबंध व प्रत्येक कार्य तूं विशुद्ध कर, आणि आह्मीं तुझ्या आज्ञेला अनुसरून सर्व संसारधर्म सिद्धीस न्यावयास समर्थ होऊं असें कर. सदरहू उपासना ॐ **एकमेवाद्वितीयम्** । ह्या मंत्रानें समाप्त करावयाची. तदनंतर कन्यादान करावयाचें त्याची पद्धति पुढें लिहिल्याप्रमाणें:-

कन्यादान—कन्येला वरासमोर उभी करून व कन्यादात्यानेंही उभें राहून पुढील मंत्र म्हणावयाचे:—

मूळांतील फेर-फेरसिह कन्यादानावधि.

कन्यां सद्गुणसंपन्नां कनकाभरणैर्युताम् ।
विद्वन् तुभ्यं प्रदास्यामि उभयोर्हितकाम्यया ॥

म्हणजे, सद्गुणसंपन्न आणि सुवर्णालंकारांनीं युक्त अशी ही कन्या मी विद्वान् अशा आपणांस उभयतांच्या हितार्थ अर्पण करितों.

विश्वंभरः सर्वशक्तिः साक्ष्यस्मिन्कर्मणि प्रभुः ।
इमां कन्यां प्रदास्यामि तुभ्यं धर्मविवृद्धये ॥

म्हणजे, विश्वाचा पालक सर्वशक्तिमान् प्रभु ह्या कार्यास साक्षि आहे, हे मनांत आणून मी ही कन्या आपल्यास धर्माभिवृद्धीकरितां अर्पण करितों. हे मंत्र म्हणून झाल्यावर **पुण्यं वर्धताम् । सौमनस्यमस्तु** । इत्यादि वर सांगितलेल्या वचनांची पुनरुक्ति करावयाची. त्यांचा अर्थही वर दिलाच आहे. तीं वचनें म्हटल्यावर वराच्या हस्तावर कन्येचा हस्त ठेवून ते दात्यानें आपल्या हातांत धरावयाचे आणि पुढील प्रयोगानें कन्यादान करावयाचें:—

ॐ तत्सत् । अमुकशर्माहं अमुककुलोत्पन्नाय, अमुकप्रपौत्राय, अमुकपौत्राय अमुकस्य पुत्राय, ब्रह्मनिष्ठब्राह्मणाय अमुकशर्मणे वराय, अमुककुलोत्पन्नां, अमुकप्रपौत्रीं, अमुकपौत्रीं, अमुकपुत्रीं अमुकनाम्नीं, (येथपर्यंतचा उच्चार त्रिवार करावयाचा.)

ह्याचा अर्थ मी अमुक नांवाचा, अमुक कुलांत उत्पन्न झालेल्या अमुकाच्या पणतवास, अमुकाच्या नातवास, अमुकाच्या पुत्रास, अमुक नांवाच्या वरास, ब्रम्हनिष्ठ अशा ब्राम्हणास अमुक कुळांत जन्मलेली, अमुकाची पणती, अमुकाची नात अमुकाची मुलगी, अमुक नांवाची—

एनां कन्यां सालंकारां, अरोगिणीं,
सुशीलां, वाससाच्छादितां, तुभ्यमहं संप्रतिपादये ।

ही कन्या अलंकृत केलेली, निरोगी, सुस्वभावी, वस्त्र परिधान केलेली, आपल्यास अर्पण करितों. ह्यास वरानें **ॐ स्वस्ति** । म्हणजे 'ठीक आहे.' असें म्हणून वधूच्या दक्षिण बाहूवर हस्त ठेवून पुढील मंत्र म्हणावयाचा:—

प्रेमा प्रेम्णेऽदात् प्रेमा दाता प्रेमा प्रतिगृहीता
प्रेम्णा त्वां प्रतिगृण्हामि । धर्मसिद्ध्यर्थं, सुख-
संपत्यर्थं कन्यां प्रतिगृण्हामि ।

म्हणजे, प्रेमानें प्रेमास दिली. प्रेम देणारें व प्रेम घेणारें. मी तुझा प्रेमानें स्वीकार करितों. धर्माच्या सिद्धीकरितां, सुखसंपत्तीकरितां, मी कन्येचा स्वीकार करितों. तदनंतर कन्यादात्यानें वरास अनुलक्षून म्हणावयाचें कीं,

ममवंशकुले जाता पालिता वत्सरान् बहून् ।
तुभ्यं विद्वन् मया दत्ता धर्मकामार्थसिद्धये ।
धर्मे चार्थे च कामे च नातिचरितव्या त्वयेयम् ।

म्हणजे, माझ्या वंशांत उत्पन्न झालेली, व कित्येक वर्षे जिचें मी पालन केलें अशी ही कन्या विद्वान् अशा आपल्याला धर्मकार्याच्या सिद्धीकरितां मी दिलेली, हिला आपण धर्म, अर्थ व काम ह्या तिन्ही पुरुषार्थांत सोडून वागूं नये. ह्यास वरानें **नातिचरामि ।** म्हणजे, इला सोडून मी वागणार नाहीं असें प्रतिवचन द्यावयाचें. ह्याप्रमाणें दात्यानें कन्यादान केल्यावर त्या शुभ कर्माच्या शाश्वतीकरितां ब्रम्हनिष्ठ अशा ब्राम्हास-वरास-दक्षिणा म्हणून कांहीं कांचन व संसारांत लागणाऱ्या वस्तु द्यावयाच्या; आणि त्याचा प्रतिग्रह करितांना वरानें पूर्वोक्त **ॐ स्वस्ति ।** म्हणावयाचें, म्हणजे कन्यादानविधि आटोपला. तदनंतर

सूत्रवेष्टन व कंकणबंधन.

सूत्रवेष्टन व कंकणबंधन—हीं दोन कृत्यें अनुक्रमें पुढें दर्शविल्याप्रमाणें करावयाचीं:—

कोरें दुहेरी पिवळें सूत घेऊन वधूवरांस समोरासमोर बसवून त्या सुताचे त्यांच्या कंठाशीं व कटीशीं चार किंवा पांच वेढे देऊन कन्यादात्यानें पुढील मंत्र म्हणावयाचा.

इहैव स्तं मा वियौष्टं विश्वमायुर्व्यश्नुतम् ॥
क्रीळंतौ पुत्रैर्नप्तृभिर्मोदमानौ स्वे गृहे ॥ १ ॥

म्हणजे, असेच तुम्ही रहा. परस्परांपासून वियुक्त होऊं नका. तुम्हांस दीर्घ आयुष्य प्राप्त होवो. आपल्या घरीं मुलें, नातवंडें, यांसह आनंदानें नांदा. हा मंत्र म्हणून झाल्यावर कंठाजवळील वेढे खालच्या बाजूनें पायांकडून, व कटीजवळील वरच्या बाजूनें मस्तकाकडून, न मोडतां काढावयाचे. इत्यर्थ हा कीं, त्या सूत्रपाशांतून उभयतांचीं सर्व शरीरें निघावीं; कारण उभयतां आतां एका पाशांत बद्ध झालीं, असें ह्या कृत्यानें दर्शवावयाचें आहे. नंतर

ीं कंकणें करून कंठाजवळच्या सुताचें कंकण प्रथ
तांत व नंतर कटीजवळच्या सूत्राचें कंकण वधूनें
धावें. हें कृत्य झाल्यावर **अक्षतारोपण** करावयाचें.
रफेरांशिवाय मंत्रानें पूर्वोक्त ब्राम्हणांच्या पद्धतीप्रमा
आहे. शिवाय, तें करावें किंवा करूंही नये, असा
असल्यानें आम्हीं त्याचा हवाला पूर्वी ५७-५८ व
आहे त्यावर सोंपून पुढें चालतों.

ंतुबंधन—वधूकरितां नूतन ... र कल
वरानें घेऊन वधूच्या ... , ...
पुढील मंत्र ह्मणावयाचा.

मांगल्यतंतुमेतं ते ममप्रेमनिबंधन...
कंठे बध्नामि सुभगे धर्मं चर मया ...

माझ्या प्रेमाचें निदर्शन, असा हा ... तुझ
ग्यवान् स्त्रिये ! मजबरोबर धर्माचरण

रण व मालारोपण—मंगलसूत्र बां
वराच्या कपाळास चंदनाचा व वर...
कुंकुमाचा तिलक करून एकमेकांनीं एक...
त्याच क्रमानें पुष्पमाला घालावयाच्या.

। व सप्तपदी—नंतर वरानें पुढील मंत्र
हात धरावयाचा.

गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तं मया प
दृष्टिर्यथासः ।

सौभाग्याकारणें तुझ्या हस्ताचें ग्रहण करितों; म
ाम तुला दीर्घकाळ पर्यंत होवो. ह्याप्रमाणें पाणि
बहुतेक ब्राम्हणांच्या पद्धतीप्रमाणेंच आहे. फर
ीति हें कृत्य वेदीवर होम झाल्यानंतर करावयाच

…ढा तांदळांच्या सात पुंज्यांवरून चालवावी असें अ… …योगामध्यें नाहीं. येथें तें वर सांगितल्याप्रमाणें प… …रावयाचें. होमाला अजीबात फांटा देण्यांत आला आहे… …ई ख्रिस्ती देवाळयांतील 'पुलपिटा' सारखा ह्मणजे अ… …रण्यासाठीं करावयाचा. सप्तपदींत तांदळांच्या निष्कारण… …आहे. वरासमागमें वधूनें जमीनीवरून सात पावलें चा… …चल्यास ब्राम्हणांच्या पद्धतींतील सात मंत्र (पहा–पान… …म्हणावयाचे ह्मणजे झालें. हें सप्तपदीचें कृत्य वरानें… …करावयाचें–

…चो सप्तपदा बभूव । सख्यं ते गमेयं । सख्यात्ते मा यो… …ख्ये मा योष्ठाः ।

…सात पावलें समागमें चालल्यानें आम्ही सखे (झाले… …नित्य साख्य करीन. तुझें सख्य कधीं सोडणार नाहीं. … सोडू नको.

…द हृदयं मम तदस्तु हृदयं तव ।
…हृदयं तव तदस्तु हृदयं मम ॥

…व्रते ते हृदयं दधातु मम चित्तमनु चित्तं तवास्तु… …वाचमेकमना जुषस्व धर्मादिहस्त्वा नियुनक्तु मा…

…जें माझें हृदय, तें तुझें होवो. हें जें तुझें हृदय … …ह्यामध्यें तुझें हृदय असो. माझ्या चित्तास अ… …माझा शब्द एकमनानें पाळ. धर्मवर्धक पर… …नियुक्त करो! ह्यास वधूनें ॐ तथा। म्हणजे 'होय… …ह्मणावयाचें.

…तल्याप्रमाणें सप्तपदीचा विधि आटोपला, ह्मणजे… …जोडप्यास वेदीशीं अभिमुख बसवून आचार्या… …सांगितल्याप्रमाणें उपदेश करावयाचा:–

वधूवरांस सर्व साधारण उपदेशः—" आज आह्मां सर्वांचा निर्मिता, ह्या विशाल विश्वाचें शासन करणारा, सर्वज्ञ, अन्तर्यामी, सर्वांस पूज्य, जो आमचीं हीं सर्व कृत्यें पहात आहे, आह्मीं उच्चारिलेले शब्द ऐकत आहे, त्याच्या साक्षीनें तुह्मीं उभयतांनी परस्परांशीं फार थोर अशा प्रतिज्ञा केल्या आहेत. त्या वज्रलेपाप्रमाणें तुमच्या आत्म्यास आतां जडल्या. ह्मणून, आतां तुह्मी विवाहरूप परम दृढ पाशानें परस्परांशी बद्ध झालां. इतके दिवस आपआपल्याच उन्नतीकडे दृष्टि ठेवून एक-एकटेच जीवनमार्गी गमन करीत होतां. या क्षणीं तुमच्या परस्पर संबंधानें उत्पन्न झालेला अत्यंत मोठा भार तुह्मांवर आला आहे. आज तुम्हीं संसाररूप सोपानाच्या पहिल्या पायरीवर पाऊल टाकीत आहां. सावधान होऊन पुढें चढा. ह्या संसाराचा सकल मार्ग अति दुर्गम आहे. ह्याच्या ठायीं नानाविध मोहपाश आहेत. याच्या ठायीं अनेक विघ्नें आहेत. अनेक विपत्ति येण्याचा संभव आहे. तेव्हां संसारांतील मोहपाशांमध्यें गुतून पडणार नाहीं, व त्यांतील सुखसंपत्तीस भुलून सर्वसुखदात्या परमेश्वरास विसरणार नाहीं, याविषयीं सावध असा. सत्यस्वरूप जो मंगलविधाता परमात्मा, त्यावर संपूर्ण भरंवसा ठेवून परस्परांची उन्नति साधणें, व सुखाची वृद्धि करणें, याविषयीं यत्न करीत रहा. यावद् गृहकर्मे ईश्वराची प्रिय कार्ये आहेत, असें समजून तीं सिद्धीस न्या; आणि ब्राम्हधर्माचा हा पुढील उपदेश सर्वदा हृदयाच्या ठायी जागृत ठेवा.—

विशिष्ट धर्मोपदेशः—

ब्रह्मनिष्ठो गृहस्थः स्यात्तत्त्वज्ञानपरायणः।
यद्यत्कर्म प्रकुर्वीत तद् ब्रह्मणि समर्पयेत् ॥

गृहस्थानें ईश्वरनिष्ठ असावें. तत्वज्ञान प्राप्त करून घेण्याविषयीं तत्पर असावें, आणि जें जें कर्तव्य कर्म आचरावयाचें तें ईश्वरास स्मरून करावें.

विशिष्ट धर्मोपदेश.

तुमचें जें कांहीं असेल, तें सर्व त्याजला अर्पण करा. तो रोग, शोक, भय, विपत्ति, पाप आणि ताप, यांतून तुमचा उद्धार करील. [वरास उद्देशून] हे अमुक, तुम्हीं नेमानें आपल्या पत्नीचें कल्याण साधण्याविषयीं सर्वदा यत्न करीत रहा. आज जगदीश्वरानें तुमच्या हातीं हें अमूल्य रत्न दिलें आहे. ह्याचें आदरानें व आस्थेनें परिपालन करा. इंद्रियनिग्रही व सत्कर्मशील व्हा; आणि संसारांतील सर्व अवस्थांमध्यें शांतचित्त असे रहा. ज्याप्रमाणें आपल्या आत्म्याचें रक्षण करण्याविषयीं व उन्नति करण्याविषयीं तुम्ही उद्योग कराल, त्याचप्रमाणें आपल्या पत्नीच्या आत्म्यासही पवित्र धर्माच्या मार्गी उन्नत करण्याचा उद्योग करा. उपदेश, व त्याप्रमाणें स्वतःचें आचरण यांच्या योगें संसारांतील शुभकार्यांचे ठायीं ती नेमानें प्रवृत्त राहील असे करा; आणि सत्याच्या मार्गी, धर्माच्या मार्गी, मंगलाच्या मार्गी, तिनें तुमची सहचरी व्हावें असें करा. [वधूस उद्देशून] अमके बाई, जेणें करून तुमच्या पतीचें शुभ होईल, असें कर्म कायावाचामनेंकरून तुम्हीं करा; त्याजवर एकनिष्ठेने प्रेम करा, आणि तुमच्या हिताकारणें जी आज्ञा ते करितील, ती तुम्ही पाळा. आपल्या पतीवर आपला प्राण ठेवा, आणि सदाचारी व्हा. आपलें मन, वचन व कर्म परिशुद्ध ठेवा, आणि पतीच्या साहाय्यानें आत्म्याच्या उन्नतीविषयीं [illegible] करा.

ॐ शान्तिः शान्तिः शान्तिः [illegible]

ॐ य एकोऽवर्णो बहुधा शक्तियोगाद्वर्णाननेकान्निहितार्थो दधाति ।
विचैति चान्ते विश्वमादौ स देवः स नो बुद्ध्या शुभया संयुनक्तु ॥

म्हणजे, जो एक व वर्णहीन होत्साता सृष्टीच्या प्रयोजनाकारणें आपल्या शक्तियोगानें विविध वस्तु निर्माण करीत आहे, व ब्रह्मांड आद्यंतसहित जो व्यापून राहिला आहे, तो दैदीप्यमान् परमेश्वर आहे. तो आम्हांस शुभ बुद्धि अर्पण करो.

सत्यमेव जयते नानृतम् । सत्येन पंथा विततो देवयानैः ॥
येनाक्रमन्त्यृषयो ह्याप्तकामा । यत्र तत्सत्यस्य परमं निधानम् ॥

म्हणजे, सत्यच जय पावतें, असत्य नाहीं. सत्य हें देवाकडे जावयाचा मार्ग तयार करितें. त्या मार्गानें ऋषि गेले, आणि त्यांचे सर्व मनोरथ सिद्धीस पावले, आणि सत्याचें परमस्थान जें, त्याच्याठायीं ते जाऊन पोंचले.

ह्याप्रमाणें उपदेश श्रवण केल्यानंतर दंपतींनीं ईश्वराच्या ठिकाणीं मन लावून त्यास प्रणिपात करावयाचा, व आचार्यांनीं त्या उभयतांस आशीर्वाद द्यावयाचा तो असाः—"करुणामय परमेश्वर तुमचें कल्याण करो! आणि तुम्हांस आनंदमय व शाश्वत असें जें आपलें धाम, त्याचे अधिकारी करो!

ॐ एकमेवाद्वितीयम् ।

वधूप्रवेश.

वरील सर्व कृत्य आटोपल्यावर वरगृहीं मोठ्या समारंभानें वधूप्रवेश करावयाचा; व तेथें वधूवरें, आचार्य, आणि इष्टजन यांनीं एकत्र बसून पुढें सांगितल्याप्रमाणें **गृहप्रवेशनीय उपासना** व प्रार्थना करावयाची. ही गृहप्रवेशनीय उपासना ब्राम्हणांच्या पद्धतींतील गृहप्रवेशनीय होमाच्या ऐवजीं ठेविलेली दिसते.

गृहप्रवेशनीय उपासना.

गृहप्रवेशनीय उपासनाः—हे जगञ्चालक परमेश्वर! आम्हीं आज तुझ्याच योजनेनें ह्या गृहस्थाश्रमाचा स्वीकार केला आहे. सर्वकाळ तुझें स्मरण ठेवून आपलीं संसारांतील कृत्यें यथायोग्य रीतीनें करण्यास आह्मीं समर्थ होऊं, अशी तूं आह्मांस बुद्धि दे. तुझी सेवा आह्मां उभयतांकडून सदा घडूं दे, आणि सर्वदां तुझी इच्छा प्रमाण मानून तिजप्रमाणें चालण्याचें आह्मांस सामर्थ्य दे. आमचें उभयतांचें चित्त सर्वदा परस्परांस अनुकूल असो, आणि धर्माचरणांत एकमेकांस परस्परांचें साहाय्य होवो!

सूचना.

यापुढें प्रत्येक दिवशीं निदान एकवेळ तरी पतिपत्नींनीं मिळून परमेश्वराची आराधना करीत जावी, अशी सदरहु समाजाच्या अध्वर्यूंनीं ह्या ठिकाणीं आपली सूचना केली आहे. असो.

शेवटीं आचार्यांनीं वधूवरांस आशीर्वाद करावयाचा तो असाः—

आशीर्वादरीति.

सर्वशक्तिमान् परमेश्वर आपणा उभयतांच्या सदिच्छा पूर्ण करो ! व आपलें आचरण इतर जनांस अनुकरणीय होऊन मंगल-कृत्यांची अभिवृद्धि होवो ! पापाचा नाश होवो ! पुण्याची वृद्धि असो !

ॐ एकमेवाद्वितीयम् ।

शांतिः शांतिः शांतिः ।

शेणवी लोकांचा लग्नविधि.

सामान्य माहिती.

शेणवई अथवा **शेणवी** हे उच्च वर्गाचे हिंदू होत. ते आपणांस **सारस्वत ब्राह्मण** असें ह्मणवितात. कोंकणपट्टी आणि कानड्याचा कांहीं भाग हीं ह्या लोकांचीं मूळ वसतिस्थानें होत. तथापि, रोजगारधंद्याच्या संबंधानें हे लोक हिंदुस्थानाच्या निरनिराळ्या भागांतून पिढीजादे स्थायिक झाले आहेत. कायस्थ परभू आणि हे लोक मोठे चतुर, व कलमकसबी असल्यानें एके समयीं राज्यकारभारांत ह्यांचें प्राबल्य विशेष होतें. ह्यांची बहुतेक रहणी दक्षिणी ब्राह्मणांप्रमाणेंच असते. ह्या जातींत वरास वरदक्षिणा अथवा हुंडा फार द्यावा लागतो. तसेंच नाना प्रकारच्या श्रीमंती सोहळ्यांनीं लग्नास खर्चही अतिशय येतो. ह्या कारणांस्तव पुष्कळ मुली वयांत आल्या असतांही त्यांस अविवाहित दशेंत राहणें अथवा ठेवणें भाग पडतें! ह्यांच्या लग्नांतील धार्मिक विधि हे मागें सांगितलेल्या ब्राह्मणांच्या धार्मिक विधीप्रमाणेंच आहेत. तथापि, सोहळे बऱ्याच अंशीं भिन्न असून विधीपेक्षां त्यांचेंच प्राबल्य विशेष असल्यानें लग्नरीतींत जागोजाग फेरफार आढळून येतात. आतां, हे फेरफार भागशः सांगत बसण्यापेक्षां साद्यंत लग्नरीति* देणेंच सोइस्कर होईल असें वाटल्यावरून आम्हीं तसें करीत आहोंत.

---

* ही लग्नरीति आम्हीं कानडा जिल्ह्याच्या गॅझीटियरांतून घेतली आहे. सबब, ती विश्वसनीय मानण्यास हरकत दिसत नाहीं. आतां, ही रीति कदाचित् तद्देशीय शेणव्यांची असून मुंबई वगैरे ठिकाणच्या त्यांच्या ज्ञातिबांधवांच्या चालीरीतीहून कांचित् भिन्न असेल, पण त्यास उपाय नाहीं. आह्मांस वेळेवर जी मिळाली ती घेतली आहे.

वधूवरांच्या पत्रिका मिळाल्या, आणि वरदक्षिणा व स्त्रीधन ह्या भानगडींच्या गोष्टींचा निकाल झाला, म्हणजे एके दिवशीं सायंकालीं सुमुहूर्तानें वराचीं मातापितरें आपल्या समागमें उपाध्याय व इष्टमित्र मंडळी घेऊन वधूच्या घरीं जातात; व तिच्या अंगावर पुष्पमाळा व अलंकार घालून **सोयरीक** करितात. अर्थात् ही सोयरीक औपचारिक होय. वस्तुतः ती ह्या पूर्वीच ठरून चुकलेली असते. सोयरीक करण्यासाठीं आलेल्या सर्व मंडळीस कन्यापक्षाकडून घारगे अथवा गोडवडे ह्यांचा फराळ घालण्यांत येतो. सोयरीक केल्यापासून लग्न अमुक एका मुदतीत केलेच पाहिजे असें नाहीं.

सोयरीक करणें.

लग्नमुहूर्त ठरविण्यांत आल्यावर उभयपक्षांकडे मंडप घालण्यांत येतो. त्यासाठीं १० पासून २०० रुपयांपर्यंत खर्च करितात. मुलीच्या मंडपाच्या मध्यभागीं पूर्वाभिमुख असें बहुलें घालितात. मंडप तयार झाल्यावर त्याच्या आग्नेय कोणांत उपाध्याय किंवा जोशी यांहीं सांगितलेल्या सुमुहूर्तावर **मेढी** रोंवितात. मेढीच्या शिरोभागीं असोले नारळ व आंब्याचे डहाळे बांधितात. मेढी रोंविल्यापासून लग्नाच्या आदले दिवसापर्यंत वधूवरांस आपापल्या इष्टमित्रांकडून मेजवान्या—गडगनेर—देण्यांत येतात. लग्नचिठ्ठया पाठविण्याचा रिवाज आहे. लग्नाच्या पूर्वदिवशीं उभयपक्षीं **देवकार्य** करण्यांत येतें; व त्याचा उद्देश, कुलदेवतेचा प्रसाद व्हावा असा आहे. तसेंच गणपतीच्या प्रीत्यर्थ उडीद दळण्यांत येतात. **उडीदमुहूर्त** करावयाचा म्हणजे एका केळीच्या पानावर गणपतीची यथाविधि पूजा करून त्यापुढें १ नारळ, २ सुपाऱ्या, २ पानें, दक्षिणा व अक्षत ठेवितात. ही पूजा घरांतील वडील मनुष्य करितो. गणपतीपुढील बाबत उपाध्यायास देतात. नंतर देवकाजवळ जातें मांडून व त्यास आम्रपल्लव बांधून त्यांत वधूच्या किंवा वराच्या साहाय्यानें सुवासिनी स्त्रिया उडीद दळितात.

मंडप व बहुलें घालणें, मेढी रोंवणें, देवकार्य, व उडीद मुहूर्त.

शेंवतीपूजन.

देवकार्याच्या दिवशीं सायंकालीं नवरामुलगा आपले उपाध्याय व इष्ट-मित्र यांसह मोठ्या थाटानें मिरवत मिरवत गांवाच्या सीमे-पलीकडे जातो. तेथें वधूपक्षही तसाच मिरवत येतो. वरपक्ष परगांवचा असल्यास तो लग्नापूर्वी येऊन वधूच्या गांवानजीक उतरतो. नंतर तेथें वधूपक्षानें घातलेल्या **चटयांच्या** बिछायतीवर दोन्हीकडील मंडळी बसतात. कन्यापिता वराचे पाय धुवून, त्यास चंदन व अत्तर लावितो, व कपाळीं तांबड्या अक्षता लावून त्यास मिरवत मिरवत जानवसवरीं नेतो. तेथें वरपक्षास मिठाई व पानसुपारी देण्यांत येते.

हळद, मातृका पूजन, देवप्रतिष्ठा, नांदीश्राद्ध, व ग्रहयज्ञ.

लग्नदिवशीं प्रातःकालीं नवरानवरीकडे मंगलवाद्यें वाजत असतां त्यांस तेल व **हळद** लावून उष्णोदकानें स्नान घालितात. नंतर उपाध्याय तांदळांच्या चार राशी घालून त्यांवर अविघ्नगण-पति, ऋद्धि, सिद्धि आणि वरुण ह्यांचें आवाहन व यथाविधि पूजन करितात. त्यानंतर **मातृकापूजन देव-प्रतिष्ठा, नांदीश्राद्ध, ग्रहयज्ञ** हे विधि ब्राह्मणांप्रमाणेंच करण्यांत येतात. मातृकांपुढें नारळ, पानें, बांगड्या, लांकडी फणी, काजळ कुंकू व हळद ह्यांचे तीन करंडे, आणि एक वस्त्र, ह्याप्रमाणें सौभाग्यवायन ठेवितात; आणि नांदीश्राद्धांत नऊ पितरांच्या नांवांनीं नऊ ब्राह्मणांस अन्नदान कर-ण्यांत येतें.

वरप्रस्थान, जामातसत्कार पत्रिकापूजन वधूवर्णन व लग्न.

लग्नमुहूर्तापूर्वी नवरामुलगा सुंदर वस्त्रें परिधान करून, खांद्यावरून शेल्याचे सोगे टाकून व डोक्यास **बाशिंग** बांधून मोठ्या समारंभानें मिरवत मिरवत वधूगृहीं लग्नास जातो. मिरवणुकी-पुढें वारांगना नाचत चालतात. लग्नसोहळा संपेपर्यंत निरनिराळ्या प्रसंगीं ह्यांचें नृत्य करविण्यांत येतें. लग्नाला जातांना वरमाता आपल्या हातीं पंचारती* घेऊन जाते. ही पंचारती देवक

---

* शकुनदिवा.

बसविल्यापासून त्यापुढें जळत ठेविलेली असते. मिरवणूक वधूच्या मांडवाशीं येतांच कन्येचीं मातापितरें वराचें स्वागत करितात. कन्यापिता पीतांबर नेसून वराचे पाय धुतो; व कन्येची माता एका ताटांत दीप व कुंकुमोदक घालून तें वरावरून ओंवाळिते. मग सासरा जांवयास आपल्या उजव्या हातीं धरून मंडपांत नेऊन चौरंगावर बसवितो. तेथें त्याचें पुन्हां पादप्रक्षालन करण्यांत येतें. सासू त्याच्या पायांवर पाण्याची धार धरिते, व सासरा त्याचे पाय चोळून धुतो. नंतर त्यास चंदनाची उटी लावितात; व उंची वस्त्रें परिधान करवून त्यांवर गुलाबपाणी शिंपडितात. **ज्येष्ठ जामात** असल्यास सासरा त्यांचाही वराप्रमाणेंच सत्कार करून त्यांस पोषाक देतो. नंतर उभयतां व्याही वधूमंडपांत **पत्रिकापूजन** करितात. तें झाल्यावर वरापुढें पांढऱ्या वस्त्राचा अंतःपट धरून लग्न लावण्याची तयारी करितात. मुलीचा मामा मुलीस कडेवर घेऊन किंवा हातीं धरून आणितो, व तिला अंतःपटापलीकडे नवऱ्याच्या सन्मुख बसवितो. वधूला पिंवळ्या वस्त्राचा परकर नेसविलेला असतो. त्यास कंबरेभोंवती त्याच रंगाची झालर लाविलेली असते. चोळीही पिंवळ्या रंगाची असून तिच्यावरून गळ्याभोंवती एक पांढऱ्या रंगाचें वस्त्र उपरण्याप्रमाणें गुंडाळून त्याचे सोगे पुढें सोडिलेले असतात. (हीं वस्त्रें लग्नाच्या चौथ्या दिवशीं मुलीस साडी मिळाल्यावर उपाध्यायास देतात. असो.) केशकलाप नानाप्रकारच्या सुवर्णालंकारांनीं व फुलांच्या जाळीनें फार शोभिवंत केलेला असतो. कपाळास 'तोंडला' म्हणजे *बाशिंग बांधिलेलें असतें. ह्याप्रमाणें वस्त्रालंकारमंडित वधू वरासमोर आणून बसविल्यावर उपाध्याय व जोशी त्यांचें लग्न लावितात. त्याचा प्रकार मागें ब्राह्मणांच्या पद्धतींत सांगितल्याप्रमाणेंच समजावा.

---

* वधूचा हा वेश कांहीं चमत्कारिकच आहे. कानड्यांतील शेणवी वधू तो धारण करीत असेल, परंतु एतद्देशीय शेणव्यांत हीच रीत आहे किंवा कसें ह्याविषयीं आह्मांस संशय वाटतो. तसेंच लग्नसमयीं वधूस बसविणें, आणि वधूवरांस बाशिंग बांधणें, हे रिवाजही एतद्देशीय शेणव्यांत असतील असें वाटत नाहीं. त्यांच्या बहुतेक चालीरीति ब्राह्मणांप्रमाणेंच आहेत.

कन्यादान, कंकणबंधन, लाजाहोम, सप्तपदी शेषारती, लोकसत्कार, वगैरे.

कन्यादान ब्राम्हणांप्रमाणेंच असतें. मात्र तें करून भांड्यांत जें अवशिष्ट उदक राहील तें एखाद्या नारळाच्या बुंधाशीं सोडितात. अर्थात् तें नारळाचें झाड कन्येबरोबर जांवयास दान केलें जातें. **कंकणबंधन**ही ब्राम्हणांप्रमाणेंच असतें, व तें झाल्यावर वधू अथवा वर ह्यांच्या आप्तांतील कोणी मृत झालें, तरी त्याचें सूतक वधूला किंवा वराला येत नाहीं; आणि ह्याच उद्देशानें कंकणबंधन करावयाचें, असें हे लोक समजतात. लाजाहोमांत लाह्या, पळसाच्या समिधा, चंदनाचें लांकूड, व तूप ह्यांचीं अवदानें देतात. **सप्तपदी** ब्राम्हणांप्रमाणेंच आहे. ती झाल्यावर सुवासिनी स्त्रिया वधूवरांस औक्षण करितात, त्यास **शेषारती** अशी संज्ञा आहे. लग्नासाठीं आलेल्या मंडळींचा सत्कार चंदनी अत्तर, गंध, चंदनाची मुकी, गुलाबपाणी, केळीं, साकर, आणि पानसुपारी इत्यादि द्रव्यांनीं करण्यांत येतो. तो झाल्यावर नवरामुलगा देवप्रतिष्ठेजवळ ‘ तलाव ’ ह्या संज्ञेची एक चौकोनी रांगोळी घातलेली असते, त्या रांगोळींत आपलें बाशिंग काढून ठेवितो. लग्नदिवशीं सर्व मंडळी आपापल्या घरीं गेल्यावर नवरा सासुरवाडीसच राहतो. त्याच्या समागमें त्याचे समवयस्क मित्र असतात, व एक चाकर असतो. त्याला ‘ घेडो ’ अशी संज्ञा आहे. लग्नानंतर तीन रात्रींपर्यंत वधूवरें बाशिंगाजवळ वर सांगितलेल्या ‘ तलावा ’ मध्यें निजतात.

वधूवरांच्या मंगल स्नानाचा प्रकार, व कन्यादानसमाराधना.

दुसऱ्या दिवशीं प्रातःकालीं दोन्ही मंडपांत सुमारें एक तासपर्यंत वाजंत्री मंगलवाद्यें वाजवितात. मुलीचीं मातापितरें आपल्या इष्टमित्रांसह वाजत गाजत वरपक्षाकडे भोजनाचें निमंत्रण करण्यास जातात. गांवांत जातिबांधवांसही निमंत्रण करण्यांत येतें. वरपक्षाची मंडळी आल्यावर नवरानवरीस बहुल्यावर बसवितात. नवऱ्यानें ह्यासमयीं बाशिंग चढविलेलें असतें. मग सुवासिनी त्यां जोडप्यावर अक्षत टाकून त्यांस औक्षण करितात. नंतर नवऱ्याकडून त्याचें बाशिंग काढवून त्याला आणि

नवरीला जवळ जवळ मांडिलेल्या चौरंगावर बसवून सुवासिनी त्यांच्या अंगास खोबऱ्याच्या तेलांत भिजविलेली हळद लावितात. नवरा-नवरीच्या मध्यभागीं हळदीच्या पाण्यानें भरलेलें एक मोठें गंगाळें ठेवितात. त्यांत नवरा आपला डावा हात आणि नवरी आपला उजवा हात बुडवून ठेविते. मग उपाध्याय नवऱ्यामुलाची सोन्याची आंगठी व एक सुपारी आपल्या उजव्या हातीं घेऊन तो हात त्या गंगाळ्यावर धरितो, व त्या दोन्ही वस्तु त्यांत एकदम टाकून देतो. असें होतांच नवरानवरीमध्यें आंगठी घेण्याची झटपट लागते. नवऱ्याच्या हातीं आंगठी लागली, तर नवरी सुपारी घेते; व ती जर नवरीच्या हाती लागली तर नवरा सुपारी घेतो. मग ती आंगठी व सुपारी फिरून उपाध्यायास देतात, आणि तो वरील प्रकार आणखी दोन वेळां किंवा चार वेळां करितो. शेवटच्या खेपेस आंगठी नवरीच्या हातीं लागल्यास ती तिनें जिंकली असें समजून आपल्या बोटांत घालावी; आणि असा प्रकार झाल्यास मौज पहाणारी मंडळी नवरीची मोठी तारीफ करितात. वरील खेळ आटोपल्यावर नवरानवरी एकमेकांच्या अंगांवर गंगाळ्यांतील पाण्याच्या गुळण्या टाकितात. कांहीं वेळानें नवरीचा भाऊ तिला उठवून देतो, व तिच्याजागीं आपण बसून मेहुण्यावर गुळण्या टाकितो.* नवरी घरांत जाऊन एखाद्या खांबाला घट्ट मिठी मारून उभी राहते. इकडे उभयतां मेहुण्यांची बराच वेळ जलक्रीडा होऊन अखेरीस दोघांतून कोणी तरी हार घेतो. मग नवरा तसाच घरांत जाऊन नवरीला स्नानासाठीं जबरदस्तीनें ओढून आणितो; व त्या उभयतांस सुवासिनी स्त्रिया उष्णोदकानें मंगलस्नान घालितात. तें झाल्यावर कन्येच्या घरीं **कन्यादानसमाराधना** म्हणून एक मोठी मेजवानी होते.

---

* अशा प्रसंगीं नवरीच्या जागीं तिच्या भावानें बसण्याची चाल इतर कोणत्याही जातींत आढळत नाहीं. परंतु ती ह्याच लोकांत सामान्यजनरुचिविरुद्ध असलेली आम्हीं ऐकतों! स्त्रीपुरुषांच्या जलक्रीडेंत जें एकप्रकारचें स्वारस्य व मौज आहे, ती केवळ पुरुषांच्या जलक्रीडेंत नाहीं. 'भिन्नरुचिर्हि लोकः' म्हणून महाकवींनीं म्हटलें आहे तें खरेंच!

चार दिवसपर्यंत प्रत्यहीं सायंकाळीं **सुपारीखेळ** खेळण्याची चाल आहे. नवरीचा पक्ष नवरीस घेऊन नवऱ्यासमोर बसतो. दोघांच्या जवळ सुपाऱ्यांच्या राशी घातलेल्या असतात. त्यांतून ते एकीबेकी खेळतात. त्यांचा खेळ चालला असतां त्यांच्या पक्षकारांकडून त्यांस प्रोत्साहनें व शाबासक्या मिळत असतात. दोघांतून कोणी तरी सगळ्या सुपाऱ्या जिंकल्या म्हणजे खेळ आटोपतो. पुढें **विड्या** तोडण्याचा सोहळा ब्राम्हणांप्रमाणेंच होतो. मात्र नवऱ्याच्या तोंडांत नवरीनें विड्या द्यावयाच्या येवढें जास्त आहे. गुळाच्या सुकविलेल्या कांड्या विड्या म्हणून तोडण्याची चाल आहे. विड्या पांचवेळां तोडितात. शेवटीं नवरा सर्व प्रकारच्या विड्या नवरीचें तोंड धरून त्यांत घालितो. सुपारी लपविण्याचा खेळ ब्राम्हणांप्रमाणेंच होतो. तो झाल्यावर नवऱ्यास बाशिंग चढवून नवरीशेजारीं बसवून त्या उभयतांस औक्षण करितात. रात्रीं आठ वाजतां वरपक्षाच्या करमणुकीसाठीं त्यांस नाच देण्यांत येतो. कलावंतिणी ताल सुरावर गाऊन नृत्य करितात व त्यांना कन्यापित्याकडून जी बिदागी देण्यांत येते तिच्या शिवाय श्रोतेमंडळींतूनही 'दौलतजादा' ह्मणून बक्षिसें देण्यांत येतात.

सुपारीखेळ, विड्या तोडण्याचा प्रकार, औक्षण व नृत्यगति.

तिसऱ्या दिवशीं दुसऱ्या दिवसाचीं कृत्यें व करमणुकी ह्यांची पुनरावृत्ति होते. ह्या दिवशीं कन्येकडे जी जेवणावळ होते, तिला कन्यादानसमाराधना ह्मणत नाहींत. ती एक नुसती मेजवानी असते. ती चालू असतां, किंवा ती झाल्यावर जांवईबोवा कांहीं तरी कुसपट काढून वधूपक्षावर रुसून आपले मित्र व नोकर ह्यांच्यासह मोठ्या तोऱ्यानें एखाद्या देवळांत किंवा स्नेह्याच्या घरीं जाऊन बसतात. त्यांच्या मागून लागलीच त्यांचे मेहुणे येतात, व "काय झालें? कां रुसून आलां तें आह्मांला सांगा ह्मणजे आम्ही कांहीं तोड काढितों, पण घरी परत चला!" इत्यादि नाना प्रका-

जांवयाचा रुसवा व त्यांची समजूत घालण्याची मासलेवाईक चाल.

रांनीं त्यांच्या विनवण्या करितात. मग जांवईबोवा परत येण्याचें कबूल करितात. पण केव्हां? तर त्यांच्या मेहुण्या व मेहुणे आपआपल्या नवऱ्यांसह व बायकांसह पदरांस गांठी मारून मेवामिठाई घेऊन वाजत गाजत त्यांस बोलावूं येतील तेव्हां! मग ह्या अटीप्रमाणें वधूपक्षाकडून सर्व व्यवस्था करण्यांत येते. मेहुण्या व मेहुणे ह्यांचीं जोडपीं मोठ्या समारंभानिशी आलीं, ह्मणजे कलावंतिणीचें नृत्यगीत सुरू होतें. तें झाल्यावर सर्वांचे फराळ होतात. नंतर मेहुण्या व मेहुणे जांवयाजवळ येऊन त्यांना घरीं परत चलण्याविषयीं मोठ्या प्रेमानें विनंति करितात. सर्वांत मोठा मेहुणा आपली बायको डाव्या बाजूस घेऊन जांवईबोवांचा एक हात धरितो, व सर्वांत वडील मेहुणी आपला नवरा उजवीकडे घेऊन जांवयाचा दुसरा हात धरिते. अशारीतीनें दोन्ही जोडप्यांच्या मध्यभागीं होत्साते जांवई मोठ्या थाटानें मिरवत मिरवत सासुरवाडीस परत येतात! ही चाल कांहीं मासलेवाईकच आहे. असो. घरीं आल्यावर नवरानवरीस जोडप्यानें बसवून सुवासिनी त्यांच्या कपाळीं अक्षता लावितात, व त्यांस औक्षण करितात. नंतर वर सांगितल्याप्रमाणें खेळ होतात.

वधूवरांचें मंगलस्नान व ऐरिणीदान.

चवथ्या दिवशीं सकाळीं वाद्यें वाजत असतां नवरानवरीस हळदीच्या पाण्यानें मंगलस्नान घालितात. नंतर नऊ दहा वाजतां वरमाता वधूगृहीं येते. तिच्याबरोबर बायका, मुलें, नाचणारणी, चाकरमाणसें, वगैरे लोकांचा समुदाय असतो. एका चाकरानें सोळा सुपल्या, विड्याचीं पानें, सुपाऱ्या, नारळें व खण आणिलेले असतात. ही मंडळी आल्यावर नवरानवरीस मंडपांत पाटावर बसवितात. त्यांच्या जवळ कन्येचीं मातापितरें आणि वरमाताही बसते. मग उपाध्याय तांदुळांच्या राशीवर सुपाऱ्या मांडून त्यांवर गणपतिवरुणाचें आवाहन करून त्यांची पूजा करितो. देवापुढें रौप्यदक्षिणा ठेवण्यांत येते; व ती सर्व बाबत उपाध्यायास देतात. हें झाल्यावर ऐरिणीदानाचा विधि होतो. त्यांतील बहुतेक कृत्यें ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणेंच आहेत. तथापि, जो कांहीं फेरफार आढळून आला, तो खालीं देत आहोंत.

बायनदानांची रीति, पोषाक वगैरे.

कन्येच्या मातापितरांनीं वरमातेस रीतीप्रमाणें ऐरिणी दान केल्यानंतर उपाध्याय थोडेसें मीठ व गहूं घेऊन ते जमिनीवर पसरितो; व त्यांत आपल्या बोटानें हत्तींच्या दोन आकृती काढितो. ह्या दोन हत्तीपैकीं एक वधूचा व दुसरा वराचा असतो. नवरा आपल्या हत्तीवर यथाशक्ति एक वस्त्र ठेवितो, आणि नवरी आपल्या हत्तीवर खण ठेविते. नंतर तीं दोघें आपापल्या हत्तीवर उभीं रहातात. मग वधूचा भाऊ ऐरिणीजवळील सोळा सुपल्यांतून प्रत्येकीं एकेक खण, नारळ, दोन पानें, एक सुपारी, व यथाशक्ति रौप्यदक्षिणा ठेवून तीं वायनें समृद्ध करितो. नंतर तीं वायनें नवरी श्रीमहालक्ष्मीच्या प्रीत्यर्थ सासूबाई सांगतील त्या त्या सुवासिनींस देते. ह्या सुवासिनी नवरी उभी असते तेथें क्रमानें येतात, व ती त्यांस हळदीकुंकू लावून वायनें देते. नंतर नृत्यगीत चालू असतां उभयपक्षीं पोषाक व मानपानाच्या देणग्या देण्यांत येतात. त्या दिल्यावर वरपक्षाची मंडळी आपल्या घरीं जातात.

वधूकडे फराळाच्या पंगती, नारळें वाटणें, पदर देणें, नवरीस लपवून शोधून काढणें, आणि दांडाच्या वेलीशेज.

ह्या दिवशीं उभयपक्षांकडे मेजवान्या होतात. दुपारीं एक वाजण्याच्या सुमारास वराकडून वधूकडे मोठ्या थाटानें मिठाई, फळफळावळ, पानसुपारी, केळीचीं पानें, साकर, व लोणी हे पदार्थ पाठविण्यांत येतात; आणि ज्ञातिबांधवांना फराळ घालण्याविषयीं वधूपक्षास विनंति करण्यांत येते. सायंकाळीं चार वाजतां वराचीं मातापितरें व तत्पक्षीय मनुष्यें, मिरवत मिरवत वधूगृहीं येतात. नंतर पानें वाढून जमलेल्या ज्ञातिबांधवांस फराळ घालितात. पुढें सहा वाजल्यावर वधूवरांचे वर सांगितप्रमाणें खेळ होतात. मग वरपक्षाची मंडळी परत घरीं जाऊन फराळ करून कित्येक लोकांसह वधूगृहीं मिरवत येतात, आणि तेथें आपल्याबरोबर आलेल्या लोकांस फराळ घालितात. ह्यासमयीं वधूपक्षाची मंडळी फराळास बसत नाहींत. तसें करण्यास ते पुष्कळ आढेवेढे घेतात. परंतु शेवटीं वरपक्षाच्या

अत्यंत आग्रहास्तव त्यांच्या ह्मणण्यास त्यांना मान द्यावा लागतो. फराळ झाल्यावर नवरा आपलें बाशिंग चढवून नवरीसह मंडपांत बसतो. सुवासिनी त्यांच्या कपाळीं अक्षता लावून त्यांस औक्षण करितात. मंडपाच्या एका कोंपऱ्यांत एका मोठ्या हाऱ्यामध्यें पुष्कळशीं नारळें ठेविलेलीं असतात, व त्यांच्या शिरोभागीं पांच वातींचा दिवा–जो मागें **शकुनदिवा** ह्मणून सांगितला आहे, व जो प्रथमदिवशीं वरमाता आपल्या बरोबर घेऊन आली होती, तो–ठेवण्यांत येतो. मग नवरी तीं नारळें प्रथमतः ज्यांचे सासूसासरे जीवमान आहेत अशा सुवासिनींस, आणि नंतर सरसकट सर्व सुवासिनींना वाटून देते. नारळें वाटल्यावर त्या स्त्रिया नवरीला पदर देऊन तिचा कासोटा घालितात. हें कृत्य होत असतां नवरा कांहीं तरी सबब काढून मांडवांतून निघून जातो, व कांहीं वेळपर्यंत परत येत नाहीं. इकडे नवरीकडील मंडळी तिला घरांत एखाद्या गुप्त जागीं नेऊन लपवून ठेवितात. जांवईबोवा मांडवांत परत आले, म्हणजे त्यांचा सासरा त्यांस सांगतो–" अहो ! आमची मुलगी इतक्यांत कोठें हरवली ! तिला आपण कसेंही करून शोधून आणा ! " मग जांवईबोवा आणि त्यांचा एखादा सौंगडी आपल्या हातीं तो शकुनदिवा घेऊन सर्व घरभर तिला शोधीत फिरतात. ते ह्या शोधांत असतां सासऱ्याच्या घरांतील कित्येक अल्पस्वल्प किंमतीच्या वस्तु लूट समजून घेतात ! नवरीला पाहून काढिली, म्हणजे नवरानवरी परत मांडवांत येतात. पण तीं दोघें आपल्या जागीं जाऊन पोहोंचण्यापूर्वी वराची बहीण त्यांना अडवून धरिते; आणि " तुम्ही आपली मुलगी माझ्या मुलाला देण्याचें वचन द्याल, तर जाऊं देईन " अशी त्यांस अट घालिते. तिची समजूत केल्यावर वधूवरांस मांडवाबाहेर एखाद्या दालनांत केळीच्या पानांवर बसवितात, व त्यांच्या समागमें दहा जोडपीं पदरांस गांठी मारून बसविण्यांत येतात. नंतर घरांतील व इतर सुवासिनी स्त्रिया त्या अकरा जोडप्यांच्या मस्तकांवर अक्षता टाकितात. ह्या कृत्यास **दांडाऱ्यावेलीशेज** अशी संज्ञा आहे.

दांडान्यावेळीशेजेचा सोहळा झाल्यावर वरपिता आपल्या कुळांतील आठ मनुष्यें निवडून घेऊन त्यांस वरासहित एका ओळीनें उभे करितो. नंतर नवरी प्रत्येकापुढें एकेक केळीचें पान मांडिते, व त्यावर मिठाई आणि फळें वाढिते. नंतर प्रत्येकाच्या हातीं दोन दोन विड्याचीं पानें व एकेक सुपारी देऊन त्यांस औक्षण करिते. मग एका झारींत ऊन्ह केलेलें तूप घेऊन तें आपल्या नवऱ्याच्या पात्रापासून शेवटच्या गृहस्थाच्या पात्रापर्यंत संततधारेनें वाढीत जाते. नंतर ही मंडळी फराळास बसतात. ह्यांस **अष्टवर्ग** अशी संज्ञा आहे. अर्थात् अष्टवर्ग म्हणजे आपल्या कुळांतील आठ मनुष्यांचा सत्कार करणें. तो झाल्यावर नवरानवरी वरपक्षाच्या मंडळीजवळ जाऊन बसतात. त्यांच्या मागून कन्येचीं मातापितरें येतात. कन्येची माता ह्या स्थळीं येतांना स्त्रीसमुदायांतून वरमातेला आपल्या बरोबर घेऊन येते. नंतर कन्यापक्षाचा उपाध्याय कन्येच्या वडिलांच्या वतीनें वराच्या वडिलांस अनुलक्षून पुढील आशयाचा श्लोक ह्मणतो:—" आह्मीं आजपर्यंत ह्या मुलीचें पालनपोषण केलें, व आतां ही तुमच्या मुलास दिली आहे. तरि, तिचा आपण आपल्या मुलाप्रमाणें प्रतिपाळ करावा, अशी प्रार्थना आहे." ही प्रार्थना झाल्यावर कन्यापिता मुलीला वरपित्याच्या मांडीवर बसवितो, आणि तिची माता तिला वरमातेच्या मांडीवर देते. ह्या कृत्यास **ओपणी** असें ह्मणतात. ही ओपणी कन्येला वराच्या वडिलांस सुप्रीत करण्याच्या उद्देशानें करितात, असें व्यक्त होतें. परंतु हें कृत्य वस्तुत: ऐरणीदानाचें अंगभूत असून ब्राह्मणलोक तें त्यावेळींच करीत असतात. ह्या लोकांनीं त्यास निराळें स्वरूप दिलें आहे. असो. ओपणी झाल्यावर सासूबाई नव्या सुनेची खणानारळांनीं ओंटी भरितात, व नवरानवरीच्या पदरांस गांठ मारून त्यांस घरांत नेऊन जोडप्यानें नवरीकडील देवाच्या आणि वाडवडिलांच्या पायां पडवितात. वडील माणसें त्यांस आशीर्वाद देतात.

अष्टवर्ग व ओपणी वगैरे.

नंतर उभयपक्षांची स्त्रीपुरुष मंडळी नवरानवरीसह वरातीनें मिरवत वधूप्रवेशासाठीं वरगृहीं जातात. वरात वराच्या दरवाज्या पुढें आली, ह्मणजे तेथें उभी राहते. नंतर वरमाता घरांत जाऊन एक पेलाभर पाणी व तबकांत पांच वातींचा लांबणदिवा आणि तांदळाच्या पिठाचे चार दिवे घालून ते घेऊन येते. प्रथमतः ती नवरानवरीवरून तें पाणी उतरून फेंकून देते. नंतर त्यांस दिवे ओंवाळून लांबणदिवा नवरीच्या उजव्या हातीं देते; आणि मग नवरी पुढें, व नवरा मागें, अशा क्रमानें त्यांजकडून घरांत प्रवेश करविते. प्रवेश करितांना उंबऱ्यावर पाय न ठेवण्याविषयीं आणि दारांत पहिल्यानें उजवाच पाय टाकण्याविषयीं वधूस सूचना देतात. मंडपांत गेल्यावर नवरी आपल्या हातांतील लांबणदिवा तेथील आंकड्यास टांगिते. मंडपांतील जमिनीवर एकमेकांपासून सुमारें दीड फुटांच्या अंतरावर आणि समोरासमोर अशा दोन चौकोनी रांगोळ्या काढिलेल्या असतात. त्यांपैकीं एक चौकोन लहान व दुसरा मोठा असतो. लहान चौकोनांत दोन केळींचीं पानें मांडिलेलीं असतात, व त्यांवर थोडथोडे तांदूळ घालून तांदळांवर पांच पांच ताम्रपात्रांच्या उतरंडी रचिलेल्या असतात. त्या अशा कीं, बुडाचें पात्र सर्वांत लहान आणि त्यावरील पात्रें उत्तरोत्तर मोठीं असतात. ह्या पात्रांपैकीं एकांत एक सोन्याची आंगठी ठेविलेली असते. रांगोळीच्या मोठ्या चौकोनांत नवरानवरी पाटावर बसतात. नंतर नवरा एक तबक घेऊन त्यांत तांदूळ पसरून त्यांवर आपल्या आवडीप्रमाणें आपल्या बायकोचें नांव योजून तें लिहितो. हेंच त्या नवरीचें 'सासरचें नांव' होय. तें वरपक्षाची मंडळी मोठ्यानें वाचून त्याच्या अक्षरांची पूजा करितात. नंतर ते तांदूळ, तीं पात्रें, दक्षिणा वगैरे बाबत उपाध्यायास देऊन टाकितात. सोन्याची आंगठी नवरी घेते, व पात्रें घरांत ठेवितात. पुढें नवरीला तांदळानें भरलेल्या एका पाटींत बसवितात! व इष्टमित्र तिला नजरनजराणे (अलंकार, रोकड नाणें इ०) देतात. हें झाल्यावर नवरानवरी घरांत जाऊन देवाच्या पायां पडून येतात,

वरात, वधूप्रवेश आणि तत्संबंधीं कांहीं सोहळे.

व पुन्हां आपल्या जागेवर बसतात. मग त्यांच्या पदरांस गांठ मारितात, व नवरा आपलें बाशिंग उतरितो. नंतर ह्या बाशिंगाची दोरी सोडून घेतात,* व तें सुटें केलेलें बाशिंग घरांतील एका खांबास बांधून ठेवितात. नंतर इष्टमित्रांस एक लहानशी मेजवानी होते.

देवकोत्थापन, व्याहीभोजनें, नवरीनें औक्षण करणें व कार्य-समाप्ति.

पांचव्या दिवशीं प्रातःकाळीं उभयपक्षांकडील उपाध्याय यथाविधि देवक उठवितात. ह्याच दिवशीं वधूपक्षाची कांहीं मंडळी वरगृहीं येऊन नवरा, त्याचे वडील, नवरी व घरांतील सर्व मनुष्यें ह्यांस आपल्याकडे भोजनास बोलावितात. तसेंच ज्ञातिबांधवांनाही रीतीप्रमाणें जेवणाचें निमंत्रण केलें जातें. हें व्याहीभोजन दुपारीं दोन तीन वाजण्याचे दरम्यान होतें. पहिल्या पंक्तींत अग्रस्थानीं नवरानवरीस व दुसऱ्या पंक्तींत व्याह्यांस बसवितात. नवरी नवऱ्याच्या हातावर तुपाचें आपोशन देते, व थोडें तूप जमिनीवरही शिंपडते. ह्याचा उद्देश कळत नाहीं. दिलेल्या तुपाचें थोडेसें आपोशन घेऊन बाकीच्यांत नवरा एक सोन्याचें नाणें (मोहोर?) घालून तें जमिनीवर टाकितो. तें नाणें नवरी उचलून घेऊन स्त्रिया जेवावयास बसल्या असतील तेथें जाऊन बसते. पुढें भोजन आटोपून नवरा इतर मंडळीबरोबर उठूं लागतांच नवरी घरांतून येऊन त्याच्या पानावरील थोडेसें उष्टें खाते. त्यावेळीं नवऱ्याकडून तिला १० पासून ३० रुपयांपर्यंत कांहीं तरी देणगी मिळते. सूर्यास्त होऊन घरांत दिवे लागतांच नवरी आपल्या आईसमागमें हातांत नीरांजनाचें तबक घेऊन येते, व नवरा, सासरा, आणि त्यांचा एखादा निकट आप्त ह्यांस औक्षण करिते. ते त्रिवर्ग

---

* ह्या दोरीचे तीन भाग करून एक भाग एखाद्या सुवासिनीस देतात, दुसरा भाग नवरी आपले केंस बांधण्यास घेते, व तिसरा कोठें तरी नीट जपून ठेवितात. नवरीनें केंसांस बांधिलेला तुकडा लग्नाच्या पंधराव्या दिवशीं अंगणांतील केळीच्या खांबास बांधून ठेवितात. तिसरा जपून ठेविलेला तुकडा असतो, तोही नवरी एक पंच-रवडा डोक्यांत घालून नंतर त्याची पूजा करून तो पूर्वीप्रमाणें त्याच केळीच्या खांबास बांधून ठेविते. हें सर्व कृत्य शकुन ह्मणून बायका करीत असतील असें वाटतें.

तिला चांदीच्या किंवा सोन्याच्या नाण्यांची ओंवाळणी घालितात. हा सोहळा झाल्यावर नवरीचीं मातापितरें जांवयास, त्याच्या आईबापांस व इतर आप्तांस पोषाक देतात. नंतर नवऱ्याकडील मंडळी वधूवरांस तेथेंच ठेवून आपल्या घरीं जातात. सहाव्या दिवशीं पांचव्या दिवसाचीं सर्व कृत्यें वरपक्षाकडे होतात. दहाव्या दिवशीं नवरा लग्नमंडपाच्या वायव्येकडील स्तंभाची पूजा करितो. नंतर इष्टमित्रांस जेवणावळ होऊन स्तंभास गुंडाळलेलें शोभावस्त्र सोडून टाकितात, म्हणजे कार्य संपलें. न्हाण येईपर्यंत मुलगी बहुधा माहेरीं राहते. लग्नाच्या प्रथमवर्षी कन्यापक्षाकडून जांवयाला सर्व सणांस मेजवान्या व यथाशक्ति पोषाक देण्याची चाल आहे.

परभू लोकांचा लग्नविधि.

सामान्य माहिती.

शेणवी अथवा सारस्वतांप्रमाणें **परभूही** उच्च वर्गाचे हिंदू आहेत. त्यांच्यांत **कायस्थ, पाठारे,** व **पाताणे**, असे तीन पोटभेद आहेत. हे लोक आपणांस **क्षत्रिय** वर्णाचे समजतात; आणि जात्यभिमानानें **प्रभु** असें ह्मणवितात. कोंकणपट्टींत आणि मुंबई, ठाणें व कुलाबा जिल्ह्यांत ह्यांची वसति फार आहे. तथापि, रोजगारधंद्यासंबंधानें ते देशाच्या निरनिराळ्या भागांत वसलेले आहेत. हे लोक मोठे चतुर, कलमकसबी, आणि हुशार असून पूर्वी राज्यकारभारांत ह्यांचें वर्चस्व फार असे. पेशवाईत कारकुनीच्या आणि मोठमोठ्या हुद्यांच्या जागा ह्यांजकडे असत. ब्राह्मणांप्रमाणें ह्यांनींही एकेकाळीं तरवार गाजवून आपणांतील क्षात्रतेज प्रकट केलें आहे. ह्यांची सर्व रहणी शेणवी लोकांप्रमाणेंच असते. लग्नरीति ब्राह्मणांसारखीच आहे. परंतु, तींत वरदक्षिणा अथवा हुंडा, करणी, आणि श्रीमंती थाटाचे सोहळे ह्यांचा जो अतिरेक आहे तो सांगतां पुरवत नाहीं! आणि ह्याच कारणांस्तव ह्यांच्यांत मुलाचें व त्यापेक्षांही मुलीचें लग्न, ह्मणजे द्रव्याची केवळ उधळपट्टी, आणि दारिद्र्यास व संकटांस मुद्दाम पाचारण करणेंच होय! ह्या अंधपरंपरागत रूढीच्या पंक्तांत फसून ह्यांचीं शेकडों सुखी कुटुंबें कायमचीं दुःखी झालीं, व होत आहेत! शेकडों मुलींना ऐन तारुण्याच्या भरांत अविवाहित दशेंत राहण्याचा प्रसंग येत आहे, ही गोष्ट मोठी शोचनीय होय! असो. ह्यांच्या लग्नांत जे धार्मिक

विधि ब्राह्मणांसमान आहेत, त्यांचा हवाला पूर्वोक्त ब्राह्मणपद्धतीवर सोंपून आम्ही ह्यांच्यांतील निरनिराळ्या सोहळ्यांचें वर्णन मात्र येथें देत आहोंत.

सोयरीक जमविण्याची पूर्वांगें.

मुलामुलीच्या पत्रिका जमल्या व हुंडा आणि करणी ह्यांच्यासंबंधानें उभयपक्षांत तडजोडीनें ठराव झाले, ह्मणजे अरसपरस साकरपुडा करून औपचारिक रीतीनें स्थलयोजना नक्की करण्यांत येते. तो साकरपुड्याचा सोहळा खालीं लिहिल्याप्रमाणें:—

साकरपुड्याची रीति.

साकरपुडाः—वरपक्षाची स्त्रीपुरुष मंडळी सुमुहूर्तानें मोठ्या थाटानिशी मिरवत कन्येच्या घरीं जातात. तेथें त्यांस कन्यापक्षाकडून निरनिराळ्या जागेंत स्वागतपूर्वक बसविण्यांत येतें. नंतर घरांत दोन चौरंग जवळ जवळ मांडून त्यांवर मश्रूचे सरपोस घालून एकावर नवऱ्यामुलीस व दुसऱ्यावर तिच्या आईस बसवितात. मुलाची आई त्या दोघींस हळदीकुंकूं देते, व मुलीच्या आईस लुगडें व खण देऊन तिची ओंटी भरिते. नंतर मुलीच्या हातीं पेढे, बरफी वगैरे मिठाईचा **साकरपुडा** देऊन तिच्या गळ्यांत पुतळ्यांची माळ घालिते, व तिला साडी आणि खण देते. हें कृत्य झाल्यावर कन्यापक्षाच्या स्त्रिया वरपक्षाच्या सुवासिनींस हळदीकुंकूं व पानसुपारी देऊन त्यांच्या ओंट्या भरितात. तिकडे पुरुष मंडळींना पानसुपारी, अत्तरगुलाब, हारगजरे, व पेढे वाटण्यांत येतात. नंतर वरपक्ष वाजत गाजत घरीं परत जातो. ह्याच रीतीनें कन्येकडून वरालाही साकरपुडा करण्याची चाल आहे.

ग्रहमख.

ग्रहमखः—कार्यारंभीं ग्रहांच्या संतोषार्थ उभयपक्षांकडे ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणेंच **ग्रहमख** अथवा ग्रहयज्ञ करून ब्राह्मणभोजनें घालितात. नंतर उक्त दिवशीं दिवा अथवा रात्रौ वरपूजा करण्यांत येते. ती पुढें लिहिल्याप्रमाणें:—

वरपूजाः—कन्यापक्षाची इष्टशिष्ट स्त्रीपुरुष मंडळी मोठया समारंभानें वाजत गाजत वरगृहीं जातात. त्यांना योग्य स्थलीं सत्कारपूर्वक बसविण्यांत आल्यावर मंडपाच्या मध्यभागीं दोन चौरंग जवळ जवळ मांडून त्यांवर मश्रूचे सरपोस घालून एकावर नवऱ्यामुलास व दुसऱ्यावर त्याच्या अविवाहित अशा बहिणीस [करवलीस] बसवितात. नंतर कन्यापिता आपल्या पत्नीसहित विधिपूर्वक गणपतीचें व शचीचें पूजन करितो. तें झाल्यावर मुलीची आई करवलीच्या पायांवर पाणी घालिते, व मुलीचा बाप तिचे पाय चोळून धुवून रुमालानें पुशितो. नंतर मुलीची आई तिला हळदीकुंकू व यथाशक्ति वस्त्रालंकार देऊन तिची ओंटी भरिते. त्यानंतर नवऱ्यामुलाचेंही वर सांगितल्याप्रमाणेंच पादप्रक्षालन करून कन्यापिता त्यास गंध लावितो, व गळ्यांत पुष्पहार घालून यथाशक्ति अलंकार व पोषाक देतो; आणि पागोटयास मुंडावळ बांधितो. नंतर सर्व मंडळीस पानसुपारी, अत्तरगुलाब, व हारगजरे वाटितात. तिकडे घरांत स्त्रिया बसल्या असतात तेथें चौरंग मांडून त्यावर वरमातेला बसवितात. मग मुलीची आई तिला हळदीकुंकू देऊन रुखवताच्या सामानास*तिजकडून हस्तस्पर्श करविते. नंतर लुगडें व खण देऊन तिची ओंटी भरिते. हें झाल्यावर विहिणी (वरमाता) व तिच्या सर्व मानकरिणी उभ्या राहतात. मग मुलीची आई वरमाताप्रभृति सर्व स्त्रियांच्या अंगावर बुक्का फेंकिते; व विहिणीविहिणी [वरमाता आणि कन्यामाता] एकीमेकीस प्रेमानें भेटतात. ह्या भेटीस **बुक्काभेट**¶ अशी अन्वर्थक संज्ञा आहे. ह्याप्रमाणें बुक्काभेट

करवलीची आणि वराची पूजा, बुक्काभेट व शेंवतीपूजन.

---

* हें सामान ह्मणजे तांदूळ, तुरीची दाळ, हरभऱ्याची दाळ, गूळ, तूप, कणीक, घारकूट, हळकुंडें, नारळ, खोबरें, खजूर, जिरें, धणे, गुलाल, व तुपासहित तपेलें ह्या वस्तु असतात. ह्या तपेल्यांत कांहीं नगद नाणें घालितात, व त्यास **शकुनाचें तपेलें** अशी संज्ञा आहे. हें रुखवत निरनिराळ्या छावड्यांतून घातलेलें असतें; व त्यांपैकीं एका छावडीवर एक लुगडें व खण ठेविलेला असतो. ह्या लुगड्यास **फिरती घडी** असें ह्मणतात. कारण तें उभयपक्षांत फिरत असतें.

¶ बुक्काभेटीसंबंधीं कांहीं सामान कन्यापक्षाकडून वरपक्षास देण्यांत येतें. त्यांत एक तबक, तिळांचा हलवा, बुक्का, लुगडें व खण ह्या वस्तु असतात

झाल्यावर वधूपक्षाच्या स्त्रिया सर्व सुवासिनींस हळदीकुंकूं व पानसुपारी देऊन नारळांनी त्यांच्या ओंटया भरितात. प्रत्येक सुवासिनीची ओंटी दोन वेळां भरण्याची चाल आहे! एक वेळां वरपूजेबद्दल आणि दुसरे वेळां बुक्का-भेटीबद्दल. वरपक्षाच्या स्त्रियाही वधूपक्षाच्या सुवासिनींस हळदीकुंकूं देऊन त्यांच्या ओंटया भरितात. नंतर वरपूजेसाठीं आलेली कन्येकडील मंडळी वाजत गाजत घरीं परत जाते. हें कृत्य **श्रीमंतपूजा** ह्या नांवानेंही प्रसिद्ध आहे. त्याचा उद्देश पूर्वी पान ३३ मध्यें सांगितल्याप्रमाणेंच आहे. परंतु त्या उद्देशाचा अशा रीतीनें विपर्यास करण्यांत आला आहे. आतां, कोणी कोणी ही श्रीमंतपूजा वरास एखाद्या देवालयांत किंवा सार्वजनिक जागेंत नेऊन तेथें करितात, आणि असें झाल्यास पूजनानंतर वराची मोठ्या समारंभानें मिरवणूक काढून त्यास आपल्या घरीं [परगांवचा असल्यास जानवसघरीं] पोंचविण्यांत येतें. परंतु नवरा व नवरी एकाच गांवांत रहात असल्यास हें कृत्य करण्याचें वस्तुतः कांहीं एक प्रयोजन नाहीं. असो. वर वरपूजनांत जसा नवरामुलगा, त्याची बहीण–करवली,–आणि वरमाता यांचा कन्यापक्षाकडून सत्कार केला जातो ह्मणून सांगितलें, त्याप्रमाणेंच नवरीमुलगी, तिची करवली आणि आई ह्यांचा वरपक्षाकडून सत्कार करण्याची चाल आहे. ह्या कृत्यास **शेंवतीपूजन** असें ह्मणतात. परंतु, तें कोणी स्वतंत्ररीतीनें करितात, व कोणी वाग्निश्चयाच्या कृत्यांत त्याचा समाहार करितात. सबब, आह्मीही त्यासाठीं निराळी जागा अडवीत नाहीं.

मंडपस्थापना देवप्रतिष्ठा, आहेर, वडगनेर व अक्षत.

मंडपस्थापना व देवप्रतिष्ठाः—वरपूजन आणि पर्यायेंकरून वधूचें **शेंवतीपूजन** झाल्यानंतर लग्नाच्या पूर्वदिवशीं किंवा लग्न-दिवशीं उभयपक्षांकडे **मंडपस्थापना* देवप्रतिष्ठा,**§ वगैरे धार्मिक कृत्यें ब्राह्मणांप्रमाणेंच करण्यांत येतात. [पहा–पान २२ ते २५] तदनंतर वधूवरांस आणि त्यांच्या माता-

---

* मंडपस्थापनेची **मुहूर्तमेढ** मंडपाच्या आग्नेय दिशेस रोंवितात.

§ देवप्रतिष्ठेत कुलस्वामीचीही प्रतिष्ठा करण्याची चाल आहे. कुलस्वामीच्या मूर्ति नसल्यास त्यांचें सुपाऱ्यांच्या ठायीं आवाहन करून स्थापना करितात. देवक मांडावयाचें तेथें भिंतीस चुना देऊन त्यावर **जिवतीची** प्रतिमा पर्यायेंकरून काढण्यांत येते.

पितरांस त्यांच्या वरचा आहेर होतो. तो झाल्यावर त्यांस आप्त व मित्रमंडळी-कडूनही पोषाक किंवा यथाशक्ति नगद रकम, आहेर ह्मणून देण्यांत येते. नंतर उभयपक्षांकडे आपआपल्या इष्टमित्रांसह मेजवानी--वरचा गडगनेर--होऊन भोजनोत्तर दोन्हीकडील स्त्रीपुरुषं मोठया थाटानें देवास अक्षत देऊन येतात. परगांवच्या इष्टमित्रांस कुंकुमपत्रिका पाठविणें, आणि गांवांत अक्षत फिरविणें, हे रिवाज ब्राह्मणांप्रमाणेंच आहेत. [पहा--पान १६ ते १९]

वाङ्निश्चय व त्यांतील विशिष्ट सोहळे.

वाग्निश्चयः--उक्त दिवशीं किंवा लग्नदिवशीं वराकडून वधूकडे स्त्री-पुरुष मंडळी मोठया समारंभानें मिरवत वाग्निश्चयास जातात. तेथें उभयतां व्याही परस्परांस भेटल्यावर सर्व मंडळीस योग्य स्थळीं सत्कारपूर्वक बसविण्यांत येतें.* नंतर मंडपाच्या मध्य-भागीं दोन चौरंग मांडून त्यांवर मश्रूचे सरपोस घालून एकावर नवऱ्या-मुलीस व दुसऱ्यावर तिच्या बहिणीस [करवलीस] बसवितात. मग उपा-ध्याय वरपित्याकडून यथाविधि गणपति व शची ह्यांचें पूजन करवितात. तें झाल्यावर प्रथमतः करवलीचे पाय धुवून तिला वरमाता हळदीकुंकूं खण व साडी देते, आणि तिची ओंटी भरिते. करवलीची पूजा झाल्यावर नवऱ्या-मुलीचीही तशीच पूजा करितात, आणि तिच्या हातीं वस्त्रालंकारांचें एक ताट देतात. ह्मणजे ती तें घेऊन घरांत परिधान करण्यास जाते. तेथें स्त्रिया तिची अलंकारांसहित वेणी घालितात, व सोनार§ इतर भूषणें घालितो. नंतर स्त्रिया तिला तीं नूतन वस्त्रें परिधान करवितात. इकडे मंडपांत उभयतां व्याही एकमेकांची पूजा करितात. नंतर मुलीचा बाप आपल्या वाडवडिलांस व नाते-वाइकांस अनुलक्षून विचारतो "हे [वरपित्याचें नांव] आपल्या मुलास मुलगी मागण्यासाठीं आले आहेत. त्यांस मुलगी द्यावयाची काय ?" त्यास

---

† दोन्हीकडील मिरवणुकी एकत्र करून अक्षतीस जातात.

* ह्यासमयीं हौशी व श्रीमान् लोक कलावंतिणीचा नाच उभा करितात.

§ हा सोनार मुलाकडून नेण्यांत येतो; आणि त्यास अलंकार घालण्याबद्दल मुली-कडून शेलापागोटें मिळतें.

वाडवडील उत्तर देतात, "फार उत्तम आहे! द्यावी." ह्या औपचारिक रुकाराचा प्रकार झाल्यावर उभयतां व्याही **साक्षीगांठ** बांधितात. [रीति पहा—पान २८-२९.] वाग्निश्चयविधि पूर्वोक्त ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणेंच होतो. [पहा. पान २९.] नंतर उभयपक्षांकडून उपाध्यायांची यथाशक्ति संभावना होते. व अरसपरस व्याह्यांचे पोषाक होतात. मुलगी वस्त्रालंकार परिधान करून आल्यावर सुवासिनी तिची ओंटी भरितात. नंतर सर्व मंडळीस साक्षीविडे वाटून रीतीप्रमाणें पानसुपारी, अत्तरगुलाब व हार-गजरे देतात. तिकडे घरांत वरपक्षाच्या स्त्रिया मुलीच्या आईला चौरंगावर बसवून तिला हळदीकुंकूं देऊन **वरणी**च्या सामानास* तिचा हस्तस्पर्श करवितात, व खण लुगडें देऊन तिची ओंटी भरितात. नंतर सर्व सुवासिनी स्त्रियांस हळदीकुंकूं, साक्षीविडे, वगैरे देऊन त्यांच्या ओंट्या भरितात. ह्याप्रमाणें सर्व सोहळा आटोपल्यावर वरपक्षाची स्त्रीपुरुष मंडळी वाजत गाजत घरीं परत जाते.

उडद्या मुहूर्ताचा सोहळा.

उडद्या मुहूर्त—लग्नदिवशीं प्रातःकाळीं, देवप्रतिष्ठा केली असेल त्या ठिकाणीं एक जातें मांडून त्यास आम्रपल्लव बांधून त्याच्या सभोंवती पांच सुवासिनी बसतात. नंतर नवऱ्यामुलास पागोटें घालून व मुंडावळ बांधून त्या जात्यापाशीं चौरंगावर बसवितात, आणि त्याच्या मदतीनें त्या स्त्रिया थोडेंसे उडीद दळितात, व दळितांना गणपतिप्रार्थनापर अशीं मंगल गीतें गातात. ह्या कृत्यास

---

* वरणीच्या सामानांत पूर्वी वरपूजेच्या वेळीं मुलीकडून आलेलें रुखवत असतें, व त्याशिवाय बदाम, वेलची, खडीसाकर, चारोळ्या, पिस्ते, बेदाणा, कुंकूं व फळफळावळ-ही नेतात. हें सामान चांगलें घवघवीत नसल्यास त्यासाठीं कन्यापक्षाच्या स्त्रिया नाकें मुरडतात, रुसतात, आणि वरपक्षाच्या स्त्रियांस उद्देशून 'जशी तुमची **वरणी** तशी आमची **करणी**' असा औपरोधिक टोला लग्न संपेपर्यंत वेळोवेळीं देत असतात. सबब, शक्य तितका जास्त खर्च करून **वरणी** भरपूर करण्याची वरपक्षाकडून काळजी घेण्यांत येते! बडोद्याकडील परभू लोकांत ह्या वरणीच्या सामानांत आणखी ब्राह्मणी चालीचें रुखवतही असतें. त्याचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. (पहा-पान ११).

उडया मुहूर्त अशी संज्ञा आहे. वधूपक्षाकडे वधूकडूनही ह्याचप्रमाणें उडया मुहूर्त करविण्यांत येतो.

तेलवणाचा सोहळा.

तेलवण—उडया मुहूर्त झाल्यावर तेलवणाचा सोहळा होतो. तो असा कीं, देवकाजवळ चतुष्कोण रांगोळी—" चौपाट "—काढून त्यांत एक चौरंग मांडतात. नंतर तळणीस ह्मणजे कढईस कच्चें सूत गुंडाळून आम्रपल्लव बांधितात, आणि तींत तिळाचें तेल घालितात. तसेंच एका वाटींत सुवासिक तेल घालून त्यांत हळद कालवून ठेवितात. ह्याप्रमाणें तयारी झाल्यावर नवऱ्यामुलास मुंडावळी-सहित पागोटें घालून चौपाटांतील चौरंगावर बसवितात. नंतर वरमाता एका हातांत चाकू व दुसऱ्या हातांत आम्रपल्लव घेऊन चाकूचें पात व आम्रपल्लव तळणींतील तेलांत बुडवून त्यांनीं प्रथमतः वराच्या पायांस, गुडघ्यास, खांदांस आणि शेवटीं कपाळास तेल लाविते. ह्याप्रमाणें पांच वेळ तेल लाविल्यानंतर सुवासिक तैलमिश्रित हळद दोहों हातांनीं घेऊन ती वर सांगितलेल्या सर्व भागांस अनुक्रमें पांच वेळ लाविते. ह्या कृत्यास **तेलवण** असें ह्मणतात. नवऱ्यामुलास हें तेलवण जमलेल्या सर्व स्त्रियां-कडून करण्यांत येतें. ह्याचप्रमाणें नवरीकडे तिलाही तिची आई व इतर सुवासिनी स्त्रिया तेलवण करितात.

उष्टया हळदीचा सोहळा.

उष्टी हळद—वरील दोन्ही सोहळे उभयपक्षांकडे केल्यावर नवरीकडून नवऱ्याकडे **उष्टी हळद** नेतात. तिचा प्रकार असा कीं, वधू पक्षाच्या इष्टशिष्ट सुवासिनी स्त्रिया मुलीला तेलवण करितांना तिची उष्टी झालेली हळद, ओंटया भरण्यासाठीं तांदूळ व नारळ, मुलास शेला पागोटें आणि वरमातेस खणलुगडें व हळदीकुंकवाचें साहित्य असें सामान घेऊन वाजत गाजत वरगृहीं येतात. तेथें गेल्यानंतर उंबऱ्यामध्यें एक मोठी परात पालथी घालून त्यावर सकलाद अंथरितात. नंतर वरास मुंडा-वळीसहित पागोटें घालून त्या परातीवर बसवितात. त्याच्या शेजारीं वर-मातेलाही बसविण्यांत येतें. मग प्रथमतः तिला हळदीकुंकू व खणलुगडें देऊन तिची ओंटी भरितात. नंतर वरास कुंकुमतिलक लावून औक्षण करितात;

आणि वर तेलवणांत सांगितल्याप्रमाणें त्याच्या निरनिराळ्या अंगांस पांच सुवासिनी सुवासिकतैलमिश्रित हळद लावितात. हें झाल्यावर नवऱ्यामुलास शेलापागोटें देतात; आणि जमलेल्या सर्व स्त्रियांस हळदीकुंकूं देऊन त्यांच्या ओंटया भरितात, ह्मणजे उष्टयाहळदीचा सोहळा आटोपला. त्यानंतर वधूपक्षाच्या स्त्रिया वाजत गाजत घरीं परत जातात. ह्या लोकांत वराकडून **वधूलाही उष्टी हळद** नेण्याचा लोकविरहित सांप्रदाय आहे. त्यांतील बहुतेक कृत्य वरील उष्टया हळदींत सांगितल्याप्रमाणेंच आहे. फरक इतकाच कीं, वराची उष्टी हळद वधूस लावावयाची व तिला साडी व खण, आणि तिच्या आईला लुगडें व खण देऊन त्यांच्या निरनिराळ्या फळांनीं व नारळांनीं ओंट्या भरावयाच्या. शिवाय, ह्याच वेळीं वरपक्षाच्या स्त्रिया वधूला आणि तिच्या आईला मुहूर्तमेढीजवळ चौरंगावर बसवून उष्टया हळदींतील पद्धतीप्रमाणेंच त्या दोघींचा सत्कार करितात. हें कृत्य मेढीजवळ करण्यांत येतें, ह्मणून ह्यास **मेढीमुहूर्त** अशी संज्ञा आहे.

गौरीहरपूजा.

गौरीहरः—लग्नमुहूर्तास सुमारें दोन तीन घटिकांचा अवकाश असतां नवऱ्यामुलीस लग्नचुडा [सर्व हिरव्या रंगाच्या साध्या बांगड्या] भरून तिला मंगलस्नान घालितात, व नंतर पिवळ्या रंगाची अष्टपुत्री व त्याच रंगाची तापत्याची चोळी घालून तिच्या हातीं रुईच्या फुलांची माळ देतात. नंतर देवकाजवळ एका पाटावर श्रीपार्वतीची मूर्ति मांडून तिजसमोर दुसऱ्या पाटावर मुलीस बसवितात. तिच्या हातांत कुंकुममिश्रित अक्षता देतात, त्या ती पार्वतीस वहात बसते, आणि मुखानें "गौरी! गौरी! सौभाग्य दे; दारीं वर येईल त्याला आयुष्य दे." अशी प्रार्थना करीत असते.

बरप्रस्थानासंबंधीं सोहळे, मधुपर्कसत्कार व पत्रिकापूजन.

वरप्रस्थान, मधुपर्क व लग्नः—अशारीतीनें नवरी गौरीहरपूजा करीत बसली असतां वधूपक्षाकडील इष्टशिष्ट स्त्रीपुरुष उत्तम वस्त्रालंकार परिधान करून वराचा पोषाक, नाना प्रकारची पक्वान्नें, किराणा, आणि फळफळावळ ह्यांचें अवांढव्य रुखवत, व इतर सत्कारसाहित्य बरोबर घेऊन मोठया

समारंभानें वाजत गाजत वरगृहीं वरास घेण्यासाठीं जातात. तेथें वरपक्षाकडून त्यांना योग्य स्थलीं सत्कारपूर्वक बसविण्यांत येतें. घरांत स्त्रियांच्या बैठकीच्या मध्यभागीं दोन चौरंग जवळ जवळ मांडून त्यांवर मश्रू घातलेले असतात. ह्या चौरंगांपैकीं एकावर नवऱ्यामुलास व दुसऱ्यावर त्याच्या आईस बसवितात. नंतर मुलीची आई त्या दोघांचे पाय ऊन्ह पाण्यानें धुवून रुमालानें पुशिते. नंतर मुलास गंध लावून त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालिते. नंतर वरमातेस व तिच्या मानकरिणींस हळदीकुंकू व फुलांचे हारगजरे देते, आणि नारळांनीं त्यांच्या ओंट्या भरिते. हीं कृत्यें होत असतां कोणी स्त्रिया रुखवताचीं पानें वाढून तयार ठेवितात. त्यांवर वरपक्षाकडील करवल्या मुली, नवऱ्या मुलाची स्नेही मंडळी, वर आणि वरमाता ह्यांस मानाप्रमाणें बसवून फराळ घालितात. वरमाता चांदीच्या ताटांतून कांहीं घांस वरास देते व आपणही घेते. फराळ होऊन मुखप्रक्षालन झाल्यावर मुलीची आई आपल्या भावी जांवयास उत्तम प्रकारचा तांबूल देऊन त्याला आपल्याबरोबर आणिलेला पोषाक घालून नाना प्रकारच्या मुंडावळी बांधून गालास काजळाचें गालबोट लावून व पायांत चर्मी जोडा घालून त्याच्या हातीं वर्ख लाविलेला नारळ देते, आणि त्यास प्रस्थानासाठीं तयार करिते. नंतर ती सर्व सुवासिनी स्त्रियांस हळदीकुंकू देऊन त्यांच्या ओंट्या भरिते. तिकडे मंडपांत पुरुषमंडळीसही पानसुपारी, अत्तरगुलाब व हारगजरे वाटण्यांत येतात. हीं कृत्यें आटोपल्यावर मोठ्या कडाक्यानें वाजत गाजत वरप्रस्थानाची मिरवणूक निघते. तिचें वर्णन पूर्वी पान ३९ मध्यें केलेंच आहे. नवरामुलगा मिरवत मिरवत वधूमंडपाच्या द्वारापाशीं येतांच कोणी शूद्रस्त्री शकुन घेऊन उभी असते, ती घोड्याच्या पायांवर पाण्याची घागर ओतिते.* नंतर मुलीची आई एका हातांत पिठाचा प्रज्व-

---

* हिला लुगडें व खण देतात. तसेंच कोंकणांतील परभू लोकांत ह्या प्रसंगीं मंडपद्वारीं गांवचा वतनदार नवऱ्यामुलास सामोरा येत असतो, त्याला पोषाक किंवा कांहीं नगद रकम देण्याची चाल आहे.

लित दीप व दुसऱ्या हातांत वस्त्र गुंडाळलेली रवी (ताक करण्याची) घेऊन सामोरी येते. ती मुलास रवी दाखवून त्याजवरून तो दिवा ओंवाळिते. मग नवऱ्यामुलास घोड्यावरून उतरवून, पीतांबर व शाल-जोडी परिधान केलेला कन्यापिता त्यास आपल्या हातीं धरून बहुल्या-जवळ नेतो, व तेथें त्याचा पोषाख उतरवून त्यास पीतांबर व शालजोडी परिधान करवितो. मिरवत आलेली उभयपक्षांची स्त्रीपुरुष मंडळी योग्य स्थळीं सत्कारपूर्वक बसविण्यांत येतात.* इकडे वराचा मधुपर्कसत्कार ब्राह्म-णांच्या पद्धतीप्रमाणेंच होतो, त्याचें वर्णन पूर्वीं दिलेंच आहे. [पहा—पान ४० ते ४९.] तथापि, तत्पूर्वीं ह्या लोकांत आपल्या ज्येष्ठ जामातांस आणि त्यांच्या स्त्रियांस [आपल्या विवाहित मुलींस] पोषाख देऊन त्यांचा गौरव करण्याची चाल विशेष आहे. मधुपर्क झाल्यावर उभयतां व्याही घटिके-जवळ येऊन तेथें जोशीबोवांनीं मांडिलेल्या पत्रिकेचें पूजन करून जोशी-बोवांची संभावना करितात.¶

लग्न, तत्संबंधी लोकाचार व इतर धार्मिक विधि.

लग्नः—पत्रिकापूजन झाल्यावर अष्टवर्ग नेमून वरास कण्यावर§ पश्चिमाभिमुख उभा करितात; आणि अष्टवर्ग त्याच्या समोर अंतःपट धरितात. नंतर मुलीचा मामा तिला गौरीहराजवळून आणून अंतःपटापलीकडे कण्यावर नवऱ्यामुलासन्मुख उभी करितो. वरमाता हातीं मंगळसूत्र घेऊन नवरीच्या पाठीमागें उभी राहते. तशाच ज्या त्या पक्षाच्या करवल्याही हातांत करे व दिवे

---

* ह्या समयीं अनुकूलता असल्यास मंडळीच्या करमणुकीसाठीं मंडपांत कलावंति-णींचें नृत्यगीत करवितात.

¶ ह्या श्रमजोशास वधूपक्षाच्या दुप्पट वरपक्षानें दक्षिणा द्यावी लागते.

§ कण्या ह्मणजे, कण अथवा बारिक बारिक टिपक्यांनीं तऱ्हेतऱ्हेच्या आकृति साधून काढिलेली रांगोळी. लग्न लावावयाच्या ठिकाणीं (ह्या॰ बहुतकरून बहुल्यासमोर) जमीन घोटून तिजवर परभू लोकांतील चतुर स्त्रिया नानाप्रकारचे कणे काढितात, व त्यांत निरनिराळे रंग भरून आणि अभ्रकाची छटा देऊन ते कणे फारच प्रेक्षणीय करीत असतात.

घेऊन नवरानवरीमागें उभ्या राहतात; आणि बहुल्याच्या पाठीमागें एक स्त्रीपुरुषांचें जोडपें उभें करितात. ह्याप्रमाणें वधूवरें लग्नास उभीं राहिलीं* ह्मणजे त्यांस आपापल्या कुलदेवतेचें स्मरण करण्यास सांगतात. नंतर ब्राह्मण मंगलाष्टकें ह्मणण्यास सुरवात करितात, आणि सुवासिनी वधूवरांवर कुंकुममिश्रित अक्षता टाकूं लागतात. मुहूर्तवेळा येतांच टाळ्यांच्या व मंगलवाद्यांच्या गजरांत अष्टवर्ग अंतःपट दूर करितात, व नवरानवरीचें लग्न लागतें. लागलीच वरमाता नवरीच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधिते व नवरी नवऱ्याच्या गळ्यांत पुष्पहार घालिते. नंतर कण्यावर दोन पाट समोरासमोर मांडून त्यांवर वरास पूर्वाभिमुख आणि वधूस पश्चिमाभिमुख बसवितात. जोशीबोवा घटिकेंतील उदक त्या उभयतांच्या नेत्रांस लावितात. तिकडे मंडपांत सर्व निमंत्रित गृहस्थांस उभय पक्षांकडून [वर्ख लाविलेले कळीदार विडे] पानसुपारी, अत्तर, गुलाब, हारगजरे व नारळ वाटण्यांत येतात. भिक्षुकवर्गास ह्याशिवाय दक्षिणा वाटितात. नारळ आणि दक्षिणा ह्यांचें प्रमाण हमेषा वधूपक्षाच्या दुप्पट वरपक्षाचें असतें. सुवासिनी स्त्रियांस हळदीकुंकूं, पानसुपारी, अत्तरगुलाब, हारगजरे देऊन त्यांच्या नारळांनीं ओंटया भरितात. ह्याप्रमाणें थोरांपासून लहानांपर्यंत सर्वांचा सत्कार करण्यांत आल्यावर लग्नास आलेली स्त्रीपुरुष मंडळी आपापल्या घरीं जाते. पुढें **कन्यादानापासून सप्तपदी**अखेरपर्यंत सर्व धार्मिक विधि ब्राह्मणांच्या पद्धतीप्रमाणेंच करण्यांत येतो. नंतर जांवई आणि त्यांचे मानकरी ह्यांचे फराळ अथवा भोजन होतें. त्याचा प्रकार बहुतेक ब्राह्मणांच्या रिवाजाप्रमाणेंच आहे.

गृहप्रवेशअथवा परतवणें व तत्संबंधीं इतर सोहळे.

गृहप्रवेशः—वरील कृत्य आटोपल्यावर ह्या लोकांत **गृहप्रवेश** अथवा **परतवणें** ह्मणून एक सोहळा पर्यायेंकरून करण्यांत येतो. तो असा कीं, नवरानवरीस सुंदर वस्त्रालंकार परिधान करवून पालखींत बसवितात, आणि मोठ्या समारंभानें वाजत गाजत वरगृहीं घेऊन येतात. मिरवणूक मंडपद्वारापाशी

---

* कायस्थ परभू लोकांत ह्या प्रसंगीं वधूवरांच्या मस्तकांवर शस्त्रें धरण्याचा रिवाज आहे.

येतांच तेथें वराची विवाहित बहीण पायघड्या घालून व हातांत गुलालाच्या पाण्यानें भरलेलें ताह्मन घेऊन उभी असते. मग नवरानवरीस पालखींतून खालीं उतरवितात, आणि वराच्या अग्रभागीं वधू अशा रीतीनें त्यांस उभीं करितात. कोणी सुवासिनी त्यांजवरून निंबलोण* उतरिते. नंतर वधूचे पाय त्या ताह्मनांतील गुलालाच्या पाण्यांत बुडवून तिला वरासह त्या पायघड्यावरून चालवीत माजघराच्या दरवाजापर्यंत आणितात. तेथें वराची बहीण त्यास अडविते. तेव्हां त्या बंधुभगिनीचीं पुढीलप्रमाणें प्रश्नोत्तरें होतात:—

बंधु:—हें मेटऽ§ कोणाचें?

भगिनी:—[आपल्या नवऱ्याचें उखाण्यानें नांव घेऊन त्यांचें ह्मणून सांगते].

बंधु:—येथें कां उभें राहिलें?

भगिनी:—मुलगी पाहिजे!

नंतर बंधु अर्थात् नवरामुलगा इतर स्त्रियांच्या सांगण्यावरून नवरीच्या कानीं लागून तिला विचारितो 'अक्का मुलगी मागते!' ह्यास नवरी लाजून हळूच उत्तर देते 'बरें आहे. देऊं!' असें तिचें वचन मिळतांच तिची नणंद दारांतून दूर होते व नवरानवरी घरांत प्रवेश करून देवकापाशीं दोन चौरंग मांडून ठेविलेले असतात त्यांवर जाऊन बसतात. नंतर उपाध्याय त्यांच्या हस्तें यथाविधि पुण्याहवाचन व लक्ष्मीपूजन करवितात. तें झाल्यावर जवळच **भाणूस**¶ केलेली असते. त्यापैकीं पहिलींत हळदकुंकू व दुसरींतील मधील भांड्यांत कांहीं अलंकार ठेविलेला असतो. तेथें नवऱ्या मुलीस आणून सासूबाई तिला ह्मणतात:—" मुली, ह्या भांड्यांत काय आहे

---

* एका पंचपात्रींत पाणी व तांदूळ घालून तें उतरून टाकितात. परंतु वस्तुतः निंबलोण निराळेंच आहे. असो.

§ बहिणीला टोंचून बोलण्याचा एक पारिभाषिक शब्द.

¶ एकावर एक तीन पात्रें रचिलीं आहेत अशा दोन उतरंडी.

तें पहा बरं! पण भांडीं उतरतांना वाजवूं* नकोस हो!" मग मुलगी तीं भांडीं उतरून त्यांत ज्या ज्या वस्तु सांपडतील त्यांची नांवें आपल्या सासूबाईना सांगते. भांड्यांतील अलंकार ह्याच समयीं नवरीच्या अंगावर घालण्यांत येतो. ह्या सोहळ्यास **भाणूस उतरणें** असें ह्मणतात. तें आटोपल्यावर वधूवरांस एका ताटांत फराळ घालितात, व तदनंतर त्यांच्या हातांवर थोडथोडें दहीं व साकर देऊन त्यांस परत वाजत गाजत वधूगृहीं पोंचवितात.

उभय पक्षांकडे सुपाऱ्या खेळण्याची चाल, मंगलस्नान, *लाजाहोम, फराळ व जेवण.

सुपाऱ्या खेळणें वगैरे:—लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं नवऱ्या मुलास आपल्या घरीं पोंचवितात. नंतर स्त्रिया नवरीची वेणीफणी करून व तिला वस्त्रालंकार परिधान करवून डोक्यास मोत्यांची मुंडावळ बांधितात; आणि पांच सहा करवल्यांसह वरगृहीं सुपाऱ्या खेळण्यासाठीं वाजत गाजत पाठवितात. नवरी येत आहे असें समजतांच नवऱ्याकडील करवल्या वरास घरांत कोठें तरी लपवून ठेवितात. मग नवरीच्या करवल्या येतांच त्यांना मुलगा शोधून काढण्यास सांगतात. तो सांपडला नाहीं तर त्यांना आपापल्या नवऱ्याचीं नांवें घेण्यास लावितात. त्यांनीं तसें केलें, ह्मणजे मग मुलाकडील करवल्या मुलास आणून हाजर करितात. पुढें सुपाऱ्या खेळण्याचा सोहळा ब्राह्मणरिवाजाप्रमाणेंच होतो. (पहा-पान ६९–७०–७१). परंतु त्यांत फरक इतकाच कीं, त्याप्रमाणें वराकडे सुपाऱ्या खेळणें झाल्यानंतर उभय पक्षांच्या करवल्या वधूवरांस घेऊन नवरीच्या घरीं वाजत गाजत जातात, आणि तेथेंही फिरून सुपाऱ्या खेळून नंतर त्यांस पूर्वी पान ७१–७२ मध्यें सांगितल्याप्रमाणें स्त्रिया मंगलस्नान घालितात. या लोकांत सदरहू स्नानाच्या वेळीं नवरानवरींकडून एकमेकांवर रंग टाकविण्याचा

---

* एका भांड्यांत स्वयंपाकाची पळी घातलेली असते. ती काढितांना किंवा भांडीं उतरितांना नाद झाला तर मुलगी पुढें घरांतील माणसांशीं भांडेल अशी भोळ्या भावड्या वृद्धांची समजूत असते!

सोहळा जास्त होतो. स्नान झाल्यानंतर वधूवरांस उंची रेशमी वस्त्रें परिधान करवून बहुल्यावर बसवितात, आणि तेथें त्यांजकडून उपाध्याय ब्राह्मणांच्या पद्धतीप्रमाणेंच लाजाहोम करवितात. (पहा-पान ६०—६१). ह्या लोकांत हा लाजाहोम वरात जाईपर्यंत दररोज सकाळ संध्याकाळीं करण्याची चाल पर्यायेंकरून आहे, व ती विशेष आहे. लाजाहोम झाल्यावर वधूवरांच्या करवल्या व इष्टमित्र ह्यांस फराळ घालितात. फराळानंतर कांहीं वेळानें जांवई व मानकरी ह्यांचें मिष्टान्नभोजन होतें. ह्या पंगतीचें वर्णन पूर्वी ६६ ते ६९ पानांत आलेंच आहे.

सूनमुख:—दुसऱ्या दिवशीं सायंकाळीं स्त्रियांच्या प्रमुखतेखालीं सूनमुख पाहण्याचा सोहळा करण्यांत येतो. तो असा कीं, नवरीकडील मंडप, बिछायती व रोषनाई ह्यांनीं शृंगारून तत्पक्षाच्या विहिणीप्रभृति स्त्रिया वरपक्षाच्या विहिणीप्रभृति स्त्रियांस बोलावूं येतात, व त्यांना मोठ्या समारंभानें आपल्या मंडपीं घेऊन जातात. तेथें उभय पक्षांच्या विहिणी, मानकरिणी व इतर निमंत्रित स्त्रियांनीं मंडप गजबजून जातो. वरमातेस व तिच्या मानकरिणींस वधूची आई सन्मानपूर्वक मंडपाच्या मध्यभागीं बसविते. कांहीं वेळ गेल्यानंतर वरमातेला बहुल्यावरील चौरंगावर बसवितात, व तिच्या शेजारीं दुसऱ्या चौरंगावर वधूस बसविण्यांत येतें. मग वरमाता नवरीस हळदीकुंकू देऊन उंची वस्त्रें परिधान करविते, आणि तिची ओंटी भरिते. नंतर तिला आपल्या मांडीवर घेऊन तिच्या तोंडांत खडीसाकर घालून व एखादा मौल्यवान अलंकार गळ्यांत घालून तिचें तोंड निरखून पहाते. हा प्रकार झाल्यावर सर्व सुवासिनींस हळदीकुंकू वगैरे देऊन त्यांच्या ओंट्या भरितात. नंतर ज्यांस फराळाचें निमंत्रण असेल, त्या तेथेंच राहून बाकीच्या आपल्या घरीं जातात. मग मुलीची आई, वरमाता आणि तिच्या मानकरिणी ह्यांस क्रमाक्रमानें चौरंगावर बसवून त्यांचे पाय ऊन्ह पाण्यानें धुवून खोबऱ्याच्या वाटीनें किंवा वस्त्रानें घांसते, आणि रुमालानें कोरडे करून त्यांस घरांत फराळासाठीं पाट मांडिले असतील तेथें सन्मानपूर्वक नेऊन बसविते.

फराळ झाल्यावर सर्व स्त्रियांस विडे वगैरे देऊन त्यांस घरीं वाजत गाजत पोंचत्या करितात, ह्मणजे सूनमुखाचा सोहळा आटोपला.

वरात आणि वधूप्रवेश:—तिसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं नवरामुलगा उठल्यावर मागें सांगितलेलीं दुसऱ्या दिवसाचीं सर्व कृत्यें ह्मणजे खेळ, मंगलस्नान, फराळ, भोजन, वगैरे करण्यांत येतात. सायंकाळीं वधूपक्षाकडील मंडळी आपला मंडप बिछायती व रोषनाई ह्यांनीं उत्तम प्रकारें श्रृंगारून ठेवितात. तिकडे वरपक्षाची सर्व इष्टमित्र स्त्रीपुरुष मंडळी उंची वस्त्रें व अलंकार परिधान करून ऐरिणीदानाच्या वेळीं लागणारें साहित्य, वधूपक्षाकडील मानकन्यांस देण्याचे पोषाक, व वरातीच्या मिरवणुकीसाठीं लागणाऱ्या सर्व वस्तूंसह मोठ्या थाटानें वाजत गाजत वधूमंडपीं येतात. तेथें वधूपक्षाकडून त्यांस आदरसत्कारानें योग्यस्थळीं बसविण्यांत आल्यानंतर बहुल्यावर 'चौपाट' [पहा-पान १३७] काढून त्यांत चौरंग मांडिलेला असतो, त्यावर नवरीला बसवून तिची सासू तिची वेणी घालून तिच्या अंगावर सर्व अलंकार घालिते. नंतर पैठणी नेसवून व अंगावर शालजोडी देऊन तिच्या डोकीस मोत्याची मुंडावळ बांधिते; आणि नंतर तिला हळदीकुंकूं देऊन तिची ओंटी भरिते. हें कृत्य आटोपल्यावर मुलीची आई बहुल्यावर तीन चौरंग मांडून त्यांवर अनुक्रमें मुलीची सासू, तिची जाऊ, आणि तिची मुलगी ह्मणजे नवरीची नणंद ह्यांना बसविते; व त्यांस हळदीकुंकूं देऊन त्यांच्या ओंट्या भरिते. नंतर ती त्या प्रत्येकीस एकेक वाण [वायन] देते. ह्या वाणांस त्या त्या व्यक्तीच्या नांवावरून अनुक्रमें ' सासूवाण ' 'जाऊवाण,' व 'नणंदवाण' अशा संज्ञा आहेत. ह्या वाणांतील

सासूवाणः—एक दुरडी, तांदूळ, नारळ, गूळ, एक बुरडी पानदान आणि त्यांत यथाशक्ति कांहीं नाणें.

जाऊवाणः—एक सूप, आणि तांदुळांखेरीज वरप्रमाणें इतर वस्तु.

नणंदवाणः—एक रोवळी, गहूं, साकर, नारळ व नाण्यासहित एक बुरडी पानदान.

वस्तूंचा तपशील खालीं टीपेंत दिला आहे. हीं वाणें दिल्यावर वधूची आई वधूच्या भोंवतीं एक लुगड्याची घडी गुंडाळून तिला तिच्या सासूच्या मांडीवर बसविते.

ह्या समयीं सासूच्या मांडीखालीं गहूं, गूळ व यथाशक्ति कांहीं नाणें घातलेलें एक तांब्याचें पातेलें देण्याची चाल आहे. त्यास 'मांडीचेपणें' असें ह्मणतात. मुलीला सासूच्या मांडीवर बसविली, ह्मणजे ती तिच्या तोंडांत खडीसाकर घालिते. बहुल्यावरील हें कृत्य आटोपल्यावर ऐरिणीदान ब्राह्मणांच्या पद्धतीप्रमाणेंच होतें. [पहा-पान ७६-७८] ऐरिणीदान झाल्यावर बहुल्याजवळ सुंदर शेजेसहित एक छपरी पलंग मांडून त्यावर वधू-वरांस समोरासमोर बसवितात, आणि त्यांच्या सभोंवतीं कच्चें सूत सोळा वेळां गुंडाळितात. नंतर त्या सुताचे सर्व पदर एकत्र करून त्याची एक वात कारितात. ह्या सोहळ्यास **शेजबाज** [कीं शेजवात ?] ह्मणतात. ही वात जपून ठेवून पुढें ती मंगळागौरीच्या पूजनसमयीं उपयोगांत आणितात. हा शेजबाजेचा सोहळा सार्वत्रिक नाहीं. असो. नंतर सासरा आपल्या जांव-यास यथाशक्ति पोषाक देतो. तो परिधान करून जांवईबोवा नवरीसह-वर्तमान घरांत जाऊन देवाच्या व वाडवडिलांच्या पायां पडतात. ह्यावेळीं त्यांची सासू त्यांच्या हातावर दहीं व साकर देते. ती चाखून ते बाहेर येतात, आणि नंतर वरातीची मिरवणूक निघते. ह्या मिरवणुकीची सर्व मिसळ ब्राह्मणांतील वरातीप्रमाणेंच असते. मात्र मार्गांत नवरानवरीवरून गुलाल उधळण्याची चाल विशेष आहे. मिरवणूक वरगृहाच्या दरवाजा-पाशीं येतांच मार्गें 'परतवणें' ह्या सोहळ्यांत सांगितलेलीं कृत्यें करण्यांत येतात. नंतर वधूवरांस पायघड्यांवरून देवकाजवळ नेतात. तेथें उपाध्याय त्यांजकडून 'परतवण्यांत' सांगितल्याप्रमाणेंच पुण्याहवाचन व लक्ष्मीपूजन करवितात. नंतर वराकडून सोन्याच्या आंगठीनें तांदळांवर वधूचें योजिलेलें

नांव लिहवितात. मग त्या नांवानें सर्व मंडळीस साकर *वाटण्यांत येते. नंतर सर्व मंडळीस पानसुपारी, अत्तर, गुलाब, हारगजरे व नारळ वाटून त्यांच्या अंगावर गुलाल उधाळितात. तिकडे घरांत वरपक्षाच्या स्त्रिया वधूपक्षाच्या विहिणीप्रभृति मानकरिणींस हळदीकुंकूं, पानसुपारी, अत्तर, गुलाब, वगैरे वाटून त्यांस साकर देतात व नारळांनीं त्यांच्या ओंट्या भरितात. नंतर त्यांस 'नेसवणी' चीं लुगडीं† व खण देऊन त्यांचा बहुमान करितात. ह्याप्रमाणें मानपानाचीं सर्व कृत्यें आटोपल्यावर वधूपक्षाची मंडळी आपल्या घरीं परत जाते.

नंतर वराकडे **वरातभोजन** व वधूकडे **मांडवपरतणें** ह्या जेवणावळी ब्राह्मणांच्या पद्धतीप्रमाणेंच होतात. मांडवपरतण्याच्या पूर्वी वधूमातेकडून वरमातेचें **तोंडधुणें** व **रासन्हाणें** हे दोन सोहळे होतात. त्यांचें वर्णन आह्मीं पूर्वी पान ७२-७३ व ८८-८९ मध्यें केलेंच आहे. ह्या लोकांत श्रीमंती थाटमाटांखेरीज त्यांत विशेष असें कांहींच होत नाहीं. सबब, आह्मी त्या सोहळ्यांची पुनरावृत्ति करून जागा न अडवितां हा परभू लोकांतील पोकळ डामडौलाचा व लांबलचक लग्नसोहळा येथें पुरा करितों.

---

* **साकर वाटण्याचा प्रकारः**—वरानें साकरेनें वाटी भरून ती वधूच्या हातांत द्यावयाची व ती तिनें पानावर ओतावयाची. ह्यासमयीं वधूवरें परस्परांचीं नांवें घेतात. ही साकर मंडपांत जमलेल्या मंडळीस वधूवरांकडून वाटवितात. परंतु सदरहू चाल सार्वत्रिक नाहीं.

† वधूच्या आईस जें लुगडें देतात त्यास **पोटझांकणें** ह्मणतात; व मुलाच्या किंवा मुलीच्या आजीस जें देतात, त्यास **आजेचीर** अशी संज्ञा आहे.

मराठे लोकांचा लग्नविधि.

सामान्य माहिती.

बलाढ्य, श्रमसहिष्णु, साहसी व निश्चयी लढवय्ये, उदार, आणि अभिमानी असे मराठे लोक, हे ज्यास ऐकूनही माहीत नाहींत, असा इतिहासज्ञ मनुष्य विरळा. एके काळीं ह्या लोकांनीं पारतंत्र्याच्या निगड बंधनांतून आपणांस व आपल्या देशबांधवांस मुक्त केलें होतें. इतकेंच नव्हे, तर संपूर्ण भरतखंडाचें साम्राज्य संपादून हिंदुधर्माचें संरक्षण केलें, आणि क्षत्रिय वर्णास शोभणारे **गुण** व **कर्म** आपल्या अंगीं आहे, हें जगाच्या प्रत्ययास आणून दिलें. महाराष्ट्र हें ह्या लोकांचें मूल वसतिस्थान होय. तथापि, हातीं राजसत्ता आल्यावर ह्यांचे जातिबंधु देशाच्या निरनिराळ्या भागांत वतनदार, कामदार, किंवा सुखवस्तु होऊन राहिले. मराठे लोकांच्या ब्रह्मवंशी, शेषवंशी, सोमवंशी, सूर्यवंशी अशा निरनिराळ्या शाखा आहेत. प्रत्येक शाखेंत निरनिराळ्या आडनांवांचीं कित्येक कुटुंबें असतात, व प्रत्येक कुटुंबाचें कांहीं एक **देवक** असतें. क्वचित् प्रसंगीं दोन कुटुंबें एकाच आडनांवांचीं असलीं, तरी त्यांच्यांत शरीरसंबंध होऊं शकतो. परंतु तो एकाच देवकाच्या कुटुंबांत मात्र होत नाहीं. ह्यांच्या लग्नांत धार्मिक विधीपेक्षां देशाचारांस व लोकाचारांस फार महत्व दिलें जातें. ह्या आचारांचें पुष्कळ भिन्न भिन्न प्रकार आहेत, व त्यांस अनुसरून सर्व मराठे लोकांची लग्नरीतीही एक सारखी नसते. परंतु, एकाच जातीच्या अनेक लग्नपद्धती येथें देणें

शक्य नाहीं. सबब, कोल्हापुर सारख्या ह्या लोकांच्या ऐन वसतीच्या ठिकाणीं ह्यांची जी लग्नरीति* आहे, तीच आह्मीं येथें देत आहों.

विवाहकाल व सोयरीक जमविण्याची रीति.

ह्या लोकांत बारापासून पंचवीस वर्षांच्या दरम्यान मुलांचें आणि न्हाण येण्यापूर्वी केव्हां तरी मुलींचें लग्न करितात. परंतु न्हाण आल्यानें मुलीच्या लग्नास जातीची कांहीं अडचण येत नाहीं. मराठ्यांच्या लग्नास फार खर्च लागतो; मुलीच्या बापास नवऱ्यामुलाला मोठी वरदक्षिणा द्यावी लागते, आणि त्याबद्दल मुलाच्या बापास फार किमतीचे दागिने मुलीच्या अंगावर घालावे लागतात. पुष्कळ कुलीन मराठ्यांस नवऱ्यामुलाला मोठी वरदक्षिणा देण्याचें सामर्थ्य नसल्यानें त्यांच्या मुली न्हाण आल्यावरही लग्नें व्हावयाच्या राहतात; आणि कदाचित् त्या मुली हलक्या कुळांतील प्रथमवरास किंवा बिजवरांस देण्याचा प्रसंग येतो. एखाद्या श्रीमान् मराठा गृहस्थासही फार मुली झाल्या, तर तो आपणास दुर्दैवी समजतो. जसें घराणें मोठें असेल, त्या मानानें बापास मुलीच्या लग्नाकरितां पुष्कळ पैसा खर्चावा लागतो, त्यामुळें त्यास कर्ज होतें, आणि तें कचितच फिटतें. साधारणतः मराठ्यांमध्यें मुलाकडून मुलीस **मागणें** येतें. लग्न ठरविण्यापूर्वी नवरानवरी एकाच कुळांतील नाहींत, अशाविषयीं खात्री करून घ्यावी लागते. उभय पक्षांचीं आडनांवें सारखींच असलीं तरी चालतात, परंतु त्यांचें देवक मात्र भिन्न असावें लागतें. दोघांचें देवक एकच निघालें तर लग्न होत नाहीं, हें वर सांगितलेंच आहे. त्याविषयीं विचारपूस होऊन योग्य मुलगी पाहिल्यावर मुलाचा बाप **राऊळ** किंवा **भाट** ह्यास मुलगी पाहण्यास पाठवितो. तो मुलीच्या घरीं गेला, ह्मणजे त्याचा आदरसत्कार होऊन त्यास जेवावयास घालितात. पानसुपारी आटोपल्यावर राऊळ किंवा भाट आपण कशाकरितां आलों हें सांगून मुलीच्या बापास मुलीचें लग्न करण्याचा बेत

---

* ही लग्नरीति कोल्हापुर संस्थानच्या गॅझीटियरांतून घेतली आहे, व ती मराठे जातीच्या बहुजनसमुदायाची आहे. त्या जातीच्या राजघराण्यांची नव्हे. राजकुलांतील लग्नविधि व सोहळे आह्मीं पूर्वीं स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून प्रसिद्ध केलेच आहेत.

आहे किंवा कसें ह्मणून विचारितो. मुलीचा बाप त्यास होय किंवा नाहीं ह्या दोहोंपैकीं एक उत्तर देतो, आणि भाट घरीं परत जातो. मुलीच्या बापानें होय ह्मटलें असल्यास मुलाकडील कांहीं गरीब आप्त स्त्रिया—कुणबिणी—मुलगी पहावयास जातात. त्यांनीं मुलगी पसंत करून चांगली आहे असें सांगितल्यास मुहूर्त पाहून मुलाचा बाप आपले आप्त, मित्र, उपाध्याय व भाट ह्यांस मुलीच्या घरीं लग्नाचें बोलणें करण्यास पाठवितो. ते मुलीच्या घरीं जातात तेव्हां तिचा बाप त्यांचा आदरसत्कार करितो. ते घरीं येतांच तो त्यांस पाय धुण्यास पाणी देतो, पानतंबाकू देतो, आणि एक बकरें किंवा निदान कोंबडें मारून त्यांस भोजन घालतो. उपाध्यायास कोरडा शिधा देतात, ह्मणजे तो स्वतः स्वयंपाक करून जेवतो, किंवा त्याकरितां एखाद्या ब्राह्मणाकडून स्वयंपाक करवितात. सर्वांचीं जेंवणें आटोपल्यावर ओसरीवर पानसुपारीस बसतात, त्यावेळीं भाट आपला येण्याचा उद्देश मुलीच्या बापास कळवितो. मुलीचा बाप ज्या गृहस्थाकडून ही मंडळी आली आहेत, त्याच्या मुलास आपली मुलगी देण्यास कबूल असला, तर तो लागलीच मुलीची जन्मपत्रिका उपाध्यायाच्या हातांत देतो. मग तो किंवा गांवचे जोशी मुलामुलीच्या पत्रिका पाहून त्या एकमेकींशीं मिळतात किंवा नाहीं, आणि लग्न मंगलदायक होईल किंवा कसें तें ठरवितात. जोशानें किंवा उपाध्यायानें लग्न मंगलदायक होणार नाहीं असें सांगितलें, तर बोलणें तितकेंच टाकितात. तथापि, मुलाचा व मुलीचा बाप हे उभयतां लग्न ठरविण्याविषयीं फार उत्सुक असले, तर जोशाचें सांगणें जुमानीत नाहींत, आणि कधीं कधीं त्यास पत्रिकाही न दाखवितां एकदम लग्नांतील मानपानांचा ठराव करितात. त्यांत मुख्य ठराव कन्यादानाच्या वेळीं मुलीच्या बापानें मुलास वरदक्षिणा किती द्यावी आणि मुलाच्या बापानें मुलीच्या अंगावर किती दागिने घालावे, किती वस्त्रें द्यावीं, आणि परस्परांच्या आप्तसोयऱ्यांस परस्परांनीं कोणते मानपान करावे, हे असतात. कधीं कधीं मुलगी फारच सुरेख आणि हुशार असून तिचे आईबाप गरीब असले, तर त्यांज-

पासून एक पैसाही न घेतां सर्व लग्नाचा खर्च करण्याचें जोखीम मुलाचा बाप आपल्या शिरावर घेतो. मुलीचे आईबाप श्रीमान् असले, आणि गरीब पण मोठ्या कुळांतील मुलास मुलगी देण्याची त्यांची इच्छा असली, तर तेच मुलास मोठी वरदक्षिणा देऊन मुलीचें सालंकृत कन्यादान करितात, व शिवाय मुलाकडचा खर्च पतकरितात.

लग्ननिश्चय, आणि वऱ्हाड-परगांवचें असल्यास लग्नाला जाण्यासंबंधी रिवाज.

लग्नाचे ठराव करण्यापूर्वी मुलीचा बाप मुलगा पाहण्यासाठीं आपल्या कोणाही आप्तास मुलाच्या घरीं पाठवितो. तेथें मुलाचा बाप त्यास मेजवानी करून धोतरजोडा व पागोटें किंवा निदान एक धोतर, अगर कांहीं रोकड देऊन त्याची रवानगी करितो. कित्येक मराठ्यांच्या घरीं लग्नाचा ठराव करितेवेळीं न्हावी असावा लागतो. लग्नाचे करार ठरले, ह्मणजे मुलामुलीचे बाप परस्परांस नारळ देतात. हे नारळ न्हाव्याच्या हस्तें देण्याघेण्याची चाल आहे. याप्रमाणें न्हाव्यानें नारळ दिले, ह्मणजे लग्नाचा पक्का ठराव झाला असें समजतात. हा ठराव न्हाव्याच्या मदतीनें होतो ह्मणून त्यास **म्हाळा** किंवा लग्न ठरविणारा असें ह्मणतात. त्यास दोहों पक्षांकडून पागोटीं किंवा पैसा मिळतो. मुलामुलीचे बाप गांवच्या जोशास तीन निरनिराळ्या दिवशीं हळदीस, लग्नास व वरातीस मुहूर्त पाहण्यास सांगतात. साधारण नियम ह्मटला ह्मणजे, नवऱ्यानें नवरीच्या घरीं लग्नास गेलें पाहिजे, असा आहे. परंतु, मुलाच्या आईबापांपेक्षां मुलीचे आईबाप गरीब असले, किंवा मुलाच्या आईबापांनीं मुलीच्या गांवीं जाण्याचें नाकबूल केलें, आणि मुलीस आपल्या गांवीं आणिल्यास लग्नाचा खर्च देतों असें ह्मटलें, तर मुलीचे आईबाप मुलीस घेऊन मुलाच्या गांवीं जातात, आणि मुलाच्या बापानें त्यांजकरितां जें वेगळें घर पाहून ठेविलें असेल, तेथें जाऊन उतरतात. परंतु एकंदरींत मुलीस मुलाच्या गांवीं नेणें, हें मराठ्यांमध्यें फार कमीपणाचें मानितात, आणि लग्नाचा ठराव करितांना ह्याविषयीं काय तो मुद्दाम ठराव करण्यांत येतो.

हळद लावण्याच्या पूर्वी थोडा वेळ मुलाकडील सोयरेधायरे व उपाध्याय वाजत गाजत मुलीच्या घरीं जातात. तेथें त्यांचा आदर-सत्कार होतो. नंतर उपाध्याय मंगलवाद्यें वाजत असतां मुलीस साडीचोळी व कांहीं दागिने देतो. मग हळदी होतात. गहूं किंवा तांदूळ पसरून त्यांचा चौक करितात, व त्यावर एका जवळ एक असे दोन पाट मांडितात, आणि त्यांच्या पुढें तिसरा पाट ठेवून सभोंवतीं सूत गुंडाळलेले असे पांच कलश मांडितात. नंतर उपाध्याय कांहीं मंत्र ह्मणून प्रत्येक कलशांत सुपारी व विड्याचीं पानें घालितो, आणि प्रत्येका-वर नारळाचें एकेक अर्ध शकल ठेवतो. नंतर त्यापुढें दोन दोन विड्यांच्या पानांवर एकेक सुपारी ठेवून गंधफूल घालून व धूपदीप आणि नैवेद्य दाखवून त्या गणपतीची व कलशाची पूजा करून दिवे ओंवाळितो. नंतर मुलाकडील स्त्रिया ओली हळद व तेल मुलीच्या व तिच्या आईच्या अंगास लावितात. मग गणपति व कलश ह्यांच्या पुढें मुलगी येऊन उभी राहते. उपाध्याय कांहीं मंत्र ह्मणतो, व ती कलशास पांच प्रदक्षिणा घालून पुढच्या दोन पाटांपैकीं एकावर बसते, आणि दुसऱ्या पाटावर तिची आई येऊन बसते. तेथें पुन्हां त्या उभयतां मायलेकींच्या अंगास तेल व हळद लावितात; आणि नंतर त्यांस आप्त व शेजारी ह्यांच्या पांच सुवासिनी न्हाऊं घालितात. मग मुलीस पिवळीं वस्त्रें परिधान करवितात, आणि तिची भावी सासू तिच्या अंगावर कांहीं दागिने घालिते. नंतर बाकी उरलेली **उष्टी हळद** वाजत गाजत नवऱ्याकडे नेतात, व ती त्याच्या अंगास लावून ह्याचप्रमाणें सर्व संस्कार करून मुलास न्हाऊं घालितात. पुढें मुलामुलींच्या घरीं जेवण होतें आणि हळदीचा समारंभ संपतो.

हळदीचा समारंभ.

नंतर **देवकपूजा** करितात. लग्नाच्या पूर्वी एक दोन दिवस मुलाच्या व मुलीच्या घरचा एकेक मनुष्य कित्येक मित्रांसहवर्तमान वाजत गाजत जाऊन जें झाड त्याचें कुलदैवत असेल, त्याची यथाविधि पूजा करून एक लहानशी फांदी तोडितो,

देवकपूजा व अक्षत.

व ती कोऱ्या सुपांत घालून वाजत गाजत घरीं आणितो. नंतर तें सूप देवघरांत ठेवून व त्यांतच घरच्या देवांच्या सुपाऱ्या मांडून त्या सर्व देवकाची पूजा करितात. परटीण **पाळ्याची पूजा** करिते. दोन प्रहरीं पुरुषांबायकांस जेवण घालितात, आणि देवकपूजा समाप्त होते. देवकास येण्याकरितां दूर दूरच्या मित्रांस पत्रें पाठवितात, व जवळच्या कांहीं सोयऱ्यांस देवकाच्या दिवशीं येण्याविषयीं घरचा मालक स्वतः जाऊन आमंत्रण करितो. भोजनोत्तर गांवांत लग्नाचें निमंत्रण करण्याकरितां उभय पक्षांकडून ब्राम्हणांच्या रिवाजाप्रमाणेंच अक्षत फिरते.

सीमांतपूजन आणि वाग्निश्चय

लग्नाच्या दिवशीं मुलास जेवण घालून परटिणीनें तांदूळ किंवा गहूं पसरून पाट मांडिला असेल त्यावर बसवितात; नंतर कांहीं सुवासिनी बायका त्याच्या अंगास हळद व कपाळास कुंकूं लावून त्यावर तांदुळांची **शेज** भरितात, नंतर पोषाक करवून व डोक्यास मुंडावळी बांधून त्यास कुलदेवतेपुढें घेऊन जातात. नंतर तो देवीपुढें नारळ ठेवून तिची प्रार्थना करितो, व नंतर घोड्यावर बसून आप्त इष्टवर्ग व उपाध्याय यांसुद्धां मारुतीच्या देवळास जातो. नवरी परगांवीं असल्यास तिच्या गांवास पोहोंचल्यावर तो मारुतीच्या देवळांत उतरतो, आणि देवाच्या पायां पडून त्याची प्रार्थना करितो. येथें त्यास नवरीकडची मंडळी सामोरी येते, आणि मारुतीच्या देवळांत **सीमांतपूजन** होतें. मुलीस मुलाच्या गांवीं नेलें असलें, तर सीमांतपूजन एखाद्या शेजाऱ्याच्या घरीं करितात. सर्व मंडळी येऊन बसल्यावर मुलीचा बाप मुलाच्या कपाळास गंध व अक्षता लावितो, व त्याच्यापुढें धूपदीप लावून साकर खाण्यास देतो. नंतर शेलापागोटें वगैरे पोषाक देतो; आणि मग सर्व पाहुण्यांस मुलीच्या घराशेजारीं जानवसघरांत नेऊन उतरवितात. ब्राह्मणांप्रमाणें मराठ्यांमध्येंही वाग्निश्चय होतो. त्यासाठीं मुलाचा बाप उपाध्यायास घेऊन मुलीच्या घरीं जातो. तेथें बसल्यावर मुलीचा बाप आपल्या उपाध्यायासह येऊन जवळ बसतो. नंतर उभय पक्षांचे उपाध्याय मंत्र ह्मणून गणपतीची व

कलशाची पूजा करितात. ती झाल्यावर मुलीचा बाप मुलाच्या बापास सांगतो कीं, 'तुमच्या मुलास आह्मी मुलगी देणार.' त्यास मुलाचा बाप 'आह्मी तुमची मुलगी करितों,' असें सर्वांदेखत प्रतिवचन देतो. नंतर ते व्याही परस्परांस नारळ देतात व साकर वाटितात.

रुखवत, वरधांवा आणि वर प्रस्थान.

नवरीच्या घरीं नवरा लग्नास जाण्यासाठीं निघण्यापूर्वीं नवरीचे आईबाप रुखवत घेऊन वाजत गाजत मुलाच्या घरीं जातात. तेथें मुलास गव्हांच्या चौकावर पाट ठेवून त्यावर बसवितात. हें रुखवत गांवचा न्हावी आणितो, आणि त्याच्या पाळ्या नवऱ्यामुलाच्या पाटासभोंवार हारीनें मांडतो. रुखवतांतील सर्व पदार्थ ब्राह्मणांच्या चालीप्रमाणेंच असतात. सबब, त्यासंबंधानें येथें फिरून उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. रुखवत व्यवस्थेशीर मांडून ठेविल्यावर नवऱ्यास पागोटें देतात, त्याच्या कपाळास कुंकू व अक्षता लावितात, दिवे ओंवाळितात, आणि त्यास रुखवत खाण्यास सांगतात. हें झाल्यावर मुलीकडील कांहीं मंडळी व तिचा भाऊ ज्यास **वरधांवा** अशी संज्ञा आहे तो वाजत गाजत मुलाच्या घरीं जाऊन लग्नाचा मुहूर्त जवळ आला, याकरितां नवऱ्यास घेऊन लवकर निघावें, अशी विनंति करितो. नवऱ्यास उत्तम पोषाक घालून त्यास बाशिंग बांधितात, व हातांत एक कट्यार देऊन घोड्यावर बसवितात. गांवचा न्हावी तो घोडा धरून बरोबर चालतो. अगदीं पुढें वाजंत्री, त्यांच्यामागें नवरीकडील पुरुष, त्यांच्यामागें नवऱ्याकडील मंडळी, आणि नंतर नवरा असे हारीनें चालतात. नवऱ्याच्या मागें त्याची बहीण शेल्याचा बुरखा घेऊन व हातांत **शकुनदिवा** घेऊन चालते. तिच्यामागें दुसरी एक बुरखा घेतलेली स्त्री कलश घेऊन चालते. दोन्ही पक्ष गरीब असले, तर त्यांच्या घरच्या बायका नवऱ्याच्या मागून बुरखे घेऊन चालतात; आणि वधूवरें श्रीमंताचीं असलीं तर बायका मेण्यांतून

जातात, किंवा कुणबिणी दोहों बाजूंस पडदे धरितात, व त्यांमधून बायका चालतात.

लग्नसमारंभ.

मुलीच्या घरीं पोंचल्यावर नवरा घोड्यावरून उतरतो. तेथें उपाध्याय मंडपावर जिरें टाकितो. मुलीची आई ताटांत गव्हांच्या पिठाचे दोन दिवे घेऊन त्यास सामोरी येते, व त्यावरून दिवे व तांदुळांचे लाडू ओंवाळून ते लाडू एका बाजूस टाकिते, आणि दिवे नवऱ्याच्या पायाजवळ ठेविते. मुलीच्या घरची दुसरी एक सुवासिनी स्त्री चुना व हळद घातलेलें एक ताम्हनभर पाणी नवऱ्याच्या पायांवर ओतिते, त्यावेळीं तो तिला लुगडें-चोळी देतो. नंतर नवरीचा बाप नवऱ्याच्या हातांत एक नारळ देऊन त्यास हातीं धरून मंडपांत नेतो, आणि बहुल्याजवळ त्याकरितां तयार केलेल्या जागेवर बसवितो. लग्नास आलेले पुरुष मंडपांत जाजमावर बसतात. बायका मेण्यांतून पडदपोशींत उतरून बहुल्याजवळ त्यांच्याकरितां एकेरी कापडाचा पडदा लावून जी जागा तयार केलेली असते, तेथें जाऊन बसतात. मंडपांत मंडळीपुढें नाच चालतो; आणि नोकरलोक बंदुका भरून मुहूर्तावर लग्न लागतांच त्या उडविण्यासाठीं तयार असतात. मुहूर्त येईपर्यंत मुलगी कुलदेवतेपुढें 'चांगला नवरा दे,' अशी प्रार्थना करीत बसते. जोशी घटका पहात घटीपात्रापाशीं बसलेला असतो. त्यानें टाळी वाजवून लग्नघटका भरल्याची खूण करितांच शिंगाड्या शिंग वाजविण्यास तयार असतो. मुहूर्त जवळ आला, ह्मणजे मुलीस घरांतून बाहेर आणितात, आणि नवऱ्याच्या पुढें त्याजकडे तोंड करून तिला उभी करितात. दोघांमध्यें स्वस्तिक काढिलेला अंतःपट धरिलेला असतो. दोन्हीकडील उपाध्याय दोहों बाजूस उभे राहून नवरानवरीस स्वस्तिकाकडे पहात व आपल्या कुलस्वामीचें नांव घेत हात जोडून उभे राहण्यास सांगतात. नंतर मंगलाष्टकें ह्मणून प्रत्येक मंगलाष्टकाच्या अखेरीस 'सावधान' असें ह्मणतात. नवरानवरीवर तांबड्या अक्षता टाकितात, आणि वाजंत्री मंगलवाद्यें वाजवितात. एक भट जमलेल्या मंडळीस अक्षता वाटतो, व दुसरा मुहूर्तावर लग्न लागतांच अक्षता टाक-

ण्याकरितां सर्वांपुढें एक तबक करून त्या गोळा करितो. लग्नघटिका भरतांच जोशी टाळी वाजवितो, शिंगाड्या शिंग फुंकतो, बंदुकवाले बंदुका उडवितात, आणि वाजंत्री मंगलवाद्यांचा एकच गजर करितात. मग उपाध्याय मधला अंतःपट काढितात, नवऱ्याच्या डोळ्यांस घटींतील पाणी लावितात, आणि उभयतां नवरानवरीवर अक्षतांचा भडिमार होऊन त्यांचें लग्न लागतें.

मधुपर्क, कन्यादान, लोकसत्कार, होम, कानपिळा, सप्तपदी व कंकणबंधन वगैरे.

नंतर नवरा बहुल्याजवळ जाऊन बसतो, व नवरी घरांत जाते. नवरीचे आईबाप नवऱ्यासमोर पाटावर बसतात. बाप मुलाचे पाय धुतो, व आई पाणी घालिते. बाप नवऱ्याच्या कपाळीं गंध लावितो, तांदुळांची शेज भरितो, हातांत हुंगण्यास एक फूल देतो, धूप जाळितो, आणि त्याच्या हातावर चाटण्यास मध व दहीं घालतो. याप्रमाणें **मधुपर्क**विधि होतो. नंतर मुलीचा मामा मुलीस आणून तिचा उजवा हात मुलाच्या हातांत देऊन तो त्याजकडून दोहों हातांनीं घट्ट धरवितो. उपाध्याय मुलाच्या हातावर आपले दोन्ही हात धरून मंत्र ह्मणतो. मुलीचा बाप गणपति व कलश ह्यांची गंध, फूल, धूप, दीप आणि नैवेद्य इत्यादिकांनीं पूजा करितो; व मुलामुलीच्या हातांवर कलशांत कांहीं द्रव्य घालून त्यांतील पाणी ओतितो, ह्मणजे **कन्यादान** आटोपलें. नंतर जमलेल्या मंडळीस पानसुपारी व अत्तरांचे फाये वाटितात; आणि ते निरोप घेऊन आपापल्या घरीं जातात. मग उपाध्याय नवऱ्याकडून नवरीच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधवून त्यांच्या पदरांस गांठ मारितो. नंतर बहुल्यावर पाट मांडून त्यांवर नवरानवरीस बसवितात. नवरी नवऱ्याच्या डाव्या बाजूस बसते. नंतर अग्नीला तूप, तीळ, कापूस व पळसाच्या समिधांचीं अवदानें देऊन ब्राह्मणाप्रमाणेंच **होम** करितात. मुलीचा भाऊ मुलाचा कान पिळतो, व त्यास नवऱ्याकडून **कानपिळ्या**चें पागोटें मिळतें. नंतर नवरानवरी उठून अग्नीस सात प्रदक्षिणा घालितात,

म्हणजे **सप्तपदी** झाली. पुढें तीं उभयतां एकमेकांच्या हातांत **कंकणें** बांधून जोडप्यानें घरच्या देवाच्या पायां पडतात, म्हणजे लग्नविधि संपला. लग्न झाल्यापासून वरात जाईपर्यंत नवरा नवरीच्या घरीं राहतो, व त्यास रोज मेजवानी करितात. तो पुरुषांबरोबर सोप्यामध्यें असतो, व नवरी घरामध्यें बायकांत असते.

सुपारी खेळणें, हळद तोंडांत घालणें, मंगलस्नान, फराळ व गोडें जेवण.

दुसऱ्या दिवशीं नवऱ्याकडच्या मंडळीस नवरीकडून एक मोठी मेजवानी देण्यांत येते. सकाळीं नवरानवरी सुपाऱ्या खेळतात. नंतर त्यांच्या अंगास तेल, हळद, व सुगंधि द्रव्यें लावितात. मग नवऱ्यास बहुल्यावर बसवून त्याच्यामागें नवरी हातांत हळदीची पूड घेऊन उभी राहते, आणि त्याच्या तोंडांत हळद कोंबण्याचा यत्न करिते. नवरा आपलें तोंड घट्ट मिटून घेतो, व त्यांत नवरीला हळद घालूं देत नाहीं. जर त्याच्या तोंडांत नवरीनें थोडीशी हळद घातली, तर मौज पाहणारी मंडळी त्यास हांसतात व 'भूक लागली होती कीं काय ?' असें थट्टेनें विचारितात. नंतर नवरीला बहुल्यावर बसवून नवराही तिच्या तोंडांत हळद घालण्याचा यत्न करितो. पुढें नवरा आपल्या हातांत सुपारी घट्ट धरून ती नवरीकडून सोडवितो. ह्यावेळीं दोघांमध्यें बरीच झटपट होते. नवऱ्याप्रमाणें नवरीच्या मुठींतही सुपारी धरवून ती त्याजकडून सोडवितात, ती त्यानें सोडून घेतली नाहीं, तर ती त्याला नवरीजवळ मागावी लागते; आणि असें झाल्यास बायका त्यास हांसतात. असो. हे सोहळे झाल्यावर त्या उभयतांस स्त्रिया मंगलस्नान घालून उंची वस्त्रें परिधान करवून फराळ घालितात. इकडे नवरीकडील कांहीं मंडळी वाजत गाजत जाऊन नवऱ्याकडील मंडळीस भोजनाचें निमंत्रण देतात. दोनप्रहरीं पुन्हां वाजत गाजत बोलावणें पाठवून त्यांस घेऊन येतात, व **गोडें जेवण** घालितात.

संध्याकाळीं नवरीची आई **सूनमुखा**चा सोहळा करविते. तो असा कीं, ती कांहीं बायकांस घेऊन वाजत गाजत नवऱ्याच्या आईस बोलावूं जाते. मग वरमाता आपल्या पक्षाच्या बायकांस व उपाध्यायास घेऊन वाजत गाजत नवरीच्या घरीं येते. तिनें आपल्या बरोबर तिळांचे लाडू, हरभऱ्याच्या दाळीचे लाडू, सुपाऱ्या, खोबऱ्याच्या वाट्या, खारका, साडी, चोळी, दागिने, मेवामिठाई व कांहीं फळें पाट्यांत भरून आणिलेलीं असतात. येतांना वाटेंत ती रुसते व परत जाऊं लागते. तेव्हां नवरीची आई तिला लुगडेंचोळी देऊन तिची समजूत घालिते. ह्याच समयीं ती परटिणी-कडून रस्त्यांत पायघड्या घालवून त्यांजवरून वरमातेस व तिच्या मानकरि-णींस चालवून वाजत गाजत आपल्या घरीं घेऊन येते. त्या तेथें आल्यावर उपाध्याय कलश व गणपति ह्यांची पूजा करितो; आणि वरमाता आपल्या नवीन सुनेस साडी नेसवून तिच्या अंगावर दागिने घालिते व तिच्या तोंडांत साखरेचे खडे देते. नंतर **झाली**चा विधि पुढें लिहिल्याप्रमाणें होतो.

वधूस नजराणा, वरमातेस पायघड्या, व सूनमुखाचा सोहळा.

एक पसरट हाऱ्यांत कोरें फडकें पसरून त्यावर नऊ खारका, नऊ खोबऱ्याच्या वाट्या, नऊ हळकुंडें आणि थोडेसे तांदूळ व शिजविलेलें अन्न ठेवितात. उपाध्याय त्या हाऱ्याची गंधा-क्षतपुष्पादिकांनीं पूजा करून त्यास नैवेद्य दाखवितो. नंतर नवरानवरीच्या पदरांस गांठी मारून त्यांजकडून त्या हाऱ्यास पांच प्रदक्षिणा करवितात. मग तो हारा नवरानवरीच्या अगदीं जवळच्या आप्तांच्या डोक्यावर देतात, आणि मुलगा व मुलगी ह्यांस त्यांच्या मांडीवर देऊन त्यांजकडून त्या जोड-प्याच्या तोंडांत खडीसाकर घालवितात, म्हणजे झालीचा विधि आटोपला.

झालीचा विधि.

पुढें **वरा**तीची मिरवणूक निघते. नवरीस उंची वस्त्रें परिधान करवून व बुरखा देऊन नवऱ्याच्या समोर पालखींत बसवितात, त्यांज-वर चाकरमाणसें अबदागीर धरितात व चवऱ्या वारितात.

वरात.

गरीब मराठ्यांमध्यें नवरानवरीस घोड्यावर बसवितात, व न्हावी घोड्याचा लगाम धरून चालतो. नवऱ्याची बहीण मेण्यांत किंवा बुरखा घेऊन घोड्यावर बसून नवऱ्याच्या वाहनामागें चालते. त्यांच्या मागें आप्त, सोयरे, वगैरे चालतात, आणि सर्वांपुढें वाजंत्री वाद्यें वाजवीत चालतात.

लक्ष्मीपूजन, मानकऱ्यांस पोषाक व शेवटची खाटी मेजवानी.

वरात नवऱ्याच्या घरीं पोहोंचल्यावर नवरानवरी वरच्या देवांस आणि वडील माणसांस नमस्कार करितात. नंतर लक्ष्मीपूजन होऊन नवरीकडील मानकऱ्यांस पोषाक देतात. शेवटीं नवऱ्याच्या घरीं नवरीकडच्या मंडळीस मेजवानी होते. मराठ्यांत **गोडी** व **खाटी** असे मेजवानीचे दोन प्रकार आहेत. देवकाची स्थापना झाल्यापासून लग्न आटोपून देवकोत्थापन होईपर्यंत गोडी मेजवानी चालते. नंतर खाटी ह्मणजे जींत मांसादि पदार्थ असतात, ती मेजवानी होते. खाट्या मेजवानीमध्यें मराठे आपला सर्व पोषाक घालून व जवळ तरवार* ठेवून जेवावयास बसतात.

वर वर्णिलेल्या सोहळ्यांशिवाय ह्या लोकांत **तोंडधुणें, रासन्हाणें,** वगैरे जे जे सोहळे आहेत, ते बहुतेक पूर्वी ब्राह्मणांच्या लग्नपद्धतींत सांगितलेल्या सोहळ्यांप्रमाणेंच असतात. सबब त्यांची येथें पुनरुक्ति केली नाहीं.

पुनर्विवाह व बहुपत्नीकत्व.

गॅझीटियरकर्ते ह्मणतात, मराठ्यांत विधवेचें लग्न होत नाहीं. एका स्त्रीस अनेक नवरे करितात, हें त्यांस माहित सुद्धां नसतें. परंतु एकच पुरुष अनेक बायका करूं शकतो.

---

* हा रिवाज पूर्वी असेल. परंतु हल्ली तरवार बाळगण्यास परवाना (लेसन) लागतो ! तेव्हां तो ज्यांजपाशीं आहे असे सरदार खेरीज करून बाकीचे नुसता जामानिमा करूनच बसत असतील असें वाटतें !

लिंगाइतांचा लग्नविधि.

लिंगाइतांची थोडीशी पूर्व-पीठिका.

लिंगाईत किंवा **लिंगवंत** हे लोक शिवलिंग धारण करणारे, अर्थात् शैव पंथाचे आहेत. ह्या लोकांची वसती महाराष्ट्रांत बेळगांव, धारवाड, विजापूर वगैरे जिल्ह्यांत व कोल्हापुर संस्थानांत अळतें, गडइंग्लज, व शिरोळ या पेटघांत आहे. लिंगाइतांचा पंथ बाराव्या शतकांत उदयास आला. विजापूरच्या आग्नेयीस २२ मैलांवर बागेवाडी ह्मणून गांव आहे, त्याजवळील इंगळेश्वर गांवचा 'आराध्य,' ह्मणजे शैव ब्राह्मणाचा मुलगा **बसव**, हा या पंथाचा संस्थापक होय. कोणी लिंगाइत असें ह्मणतात कीं, लिंगाची पूजा फार प्राचीन काळापासून लोक करीत होते; आणि **बसवानें** हा पंथ नवीन स्थापन केला नसून केवळ जुन्या पंथाचें पुनरुज्जीवन केलें. दक्षिणेंतील कित्येक लोक फार प्राचीन काळापासून लिंग धारण करीत होते, असें दिसतें; कारण, शिवाच्या देवालयांत जे गुरव पुजारी असतात, त्यांपैकीं पुष्कळ जरी लिंगाईत पंथी नसले, तरी ते लिंग धारण करितात. त्यांपासून किंवा दुसऱ्या कोणत्या तरी लोकांपासून आराध्य ब्राह्मणांनीं आपल्या बाहूभोंवतीं लिंग धारण करण्याची चाल स्वीकारिली असावी. आपल्या पंथाच्या सर्व लोकांनीं लिंग धारण करावें, अशी वहिवाट **बसवानें** घातली, व त्याप्रमाणें लिंगाईत स्त्रीपुरुष लिंग धारण करितात, आणि कपाळीं विभूति लावितात. **बसवाचे** अनुयायी त्यास नंदीचा अवतार समजतात. कित्येक ह्मणतात कीं, त्यानें मुंजींत जानवें

घालण्याचें नाकबूल केलें, व कोणी ह्मणतात कीं, त्यानें गायत्री ह्मणण्याचें नाकारिलें, त्यामुळें त्यास बापानें घरांतून घालविलें. जैन लोकांत अशी दंतकथा आहे कीं, **बसव** रजस्वलेच्या हातचें जेवला, म्हणून त्यास बहिष्कार घालण्यांत आला; तेव्हां त्यानें हा लिंगाईत म्हणून आपला नवीन पंथ स्थापन केला. असो. ह्या पंथाचें मूलतत्त्व असें आहे कीं, 'लिंगाईत तितके सर्व समान.' त्यांत जातिभेद मुळींच नाहीं. ब्राम्हणांच्या सोळा संस्कारांऐवजीं लिंगाइतांत **लिंगधारण, जंगमदीक्षा,** आणि **शुद्धीकरण,** असे तीन संस्कार करण्यांत येतात. तथापि, ते ब्राम्हणांच्या किंवा जैनांच्या कोणत्याही संस्कारांशीं मिळत नाहींत. हिंसा न करणें, मद्य, मांस, यांचें सेवन न करणें, आणि मरणोत्तर मनुष्याचें श्राद्धादि कांहीं एक कर्म न करणें, ह्या तीन गोष्टींत मात्र लिंगाईत व जैन ह्यांचें फार साम्य आहे. निरनिराळ्या जातींचे व धंद्याचे लोक ह्या पंथांत शिरल्यानें त्यांत अनेक वर्ग झाले आहेत. त्यांपैकीं जंगम, वाणी, आणि पंचम किंवा पंचमसाळी, हे तीन वर्ग प्रमुख आहेत. जंगम हे लिंगाइतांमध्यें श्रेष्ठ व फार पूज्य मानिले जातात, व त्यांच्यांतील मुख्यास '**स्वामी,**' व इतरांस **बगी** असें म्हणतात. हेच लोक लिंगाइतांचे उपाध्याय व धर्मोपदेशक असतात; व ते समंत्रक विधीनें सर्वांचे धर्मसंस्कार करितात, आणि वधूवरांचीं लग्नें लावितात. संप्रदायपरत्वें जंगम लिंगाइतांच्या पांच मुख्य शाखा आहेत. एकोरामाराध्य, मरुलाराध्य, पंडिताराध्य, रेवनाराध्य, व विश्वाराध्य. ह्यांपैकीं विवक्षित संप्रदायाच्या एकाच भेदाच्या जंगमांत परस्पर लग्नें होत नाहींत.

१ मुलीचें लग्न तिला न्हाण येण्यापूर्वी ह्मणजे ती सुमारें दहा वर्षांची झाल्यावर करितात. लग्नाचा निश्चय झाल्यावर जंगम ज्योतिषी मुहूर्त ठरवितो. मुलामुलीच्या घरापुढें मंडप घालितात. मंडपाचा पहिला खांब मुहूर्तावर पुरितात. लग्नसमारंभ बहुतकरून

विडे घालणें.

चार दिवस चालतो.* पहिल्या दिवशीं 'विडे घालणें' हा समारंभ होतो. ह्मणजे या दिवशीं परस्परांस विडे देतात, व यावरून लग्नाचा पक्का ठराव झाला, व तो मोडतां येणार नाहीं असें समजतात. या दिवशीं मुलीच्या अंगावर कांहीं दागिने घालून तिला जंगम आणि जातींतील दुसरे प्रतिष्ठित गृहस्थ यांच्या समक्ष खडीसाकरेचे खडे खावयास देतात.

---

* विजापूर जिल्ह्यांत जे अस्सल लिंगाईत आहेत, त्यांच्या चालीरीति इतर लिंगाइतांच्या चालीरीतींहून बऱ्याच भिन्न आहेत. तथापि, त्या आह्मांस मागून उपलब्ध झाल्यानें येथें संक्षेपतः सांगतों. त्या लिंगाइतांत बालविवाह प्रशस्त मानितात. कदाचित् लग्नापूर्वी मुलीस ऋतु प्राप्त झाला तर ती गोष्ट फार गुप्त ठेवितात. नवरानवरी पसंत करणें, हें सर्वस्वी आईबापांच्या खुषीवर अवलंबून असतें. लग्नाविषयींचा प्रश्न प्रथमतः वरपक्षाकडून करण्यांत येतो. कार्यास खर्च अगदीं थोडा लागतो. कारण, मुलीला उलट हुंडा द्यावा लागत नाहीं. सोयरीक नवरीच्या घरीं जंगमांच्या व जातिबांधवांच्या समक्ष जमवितात. त्या प्रसंगीं मुलास व मुलीस अरसपरस पोषाक देण्यांत येतात. नंतर जंगम सर्वजणांस हीं नवरानवरी नक्की झालीं, असें सांगतो. ह्या कृत्यास **साक्षीविडे** अशी संज्ञा आहे. ह्याच्या दुसऱ्या दिवशीं **वाङ्गतनी** ह्मणून सोहळा होतो. त्यांत नवरीचा बाप वरपक्षास मेजवानी व पोषाक देतो; व त्यांची सीमांतापर्यंत मिरवणूक काढितो. नंतर लग्न व तत्संबंधीं कृत्यांचे मुहूर्त नक्की करून ते मुलीच्या बापास कळविण्यांत येतात. हळद कुटणें व दळणें हीं कृत्यें सामान्यतः ब्राह्मणां प्रमाणेंच आहेत हळद तयार झाल्यावर मंडप घालितात. लग्नकार्य पांच दिवस पर्यंत चालतें. लग्न मुलीच्या घरीं न लावतां मुलाच्या घरीं लावितात. पहिल्या दिवशीं हळदीचा सोहळा ह्मणजे **अरशन** करण्यांत येतो. जंगम व प्रथम वराच्या सुवासिनीं यांनीं वधूवरांस हळद लाविल्यावर तीं उभयतां एकमेकांस हळद चोपडितात. हें झाल्यावर त्या मुलामुलीस पतिपत्नी—मदुमकलू— असें समजतात. अरशनच्या दुसऱ्या दिवशीं **देवकार्य** करितात. त्यांत लग्नांत देण्याचे पोषाक घरच्या देवांजवळ मांडून त्यांची पूजा, व गुरूंची पादपूजा, हीं कृत्यें केलीं जातात. गुरूंचें पादोदक, नवरानवरीसुद्धां सर्वजण पितात. पुढें तिसऱ्या दिवशीं, ज्यांचे वीरभद्र हें कुलदैवत आहे अशा घराण्यांत मात्र **गुग्गुळ** समारंभ होतो. इतरांत तो करीत नाहींत. गुग्गुळाची मिरवणूक **बसवण्णाच्या** मंदिरास नेतात. तींत नवरानवरींच्या हातीं वीरभद्राची मूर्ति दिलेली असते, व जंगम गुग्गुळपात्र घेऊन चालतो. चवथ्या दिवशीं लग्न ह्मणजे **मंगलसूत्रबंधन** होतें. हें कृत्य गुरु, मठदय्या, व पंचाचारु, ह्यांच्या प्रमुखतेखालीं केलें जातें. लग्न लावितांना

दुसऱ्यादिवशीं **गणपतिपूजन**, **हळदी**, आणि **गुग्गुळ**, असे तीन संस्कार होतात. गुग्गुळास नवरी किंवा नवरा, आणि त्यांच्या आया यांना यावें लागतें. मातीच्या दोन घागरी घेऊन त्यांचीं बुडें फोडून त्या तोंडावर उलटया ठेवितात, व त्यांत राख भरून त्या राखेंत दोन काड्यांस तेलांत भिजविलेल्या चिंध्या गुंडाळून ते कांकडे रोंवितात; आणि त्यांवर गुलाल बुक्का घालून, गंध लावून माळा घालितात. अशा रीतीनें तयार केलेल्या त्या दोन शेगड्या दोन जंगम किंवा आप्त आपल्या हातांत किंवा डोक्यावर घेऊन नाचत नाचत व पुष्कळ मंडळीसह मोठ्या थाटानें वाजत गाजत गांवाबाहेर नदीवर किंवा विहिरीवर जातात. तेथें गेल्यावर त्या दोन्ही शेगड्या जमिनीवर ठेवून त्या कुटुंबांतील मुख्य मनुष्य, बरोबर जो स्वामी आला असेल, त्याचे पाय धुवून पादपूजा करितो, त्यास नारळ व दक्षिणा देतो, आणि त्याच्यापुढें साष्टांग नमस्कार घालितो. स्वामीची पूजा आटोपल्यावर शेगड्यांतील कांकडे विझवून त्या शेगड्या फोडून टाकितात. जी मंडळी बरोबर आली असेल, त्या सर्वांस पानसुपारी देतात, व जंगमांस दक्षिणा वाटितात. नंतर सर्व मंडळी वाजंत्री न वाजवितां मुकाट्यानें घरीं येतात. हा गुग्गुळसंस्कार पूर्वी फक्त वीरभद्रास नवस केला असला, तरच करीत असत. परंतु, आतां बहुतेक लिंगाईत घराण्यांत **गुग्गुळ** हा लग्नाचा एक आवश्यक भाग झाला आहे.

गणपतिपूजन, हळदी, व गुग्गुळसंस्कार.

नवरानवरीस घोंगडीवर तांदळांचा चौक घालून त्यावर एकमेकांशेजारीं बसवितात. त्यांजमध्यें अंतःपट धरीत नाहींत. लग्नांतील प्रमुख कृत्य मंगलसूत्रबंधन हें असतें, व तें बसवाच्या मूर्त्तिसन्निध गणाचारी जंगम करितो. त्या मंगलसूत्रास पूर्वी दूध तूप, भस्म व कुंकू ह्यांनीं संस्कृत करण्यांत येतें. मंगलसूत्र बांधतांना ‘ सुमुहूर्त सावधान ’ असा जयघोष करितात. नंतर नवरानवरीस कंकणें बांधितात. तदनंतर तीं उभयतां गुरूच्या पायां पडतात, व तो त्यांच्या तोंडांत साकर घालितो. जंगमांस दक्षिणा देतात. पांचव्या दिवशीं सायंकालीं नवरानवरी मोठ्या थाटानें मिरवत बसवाच्या देवळास जाऊन येतात. मिरवणुकीची चाल ब्राह्मणांप्रमाणेंच आहे.

लिंगाइतांची चाल पाहून महाराष्ट्रांतील कित्येक मराठ्यांत व ब्राह्मणांतही हा गुग्गुळसमारंभ रूढ झाला आहे! मात्र त्यांत भेद ह्मणून इतकाच कीं, ब्राह्मण आणि मराठे यांचा गुग्गुळ जात असतां आपच शेगड्या नेतात; आणि स्वामीची पूजा करीत नाहींत. इतर सर्व प्रकार वर सांगितल्या प्रमाणेंच होतो. असो.

देवकपूजा, वरप्रस्थान आणि लग्न.

तिसऱ्या दिवशीं **देवकपूजा** करितात. सर्व लिंगाइतांचें देवक एकच असतें. तांदूळ, विडा, हळकुंडें, आणि झांकण घातलेला मोघा हे जिन्नस एका सुपांत ठेवून त्यास देवक मानून त्याची प्रतिष्ठा वगैरे करितात. मोघ्यांत पाणी व पैसे घालून त्यावर झांकण ठेवून त्यास सुतानें वेष्टितात. कधीं कधीं देवकसमारंभ लग्नापूर्वी एक दोन दिवस होतो. देवकपूजा व स्थापना झाल्यावर नवऱ्यास स्नान घालून त्याच्या कपाळीं भस्म लावितात; आणि त्यास उंचीं वस्त्रें परिधान करवून त्याच्या डोक्यास भेंडाचें (बोरूच्या आंतील गीराचें) बाशिंग बांधितात. लग्न बहुधा संध्याकाळीं होतें; आणि त्यापूर्वी तास किंवा दोन तास नवरा पुष्कळ मंडळीसह वाजत गाजत नवरीच्या घरीं जाण्यास निघतो. लिंगाइतांच्या लग्नांत लग्नमुहूर्त बरोबर समजण्यासाठीं पाण्यांत घटीपात्र ठेवीत नाहींत. मुहूर्ताची वेळ कोणी तरी पोक्त मनुष्य अजमासानें सांगतो! नवरा नवरीच्या घरीं गेल्यावर चौकाच्या चोहोंबाजूस चार कळश ठेवून त्यांमध्यें दोन पाट जवळ जवळ मांडिलेले असतात. त्यांवर नवरानवरीस बसवितात. मुलगी पांढऱ्या रंगाचें साधें वस्त्र नेसलेली असते. त्या उभयतांच्या अंगावरील वस्त्राच्या पदरांस गांठ मारितात. लग्नास आलेल्या मंडळीस अय्या थोडथोड्या अक्षता देऊन कांहीं मंत्र ह्मणतो. तो मंत्र ह्मणत असेपर्यंत लोक नवरानवरीच्या डोक्यावर अक्षता टाकितात. त्यावेळीं वाद्यें वाजवितात, व बंदुकांचे बार काढितात. अय्याचें ह्मणणें आटोपल्यावर काव्या

रंगाच्या मुहूर्तगळेसऱ्या नवरीच्या गळ्यांत बांधितात. नंतर नवरानवरीस जोडप्यानें घरच्या देवाच्या पायां पडवून त्यांच्या वस्त्रांची गांठ सोडितात.

वधूप्रवेश.

चवथ्या दिवशीं रात्रीं नवरानवरीस बैलावर बसवून मोठ्या थाटानें मिरवीत मिरवीत मठास नेतात. अलीकडे नवरानवरीला घोड्यावर बसवून नेण्याचा प्रघात पडला आहे. परंतु, ही गोष्ट जुन्या मतांच्या धार्मिक लिंगाइतांस मोठी दुःखास्पद वाटते! असो. मठांत गेल्यावर उभयतां वधूवरें स्वामीपुढें नारळ ठेवून त्यांस साष्टांग नमस्कार घालितात. हें झाल्यावर पुन्हां वाहनारूढ होऊन नवरी नवऱ्यासह मोठ्या थाटानें मिरवत त्याच्या घरीं जाते.

व्याहीभोजन व लग्नसंबंधीं इतर माहिती.

पांचव्या दिवशीं व्याह्यांस जेवण घालतात, आणि जंगम वगैरे लोकांस भिक्षा व दक्षिणा वाटितात. नवरानवरी मिरवत असतां वाटेंत जीं ठिकाणें भुतांखेतांची बाधा होण्याचीं असतील तेथें नारळ फोडून त्यांचीं अर्धशकलें भुतांस टाकण्याची चाल आहे. श्रीमान् घराण्यांत मुलाच्या लग्नास सुमारें २००० रुपये खर्च येतो. यांपैकीं १००० रुपयांचे दागिने मुलीच्या अंगावर घालितात; ३०० रुपयांचें कापड, ३०० रुपये धर्मादाय, आणि ४०० रुपये अन्न व इतर खर्च होतो. मध्यम स्थितींतल्या घराण्यांत मुलाच्या लग्नास ४०० रुपये खर्च येतो. त्यांपैकीं मुलीच्या अंगावर २०० रुपयांचे दागिने घालितात, १०० रुपयांचें कापड लागतें, २५ रुपये धर्मादाय खर्च, आणि ७५ रुपये अन्न व इतर खर्च होतो. गरीबांच्या घरीं मुलाच्या लग्नास २०० रुपये खर्चितात. त्यांत ५० रुपये दागिन्याकडे, ७५ रुपये कापडाकडे, १० रुपये धर्मादाय आणि ६५ रुपये अन्न व इतर खर्चाकडे जातात. मुलीच्या लग्नास मुलाच्या लग्नापेक्षां कमी खर्च लागतो; व तो २५ पासून ३०० रुपयांपर्यंत येतो. २५ रुपयांपासून ५० रुपयांपर्यंत वरदक्षिणा देतात; व नवऱ्या

मुलास यथाशक्ति कपडे, कंठी, आंगठी, वगैरे देतात. नवऱ्याच्या आईस व इतर आप्त स्त्रियांस लुगडीं, चोळ्या, आणि नवऱ्याचा बाप व भाऊ यांस पागोटीं देतात.

पुनर्विवाह.

जंगम, शीलवंत, आणि लोकवंत यांत विधवाविवाह होत नाहीं. पंचम मात्र कधीं कधीं विधवेशीं लग्न करितात. लिंगाईत न्हावी, तेली, कुंभार, परीट आणि महार ह्यांजमध्यें विधवाविवाहास प्रतिबंध नाहीं; व ते त्यांच्यांत नेहमीं होतात. लिंगाइतांच्या विधवेस हव्या त्या रंगाचें लुगडें नेसण्यास व चोळी घालण्यास हरकत नसते. तिचें केशवपन करीत नाहींत; आणि जोडवीं मंगळसूत्र व नथ यांशिवाय बाकीचे दागिने घालण्यास तिला मनाई नसते. तथापि, तिला अभद्र समजतात; आणि लग्नादि मंगलकार्यांत तिला बोलवीत नाहींत.

दक्षिणेंतील जैनलोकांचा लग्नविधि.

ह्या जैनांच्या चालीरीतीविषयीं एक सूचना.

हे लोक मूळचे **वैश्य** वर्णाचे आहेत. ते आपणांस जरी **जैन** ह्मणवीत असले, तरी महाराष्ट्रांत त्यांचें वास्तव्य फार झाल्यानें त्यांच्या पुष्कळ चालीरीति एतद्देशीय हिंदूंच्या चालीरीतीनीं मिश्र झालेल्या आहेत. ह्यांच्या इतक्या गुजरातेंतील जैनांच्या चालीरीति संकीर्ण झाल्या नसाव्या, असें आह्मांस वाटतें. सबब, तिकडील जैनांच्या लग्नविधि व सोहळ्यांवर आह्मीं जास्त विश्वास ठेवून ह्यांच्या लग्नकृत्यांचें तांत्रिक वर्णन करीत आहों.

मागणीची रीति.

पंधरा आणि पंचवीस वर्षांच्या दरम्यान मुलांचीं, आणि न्हाण येण्यापूर्वी मुलींचीं लग्नें करितात. जैनांत साधारण नियम असा आहे कीं, मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे **मागणी** करितो; आणि जेव्हां त्यांचें ठरतें, तेव्हां ते ज्योतिष्यास सल्ला विचारितात. तो, मुलगा व मुलगी यांच्या जन्मपत्रिका पाहून जर त्यांचीं गोत्रें व शाखा भिन्न असतील, आणि लग्न मंगलकारक होईल असें त्यास वाटेल, तर लग्न करण्यास संमति देतो. नंतर एक मुहूर्त पाहून मुलाचा बाप कांहीं मित्र व पांच आप्त बायका यांस बरोबर घेऊन मुलीच्या घरीं जातो, आणि मुलीचे आईबाप त्याचा सत्कार करितात. मुलीस घरच्या देवापुढें पाटावर बसवितात, व तिच्या डोक्यावर एक फुलांची जाळी घालितात. नंतर

मुलाच्या घराहून आलेल्या बायका मुलीस साडीचोळी नेसवितात, पायांत साखळ्यावाळे घालितात, आणि मुलाचा बाप तिच्या तोंडांत साखर घालितो. नंतर जमलेल्या मंडळीस साखरेचे पुडे व सुपाऱ्या वाटतात; आणि सोयऱ्यांस मेजवानी करितात, ह्मणजे **मागणीचा** समारंभ आटोपला.

मुहूर्तनिश्चय जलदेवतेची पूजा व अंकुरार्पण.

बहुतकरून मागणी झाल्यावर दोन किंवा तीन वर्षांनीं लग्न होतें. दरसाल मुलाच्या बापास मुलीच्या घरीं खोबऱ्याच्या वाट्यांची माळ व कांहीं पोहे असे नागपंचमीच्या दिवशीं पाठवावे लागतात; आणि याप्रमाणें मुलीस न्हाण येईपर्यंत करावें लागतें. मुलगा पंधरासोळा वर्षांचा झाला, ह्मणजे मुलामुलींचे आईबाप आतां लग्न करण्याचा काल झाला असें समजून जैन ज्योतिष्यास बोलावून मुहूर्त विचारितात. तो उभयतांच्या पत्रिका व पंचांग पाहून लग्नास मुहूर्त सांगतो. जैनाचा लग्नसमारंभ बहुधा पांच दिवस चालतो. पहिल्या दिवशीं मुलीच्या घरच्या दोन लग्न झालेल्या मुली सकाळीं स्नान करून उंची पोषाक करितात, व डोक्यावर तांब्याच्या घागरी घेऊन कांहीं पुरुषांसह वाजत गाजत तळ्यावर किंवा नदीवर जातात, आणि तेथें कांठावर **जलदेवतेची** गंधफूल अक्षता व कुंकूं घालून, धूपदीप आणि नैवेद्य दाखवून पूजा करितात. नंतर पाण्यानें भांडीं भरून त्यांस कुंकूं लावितात. त्यांच्या तोंडावर विड्याचीं पानें व नारळ ठेवून त्यांच्या सभोंवार चोळ्या गुंडाळितात; आणि त्या भांड्यांस पुतळ्यांच्या माळा घालून शृंगारितात. नंतर तीं भांडीं डोक्यावर घेऊन वाजत गाजत घरीं येतात; आणि तीं बहुल्यावर ठेवितात. तेथें गंधफूल घालून कुंकूं लावून आणि धूपदीप दाखवून त्यांची पूजा करितात. पांच ताटें मातीनें भरून त्यांपुढें ठेवितात, त्यांवर भांड्यांतील पाणी शिंपडितात, आणि ताटांत मिश्र धान्य पेरितात. नंतर इष्टमित्रांस जेवण घालितात, ह्मणजे **अंकुरार्पण** संस्कार संपला.

पहिल्या दिवसाचीं कांहीं इतर कृत्यें.

नंतर नवरा आपल्या घरीं स्नान करितो, आणि उंची पोषाक घालून घोड्यावर बसून इष्टमित्रांसहवर्तमान वाजतगाजत नवरीच्या घरीं जातो. याच वेळीं बरोबर काकडचोपड, दागिने, साकर, आणि विडे वगैरे नेतात. मुलीकडची मंडळी नवऱ्यास सामोरी येऊन मुलीच्या घरीं नेतात, आणि घराबाहेर औदुंबराच्या 'कट्टया'-वर बसवितात. मुलीचे आईबाप पाण्याचें भांडें घेऊन बाहेर येतात. बाप आपल्या भावी जांवयाचे पाय धुतो, आणि आई पाणी घालिते. नंतर नवऱ्यास घरांत नेऊन चौरंगावर बसवितात, आणि त्यास कपडे, अंगठी, व कंठी देतात. नवऱ्याचे आईबाप बरोबर आणिलेलीं वस्त्रें व दागिने नवरीस देतात, आणि तेथें असलेल्या आप्तसोयऱ्यांस व इष्टमित्रांस साखरेचे पुडे व पट्टया वाटितात. मग नवऱ्याकडील मंडळीस मेजवानी होते. हा पहिल्या दिवशींचा समारंभ आटोपल्यावर नवरा सर्व मंडळीसह घरीं परत येतो.

दुसऱ्या दिवसाचीं कृत्यें.

दुसऱ्या दिवशीं त्याच्या अंगास हळद व तूप लावितात, व एक चौक करून त्याच्या चाऱ्ही कोपऱ्यांस चार मातीचीं भांडीं ठेवून त्यासभोंवतीं पिंवळें सूत पांचवेळ गुंडाळितात, आणि त्या चौकांत पांच सुवासिनी त्यास न्हाऊं घालितात. नवरीसही आपल्या घरीं अशाच चौकांत न्हाऊं घालितात.

तिसऱ्या दिवसाचीं कृत्यें.

तिसऱ्या दिवशीं नवरानवरी स्नान करून व धूत वस्त्रें नेसून आपापल्या घराहून देवळांत जाऊन एकत्र मिळतात. बरोबर उपाध्याय असतात. नवरानवरी देवाच्या पायां पडतात. नंतर उपाध्याय त्यांजकडून पंचस्तुतिमंत्र जो सर्व जैनांस येत असतो, तो ह्मणवितो, आणि सदाचरणानें आयुष्यक्रमण करण्याविषयीं व हिंसा न करण्याचें जें जैनलोकांचें व्रत तें पाळण्याविषयीं त्यांस बजावितो.

नंतर नवरानवरीस त्यांचे नातलग खाऊ देतात, आणि त्या उभयतांच्या घरीं घरच्या देवांची व बाशिंगाची पूजा करण्यांत येते. दोहों घरच्या पुरुषबायका वाजत गाजत जाऊन इष्टमित्रांस व आपल्या सोयऱ्यांस जेवावयास बोलावितात. दोनप्रहरीं सर्व एकत्र मिळतात; आणि बायका मंडपांत व पुरुष घरांत बसून सर्व एके वेळीं जेवतात.

चौथ्या दिवसाचीं कृत्यें.

चौथ्या दिवशीं खऱ्या लग्नसमारंभास आरंभ होतो. इष्टमित्रांस व आप्त सोयऱ्यांस दोहों घरीं बोलावितात. नवऱ्यास सुवासिक तेलें लावितात. आपल्या पंधरा सोयऱ्यांसहवर्तमान तो होम करून उंची कपडे घालितो, व पुन्हां घोड्यावर बसून वाजत गाजत मित्रांसहवर्तमान नवरीच्या घरीं जातो. वाटेंत नवरीकडील मंडळी भेटते. ती नवऱ्यास घेऊन उंबराच्या 'कट्ट्या'वर नेऊन बसविते. तेथें मुलीचे आईबाप येऊन त्याचे पाय धुतात. नवरा आचमन करून नवरीचा उपाध्याय जें जानवें देतो तें घालितो, आणि नवरीचे आईबाप त्याच्या हातावर साकर व दहीं घालितात तें तो चाखितो. तेथून नवरीचा बाप नवऱ्यास हातांत धरून घरांत जी जागा तयार केली असेल तेथें नेतो. या जागेपुढें अंतःपट धरलेला असतो, आणि त्याच्या दोहोंबाजूस स्वस्तिकें काढिलेल्या व दर्भांनीं आच्छादिलेल्या अशा दोन तांदळांच्या राशी असतात. मुहूर्ताच्यापूर्वी कांहीं वेळ मुलीस तिच्या सोबतीणी बाहेर आणून तांदुळांच्या एका राशीवर अंतःपटाच्या मागें उभी करितात; आणि नवरा दुसऱ्या बाजूस तांदळांच्या राशीवर उभा राहतो. लग्नास आलेली मंडळी सभोंवार उभी राहते, आणि उपाध्याय नवग्रहमंगलाष्टकें ह्मणतात. घटीपात्राजवळच जोशी मुहूर्तघटिका भरतांच टाळी वाजवितो, बाजंत्री खूब जोरानें वाद्यें वाजवितात, उपाध्याय अंतःपट काढितात, आणि नवरानवरी एकमेकांकडे पाहतात व लग्न लागतें. नवरा नवरीच्या कपाळास कुंकू लावितो, व नवरी नवऱ्याच्या गळ्यांत फुलांची माळ घालिते. नवरानवरी एकमेकांचे हात

धरितात, आणि त्यांवर नवरीचा बाप पाणी ओतितो. नंतर नवरानवरी एकमेकांच्या डोक्यांवर अक्षता टाकितात, आणि उपाध्याय व इतर मंडळी उभयतांवर अक्षता टाकितात. नंतर उपाध्याय त्यांच्या हातांत **लग्नकंकणें** बांधितो. हें आटोपल्यावर नवरा पूर्वेकडे तोंड करून एका पाटावर बसतो, आणि नवरी त्याच्या डाव्या बाजूस दुसऱ्या पाटावर बसते. उपाध्याय होम करितो, आणि नवरा त्याच्यापुढें धरलेल्या ताटांतील लाह्यांचीं अग्नीला अवदानें देतो. नंतर उपाध्याय एका रांगेनें तांदळाच्या सात राशी घालितो, व प्रत्येक राशीवर एक एक खडा ठेवितो. नवरा नवरीस हातांत धरून प्रत्येक राशीस व खड्यास उजव्या अंगठ्यानें स्पर्श करितो, व त्यांसभोंवतीं पांच प्रदक्षिणा घालतो. पुढें उपाध्याय उभयतांस ध्रुवतारा दाखवितो, तीं त्यास दक्षिणा देतात, व त्या दिवसाचा समारंभ आटोपतो. मग नवरानवरीच्या अंगांवरील वस्त्रांस गांठ मारितात. तीं उभयतां घरांत जाऊन पहिल्या दिवशीं आणून ठेविलेल्या कलशांस नमस्कार करितात, आणि तेथें त्यांस दूध व तूप खावयास देतात.

पांचव्या व शेवटच्या दिवसाचीं कृत्यें.

पांचव्या दिवशीं नवरीचे आईबाप नवऱ्याकडील मंडळीस व आपल्या इष्टमित्रांस मेजवानी करितात. त्या दिवशीं सकाळीं नवरानवरीस मंडपांत बसवितात, आणि त्यांच्या दोहों बाजूंस कांहीं लहान मुली बसतात. प्रथमतः कांहीं वेळ नवरानवरी सुपाऱ्या खेळतात. मग नवरा ओली हळद घेऊन नवरीच्या तोंडास पांचवेळ लावितो; आणि नवरी बाकीची हळद नवऱ्याच्या तोंडास पांचवेळ लाविते. नवऱ्यास विडा खाण्यास देतात; तो अर्धा विडा आपण खातो व बाकीचा नवरीस देतो. याप्रमाणें नवरा पांच विडे खातो, आणि नवरीही पांच विडे खाऊन प्रत्येक विड्यांतील अर्धा विडा नवऱ्यास देते. दुसऱ्या दिवशीं सकाळीं पुनः होम करून नागाची पूजा करितात. मग

नवरानवरी वधूच्या घरीं जेवतात, व सुपाऱ्यांनीं खेळतात. नंतर नवरीपुढें व नवरा मागें असें त्या उभयतांस घोड्यावर बसवून देवळास नेतात. तीं देवास प्रदक्षिणा घालून नमस्कार करितात, आणि त्याचा आशीर्वाद मागतात. तेथून तीं वाजत गाजत व मिरवत सर्व मंडळीसह नवऱ्याच्या घरीं जातात. वरात घरीं येण्यापूर्वी घरांत जिकडे तिकडे दिवे लावून मंडपाच्या दारापासून देवाच्या खोलीपर्यंत जमिनीवर चादरी पसरून ठेवितात. जेव्हां नवरानवरी घरीं येऊन उंबरा ओलांडूं लागतात, तेव्हां नवऱ्याची बहीण दारांत उभी राहते, व त्यांस आंत जाऊं देत नाहीं. मग नवरा तिला विचारितो कीं, 'तूं दारांत कां उभी राहिलीस?' ती त्यास विचारते, 'तूं आपली मुलगी माझ्या मुलास देशील काय?' तो ह्मणतो, 'माझ्या बायकोस विचार.' मग ती त्याच्या बायकोस विचारिते, आणि ती सांगते कीं, 'तुझ्या मुलास माझ्या तीन मोत्यांपैकीं एक मोतीं देईन.' असें वचन घेतल्यावर बहीण दारांतून एकीकडे होते, आणि नवरानवरी घरांत जाऊन देवाच्या पायां पडतात. नंतर जातीच्या इष्टमित्रांस व आप्तसोयऱ्यांस जेवण घालितात. जे जेवणार नसतील त्यांस फराळ घालतात, आणि समारंभ समाप्त होतो. जैनांच्या शास्त्रांत जरी विधवाविवाह वर्ज्य मानिला आहे, तरी उपाध्यायांखेरीज इतर जैनांत विधवाविवाह होतो. ही चाल जैन लोकांत सुमारें दोनशें वर्षांपूर्वीं पडली असें ह्मणतात. जर एकाद्या बायकोचें नवऱ्याशीं नीट पटेनासें झालें, तर तिला नवऱ्यापासून वेगळें राहतां येतें. परंतु नवरा जीवंत असेपर्यंत दुसरें लग्न करितां येत नाहीं.

दक्षिणेंतील कुणब्यांचा लग्नसोहळा.

सामान्य माहिती.

कुळंबी अथवा **कुणबी** हे शूद्रवर्णाचे असून त्यांची वसती महाराष्ट्रांत सर्वत्र आहे. हे लोक शेतकी व मोलमजूरी करून असतात. त्यांच्यांतील एखाद्या घराण्याकडे गांवच्या पाटीलकीचें वतन असतें; व त्यावरून सर्व कुणब्यांस बहुमानार्थी पाटील अशी संज्ञा देण्यांत येते. मराठ्यांप्रमाणें ह्यांच्या स्त्रियांस पडदा नसतो. त्या खेरीज ह्यांच्या चालीरीति पुष्कळ अंशीं मराठ्यांसारख्याच आहेत.

मुलाचें लग्न करणें झालें, ह्मणजे बाप जातींतील एखादी बरीशी मुलगी पाहून तिला कुंकूं लावून, साकरपुडा हातीं देऊन **मागणें** घालितो. नंतर,–

सोयरीक जमविणें, कलशपूजा, गणपतिपूजा, हळद व मंगलस्नान.

नवरानवरीचे आईबाप जोशाकडे जाऊन ह्या संबंधास ग्रह अनुकूल आहेत किंवा नाहींत तें विचारतात. जोशी नवरानवरी यांचीं नांवें विचारितो; व पंचांग पाहून ग्रह चांगले पडतात, असेंच बहुधा सांगतो; ह्मणजे लग्न नक्की ठरतें. नंतर आईबाप जोशास हळद, लग्न, आणि वरात, ह्या कृत्यांचे मुहूर्त विचारून घरीं जातात. हळदीचा जो मुहूर्त ठरला असेल, त्याच्या अगोदर कांहीं वेळ नवऱ्याकडील इष्टमित्र व आप्तसोयरे स्त्रीपुरुष दोन लुगडीं, साकर, नारळ, खारका, हळद, सुपाऱ्या, सांखळ्यांचा जोड आणि पुतळ्यांची माळ घेऊन वाजत गाजत नवरीच्या घरीं जातात. तेथें गेल्यावर उपाध्याय मंत्र सांगतो, आणि नवऱ्याचा बाप नवरीस साडी

देऊन तिच्या तोंडांत साकर घालितो. नंतर नवरीकडील बायका चौकोनीं रांगोळी घालून तिजभोंवतीं पांच मोघे* मांडून त्यांसभोंवती सूत गुंडाळितात, व त्यांपुढें दोन पाट मांडितात. उपाध्याय प्रत्येक कलशांत पाणी व एक एक सुपारी घालितो, व त्याच्या तोंडावर एकेक नारळ ठेवून त्यांची पूजा करितो. कलशांपुढें एकेक सुपारी मांडून तिचे ठायीं गणपतीचें आवाहन करून त्याची पूजा व प्रार्थना करण्यांत येते. मग नवरीस व तिच्या आईस सुवासिनी स्त्रिया तेलहळद लावितात. नंतर उपाध्याय नवरीकडून त्या कलशांस पांच प्रदक्षिणा घालवितो, व त्यांवर अक्षता टाकवितो. पांचवी प्रदक्षिणा पुरी झाली, ह्मणजे कलशांपुढील एका पाटावर नवरीस आणि दुसऱ्या पाटावर तिच्या आईस बसवून त्या दोघींस सुवासिनी स्त्रिया तेल हळद लावून न्हावयास घालितात. न्हाणें झाल्यावर नवऱ्याकडील सोयरे नवरीस लुगडें देतात, आणि तिच्या अंगावर कांहीं दागिने घालितात. नंतर नवरीकडील बायका बाकी राहिलेली **उष्टी हळद** व तेल घेऊन नवऱ्याकडील मंडळींबरोबर वाजत गाजत नवऱ्याच्या घरीं जातात, आणि तेथें वर सांगितल्याप्रमाणेंच सर्व प्रकार करून नवऱ्यास हळद लावून न्हावयास घालितात.

देवक बसविणें, जातें व पाटा पुजणें आणि जातिभोजन.

नवरानवरीस हळद लागल्यावर **देवकपूजा** होते. उपाध्यायाच्या पंचागांतील गणपतीचें पूजन करून घराबाहेर मांडवांत एक **मुहूर्त-खांब** रोंवितात, आणि सुपाऱ्या, हळकुंडें व तांदूळ ह्यांच्या दोन राशी करून त्यांवर कुलदेवतांची स्थापना करितात. हें देवक बसविण्याचें कृत्य पुरुष करीत असतां बायका घरांत जात्याची पूजा करितात, व गांवची परटीण **पाट्याची पूजा** करिते. दुसऱ्या दिवशीं जोतीबा; खंडोबा किंवा अंबाबाई यांपैकीं जी कुलदेवता असेल तिच्या नांवानें जेवण घालितात.

---

* मातीचे कलश.

तिसऱ्या दिवशीं लग्न होतें. नवऱ्यास सकाळीं मंगलस्नान घालितात, आणि मुहूर्ताच्यापूर्वी तास किंवा दोन तास घोड्यावर बसवून व टोंकास लिंबू टोंचलेली कट्यार त्याच्या हातीं देऊन बायका-पुरुषांसहवर्तमान वाजतगाजत गांवच्या मारुतीस नेतात, आणि तेथून नवरीच्या घरीं नेतात. नवरानवरीच्या घरीं पोंचला, ह्मणजे गांवचा न्हावी त्याचे पाय धुतो. नवरीचा बाप त्यास सामोरा येऊन नेसावयास व अंगावर घ्यावयास नवीं धोतरें आणि एक पागोटें देतो. नंतर नवरा तीं धोतरें नेसून व पागोटें घालून मंडपांत जातो व भाताच्या [साळीच्या] राशीवर उभा राहतो. नवरी घरांत बायकांमध्यें असते, तिला बाहेर आणून नवऱ्यासमोर त्याच्याकडे तोंड करून दुसऱ्या एका भाताच्या राशीवर उभी करितात, आणि त्यांच्यामध्यें स्वस्तिक काढिलेला अंतःपट धरितात. नवरानवरीस तोंडांत धरण्यासाठीं थोडथोडें जिरें देतात. कोणी जवळचा आप्त नवऱ्याच्या डोकीवर तरवार अगर कट्यार धरितो. उपाध्याय व दुसरे ब्राह्मण मंगलाष्टकें ह्मणून सावधान करितात, व मुहूर्त येतांच अंतःपट काढून लग्न लावितात. तें लागतांच जमलेली मंडळी नवरानवरीवर अक्षता टाकितात, आणि वाजंत्री (होलार) वाद्यांचा कडाका उडवितात. मग नवऱ्याकडील उपाध्याय नवरीच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधितो, आणि कोणी तरी ह्मातारा सोयरा 'डोरलें' (सूत) बांधितो. नंतर उपाध्याय त्या नवीन जोडप्यास घरांत नेऊन देवाच्या पायां पडवितो. ह्या वेळीं नवरा देव्हाऱ्यांतील एक मूर्ति चोरून घेतो, व त्यास एक रुपया दिल्याखेरीज तो ती परत देत नाहीं. हें झाल्यावर त्यास बाहेर नेऊन बहुल्यावर बसवितात. तेथें नवरीचा भाऊ येऊन नवऱ्याचा उजवा कान धरितो, व त्यास पागोटें दिल्याशिवाय तो कान सोडीत नाहीं. ह्यावेळीं आप्तसोयऱ्या बायका नवरानवरीजवळ येऊन त्यांच्या खांद्यांवरून तांदूळ पाडवितात. नंतर दोन सुवासिनी स्त्रिया एका ताटांत सर्व पदार्थ वाढून तें ताट बहुल्यावर नवरानवरीपुढें ठेवितात; दोहोंकडील दोन सोयरेही त्यांच्याजवळ बसतात, व सर्वजण ते पदार्थ खातात.

लग्नसमारंभ.

हीं सर्व कृत्यें झाल्यावर जातीच्या लोकांस जेवण घालण्यांत येतें. नवऱ्याचे आईबाप नवरीस उंचीं वस्त्रें नेसवून दागिने घालितात, आणि दोन्हीकडील व्याही एकमेकांस सणगें देतात व घेतात. मग नवरानवरीस घोड्यावर बसवून उभयपक्षांकडील आप्तसोयरे स्त्रीपुरुष वाजत गाजत वरातीनें नवऱ्याच्या घरीं आले, ह्मणजे नवऱ्याची बहीण दरवाज्यांत उभी राहून भावास अडविते, आणि 'तुझ्या मुलास माझी मुलगी देईन' असें भावानें वचन दिल्याखेरीज त्यास आंत जाऊं देत नाहीं. हें झाल्यावर नवरानवरी घरांत जाऊन देवाच्या पायां पडतात. मग गांवची परटीण हातांत मुसळ घेऊन नवरानवरी आणि कांहीं सोयऱ्या बायका ह्यांच्या मदतीनें, गाणीं ह्मणत कांहीं भात कांडिते, ह्मणजे लग्नसोहळा आटोपला.

ज्ञातिभोजन, व्याह्यांचा सत्कार, वरात, वधूप्रवेश व नंतरचीं कांहीं कृत्यें.

कुणबी आपल्या मुली सोळा वर्षांच्या होईपर्यंत त्यांस अविवाहित ठेवितात. मराठा फार गरीबीस आला, आणि त्यास मराठ्याची मुलगी मिळेनाशी झाली, तर मात्र तो कुणब्याची मुलगी करितो. कुणब्यांत अनेक स्त्रिया करण्याची चाल आहे; परंतु ही चाल मराठ्यांप्रमाणें त्यांच्यांत फारशी दिसत नाहीं. विधवेला पाट लाविलां येतो. परंतु पाटाच्या स्त्रीस अशुद्ध समजून तिला कोणत्याही मंगलकार्यांत घेत नाहींत.

कुणब्यांतील कांहीं इतर चाली.

कुणबी खेरीजकरून महाराष्ट्र देशामध्यें शूद्रवर्णांत मोडणाऱ्या आणखी किती तरी जाति व पोटजाति आहेत. उदाहरणार्थ गुरव, कोमटी, सोनार, कांसार, तांबट, लोहार, साळी, शिंपी, माळी, तेली, तांबोळी, भंडारी, कलाल, धोबी, धनगर, घिसाडी, वगैरे. ह्या सर्वांच्या चालीरीतींचें वर्णन केल्यास

शूद्रवर्णांतील कित्येक इतर जातींविषयीं उल्लेख.

ग्रंथविस्तार फार होईल, व तसें करण्यास पुरेसा अवकाशही नाहीं ! शिवाय ह्या लोकांच्या लग्नकार्यांतील पुष्कळ सोहळे, येथवर वर्णिलेल्या सोहळ्यांहून फारसे भिन्नही नाहींत. किंबहुना कित्येक जातींत तर कांहीं सोहळे अगदीं एकसारखे आहेत. जसे कीं, मागणें घालणें, सीमांत अथवा वरपूजन, लग्न लावणें, कंकणबंधन, सुपाऱ्या खेळणें, विड्या तोडणें, न्हाणीं, सूनमुख, झाल, वरात, रासन्हाणें वगैरे. तेव्हां अशा सोहळ्यांचें पुनः पुनः वर्णन केल्यास आवृत्तीचा दोष येऊन ग्रंथ वाचकांस कंटाळवाणा होईल. सबब, वर निर्दिष्ट केलेल्या जातींच्या लग्नसोहळ्यांचा हवाला पूर्वोक्त वर्णनावर सोंपून आह्मीं जिज्ञासु वाचकांसाठीं वाघे व मुरळ्या यांची चमत्कारिक माहिती देत आहों.



वाघे व मुरळ्या यांचे लग्नसोहळे.

सामान्य माहिती.

मराठे, धनगर किंवा महार ह्या जातीच्या कोणा भाविक स्त्रीपुरुषांस पोटीं संतान नसलें, तर तीं केव्हां केव्हां सातारा जिल्ह्यांतील प्रसिद्ध **देवस्थान** जें **जेजुरी,** तेथें जाऊन **खंडोबास** नवस करितात कीं, 'आह्मांला मूलबाळ दे, आह्मी तें तुला अर्पण करूं.' पुढें खंडोबाच्या कृपेनें त्यांस मुलगा झाला, तर ते त्यास देवाच्या पायांवर घालून त्याचा **वाघ्या** करितात, व कन्या झाली, तर ती बारा वर्षांची होईपर्यंत केव्हां तरी खंडोबाशीं तिचें लग्न लावून तिला त्या देवाची **मुरळी** करितात. अर्थात् वाघे हे खंडोबाचे शिष्य अथवा गण, व मुरळ्या त्या देवाच्या स्त्रियाच होत. त्यांच्या जातीसंबंधानें आतां आणखी निराळा खुलासा करण्याचें कारण नाहीं. ह्या लोकांची वसती जेजुरी येथें पुष्कळ आहे. तथापि, ते कमजास्त प्रमाणानें महाराष्ट्रांत सर्वत्र आढळतात. खंडोबा, देवी, आणि महादेव ह्यांच्या यात्रेच्या दिवशीं त्यांच्या मंदिरांपुढें वाघे व मुरळ्या गळ्यांत कवड्यांच्या माळा व भंडाराचें तोजदान घालून देवळांत जाणाऱ्या येणाऱ्या लोकांच्या कपाळीं भंडार लावितात व त्यांजपाशीं पैसे मागतात; किंवा मुरळ्या मंदिरापुढें नृत्यगीत करितात आणि वाघे त्यांच्यामागें खंजिऱ्या, मंजिऱ्या व घंटा वाजवितात. देवादिकांचे शृंगारिक पोंवाडे गाणें, नाचणें, व यात्रेकऱ्यांचें मनोरंजन *

---

* हें मनोरंजन कित्येक वेळां येथपर्यंत जातें कीं, मुरळ्या नाचतां नाचतां नाचापोऱ्याप्रमाणें रंगेल प्रेक्षकांच्या मांडीवर बसून, बीभत्स गाणीं गाऊन, तदनुरूप अंगविक्षेपांनीं व चुंबनादि प्रकारींनीं आपल्या प्रेक्षकांस मोहित करून त्यांजपासून कांहीं रुपेरी इनाम उपटल्याखेरीज त्यांस सोडीत नाहींत.

करून त्यांजपासून पैसे मिळविणें, हा ह्या लोकांचा धंदा होय. ह्यांच्या चालीरीति ह्यांच्या मूळजातीप्रमाणेंच असतात. त्यांत फरक इतकाच कीं, वाघे आपल्या आईच्या कुळांतील मुलीशीं लग्न लावीत नाहींत, बापाच्या कुळांतील मुलगी चालते. कारण, आईच्या कुळांतील मुलगी पुढें बहुधा मुरळी व्हावयाची असते, व मुरळी आणि वाघ्या ह्यांमध्यें बहीण-भावंडाचें नातें आल्यानें त्यांचीं एकमेकांशीं लग्नें होऊं शकत नाहींत. वाघे लोकांचे लग्नसोहळे त्यांच्या मूळजातीच्या सोहळ्यांप्रमाणेंच असतात. मुरळ्यांची लग्नरीति मात्र भिन्न आहे.

खंडोबाशीं लग्न लावून मुरळी करणें.

एखाद्या मुलीला खंडोबाची मुरळी करणें झालें, ह्मणजे तिचे आईबाप चैत्रमासीं तिला घेऊन जेजुरीस जातात. तेथें गेल्यानंतर उक्त दिवशीं ते आपल्याबरोबर भंडार, खोबरें, फुलांचे हारगजरे, पंचामृत, फुलें, साडीचोळी, व शेलापागोटें इत्यादि साहित्य घेऊन ती भावी मुरळी, गुरव उपाध्याय, आणि वाघे व मुरळ्या, यांसहवर्तमान वाजत गाजत खंडोबाच्या देवळास जातात. मग तेथें त्या देवास हळद लावून त्याची उष्टी हळद त्या मुलीस लावितात, आणि तिला न्हाऊं घालितात. नंतर तिला नवी साडीचोळी परिधान करवून व हिरव्या बांगड्या भरवून तिच्या डोकीस फुलांच्या मुंडावळी बांधितात. तसेंच खंडोबाचीही यथाविधि पूजा करून त्याला तें शेला पागोटें घालितात. नंतर गुरव उपाध्याय नऊ कवड्यांची एक माळ घेऊन ती मुलीच्या गळ्यांत घालितो. ह्या माळेस **गाठा** (गेठा ?) असें ह्मणतात, व ती घालण्याच्या कृत्यास **गाठा फोडणें,** अशी संज्ञा आहे. हा गाठा फोडण्याबद्दल व त्या गाठ्याची किंमत ह्मणून गुरवास सवा रुपया द्यावा लागतो. हें कृत्य आटोपल्यावर त्या मुलीस खंडोबाच्या डाव्या बाजूस उभी करितात; आणि जमलेली सर्व मंडळी त्या नवरदेवावर व नवरीवर भंडार उधळून " येळकोट घे, येळकोट घे !" असा द्विवार जयघोष करि-

तात; ह्मणजे ती मुलगी खंडोबाची **मुरळी** अथवा बायको झाली. नंतर ह्या कार्याच्या उपाध्यायत्वाबद्दल गुरवास मुलीचे आईबाप पांच रुपये देतात; आणि सदरहू प्रसंगासाठीं तेथें जितके वाघे व मुरळ्या आल्या असतील त्या प्रत्येकास एकेक पैसा वाटितात. नंतर तीं देवभोळीं मातापितरें त्या नवीन मुरळीला घेऊन आपल्या मुक्कामीं येतात, आणि तिच्या लग्नाप्रीत्यर्थ वाघेमुरळ्यांस एक मेजवानी देतात, ह्मणजे कार्य संपलें.

मुरळीचा व्यभिचार.

पुढें मुरळीस ऋतु प्राप्त झाला, ह्मणजे ती इतर स्त्रियांप्रमाणें चार दिवस दूर बसते. नंतर ती आपल्यासाठीं एखादा यजमान पहाते. तो मिळाला, ह्मणजे ती वाघे बांधवांची एक सभा भरविते. ह्या सभेपुढें तो भावी यजमान कबूल करतो कीं, "हिची ओंटी मी भरीन." मग ते वाघेबंधू त्यास तूं ह्याबद्दल काय देशील ह्मणून विचारितात, आणि कांहींशी जिकीर करून शेवटीं २५ पासून १०० रुपयांपर्यंत यथाशक्ति कांहीं तरी रकम ठरविण्यांत येते. ह्या रकमेचा अर्धा हिस्सा वाघेमुरळ्यांच्या मंडळींस मिळतो. व अर्ध्या भागांतून ती नवी तरणी मुरळी आपल्यासाठीं मखर घालिते, व शय्यादि उपभोगसाहित्य खरीदी करिते. नंतर मोठ्या समारंभानें ती गांवच्या मारुतीस जाऊन त्याची पूजा करून येते, आणि त्या यजमानासमागमें पक्षमास घालविते. पुढें त्याचें व तिचें जमलें, व तो यजमान तिला आपला कायमचा उदाराश्रय ह्मणजे दरमहा ८ पासून १० रुपये देण्यास कबूल असला, ह्मणजे ती मुरळी अथवा खंडोबाची पत्नी त्या पुरुषाची उपपत्नी होऊन राहते!

प्रस्तुत विषयावरील आमचे उद्गार.

वरील हकीकतीवरून मुरळ्यांची धर्मनिष्ठा व नीतिमत्ता किती पंगू आहे, तें निराळें सांगणें नकोच. जे देवभोळे आईबाप आपल्या मुलींना मुरळ्या करितात, त्यांचा उद्दिष्ट हेतु त्या मुलींनीं पुढें धर्माच्या पांघरुणाखालीं राजरोस व्यभिचार करावा, असा खरोखरच नसेल! आईनें सहज कोठें हा **विठोबा** तुझा

नवरा, येवढें ह्मटल्यावरून आपलें तनमनधन विठ्ठलचरणीं अर्पण करणारी **मिराबाई** कोणीकडे, आणि खंडोबाशीं धडधडीत लग्न लावून व्यभिचार करणाऱ्या ह्या मुरळ्या कोणीकडे! आतां सर्वच व्यक्तींमध्यें धर्मनिष्ठा व नीतिमत्ता सदैव सारखी असूं शकणार नाहीं, हें खरें आहे. तथापि, मग असल्या चंचल मनाच्या व नीतिधैर्यशून्य व्यक्तींनीं आपणांस मुद्दाम धर्मबंधनांत गुंतवून घेऊं नये, हें फार चांगलें. परंतु, हा विचार धर्मवेड्या आईबापांस व तारुण्यमदानें उच्छृंखल झालेल्या मुरळ्यांस कोठून असणार? यासाठींच अनुभवी लोक जें ह्मणतात कीं, धर्मासाठीं प्राणत्याग करणें ही सोपें, परंतु जीवंत राहून धर्मनियमांप्रमाणें चालणें हें अत्यंत कठीण! तें अक्षरशः खरें होय.

कोल्हाटी किंवा डोंबारी लोकांचा लग्नसोहळा.

सामान्य माहिती.

कोल्हाटी किंवा **डोंबारी** हे लोक अतिशूद्रांतच गणिता येतील. तेली बाप व क्षत्रिय आई ह्यांपासून डोंबाऱ्याची उत्पत्ति झाली आहे, असें ह्मणतात. ह्यांचा मूळ पुरुष **नट**, ह्यास 'कोला' असें टोपण नांव होतें, व त्यावरून त्याच्या वंशजांस कोल्हाटी ही संज्ञा पडली आहे. बारशी तालुक्यांतील माणकेश्वर हें यांचें मूलवसतिस्थान होय; परंतु, हे लोक एके ठिकाणीं असे क्वचितच राहतात. ते फिरस्ते असून गांवाबाहेर चटयांच्या झोंपड्यांतून मुक्काम करितात. त्यांच्या भाषेंत मराठी व गुजराती ह्यांचें मिश्रण आहे. ह्यांचीं उपनांवें, अंधारे, जाधव, पवार आणि सांकेश्वर अशीं असून ह्या सर्व कुटुंबांमध्यें रोटीबेटीव्यवहार चालतात. दोरावरून चालणें, नाचणें, गाणें, कोल्हाट्या मारणें, शिंगांच्या फण्या, चाकें व फडक्यांच्या बाहुल्या करणें, हे ह्या लोकांचे धंदे होत. ह्यांची चालचलणूक वाईट असते. पुष्कळ स्त्रिया कसब करून राहतात; व तसें करण्यास त्यांस जातीची संमतीही मिळते. मुलगी वयांत आली, ह्मणजे कसबीण किंवा घरधनीण होणें ह्या दोहोंपैकीं एक मार्ग तिला पतकरण्यास सांगतात. आपल्या आईबापांच्या संमतीनें घरधनीण होणें हें जर तिला पसंत असलें, तर ती तसें सांगते, ह्मणजे तिचें लग्न करून तिजवर सक्त नजर ठेवितात. परंतु, तिनें जर कसबीण होण्याची आपली खुषी दर्शविली, तर तिला जातिबांधवांच्या पंचायतीपुढें आणून रुजू करितात. ती पंच लोकांस एक मेजवानी देते, व त्यांच्या संमतीनें कसबीण ठरविली जाते! असें झाल्यावर तिच्याशीं जातिबांधवांचा अन्नपानादि व्यवहार तुटतो. तथापि, कालगतीनें तिचा कसबिणीचा धंदा चालेनासा झाला, ह्मणजे तिचे जातिबांधव तिचा परामर्ष घेतात!

लग्न करणें झाल्यास मुलीच्या बापास मुलाच्या बापानें १०० पासून २०० रुपयांपर्यंत हुंडा द्यावा लागतो. इतका हुंडा देण्याचें सामर्थ्य नसल्यास दोन कुटुंबांत अरसपरस बेटीव्यवहार (साटेंलोटें) करितात, ह्मणजे झालें.

सोयरीक जमविणें.

लग्नापूर्वी दोन किंवा तीन दिवस गांवच्या देवास एक मेंढरूं बळी देऊन त्याच्या प्रसादाची जातिबांधवांना मेजवानी देण्यांत येते. ह्या मेजवानीच्या दुसऱ्या दिवशीं मंडप घालितात. दोन मृत्तिका-पात्रांस चुना देऊन त्यांची पूजा करितात, व एक आंब्याचा डहाळा मांडवाच्या खांबांस बांधून त्याचीही **देवकार्य** किंवा **देवक** समजून पूजा करण्यांत येते. नवरानवरीस आपापल्या घरीं त्यांच्या नातलग स्त्रिया मंगलगीतें गाऊन हळद लावितात व मंगलस्नान घालितात.

बळी, मांडव घालणें, देवक व हळद.

लग्नदिवशीं नवरा पोषाक करून आपल्या पक्षाच्या मंडळीसह वाजत गाजत नवरीच्या घरीं लग्नासाठीं पायीं चालत जातो. तेथें गेल्यावर तो नवरीच्या कपाळीं कुंकूं लावितो. मग त्या उभय-तांस पाटांवर एकमेकांकडे तोंडें करून उभे करितात. लग्न लावण्यास ब्राम्हण बोलाविलेला असतो, तो त्यांस आशीर्वाद देऊन त्यांच्या मस्तकांवर अक्षता टाकितो, म्हणजे तीं उभयतां पतिपत्नी झालीं. ह्या लोकांत ह्या दिवशीं जेवणावळ देण्याची चाल नाहीं. परंतु दारू मात्र मनमुराद पितात. स्त्रिया रात्रभर सारख्या गात व नाचत असतात. लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरानवरीचे बाप आपल्या अंगवस्त्रांच्या पदरांस गांठ मारून नवरीस व नवऱ्यास आपल्या खांद्यांवर बसवून गांवच्या मारुतीच्या पायां पडण्यासाठीं जातात; व तेथून परभारें नवऱ्याच्या मुक्कामीं येतात. नंतर त्यांच्या पदरांची गांठ सोडण्यांत येते. नवरानवरी एकमेकांचीं नांवें घेतात. ह्या दिवशीं नवऱ्याकडे जातिबांधवांस एक मोठी चमचमीत मेजवानी होते. तींत मद्यमांसाचा सुकाळ असतो! ही मेजवानी झाली, म्हणजे कार्य आटोपलें.

लग्नसोहळा.

महार लोकांचा लग्नसोहळा.

सामान्य माहिती.

महार लोकांस **अतिशूद्र** असें ह्मणतात. हे लोक महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत. त्यांची वसती बहुतकरून गांवाच्या बाहेर असते, व त्यांच्याकडे गांवाचें रक्षण करणें, दवंडी पिटाविणें, वगैरे वतनें असतात. वतनदारांखेरीज इतरांची उपजीविका मोलमजुरीवर चालते. ह्यांचे बहुतेक रीतिरिवाज कुणब्यांसारखेच आहेत.

विवाहकाल, सोयरीक व मुहूर्तनिश्चय.

हे लोक कधीं कधीं आपल्या मुलींचीं लग्नें त्या अगदींच लहान असतां करितात. परंतु प्रायः मुलीचा विवाह ती वयांत येण्यापूर्वी, व मुलाचा त्याच्या बाराव्या वर्षापूर्वी करण्यांत येतो. तसेंच मुलाचें लग्न तो वीस वर्षांचा झाल्यानंतर होण्याचें क्वचितच रहातें. ह्या लोकांत मुलगी वयांत येण्यापूर्वी तिचें लग्न केलेंच पाहिजे असा मात्र निर्बंध नाहीं. **मागणीची** रीति अगदीं मराठ्यांसारखीच आहे. लग्न करणें झालें, ह्मणजे सुमारें एक आठवडा अगाऊ नवरानवरीचे बाप गांवच्या भटाकडे जाऊन मुलामुलींच्या नांवांवरून (अर्थात् नामराशींवरून) त्यांचा शरीरसंबंध होण्यास कांहीं हरकत आहे किंवा कसें ह्याविषयीं खुलासा विचारितात. भट आपलें पंचांग काढून पाहतो, व बहुधा हरकत नाहीं असेंच सांगतो. नंतर ते त्यास हळदीला व लग्नाला मुहूर्त काढून देण्यास सांगतात. तो लागलीच पंचांग पाहून त्या दोन्ही कृत्यांचे मुहूर्त मुकरर करून देतो; व "श्रीगणपतिः सुप्रसन्नोवरदो

भवतु" अशा आशीर्वादासह थोडथोड्या अक्षता त्याच्या हातावर टाकितो. त्या घेऊन व भटाला यथाशक्ति कांहीं दक्षिणा देऊन ते भावी व्याही आपल्या घरीं जातात.

पुढें लग्नापूर्वी सुमारें चार दिवस नवरानवरीस **हळद** लावण्यांत येते.

हळद व देवक.

हळदीचा सोहळा मराठ्यांप्रमाणेंच समजावा. उभयपक्ष आपापल्या घरीं वाजतगाजत पंचपल्लव आणून ते **देवक** समजून त्यांची प्रतिष्ठा व पूजा करितात.

लग्नरीति, व तत्संबंधीं इतर सोहळे.

लग्नदिवशीं नवरा घोड्यावर किंवा बैलावर बसून आपल्या पक्षाच्या स्त्रीपुरुषांसहवर्तमान वाजत गाजत नवरीच्या घरीं लग्नास जातो. तो दरवाजापाशीं येतांच नवरीचा भाऊ किंवा कोणी जवळचा नातलग त्याचें स्वागत करून त्यास घरांत नेऊन घोंगडीवर बसवितो. मग नवरीची बहीण (करवली) किंवा कोणी नातेवाईक बाई नवरीला घरांतून आणून नवऱ्याशेजारीं घोंगडीवर बसविते. नंतर उभयपक्षांच्या मंडळीस नवरीकडून सागोतीची जेवणावळ देण्यांत येते. ती झाल्यावर मुलीचा बाप नवऱ्यामुलास एक पागोटें, नेसण्यास व पांघरण्यास धोतरजोडा, करगोटा व एक चर्मी जोडा देतो मग नवरा हा नवीन पोषाक करून घोंगडीजवळच दोन पाट समोरासमोर मांडिलेले असतात, त्यांपैकीं एकावर उभा राहतो. त्याच्या समोर दुसऱ्या पाटावर नवरीस उभी करितात; व दोघांच्या हातीं विडे (२ पानें व १ सुपारी) देतात. उभयतांमध्यें अंतरपाट धरिलेला असतो. त्यास नवरानवरी आपापल्या बाजूनें हस्तस्पर्श करितात; किंवा त्याच्या खालून एकमेकांच्या हातास हात लावितात. ह्याप्रमाणें तीं दोघें लग्नास उभीं राहिलीं, ह्मणजे गांवचा भट असल्यास तो कांहींसा अंतरावर उभा राहून मंगळाष्टकें ह्मणतो. भट हाजर नसल्यास महार आपल्यापैकींच एखाद्या श्रेष्ठ मनुष्याकडून मंगलाष्टकें ह्मणवितात. तीं ह्मणणें झाल्याबरोबर

दोन्हींकडील मंडळी नवरानवरीच्या मस्तकांवर अक्षता टाकितात, (ह्या अक्षतांमध्यें पूर्वी सोयरीक जमवितेवेळीं भटानें आशीर्वादासह दिलेल्या अक्षता मिसळिलेल्या असतात-) व लागलीच अंतरपाट दूर करितात, ह्मणजे लग्न लागलें. तदनंतर पांच असामी तो अंतरपाट नवरानवरीच्या डोक्यांवर धरितात, व कोणी एकजण त्या जोडप्याच्या अंगावरील वस्त्रांच्या पदरीं थोडेसे तांदूळ, हळकुंडें व सुपाऱ्या बांधून त्यांच्या पदरांची गांठ मारितो, आणि अशारीतीनें त्या जोडप्यास बहुल्यावर नेऊन बसवितात. ज्या पांचजणांनीं तो अंतरपाट नवरानवरीवर धरिला असेल, त्यांच्या बोटां-सभोंवतीं कच्चें सूत एकदां पांचवेळां, व एकदां चार वेळां चंवगे घालून गुंडाळण्यांत येतें; आणि नंतर त्या दोन्ही सुतांच्या एक एक हात लांबीच्या दोन दोऱ्या वळून त्या प्रत्येकींत हळकुंड व सुपारी बांधून त्यांचीं दोन कंकणें तयार करितात. त्यांतील पांच चंवग्यांचें कंकण नवऱ्याच्या उजव्या मणगटांत व चार चंवग्याचें नवरीच्या उजव्या मणगटांत बांधितात. ह्या प्रमाणें **कंकणबंधन** झाल्यावर कोणी लग्न झालेला आप्त पुरुष आपल्या बायकोचें नांव घेऊन नवरानवरीच्या पदरांची गांठ सोडितो. मग उभय-पक्षांच्या नातेवाईक सुवासिनी स्त्रिया व करवल्या त्या जोडप्यास औक्षण करितात. लग्न लावण्यासाठीं आलेल्या भटास दोन्ही व्याही एकेक नारळ, सुपारी, साकर व चवली चवली दक्षिणा देतात. लग्न लागल्यापासून चार दि-वस नवरा नवरीच्या घरींच राहतो, व तेथें त्यास जेवणावळी देतात. पांचव्या दिवशीं संध्याकाळीं नवऱ्यामुलाचा बाप आपल्या कडील स्त्रीपुरुष समागमें घेऊन वाजत गाजत नवरीकडे **साडा** करण्यासाठीं येतो. तो नवरीला साडी, चोळी, मणिमंगळसूत्रासहित गळेसर, बांगड्या व जोडवीं देतो. त्या वस्तु परिधान करून नवरी आपल्या मामाच्या मांडीवर बसते, व नवराही आपल्या मामाच्या मांडीवर बसतो; आणि तीं दोघें विड्या तोडितात. ह्या वेळीं त्या उभयतांच्या मध्यभागीं काळ्या दोऱ्यांत ओंविलेला नारळाचा एक तुकडा बांधण्याची चाल आहे. हा विड्या तोडण्याचा प्रकार झाल्यावर

रात्रीं नवऱ्याकडील मंडळी वर सांगितल्याप्रमाणें नवरानवरीची मिरवणूक—वरात—काढून सुमुहूर्तानें वधूप्रवेश करितात. दुसऱ्या दिवशीं नवरी आपल्या माहेरीं परत जाते. पुढें कित्येक दिवसांनीं संक्रांत किंवा नागपंचमी सारख्या सणाच्या दिवशीं नवऱ्याकडील स्त्रीपुरुष नवरीकडे साडी, चोळी व शिधा घेऊन मिरवत जातात्. ह्यास **ववसा** असें ह्मणतात. हा ववसा नवरीला दिल्यावर नवरीचा बाप आलेल्या मंडळीस जेवणावळ देतो, व तत्पश्चात् नवऱ्याकडील मंडळी नवरीला आपल्या घरीं घेऊन जातात; ह्मणजे लग्न संबंधीं सोहळे संपले.

मांग लोकांचा लग्नसोहळा.

सामान्य माहिती.

मांग अथवा **चांडाल** ही जात महारांपेक्षां खालच्या प्रतीची समजली जाते. हे लोक महाराष्ट्रांत सर्वत्र आहेत. ते दोरखंडें, केरसुण्या, शिंकीं, मोटा, व चाबूक वगैरे चामड्याच्या वस्तु आणि इतर मोलमजुऱ्या करून आपला उदरनिर्वाह करितात. ह्यांच्यांतील कित्येक लोक वाजंत्र्यांचाही धंदा करितात, त्यांस ' होलार ' अशी संज्ञा आहे. पूर्वी अपराध्यांस राजाज्ञेवरून स्मशानांत नेऊन त्यांस सुळी देण्याची किंवा त्यांचा शिरच्छेद करण्याची कामगिरी ह्यांजकडे असे; व हल्लींही फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांस हेच फांसावर चढवितात. ह्याशिवाय ह्यांच्याकडे खेड्यापाड्यांतून रखवालीचेंही वतन असतें. ह्यांच्या बहुतेक चालीरीति महारांप्रमाणेंच आहेत.

विवाहकाल व सोयरेकीची रीति.

हे लोक आपलीं मुलें लहान असतांच त्यांचीं लग्नें करितात. कित्येक वेळां तर ह्यांचीं तान्हीं मुलें पाळण्यांत असतां त्या पाळण्यालाच बाशिंगें बांधून त्या अर्भकांचीं लग्नें उरकून घेतलीं जातात. जणूं काय मुलें मोठीं होऊन आपल्या लग्नाचीं बाशिंगें आपल्या डोक्यांस चढवीपर्यंत त्यांच्या आईबापांस धीरच धरवत नाहीं ! ह्या लोकांत **मागणें** घालण्याची रीति महार लोकांसारखीच आहे. मुलीला मुलाचा बाप कुंकूं लावून रुपया सवा रुपया किंमतीची साडी व एक खण किंवा चोळी देतो, व उभयतां व्याही एकमेकांस सणगें देतात, ह्मणजे मागणें व सोयरीक नक्की झाली असें समजावें. लग्न इतर हिंदू लोकांप्रमाणें वैशाख ज्येष्ठ वगैरे महिन्यांतच होतें.

हळद.

लग्नापूर्वी पांच दिवस प्रत्यहीं नवरीच्या अंगास हळद लावून बाकीची **उष्टी हळद** तत्पक्षाच्या स्त्रिया वाजत गाजत मुलाकडे घेऊन येतात, व ती त्याच्या अंगास लावितात.

तिसऱ्या दिवशीं तिसरे प्रहरीं नवरानवरीकडे आपापल्या कुलदेवतेस अजापुत्र बळी देऊन तो मंडपांत मारितात. ह्यानंतर सायंकाळीं मुलाचा चुलता किंवा भाऊ, अथवा कोणी जवळचा नातलग आपल्या जातिबांधवांसह वाजत गाजत मारुतीच्या देवळास जातो. त्यानें आपले दोन्ही हात वर केलेले असून त्यांत एक लहानशी कुऱ्हाड धरलेली असते. त्याच्या डोक्यावर चोहींकडून चार मनुष्यें एक चांदणी धरितात, आणि कोणी एक मनुष्य देवास नैवेद्य घेऊन चालत असतो. ते सर्वजण देवळांत येतात. तेथें गुरवानें त्यांचें **देवक** जे पंचपल्लव (आंबा, जांबूळ, रुई, सोंडाई व उंबर ह्यांच्या फांद्या,) ते तयार ठेविलेले असतात. मग नवऱ्याचा चुलता त्या देवकापुढें नैवेद्य व दक्षिणा—एक पैसा—ठेवून देवक घेऊन सर्व मंडळीसह वाजत गाजत आपल्या घरीं परत येतो, व तें देवक मांडवाच्या एका खांबास बांधून ठेवितो.

कुलदेवतेस बळी व देवक.

नंतर नवरामुलगा घोड्यावर किंवा बैलावर बसून आपल्या नातलगांसह वाजत गाजत मारुतीच्या देवळास जातो. तेथें नवरीचा बाप आपल्याकडील मंडळीसह मिरवत येऊन नवऱ्या मुलास एक नेसण्याचें धोतर व पागोटें वगैरे देतो. नवरामुलगा तो पोषाक करून पुन्हां वाहनारूढ होतो, व उभयपक्षांची मंडळी त्यास मिरवत आणून नवरीच्या मांडवांत बसवितात. नंतर दोन पाट्या घेऊन त्यांत चामडें* व दोर घालून त्या लग्नस्थळीं ठेवितात. नवरानवरींना एकमेकांसमोर बसवितात, व त्यांच्यामध्यें अंतःपट धरण्यांत येतो. गांवचा भट दूर उभा राहून मंगलाष्टकें ह्मणतो. दोन्हीकडील मंडळी हातीं अक्षता घेऊन उभी असते, ती नवरानवरीच्या मस्तकां-

वरपूजा व लग्न सोहळा.

---

* कित्येक मांग लोकांत नवरीच्या पाटीमध्यें चामड्याच्या ऐवजी जातें ठेवितात, व नवऱ्याच्या पाटींत फक्त एक नाडा किंवा दोरी ठेवण्याची चाल आहे. लग्नसमयीं नवरानवरीमध्यें अंतःपट ह्मणून एक जामनिका? (Quilt) धरितात, व त्यांजवर जोंधळ्याच्या अक्षता टाकितात.

वर अक्षता टाकितात. शेवटचें मंगलाष्टक संपून सावधान होऊन टाळी वाजली, ह्मणजे नवरानवरीचें लग्न होऊन त्यांचा एकमेकांशीं पतिपत्नी हा संबंध कायम झाला असें समजतात. नंतर त्यांस भुईवर उभें करून लग्नसमयीं त्यांजमध्यें धरिलेला अंतःपट त्यांच्यावर घालून त्यांस झांकून टाकितात. नंतर त्यांच्याभोंवतीं कच्चें सूत पांच वेळां गुंडाळून त्याचे दोन भाग करितात, व त्यांच्या दोऱ्या वळून आणि त्यांत हळकुंडें बांधून एक भाग अथवा **कंकण** नवऱ्याच्या उजव्या हातांत, व दुसरें नवरीच्या डाव्या हातांत बांधितात. पुढें नवरानवरींस बहुल्यावर उभें करून त्यांना तीन वेळां एकमेकांच्या जागीं आलटून पालटून उभे राहण्यास सांगतात, व त्यांच्या तोंडांस हळद लावितात. लग्नदिवशीं रात्रीं नवरा नवरीच्या घरीं राहतो; व मांडवामध्यें इतर पुरुष मंडळीमध्यें निजतो. दुसऱ्या दिवशीं नवरानवरी सुपाऱ्या खेळतात, व धोतरांचे तोबे करून ते विनोदार्थ एकमेकांच्या पाठींत मारितात! ह्या दिवशीं व तिसऱ्या दिवशीं मुलीचा बाप मुलाकडील व आपल्याकडील नातेवाइकांस आणि जातिबांधवांस जेवणावळी देतो. चवथ्या दिवशीं मुलाचा बाप मुलीला साडी व चोळी देऊन त्या नवीन जोडप्याच्या कपाळीं बाशिंगें बांधितो. नंतर त्यांस मिरवीत मिरवीत मारुतीच्या देवळास नेतात, व देवाच्या पायां पडवून तेथून नवऱ्याच्या घरीं आणितात. पांचव्या दिवशीं त्या जोडप्यास गांवांतील आपल्या नातेवाइकांकडे भेटीस पाठवितात. नातेवाईक त्यांचा यथाशक्ति खानपान किंवा वस्त्रादिकांनीं आदरसत्कार करितात, ह्मणजे लग्नसोहळा संपला.

साडा. श्रावणमासांत नवऱ्याचा बाप मुलीकडे मागें महारांच्या पद्धतींत सांगितल्याप्रमाणेंच **साडा** नेतो, व तो तिला देऊन तिला आपल्या घरीं राहण्यासाठीं घेऊन येतो.

येथपर्यंत महाराष्ट्रांतील कित्येक जातींच्या लग्नविधि व सोहळ्यांचें वर्णन झालें. आतां गुजरातेंतील निरनिराळ्या जातींत लग्नासंबंधीं काय काय चालीरीति आहेत त्या पाहूं.

नागर ब्राह्मणांचा लग्नविधि.

नागरांविषयीं सामान्य माहिती.

गुजरातेंतील समस्त ब्रह्मवृंदांत **नागर** ब्राह्मण हे उच्च प्रतीचे लोक समजले जातात. त्यांची रहणी इतरांपेक्षां पुष्कळ बाबतींत चांगली व उच्च वर्णास शोभणारी आहे. बुद्धिमत्ता, शिक्षण, टापटीप, वगैरे गुण ह्या लोकांत जसे दिसून येतात, तसे गुजरातेंतील इतर जातींत आढळत नाहींत. हे लोक जात्याच लेखनपटु, धूर्त आणि कारस्थानी असल्यामुळें राजकारभारांत ह्यांचें अंग प्राचीन कालापासून विशेष आहे. सारांश, देशाच्या ह्या भागांत नागर लोक अग्रगण्य आहेत; व ते आपल्या आंगींच्या नैसर्गिक गुणांमुळें सदैव तसेच राहतील असें ह्मणण्यास हरकत नाहीं. ह्या लोकांत **वडनगरा नागर** आणि **विसनगरा नागर** असे दोन पोटभेद आहेत; व ते कडी प्रांतांतील त्यांचीं मूलवसतिस्थानें, जीं वडनगर आणि विसनगर हीं दोन शहरें, त्यांच्या नांवावरून पडलेले दिसतात. सदरहू दोन्ही शहरांत नागर लोकांचा भरणा विशेष आहे. तथापि, उद्योगपरत्वें हे लोक गुजरातेंत आणि काठेवाडांत सर्वत्र दिसून येतात. धंद्याच्या अनुरोधानें ह्यांच्यांत 'गृहस्थ' आणि 'भिक्षुक' असे पूर्वी दोन वर्ग झाले होते; ते परंपरेनें हल्लीही तसेच चालू आहेत. नागर, हे शिवाचे उपासक असून **हाटकेश्वर** हें त्यांचें मुख्य उपास्य दैवत होय. वडनगर येथें त्या महादेवाचें ह्या लोकांनी एक मोठें भव्य मंदिर बांधिलें आहे.

नागर ब्राह्मणांमध्यें लग्न करण्यासाठीं वधूवरांचीं वयें अमुकच असलीं पाहिजेत असा कांहीं नियम नाहीं. परस्परांचें कुलशील मात्र पाहतात; व तें अनुकूल असलें, म्हणजे सोयरीक जमण्याला जी एक मोठी आडकाठी असते, ती दूर होते. उभयपक्षांच्या मर्जीप्रमाणें कुलशील शिवाय करून इतर गोष्टीही अनुकूल असल्या आणि लग्न करण्याला एकमेकांची संमति पडली, म्हणजे एखाद्या शुभ दिवशीं वाग्दान अथवा 'विवाह' करण्यांत येतो. ह्या प्रसंगीं विसनगरा नागरांत कन्यापिता वराला कांहीं पोषाक, मिठाई व एक रुपया देतो; आणि वरपक्षाच्या जमलेल्या मंडळींस प्रत्येकीं चार चार पैसे वाटण्यांत येतात. वडनगरा नागरांमध्यें विवाहाच्या प्रसंगीं वराला पागोटें, एक रुपया, व तत्पक्षीयांस मेजवानी देण्याची चाल आहे. विवाह होतांच वराची बहीण वधूला वरगृहीं घेऊन येते. तेथें तिला तिचा सासरा कांहीं वस्त्रालंकार व एक रुपया देऊन जमलेल्या मंडळींस साकर वाटतो; व नंतर सर्व जातिबांधवांस एक जेवणावळ देण्यांत येते. पुढें दिवाळी, होळी, वटसावित्री, आषाढी एकादशी इत्यादि सणावारांच्या दिवशीं वधूला तिच्या घरीं कांहीं वस्त्र, खेळणीं, व त्या त्या सणाला अनुरूप अशी मिठाई वगैरे पाठविण्याचा रिवाज आहे.

सोयरीक जमविण्याची व वाग्दानाची पद्धति.

कोणाही मुलीचें लग्न ठरल्यानंतर ती आपल्या आप्तस्वकीयांच्या येथें भोजनास गेली असतां तिला नऊ बत्तासे देतात. हे बत्तासे त्यावेळीं देण्यांत न आले, तर लग्न होईपर्यंत जितके दिवस ते दिले जाणार नाहींत, त्या प्रत्येक दिवसाचे नऊ नऊ ह्याप्रमाणें ते केव्हां तरी एकदम द्यावे लागतात.

नवरीला बत्तासे देण्याचा रिवाज.

ज्या सालीं लग्न व्हावयाचें त्या सालच्या संक्रांतीला कन्येला जितकीं वर्षें झालीं असतील तितकीं मृत्तिका पात्रें घेऊन त्यांत पाणी घालून त्या पाण्यानें मुलीला स्नान घालितात; व नंतर तीं पात्रें वरपक्षाच्या सोयऱ्याधायऱ्यांस वाटून देतात.

नवरीच्या मंगल स्नानाची रीति.

दोन्ही पक्षांच्या सवडीप्रमाणें एखादा लग्नमुहूर्त ठरविण्यांत येतो; व तत्पूर्वी आणि तत्पश्चात् आठ आठ दिवस आपापल्या नातेवाइकांस जेवणावळी देण्यांत येतात.

जेवणावळी.

लग्नाच्या पूर्वदिवशीं नवरीला 'पल्ला' ह्मणून द्यावयाची रकम आणि उभयपक्षीं देण्याघेण्याच्या एकंदर बाबती, परस्परांकडून कबूल करवून व नक्की ठरवून घ्याव्या लागतात. ह्याच दिवशीं **नांदीश्राद्ध, गणपतिपूजन,** वगैरे विधि होऊन मुलीला **हळद** लावण्यांत येते. नंतर इष्टमित्र स्त्रियांकडून **मूग** भरडविण्याची चाल आहे.

पल्ला.

लग्नदिवशीं वरपक्षाकडून साकर, मूग व कांहीं रोकड रकम मुलीच्या बापास पाठविण्यांत येते. इष्ट कालाच्या बेतानें वर घोड्यावर बसून आपल्या मंडळीसहवर्तमान वधूगृहीं लग्नाला जातो. ह्यावेळीं नेसत्या धोतराशिवाय त्याच्या अंगावर फक्त एक शाल मात्र असते. पोषाक चढवून जाण्याचा रिवाज नाहीं. त्याच्या हातांमध्यें एक नारळ, विड्याचीं पांच पानें व एक रुपया ठेवण्यांत येतो. **वरघोडा** मिरवत मिरवत कन्येच्या घरीं आला, ह्मणजे तत्पक्षाच्या स्त्रिया व कन्यापिता सामोरा येऊन वराचें स्वागत करून त्यास तसाच जानवसघरीं पोहोंचवितो. तेथें घोड्यावरून उतरल्यावर कन्यापक्षाकडून त्यास साकरपाणी पाजून थोडासा फराळ घालून तांबूल देण्यांत येतो. सर्व मंडळीस पानसुपारी वाटितात. नंतर कन्यापक्षाच्या स्त्रिया वराला मंगलस्नान घालून सासऱ्यानें दिलेलें वस्त्र परिधान करवून आपल्या घरीं लग्नासाठीं घेऊन जातात. तेथें गेल्यावर वस्त्रभूषणांनी व इतर मंगलद्रव्यांनीं त्याचा विशेष सत्कार करण्यांत येतो; व नंतर शास्त्रोक्त विधीनें लग्न होतें. तें झाल्यावर जांवईबोवा सासऱ्यानें पोषाक वगैरे देईपर्यंत त्याच्या घरीं चार दिवस उघडे बोडकेच बसून असतात!

वरघोडा, लग्नविधि व सोहळे.

श्रीगौड ब्राह्मणांचा लग्नविधि.

विवाह (वाग्दान) व लोकाचार.

गुजराथेंत **श्रीगौड** ह्मणून ब्राह्मण आहेत. त्यांच्यामध्यें बालविवाह होतात. कन्यापिता स्वजातींतील एखादा मुलगा पाहून पसंत करितो; व त्याच्या बापाशीं लग्नसंबंधीं बोलणें लावून त्याची मर्जी असल्यास सोयरीक करण्याचें नक्की ठरवितो. नंतर जोशाकडून *वाग्दानासाठीं मुहूर्त काढून घेतात. त्या मुहूर्तावर कन्यापिता आपल्या मंडळीसमागमें वरपित्याच्या घरीं जातो. तेथें गेल्यावर कन्येचा भाऊ किंवा मामा गणपतिस्थापना करून त्याची पूजा करितो. नंतर वराचे पाय धुवून त्याची पूजा करून त्यास पागोटें बांधितो, व हातीं एक रुपया देतो. मग उभयपक्षांच्या जमलेल्या मंडळीस गूळ वाटितात. नंतर वराला कन्येच्या येथें आणि कन्येला वराच्या येथें जेवावयास बोलावून तिला साडी, चोळी, व कांहीं दागिने देतात. मुलीचें वय जास्तींतजास्ती दहा वर्षांचें झालें म्हणजे, किंवा त्या मुदतीच्या आंतच कन्यापिता लग्नमुहूर्त काढवून तो वरपित्याला कळवितो. मग दोन्ही कडील मंडळी वडे, पापड, इत्यादि लग्नसाहित्याच्या तयारीस लागतात. साहित्य करण्याच्या कामीं सोयऱ्याधायऱ्यांच्या स्त्रियांस मदतीला बोलावण्याची चाल आहे.

---

* खास गुजराती लोकांत **विवाह** अशी संज्ञा आहे. सबब जेथें जेथें 'वाग्दान' असा शब्द येईल तेथें 'विवाह' असें समजावें, व 'विवाह' ह्या संज्ञेनें वाग्दान असें जाणावें. विवाह झाल्यानंतर लग्न उभयपक्षांच्या सवडीप्रमाणें होतें.

लग्नमुहूर्तास तीन दिवसांचा अवधि राहिला, म्हणजे **गणपतिपूजन** करून वराला **हळद** लावितात; व त्याच दिवशीं किंवा चांगला मुहूर्त असल्यास दुसऱ्या दिवशीं वधूला **हळद** लावण्यांत येते. पुढें लग्नाच्या दिवशीं **ग्रहशांति** करून ज्ञातिबांधवांना जेवणावळ देतात; आणि मुहूर्त साधेल अशा बेतानें कांहीं वेळ अगोदर **वरघोडा** काढण्यांत येतो. प्रथम वरास कुळदेवतेचें दर्शन करवून तत्पक्षाची सर्व मंडळी त्यास घेऊन कन्येच्या येथें जाते. नंतर वरपक्षाकरितां जें जानवसघर कन्यापित्यानें तयार करून ठेविलें असेल, तेथें ती मंडळी जाऊन बसल्यावर कन्यापक्षाकडून त्यांना पानसुपारी होते. मग कन्येची आई, आपली बहीण अथवा भावाची बायको आणि इतर आप्त स्त्रिया बरोबर घेऊन वराच्या जानवशावर **'कलवो'** घेऊन जाते. कलवो म्हणजे एक प्रकारचा नजराणाच आहे. त्यांत दीड दीड दोन दोन शेरांचे गुळपापडीचे पांच लाडू, पाणी, कुंकूं, अक्षता, व दहीं हे पदार्थ असतात. तेथें गेल्यावर वराला आचमन देऊन त्याच्या कपाळीं कुंकुमतिलक व अक्षता लावितात; आणि आधीं पांच वेळां थोडथोडें दहीं प्राशन करवून नंतर गुळपापडीचे पांच घांस देतात. बाकीची गुळपापडी वराच्या नातेवाईक मुलांस खाऊं घालितात. मग भावी सासूबाई जांवयाचे हात धुवून आपल्या आप्त स्त्रियांसह घरीं परत जातात. त्यासमयीं वरपक्षाकडून प्रत्येकीला सात सुपाऱ्या देण्याची चाल आहे.

हळद व कलवो.

वरील कृत्य आटोपल्यानंतर कन्यापक्षाकडून एका न्हाव्यासोबत वराला मंगलस्नान घालण्याकरितां उष्णोदक व हळद पाठविण्यांत येते. तो न्हावी वरास हळद लावून मंगलस्नान घालितो! त्याबद्दल त्यास नवऱ्यामुलाचा नेसता पंचा देण्याची वहिवाट आहे. स्नान झाल्यावर नवऱ्यामुलास त्याचा मामा कडेवर घेऊन लग्नासाठीं कन्येच्या घरीं नेतो. मार्गांतून जातांना चार ब्राह्मण नवऱ्या-

वराचें मंगलस्नान, वरप्रस्थानरीति, लग्नविधि व सोहळे.

मुलाच्या डोकीवर एक शालेची चांदणी धरून मंत्र ह्मणत चालतात. अशा रीतीनें तें नवरेंमूल कन्यागृहाच्या दरवाज्यापाशीं येतांच तत्पक्षाचे उपाध्याय, व कन्येची आई त्याच्या स्वागतार्थ सामोरे येतात. स्वागत झाल्यावर सासूबाई आपल्या भावी जांवयास कडेवर घेऊन कन्यादान करण्याच्या जागीं त्यास आणून बसवितात ! नंतर कन्येला मंगलस्नान घालून गणपतीपाशीं आणून बसवितात, व तिला त्या मंगलमूर्तीचें ध्यान करावयास सांगतात. मग सासूसासरे जांवयाचे पाय धुवून एका कांशाच्या ताटांत तुपाचा दिवा लावितात. उपाध्याय त्यांजकडून प्रायश्चित्ताचा संकल्प करवून (?) वराला पीतांबर, व सोन्याची किंवा चांदीची आंगठी देववितो. हें झाल्यावर एका बाजूस सासूसासरे व दुसऱ्या बाजूस उपाध्याय अथवा कोणी इतर ब्राह्मण ह्या प्रमाणें उभे राहून वरासमोर अंत:पट धरितात; व मंगलाष्टकें ह्मणण्याला सुरुवात होते. इतक्यांत कन्येचा मामा स्नान करून कन्येला गणपतीपासून उचलून आणून वरासमोर अंत:पटाच्या पलीकडील पाटावर बसवितो. नंतर अंत:पट कांहींसा वर धरून उपाध्याय कन्येच्या मातापितरांकडून कन्यादानाचा संकल्प करवितो. ह्या प्रसंगीं कन्येचा उजवा हात वराच्या उजव्या हातांत घालतात, आणि त्यास एक गोप्रदान देण्यांत येतें. कन्यादान झाल्यावर अंत:पट दूर करून वधूवरांस परस्परांचें दर्शन करवितात; व नंतर त्यांजकडून गणपतिदर्शन करवून ब्राह्मणांस दक्षिणा देववितात. ह्या दिवशीं वरपक्षाची सर्व मंडळी कन्येच्या घरी भोजनास असते; आणि वराचा मुक्कामच तेथें असतो.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशींचीं कृत्यें.

दुसऱ्या दिवशीं वधूवरांकडील प्रमुख मनुष्यें उभयपक्षांच्या सोयऱ्याधायऱ्यांस वरातीला (वरघोडा ?) येण्यासाठीं निमंत्रण करितात. दुपारीं **'चरुभाशना'**चा विधि होतो. तो असा कीं, बहुल्यावर अग्नि पेटवून त्यावर एका लहानशा कोऱ्या मृत्तिकापात्रांत तांदूळ शिजवितात. उपाध्याय स्नान करून तें पात्र खालीं उतरून घेतो. वरकन्येला स्नान घालून बहुल्यावर एकमेकांशेजारीं बसवितात; व त्यांच्या

कडून होम करवून अग्निभोंवतीं सात प्रदक्षिणा घालवितात. नंतर कन्येची आई कंसार व तूप घेऊन येते; व प्रथमतः एका ताटांत मडक्यांतून माताचे पांच घांस काढून व नंतर सर्व भात काढून त्यांत तूपगूळ घालून त्याचे, व तूपकंसाराचे पांच पांच घांस वरकन्येकडून खाविवते; आणि त्यांचे हात धुवून घरांत जाऊं लागते. तेव्हां जांवई तिचा पदर धरितो; व तिनें एक रुपया दिल्याखेरीज तो सोडीत नाहीं. ह्यावेळीं मुलाचा बाप मुलीच्या अंगावर कांहीं दागिने घालितो; व त्याची आई आणि इतर चार स्त्रिया त्या नव्या सुनेच्या कानांत 'अखंड सौभाग्यवती भव.' असा आशीर्वाद बोलतात. हें झाल्यावर सासू आपल्या जांवयाचें नाक ओढिते! आणि त्याजकडून तेथील स्त्रियांना सुपाऱ्या वाटण्यांत येतात. ह्या दिवशींही वरपक्षाच्या मंडळींचें भोजन वधूगृहींच होतें, आणि वधूला 'पल्ला' व दागिने रेशमी साडी वगैरे देऊन तिची वेणी घालितात. सायंकाळीं वराकडील मंडळी भोजनास बसण्यापूर्वी कुलदेवतेची एक गोधूमपिष्टमयी प्रतिमा करून तिला वधूस दिलेलें वस्त्र आणि अलंकार घालितात, आणि पाटावर ठेवून तो पाट वरासमोर पंक्तीमध्यें आणून मांडितात. नंतर भोजनास आरंभ होतो. हें भोजन चालू असतां स्त्रिया 'गौरव' नांवाचें गाणें ह्मणतात; व देवीच्या शक्तिप्रीत्यर्थ तिला तुपाचा नैवेद्य समर्पण करून तें तूप नवरामुलगा, त्याचा बाप, काका, व तत्पक्षीय इतर प्रमुख मंडळी यांस पाजतात! घृतप्राशन झाल्यावर नवरीला रेशमी साडी नेसवून सासऱ्यापाशीं नेतात. तो दूधपोळी कुसकरून तिला खाऊं घालितो. मग लग्नासाठीं आलेल्या मंडळींतून नवऱ्यामुलीला कोणांस कांहीं आहेर करणें असल्यास ते करितात. शेवटीं भात घेऊन सर्व मंडळी उठून जाते.

लग्नाच्या तिसऱ्या दिवशींचीं कृत्ये.

तिसऱ्या दिवशी सायंकाळीं 'पहेरामणी' होते. वरपिता ज्याप्रमाणें वधूला 'पल्ला' देतो ह्मणून वर सांगितलें, त्याचप्रमाणें कन्यापिता वराला कांहीं वस्त्रें, यथाशक्ति रोकड रकम, व भांडीं वगैरे देतो. ह्या नजराण्याला 'पहेरामणी' अशी संज्ञा आहे. ही पहेरामणी झाल्यावर उभयपक्ष अरसपरस कुंकुम-

तिलक लावून पुरुषांस पागोटीं व स्त्रियांस लुगडीं देतात. नंतर जेवणीं होऊन तत्पश्चात् स्त्रियांचें गर्भे-गायन होतें.

वधूवरांची बोळवण.

पुढें एखादा शुभदिवस पाहून वधूवरांस बिदा करितात. वधूवरें वरगृहीं येतांच वरमाता त्यांनां सामोरी येऊन सत्कारपूर्वक घरांत घेऊन जाते. तेथें त्या उभयतांकडून **गणपतिपूजन** करवून **एकीबेकी** खेळवितात. नंतर तीं दोघें सर्व वाडवडिलांस नमस्कार करितात. नवरीला एक दिवस ठेवून घेऊन दुसऱ्या दिवशीं तिच्या माहेरीं परत पाठवितात. ती मोठी होईपावेतों प्रसंगविशेष खेरीजकरून तिचें वास्तव्य बहुधा माहेरींच असतें.

जांबु ब्राह्मणांचा लग्नविधि.

जांबु ह्मणून गुजरातेंत कांहीं ब्राह्मण आहेत. त्यांचा लग्नविधीही कांहीं जुजबी फेरफार खेरीजकरून **श्रीगौड** ब्राह्मणांसारखाच आहे. सबब, तो निराळा सांगत बसण्याचें प्रयोजन नाहीं.

औदीच ब्राह्मणांचा लग्नविधि.

औदीच ब्राह्मणांचा लग्नविधि व सोहळे.

एकंदर गुजराती ब्राह्मणांमध्यें **औदीचांची** संख्या बरीच मोठी आहे. हे ब्राह्मण शुक्लयजुर्वेदी माध्यंदिन शाखेचे आहेत. यांच्या मध्यें वधूवरांच्या वयांची इयत्ता ठरलेली नाहीं. वाग्दान करण्याकरितां वरपक्षाची मंडळी कन्यापित्याच्या घरीं जाते. तेथें यथाशास्त्र वाग्दानविधि झाल्यावर दोन्ही पक्षाची मंडळी परस्परांस सवाशेर बत्तासे देतात. 'विवाह' ह्मणजे वाग्दान तोंडी ठरावानें करण्यांत येतें. त्यानंतर गणपतिपूजन होऊन व्याही परस्परांस पांच पांच सुपाऱ्या देतात. कन्यापिता वराच्या हातीं एक रुपया, सुपारी व नारळ देऊन त्याचा उजवा पाय धुवून त्याची पूजा करितो. वाग्दान झाल्यापासून पुढें लग्न होईपर्यंत सणावारांच्या दिवशीं वरपिता वधूला कांहीं वस्त्र, खेळण्याच्या वस्तु, व खाऊ पाठवितो. लग्न दिवशीं दोन्हीकडे ग्रहशांति होऊन वधूवरांस हळद लावितात. वरप्रस्थान आणि 'कलवो' श्रीगौडब्राह्मणांच्या चालीप्रमाणेंच आहे. 'कलवो' येऊन गेल्यावर वरपक्षाकडून वधूला घालावयाचे अलंकार वगैरे पाठवितात. लग्नमुहूर्त नजीक येतांच नवरामुलगा स्नान करून जानवसघराहून वधूगृहीं जातो. तेथें त्याची भावी सासू सामोरी येऊन त्यास घरांत घेऊन जाते. नंतर लग्नाचीं यथाशास्त्र सर्व कर्मे मंडपांत बहुल्यावरच होतात.

वाल्मिकि ब्राह्मणांचा लग्नविधि.

वाल्मिकि ह्मणून जे गुजराती ब्राह्मण आहेत, त्यांचा लग्नविधीही वर सांगितल्याप्रमाणेंच आहे.

श्रीमाळी ब्राह्मणांचा लग्नविधि.

विवाह (वाग्दान.)

गुजरातेंतील **श्रीमाळी** ब्राह्मणांमध्यें विवाह (वाग्दान) समयीं कन्यापिता वरपित्याला श्रीफल व एक रुपया देतो. वरपिता जमलेल्या मंडळीस साकर वांटितो. ह्यानंतर लग्न होईपर्यंत कोणीही कोणाला कांहीं देणगी वगैरे देत घेत नाहींत. तथापि, वरपिता हौशी असून त्यास वाटेल तर तो एखाद्या सणावाराच्या दिवशीं आपल्या भावी सूनबाईला साकरसाडी पाठवितो.

देणेंघेणें.

लग्नाच्या वेळीं वरपित्याकडून कन्यापित्याला पल्लवाबद्दल १०१ रुपया व मुलीच्या घडोतीबद्दल (ओढाणाना) उभयतांत ठरलें असेल त्याप्रमाणें यथाशक्ति २५ पासून ४० पर्यंत रुपये देण्यांत येतात. शिवाय कांहीं इतर किरकोळ बाबती आहेत, त्याबद्दलही त्यास कन्यापित्याला १२ रुपयांची एक स्वतंत्र रकम द्यावी लागते. मात्र ह्या रकमा उभयपक्ष कुलशीलवान् असले तरच देण्याघेण्यांत येतात. कन्यापिता कुलीन नसला, तर त्यास कांहीं मिळत नाहीं.

लग्नरीति.

लग्न लागण्यापूर्वी ह्या लोकांत वधू एकदा घोड्यावर बसून वराच्या जानवसघरीं जात असते! त्यावेळीं वरपिता तिला यथाशक्ति एक साडी देतो. वस्त्रभूषणें घालून वर लग्नासाठीं मिरवत कन्येच्या घरीं आल्यावर कन्यापिता त्यास दोन पीतांबर देतो. त्यापैकीं एक त्यानें नेसावयाचा, व दुसरा पांघरावयाचा असतो! नेसण्याच्या वस्त्राचा

उपयोग पांघरण्याकडे करण्याची ही चाल विलक्षणच आहे. असो. पीतांबर पांघरलेले वरराज मंडपांत आल्यावर तेथें त्याचें यथाशास्त्र लग्न लागतें. अग्नीला प्रदक्षिणा करितेवेळीं वराचा पिता वधूला यथाशक्ति एखादें वस्त्र देतो. तसेंच लग्नानंतर तिसऱ्या दिवशीं बहुल्याची पूजा होत असते, त्या समयींही वधूला एक हिरवी साडी द्यावी लागते. कन्यापित्याकडून वरास फक्त दोनच वस्त्रें, दहा भांडीं, व यथाशक्ति कांहीं रोकड रकम दिली जाते.

मोढ ब्राह्मणांचा लग्नविधि.

विवाहकाल, वाग्दान, पल्ला, आणि वसंत.

मोढ ह्मणून गुजरातेंत कांहीं ब्राह्मण आहेत. त्यांचा लग्नविधि बहुतेक अंशीं **औदीच** ब्राह्मणांच्या विधीसारखाच असतो. तथापि, वडोदें शहरीं त्यांचीं जीं कित्येक घराणीं आहेत, त्यांच्या मध्यें कांहीं निराळाच प्रकार आढळतो. हे लोक आपल्या मुलीचीं लग्नें कांहीं अनिवार्य कारण खेरीजकरून आठापासून चौदावर्षांच्या वयापावेतों केव्हां तरी करितात. वाग्दानाच्या प्रसंगीं कन्यापिता वरास कुंकुमतिलक (चांदलो) लावून एक रुपया हातीं देतो. नंतर वरपक्षाची मंडळी ' पल्ला ' घेऊन आली, ह्मणजे त्यांनाही एक रुपयाचा 'चांदलो' करावा लागतो. पल्याची रकम २०० पासून ५०० रुपयांपर्यंत यथाशक्ति देण्याची चाल आहे. तथापि, कांहीं विशेष करार करण्यांत आले असतां ह्या रकमेंत कमजास्त होऊं शकतें. 'विवाह' झाल्यावर लागलीच लग्न करणें असल्यास वरपिता कन्यापित्याला पल्ल्याबद्दल आपल्या सामर्थ्याप्रमाणें कांहीं तरी उक्ती रकम देतो. मग त्या संबंधानें करार करावा लागत नाहीं. पण विवाहानंतर सवडीस येईल तेव्हां लग्न करणें झाल्यास पल्ल्याबद्दल आगाऊ करार करून ठेवितात. लग्न लांबणीवर टाकण्यांत आलें, ह्मणजे होळी, दिवाळी, वटसावित्री, ह्यांसारख्या सणावारांस वरपक्षाकडून कन्येला कांहीं खाऊ व एकापासून पांचांपर्यंत शक्तीप्रमाणें रोकड रकम देण्याची चाल आहे. ह्या शिवाय, तिचा ' **वसंत** ' ह्मणून एक सोहळा करण्यांत येतो. त्या प्रसंगीं एक रेशमी साडी, १०० रुपयांच्या किंमतीपावेतों एखादा दागिना, व त्याखेरीज करार झाला असेल त्याप्रमाणें पांचांपासून पन्नासांपर्यंत कांहीं रोख रकमही द्यावी लागते.

लग्नदिनकृत्यें.

लग्नदिवशीं वराकडे इष्टमित्रांस जेवणावळ देण्यांत येते; व कन्येकडे ज्ञातिभोजन होतें. मुहूर्ताच्या बेतानें कुंकुमादि मंगलद्रव्यें, गुळाचें सरबत, व एक रुपया घेऊन वधूपक्षाची मंडळी वराला सामोरी येते. नंतर ते वरास गूळपाणी पाजून 'चांदलो' वगैरे करून त्यास वाजत गाजत लग्नासाठीं घरीं घेऊन येतात. तेथें आल्यावर मंडपामध्यें **गणपतिस्थापना, स्वस्तिवाचन,** इत्यादि विधि होतात. नंतर अंतःपट धरून मंगलाष्टकें ह्मणून कन्यादानसंकल्पपूर्वक वधूवरांचें पाणिग्रहण (हस्तमेळाप) होतें. कन्यापिता वराला यथाशक्ति देणग्या देतो. मग सतपदी व अग्निप्रदक्षिणा झाल्यावर '**चरुभक्षण**' ह्मणून एक विधि करितात. त्यानंतर वधूवरांस आप्त स्वकीयांचे आहेर (चांदला) होतात; व तत्पश्चात् वधूला घेऊन सर्व मंडळी वराच्या जानवसघरीं येते. तेथें तिला तिच्या सासऱ्यानें दिलेलीं वस्त्रें परिधान करवून डोकीस बाशिंग बांधितात. ह्या बाशिंगाचा प्रकार दक्षिण प्रांतीं ज्याला बाशिंग अशी संज्ञा आहे, त्याहून पुष्कळच भिन्न असतो. तथापि, दोहोंचाही उपयोग सारखाच असल्यामुळें आह्मीं ह्यास ' बाशिंग ' हीच संज्ञा देत आहों. वरील कृत्य आटोपल्यानंतर कन्येकडे सर्व जातिबांधवांस जेवणावळ देण्यांत येते; व भोजनोत्तर वरपक्षीयांस पोषाक देतात.

लग्नसमाप्ति.

लग्नाच्या तिसऱ्या दिवशीं वधूवरांकडून **गणपतिपूजन, देवकोत्थापन** व **मंडपोद्वासन** वगैरे विधि करवितात; आणि भोजनोत्तर वधूला माहेरीं परत पाठवितात. ह्मणजे लग्नकार्य संपलें.

विसाभार्गव ब्राह्मणांचा लग्नविधि.

सोयरीक जमविण्याची रीति हळद, वरध, आणि इतर धर्मविधि.

विसाभार्गव हाही गुजरातेंतील ब्राह्मणांचा एक पोटभेद आहे. हे ब्राह्मण सूर्योपासक आहेत. ह्यांच्यामध्यें ज्या वर्षी मुलीला गुरु अनुकूल असेल, त्या वर्षी तिचें लग्न करितां येतें. तसेंच लग्नतिथि ठरविण्याला वधूवरांला चंद्रबळाची अवश्यकता लागते. त्यासाठीं जोशास बोलावून वधूवरांच्या पत्रिका दाखवून ग्रहांच्या बलाबलाप्रमाणें लग्नमुहूर्त व इतर अंगकर्मांचे मुहूर्त ठरवून घेतात. नंतर नातलगांतील ज्या स्त्रिया विधवा झाल्याला योग्य काळ गेला असेल, अशा विधवांस समजावून त्यांस निमंत्रण करून लग्नासाठीं घेऊन येण्याची चाल आहे. विधवा स्त्रियांना गुजराती भाषेंत 'डोशी' असें ह्मणतात. लग्न व्हावयाचें असलें, ह्मणजे अगोदर जोशांस आणि डोशांस बोलावावें लागतें. सबब, जोशाडोशांस बोलावणें हें मंगलकार्याचें एक प्राथमिक कृत्यच समजलें जातें! डोशांस आणिल्यानंतर **गणपति** व **कुलदेवता** यांचें पूजन होऊन वधूवरांस हळद लागते. ह्या दिवसापासून लग्नकार्याला प्रारंभ झाला असें समजतात; आणि ह्याच दिवशीं इष्टमित्रांस जेवणावळ दिली जाते. तिला '**वरध**' अशी संज्ञा आहे. पुढें जोशानें दिलेल्या मुहूर्तावर **पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध,** व **ग्रहयज्ञ** हीं कर्में यथाशास्त्र करण्यांत येतात.

लग्नाच्या पूर्वदिवशीं वराकडून वधूला वस्त्रालंकार वगैरे पाठविण्यांत येतें. त्या वस्तु मर्जीपसंत नसल्यास त्या संबंधानें व्याह्या व्याह्यांमध्यें रुसवा व बोलाचालीही होण्याचा संभव असतो. सबब, ज्या दिवशीं त्या वस्तूंची देवघेव व्हावयाची, त्या दिवसाला 'खाटूं वडूं' अशी अन्वर्थक संज्ञा आहे. ह्या खाटूं वडूंच्या दिवशींच सायंकाळीं कन्यापिता आपल्या पक्षाच्या शिष्टसद्गृहस्थांस बरोबर घेऊन वरपित्याकडे लग्ननिमंत्रण करण्यास जातो. ह्या वेळीं निमंत्रणार्थ आलेल्या लोकांना वरपक्षाकडून सुपाऱ्या वाटण्यांत येतात. कन्यापक्षाच्या स्त्रियाही वरपक्षाच्या स्त्रियांना लग्ननिमंत्रण करितात; व त्या प्रत्येकीस एकेक पैसा देण्याची चाल आहे. लग्ननिमंत्रण करितांना लागलींच वरपक्षाच्या स्त्रीपुरुषांस भोजनाचेंही आमंत्रण केलें जातें.

खाटूं वडूं, व देणें घेणें.

लग्नदिवशीं कन्येकडून वराकडे लग्नपत्रिका पाठवितात. ती आल्यानंतर वराकडील सुवासिनी स्त्रिया वधूचीं सौभाग्यभूषणें घेऊन वाजत गाजत तिच्या येथें जाऊन तीं तिला देतात. नंतर **वरघोड्या**ची मिरवणूक निघून वर लग्नासाठीं कन्येच्या घरीं जातो. त्याला त्याची भावी सासू सामोरी येते. पुढें वधूवरांचें पाणिग्रहण (हस्तमेळाप), गोत्रोच्चार, कन्यादान, ध्रुवदर्शन, सप्तपदी, वगैरे समंत्रक विधि होतात. ते झाल्यावर त्या उभयतांना कंसार खाऊं घालितात. नंतर **सूर्यपाठ** होऊन रात्रौ भोजन झाल्यावर वरकन्या पालखींत बसून मिरवत मिरवत वरगृहीं येतात. ह्या लोकांत सदरहू मिरवणुकीमागें कन्यागृहीं सिद्ध केलेला **गृह्याग्नि** वरगृहीं घेऊन जाण्याची चाल आहे; व ती यथायोग्य आहे. तो गृह्याग्नि वरगृहीं आणिल्यावर व्यवस्थेनें राखून ठेवितात; व दुसऱ्या दिवशीं वधूवरांचें मंगलस्नान झाल्यावर **गृहप्रवेशनीय होम, सूर्यपाठ,** गुरुदक्षिणा व तदनंतर वधूवरांचें एका पात्रांत भोजन हीं कृत्यें होतात. रात्रौ कन्येच्या येथें मेजवानी होते. हास्यविनोदाचेही बरेच प्रकार केले जातात. ह्या दिवसाला '**गौरव दिवस**' अशी अन्वर्थक संज्ञा आहे.

लग्नविधि व सोहळे.

लग्नानंतरच्या तिसऱ्या दिवसाच्या विधीला 'महापुतुं' असें ह्मणतात. ह्या दिवशीं वधूवरगृहीं खास देवीप्रीत्यर्थ आगाऊ पासून वाढविलेल्या ज्वारीच्या रोपांची नवरानवरीकडून पूजा करवितात, व त्यांस एकीबेकी खेळवितात. नंतर देवीच्या सुवासिनी जेवूं घालितात. त्या देवीच्या प्रतिमा तीन दिवस ठेवून पुढें शुभमुहूर्तावर त्यांचें विसर्जन करण्यांत येतें. तें झालें, ह्मणजे लग्नविधि संपला. उभयपक्ष श्रीमान् असल्यास लग्नाप्रीत्यर्थ लग्नाचे चारही दिवस ज्ञातिभोजन घालितात. कोणी कोणी तें सवडीप्रमाणें मागूनही करितात. लग्नसमाप्तीच्या दिवशीं कन्यापिता वरपक्षीयांस यथाशक्ति पोषाक देतो; व उभयपक्षांकडून ब्राह्मणांना दक्षिणा वाटण्यांत येते.

महापुतुंचा विधी व लग्न समाप्ति.

बाजखेडावळ ब्राह्मणांचा लग्नविधि.

विवाह (वाग्दान.) 'समुरतूं चढाववूं.'

बाजखेडावळ ब्राम्हण हे मूळचे काठेवाडांतील रहिवासी आहेत. तत्रापि त्यांची वसति गुजरातेंतही पुष्कळ ठिकाणीं आहे. ह्या लोकांत लग्नसमयीं वधूवरांचीं वयें समान असावींत, किंवा वराचें, वधूपेक्षां थोडेंसें जास्त असावें, असा एक सामान्य नियम आहे. ज्या मुलास मुलगी द्यावयाची, त्याचें कुल, उत्पन्न, व शिक्षण ह्या गोष्टी पाहण्यांत येतात. त्या मनासारख्या असल्या व उभयपक्षीं सोयरीक करण्याचा विचार ठरला, म्हणजे रीतीप्रमाणें वाग्दान किंवा 'विवाह' करितात. त्याप्रसंगीं वरपिता मुलीला एक 'चुनडी' नांवाचें वस्त्र, नारळ व रुपया देतो. उभयपक्षांच्या जमलेल्या मंडळीस गूळ वाटितात. पुढें लग्न होईपावेतों सणावारांच्या दिवशीं वरपित्याच्या शक्तीप्रमाणें, व मुलीच्या वयाच्या मानानें तिला घालण्यालायक असे दागिने वेळोवेळीं दिले जातात. वाग्दान झाल्यापासून जो पहिलाच शिमगा येईल त्या शिमग्याला मुलीस एक रेशमी चुनडी, चोळी, एक साधी सुतराऊ चुनडी, आणि पांचशेरपर्यंत मिठाई पाठवावी लागते. क्वचित् हा प्रकार चार शिमगे होईपावेतों दर शिमग्यास असाच करण्यांत येतो. मुलगी सहा सात वर्षांची झाली, म्हणजे तिला रेशमी साडीचोळी, गळ्यांत घालण्याचा एखादा अलंकार, साडीच्या पदरीं बांधून दोन रुपये, साकर, कुंकूं, आठदहा शेर खारीक वगैरे वस्तु देण्याचा रिवाज आहे. ह्या नजराण्याला 'समुरतूं चढाववूं' अशी पारिभाषिक संज्ञा आहे.

लग्नदिवस वधूवरांचें चंद्रबळ पाहून ठरविण्यांत येतो; व तो ठरविल्या-नंतर त्यास अदमासें पंचवीस दिवसांचा अवधि आहे असें

लग्ननिमंत्रण.

पाहून कन्यापिता उपाध्यायाबरोबर वरपित्याकडे एक कुंकुम-पत्रिका पाठवितो. तींत वरपक्षास लग्नाला येण्याबद्दल निमंत्रण केलेलें असतें. मग त्याप्रमाणें वरपिता आपल्या पक्षाची मंडळी घेऊन जातो.

लग्नमुहूर्त साधण्याच्या बेतानें **वरघोडा** काढून वऱ्हाडी मुलीच्या येथें आले, म्हणजे वरपित्याच्या सामर्थ्याप्रमाणें वधूला अलंकार,

लग्नदिनकृत्यें.

दोन रेशमी चुनड्या, दुसरें कांहीं कापड, नाडाछडी (?) साकरपुडे वगैरे वस्तु देण्यांत येतात. रात्रौ लग्नपत्रिकेचें वाचन आणि धार्मिकविधि होतात.

दुसऱ्या दिवशीं दुपारीं **होमहवन, अग्निप्रदक्षिणा, नांदीश्राद्ध,** वगैरे विधि यथाशास्त्र करण्यांत येतात. ह्याच दिवशीं कन्यापिता

दुसऱ्या दिवशींचीं कृत्यें व लग्नसमाप्ति.

वराला व तत्पक्षाच्या प्रमुख मंडळीला यथाशक्ति पोषाक देतो; आणि मुलीला सासरीं पाठवितांना तिलाही अनुकूल असेल त्याप्रमाणें कांहीं वस्त्रालंकार देतो.

ह्या लोकांत कोणी कोणी आपल्या कन्येबद्दल वरपक्षापासून द्रव्य घेतात. त्याची रकम अमुकच असते असें नाहीं. तथापि, जी

कन्याविक्रयाचा पर्याय.

देण्याचें वरपक्षानें कबूल केलें असेल, ती, तो कन्याविक्रय करणारा पिता लग्नमुहूर्त नक्की करितेसमयींच हस्तगत करून घेतो. त्याखेरीज मुहूर्त ठरवीत नाहीं!

गुजरातेंतील जैन वैश्यांचा लग्नविधि.

सामान्य माहिती.

एके कालीं ज्या धर्मानें सर्व हिंदुस्थान देश व्यापून टाकिला होता, व जो जैन धर्म पुढें सनातन वैदिक धर्माच्या सूर्यप्रकाशांत अस्तंगत झाला, त्याचे अनुयायी ह्या देशांत अझूनही कोठें कोठें आहेत; ते बहुतकरून **वैश्यवर्णाचे** असून त्यांचा भरणा गुजरातेंत आणि काठेवाडांतील **पालिटाणा** वगैरे ठिकाणीं विशेष आहे. एतद्देशीय वैश्य अथवा वाणी लोकांची बरीच मोठी संख्या जैनधर्मी आहे. त्यांस **श्रावक** असें ह्मणतात. त्यांच्यांत **श्वेतांबरी, दिगंबरी, ढुंढिया,** वगैरे भेद आहेत. ह्या सर्व भेदांत अरसपरस कन्याव्यवहार होत नाहीं. श्वेतांबरी व ढुंढिया या दोघांमध्यें मात्र होतो. इतर वाणी वैष्णवपंथी असतात, व त्यांस **मेश्री** अशी संज्ञा आहे. कांहीं श्रावक व मेश्री वाण्यांतही शरीरसंबंध होऊं शकतो. परंतु अशीं कुटुंबें फार नाहींत. जैनधर्मी वैश्य कापड, किराणा, जवाहिर, वगैरे जिनसांचा व्यापार करितात. धर्मभेदामुळें त्यांच्या लग्नांतील **विधि** कांहींसे भिन्न आहेत; सबब ते येथें देतों. **सोहळे** मेश्री वाण्याप्रमाणेंच असल्यानें ते पुढें त्या वैश्यांच्या लग्नवर्णनांत येतील.

सोयरीक जमविणें व पक्का.

ज्या जातींत अरसपरस कन्याव्यवहार होतो, अशा जातींत कन्यापिता आपल्या पसंतीप्रमाणें एखादा वर पाहून काढितो. वर पसंत होण्यास मुख्यतः त्याचें कुल व श्रीमंती ह्या दोनच गोष्टींची आवश्यकता असते! वराचें वय, शिक्षण,

किंवा इतर परिस्थिति, ह्यांजकडे फारसें लक्ष्य देत नाहींत! लग्नें बहुत-करून बालवयांत करण्यांत येतात; व त्यांतूनही सामान्यजनरूढिविरुद्ध, आणि विशेष गर्हणीय गोष्ट अशी कीं, नवऱ्याचें वय नवरीपेक्षांही कमी असलें तरी चालतें! वर कन्यापक्षास पसंत पडला, ह्मणजे पहिल्यानें उभयपक्षांत **पल्ल्या**संबंधीं वाटाघाट चालते. **पल्ला** ह्मणजे वर-पित्यानें कन्यापित्यास मुलीबद्दल देण्याची *रकम. हा पल्ला घेण्याचा प्रघात फार आहे; आणि वस्तुतः तो घेणें, ह्मणजे धडधडीत कन्याविक्रय करणेंच होय! असो. पल्ल्याची रकम ठरली, ह्मणजे बहुधा विवाह नक्की ठरल्या-सारखाच होतो. तथापि, नंतर औपचारिक रीतीनें तो नक्की ठरल्या-बद्दल एक लेख करण्याचा रिवाज आहे.

विवाहलेख.

विवाहलेख—कन्यापक्षाचा वडील पुरुष हा लेख तयार करवून त्यावर कुंकवाच्या पाण्याचा शिडकाव करितो; आणि त्याची शालि, दूर्वा, इत्यादि द्रव्यांनीं यथाविधि पूजा करून श्रीफळ व रुपयासह तो वरपक्षाच्या वडील पुरुषास इष्टमित्र व जातिबांधवां-समक्ष देतो. जमलेल्या मंडळीस पानसुपारी वाटण्यांत येते. नंतर वरप-क्षाकडून वधूला वस्त्रभूषणें पाठविण्यांत येतात; आणि उभयपक्षांच्या ऐपतीप्रमाणें अरसपरस मेजवान्या व सत्कार होतात.

लग्ननिर्धार.

लग्ननिर्धार—लग्नापूर्वी कांहीं दिवस दोन्ही पक्षाची मंडळी एकत्र जमून जोशीबोवांस बोलावून आणितात, व त्यांकडून लग्नपत्रिका करवितात. अर्थात् ह्या पत्रिकेंत लग्नमुहूर्ताचा उल्लेख केलेला असतो. तिच्यावर कुंकुमोदक शिंपडून व तिचें यथाविधि पूजन करून आपल्या ऐपतीप्रमाणें जोशीबोवांचा सत्कार करितात. नंतर

---

* ही रकम कन्यापित्यास आपल्या मुलीच्या लग्नासंबंधें तिजसंबंधानें झालेल्या एकंदर खर्चाऐवजीं देण्यांत येते, असें ह्मणतात. परंतु वस्तुतः ती कन्येची किंमतच होय! ह्या रकमेबरोबर कोणी कोणी आणखी मुलीला वस्त्रालंकारही देतात.

कन्यापिता वराला देण्याचा हुंडा—**पहेरामणी**—देतो. ह्या प्रसंगीं जमलेल्या मंडळीस गूळ वांटण्याची चाल आहे.

मातृकास्थापन.

मातृकास्थापन—लग्नाच्या पूर्वी दोन, चार, पांच, सात, किंवा नऊ दिवस, अथवा लग्नदिवशीं शुभ मुहूर्तानें वधूवरांकडे यथाविधि **मातृकास्थापन** करितात. ह्या मातृका ह्मणजे जैन लोकांच्या गोत्रदेवता होत. त्यांच्या संख्येविषयीं मतभेद आहे. 'आचार दिनकर'नामक ग्रंथांत आठ मातृका सांगितल्या आहेत. 'अभिधान चिंतामणीं'त सात ह्मटल्या आहेत; व कित्येक ठिकाणीं ह्या सात मातृकांचेंच स्थापन व पूजन करण्यांत येतें. तथापि, रूढीनें सोळाही मातृका मानिल्या जातात. त्यांच्या स्थापनपूजनासंबंधानें निरनिराळ्या ज्ञातिकुलांकडून निरनिराळे रिवाज अनुसरण्यांत येतात.

अभ्यंगस्नान व देवपूजा.

मातृकास्थापन केल्या दिवसापासून लग्नदिवसापर्यंत वधूवरांस दररोज (सुंगधी तेल व 'पीठी' म्हणजे हळद लावून) अभ्यंगस्नान, घालण्याची, त्यांजकडून आराध्य देवतांची पूजा करविण्याची, व यथाशक्ति 'आंगी,' ह्मणजे देवीचें मखर करविण्याची चाल आहे.

मंडपमुहूर्त.

मंडपमुहूर्त—बहुधा लौकिक रीतीनें मांडव अगोदरच तयार करून ठेवितात. नंतर त्या मंडपांत सुमुहूर्तावर कन्यापिता आपल्या स्त्रीसह व चार विवाहित पुरुषांसह पाटावर पूर्वाभिमुख बसून उपाध्याय सांगतील त्याप्रमाणें संकल्प करून ज्या संक्रातीला जो कोन विहित आहे, त्या कोनांत प्रथमतः खळगा करितो. नंतर बाकीच्या कोनांत खळगे करितात; व त्यांत मेढी उभ्या करून उपाध्यायांनीं 'ओम् नमः क्षेत्रदेवतायै शिवायै०' इत्यादि प्रतिष्ठामंत्र ह्मटल्यानंतर अनुक्रमानें त्या खळग्यांत शमी, आंबा, अशोक, व दूर्वा, ह्या मंगलपल्लवांभोंवतीं लाल रंगाचें सूत गुंडाळून ते पल्लव पुरितात; आणि वर पाणी शिंपडितात. मग पहिल्या मेढीस 'मींढळ' ह्मणजे कंकण

बांधून सुगंधी द्रव्य (पीठी) लावितात; व तिजपुढें पानें सुपारी पैसे वगैरे ठेवितात.

हें झाल्यावर उपाध्याय ' ओम् ऱ्हीं श्रीं नमो द्वारश्रिये० ' इत्यादि तोरण-प्रतिष्ठामंत्रांनीं कन्यापित्याकडून मांडवाच्या दरवाज्यावर तोरण बांधितात. नंतर मंडपास चांदणी बांधितात. ह्या चांदणीवर एका सुपांत शुभ्र वस्त्र अंथरून त्यावर सौभाग्यद्रव्यानें खाने काढून त्या खान्यांतून स्त्रियांनीं तयार केलेल्या वड्या वगैरे पदार्थ ठेवण्यांत येतात. ह्याप्रमाणें मंडपस्थापना झाली, ह्मणजे ती करणारांस सुपारी देण्याची चाल आहे.

ग्रहशांति.

ग्रहशांति—येथपासून लग्नसमारंभ होईपावेतों दररोज, किंवा निदान लग्न दिवशीं शांतिपुष्टिप्राप्त्यर्थ 'ग्रहशांतिस्तोत्रा'चा पाठ करविण्याचा रिवाज आहे.

वरघोडा.

वरघोडा—लग्नमुहूर्तापूर्वी वरास अभ्यंगस्नान घालून कपाळीं कुंकवाचा मळवट भरून वस्त्रें भूषणें घालून ' **गोत्रज** ' ह्मणजे गोत्रदेवतांस त्याकडून नमस्कार करवून त्याच्या बहीणीच्या हस्तें त्याजवरून मीठ उतरवून टाकितात; व त्यास हत्ती किंवा घोडा ह्या वाहनावर बसवून छत्रचामरादि उपचारांसहित वाजत गाजत वधूच्या घरीं लग्नासाठीं नेतात. त्याच्या समागमें उपाध्याय शांतिमंत्रांचा पाठ करीत चालतात. वाटेंत जेथें जेथें जैनदेवस्थानें लागतील, तेथें त्यांस वराकडून वंदन करवितात. ह्या मिरवणुकीस **वरघोडा** अशी संज्ञा आहे.

जैन वधू.

वरघोडा वधूच्या घरीं येऊन पोहोंचण्यापूर्वी वधूला अभ्यंगस्नान घालून तिच्या हातांत चुडे व इतर भूषणें घालितात, कपाळीं कुंकवाचा मळवट भरून त्यावर अक्षता चिकटवितात, डोळ्यांत काजळ घालून गालावर कस्तूरीतिलक करितात, पाय अळित्यानें रंगवितात, गळ्यांत पुष्पमाळा घालून हातांत गजरे बांधितात; व केंसांचा

अंबाडा बांधून तिजकडून गोत्रजाचें दर्शन व पूजन करवितात. नंतर तिला मातृगृह म्हणजे 'मोहरूं'* असतें तेथें बसवावी, असें सांगितलें आहे.

वरागमनाच्या वेळचे कित्येक सोहळे.

नवरामुलगा मिरवत मिरवत वधूच्या दरवाज्यापुढें आला, म्हणजे त्यास चौरंगावर उभा करितात. तेथें कन्येच्या मातेनें त्याचा अर्घ्यसत्कार करावयाचा असतो. तो करण्यापूर्वी वरासमोर अंत:पट धरवून वराच्या मामानें वधूकडून त्या अंत:पटावर चाविलेल्या विड्याचा पीक थुंकविण्याची चाल आहे! ही चाल घाणेरडी व त्याज्य आहे. असो. कन्येच्या मातेनें नवऱ्यामुलाचे पाय धुवून त्यावर कुंकुमचंदनाचें पाणी ओतावयाचें, त्याच्या कपाळीं कुंकवाचा टिळा लावून वर अक्षता चिकटवावयाच्या, गळ्यांत पुष्पहार घालावयाचा, मस्तकावर फुलें, दूर्वा, व अक्षता टाकावयाच्या, आणि त्याच्या मुखास दहीं व लोणी ह्यांचा स्पर्श करवून थोडें पाणी लावावयाचें. नंतर कापूरआरती करावयाची. ह्या कृत्यांस **अर्घ्यसत्कार** असें म्हटलें आहे. हल्लीं हा अर्घ्यसत्कार, 'हस्तमेळाप' म्हणजे पाणिग्रहणापूर्वी न करितां त्या नंतर कन्येच्या मातापित्यांकडून उभयतां वधूवरांस टीपेंत सांगितलेल्या रत्नदीप व माणिकलाडूजवळ करण्याचा प्रघात आहे. वराच्या प्रवेशमार्गांत लाल सूत गुंडाळिलेलें एक सरावसंपुट§ ठेवितात. त्यांत थोडासा विस्तव व मीठ वगैरे असतें. हें संपुट वरानें आपल्या पायानें फोडून मंडपांत प्रवेश करावयाचा. मंगलप्रसंगीं हा प्रकार कांहींसा विचित्र दिसतो!

---

* हें मोहरूं घरांतील एखाद्या खोलींत पूर्व दिशेच्या भिंतीवर काढिलेलें असतें. तेथें वधूवरांचें पाणिग्रहण (हस्तमेळाप) वगैरे करण्याची सोय नसते. सबब, वधूवरांकडून मोहरूंजवळ जीं कृत्यें करवावयाचीं, तीं मंडपामध्येंच करवितात. मात्र तेथें गोत्रजनातांच्या ऐवजीं चार वातीकरितां चार घरें केलेला कणकीचा दिवा तांबड्या सुताच्या वाती घालून लावितात. त्यास 'रत्नदीप' अशी संज्ञा आहे. ह्या रत्नदीपाजवळ एक नारळ वर शेंवया चिकटवून ठेविलेला असतो. त्यास 'माणिकलाडू' असें ह्मणतात.

§ पसरट आकाराच्या मातीच्या पात्रास संस्कृतांत 'शराव' किंवा 'सराव' असें ह्मणतात. अशीं दोन पात्रें एकावर एक पालथीं घातलीं, ह्मणजे त्यांचें संपुट होतें.

नंतर कन्येच्या मातेनें वराच्या गळ्यांत एक लाल वस्त्र माळेसारखें* घालून त्यास वर सांगितलेल्या रत्नदीपाजवळ कन्येच्या डाव्या बाजूस एका चौरंगावर पूर्वाभिमुख बसवावयाचा; आणि गोत्रदेवतांचें मोहरूं असतें, त्यापुढें धूप जाळावयाचा.¶ 'हस्तमेळापा'स अवकाश असल्यास उपाध्याय कांहीं मंगलाष्टकें ह्मणतात. ह्या मंगलाष्टकांत जैनधर्मसंस्थापक भगवान् गौतमबुद्ध, इतर तद्धर्मपुरस्कर्ते महापुरुष, चक्रवर्ती भरत, जैनधर्मी राजे, मातृका, महापतिव्रता, साध्वी, चक्रवर्तिनी राण्या, आणि यक्षादि उपदेवता, ह्या सर्वांची मंगल करण्याविषयीं प्रार्थना आहे.

लग्नाच्यावेळचीं कृत्यें.

हस्तमेळापाची वेळ जवळ आली, ह्मणजे उपाध्यायानें वधूवरांच्या हातांत कंकणें (मींढळ) बांधिलीं नसल्यास तीं बांधावयाचीं. नंतर दोघांच्या हातास चंदन व शमीच्या गंधाचा लेप करून उभयतांच्या गळ्यांत 'वरमाळा' घालून व त्यांच्या पदरांस गांठ बांधून वराच्या तळहातावर वधूचा तळहात पालथा ठेवावयाचा. ह्या हस्तसंपुटांत कन्यापित्यानें यथाशक्ति रुप्याचें नाणें ठेवावयाचें. नंतर उपाध्यायानें " ओम् अर्हम् । आत्माऽसि । जीवोऽसि । समचित्तोऽसि " इ० मंत्र, कीं ज्यांत विशेषतः परमेश्वराचें सर्व बाबतींतील समत्व वर्णन केलें आहे, ते पठन करून अशा परमेश्वरास त्या वधूवरांचें निश्चतशुभमुहूर्तावर एकीकरण करण्यासाठीं यावें, ह्मणून प्रार्थना करावयाची. उपाध्याय हे मंत्र ह्मणत असतां वधूवरांच्या हस्तसंपुटावर कन्येच्या मातापित्यांस दूध व पाणी ह्यांची एकधारा धरण्यास सांगतात. अर्थात् दूधपाण्याचा जसा एकजीव होतो, तसा त्या उभयतांचा व्हावा, असा ती धार धरण्याचा उद्देश दिसतो; व तो यथायोग्य आहे. मंत्र संपतांच उभयतांचे हात सुटे करितात.

हस्तमेळाप.

---

* ह्यास 'वरमाळ' असें ह्मणतात.

¶ तो कन्येच्या मातेनेंच जाळिला पाहिजे असें नाहीं.

नंतर वधूवर आणि त्यांचीं मातापितरें ह्यांजकडून **स्वस्तिवाचन** करवितात. हें स्वस्तिवाचन ह्मणजे पाण्यानें भरलेल्या एका भांड्यावर श्रीफळ ठेवून त्याची यथाविधि पूजा करावयाची.

स्वस्तिवाचन.

वेदी, अग्निस्थापना आणि होम—स्वस्तिवाचन झाल्यावर वधूवरांस होम करण्यासाठीं वेदीवर नेतात. ही वेदी बहुतेक हिंदुधर्मीयांच्या वेदीप्रमाणेंच असते. तिचें वर्णन पूर्वी येऊन गेल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. मात्र इतकें सांगणें अवश्य आहे कीं, जैनधर्मी लोक वेदीवरील मंडपीची व तिला दक्षिण बाजूस जें द्वार ठेवण्यांत येतें, त्यावरील तोरणाची पूर्वोक्त मंत्रांनीं प्रतिष्ठा करितात; आणि वधूवरांस दक्षिणेकडून वेदीवर नेऊन वेदीच्या आग्नेय कोनांत उपाध्यायांच्या हस्तें अग्निस्थापना व होम करितात. होमद्रव्येंही निराळीं आहेत. येवढा त्यांच्यांत आणि आपल्यांत फरक आहे. जैनोपाध्याय "ओंम् न्हां न्हीं न्हौं न्हः नमोऽग्नये० " इत्यादि मंत्रांनीं अग्नीचें आवाहन करून वर सांगितल्याप्रमाणें त्याची स्थापना करितो; व उत्तराभिमुख बसून गूळ, जव, तीळ, व सुपारी इत्यादि द्रव्यांनीं होम करितो. होममंत्रांमध्यें ओंकारपूर्वक **अर्हन्** (ही जैनांची आदिदेवता होय,) व **अग्नि** ह्यांना प्रसन्न व सावधान होण्याविषयीं प्रार्थना आहे. सर्व देवतांना सकुटुंब सपरिवार आवाहन करून आणण्याविषयीं अग्नीची प्रार्थना आहे. तसेंच अर्घ, पाद्य, आचमनीय, बलि, व चरुप्रमुख होमद्रव्यें सर्व देवादिकांस देऊन आपण स्वतांही स्वीकारावींत ह्मणून अग्नीला निवेदन आहे.

होम.

पूर्वाभिषेक—तें झाल्यानंतर जैनोपाध्याय "ओम् अर्हम्। इदमासनमध्यासीनौ० " इत्यादि मंत्रांनीं वधूवरांस दर्भाग्रानें किंवा नागवेलीच्या पानानें तीर्थोदकाचा अभिषेक करितात.

अक्षतारोपण—हें अगदीं भिन्न आहे. तें वरील अभिषेकानंतर उपाध्यायांच्या हस्तें केलें जातें. उपाध्याय आपल्या हातांत दूर्वा व अक्षता घेऊन वधूवरांच्या गोत्रप्रवरांचा आणि त्यांच्या मातृ-

अक्षतारोपण.

पितृवंशांचा उच्चार करून, त्यास आशीर्वाद देऊन, त्या दूर्वा व अक्षता नवरानवरीच्या मस्तकावर टाकितो. ह्या अक्षतारोपणाचा मुख्य उद्देश त्या त्या कुलांतील वधूवरांचा विवाहसंबंध दृढ व्हावा, इतकाच आहे.

शालीहोम, अग्निप्रदक्षिणा व कन्यादान.

शालीहोम, अग्निप्रदक्षिणा व कन्यादान—अक्षत टाकण्याचा विधि झाल्यावर उभयतां वधूवरांकडून यथाविधि अग्निपूजा करवून त्यांकडून शाली व पानसुपारी अग्नीस अर्पण करवितात. ह्यास 'डांगेरनी धाणी' अशी संज्ञा आहे. ही धाणी वधूचा भाऊ एका वेळूच्या सुपांत घेऊन वेदीजवळ उभा असतो, व ती तो वधूवरांस प्रत्येक वेळेस देतो. त्यांनीं ती घेऊन उपाध्यायांस द्यावयाची, म्हणजे ते अग्निस अर्पण करितात. प्रथमतः कन्येला पुढें करून तिचा हात वराच्या हातावर ठेवून उपाध्यायानें "ओम् अर्हम् । अनादि विश्वं । अनादिरात्मा । " इत्यादि मंत्रांनीं त्यांजकडून पहिली प्रदक्षिणा करवावयाची. नंतर धाणी अर्पण करवून "ओम् अर्हम् । कर्मास्ति । मोहनीयमस्ति ।" इत्यादि मंत्रांनीं दुसरी प्रदक्षिणा करवून धाणी अर्पण करावयाची. पुन्हां "ओम्अर्हम् । कर्मास्ति । वेदनीयमस्ति । सातमस्ति" इत्यादि मंत्रांनीं तिसरी प्रदक्षिणा व धाणी अर्पण केल्यावर उपाध्यायानें " ओम् अर्हम् । सहजोऽस्ति । स्वभावोऽस्ति । " इत्यादि मंत्र म्हणावयाचे. नंतर कन्यापित्याच्या हातीं तीळ, जव, दर्भ, दूर्वा व पाणी देऊन कन्यादानाचा यथाविधि संकल्प सांगून त्याकडून तें पाणी वधूवरांच्या हस्तयुग्मांत सोडवावयाचें. वरानें कन्यास्वीकार केल्याबद्दल विधान करावयाचें. हा विधि वस्तुतः हस्तमेळाप झाल्याबरोबर व्हावयास पाहिजे. ह्या स्थलीं त्याच्या क्रमाची विसंगतता दिसते. आपल्यांतील विधि सदरहू क्रमाशीं ताडून पाहतां फारच संगतवार वाटतात. असो. कन्यादान होतांच उपाध्याय वरास " सुप्रतिगृहीता ऽस्तु । शांतिरस्तु । " इत्यादि मंत्रांनीं आशीर्वाद देतात. 'आचारदिनकरां'त ह्या प्रसंगीं कन्यापित्यानें यथाशक्ति देणगी वगैरे

द्यावी, असें सांगितलें आहे; व तें बरोबर आहे. परंतु त्यासंबंधानें हल्लीच्या लोकाचारांत बदल झाला आहे.

होमसमाप्तीचीं कृत्यें.

कन्यादान झाल्यावर उपाध्यायानें वधूचा हात खालीं आणि वराचा वरतीं ठेवून त्यांजकडून अग्नीला धाणी अर्पण करवावयाची; व पुढें नवरा, आणि मागें नवरी, अशा व्युत्क्रमानें त्यांजकडून अग्नीला चवथी प्रदक्षिणा करवावयाची. प्रदक्षिणेंत **क्षेत्रपाला**च्या पाषणास वराला आपल्या पायानें स्पर्श करण्यास सांगतात; व त्यानें तसें केलें, ह्मणजे वधूच्या भावाकडून त्याचा पदांगुष्ठ दाबवितात!

वासक्षेप.

वासक्षेप—नंतर उजव्या बाजूस वर, आणि डाव्या बाजूस कन्या, अशा रीतीनें उभयतांस बसवून उपाध्याय आपल्या हातांत दर्भ, दूर्वा, अक्षत, आणि 'वासक्षेप', (ह्मणजे केशर घालून उगाळिलेलें चंदन सावलींत वाळवून त्याचें तयार केलेलें चूर्ण,) घेऊन ती द्रव्यें 'येनाऽनुष्ठानेन०' इत्यादि मंत्रानें वधूवरांच्या मस्तकावर घालितात. ह्या कृत्यास वासक्षेपाच्या प्रमुखत्वामुळे तेंच नांव दिलें आहे. मंत्राचा अर्थ असा आहे कीं, ज्या अनुष्ठानानें, इंद्रादि देवकोटींनीं वेष्टिलेला आद्य **अर्हन्** हा संसारी जीवांना व्यवहारमार्ग दाखविण्याच्या हेतूनें भोग भोगण्यासाठीं **सुनंदा** व **सुमंगला** ह्या देविद्वयाशीं विवाह करिता झाला, तें हें अनुष्ठान परिपूर्ण असो!

ह्यानंतर कन्यापित्याकडून यथाविधि संकल्प करवून वरास देणगी देववितात. तिचा वरानें स्वीकार केल्यावर उपाध्याय त्यास आशीर्वाद देतो.

अभिषेक व सप्तपदी.

उत्तराभिषेक, व सप्तपदी—नंतर तो "वधूवरौ वां कर्मानुबंधेन०" इत्यादि मंत्रांनीं, वधूवरांस दर्भानें तीर्थजलाचा अभिषेक करितो. मंत्रामध्यें वधूवरांचा विवाह सुखकर होवो, वगैरे अर्थाचीं आशीर्वचनें आहेत.

पुढें **सप्तपदी** व **ध्रुवदर्शन** हे विधि बहुतेक आपल्यांतील विधीप्रमाणेंच आहेत; ते पूर्वी सविस्तर सांगितले असल्यानें येथें थोड्या फेरफारानें पुन्हां

देण्यांत मतलब नाहीं. मात्र ते ह्या लोकांत करितात, येवढें दर्शवून जैन विवाहविधीचा शेवटचा भाग सांगतों.

करमोचन विधि.

उपाध्याय वधूवरांस गोत्रदेवतांसमीप नेऊन त्यांजकडून त्या देवतांची यथाविधि जा करवितो; व तें जोडपें स्नेह, भोग, आयुष्य, व धर्म, ह्यांनीं युक्त असो, त्यांचें सर्व बाबतींत ऐक्य असो, वगैरे अर्थाच्या मंत्रांनीं त्या गोत्रदेवतांची प्रार्थना करितो. नंतर ह्या प्रसंगी तो कन्यापित्याच्या विनंतीवरून वधूवरांचें '**करमोचन**' करण्यासंबंधानें कांहीं मंत्र ह्मणतो. कर बद्ध करण्याचें विधान ह्यापूर्वी असावयास पाहिजे. तें आढळत नाहीं; व त्याशिवाय करमोचन तुटक दिसतें. करमोचनमंत्रांत जीव कशाकशानें बद्ध झालेला आहे, तें सांगून त्याची वरच्या पायरीच्या गुणांकडे प्रगति होण्यासाठीं सुटका असो, व करमोचन केलेल्या वधूवरांचा स्नेहसंबंध अखंडित असो, असें विधान आहे. सदरहू मंत्र वाचनीय असल्यानें तो खालीं जसाचा तसा देत आहोंतः—

ओम् अर्हम्। जीवस्त्वं कर्मणा बद्धः, ज्ञानावरणेन बद्धः; दर्शनावरणेन-बद्धः, वेदनीयेन बद्धः, मोहनीयेन बद्धः, आयुषा बद्धः, नाम्ना बद्धः, गोत्रेण बद्धः, अंतरायणे बद्धः, प्रकृत्या बद्धः, स्थित्या बद्धः, रसेन बद्धः, प्रदेशेन बद्धः, तदस्तु ते मोक्षो गुणस्थानारोहक्रमेण् । अर्ह ओम्।

मुक्तयोः करयोरस्तु वां स्नेहसंबंधोऽखंडितः।

जैन धर्मशास्त्रांत ह्या वेळीं कन्यापित्यानें जांवयास यथाशक्ति देणगी देण्याविषयीं लिहिलें आहे.

नंतर उपाध्याय वधूवरांस वेदीवर घेऊन जाऊन त्यांस आशीर्वाद देतात. वधूवरांकडून परस्परांस शिरा खाऊं घालण्याचा रिवाज आहे. त्या नंतर उभयपक्षांच्या सुवासिनी स्त्रिया त्या वधूवरांस कुंकुमतिलक अक्षता वगैरे मंगलोपचार करून आशीर्वाद देतात. ते झाल्यावर वरानें परमेश्वराची क्षमा मागून वेदीचें यथाविधि विसर्जन करावयाचें; व वाजत गाजत आपल्या घरीं परत जावयाचें. तेथें गेल्यावर त्याच्या आईनें त्यावर अक्षत टाकावयाची. पुढें मातृकाविसर्जन, मंडपविसर्जन, कंकण सोडणें, वगैरे कृत्यें ज्ञाति व कुलाचारांप्रमाणें केलीं जातात.

मेश्री वैश्यांचा लग्नविधि.

सामान्य माहिती.

श्रावक वाणी खेरीजकरून इतर वैश्यांस **मेश्री** असें ह्मणतात, व हे **वैष्णव** संप्रदायाचे आहेत, ह्मणून मागें सांगितलेंच आहे. ह्यांचे एकंदर तेवीस पोटभेद आहेत! त्यांपैकीं कित्येक **वीसा** असतात, व कित्येक **दसा** असतात. त्यांच्यांत अरसपरस रोटीव्यवहार होतो. परंतु बेटीव्यवहार होत नाहीं.

विवाहरीति.

लग्नें बहुधा बालवयांतच करितात. वाग्दान अथवा 'विवाह' हा लग्नापूर्वी कित्येक वर्षे किंवा तत्पूर्वी कित्येक दिवस करितात. त्याची सामान्यतः अशी चाल आहे कीं, मुलाचा बाप मुलीच्या बापाकडे कन्येविषयीं मागणी करितो. तथापि, कित्येक वेळां मुलीच्या बापाकडूनच आपली मुलगी स्वीकारण्याबद्दल मुलाच्या बापास विनंति करण्यांत येते. दुसऱ्या पक्षास ही गोष्ट मान्य झाली, तर मुलामुलींच्या पत्रिका जोशास दाखवितात. त्या जमल्या, तर मुलगा नक्की करून ठेवण्यासाठीं मुलीचा बाप एखाद्या शुभ दिवशीं जातिबांधवांस बोलावून सार्वजनिक ठेवींत एक रुपया घालितो. तो घातल्यावर उभय पक्षांमध्यें कोणी व्यक्ति आसन्नमरण झाल्याखेरीज सोयरिकीचा ठराव मोडूं शकत नाहीं. याप्रमाणें कन्येच्या पित्यानें रुपया भरून मुलगा नक्की करून ठेविला, ह्मणजे एके दिवशीं मुलाचा बाप आपल्या चारचौघां नातलगांसह मुलीच्या बापाकडे जाऊन त्यास दोन तीन रुपयांचा ' चांदलो ' करितो. मुलीचा बाप, आलेल्या

मंडळीस नारळ व पैसे वांटितो. पुढें त्या भावी नवरानवरीस त्यांचे परस्पर सासरे आपल्या घरीं बोलावून त्यांस यथाशक्ति पांचांपासून दहा रुपयांपर्यंत 'चांदला' करितात. मुलीच्या घरीं पहिल्या खेपेस गेल्यावर मुलाच्या बापास कन्यापिता यथाशक्ति कांहीं रोकड रकम नजराण्यादाखल देत असतो. अशा रीतीनें विवाह करण्यांत आल्यावर लग्न होईपावेतों प्रत्येक दसरा, दिवाळी, होळी, व राखीपौर्णिमेच्या सणाला वरपित्यानें वधूला वस्त्रें, व कन्यापित्यानें वरास यथाशक्ति रोकड रकम, नजराणा ह्मणून द्यावी लागते. ह्याखेरीज आषाढ महिन्यामध्यें नवरीनें पांच दिवस उपवास करावयाचे असतात. त्या दिवशीं नवऱ्याचीं मातापितरें तिला फळफळावळ पाठवितात. विवाहाच्या प्रथम वर्षी मुलाकडून मुलीकडे नेण्याचे नजराणे मुलाच्या नातेवाईक स्त्रिया घेऊन जातात; वराची आई व बहीण, ह्यांस कन्यापक्षाकडून यथाशक्ति चांदीचीं नाणीं व इतर स्त्रियांस पैसे देण्याची चाल आहे.

विवाहकाल व लग्नमुहूर्त.

सामान्यतः मुलगी सात, नऊ, किंवा अकरा वर्षांची झाली, ह्मणजे तिचें लग्न करितात. कपोळ वाण्यांमध्यें मात्र कित्येक वेळां मुली चौदा किंवा सोळा वर्षांच्या होईपर्यंत त्यांचीं लग्नें होत नाहींत. लग्नमुहूर्त कार्तिक शुद्ध एकादशीपासून तों आषाढ शुद्ध एकादशीपर्यंत मुलीचा बाप आपल्या सवडीप्रमाणें ठरवितो. तो ठरविण्यासाठीं जोशास आणि आपल्या इष्टमित्रांस घरीं बोलावून आणितो. जोशीबोवानीं सर्वानुमतें सोईस्कर पडेल असा एखादा मुहूर्त दिल्यावर कन्यापिता त्यांस तांदूळ व एक रुपया दक्षिणा देतो. नंतर हा लग्नमुहूर्त एका कागदावर लिहून ती पत्रिका कन्यापक्षाच्या उपाध्यायासोबत वरपित्याकडे पाठविण्यांत येते. वरपिता त्या उपाध्यायास मेजवानी व बरीचशी दक्षिणा देतो.

लग्नापूर्वीचीं कृत्यें.

लग्नापूर्वी तीन किंवा चार दिवस उभयपक्षांकडे **गणपतिपूजन** व **कुलदेवताप्रतिष्ठा** होऊन विधिपूर्वक मांडव घालितात. मुहूर्तमेढ मंगल वाद्यें वाजत असतां सुताराकडून पुरविण्याचा प्रघात आहे. ती पुरिल्यावर नवरानवरीच्या नातलग स्त्रिया आपा-

पल्या घराहून कुंभाराकडे वाजत गाजत जातात, व त्याच्या चक्राची गंध-पुष्पादिकांनीं पूजा करून त्याजपासून कार्यांत लागणारीं मृत्तिकापात्रें घेऊन येतात. नंतर नवरानवरींस आपापल्या घरीं **हळद** लावून त्यांस त्यांच्या इष्टमित्रांकडून मिठाईचे नजराणे करण्यांत येतात. हळद लग्नदिवसापर्यंत प्रत्यही लावण्याची चाल आहे; व ती लाविल्यापासून दोन्हीकडे स्त्रिया सकाळसंध्याकाळीं मंगलगीतें गातात. तसेंच लग्नापूर्वी उभयपक्षांकडे सवडीप्रमाणें **नांदीश्राद्ध** व **ग्रहयज्ञ** हे विधि करण्यांत येतात.

लग्नदिन-कृत्यें.

लग्नदिवशीं वधूच्या घरीं रीतीप्रमाणें बहुलें घालितात. त्यास 'चोरी' अशी संज्ञा आहे. ह्या दिवशीं मुलामुलींचे मामा त्यांजकडे वाजत गाजत कांहीं नजराणे घेऊन येतात. मुलाचा मामा त्यास एक धोतरजोडा, पुष्पहार, नारळ, व कलाबतूचें काम केलेला एक चर्मी जोडा, यांचा नजराणा देतो; आणि मुलीचा मामा तिला एक 'घागरा' (लहंगा), पांढऱ्या साटणीची कांचोळी, सोन्याच्या पत्र्यानें मढविलेले हस्तिदंती चुडे, गळ्यांत घालण्याचा एखादा सुवर्णालंकार (माळ), मोत्यांची नथ (कांटो), पायांत घालण्याचे रौप्यालंकार (कड़ा) व जोडवीं वगैरे जिन्नस देतो. हे नजराणे झाल्यावर मुलीकडील स्त्रिया आपल्याबरोबर सात पुऱ्या, एक द्रोणभर साकर, एकेक पेला दहीं व दूध, लांकडी खडावांची एक जोडी (?), पीतांबर, व धोतरजोडा इतक्या वस्तु घेऊन वाजत गाजत मुलाकडे येतात. मुलीची आई मुलाकडून एखादी पुरी खाववून त्या सर्व वस्तु त्यास देते. नंतर कन्यापक्षाच्या स्त्रिया घरीं परत येतात. ह्या दिवशीं नवरानवरींस आपापल्या घरीं सुवासिनी स्त्रिया मंगलस्नान घालितात. नंतर त्यांस त्यांच्या मामांनीं दिलेले वस्त्रालंकार घालून त्यांजकडून कुलदेवतांची (गोत्रज) पूजा करवितात. मग लग्न-मुहूर्तापूर्वी मुलाचा मामा त्यास घोड्यावर बसवितो, व त्याच्या हातीं सात पानें, सात सुपाऱ्या, एक नारळ, व एक रुपया देतो. वरास दृष्टीची बाधा न व्हावी, ह्मणून त्याची बहीण त्याजवरून एक तांब्याभर पाणी

ओंवाळून टाकिते. नंतर वरपक्षाची सर्व स्त्रीपुरुष मंडळी मोठ्या थाटानें वाजत गाजत कन्येकडे लग्नाला जाण्यासाठीं निघतात. ह्या लोकांतील मिरवणुकीची मिसल दाक्षिणात्यांहून भिन्न असते. प्रथमतः वाद्यांचा ताफा, त्यांच्यामागें पुरुषसमुदाय, त्याच्यामागें अश्वारूढ वरराज, व त्यांच्यामागें मंगलगीतें गाणाऱ्या स्त्रिया, अशा क्रमानें मिरवतात. वरमाता हातीं तुपाचा दिवा घेऊन चालते. नवरीच्या मंडपद्वारापाशीं मिरवणूक येतांच नवऱ्यास घोड्यावरून खालीं उतरवून दारापुढें एका चौरंगावर उभा करितात. येथें कन्येची आई त्याचें स्वागत करिते. तें असें कीं, ती प्रथमतः त्याच्या कपाळीं कुंकुमतिलक लावून त्याचें नाक ओढिते! व त्यास लहानशा आकाराचा एक नांगर, मुसळ, ताक करण्याची रवी, व तीर, इतक्या वस्तु दाखविते. ह्याचा उद्देश काय असेल तो असो! नंतर ती गाईच्या शेण-गोळ्याची रक्षा चारही दिशांस फेंकिते; आणि दह्यानें भरलेलीं दोन लहान लहान मृत्तिकापात्रें संपुटाकृतीनें धरून तीं त्याजवरून सात वेळां ओंवाळून त्याच्या पायापाशीं जमिनीवर ठेविते. त्या पात्रांवर नवरामुलगा आपला उजवा पाय देऊन तीं फोडून टाकितो. हें कृत्य वाईट दृष्टीच्या प्रतिकारार्थ केलें जात असावें असें वाटतें. तें झाल्यावर नवरा मंडपांत प्रवेश करितो. ह्या स्थलीं लग्नप्रसंगीं वधूवरांस आशीर्वाद देण्यासाठीं वैष्णव संप्रदायाचे कोणी **महाराज** बोलावून आणून मोठ्या आदरसत्कारानें प्रमुखस्थानीं बस-विलेले असतात. नवरामुलगा त्यांस वंदन करून 'चोरी'वर जाऊन पाटावर बसतो, आणि तेथें कुलोपाध्यायांच्या सांगण्याप्रमाणें गणपतिपूजन करितो. नंतर कन्येची मातापितरें वराचे पदांगुष्ठ धुवून त्यांची पंचामृतपूजा करि-तात. ती झाल्यावर नवरीचा मामा वस्त्रालंकारमंडित अशा वधूस आणून नवऱ्यासन्मुख अंतःपटापलीकडे उभी करितो; व ब्राह्मण मंगलाष्टकें म्हणतात. लग्नमुहूर्त नजीक येतांच अंतःपट काढून घेऊन वधूवरांचा 'हस्तमेळाप' करितात, त्यांच्या वस्त्रांच्या पदरांस गांठ मारितात, त्यांच्या गळ्यांत 'वरमाळा' घालितात, आणि हीं कृत्यें होत असतां तिकडे वाजंत्री

वाद्यांचा गजर करितात. पुढें इष्टमित्रांकडून वधूवरांस यथाशक्ति रोकड रकमांचे आहेर 'चांदला' होतात. ते झाल्यानंतर बहुल्यावर होमहवन होतें. नवऱ्यामुलाचा मेहुणा एका सुपांत तीळजव घेऊन येतो. नवरानवरी तूप, तीळ, व जव ह्यांचीं अग्नीस अवदानें देऊन प्रदक्षिणा घालितात, व फिरून अग्नीस त्याच हविर्द्रव्यांच्या आहुती देतात. ह्या प्रमाणें चार वेळां अवदानें व अग्निप्रदक्षिणा झाल्यावर तें नूतन दंपत्य (वधू वराच्या डावीकडे अशा रीतीनें) बहुल्यावरच पाटावर बसतें; आणि कन्येच्या आईनें तयार करून आणिलेला साकरेचा शिरा (कंसार) एकमेकांस खाऊं घालितें. प्रत्येकानें प्रत्येकास कंसाराचे चार घांस दिल्यावर तीं दोघें हात धुतात, व **सप्तऋषीं**ची जोडप्यानें पूजा करितात. ती झाल्यावर उभयतां वरांत जाऊन कुळदेवता ह्मणजे गोत्रजांपुढें पैशांनीं एकीबेकी खेळतात. ह्या जुगारींत जो जिंकील तो आयुष्यांत जिंकील, आणि घरसंसार चालवील अशी समजूत आहे, आणि त्या अन्वयें हा खेळ नवरानवरीच्या नशीबाचा शकुन पाहण्याच्या उद्देशानें त्यांजकडून खेळवितात. दाक्षिणात्यांत तो केवळ मौजेखातर खेळत असतात. त्यामध्यें वरील उद्देश नसतो. जसा उद्देश भिन्न, तशी ह्या लोकांत हा खेळ खेळण्याची रीतिदेखील दाक्षिणात्यांच्या रीतीहून भिन्न आहे. ते कधीं कधीं तो पैशांनीं खेळतात; व कधीं कधीं एका खोलगट पितळीमध्यें पाणी भरून त्यांत सात सुपाऱ्या, सात पैसे, सात खारका, आणि एक रुप्याची किंवा सोन्याची आंगठी टाकून ती त्या वधूवरांस शोधून काढण्यास सांगतात. वधूवरें आपापले उजवे हात त्या पाण्यांत बुडवून इतर द्रव्यांमध्यें ती आंगठी चांचपून पाहतात. अर्थात् ज्याच्या हातीं पहिल्यानें आंगठी लागेल, त्यानें जिंकलें, असें समजून त्याची हुशारी व नशीब जास्त प्रशंसनीय होतें. हें कृत्य घरांत गोत्रजापुढें करण्याची चाल आहे. तें आटोपल्यावर नवरानवरी फिरून मांडवांत येतात. नंतर मुलीचा सासरा तिच्या अंगावर कांहीं दागिने घालितो, व तिचीं मातापितरें व्याह्यांस कांहीं परतदेणग्या

देतात. नंतर नवरीच्या नातलगांपैकीं कोणी पुरुष नवऱ्यामुलाच्या एखाद्या नातलगाच्या गालांस व हनुवटीस आपल्या हातानें कुंकवाचें पाणी फांसतो, व आपला हात कुंकवाच्या अथवा इतर रंगाच्या पाण्यांत बुचकळून, त्यानें पांढरे-शुभ्र पोषाक केलेल्या वऱ्हाड्यांच्या पाठीवर किंवा छातीवर रंगीत पंजे वठवीत जातो. हें विनोदाचें कृत्य वरपक्षाकडूनही केलें जातें. नंतर वरपक्षाच्या स्त्रीपुरुषांस मिष्टान्नांचा फराळ घालितात. तो झाल्यावर नवरानवरींस घरीं पोंचविण्यासाठीं गाडी आणितात, आणि नवरीचे वाडवडील मोठ्या दुःखानें तिची सासरीं बोळवण करितात. प्रथमतः नवरीची आई गाडीच्या चाकाची गंधपुष्पांनीं पूजा करिते, व गाडीनें त्या दंपत्यास सुरक्षितपणें पोंचवावें, ह्मणून तिच्या चाकापुढें बळीदाखल एक नारळ ठेविते; आणि गाडी चालू होऊन तिच्या चाकाखालीं तो नारळ फुटला गेला, ह्मणजे त्याचे तुकडे गोळा करून ते ती आपल्या मुलीच्या ओटींत घालिते. ह्या समयीं नवरा-नवरीच्या मिरवणुकीबरोबर नवरीकडील कोणीही जात नाहीं! तींत सर्व माणसें वरपक्षाचीं असतात. त्यांपैकीं पुरुष गाडीपुढें व स्त्रिया गाडीमागें गाणीं ह्मणत चालतात. नवऱ्यामुलास त्याच्या सासऱ्याकडून इतर मूल्यवान् वस्तु खेरीजकरून एक पलंग, बिछाना, ताट, व हंडा इतक्या जिनसा देण्यांत येतात. मिरवणूक वरगृहाच्या दरवाज्यापुढें येतांच ज्यांच्या पदरांस पूर्वी गांठ मारिली आहे, असें ते नव दंपत्य गाडींतून उतरून दरवाज्या-समोर एका चौरंगावर उभें राहतें. ह्यावेळीं नवऱ्यामुलाची बहीण घराचा दरवाज्या लावून घेते, व तिला तिच्या भावानें बक्षिसादाखल कांहीं रकम दिल्याखेरीज ती तो उघडीत नाहीं. तिला तिची हक्काची देणगी मिळाल्या-वर नवऱ्यामुलाची आई त्या जोडप्यास घरांत घेऊन जाते; व गोत्रजाच्या पायां पडविते. नंतर तेथेंही तीं दोघें पूर्वोक्त रीतीनें एकीबेकी खेळतात. ह्मणजे लग्नसमारंभ संपला. पुढें उभयपक्षांकडून जातिबांधवांस ज्ञातिभोजनें देण्यांत येतात. नवऱ्यामुलाचे नातेवाईक नवरीच्या घरीं जेवूं शकतात; परंतु नवरीच्या नातलगांस नवऱ्याकडे अन्नग्रहण करितां येत नाहीं.

केडवा कुणबी लोकांचा लग्नविधि.

ह्या लोकांसंबंधीं कांहीं माहिती; व लग्नाची विलक्षण चाल.

गुजरातेंत गायकवाडी अमलाखालीं **कडी** नांवाचा प्रांत आहे. ह्या प्रांतांतील तालुके **सिद्धपुर** मौजे **उंझा** येथें **उमियामाता** नांवाची देवि आहे, ती **केडवा कुणबी** लोकांची कुलस्वामिनी होय. ह्या लोकांस बहुमानार्थ 'पटेल' अशी सर्वसाधारण संज्ञा देण्यांत येते. गुजरातेंत ही जात 'पाटीदार' ह्या नांवानें प्रसिद्ध आहे. ह्या लोकांमध्यें बारावर्षांनीं एकदा लग्नसराई येते; व ती आली, ह्मणजे ह्यांच्यांत घरोघर लग्नांची एकच गर्दी उडून जाते. तें लग्नपर्व साधण्यासाठीं लहान लहान अर्भकांचींही लग्नें लावून घेतात; आणि त्यांत विशेष हा कीं, बहुतेक सर्व लग्नें एके दिवशीं एकाच मुहूर्तावर लावावयाचीं, अशी चाल आहे! त्यामुळें एखाद्या गांवांत पटेल लोकांचीच वसती असली, तर सारा गांवचा गांव लग्नघर बनून राहतो.

मुहूर्तनिश्चयाचा प्रकार.

मुहूर्तनिश्चयाचा विलक्षण प्रकारः—लग्नमुहूर्त वर सांगितलेल्या उमियामातेच्या देवळांत देवीसमक्ष काढावा लागतो. त्यासाठीं **रुसात** व **मोलीत** ह्या दोन तठाचे पटेल आपापल्या पक्षापैकीं पांच सात इसम बरोबर घेऊन सिद्धपुर येथील भट **कृपाराम केशवजी** ह्यांच्या वंशजांकडे जातात; (ह्या वंशाचीं हल्लीं तीस चाळीस घरें आहेत.) व त्यांच्यापैकीं कित्येकांस घेऊन उंझा येथें येतात. नंतर त्या ब्राह्मणांकडून देवीच्या देवळांत पंधरा दिवस अनुष्ठान करवून मुहूर्तनिश्चय करण्यांत येतो. त्याचा प्रकार असा कीं, ब्राह्मण दोन

चिठ्यांवर मुहूर्त लिहून त्या चिठ्या दोन निरनिराळ्या कुंकवाच्या पुड्यांत गुंडाळून ठेवितात. नंतर मोलोत तटाचा एक, व रुसात तटाचा एक, असे दोन पटेल व दोन ब्राम्हण देवीच्या देवळांत जाऊन मातेचें पूजन करितात, व त्या कुंकवाच्या पुड्या पटेलांस देतात. ह्या वेळीं मंदिराचीं दारें बंद केलेलीं असतात. नंतर ते दोघेही पटेल त्या कुंकवाच्या पुड्या घेऊन गांवांतील चावडीवर (चौरा) येऊन बसतात; व पुड्या सोडून त्यांतील चिठ्यांवर लिहिलेले मुहूर्त तेथील जातिबांधवांस जाहीर करितात. पुढें त्या मुहूर्ताची खबर उपाध्यायांमार्फत अमदाबाद येथें जो प्रमुख पटेल असतो, त्यास देण्यांत येते, व तो सदरहू मुहूर्त गांवोगांव प्रसिद्ध होईल, अशी तजवीज करितो. दरेक गांवांतील प्रमुख पटेल एक चांदणी बांधून व तिजमध्यें एक नगारा ठेवून मुहूर्त जाहीर करण्याची सर्व सिद्धता करितो. उपाध्याय (गोर) मुहूर्तचिठ्ठी घेऊन आला, ह्मणजे नगारा वाजवितात. नंतर घरोघरची पटेल मंडळी सवाशेर गहूं, पावशेर गूळ, तीन पैसे, कुंकूं, श्रीफल, वगैरे घेऊन गात गात चांदणीमध्यें येतात, व ब्राह्मणानें मांडिलेल्या मुहूर्तचिठ्ठीची पूजा करून तिजवर कुंकवाचें पाणी शिंपडून तिजपुढें यथाशक्ति धान्य, श्रीफल, वगैरे ठेवितात. नंतर ब्राह्मणास दक्षिणा देऊन नमस्कार करून व लग्न-मुहूर्त समजून घेऊन आपापल्या घरीं परत जातात. ब्राह्मण त्या गांवीं दोन दिवस मुक्काम करून घरोघरचा शिधा व दक्षिणा घेऊन परत जातो. हें काम करण्यासाठीं लहान गांवीं जाणाऱ्या उपाध्यायांस दहा रुपयेपर्यंत व मोठ्या शहरीं जाणारांस शंभर रुपयांपावेतों दक्षिणेची प्राप्ति होते.

वर सांगितल्याप्रमाणें मुख्य लग्नमुहूर्त ठरला गेल्यावर आणखी एक मुहूर्त ठरवितात. त्याला ' मांडवरातनुं मुहूर्त ' अशी संज्ञा आहे. पहिल्यांत आणि दुसऱ्यांत आठ दिवसांचें अंतर असतें. कांहीं अपरिहार्य अडचणीमुळें पहिल्या मुहूर्तावर लग्न करितां आलें नाहीं, तर तें दुसऱ्या मुहूर्तावर करण्यांत येतें.

मांडवरातनुं मुहूर्त.

ग्रहशांति—ही लग्नकार्याच्या विघ्नप्रतिकारार्थ करण्याची चाल आहे. तिजकरितां एखादा शुभ दिवस नक्की करून त्याची खबर गांवोगांव चिठ्ठ्या पाठवून देतात. सर्व जातीतर्फे उमिया-मातेच्या मंदिरांत एक ग्रहशांति होत असतेच. तथापि, मर्जी असल्यास गांवो-गांवचे लोक आपापल्या घरीं ती स्वतंत्रही करितात. मातेच्या मंदिरांत जी शांति होते, तिजकरितां **पालोदरा** गांवांतील कोणी पटेल सहकुटुंब ऊंझास आणून त्या दंपत्याच्या यजमानत्वाखालीं ती करण्याची चाल आहे, व ती करण्याबद्दल त्या पटेलास एक पोषाक, व त्याच्या स्त्रीस एक हस्ति-दंती चुडा व एकवीस रुपये द्यावे लागतात. शिवाय त्यांना सपरिवार एक जेवणावळही देतात.

ग्रहशांति.

लग्नापूर्वीचीं कृत्यें (वाग्दान)—हें लग्नतिथीपूर्वी कधीं तरी करितात; व तें मुलामुलींचे वडील तोंडी करारानें करितात. मुलीचा बाप मुलाच्या येथें जाऊन किंवा आपल्या उपाध्यायास पाठ-वून वराला कुंकवाचा टिळा लावून त्याच्या बापाला नारळ व एक रुपया देतो. हा विधि झाल्यावर बहुधा कोणी सोयरीक मोडीत नाहींत. तथापि, ती मोडण्याला मानावा तितका प्रतिबंधही मानीत नाहींत. ह्या लोकांत बहुतकरून ज्या घराण्यांत मुलगी देतात, त्याच घराण्यांतील मुलगी करण्याचीही चाल आहे. ह्या पद्धतीस 'साष्टकोष्ट' अशी संज्ञा आहे. महाराष्ट्रांत त्याला 'साटेंलोटें' असें ह्मणतात.

वाग्दान व लग्न-पूर्वदिन कृत्यें.

वराचा बाप मोठा कुलवान् असल्यास मुलीचा बाप त्यास एक हजार रुपयांपर्यंत हुंडा देतो. पण मुलीचा बाप जर गरीब स्थितींत असेल, तर उलट त्यालाच मुलाच्या बापाकडून लग्नखर्चा-साठीं तीनशें रुपयांपर्यंत कांहीं रकम देण्यांत येते.

हुंडा-देणें घेणें.

गणपतिपूजन—बायका कुंभाराच्या येथें वाजत गाजत जाऊन सुघडें घेऊन येतात. कुंभारास त्याबद्दल सवाशेर गहूं व पावशेर गूळ देण्याची चाल आहे. ह्या सुघडांत जोंधळे किंवा गहूं

गणेशपूजा.

घालून त्यावर ब्राह्मण गणेशाची मूर्ति ठेवितो. त्यास सवाशेर गहूं पावशेर गूळ, व तीन पैसे दक्षिणा देऊन शिन्याचें भोजन घालितात.

माणेकस्तंभ-रोपण.

माणेकस्तंभरोपण—ज्या घरीं सुघडें आणतात, त्याच घरीं* सुताराला बोलावून त्याजकडून एक खांब करवून त्याबद्दल त्याला सवाशेर गहूं, पावशेर गूळ, व तीन पैसे देतात. स्तंभरोपण ब्राह्मणाकडून करवून त्यास सात पैसे दक्षिणा देऊन इतर संभावना§ वरप्रमाणें करितात.

वरघोडा.

वरघोडाः—जेवणखाण झाल्यानंतर वराला कुंकवाचा टिळा करून त्याच्या हातीं नारळ व तरवार देतात; आणि गणेशाच्या कुंभापुढें त्याजकडून तीन पैसे ठेववून स्त्रिया त्यास घेऊन गात गात गांवाच्या सीमेवर जातात. कन्येचा बाप व इतर मंडळी त्यांना सामोरी येते. कन्यापक्षाच्या स्त्रियाही गात गात येतात. त्यांनीं आपल्याबरोबर साकरपाणी आणिलेलें असतें. तें त्या वरास पाजितात; आणि त्याला घेऊन जानोसघरीं गात गात जातात. तेथें कन्येची आई वरावरून पाणी उतरून त्यास कुंकवाचा टिळा करून सपीठाचें मिष्टान्न खाऊं घालिते. त्याच्या पंक्तीस वरमातेलाही बसवितात. तदनंतर कन्यापक्षाची मंडळी आपल्या घरीं परत जाते, व त्यांच्या मागून वर आपल्या मंडळीसह लग्नाला जातो. तेथें गेल्यावर कन्येची आई त्याला सामोरी येऊन त्याचा आदर सत्कार करून पाटावर बसविते. पुढें ब्राह्मण कन्येच्या मातापितरांकडून गणपति व ग्रह ह्यांचें पूजन करवून कन्यादानाचा संकल्प करवितो.

---

* ह्यावरून सुघडें आणण्याची चाल सर्वच घराण्यांत नसून ती विकल्पानें आहे असें वाटतें; आणि ज्या घराण्यांत ती आहे, त्याच घराण्यांत सुताराकडून **माणेकस्तंभ** करविण्यांत येतो, असें सिद्ध होतें.

§ भोजन, शिधा, किंवा दोन्ही गोष्टी.

लग्नः—मंडपामध्यें एके ठिकाणीं, रंगविलेल्या सात सात मडक्यांची एक, ह्याप्रमाणें चारी बाजूस चार उतरंडी रचून ती प्रत्येक उतरंड सभोंवतीं तीन तीन वेळू उभे पुरून त्यांस बांधिलेली असते. ह्यास ' चोरी ' अशी संज्ञा आहे. बहुतेक लग्नविधि ह्या चोरींतच होतो. तेथें वधूला एका पाटावर, आणि वराला नवारीनें विणलेल्या चौपायीवर बसवून (वधूवरें अगदीं लहान असलीं, तर येथें त्यांनां घेऊन त्यांचीं मातापितरेंच बसतात !) दोघांमध्यें अंतःपट धरून ब्राह्मण मंगलाष्टकें ह्मणतात, व उभयतांचा " हस्त-मेळाप "—पाणिग्रहण— करवितात. मग अग्नि प्रदीप्त करून त्यांत तीळ, जव, तूप, ह्यांचा होम करितात. वधूवरांकडून अग्नीस प्रदक्षिणा करवितात. **क्षेत्रपाला**ची मूर्ति मांडून तिची, व नंतर **ध्रुव** आणि **सूर्य** ह्यांची पूजा करितात. ह्मणजे लग्नविधि आटोपला.

लग्नविधि.

लग्नसंबंधीं इतर सोहळे व रीतिरिवाजः—लग्नविधि संपल्यावर मुलीची आई वधूवरांकडन एका कांशाच्या ताटांत शिऱ्याचे (कंसार) पांच घांस खावविते. नंतर कुलदेवतेला नमस्कार करवून आणि नवरानवरीच्या पदरांच्या गांठी सोडून वरपक्षाची मंडळी वरास घेऊन जानवस घरीं परत जाते. कोठें कोठें कुलदेवतेपुढें वधूवरांकडून मेश्री वाण्यांच्या रीतीप्रमाणें एकीबेकी खेळवितात. (पहा—पान २२३) व ती खेळणें झाल्यावर वधूवरांस गाडींत बसवून वाजत गाजत जानवसघरीं नेतात. तेथें वरमाता त्यांना सामोरी येते; आणि वधूवरें फिरून वरप्रमाणें एकीबेकी खेळतात. नंतर मुलगी आपल्य माहेरीं परत जाते. कोठें कोठें चोरीमध्यें वरानें आपल्या सासूचा पदर धरिल्याबद्दल त्यास कन्यापित्यानें आपल्या शक्तीप्रमाणें गाय, हैस, किंवा निदान पांच रुपये द्यावे लागतात.

इतर सोहळे व रीतिरिवाज.

नवरामुलगा सासुरवाडींहून आपल्या घरीं परत जाण्यापूर्वी मुलीचा बाप त्यास यथाशक्ति तांब्याचीं भांडीं (ह्यांतून वडे, पापड, चवळ्या, वगैरे पदार्थ भरून देण्याची चाल आहे.), ताट, वाटी, पागोटें, आंगठी, वराच्या बापाला व इतर मंडळीस पोषाक ह्याप्रमाणें देणग्या, व एक मेजवानी देऊन मग त्यांस बिदा करितो.

देणगी व मेजवानी.

कन्या बारापासून सोळा वर्षांच्या वयाची झाली, ह्मणजे तिचा बाप मुहूर्त पाहून तिला घेऊन जाण्याकरितां एखाद्या ब्राह्मणाबरोबर कुंकुमपत्रिका (कंकोत्री) लिहून ती आपल्या व्याह्यांकडे पाठवितो. ती मिळाल्यावर वराचा बाप वरास आणि पंचवीस तीस जातिबांधवांस घेऊन व्याह्याच्या घरीं येतो. कन्यापिता त्यांस तीन दिवस मिष्टान्नभोजन देऊन चौथे दिवशीं त्यांची रवानगी करितो. त्यासमयीं वरपक्षाकडून कन्यापक्षास पंचवीस तीस रुपयांचा पोषाक, व कन्यापक्षाकडून वरपक्षास पोषाक, आणि कन्येला यथाशक्ति दागदागिने वगैरे देणग्या देण्यांत येतात. मुलीचीं मातापितरें गरीब स्थितींत असलीं तर लग्न झाल्यावर लागलीच मुलीला घेऊन तिची आई तिच्या सासरीं जाते, व तेथें सात आठ दिवस तिची पाठराखणी करून आपल्या घरीं परत येते.

वधूचा पितृगृहवास.

ह्या जातींत पाट (नात्रं) लावण्याची चाल आहे. तो केव्हांही लावितां येतो, व त्यांत कांहीं विशेष विधि करावा लागत नाहीं. वराच्या येथें कुळदेवतेचें चित्र काढून त्याची पूजा करितात; व एका मडक्यांत पांचशेर तांदूळ घाळून तुपाचा दिवा लावून ठेवितात. नंतर पाट लावणाऱ्या स्त्रीस घरीं आणून कुळदेवतेच्या पायां पडवून नवरा तिच्या हातांत हस्तिदंताचा चुडा घालितो, ह्मणजे झालें. कन्येचा बाप चांगल्या स्थितींत असला, तर ह्या प्रसंगीं वरापासून कांहीं एक न घेतां उलट कन्येला पंचवीस रुपयांपावेतों कांहीं जिन्नस देतो.

नात्रं (पाट).

लग्नसराई येते, तेव्हां कन्येला कोणी वर न मिळाल्यास तिला पुढें अकरा वर्षेपर्यंत अविवाहित रहावें लागावयाचें; आणि तसें होणें इष्ट नसेल तर हे लोक त्या मुहूर्तावर तिचा **पुष्पगुच्छाशीं विवाह करितात** ! व नंतर तो गुच्छ विहिरींत विसर्जन करितात. अर्थात् ती कन्या विधवा समजली जाते, व नंतर वर सांगितल्या प्रमाणें तिचा केव्हांही पाट लावण्यांत येतो ! प्रत्येक घरचें लग्नकार्य त्या त्या घरीं स्वतंत्रपणें होतें; परंतु कोठें कोठें अनेक वधूंचीं एकेच ठिकाणीं लग्नें लावितात. असें करणें झाल्यास एका मंडपांत वधूप्रत निरनिराळी चोरी करितात, ह्मणजे झालें. उभयपक्षीं यथाशक्ति जें कांहीं देणेंघेणें असेल तें लग्नसमयींच केलें जातें.

विलक्षण विष-वात्व.

नवरा परागंदा झाला, तर कन्येचा बाप ती गोष्ट जातीला जाहीर करितो. नंतर त्याजपासून जातिबांधव दोनशें रुपये अनामत घेऊन त्या मुलीला पाट लावण्यास परवानगी देतात. पुढें वर्तमान-पत्रांतून पहिल्या नवऱ्याला नेमिलेल्या वेळांत येऊन ती रकम घेण्याविषयीं जाहिरात दिली जाते. तो आला तर ठीकच आहे. नाहीं-पेक्षां सदरहू रकम त्याच्या वारसास देण्यांत येते.

जीवंतभर्तृ-केचा पाट.

नवरा हयात असतांही कांहीं कारणावरून मुलीचा किंवा मुलाचा बाप फारकती मागूं शकतो. जो फारकती मागेल त्यानें जातीला चौपन रुपये दिले, ह्मणजे फारकती मिळते.

फारकती.

आंजणा कुणबी लोकांचा लग्नविधि.

गुजरातेंत केडव्यांप्रमाणें **आंजणा** ह्मणूनही कुणब्यांची एक पोटजात आहे. ह्या लोकांत एखाद्या गृहस्थाचा मुलगा दहापंधरा दिवसांचा झाला न झाला तोंच त्याला चतुर्भुज करण्याची वाटाघाट सुरू होते ! ज्या गृहस्थाची मुलगी त्या मुलाच्या बेताची असेल, त्याला मुलाचा बाप आपल्या नातेवाईकांकडून सोयरीक करण्याविषयीं विचारवितो. कन्यापित्यानें त्या गोष्टीला रुकार दिला, कीं लागलीच वरपिता अथवा त्याचा भाऊ आपल्या इष्टमित्रांस बरोबर घेऊन कन्येच्या घरीं जातो. जातांना एक रुपया व खोबऱ्याच्या वाटींत गूळ भरून ती घेऊन जातात. व्याह्याच्या येथें गेल्यावर एक दोन दिवस मुक्काम करून विवाहासंबंधीं उहापोह होतो; व उभयतांच्या संमतीनें नक्की झालें, ह्मणजे वरपिता कन्यापक्षास तो रुपया व खोबऱ्याची वाटी देऊन आपल्या घरीं परत येतो.

सगाईची रीति.

ह्याप्रमाणें सगाई झाल्यानंतर गांवकरी लोक ठरवितील, तेव्हां त्या वधूवरांचें लग्न करण्यांत येतें. साल चांगलें असलें, व पंच लोक एकत्र झाले, ह्मणजे सर्व प्रकारची अनुकूलता पाहून लग्नासंबंधीं गोष्ट काढितात. पंचांच्या विचाराअंतीं तें करण्याचें ठरलें, तर जोशास बोलावून तो व पंच ह्यांच्या विद्यमानें मुहूर्त नक्की करण्यांत येतो. नंतर मुलीचा बाप मुलाच्या बापाला अमुक दिवशीं लग्नमुहूर्त नक्की केला

लग्ननिमंत्रण.

आहे, तरी आपण मंडळीनिशी त्या दिवशीं येण्याचें करावें; अशा मजकुराची कुंकुमपत्रिका लिहून ती आपल्या कुटुंबापैकीं कमींत कमी पांच इसमांसोबत त्याजकडे पाठवितो. कुंकुमपत्रिकेबरोबर कुंकूं, तांदूळ, सुपारी, खारका, आणि बडिशोप ह्या पांच वस्तूंचे पांच पुडे व एक रुपया पाठवावा लागतो. मंडळी तें सर्व घेऊन वरगृहीं आली, ह्मणजे वरास पाटावर बसवून टिळा लावून ते पांचही पुडे व रुपया त्याच्या हातीं देतात. नंतर वरमाता त्यांच्यापुढें तांदळांचें किंवा जोंधळ्यांचें स्वस्तिक काढून त्यावर कुंकवाचें पाणी शिंपडून पुड्यांवर अक्षता टाकिते व ते घरांत घेऊन जाते. आलेल्या सोयऱ्यांस दोन तीन दिवस ठेवून घेऊन शिऱ्याची (कंसार) मेजवानी देतात; व आपल्या गांवीं बिदा करितात.

कार्यारंभींचीं कृत्यें.

पुढें योग्य वेळीं उभयपक्षांकडे पाण्याच्या तांब्याला कुंकवाचीं पांच बोटें लावून आणि वर नारळ ठेवून त्या कलशाची पाटावर स्थापना करितात. हीच **गणपतिस्थापना** होय! मुलीच्या घरीं केडवा कुणब्यांच्या रिवाजाप्रमाणें **माणेकस्तंभरोपण** होतें; व त्या दिवसापासून लग्नकार्याला आरंभ झाला असें मानितात. नंतर नवरानवरीला त्यांचे नातेवाईक भोजनास बोलावितात. भोजनोत्तर त्यांच्या हातांत गहूं व नारळ देऊन कपाळीं कुंकुमतिलक लावितात, व नंतर त्यांना मंगलगीतें गात गात स्त्रिया त्यांच्या घरीं पोंहचते करितात.

लग्नाच्या पूर्वीं एक दिवस वराचा मामा वराकरितां पायजामा, अंगरखा, उपरणें (अंगावर घेण्याजोगें कांहीं वस्त्र), वगैरे पोषाक व एक रुपया घेऊन येतो. नंतर वरास मंडपांत पाटावर बसवून हळद लावून स्नान घालितात, आणि मामानें दिलेला पोषाक चढवून हातीं रुपया देतात. वरपिता त्याला पागोटें बांधतो, व मामा त्याच्या हातीं शस्त्र (तरवार, किंवा कटयार) देऊन त्यास घोड्यावर बसवितो. नंतर स्त्रीपुरुष मंडळी त्या वरासह गांवांतून मिरवतात. मिरवणुकींत स्त्रिया मंगलगीतें गातात. पुढें वरपिता

लग्नमुहूर्तापूर्वी वधूच्या गांवीं दाखल होतां येईल अशा बेतानें, पांचापासून पन्नासापर्यंत स्वपक्षाची मंडळी घेऊन वधूच्या गांवीं लग्नाला जातो. वऱ्हाडी सीमेवर येऊन पोहोंचल्याची वर्दी मिळतांच मुलीकडील स्त्रीपुरुषें एकत्र जमून त्यांच्या स्वागतासाठी सीमेवर जातात. त्यांच्या पैकीं कोणी स्त्री पाण्यानें भरलेल्या ताटांत एक जलपूर्ण कलश, व त्याच्या तोंडावर श्रीफल ठेवून तें ताट घेऊन चालते. वऱ्हाडी उतरले असतील तेथें वधू-पक्षाची मंडळी येऊन त्यांचें स्वागत करितात. नंतर वरपिता वर सांगि-तलेल्या ताटांतील कलशावरचा नारळ उचलून घेऊन कलशांत एक रुपया टाकितो. ह्मणजे वधूपक्षाची मंडळी परत जाते, व वराकडील मनुष्यें त्यांस दिलेल्या जानवशांत जाऊन उतरतात. मग कन्येकडील बायका एका ताटांत शिरा व तूप घेऊन गात गात जानवशावर येऊन वरास, व त्याब-रोबर आणखी चारजणांस शिरा व तूप खाऊं वाढून घरीं परत जातात.

वरप्रस्थान.

तदनंतर वरासुद्धां सर्व वऱ्हाडी स्त्रीपुरुष वाजत गाजत व मंगलगीतें गात मुहूर्ताच्या सुमारास वधूच्या मंडपाशीं येऊन दाखल होतात. कन्येची आई सामोरी येऊन वराच्या हातीं मूठभर तांदूळ व नारळ देऊन त्याच्या कपाळीं कुंकवाचा टिळा लाविते, आणि अंगावर अक्षता टाकून त्याचा पूजासत्कार करिते. मग नवरामुलगा 'चोरीं'त जाऊन बसतो, व इतर माणसें बिछायतीवर बसतात. कन्येला हळद लावून तिच्या मामानें आणलेलीं वस्त्रें परिधान करवितात; व मामा तिला बहुल्यावर आणून बसवितो.

लग्नविधि.

कन्येकडील उपाध्याय एका ताटांत कुंकूं, अक्षता, नाडे (लाल रंगाचीं सुतें), तीळ, जव, तूप, व पाण्यानें भरलेलें भांडें घेऊन येतो. नाडे चौपट करून त्याच्या ' वरमाळा ' करितो, व त्या वधूवरांच्या गळ्यांत घालितो. नंतर मातीच्या कुंडांत अग्नि प्रदीप्त करून होम व प्रदक्षिणा हीं कृत्यें केडव्रा कुणब्याप्रमाणेंच करण्यांत येतात. मग कन्येची आई कंसार व तूप घेऊन 'चोरीं'त येते; व तें त्या उभयतां वधू-

वरांपुढें ठेविते. वर त्यास फक्त स्पर्श करून हात धुवून सासूचा पदर धरून ठेवितो, व कांहीं देणगी देण्याचें कबूल करून घेतल्याखेरीज तो सोडीत नाहीं. देणगीचा प्रकार केडवा जातीप्रमाणेंच आहे. हें झाल्यावर वरमाता वधूवरांवर अक्षत टाकिते. नंतर कन्यापक्षाच्या स्त्रिया व वरपक्षाची सर्व मंडळी वधूवरांस घेऊन वर सांगितल्याप्रमाणें मिरवत परत जानवस घरीं येतात. तेथें वरमाता वराच्या अंगावर अक्षत टाकून व त्यास टिळा लावून त्याचें स्वागत करिते. मुलीकडील पोक्त मनुष्य मुलीला घेऊन वरपक्षाच्या पोक्त मनुष्याच्या ओटींत घालितो—अर्थात् त्याच्या मांडीवर बसवितो. ह्यासमयीं जमलेल्या मंडळींतून प्रत्येकजण मुलीच्या हातीं एकेक रुपया देतो. नंतर मुलीकडील स्त्रिया तिला घेऊन घरीं परत जातात. वरपक्षाची मंडळी दोन दिवस राहून तिसरे दिवशीं आपल्या गांवीं बिदा होते. मंडळींच्या जेवणा-खाणाचा खर्च मुलीच्या बापाकडे असतो.

वधूवरांची बोळवण.

वराची रवानगी करितेसमयीं कन्येचा बाप त्यास एक पागोटें, तांब्याची घागर, कांशाचें ताट, वगैरे देणग्या देतो. तसेंच गांवांतील प्रमुख मनुष्याजवळ उपाध्याय, देवस्थानें, व चाकर-माणसें, ह्यांना देण्यासाठीं ह्मणून दहा रुपये त्यास द्यावे लागतात; व गांवाच्या सीमेवर ब्राह्मण व इतर याचक मंडळीला आठ आ-ण्यापासून तों पन्नास रुपयांपावेतों यथाशक्ति दक्षिणा द्यावी लागते. वधू मोठी असली, तर तिला त्याचवेळीं घेऊन जातात. लहान असली, तर नेत नाहींत. घरीं गेल्यावर वरमाता त्यांचें पूर्वोक्त रीतीनें स्वागत करिते, व नंतर सर्व नातेवाईक आपापल्या घरीं जातात.

माहेरवास व पुन्हा सासरची पाठवणी.

कन्या बारा वर्षांची झाली, ह्मणजे तिचा बाप मुलीला घेऊन जाण्या-विषयीं उपाध्यायासोबत वरगृहीं निरोप पाठवितो. वरपिता कन्यापित्याची गृहस्थिति ध्यानांत आणून वर आणि इतर दहा पंधरा असामी समागमें घेऊन मुलीच्या येथें जातो.

ह्या समयीं कन्येच्या अंगावर घालण्याचे अलंकार न्यावे लागतात. मुलीची सासरीं पाठवणी करितांना तिचा बाप जांवयास कर्णभूषणें, धोतर, चांदीची आंगठी, बनात, वगैरे देतो. इतर मंडळीस प्रत्येकीं एकेक धोतर देण्याची चाल आहे. मुलीला यथाशक्ति हौस, तांब्याची घागर, गंज, कांशाचें ताट, पितळेचा गडू, गादी, चादर, लेप, बिरूद्या, जोडवी, चुडे, बाळ्या वगैरे वस्तु देण्यांत येतात. मुलगी लग्नांतच मोठी असली, तर तिला सदरहू देणग्या लग्नसमयीं न देतां एक मूल झालें ह्मणजे देण्याची चाल आहे.

नात्रं. केडवा कुणब्यांप्रमाणें ह्या लोकांतही 'नात्रं' ह्मणजे पुनर्लग्न करण्याची चाल आहे. हें पुनर्लग्न नवरा विद्यमान असतांही करितां येतें! मग तो मेल्यावर तर तें करण्यास मुळींच हरकत नाहीं. लग्नाचा नवरा हयात असतां त्याचा संबंध कांहीं कारणावरून तोडून टाकण्याची इच्छा असल्यास कन्यापिता वरपित्याला (किंवा वराला) कांहीं रकम देऊन तसें करूं शकतो. मुलीचें पुनर्लग्न करण्याचा अधिकार तिच्या आई-बापांस, भावांस, किंवा इतर पालकाला आहे. तें करावयाचें असलें, ह्मणजे पुनर्लग्नाच्या नवऱ्याशीं त्या संबंधानें विचार ठरवून मंगळवारीं किंवा रविवारीं तें लावण्यांत येतें. हा नवरा त्या स्त्रीसाठीं एक हस्तिदंती चुडा व यथाशक्ति अलंकार घेऊन ठरलेल्या दिवशीं तिच्या माहेरीं जातो; व त्या वस्तु तिच्या अंगावर घालून आपल्या कित्येक मित्रांसह दोन दिवस तिच्या येथें राहून नंतर तिला घेऊन परत जातो, ह्मणजे झालें.

गुजराती सोनारांचा लग्नविधि.

पोटजाती, 'विवाहरीति' व विवाहलेख.

गुजरातेंतील सोनारांमध्यें सहा पोटजाती आहेत. **गुजर, मेवाडा, पराजिया, त्रागड, श्रीमाळी, व मारू.** ह्या साही पोटजातींत लग्नसंबंधीं विधि व सोहळे बहुतेक अंशीं एकसारखेच आहेत. ह्या लोकांत लग्न जमविण्याकरितां मुलामुलींच्या जन्मपत्रिका पाहण्याची चाल नाहीं. वाग्दान करितात. त्यास 'विवाह' अशी संज्ञा आहे. हा विवाह करण्यासाठीं कन्येचा बाप अथवा पालनकर्ता जातीच्या पंचांस किंवा सोयऱ्याधायऱ्यांस बरोबर घेऊन मुलाच्या बापाकडे जातो. तेथें श्रीगणपतीचें व वराचें पूजन करून त्यास पागोटें बांधितो. नंतर वरपित्यास टिळा लावून एक रुपया देतो. मग उभयपक्षांत 'अमुकाच्या कन्येचा अमुकाच्या मुलाशीं विवाह निश्चित झाला,' अशा मतलबाचा लेखी करार होतो. त्यांत देण्याघेण्यासंबंधानेंही उल्लेख करण्याची चाल आहे. त्रागड सोनारांत मात्र असा लेख करीत नाहींत. ह्याप्रमाणें विवाह, ऊर्फ लग्न—करार झाल्यानंतर तो उभयपक्षीं मोडितां येत नाहीं.

विवाहानंतर उभयपक्षांतील सणावाराचीं कृत्यें.

विवाहानंतर सणावाराचे दिवशीं वधूवरें आपापल्या सासरीं भोजनास जातात. वटसावित्री, दिवाळी, होळी, इत्यादि सणाचे दिवशीं कन्येला खाऊ आणि वस्त्रें पाठविण्याची चाल आहे. हा नजराणा घेऊन येणारास कन्यापक्षाकडून आठ आणे देण्यांत येतात. लग्न होईपर्यंत मुलीला सणावाराचे दिवशीं

घालण्याकरितां तिच्या सासऱ्याकडून दागिने मिळतात. हे दागिने मुलीची सासू घेऊन जाऊन कन्यापित्याच्या व इतर नातलगांच्या समक्ष मुलीच्या अंगावर घालिते.

ह्या प्रमाणें 'विवाह' झालेल्या वधूवरांचें लग्न करण्याचा विचार ठरला, ह्मणजे मुलीचा बाप जोशाकडून मुहूर्त पाहवितो; व त्याजकडून गणपति व पत्रिकापूजन करवून घेतो. नंतर ती पत्रिका उपाध्यायाबरोबर वरपक्षाकडे पाठविण्यांत येते. वरपिता पत्रिका घेऊन येणाऱ्या उपाध्यायाची यथाशक्ति संभावना करितो. मुहूर्त ठरविणें, हें मुलीच्या बापाच्या मर्जीवर आणि सोईवर अवलंबून असतें.

लग्नमुहूर्तपत्रिका.

लग्नाच्यापूर्वी पंधरा दिवस सुमुहूर्तानें **घाणा** भरण्याची चाल आहे. तो भरण्याचा बहुतेक प्रकार दक्षिणी ब्राह्मणांप्रमाणेंच आहे. ह्या दिवसापासून लग्नसाहित्य करण्याची सुरुवात होते. कोणी कोणी घाण्याचे दिवशीं भिंतीवर गणपतीचें चित्र काढून त्याची पूजा करितात. ह्या गणपतीस **कामागणेश** अशी संज्ञा आहे. कामागणेशाची पूजा झाली, ह्मणजे लग्नाच्या **कामाला** सुरुवात झाली असें समजावयाचें. वडे, पापड, शेव, इत्यादि पदार्थ तयार करण्यासाठीं शेजाऱ्यांच्या व नातेवाइकांच्या स्त्रियांस बोलावितात; व त्या ते पदार्थ करितांना गाणीं ह्मणतात. भिंतीस रंग देऊन तिजवर नानाप्रकारचीं चित्रें काढितांना त्यांत व्याही व विहीण ह्यांचींही चित्रें काढितात, व त्यांखालीं त्यांचीं नांवें लिहितात. दररोज सकाळसंध्याकाळीं शेजारच्या व इष्टमित्रांच्या स्त्रिया येऊन गाणीं गातात. त्यांना खारका वांटण्याची चाल आहे.

लग्नाची तयारी, कामागणेश, गृहमंडन, व मंगलगीतें.

लग्नाला थोडे दिवस राहिले, ह्मणजे कार्य निर्विघ्न पार पडावें, ह्मणून गणपतिस्थापना होते. भिंतीवर खडीनें किंवा तांदळाच्या पिठानें एक चौक काढून त्यांत कुंकवाच्या पाण्याचे ठिपके देतात. ह्याचें नांव गणपति! त्याची ब्राह्मण पूजा करितो. इष्टमित्रांच्या बायका सुपांत तांदूळ आणून ते गणपतीपुढें ठेवितात. हे

गणपतिस्थापना.

तांदूळ उपाध्याय घेऊन जातो; व ते आणणाऱ्या स्त्रियांस गूळ वांटितात. ह्या दिवसापासून दररोज सकाळसंध्याकाळीं वाजंत्री वाजा करितात. गीतें गाणाऱ्या स्त्रियांस खारका व सुपाऱ्या वांटण्यांत येतात.

मंडपस्थापना.

लग्न दोन तीन दिवसांवर राहिलें, ह्मणजे सुमुहूर्तानें मंडपस्थापना होते. त्याचा प्रकार असा कीं, पांच नातलग पुरुष शमीच्या डहाळ्या घेऊन घराच्या डाव्या बाजूस जमीनींत पुरितात. ह्या इसमांस कुंकवाचे टिळे लावून त्यांच्या हातास (मणगटास ?) लाल सुताचे नाडे बांधितात. उपाध्याय शमीच्या डहाळ्यांची पूजा करितो, व स्त्रिया गाणीं गातात. ह्याला 'मांडवामुहूर्त' असें म्हणतात.

'उकरडी नोतरवी'

मांडवामुहूर्त झाल्यावर स्त्रिया दोन गवऱ्यांमध्यें कापसाच्या सरक्या घालून त्यांच्या भोंवतीं लाल नाडा गुंडाळून मंगलगीतें गात तें गवऱ्यांचें संपुट अंगणांतील एका कोंपऱ्यांत पुरितात. ह्या कृत्यास **उकरडी नोतरवी** असें ह्मणतात.

हळद अथवा 'पीठी'चा सोहळा.

लग्नाच्या आगाऊ दोन किंवा तीन दिवस वधूवरांस आपापल्या मंडपांमध्यें **हळद** लावण्यांत येते. ही हळद मांडवांत पाट मांडून चार पांच स्त्रिया गाणीं ह्मणून वधूला किंवा वराला लावितात; व त्या नंतर लग्नदिवसापर्यंत त्या उभयतांस आंघोळ घालीत नाहींत! ही चाल गलिच्छपणाची आहे. असो. हळद लावण्याला **पीठी चोळवी** असें ह्मणतात.

'चोरी' व ग्रहशांति.

लग्नाच्या पूर्वदिवशीं मंगल कार्याच्या निर्विघ्नतेसाठीं **ग्रहशांति** करण्यांत येते. तिचें वर्णन करण्यापूर्वी **चोरी** करण्याचा प्रकार सांगितला पाहिजे. ती करण्यासाठीं स्त्रिया वाजत गाजत सीमेवर जाऊन तेथील माती सुमारें चार पांच शेर घेऊन व कुंभाराच्या येथून शंकूच्या आकाराचीं लहान लहान सात मृत्तिकापात्रें घेऊन येतात. उपाध्याय त्या मातीचें स्थंडिल करून त्यावर चार बाजूस चार, व बाकीचीं मधोमध अशा रीतीनें तीं मृत्तिकापात्रें मांडून त्यांसभोंवतीं

तांबडें सूत गुंडाळितो. तसेंच त्या स्थंडिलावर हळदीचीं चित्रें काढितो. ह्यास **चोरी** अशी संज्ञा आहे. ही चोरी तयार झाल्यावर यजमान व त्याची पत्नी मंगलस्नानें करून तिच्या समोर पूर्व किंवा उत्तर दिशेस तोंडें करून बसतात. नंतर उपाध्याय यजमानांस गंध लावून त्याच्या डाव्या हातीं थोडेसे तांदळाचे दाणे देतो, व त्यावर उजवा हात पालथा ठेवून हस्तसंपुट करण्यास सांगतो. नंतर कांहीं मंत्र ह्मणून ते तांदूळ चारही दिशांस टाकवितो. मग **गणपति** व **नवग्रह** ह्यांच्या पूजेचा संकल्प करवून पूजा करवितो. ती झाल्यावर **पृथ्वीपूजन, कलशस्थापन,** व **पूजन** हे विधि होतात; आणि नंतर **स्वस्तिवाचन, अमृताभिषेक, मातृकास्थापन** व **पूजन, नांदी-श्राद्ध, होम, ग्रहस्थापन** व **पूजन,** हीं कर्में यथाक्रमानें करून पुढें सर्व देव-तांचें उत्तरपूजन **बलिदान,** व **लक्ष्मीहोम** वगैरे विधि करण्यांत येतात. नंतर आरती आणि ब्राह्मणभोजन घालण्याचा संकल्प करून, देवतांचें विसर्जन करण्यांत येतें. उपाध्याय यजमानांस आशीर्वाद देतात. सदरहू धर्मकृत्यें पूर्वी सांगण्यांत आलीं असल्यानें येथें त्यांचें फिरून वर्णन कर-ण्याची जरूर नाहीं. तीं होतांना मंगलवाद्यें वाजत असतात; व निमंत्रण केलेल्या स्त्रीपुरुषांस प्रत्येकीं सात सात सुपाऱ्या, बदाम, व पानसुपारी देण्यांत येते. विधिविधानें करणारें दंपत्य आपल्या वडिलांच्या पायां पडतें; व ते त्यांस आशीर्वाद देतात.

'वाने घालवूं'

लग्नदिवशीं सकाळीं मांडवांत चार बायका चार बाजूस उभ्या राहून मध्यभागीं पाट मांडून त्यावर वधूला किंवा वराला बसवितात. नंतर चारही बाजूला सात सात पापड, पुऱ्या, व सुपाऱ्या ठेवून स्त्रिया गाणीं गात वधूला अथवा वराला हळद फांसतात; व नंतर आजूबाजूला ठेविलेले पदार्थ सोयऱ्यांत वांटून देतात. ह्याला **वाने घालवूं** अशी संज्ञा आहे. वधूवरांस हळद लागल्यावर त्यांस त्यांचे इष्टमित्र भोजनास बोलावून खाऊकरितां रुपया आठ आणे देतात.

कित्येक ठिकाणीं ग्रहशांतीच्या वेळीं व कित्येक ठिकाणीं लग्नाच्या वेळीं नवरानवरीला त्यांचे आप्त व मित्र कुंकुमतिलक करून कांहीं रोकड रकमेचा आहेर 'चांदला' करितात. लग्नाच्या पूर्वदिवशीं आणि लग्नदिवशीं उभयपक्षीं आपापल्या इष्टमित्रांस यथाशक्ति मेजवान्या देण्यांत येतात.

आहेर अथवा चांदला.

नंतर लग्नमुहूर्तास बराच अवधि राखून नवऱ्यामुलास उंची वस्त्रालंकार परिधान करवितात, त्यास तांबूल खाण्यास देतात, त्याच्या डोक्यावरून खूब खालपर्यंत लोंबणारी फुलांची एक मोठी थोरली जाळी घालितात, डोळ्यांत काजळ घालितात, व गालास काजळाचें गालबोट लावून नवरीच्या घरीं लग्नास नेण्यासाठीं त्यास घोड्यावर बसवितात; आणि **वरघोड्या**ची मिरवणूक मोठ्या थाटानें निघते. तिची मिसल वाण्यांच्या वरघोड्याप्रमाणेंच आहे. फरक ह्मणून इतकाच कीं, वरमाता **रमणदिवा** नुसता हातांत न घेतां तो एका लोखंडी ताटांत ठेवून तें ताट घेऊन चालते; आणि तिच्या डोक्यास बाशिंग बांधिलेलें असतें. तसेंच वराची बहीण घोड्यावर बसून आपल्या भावास दृष्टीची बाधा न व्हावी ह्मणून त्याच्या पाठीमागें त्याजवरून लोण उतरीत* चालते.

वरघोडा.

वऱ्हाड लग्नासाठीं परगांवीं जावयाचें असल्यास नवऱ्यामुलास एका घुसटाकृति गाडींत बसवून सुमुहूर्तानें प्रस्थान करितात. बरोबरची स्त्रीपुरुष मंडळी कोणी गाड्यांत व कोणी घोड्यावर बसून जातात. वाटेंत वराच्या गाडीसमोरून दुसरें वाहन येत असल्यास वराची गाडी बाजूस न करितां समोरचें वाहन एका बाजूनें काढून देतात. वराची गाडी बाजूस घेतल्यास वरा-

परगांवीं वरप्रस्थान, 'सामियूं,' व जानवसघरचे सोहळे.

---

* हें उतरण्याची रीति अशी आहे कीं, एका वाटींत मीठ घालून तिच्यावरून रुमाल गुंडाळितात; आणि ती वरभगिनीच्या हातीं देऊन ती तिला भावावरून उतरण्यास सांगतात. ह्यास **लूण उतारवूं** असें ह्मणतात.

ज्याचा अपमान होतो अशी समजूत आहे. वऱ्हाडी नवरीच्या गांवच्या सीमेवर येऊन दाखल झाले, ह्मणजे वाजंत्री वाद्यें वाजवूं लागतात, आणि स्त्रिया मंगलगीतें गातात. वऱ्हाडी आल्याची वर्दी मिळतांच मुलीकडील स्त्रीपुरुष मंडळी मोठ्या थाटानें वाजत गाजत, आणि स्त्रिया मंगलगीतें गात वरपक्षास सामोऱ्या येतात; ह्यास **सामियुं** अशी संज्ञा आहे. ते आल्यानंतर उभयपक्षांच्या परस्पर भेटी होऊन कन्यापिता वरप्रभृति वऱ्हाड्यांस मिरवीत मिरवीत जानवसघरीं नेऊन पोहोंचवितो. मग तेथें कन्येची आई किंवा बहीण दळियाचे पांच लाडू अथवा गूळपापडी—जिला 'सुखडी' अशी संज्ञा आहे ती—वाजत गाजत घेऊन येते, आणि तिचे पांच घांस वराच्या तोंडांत घालून त्याचें नाक ओढिते! वर तिचा पदर धरितो व एक रुपया दिल्याखेरीज तो सोडीत नाहीं. हे सोहळे आटोपल्यावर ती स्त्री आणिलेली गूळपापडी इतरांस वांटून आपल्या घरीं परत जाते.

वरघोडा, आनीचांपी, आणि वराच्या स्वागताची रीत.

नंतर लग्नमुहूर्त नजीक आल्यावर पूर्वोक्त रीतीनें वरघोडा निघतो. मार्गांत नवऱ्यामुलास एखाद्या देवीच्या मंदिरांत नेऊन तिचें दर्शन करवितात. नंतर नवरामुलगा, त्याचे एक दोघे सोबती, व मशालजी असे थोड्याशा अंतरावर पायीं चालत जाऊन परत येतात. ह्यास '**आनीचांपी**' असें ह्मणतात. हें कृत्य काय उद्देशानें करीत असतील तें न कळे. तदनंतर वरास पुन्हां अश्वारूढ करून वधूच्या मंडपद्वारापर्यंत मिरवीत आणितात. तेथें प्रथम कन्येची बहीण डोकीवर पाण्याचा तांब्या घेऊन त्यास सामोरी येते. त्या तांब्यास 'वरबेडियुं' असें ह्मणतात. नवरामुलगा ह्या 'वरबेडियूं' मध्यें रुपया किंवा आठ आणे टाकितो; ह्मणजे त्याची भावी मेहुणी घरांत परत जाते. मग त्याचा भावी मेहुणा येऊन त्याच्या अंगावर थोडेंसें पाणी शिंपडतो. त्यालाही रुपया अर्धा रुपया देण्याची चाल आहे. हे सोहळे

झाल्यावर नवऱ्यामुलास घोड्यावरून खालीं उतरवून मंडपद्वारापुढें एका चौरंगावर उभा करितात. मग त्याची भावी सासू एका चाळणींत कांहीं कणकीचे दिवे, मुटकळे, सूत काढण्याची चाती, चार गवताच्या काड्या वगैरे वस्तु घालून ती चाळणी व एक मुसळ घेऊन जांवयाच्या स्वागतार्थ त्यास सामोरी येते ! आणि त्या वस्तु त्यास दाखवून चार दिशेस गवताच्या चार काड्या फेंकून देते. ह्या समयीं ब्राम्हण उपाध्याय—**गोर**—हें कार्य निर्विघ्न व्हावें म्हणून ईश्वराची समंत्रक प्रार्थना करितात; व सासूबाई चाळणींतील दिवे आणि सरावसंपुट (पहा-पान २१३) जांवईबोवांच्या पायांजवळ ठेवून, त्यांस तें उजव्या पायानें फोडून व ते दिवे ओलांडून आंत येण्यास सांगतात. ह्या समयीं नवरामुलगा गडबडींत आहे असें पाहून कन्यापक्षाचा कोणी मनुष्य मुलीची जुनी कांचोळी त्याच्या गालास पुसून जातो. नवऱ्यामुलाची नजर चुकवून तो हें कृत्य शहाजोग रीतीनें करून गेला, तर नवऱ्यावर नवरीची सरशी होईल असें समजतात !

लग्नसमारंभ.

वरील सोहळे होऊन नवरा मंडपांत आला, म्हणजे त्यास बहुल्यासमोर पाटावर पूर्वाभिमुख बसवितात. दोन्ही पक्षाची पुरुष मंडळी मंडपांत बसते, व स्त्रिया घरांत जाऊन बसतात. ह्याप्रमाणें सर्वजण स्थानापन्न झाल्यावर नवऱ्यामुलासमोर अंतःपट धरितात. कन्येला तिचा मामा घरांतून आणितो, व तिजकडून तोंडांतील तांबूलाची पीक अंतःपटावर टाकवून तिचा वरासन्मुख (अर्थात् पश्चिमाभिमुख) पाटावर बसवितो. ह्यासमयीं तिनें पांढऱ्या रंगाची रेशमी साडी, व त्याच रंगाच्या साटणीची कांचोळी परिधान केलेली असते; आणि हातांत हस्तिदंताचे रंगीत चुडे घातलेले असतात. असो. अशा रीतीनें वधूवरें बसल्यावर कन्यापिता त्यांचें पादप्रक्षालन करून त्यांस कुंकवाचे टिळे लावितो. उपाध्याय वधूच्या डोकीस मुंडावळी बांधितो. ब्राह्मण, व 'गोर' मंगलाष्टकें म्हणण्यास सुरुवात करितात. कन्येचा उपाध्याय कन्यापित्याच्या हातीं पाणी

व अक्षता देऊन त्याजकडून कन्यादानाचा संकल्प करवितो. नंतर कन्येचा उजवा हात अंत:पटाखालून वराच्या उजव्या हातांत देतात. ह्या वधूवरहस्त-संपुटामध्यें दोन पानें व एक सुपारी तांबड्या सुतानें एकत्र गुंडाळून ती गुंडाळी ठेवण्याची, व हस्तसंपुटावरून एक शेला गुंडाळण्याची चाल आहे. ह्याप्रमाणें वधूवरांचा 'हस्तमेळाप' होतांच अंत:पट काढून घेतात, वाजंत्री वाद्यगजर करितात, स्त्रिया मंगलगीतें गातात, आणि वधूवरांच्या गळ्यांत वरमाळा घालितात, ह्मणजे त्यांचें लग्न लागलें. नंतर दोन्ही पक्षांकडील 'गोर' वधूवरांचा गोत्रोच्चार करितात. केव्हां केव्हां तर ह्या गोत्रोच्चाराऐवजीं एखादें मंगलाष्टक चार वेळां ह्मणतात; व प्रत्येक वेळीं श्लोक संपतांच 'वरकन्या सावधान!' असें जागृतिदायक विधान करण्यांत येतें. हें झाल्यावर वरास वरदक्षिणा आणि 'गोरा'स त्याची बाबत देण्यांत येते. पांच ब्राह्मण **स्वस्तिवाचना**चे मंत्र ह्मणतात. त्यांनाही गंध लावून दक्षिणा वांटितात.

ग्रहपूजा, होम, मंगलफेरे, सप्तपदी वगैरे.

नंतर कन्येला आपल्या जागेवरून उठवून वराच्या डाव्या बाजूस पूर्वाभिमुख बसवितात; आणि त्यांच्या समोर एकसंधी पाट मांडून त्यावर तांदुळांच्या सात राशी घालितात. प्रत्येक राशीवर एकेक पैसा व सुपारी ठेवून तिच्या ठायीं एकेका ग्रहाचें, ह्याप्रमाणें नऊ राशींवर नवग्रहांचें आवाहन, व त्यांचें वधूवरांकडून यथाविधि पूजन करविण्यांत येतें. तें झाल्यावर उपाध्याय बहुल्यावर (चोरी) अग्नि सिद्ध करून वधूवरांस तेथें नेऊन बसवितात, कन्येच्या भावास साळी (डांगेरनी धाणी) घेऊन बोलावितात. मग तो वधूवरांच्या हातांत साळी घालितो, आणि उपाध्याय कांहीं मंत्र म्हणून त्या दोघांकडून अग्नीला साळीचीं अवदानें देववितात. नंतर वधूवरांकडून अग्नीभोंवतीं प्रदक्षिणा घालवितात. त्यांस 'मंगलफेरा' अशी संज्ञा आहे. नवरानवरीचे हे मंगलफेरे होत असतां स्त्रिया मंगलगीतें गातात, व उपाध्याय मंगलाष्टकें ह्मणतात. वधूवरांनीं अग्नीला साळीचें

अवदान देऊन नवरी पुढें, व नवरा मागें, अशा क्रमानें एक मंगलफेरा घातला, ह्मणजे उपाध्याय **पहिलें मंगल** झालें! ह्मणून कन्यापित्यास मोठ्यानें सांगतो; व अशा रीतीनें **दुसरें** व **तिसरें मंगल** करवितो. प्रत्येक मंगल संपतांच कन्येच्या मातापित्यास आपल्या मुलीला कांहीं दान करावयाचें आहे काय ह्मणून 'गोर' विचारीत असतो. त्यांना कांहीं दान द्यावयाचें असल्यास तें ह्या प्रसंगीं देण्यांत येतें. ह्याप्रमाणें तीन अग्निप्रदक्षिणा अथवा मंगलफेरे झाल्यावर उपाध्याय वधूवरांस (वराच्या उजव्या बाजूस वधू अशा रीतीनें) खालीं बसवून त्यांजकडून अग्नीला आहुती देववितो, व नंतर धान्याच्या सात राशी घालून त्या प्रत्येकीस कन्येकडून आपल्या पदांगुष्ठानें स्पर्श करवितो; ह्मणजे **सप्तपदी** झाली. तदनंतर नवरा पुढें, व नवरी मागें, अशा व्युत्क्रमानें तो त्यांजकडून अग्नीला चौथा मंगलफेरा फिरवितो. मग कन्येची आई वहुल्यावरील अग्नीवरच 'कंसार' तयार करून तो नवरानवरींस खावयास देते. ह्या वेळीं उपाध्याय विनोदार्थ एक गुजराती ह्मण ह्मणत असतो, ती अशी:—

" કરમાં કંસાર, હાથમાં ઘીની વાડી,
કંસાર પિરસે કન્યાની માડી !!"

ही ह्मण आह्मी केवळ गुजराती सोनारांच्या चालीरीतींच्या दिग्दर्शनार्थ जशीची तशी दिली आहे. वस्तुतः तींत सासू जांवयास कंसार वाढिते, ह्या पलीकडे कांहीं मतलब नाहीं. असो. कन्येच्या मातेनें कांशाच्या ताटांत कंसार वाढिल्यावर वधूवरें एकमेकांच्या तोंडापुढें त्याचे पांच घांस नेतात. परंतु हे घांस खावयाचे नसतात. त्यांतूनही एखादा घांस चुकून खाण्यांत आलाच, तर जवळ असलेली मंडळी तो खाणारास हांसतात. ह्याप्रमाणें पांच वेळां वधूवरांत अरसपरस घांस दाखविण्याचें कृत्य झाल्यानंतर पुढें तीं दोघें कंसार खातात. ह्या समयीं दुसऱ्या एका कांशाच्या ताटांत कणकीचे चार दिवे करून त्यांत तूप व वाती, घालून ते लावितात, आणि वधूवरांस दाख-

वितात. ह्या दीपचतुष्टयास ' रतनदिवडो ' अशी संज्ञा आहे. ' रतनदिवडो ' दाखविल्यावर पांच सुवासिनी वधूवरांवर अक्षत टाकून वधूच्या कानांत " सौभाग्यवती भव." " राणी रत्नादीनुं सौभाग्य " " ईश्वरपार्वतीनुं सौभाग्य,' ' अखंड सौभाग्य,' असे आशीर्वाद बोलतात. ह्या कृत्यास ' जोडुं वधाववुं ' असें ह्मणतात. तें झाल्यावर कन्येची आई वरमाळ काढून कन्येच्या पदरांत टाकिते, व अग्नीची पूजा करिते. नंतर वधूवरांस मांडवाबाहेर नेऊन **ध्रुव** व **अरुंधती**चें दर्शन करवितात. त्याचा उद्देश, तें नवदंपत्य ध्रुवासारखें चिरंजीव व्हावें, व कन्येला अरुंधतीसारखें अखंड सौभाग्य प्राप्त व्हावें, असा आहे. ध्रुवारुंधतीचें दर्शन करविल्यावर नवरानवरीस घरांत गणपति व कुलदेवता (गोत्रज) ह्यांच्या सन्निध नेतात, व त्यांजकडून त्या देवतांचें पूजन करवितात. लग्न लागल्यापासून वरातीपर्यंत नवरामुलगा सासुरवाडीसच राहतो; व कन्यादान करणारें दंपत्य आणि वधूवरें ह्यांना उपवास करून रहावें लागतें.

द्वितीयदिन-कृत्यें.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं नवरी जानवसघरीं आपल्या सासूबाईकडे वेणी घालण्यासाठीं ' चोटलो वळाववा ' जाते. सासू तिच्या केंसांस सुगंधि तेल लावून तिची वेणी घालिते. मग दुपारीं कन्यापिता वरपक्षाच्या सर्व मानकऱ्यांस आपल्या येथें बोलावून त्यांस यथाशक्ति पोषाक देतो. ह्यास 'उवेतर' (?) अशी संज्ञा आहे. ह्या प्रसंगीं स्त्रिया विनोदपर गाणीं ह्मणतात. वरास पीतांबर, पागोटें तांब्याची कळशी, वगैरे वस्तु देण्यांत येतात. ह्या लोकांत ह्यासच ' पहेरामणी ' असें ह्मणतात; व ती देतांना कन्यापिता एका सुपांत तांदूळ भरून त्यांवर एक लुगडें ठेवून तें सूप वरपक्षापुढें आणून ठेवितो; आणि त्यांतील थोडेसे तांदुळांचे दाणे वधूवरांकडून मंडपावर टाकवितो. ह्यास ' मांडवो वधाववो ' असें ह्मणतात. सुपांतील तांदूळ व लुगडें वरपक्षानें घ्यावयाचें असतें. कन्यापक्षाकडून वरपक्षास वरप्रमाणें 'पहेरामणी' झाल्यावर वरपिता एका ताटांत वधूला देण्याचे अलंकार व खाऊ घालून तें ताट शिष्टाचारार्थ पंचांपुढें

आणून ठेवितो; व त्यांजकडून कन्येला देववितो. हाच तिला देण्याचा 'पल्ला' होय. वधूवरांची पल्लापहेरामणी होण्यापूर्वी कन्यापक्षाचा उपाध्याय त्या उभयतांस शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या घरीं नेऊन त्यांजकडून त्या लोकांच्या भिंतींवर कुंकुमोदकाचे पंजे वठवितो; आणि पोषाक देणेंघेणें होत असतां उभयपक्षांची मंडळीही एकमेकांच्या पाठीवर ह्याचप्रमाणें कुंकवाचे पंजे मारितात.

सासरची पाठवणी, कुसुंबानी बैठक, देणेंघेणें, वगैरे.

पुढें सुमुहूर्तानें कन्यापिता वधूवरांची रवानगी करितो. त्यांस बसण्याची गाडी घुमटाकृतीची असते. उपाध्याय गाडीच्या चाकाची पूजा करून त्यापुढें नारळ ठेवितो. दोन्ही पक्षांची मंडळी एकमेकांस भेटतात. कन्या रुदन करिते; व तिच्या भावी विरहदुःखानें तिची आईबापेंही सद्गदित होऊन अश्रुपात करितात. कन्येची आई आणि सोबतिणी तिला समयोचित उपदेश करितात. तुला लवकरच परत घेऊन येऊं, म्हणून बाप तिची समजूत करितो. नंतर वधूवरें गाडींत बसून चालूं लागतात. पुरुषमंडळी गाडीपुढें व स्त्रिया गाडीमागें गाणीं म्हणत चालतात. कन्येच्या आईनें डोक्यास बाशिंग बांधून हातीं 'रमणदिवा' घेतलेला असतो; व तत्पक्षाची कोणी स्त्री श्रीफलासहित जलकलश घेऊन चालते. कन्यापक्षाची मंडळी वरपक्षास सीमेपर्यंत पोहोंचवावयास जातात. सीमेवर आल्यावर सर्व मंडळी एके ठिकाणीं बसून कुसुंबा म्हणजे अफूचें पाणी करून पितात. ह्यास 'कुसुंबानी बैठक' अशी संज्ञा आहे. उभयपक्षांत कांहीं देणेंघेणें राहिलें असल्यास त्याचा ह्या स्थळीं अखेर निकाल करण्यांत येतो. ब्राम्हणांस भूयसी दक्षिणा वांटितात; व इतर सर्व लोकांच्या बाबती देऊन टाकितात. ह्यास 'दापा चुकावचा' असें म्हणतात. वरकन्येला सीमेसमीपच्या एखाद्या देवळांत नेऊन देवदर्शन करवून आणितात. नंतर वरपक्षाची मंडळी निघून जाते, व कन्येकडील मंडळी घरीं परत येते.

वधूप्रवेश सुमुहूर्तानें करण्यांत येतो. मुहूर्त चांगला नसल्यास तो येई-पर्यंत वधूवरांस शेजाऱ्याच्या घरीं ठेवितात. प्रवेश करितेसमयीं वरमाता नवरानवरींस सामोरी येते, व स्वागतपूर्वक त्यांस घेऊन घरांत जाते. तेथें त्यांजकडून गणपतिपूजन करवून मेश्री वैश्यांच्या रीतीप्रमाणें एकीबेकी खेळविते. नंतर त्यांचीं लग्न-कंकणें व पदराच्या गांठी सोडितात. स्त्रिया ह्या प्रसंगास अनुरूप अशीं गीतें गातात. संध्याकाळीं त्या नवीन जोडप्यास देवीच्या दर्शनास घेऊन जातात. रस्त्यानें जातांना त्या मंगलगीतें गातात. देवीचें व इतर देवतांचें दर्शन घेऊन वरकन्या घरीं परत आल्यावर वाडवडिलांस नमस्कार करितात, व ते त्यांस आशीर्वाद देतात.

वधूप्रवेश व तत्संबंधीं सोहळे.

वरपक्षाच्या मंडळीस लग्नासंबंधानें एकच ज्ञातिभोजन घालावें लागतें; परंतु कन्यापक्षास विवाहनिमित्तें एक, व गौरवनिमित्तें एक, अशा दोन जेवणावळी जातीला द्याव्या लागतात. गौरवाच्या जेवणावळीस वरपक्षाचे स्त्रीपुरुष वाजत गाजत आणि स्त्रिया विनोदगीतें गात कन्येच्या घरीं येतात, व जेवतेसमयीं देखील त्यांची नर्मगीतें चालू असतात.

जेवणावळी व स्त्रियांचीं नर्म-गीतें.

कन्या थोडे दिवस सासरीं राहिल्यानंतर तिच्या माहेराहून कांहीं माणसें तिला परत नेण्यासाठीं बोलावूं येतात; ह्यास 'परजान' अथवा 'तेढवा आवतुं असें म्हणतात. तीं माणसें एक दोन दिवस वरगृहीं राहून आणि तत्पक्षाकडून मेजवान्या व पाहुणचार घेऊन सुमुहुर्तानें नवरीस माहेरीं नेतात. ह्या समयीं तिच्या कनिष्ठ बंधूस वरपिता यथाशक्ति पोषाक वगैरे देतो.

नवरीची परत बोळवण.

ज्या दिवशीं **ग्रहशांति** व्हावयाची त्या दिवशीं स्त्रिया वाजत गाजत विहिरीवर जाऊन नूतन मृत्तिकापात्रांत पाणी भरून आणितात. ह्यास 'वरध भरवी' असें म्हणतात. मुलाचा व मुलीचा मामा श्रीमान् असल्यास ग्रहशांतीच्या वेळीं आपल्या भाचाला किंवा भाचीला, आणि त्यांच्या

वरध भरवी, मोसाळुं भरवुं, आणि माय-माटळुं.

निकट आप्तांना वाजत गाजत आहेर घेऊन येतो. ह्यास 'मोसाळूं भरबुं' असें म्हणतात. तसेंच घाणा भरण्याच्या वेळीं वरपक्षाच्या स्त्रिया एका सुघडांत एकसडी तांदूळ भरून कन्येच्या घरीं घेऊन जातात; व तत्पक्षाच्या स्त्रिया ते तांदूळ 'वाढवून' अर्थात् त्यांत भर घालून आणि तांदुळांचें सुघड रेशमी वस्त्रानें आच्छादून तें वराकडे परत नेतात. ह्या सुघडास 'मायमाटलुं' अशी संज्ञा आहे. त्यावरील रेशमी वस्त्र वराची आत्या घेते.

धान्यपूजन व विसर्जन.

ह्या लोकांत लग्नकार्यामध्यें धान्यपूजनाची एक चाल आहे. हें धान्यपूजन कित्येक घराण्यांत केवळ जातीच्या रिवाजास अनुसरून करितात, व कोणी कोणी त्याबद्दल नवस केला असल्यास करितात. त्याचा प्रकार असा आहे कीं, एका पाटावर मातीनें भरलेलें टोपलें मांडून त्यांत निरनिराळीं धान्यें पेरितात, व तीं उगवलीं, म्हणजे त्यांची प्रत्यहीं पूजा करितात. ह्याप्रमाणें सात दिवस झाल्यावर आठव्या दिवशीं टोपल्यासहित तो पाट एखाद्याच्या डोकीवर देऊन आणि धान्यावर छत्री धरून स्त्रीपुरुषें मोठ्या समारंभानें पायघड्यांवरून मिरवत गांवांतील तलावावर अथवा नदीवर तें धान्य घेऊन जातात, व जलाशयांत त्याचें विसर्जन करून येतात.

गुजराती लोहारांचा लग्नविधि.

गुजराती लोहारांत **रूपाघडा** व **लोढाघडा** अशा पोटजाति आहेत. त्यांत रोटीबेटीव्यवहार होऊं शकतात. मुलामुलींचीं लग्नें पांच वर्षांच्या आंत करीत नाहींत. तथापि, बालविवाह रूढ आहे. लग्न जमविणें तें मुलामुलींच्या जन्मराशींवरून किंवा नामराशींवरून जमवितात. दोघांच्या जन्मराशी किंवा नामराशी मिळत्या आल्या, व देण्याघेण्यासंबंधीं एकमेकांचें ह्मणणें एकमेकांस कबूल असलें, म्हणजे कन्यापिता एखादा शुभ दिवस पाहून आपला उपाध्याय व इष्टशिष्ट मंडळी यांसहवर्तमान सवाशेर बत्तासे व एक रुपया घेऊन वरगृहीं जातो. तेथें गेल्यावर 'गोर' वरास पाटावर बसवून प्रथमत: यथाविधि गणपतिपूजन करितो, व नंतर वरास कुंकुमतिलक लावून ते बत्तासे व रुपया त्याच्या हातीं देतो; म्हणजे वाग्दान अथवा 'विवाह' झाला. ह्याच दिवशीं कन्यापक्षाकडून आपल्या सोयऱ्याधायऱ्यांस व शेजाऱ्यापाजाऱ्यांस एकेक वाटी 'कंसार' वांटण्यांत येतो. विवाहानंतर पहिली होळी, दिवाळी, व आषाढी एकादशी ह्या सणांच्या दिवशीं वरमाता आपली मुलगी व आणखी एखादी दुसरी इष्टमैत्रीण बरोबर घेऊन नवरीच्या घरीं तिला कांहीं खाऊ घेऊन जाते. तेव्हां कन्यापिता तिला व तिच्या मुलीला दहा दहा आणे किंवा एकेक लुगडें देतो. ह्याच प्रमाणें नवरीची आई व बहीण एक वर्षपर्यंत सणावारांस नवऱ्यामुलाला खाऊ घेऊन येतात, व त्यांनाही वरपिता दहा दहा आणे अथवा लुगडीं देतो.

सामान्य माहिती, सोयरीक जमविण्याचीरीति, व वाग्दान अथवा विवाह.

पल्ला.

पुढें एखाद्या दिवशीं वरपिता आपल्या ज्येष्ठ चिरंजीवास अथवा बंधूस बरोबर घेऊन कन्येच्या घरीं येऊन तिला यथाशक्ति साठपासून शंभर रुपयेपर्यंत किंमतीचे दागिने देतो. हाच तिचा ' पल्ला ' होय.

मुहूर्तनिश्चय, घाणा, व लग्न-साहित्य.

लग्नमुहूर्त उभयपक्षांच्या सवडीप्रमाणें ठरविण्यांत येतो. तो काढविण्यासाठीं उभयतां व्याही आपापल्या पक्षाच्या कांहीं इष्टशिष्टांसहवर्तमान तांदूळ, सवाशेर गूळ, कुंकू सुपाऱ्या व सात सात पैसे घेऊन जोशीबोवांकडे जातात. ते मुहूर्त काढून त्याची पत्रिका करून ती कन्यापित्याच्या हातीं देतात; व तो ती वरपित्यास देतो. नंतर दोघेही व्याही आणिलेलें सामान जोशीबोवांस देऊन व इतर मंडळीस गूळ वांटून आपापल्या घरीं परत जातात. तेथें गेल्यावर आपापल्या आळींतील लोकांसही पाव पाव शेर गूळ वांटितात, व सर्वांस लग्नमुहूर्त जाहीर करितात. पुढें उभयपक्षांकडे स्त्रिया एखाद्या शुभ दिवशीं पांच सात शेर एक सडीचे तांदूळ मंगलगीतें म्हणून कांडितात. ह्या कृत्यास 'घाणा' असें म्हणतात. घाण्याचे दिवशीं दोन्ही घरीं मिष्टान्नभोजन होतें, व त्या दिवासापासून लग्नाचें साहित्य तयार करण्याला सुरुवात करितात. तें करण्यासाठीं सोयऱ्याधायऱ्या स्त्रीपुरुषांना मदतीस बोलावण्याची चाल आहे. वडे, पापड, वगैरे तयार करितांना स्त्रिया मंगलगीतें गातात.

वैश्य व सोनारांच्या लग्नरीतीशीं ह्यांच्या चाली रीतींचें सादृश्य वगैरे.

ह्या लोकांत 'ग्रहशांति,' 'वरघोडा,' सासूनें सामोरां येऊन जांवयाचा स्वागतसत्कार करणें, 'कलवा,' वगैरे सर्व कृत्यें वैश्य व सोनारांप्रमाणेंच करण्यांत येतात. त्यांचें वर्णन पूर्वी केलेंच आहे. सबब, तें फिरून करण्याचें प्रयोजन नाहीं. लग्न लागून वधूवरें 'चोरीं'त बसल्यावर तेथें त्यांस कंसार खाऊं घालितात, व नंतर वरमाता एका सुपांत मुलीला देण्याचे

दागिनें, वस्त्र, कांहीं खाऊ, सुपारी, व पापड अशा वस्तु घाढून तें सूप घेऊन 'चोरीं'त येते. ह्यासही पल्ला अशीच संज्ञा आहे. ह्यावरून पल्ला म्हणून देण्याच्या रकमा एकदम न देतां निरनिराळ्या प्रसंगीं भागशः देण्याची चाल आहे असें दिसतें. वरमातेनें तो पल्ला आणून ठेविला, म्हणजे कन्या-पक्षाच्या पांच सुवासिनी येऊन वधूवरांस औक्षण कारितात. त्यांस वर-पक्षाकडून प्रत्येकीं सात सात सुपाऱ्या देण्यांत येतात. नंतर कन्येकडील स्त्रिया सुपांतील पल्ला काढून घेतात, आणि सुपाऱ्या व पापड दुप्पट वाढवून ते वरपक्षास परत देतात. लग्नाप्रीत्यर्थ उपाध्यायांस जी देणगी द्यावयाची ती जो तो पक्ष आपल्या सामर्थ्याप्रमाणें स्वतंत्र रीतीनें देऊन गोरांची समजूत घालितो. कन्यापिता आपल्या सामर्थ्यानुरूप वराची संभावना करितो. त्या समयीं त्यास एक आंगठी द्यावी लागते. ती देण्याची ऐपत नसल्यास एक रुपया देऊन तो त्याची समजूत घालितो.

काडी मोडणें, नात्रं.

ह्या लोकांत नवराबायकोचें जमेनासें झालें, तर जातीला दंडादाखल दहा रुपये देऊन वाटेल तेव्हां काडी मोडितां येते. नात्रं अथवा पाट लावण्याला मोकळीक आहे.

गुजराती सुतारांचा लग्नविधि

पोटजाति, व विवाहरीति.

गुजराती सुतारांत **गुजर, मेवाडा,** वगैरे पोटजाति आहेत. ह्याच्यांत लग्नें लहानपणींच करितात. 'पल्ला' वगैरे देण्याघेण्यासंबंधानें व्याह्यान्व्याह्यांचें बोलणें होऊन लग्न करण्यास दोघे कबूल असले, ह्मणजे मुलीचा बाप एके दिवशीं आपले दोन चार आप्त बरोबर घेऊन मुलाच्या घरीं जातो, व मुलास पागोटें बांधून त्याच्या हातीं साकरपुडा व एक रुपया देतो. नंतर उभयपक्ष अरसपरस गूळ वांटितात. ह्मणजे विवाहाचें कृत्य आटोपलें.

सणावारांच्या चाली.

विवाह झाल्यापासून लग्न होईपर्यंत प्रत्येक होळी, दिवाळी, वगैरे सणावारांस वरपक्षाकडून कन्येला कांहीं खाऊ पाठविण्यांत येतो. वटसावित्रीच्या दिवशीं खाऊ व एक लुगडें पाठविण्याची चाल आहे. तें घेऊन येणारास कन्यापिता आपल्या सामर्थ्याप्रमाणें दोन तीन रुपये देतो.

विवाह झाल्यानंतर दोन्ही व्याह्यांच्या सवडीप्रमाणें मुहूर्त काढवून मुलामुलींचें लग्न लावण्यांत येतें. मुहूर्त काढावयाचा झाला, ह्मणजे व्याही एकत्र जमून जोशास बोलावून आणितात, व त्याजकडून मुहूर्तपत्रिका तयार करवून त्याची यथाशक्ति संभावना करितात. नंतर मुलीचा बाप ती मुहूर्तपत्रिका व एक रुपया आपल्या उपाध्यायाबरोबर देऊन त्यास मुलाच्या बापाकडे पाठवितो. उपाध्यायानें पत्रिका व रुपया दिला, ह्मणजे मुलाचा बाप त्याला सामर्थ्याप्रमाणें रुपया आठ आणे दक्षिणा देतो.

लग्नापूर्वीं स्त्रिया मंगलगीतें गाऊन मुसळाला आम्रपल्लव बांधून त्यानें दहाशेर एकसडी तांदुळांचा **घाणा** कांडितात. घाण्याच्या दिवशींच त्या मंगलगीतें ह्मणत सवा सवा शेर पिठांचे वडे व पापड करितात; आणि इष्टमित्र व घरमंडळीस मिष्टान्न भोजन घालितात. ह्या लोकांत लग्नासंबंधानें गणेशस्थापना, 'मांडवामुहूर्त,' ग्रहशांति, 'वरध' भरणें वरघोडा, वराला सामोरें येणें, 'कलवा,' वगैरे विधि आणि सोहळे सोनारांच्या रीतीप्रमाणेंच करण्यांत येतात; व त्यांचें वर्णन पूर्वी केलेंच आहे.

पल्ला.

पल्ला लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं, व.४०० रुपयांपर्यंत देतात. त्याचा कांहीं भाग वस्त्रालंकाराच्या रूपानें दिला तरी चालतो. मात्र लग्नापूर्वी मुलीला जे वस्त्रालंकार घातले असतील, त्यांची किंमत वजा जातां बाकीची रकम पल्ला ह्मणून देतात. पल्ला घेऊन येणाऱ्या मनुष्यांचा कन्यापिता यथाशक्ति पाहुणचार करितो.

गोली लोकांचीं लग्नें.

गुजरातेंत धान्यांचा व मुख्यतः तांदुळांचा व्यापार करणारे, ह्मणजे भात विकत घेऊन तें चरडून कांडून साफ करून देणारे कांहीं लोक आहेत. त्यांस **गोली** असें ह्मणतात. त्यांच्यांत बाल-विवाह करण्याची फार चाल आहे. मुलगी सहा महिन्यांची होतांच तिच्या विवाहाची वाटाघाट सुरू होते. ह्या वयापासून ती

सामान्य माहिती, विवाहकाल, सोयरिकीला अनुकूलप्रतिकूल गोष्टी, व ती जमविण्याची रीति.

सात आठ वर्षांची होईपर्यंत तिचा विवाह करणें हें सामान्य जनरूढी-प्रमाणें प्रशस्त मानिलें जातें. परंतु इतउत्तर तिला अविवाहित ठेविली असतां तिचीं मातापितरें जातिबांधवांच्या चर्चेस पात्र होतात; आणि मुलगी फार तर अकरा वर्षांची झाल्यावर तिला कोणत्याही सबबीनें कुमारिका ठेवितां येत नाहीं. मुलाचें वय मुलीपेक्षां बहुधा जास्त असतें; तथापि, केव्हां केव्हां तो समवयस्क अथवा मुलीहून कमी वयाचा असला तरी चालतो. मुलीचा बाप विद्यमान असून तो चांगल्या रीतीनें वागून घरसंसार करीत असला, तर तो आपल्या पसंतीप्रमाणें स्थलयोजना करून तेथें मुलगी देण्यास मुखत्यार असतो. परंतु, तो हयात नसल्यास अथवा हयात असून चांगल्या चालीचा नसल्यास मुलीचें लग्न तिच्या आईच्या सल्लयानें करावें लागतें. मुलाच्या लग्नाची गोष्टही अशीच आहे. बापाची शारीरिक

किंवा मानासिक दुर्बलता असतां, अथवा तो विद्यमान नसतां, आईनें आपल्या इच्छेप्रमाणें स्थलयोजना करून मुलाचें अगर मुलीचें लग्न ठरविल्यास तें कोणाच्यानेंही मोडिलें जात नाहीं. गोली लोकांत साटेंलोटें, ह्मणजे ज्या घराण्यांत मुलगी दिली त्याच घराण्यांतील मुलगी उलटून करण्याची चाल नाहीं. अज्ञानपणानें भलत्याच घराण्यांतील, किंवा अन्य कारणांनीं अयोग्य अशा मुलामुलींचें लग्न ठरलें गेलें, आणि ती गोष्ट खरी असून गांवच्या पाटलास समजली, तर तो पंचायत जमवून तिजकडून असें लग्न तहकूब करवूं शकतो; आणि कदाचित् तें होऊन गेलें, तर त्यासंबंधीं जबाबदार इसमांस त्याबद्दल जातीला कांहीं दंड द्यावा लागतो. प्रतिकूलतेच्या वगैरे दोषांमुळें ह्या लोकांत ठरलेलें लग्न मोडत नाहीं. मुलाचे अथवा मुलीचें लग्न कर्तव्य असलें, ह्मणजे आईबाप आपल्या 'गोरा' मार्फत एखादें स्थळ पाहून काढितात. त्यानें सुचविलेलें स्थल परस्पर व्याह्यांस पसंत पडलें, व उभयपक्षीं देण्याघेण्याच्या प्रश्नांचा गोरासमक्ष उलगडा झाला, ह्मणजे दोन्ही व्याह्यांतून जो जास्त गरजू असेल, तो आपल्या उपाध्यायामार्फत मुलाची अथवा मुलीची लौकिकरीत्या मागणी करितो. अर्थात् ती प्रतिपक्षाकडून मान्य करण्यांत येते. नंतर जोशाकडून एखादा सुमुहूर्त काढवून त्यामुहूर्तावर मुलामुलींचे बाप, उपाध्याय, आणि दोन्ही पक्षांची इष्टशिष्ट पुरुष मंडळी पंचाच्या वाडींत एकत्र जमतात. तेथें सर्वांसमक्ष 'पल्ला' अथवा स्त्रीधन, आणि पहेरामणी वगैरे देण्याघेण्यासंबंधीं उभयपक्षांचे ठराव होतात. नंतर मुलाचा बाप अथवा गोर मुलीच्या बापास कुंकुमतिलक करून त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालून त्यास यथाशक्ति अहेर करितो, आणि त्याच्या हातीं सवाशेर बत्ताशांचा पुडा व एक नारळ देतो. जमलेल्या मंडळीस माणसागणित चार लाडू व चार पैसे वांटण्यांत येतात. त्यांतूनही जो कोणी गांवचा 'पटेल' अथवा मोहल्यांतील प्रमुख मनुष्य असेल त्यास इतर व्यक्तींच्या दुप्पट लाडू व पैसे देण्याची चाल आहे. ह्या बाबतींत जो खर्च होईल त्याचे तीन हिस्से करून दोन भाग मुलाच्या बापानें व एक

भाग मुलीच्या बापानें द्यावा, अशी वहिवाट आहे. सदरहू कृत्य सोयरीक सुप्रसिद्ध करण्याकरितां, व तिला जास्त बळकटी आणण्याच्या उद्देशानें करण्यांत येतें, हें निराळें सांगणें नकोच.

लग्नापूर्वी नवरा नवरीचें सासरीं जाणेंयेणें.

ह्याप्रमाणें सोयरीक झाल्यानंतर, आणि लग्नाच्या पूर्वी, मुलगी आपल्या मर्जीप्रमाणें केव्हां केव्हां सासरीं जाते. तत्रापि, लग्न झाल्याशिवाय तिनें नियमानें सासरीं आलेंच पाहिजे, अशी सासरच्या मंडळींची तिजवर सत्ता चालत नाहीं. सणावारांच्या दिवशीं मुलास त्याच्या सासुरवाडीस जेवावयास बोलावितात, व तोही खुषी असल्यास जातो.

लग्नरीती-विषयीं.

लग्न मकर संक्रांतीपासून ज्येष्ठ महिनाअखेरपावेतों ज्योतिषी सांगतील त्या मुहूर्तावर करण्यांत येतें. त्यांतील विधि किंवा सोहळे ह्यांच्या संबंधानें योग्य माहिती आह्मांस उपलब्ध झाली नाहीं. तत्रापि, हे लोक वरास कन्या द्यावयाची ती विधिपूर्वक दान करून देतात, येवढें मिळालेल्या हकीकतीवरून दिसून येतें.

बहुपत्नीकत्व, स्त्रीचा त्याग, वगैरे.

ह्यांच्यांत एकाच पुरुषानें अनेक स्त्रिया करण्याची चाल आहे. केव्हां केव्हां एखादा वर एकसमयावच्छेदानेंही दोन वधूंशीं लग्नें लावितो! अशा प्रसंगीं दोन्ही लग्नें एकाच मंडपांत होतात. मात्र प्रत्येक वधूचें बहुलें निराळें केलें ह्मणजे झालें. कोणत्याही कारणावरून स्त्रीचा त्याग सहसा करीत नाहींत. तथापि, अनेक वेळां स्त्रीपुरुषांत फारकती झाल्याचींही उदाहरणें आहेत. एका कुटुंबांतील मुलामुलीचें लग्न होऊं शकत नाहीं. मेहुणी (बायकोची बहीण) बरोबर स्त्री जीवंत असतांना अथवा तिच्या पश्चात् लग्न करितां येतें.

गुजराती कुंभारांचा लग्नविधि.

सामान्य माहिती व सोयरीक.

गुजराती कुंभारांतही अनेक पोटजाति आहेत. त्यांपैकीं कोणी तऱ्हेतऱ्हेचे कुंभ करितात, कोणी रांजण बनवितात, व कोणी विटा आणि कवलें भाजितात. ह्यांच्यांत लग्नासंबंधानें वधूवरांच्या वयाचें प्रमाण ठरलेलें नाहीं. उभयतां व्याही आपल्या मुलामुलींचें लग्न लावण्यास खुषी असले, व देण्याघेण्याच्या प्रश्नाचा उलगडा झाला, ह्मणजे उपाध्यायामार्फत मुलाचा बाप सोयरीक नक्की करून ठेवितो.

सोयरीक व लग्न ह्यांच्या दरम्यानचे रीतरिवाज.

पुढें वधूवरें सात आठ वर्षांचीं झालीं, ह्मणजे उभयपक्षांस अरसपरस 'मांडवसणूं' द्यावें लागतें. तें असें कीं, वधूला, तसेंच वराला, एखाद्या शुभ मुहूर्तीं वस्त्रालंकार परिधान करवून पाटावर बसवितात, त्यांजकडून यथाविधि गणपतिपूजन करवितात, व नंतर त्यांस उपाध्यायहस्तें मिठाई देऊन वाडवडिलांच्या पायां पडवितात. हें 'मांडवसणूं' होत असतां स्त्रिया मंगलगीतें गातात. कन्येचें मांडवसणूं झालें, ह्मणजे स्त्रिया तिच्या कानांत 'अखंड सौभाग्य' वगैरे आशीर्वचनें बोलतात. नंतर जमलेल्या मंडळीस गूळ व सुपारी वांटण्यांत येते. ज्या दिवशीं कन्येच्या माहेरीं तिचें मांडवसणूं होतें, त्याच दिवशीं तिला वराकडे जेवावयास बोलावितात. नवरीमुलगी आपल्याबरोबर आपली एखादी मैत्रीण घेऊन भोजनास जाते. जातांना तिच्या आईनें तिच्या पदरीं अर्धा रुपया बांधिलेला असतो, तो ती वरगृहीं

गेल्यावर आपल्या भावी सासूबाईस देऊन त्यांच्या पायां पडते. भोजनोत्तर मुलीला पन्नास रुपये किंमतीचे पल्लयाचे दागिने, कांहीं वस्त्रें, व सवाशेर खाऊचा पुडा देतात. त्यानंतर कित्येक सणावारांच्या दिवशीं मुलीला सासूबाई जेवावयास बोलावून खाऊही देतात. ह्या लोकांत सोयरीक झाल्यापासून लग्न होईपर्यंत उभयतां व्याही व विहिणी एकमेकांच्या घरीं जात नाहींत. कांहीं कामकाज असल्यास रस्त्यांत अनायासें भेट होईल तेव्हां, अथवा शेजाऱ्यापाजाऱ्यांकडे त्यांस बोलावून तेथें भेटून बोलतात. तसेंच मुलास मुलीकडे जेवावयास पाठवीत नाहींत. वटसावित्रीच्या सणाला मुलीस मिठाई वगैरेचा नजराणा पाठवावा लागतो.

मुहूर्तनिश्चय.

पुढें कन्येच्या बापाच्या मनांत मुलीचें लग्न करावेसें आलें, म्हणजे तो उपाध्यायामार्फत वरपित्यास त्याप्रमाणें सांगून पाठवितो; व दोघे व्याही जोशाकडून आपल्या सवडीप्रमाणें एखादा लग्नमुहूर्त काढवून नक्की करितात.

लग्नापूर्वी स्त्रिया गाणीं गाऊन एकसडी तांदुळांचा **घाणा** कांडितात, व वडेपापड तयार करितात. ह्या लोकांत गणेशस्थापना; 'मांडवामुहूर्त,' ग्रहशांति, 'वरघोडा,' वरस्वागत वगैरे कृत्यें सोनारांप्रमाणेंच करण्यांत येतात. वरघोडा आपल्या सामर्थ्याप्रमाणें कोणी काढितात, पण क्वचितच. सगळेच कुंभार तो थाटानें काढूं शकत नाहींत. 'वरध' 'चांदला' 'कलवा' वगैरे कृत्यें ह्यांच्यांत करण्याची चाल नाहीं.

पंचमहालांतील भिल्लांची लग्नरीति.

लग्नरीति.

गुजरातेलगतच्या पंचमहालामध्यें जे भिल्ल लोक आहेत, त्यांजमध्यें वरानें कन्यापित्यास कन्या देण्याबद्दल सत्तर रुपये द्यावे लागतात. लग्नासाठीं वर वधूगृहीं आला, म्हणजे मुलीची आई मुलीस आणून त्यासमोर बसविते. नंतर त्यांचे हात जुळवून (हस्तमेळाप) त्यांच्या वस्त्राच्या टोकांस गांठी देतात. तीन बायका कांहीं मंगलगीतें गातात. मग वधूवरांकडून विवाहमंडपाच्या मध्यभागीं ठेविलेल्या झाडास बारा प्रदक्षिणा घालवितात. त्या झाल्यावर वधूवरें एकमेकांस गव्हांची पोळी व काकवी ह्यांचे घांस देतात, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

बहुपत्नीकत्व, व पुनर्लग्नरीति.

पहिली बायको जीवंत असतां नवरा दुसरी, अथवा पाहिजे असल्यास तिसरीही बायको करूं शकतो. परंतु बायको ही मात्र आपला एक नवरा मेला, तरच दुसरा करूं शकते. पहिल्या नवऱ्यावर जर ती नाखूष झाली, तर ती आपणांस जो दुसरा पुरुष इष्ट असेल, त्याकडून पहिल्या नवऱ्यास लग्नांत व लग्नापासून तिजसंबंधीं झालेला खर्च देवविते. ह्याप्रमाणें ती त्याच्या ऋणांतून मुक्त झाल्यावर मग त्या इष्ट पुरुषाशीं लग्न करूं शकते. पहिल्या नवऱ्यापासून कांहीं संतति झाली असल्यास ती आपल्या बापाजवळ राहते. जर एखाद्या भिल्ल तरुणाची आणि तरुणीची लग्न करण्याची इच्छा असेल, परंतु तसें करण्यास त्या तरुण पुरुषापाशीं चालीप्रमाणें कन्यापित्यास

द्यावयाला सत्तर रुपये नसतील, तर तो तिच्या संमतीनें एकाद्या स्वजाति-भोजनाच्या किंवा जत्रेच्या दिवशीं, अर्थात् गडबडीच्या प्रसंगीं संधि साधून तिला पळवून नेतो. ती त्याजपाशीं बायकोच्या नात्यानें राहते; आणि जेव्हां तिचे आईबाप तिच्या शोधार्थ येतात, तेव्हां तिचा नवरा आपल्या सासऱ्यास हप्त्याहप्त्यानें सत्तर रुपयांचा भरणा करून देण्याचें ठरवितो, ह्मणजे झालें.

मिश्रविवाहाची चाल.

सदरहू हकीकतीवरून ह्या लोकांत 'आसुर' आणि 'पैशाच' ह्या दोन्ही विवाहपद्धती आज अस्तित्वांत आहेत, असें म्हणण्यास हरकत नाहीं. कारण, कन्येच्या मातापितरांस मुलीचा शोध लागून ते तिचें हरण करणाऱ्याजवळ द्रव्य मागण्यास येऊन थडकले, तर ठीकच आहे. नवरा हप्त्यानें द्रव्य देण्याचें कबूल करून आसुर विवाहपद्धतीनें ती स्त्री आपलीशी करितो. नाहींपेक्षां वर सांगितल्याप्रमाणें तिचें कपटानें हरण करणें म्हणजे पैशाच विवाहच होय. तथापि, ज्याअर्थी त्यांत मुलीची संमति आहे, त्याअर्थी तो शुद्ध पैशाच नसून त्यांत गांधर्व पद्धतीचेंही मिश्रण आहे.

नायकडे व कोळी ह्यांची लग्नरीति.

लग्नरीति.

पंचमहालांत **नैकडा** किंवा **नायकडा**, व **कोळी** अशा जवळ जवळ दोन मिश्र जाती आहेत. ह्या जातींत अरसपरस शरीरसंबंध होऊं शकतात. वधूवरांस भोजनोत्तर अंगणाच्या अथवा मंडपाच्या मध्यभागीं बसवून उभयपक्षांचीं वृद्ध मनुष्यें उपाध्यायाच्या नात्यानें त्या वधूवरांचा 'हस्तमेळाप' करितात, व त्यांच्या वस्त्रांच्या पदरांस गांठ मारून त्यांच्या डोक्यावरून दुसरें एक वस्त्र धरितात. नंतर वृद्ध मनुष्यें त्यांना गुळपापडीचे लाडू देतात. त्याचे वधूवरांनीं परस्परांस दोन दोन घांस दिल्यावर त्यांच्या डोक्यावरील वस्त्र काढून टाकतात, ह्मणजे लग्नकार्य संपलें. कित्येक प्रसंगीं हें कृत्य करीतही नाहींत.

स्वयंविवाह अथवा घरघुसेपणा, आणि पुनर्विवाह.

कोणी मुलगी सोळा वर्षांच्या वयावर अविवाहित स्थितींत असेल, तर तिनें त्यानंतर आपल्या पसंतीस येईल त्या पुरुषाबरोबर स्त्रीच्या नात्यानें जाऊन राहण्यास हरकत नाहीं; आणि जर तो पुरुष त्या स्त्रीच्या आईबापांस सोळा पासून पन्नास रुपयांपर्यंत कांहीं देणगी देऊं शकेल, तर त्या स्त्रीनें त्या पुरुषाजवळ राहण्यास तिचे आईबापही हरकत करीत नाहींत. जर बायको नवऱ्यास टाकून देईल, आणि दुसऱ्याजवळ जाऊन राहील, तर तो पहिल्या नवऱ्यास सोळापासून साठापर्यंत कांहीं रुपयांची रकम देतो, ह्मणजे तंटा तुटला!

परंतु, जर नवरा आपखुषीनें बायकोस टाकून देईल, तर तिनें दुसऱ्याशीं लग्न केल्यावर पहिल्या नवऱ्यास कांहीं द्यावें लागत नाहीं. विधवा दुसरें लग्न करूं शकते. पण त्यांत कांहीं विधि करावा लागत नाहीं. नवरा तिच्या घरीं येऊन तिला एक चोळीलुगडें देतो, व आपल्या घरीं घेऊन जातो. परंतु हें कृत्य रात्रीस केलें पाहिजे. कारण, विधवा दिवसास लग्न करील, तर गांव दग्ध होईल असा त्या लोकांचा समज आहे ! एक पुरुष एकदम एकीपेक्षां जास्त बायका करूं शकतो. मात्र नायकडे लोक असल्या अनेक स्त्रिया करणाऱ्याच्या संततीशीं शरीरसंबंध करीत नाहींत. परंतु जर एखादी कोळीण नायकड्याबरोबर लग्न करील, अथवा कोळी नायकडा स्त्रीबरोबर लग्न करील, तर त्या जोडप्यास नायकडे आपल्या जातींत घेतात.

गुजरातेंतील आणखी कित्येक जातींच्या लग्नरीति.

लग्नरीति.

गरोडा—गुजरात देशांत 'गरोडा' ह्या जातीचे लोक आहेत. ते आपणांस धेड लोकांचे गोर अथवा उपाध्याय ह्मणवितात, व भिक्षावृत्ति करून असतात. ते एका गांवाहून दुसऱ्या गांवीं भिक्षा मागत फिरत असतांना निरनिराळ्या गांवकऱ्यांस भेटतात. तेव्हां कोणत्या गांवांत कोणत्या गरोड्यास काय काय मुलेंबाळें आहेत, व त्यांपैकीं कोणकोणते मुलगे व मुली अविवाहित आहेत, वगैरे गोष्टींचा तपास करून ठेवितात; व सोयरिकी जमविण्यासारखीं स्थळें असल्यास, सहज गप्पा गोष्टी करितांना नक्कीही करून ठेवितात. पुढें कन्येचा पिता भेटला, ह्मणजे त्याला स्थळाविषयीं खबर कळवितात. नंतर एखाद्या दिवशीं मुलीचा बाप मुलाच्या घरीं जातो. तेथें गेल्यावर चार सुज्ञ मनुष्यें एकत्र करून माझ्या कन्येचा अमक्याच्या मुलाशीं शरीरसंबंध करावयाचा आहे, असें बोलणें लावितो. ती गोष्ट पसंत पडली, ह्मणजे मुलाचा बाप मुलीच्या बापास पैसे देतो. ते दिले, कीं त्या उभयतांची सोयरीक जमली. ती मोडूं शकत नाहीं. नंतर दोन चार वर्षांनीं ते भिक्षावृत्ती मुलामुलींचे बाप एकमेकांस भेटले, ह्मणजे मुलीचा बाप मुलाच्या बापास तें लग्न उरकून घेण्याबद्दल विचारितो. शक्य असल्यास तो रुकार देतो. नाहींपेक्षां कांहीं

मुदतीचा वायदा करितो. त्या वायद्यावर ते उभयतां फिरून भेटले, ह्मणजे पंचांग काढून लग्नतिथि मुकरर करितात. नंतर मुलाचा बाप जातींतील फक्त पुरुष मनुष्यें समागमें घेऊन मुलाचें लग्न करण्याठीं मुलीच्या गांवास येतो. तो तेथें आल्यावर त्या गांवची गरोडा जात जमा होते. मग मुलाच्या बापानें प्रयोजन करण्यासाठीं काय रकम द्यावयाची, ती नक्की करितात. मुलाचा बाप आपल्या शक्तीप्रमाणें पंधरा पासून पंचविसापावेतों कांहीं तरी देण्याचें कबूल करितो. त्या रकमेंत मुलीचा बाप पांच सात रुपये भर घालून शिरा व खिचडी तयार करवून इष्टमित्रांस व जातभाईस मेजवानी देतो. त्यानंतर नवरा नवरीच्या घरीं लग्नासाठीं येतो. तेथें-बाजरीच्या कडब्याचा मांडव घालून त्यास आंब्याच्या पानांचें तोरण बांधिलेलें असतें. मंडपामध्यें बाजरीच्या पिठाचें स्थंडिल (शाथियो) करून त्यावर एखाद्या सौभाग्यद्रव्यानें नवग्रह मांडण्याकरितां नऊ घरें करितात. अशा स्थंडिलास 'चौशी' (?) असें म्हणतात. चौशीजवळ एक गोधडी अंथरून तिजवर नवरानवरींस बसवितात. त्यांच्यापुढें (चौशीजवळ) एक पाण्याचें भांडें, तुपाची वाटी, व तुपाचा दिवा लावून ठेवितात. नंतर नवरीचा भाऊ किंवा आतेभाऊ त्या वधूवरांच्या हातांत मणगटाजवळ 'मींढळ' नांवाचें फळ सुताच्या नाड्यांत ओंवून तें बांधितो, व एकमेकांचे हात एकमेकांच्या हातांत घालून त्या उभयतांकडून तुपाच्या दिव्याभोंवतीं चार प्रदक्षिणा करवितो. नंतर वधूचा बाप वधूच्या पदरीं, व वराचा बाप वराच्या पदरीं एक एक पैसा बांधितो; आणि दोघांच्या वस्त्रांचे पदर एकमेकांस बांधून त्या जोडप्यास वराच्या जानवसघरीं नेतात, ह्मणजे लग्नविधि आटोपला. वरपक्षाची मंडळी जानवसघरीं दोन दिवस मुक्काम करून नंतर तिसऱ्या दिवशीं वधूसह आपल्या गांवीं निघून जातात. कन्या सासरच्या गांवीं जाऊं लागली, ह्मणजे तिचा बाप तिला एक पितळेचें भांडें व ताट देत असतो. पुढें पांच सात दिवसांनीं कन्येचा भाऊ किंवा काका तिला बोलावूं जातो. त्यास वराकडून कांहीं देण्याची चाल नाहीं.

चांभार (भांभी)—मुलीचा बाप आपल्या नातेवाइकांच्या मार्फत ज्या चांभाराचा मुलगा अविवाहित असेल, त्यास सोयरीक करण्याबद्दल विचारितो. त्यानें कबूल केल्यास गरोडा जातीच्या आपल्या उपाध्यायाजवळ एक रुपया देऊन सोयरीक जमविण्यासाठीं त्यास मुलाकडे पाठवितो. मुलाचा बाप त्या आलेल्या उपाध्यायास गूळभात व तूप ह्याची मेजवानी देतो. नंतर जातभाईस व पंचांस बोलावून त्यांतील प्रमुख मनुष्याच्या हातीं मुलीकडील उपाध्यायानें आणिलेला रुपया देतो. मग तो मनुष्य तोच रुपया फिरून मुलाच्या बापास परत देतो, व अमक्याच्या मुलीबरोबर तुमच्या मुलाचें लग्न ठरलें, असें सांगतो. हें झाल्यावर जमलेले जातभाई आपापल्या घरोघर जातात; व गरोडा परत मुलीच्या बापाकडे जाऊन लग्न ठरवून आल्याबद्दल त्यास कळवितो. ही सोयरीक कायमची होते. मोडत नाहीं. पुढें मुलीच्या व मुलाच्या बापास खर्चाची सवड होईल, तेव्हां ते त्या नवरानवरीचें लग्न लावितात. दरम्यान नवरी वयानें बरीच मोठी झाली, तरी चिंता नसते. खर्चाची सवड झाल्यावर मुलीचा बाप चार चौघांस बरोबर घेऊन मुलाच्या घरीं येतो; व त्यास कुंकुमतिलक (चांदलो) करून पांच रुपये हातीं देतो. नंतर मुलाचा बाप आपला नवीन व्याही, व त्या बरोबर आलेलीं माणसें यांना गूळभात, खिचडी, तूप ह्यांची मेजवानी देऊन लग्नदिवस मुकरर करितो. त्या दिवशीं दहा पांच तरुण पुरुष माणसें वरास घेऊन लग्नासाठीं कन्येच्या घरीं जातात. लग्नविधि हा, मागें गरोडा जातीचा सांगितला आहे, त्या प्रमाणेंच होतो. फरक ह्मणून इतकाच कीं, नवरानवरीच्या हातांत'मींढळ' नांवाचीं फळें बांधून त्यांचें पाणिग्रहण करविणें, व त्यांजकडून दिव्याभोंवतीं प्रदक्षिणा करविणें, हीं कृत्यें गरोडा जातीच्या उपाध्यायानें करावयाचीं. लग्न लागल्यावर वराचा पिता वधूच्या पित्यास आपल्या ऐपतीप्रमाणें पंचवीसापासून तीसापर्यंत कांहीं तरी रकम (रुपये) देतो. त्या रकमेंत वधूचा पिता यथाशक्ति दहा वीस रुपयांची भर घालून त्यांपैकीं कांहीं खर्चानें शिरा तयार करवितो; आणि

स्नेही, सोयरे, व जातभाई यांना मेजवानी देतो. तसेंच भक्तभिकाऱ्यांस धर्मादाय जेवूं घालितो. असें करून जी रकम शिलक राहील, तिच्या खर्चानें लग्नास आलेल्या सोयऱ्याधायऱ्यांतून कोणास पागोटें, कोणास धोतर, (थेपाडूं) व स्त्रियांस लुगडीं (साल्लाओ) असा पोषाक देतो. सोयरे तीन दिवसपर्यंत कन्येच्या गांवीं राहून चौथे दिवशीं तिला घेऊन घरीं जातात. पुढें पांच सात दिवसांनीं कन्येचा भाऊ, किंवा तो नसल्यास उपाध्याय (गरोडा गोर) तिला बोलावूं जातो. त्यास वराचा पिता पांच शेर धान्य अथवा पांच पैसे देऊन त्याबरोबर सुनेची माहेरीं बोळवण करितो. या जातींत कन्येपेक्षां वर दोन चार वर्षांनीं मोठा असला पाहिजे, असा नियम आहे.

लग्नरीति.

धेड (वणकरिया)—मुलीचें लग्न करणें झालें, ह्मणजे तत्पूर्वी स्नेही किंवा कोणी सोयरा यांच्या मार्फत मुलाचा शोध करून स्थळ नक्की करून ठेवितात. नंतर कन्येचा कोणी एक नातेवाईक वराच्या घरीं एक रुपया घेऊन जातो. त्यास वराचा बाप तूप, साकर, भात, या पदार्थांची मेजवानी देतो. नंतर तो नातेवाईक आणिलेला रुपया वराच्या हातीं देतो, ह्मणजे सोयरीक झाली. तदनंतर दोन तीन वर्षांनीं कन्येचा बाप वराच्या बापास लग्न उरकून घेण्याविषयीं कळवितो. दहा पंधरा दिवसांनीं वराचा बाप लग्न दिवस मुकरर करून सांगतो. ठरलेल्या दिवशीं दहा बारा तरुण पुरुष माणसें वरास बरोबर घेऊन कन्येच्या घरीं जातात. वराच्या बापानें किंवा घरांतील बायका माणसांनीं जाण्याची चाल नाहीं! लग्नदिवशीं कन्येचा बाप आलेल्या वऱ्हाड्यांस शिरा करून जेवूं घालतो. लग्नविधि गरोड्यांच्या विधीप्रमाणेंच असतो. मात्र मांडव बांधणें, वधूवरांचें पाणिग्रहण (हस्तमेळाप) करविणें, व त्यांजकडून दिव्याभोंवतीं प्रदक्षिणा करविणें, हें सर्व कृत्य गरोड्यानें करवावयाचें. नंतर प्रयोजन (दापू) करण्या-

साठीं जातींतील चार चौघे इसम जमून वरपक्षाकडून कन्येच्या बापास यथाशक्ति पंचवीस रुपयांपर्यंत रकम देववितात. त्यांत कन्येचा बाप पांच सात रुपयांची भर घालून, चांभार जातींत सांगितल्याप्रमाणें वऱ्हाड्यांस व इष्टमित्रांस जेवूं घालून पोषाक देतो. नंतर वऱ्हाडी तीन दिवस मुक्काम करून चौथे दिवशीं कन्येस घेऊन घरीं जातात. पुढें तिचा भाऊ तिला बोलावूं येईल, तेव्हां वराचा बाप त्यास चार आण्यांच्या किंमतीचें एक धोतर (घेपाई) देऊन सुनेची बोळवण करितो.

लग्नरीति.

सेनमा—वधूवरांचे पिते प्रत्यक्ष रीतीनें भेटून जातभाईस जमवून सोयरीक करण्याबद्दल एकमेकांची संमति घेतात. मग उभयपक्षांनीं दोन दोन आण्यांचा गूळ आणवून सर्वत्रांस वांटावयाचा. त्यांनीं तो गूळ खाल्ला, कीं सोयरीक जमली. तदनंतर सहा महिन्यांनीं किंवा वर्षानें लग्नदिवस मुकरर करण्याकरितां पांच सहा इसमांस बरोबर घेऊन कन्येचा बाप वराकडे येतो; व पोषाक म्हणून त्यास एक धोतर देतो. वराच्या घरीं हे वऱ्हाडी दोन दिवस मुक्काम करितात. त्यांस वराचा बाप पहिल्या दिवशीं साकर व भात हे पदार्थ, व दुसऱ्या दिवशीं भाकरी खाऊं घालितो. नंतर लग्नदिवस ठरवून घेऊन सोयरे परत जातात. पुढें ठरलेल्या दिवशीं वराचा बाप मुलास व सहा सात असामींस बरोबर घेऊन लग्नासाठीं कन्येच्या घरीं येतो. कन्येचा बाप त्यांस शिऱ्याची मेजवानी देतो. लग्नविधि गरोड्याकडून व त्यांच्या विधीसारखाच करविण्यांत येतो.

लग्नरीति.

भंगी—कन्येच्या किंवा वराच्या घरीं सर्व जातभाईनीं जमून अमक्याचा मुलगा व अमक्याची मुलगी अशी सोयरीक ठरवितात. नंतर कन्येचा बाप वराच्या बापास, व तो कन्येच्या बापास, अशा रीतीनें अरसपरस खोबऱ्याचे तुकडे गूळसाकरेनें भरून देतात. मग उभयपक्षांनीं आठ आठ आण्यांची

दारू आणवून थोडथोडी सर्वांस पाजावयाची. ह्यास 'रावणूं' असें ह्मणतात. रावणूं केल्यावर जातभाई आपल्या घरीं जातात. नंतर कन्येचा बाप वरास आठ आण्यांचें धोतर देतो; व वराचा बाप कन्येस बारा आण्यांचें लुगडें (साल्लो) देतो. पुढें दोन चार महिन्यांनीं मुलीचा बाप दहा बारा इसमांस बरोबर घेऊन लग्नदिवस ठरविण्यासाठीं वराच्या घरीं येतो; आणि वरास कुंकवाचा टिळा लावून-'चांदलो' करून-पागोटें, धोतर, नारळ, व एक रुपया हातीं देतो. हे सोयरे दोन दिवस वराच्या घरीं रहातात. वराचा बाप त्यांना पहिल्या दिवशीं साकर व भात, आणि दुसऱ्या दिवशीं खिचडी खाऊं घाढ्न लग्नदिवस कळवितो, ह्मणजे सोयरे परत जातात. पुढें ठरलेल्या दिवशीं वराचा बाप स्त्रीपुरुष मिळून वीस माणसें बरोबर घेऊन लग्नास येतो. कन्येच्या घरीं बाजरीच्या कडब्याचा मांडव घालितात. ह्या मांडवाच्या प्रत्येक मेढीसभोंवतीं पाण्यानें भरलेला एक मातीचा कुंभ, व नऊ बोळकीं ह्याप्रमाणें चारही मेढीसभोंवतीं मांडून ठेवितात. मांडवाच्या मध्यभागीं पाण्याचें व तुपाचें भांडें, आणि तुपाचा दिवा ठेवितात. जवळच गोधडें अंथरून त्यावर नवरानवरींस बसवितात; तेथेंच उपाध्याय (गोर) असेल तो वर सांगितल्याप्रमाणें बाजरीच्या पिठाचें स्थंडिल चौशी (?) करितो. नंतर नवरानवरीच्या हातीं 'मींढळ' बांधून त्यांचे हात एकमेकांच्या हातांत घालितात, व त्या जोडप्याकडून दिव्यास चार प्रदक्षिणा करवितात. नंतर उपाध्यायास (?) चौशी दान करितात. त्यासमयीं कन्येचा बाप कन्येला तांब्याची कळशी (बेडूं), ताटली, वाटी, व पांच रुपयांच्या किंमतीची कांहीं तरी जिन्नस दान देतो. वराचा बाप कन्येच्या बापास ज्ञातिभोजना (दापू) बद्दल तेहेतीस रुपये देतो. तसेंच भक्त, गोर, यांस सात रुपये देतो. मग दोघांच्या पदरीं थोडथोडे तांदूळ व सुपारीचा भुगा एकत्र करून तो बांधितात, व त्यांच्या पदरांस गांठ मारून त्या जोडप्यास वराच्या जानवसघरीं घेऊन जातात, ह्मणजे लग्नविधि संपला. वऱ्हाडी दोन दिवस कन्येच्या गांवीं रहातात. त्यांना कन्येचा बाप प्रथम दिवशीं भात व शिरा, आणि दुसऱ्या दिवशीं

तूपखिचडी खावूं घालितो. नंतर तिसऱ्या दिवशीं ते नवरीस घेऊन घरीं जावयास निघतात. तेव्हां कन्येला तिच्या माहेरची मंडळी गांवच्या सीमेपर्यंत पोंचविण्यास जाते; तेथें वराच्या बापानें कन्येच्या बापाला लहंग्याबद्दल कर ह्मणून दहा रुपये द्यावे लागतात. पुढें दहा दिवसांनीं कन्येचा भाऊ वराच्या गांवीं जाऊन तिला घेऊन येतो. त्यास वरपक्षाकडून कांहीं देण्याची चाल नाहीं.

पारशी लोकांचा लग्नविधि.

मुखोद्वार.

आमचा देश नांवाला मात्र **हिंदुस्थान.** पण वस्तुतः तो निरनिराळ्या उद्देशांनीं निरनिराळ्या परकीयांचें **स्थान** झालेला आहे. कोणी अभय मिळविण्याच्या हेतूनें, कोणी द्रव्य मिळविण्याच्या हेतूनें, व कोणी क्रयविक्रयाच्या बाह्य हेतूनें परंतु अंतस्थ राज्यलोभानें, ह्या देशांत आपलें ठाणें दिलें आहे. ज्या वेळेस मुसलमानी धर्माची प्रचंड लाट इराणांतील पारसीकांचा पूज्य अग्नि कायमचा विझवून टाकण्याच्या बेतांत आली, तेव्हां तेथील कित्येक अग्न्युपासक पारशी लोक आपलें आराध्य दैवत, आपला धर्म, व आपला जीव घेऊन अभय मिळविण्याच्या हेतूनें ह्या देशांत येऊन राहिले असें ह्मणतात. त्यांचें प्रथम वास्तव्य गुजरातेंत झालें, व आज मित्तीसही त्यांचा भरणा ह्याच प्रांतांत अधिक आहे. सबब, त्यांचा लग्नविधीही गुजरातेंतील लोकांबरोबरच सांगणें सोइस्कर होईल, असें वाटल्यावरून तो येथें देत आहों.

विवाहकाल.

ह्या लोकांचा '**झोरोॲस्टर**' ह्मणून कोणी एक धर्मसंस्थापक आणि शास्ता पुरुष होऊन गेला. त्याच्या आज्ञेप्रमाणें पाहूं जातां पंधरा वर्षांच्या वयापूर्वी कोणाही मुलाचें अथवा मुलीचें लग्न करितां कामा नये. ही आज्ञा पारशी लोकांच्या पूर्वजांकडून पाळिली जात असावी, यांत संशय नाहीं. परंतु, हिंदुस्थानांतील पारशी समाजानें एतद्देशीय लोकांच्या पुष्कळ चालीरीतींचें अवलंबन केलें आहे; व त्यांपैकींच बालविवाहाची चाल ही एक होय. असें ह्मणणें भाग पडतें

तथापि, अलीकडे पाश्चात्य लोकांच्या सहवासामुळें ती चाल ह्या लोकांतून लुप्तप्राय होत चालली आहे. हल्लीं ह्यांच्यांतील वधूवरें चांगलीं वयांत आलेलीं असतात.

सोयरीक जमविणें व पत्रिकावलोकन.

ह्या लोकांच्या उपाध्यायांस '**अध्यारू**' असें म्हणतात. त्यांच्या पैकीं ज्या कोणांचा पुष्कळ पारशी कुटुंबांशीं चांगल्या रीतीनें परिचय झालेला असतो, ते उपाध्याय सोयरीकी जमवून देण्याचा धंदा पतकरितात. त्यासाठीं ते प्रथमतः ज्या कुटुंबांत उपवर मुली असतील, त्यांच्या स्थितीसंबंधानें नीट विचारपूस करून ठेवितात. नंतर ज्या घराण्यांतील मुलें गृहस्थाश्रम स्वीकारण्यास खुषी असतील त्यांजकडे ते जातात; आणि त्या उभयकुटुंबांत संबंध घडवून आणण्याचा आपल्याकडून शक्य तेवढा प्रयत्न करितात. ह्या लग्नमध्यस्थांस कित्येक मातापितरें आपल्या मुलासाठीं किंवा मुलीसाठीं एखादें सुस्थळ मिळवून देण्याबद्दल दलाली देतात, अशींही कांहीं उदाहरणें आहेत. मुलाचीं मातापितरें किंवा पालक, आपल्या मुलास जी मुलगी सांगून आली असेल, तिचे आईबाप हे प्रतिष्ठित लोक आहेत किंवा कसें ह्या संबंधानें त्रयस्थाकडून तपास करवितात; आणि त्यानें समाधानकारक हकीकत सांगितली, म्हणजे मग त्या लग्नमध्यस्थ उपाध्यायाची त्या स्थळासंबंधीं शिफारस मान्य करितात. पुढें उभयपक्षांत प्रत्यक्ष व्यवहार सुरू होतो. प्रथमतः मुलाचे वडील तो भावी शरीरसंबंध परस्परांस अनुकूल होईल किंवा कसें, याविषयीं ज्योतिष्याचा अभिप्राय घेण्यासाठीं मुलीच्या वडिलांकडून त्या कुमारिकेची जन्मपत्रिका दोन दिवसांकरितां मागून आणितात. नंतर उभयतांच्या पत्रिका जोशास देऊन एकमेकांचे ग्रह एकमेकांस अनुकूल आहेत किंवा कसें, व तीं योजिलेलीं वधूवरें पुढें सुखी होण्याचा संभव कितपत आहे, तें पाहण्यास सांगतात. ज्योतिष्यानें जर त्या उभयतांचा शरीरसंबंध होणें पसंत केलें नाहीं, आणि त्यापासून कांहीं अनिष्ट परिणाम भाकित केला, तर दोन्ही पक्षांतील व्यवहार तेथेंच थांबतो. पण

त्या संबंधास जोशीबोवांचें मत जर अनुकूल असलें, तर ती सोयरीक जमण्याच्या बाबतींत, तिचें एक महत्वाचें पाऊल पुढें पडलें असें समजतात.

परस्परांच्या गृहस्थितीविषयीं विचारपूस, अभिनंदनलेख, मुहूर्तनिश्चय आणि मेजवान्या.

विवाहास ग्रहांची अनुकूलता आहे, असें कळल्यानंतर उभयपक्षांचीं मातापितरें परस्परांच्या चरितार्थसाधनाविषयीं, लौकिकी स्थितीविषयीं, आणि जातीमध्यें त्यांचे कोणकोणाशीं स्नेहसंबंध आहेत, ह्याविषयीं विचारपूस करितात. मुलीचीं मातापितरें, विशेषतः तिची पुढें होणारी सासू स्वभावानें मायाळू आहे किंवा कसें, ह्याबद्दल खुलासा काढितात. कारण, नवरामुलगा अद्यापि आपल्या बापाच्या आधारावर अवलंबून असतो; तेव्हां लग्न झाल्यानंतर नवऱ्यामुलीचें सुखही पुष्कळ अंशांनीं तिच्याशीं नवीन संबंधी होणाऱ्या सासूच्या वागणुकीवरच अवलंबून असावयाचें. वरील बाबतींत उभयपक्षांच्या पुरस्कर्त्यांचें समाधान झालें, व त्यांस ती सोयरीक जमणें योग्य वाटलें, म्हणजे ज्योतिष्यानें दिलेल्या सुमुहूर्तावर त्या वधूवरांचा विवाह होतो. तत्पूर्वी वराचे वडील वधूच्या वडिलांस, आणि ते वराच्या वडिलांस, भावी मंगलकार्यास अनुलक्षून अभिनंदनलेख पाठवितात. ह्या पत्रव्यवहारानें उभयपक्षांतील सोयरीक नक्की होते; व नंतर ती मोडूं शकत नाहीं. लग्न ज्या शुभ मुहूर्तावर लावावयाचें तो मुहूर्त ठरविणें, हें दोन्हीकडील पुरस्कर्त्यांच्या सोईवर अवलंबून असतें. तत्रापि, त्यासंबंधानें दिरंगाई फार तर वधू ऋतुस्नात होईपर्यंतच करितात. पुढें तो शक्य तितका लौकर धरण्यांत येतो. दोन्ही पक्ष जर श्रीमान् असले, तर लग्नापूर्वी कित्येक दिवस हजारों रुपयांचा खर्च करून इष्टमित्रांस एकावर एक मेजवान्या व नाच देण्यांत येतात. ह्या प्रसंगीं वधूवरांचे वडील आणि नातेवाईक त्या उभयतांस अरसपरस कांहीं दागिना अगर उंची पोषाक, किंवा दोन्ही नजर म्हणून देतात; व वधूचा सासरा तिला मूल्यवान् भूषणें देतो. परंतु ह्या चालीचें श्रीमंत मनुष्यांच्या सान्निध्यांत रहाणाऱ्या गरीबगुरीब जातिबांधवांतून जे कोणी अनुकरण करितात, त्यांस ती मोठी उपाधिकारक होते!

निश्चित मुहूर्तावर लग्नसमारंभ पाहण्यासाठीं वधूवरांचे वडील पुष्कळ लोकांस निमंत्रण करितात. लग्न हिंदू लोकांच्या रिवाजाप्रमाणें सायंकाळीं लावण्यांत येतें. निमंत्रित पुरुषवर्गास घराच्या ओसरीवर, आणि ज्या दालनांत विवाहविधि व्हावयाचा असेल त्याच्या दुतर्फा, वराकडे तोंडें करून खुर्च्यांवरून व बांकांवरून बसवितात. घरांतील दालनें शिष्टसांप्रदायास अनुसरून स्त्रीवर्गाकडे सोंपण्यांत येतात. ह्या प्रसंगीं पुरुष मंडळी जामा आणि पिछोरी (पिशोरी?) घालून येतात. हाच पारशी लोकांचा मूळचा, व अन्यून वेष होय. स्त्रियांचे पोषाक निरनिराळ्या भपकेदार रंगाचे असून ते सोनेरी कलाबतूनें शोभिवंत केलेले असतात. शिवाय त्या आपल्या अंगावर जवाहीरही घालितात.

लोकरिवाज.

लग्नाची मिरवणूक निघण्यापूर्वीं नवरीच्या मैत्रिणी नवऱ्यामुलाच्या घरीं त्यास एक उंची पोषाक, व नवरीच्या बापाच्या ऐपतीप्रमाणें एक हिऱ्याची किंवा सोन्याची आंगठी, नजराणा ह्मणून घेऊन जातात. ह्या वस्तु एखाद्या चांदीच्या किंवा पितळेच्या नक्षीदार ताटांतून व्यवस्थित रीतीनें मांडून ठेविलेल्या असतात; व तें ताट नवरीची आई आपल्या उजव्या हातावर धरून मिरवत जाते. वरास नजराणा दिल्यावर त्या स्त्रिया लागलीच घरीं परत येतात. तिकडे वरगृहीं लग्नसमारंभासाठीं जी मंडळी जमली असतील, त्यांतील प्रत्येकास सूर्यास्ताच्या संधीस गुलाबाचे किंवा इतर सुवासिक पुष्पांचे झेंडे, व त्रिकोणाकृति सोनेरी वर्ख लाविलेले विडे वांटून त्यांच्या अंगावर सोन्याच्या किंवा चांदीच्या गुलाबदानींतून गुलाबपाणी शिंपडितात. हें झाल्यावर सर्व मंडळी मिसलीनें मिरवत मिरवत वधूच्या घरीं येतात. मिरवणुकीच्या अग्रभागीं वाजंत्र्यांचा ताफा मंगलवाद्यें वाजवीत चालतो. त्याच्यामागून लग्नविधि करणाऱ्या **'अध्यारू'**–उपाध्याया–समागमें नवरामुलगा मिरवत असतो, आणि नंतर पुरुषांचा व स्त्रियांचा समुदाय

वराला नजराणा, लोकसत्कार, मिरवणूक, वगैरे.

अनुक्रमें मिरवत जातो. ही मिरवणूक वधूच्या घरीं पोहोंचल्यावर तींतील पुरुष मंडळी वधूपक्षाकडच्या पुरुषसमुदायांत जाऊन बसते; व स्त्रिया तत्पक्षीय स्त्रियांत बसतात. ह्याप्रमाणें सर्व समुदाय व्यवस्थेशीर बसला, ह्मणजे पुनः पूर्वोक्त पुष्पांचे झेंडे, विडे, आणि गुलाबपाणी सर्वांस देण्यांत येतें. सूर्यास्त झाल्यानंतर लागलीच लग्नविधि सुरू होतो; व तो बहुधा तळमजल्यावरील एखाद्या दालनांत, किंवा प्रशस्त खोलींत गालिचाची अगर सतरंजीची बिछायत घालून तिजवर करण्याचा मार्ग आहे.

लग्नविधि.

प्रथमारंभीं वधूवरांस परस्परांसमोर शोभिवंत खुर्च्यांवर बसवून तीं एकमेकांस दिसूं नयेत अशा बेतानें त्यांच्यामध्यें अंतःपटासारखें एक वस्त्र धरितात. ह्या वस्त्राखालून नवरीचा उजवा हात नवऱ्यामुलास आपल्या उजव्या हातानें धरावयास सांगतात. नंतर दुसरें एक वस्त्र घेऊन तें वधूवरांसभोंवतीं गुंडाळितात, व त्याच्या वरच्या कोपऱ्यांस एक, आणि खालच्या कोपऱ्यांस एक, अशा दोन गांठी देतात. त्याचप्रमाणें लग्नविधि करणारा जो अध्यारू असतो, तो **याथा आहू वइरिओ** (?) याचीं लहान लहान स्तोत्रें ह्मणून त्या जोडप्याभोंवतीं कच्या सुताचीं सात वेष्टनें देतो. सातवा वेढा पुरा झाला, ह्मणजे मग तो धागा वधूवरांच्या पाणीग्रहणावरून आणि सभोंवतालच्या वस्त्राच्या दोन्ही गांठींवरून सात सात वेळ लपेटितात. नंतर एका कल्हईच्या उथळ पात्रांत अग्नि ठेविलेला असतो, त्यावर धूप जाळितात; व त्यासरसा अंतःपट चटकन् खालीं टाकितात. तो खालीं पडतांच, नवरानवरीच्या हातीं थोडथोड्या तांदळाच्या अक्षता देऊन ठेविलेल्या असतात, त्या तीं दोघें परस्परांवर अविलंबानें टाकितात. लागलींच वधूवरांच्या आसपास बसलेल्या स्त्रिया टाळ्या वाजवितात. त्यांचा आवाज कानीं पडतांक्षणीं बाहेरच्या बाजूस बसलेली पुरुष मंडळीही आनंदप्रदर्शनार्थ टाळ्यांचा गजर करिते. इकडे परस्परांवर अक्षता टाकिल्यानंतर वधूवरांस एकमेकांशेजारीं

वसवितात; आणि ज्या मुख्योपाध्यायास ' **दस्तूर** ' ही संज्ञा आहे, असे दोघे गृहस्थ, एक वधूसमोर, व दुसरा वरासमोर, याप्रमाणें उभे राहून त्यांस आशीर्वाद देतात. येवढा विधि आटोपला, ह्मणजे मग त्या उभयतां दस्तूरांतून जो मानानें श्रेष्ठ असेल, तो ह्या लग्नविधींतील विशेष उदात्त भागास प्रारंभ करितो. तो वधूवरांस जे आशीर्वाद देतो, ते येणेंप्रमाणें:—

' सर्वसाक्षी परमेश्वर तुह्मां उभयतांवर कृपा करो ! तो तुह्मांस बहु पुत्र देवो ! बहु पौत्र देवो ! चांगलें अन्न देवो ! परस्परांच्या हृदयांचें आकर्षण करणारें प्रेम देवो ! आणि तुम्हां उभयतांना सार्ध शतकाचें दीर्घायु देवो ! (सार्ध शतंजीव करो !) ह्या प्रसंगीं वराजवळ एक, आणि वधूजवळ एक, असे दोन गृहस्थ बसलेले असतात. ते त्यांचे धर्माचे पिते किंवा पालक होत. त्यांस तें लग्न त्यांच्या संमतीनें होत आहे किंवा कसें, ह्याविषयीं उपाध्यायांकडून प्रश्न करण्यांत येतात. प्रथमतः मुलाच्या धर्मपित्यास विचारितात कीं, ' ह्या गांवीं, ह्या स्थळीं, चक्रवर्ती **यझ्देजार्ड** ह्याच्या अमुक शकांत, अमुक मासांत, आणि आज अमुक तारखेला, हा जो समाज जमलेला आहे, त्यासमक्ष मला सांगा बरें, कीं **मज्दायस्नन्** धर्मविहित आज्ञा व आचार ह्यांना अनुसरून ह्या वधूचें ह्या वराकडून पाणिग्रहण करविण्यास आपलें अनुमोदन आहे काय ? आणि जें सांगणें असेल, तें शुद्ध चांदीचे दोनहजार द्राम, व निशापूरशाई आरक्त सुवर्णाचे दोन दीनार वधूस देईन, अशा शर्तेवर सांगा.' ह्या प्रश्नास वराच्या धर्मपित्याचें उत्तरः—' होय ! माझें अनुमोदन आहे.' ह्यावर उपाध्याय मुलीच्या धर्मपित्यास विचारितात कीं, ' सद्विचारानें, सद्वचनानें, आणि सदाचाराची अभिवृद्धि व्हावी अशा हेतूनें, आपल्या कुटुंबांतील ह्या कन्येचें अमुक नांवाच्या ह्या वराशीं लग्न लावून ती यास निरंतर दान करीन असें आपण अभिवचन दिलें आहे काय?' ह्या प्रश्नास मुलीच्या धर्मपित्याचें उत्तरः—

' होय ! मी अभिवचन दिलें आहे. ' यानंतर वधूवरांस असा प्रश्न केला जातो कीं, ' तुह्मी उभयतां आपल्या वचनाप्रमाणें यावज्जीव निर्मल

अंत:करणानें वागण्याविषयीं कबूल आहांत काय ? ' यास तीं दोघें उत्तर देतात:— ' होय. आह्मीं आहों. ' या प्रमाणें प्रश्नोत्तरें झाल्यावर दोन्ही उपाध्याय त्या पतिपत्नींस एक लहानसें व्याख्यान देतात. त्या व्याख्यानांत सुंदर सारभरित असा व्यावहारिक उपदेश असतो. तो विशेषत: वरानें जर लक्ष लावून ऐकिला, तर त्यास आपल्या जीवनचरित्रांत सामाजिक, राजकीय, व्यावहारिक, अशा निरनिराळ्या दृष्टीनें मोठा हितकारक होण्यासारखा आहे. असो. पुढें ते दस्तूर इराणांतील प्राचीन महापुरुषांचें नामस्मरण करून त्यांचा कित्ता घेण्याविषयीं वधूवरांस उपदेश करितात. नंतर सर्वशक्तिमान् परमेश्वरानें त्या नवविवाहित दंपत्यास नैतिक आणि सामाजिक सद्गुण द्यावे, ह्मणून त्याची मनोभावानें प्रार्थना होते. ह्या प्रार्थनेंत तीस देवदूतांचें नामस्मरण करितात. ह्या देवदूतांच्या नांवावरून फारशी महिन्यांतील तीस दिवसांचीं नांवें पडलीं आहेत, व हेच देवदूत वर सांगितलेल्या सद्गुणांचें स्वामी व संरक्षक विभूति आहेत, असें मानितात.

लग्नविधि पुढें चालू.

वर सांगितलेली प्रार्थना, ते दस्तूर **पझंद** भाषेमध्यें करितात; व ती संपल्यावर खुद्द **अवेस्ताच्या** भाषेंतून कांहीं आशीर्वाद दिले जातात. यांत ' **यामा** ' नामक ग्रंथाच्या उत्तर भागापैकीं कांहीं कलमें असतात. तीं ह्मणणें झाल्यावर फिरून पझंद भाषेमध्यें कांहीं आशीर्वचनें देतात; व त्यांत इराणांतील ' **कयानी** ' घराण्यांत होऊन गेलेल्या कित्येक राजांचें आणि वीर पुरुषांचें नामस्मरण असतें. तें चाललें असतां दस्तूर तेथें जमलेल्या लोकांस संबोधून सांगतात कीं, ' अहो ! अशा अशा सद्गुणांमुळें हे राजे व वीर पुरुष प्रख्यातीस आले आहेत. अतएव तुह्मीही त्याच सद्गुणांचें अनुकरण करा! ' तसेंच ते दस्तूर कित्येक सृष्ट वस्तु, उदाहरणार्थ सूर्य, चंद्र, इत्यादिकांचीं नांवें घेतात; व ते ग्रह ज्या सद्गुणांचे स्वामी आहेत असें मानिलें जातें, ते सद्गुण त्या वधूवरांनीं स्वीकारावे, अशी आपली इच्छा दर्शवितात. पुढें **संस्कृत** भाषेंतील कांहीं वचनें भागश: ह्मणतात, व त्यांजबरोबर वधूवरांस कांहीं उपदेश करण्यांत

येतो. ह्या एकंदर लग्नविधीचें पर्यवसान ' **तनदरुस्ती** ' नामक प्रार्थनेमध्यें केलें जातें. तनदरुस्ती ह्मणजे त्या नवविवाहित दंपत्यास शारीरिक शक्ति, उत्साह आणि आरोग्य प्राप्त व्हावें, ह्या हेतूनें ईश्वरास आळवून याचना करितात. हें सर्व आटोपल्यानंतर उभयतां वधू आणि वर, अथवा ते अज्ञान असल्यास त्यांचे पिते किंवा पालक, तसेच त्या उभयतांचे धर्मपिते अथवा धर्मपालक, आणि लग्नविधि करणारे उपाध्याय, इतकी मंडळी त्या लग्नसंबंधी दाखल्यावर आपल्या सह्या करितात. हा दाखला पुढें पारशी लोकांच्या लग्नांचे नोंदणीकामदार यांच्या कचेरींत नोंदिला जातो.

मेजवान्या.

वर सांगितल्याप्रमाणें हा लग्नविधि संपला, ह्मणजे नवरामुलगा आपल्या मित्रांसह घरीं परत जातो. तेथें ते सर्व मेजवानीस बसतात. नवरीच्या पक्षाच्या मंडळीस तिच्या बापाकडून जेवणावळ देण्यांत येते. या मेजवानीची रीति अशी आहे कीं, स्त्रियांचीं पात्रें पहिल्यानें वाढावयाचीं; व त्यांचीं जेवणीं होऊन त्या मेजाजवळून उठून गेल्या, ह्मणजे मग त्याच मेजावर पुरुषांच्या पंक्तीची तयारी होते. खाद्य पदार्थांत मांसे, शाकभाजा, मिष्टान्नें, फळफळावळ, मुरंबे, इत्यादिकांचा समावेश असतो; व पेयांमध्यें विलायती आणि देशीं मद्यें असून तीं मनमुराद पिण्यांत येतात ! नवविवाहित दंपत्याचें, त्यांच्या मातापितरांचें, व पंक्तींतील प्रमुख गृहस्थांचें आरोग्य चाहून मद्यपान करण्याविषयीं मंडळींचा आग्रह चालतो. येथें येवढें न वगळतां सांगितलेंच पाहिजे कीं, अशा प्रसंगीं हमेष राजघराण्याखातर एक वेळ मद्यप्राशन केलें जातें. इंग्रजांची नक्कल !

नाच, इतर मनोरंजन, व लग्नसमाप्ति.

मेजवानी आटोपल्यावर स्त्रिया आपापल्या घरोघर जातात. परंतु पुरुष मंडळी, नाच पहाण्यासाठीं किंवा त्यानंतर श्रुतिमनोहर आंग्लवाद्यांचा मजा घेण्यासाठीं बरीच रात्र पावेतों बसतात. मध्यरात्र झाल्यावर उपाध्याय जमलेल्या मंडळींतील कांहीं निवडक स्नेही व संबंधी जनांसमोर त्या लग्नास उद्देशून फिरून एकदा आशीर्वचनें देतात; ह्मणजे लग्नसमारंभ आटोपला.

मुसलमानांची लग्नरीति.

मंगनी.

प्रथमतः उभयपक्षांमध्यें मुलगा आणि मुलगी ह्यांचें लग्न करण्यासंबंधानें खाजगी रीतीनें विचारपूस झाल्यावर नवऱ्यामुलाचे आईबाप अथवा कोणी नजीकचे नातेवाईक उघड रीतीनें मुलीची मागणी करण्यासाठीं तिच्या घरीं जातात. ह्या मागणीस मुसलमानी भाषेंत 'मंगनी' असें ह्मणतात.

मंगनी करण्याची सामान्य रीति.

मंगनी करण्याची रीत अशी आहे कीं, वर आणि कन्या हीं दोघें निरनिराळ्या गांवांत रहात असल्यास कन्येचा बाप सांगेल तितके लोक समागमें घेऊन वरपक्षानें कन्येच्या घरीं जावें. परंतु, उभयपक्ष एकाच गांवचे रहिवासी असतील, तर अमुक इतक्या लोकांनींच यावें, अशी अगाऊ बोली करण्यांत येत नाहीं. वाटेल तितकीं माणसें बरोबर नेलीं तरी चालतात. मात्र त्या सर्वांना जेवणासाठीं ठेवून घेत नाहींत. वरपक्षाची मंडळी मंगनी करण्यास आली, ह्मणजे कन्यापक्षाचीं माणसें गांवांतील आपल्या जातिबांधवांस बोलावून आणितात; व ते आल्यानंतर सर्वांसमक्ष अमक्याच्या मुलीचें अमक्याच्या मुलाबरोबर लग्न करण्याचें ठरलें आहे; आणि वरपक्षाकडून कन्येला अमुक अमुक दागिने व वस्त्रें देण्यांत आलीं आहेत, असें सांगतात. त्यानंतर कन्यापक्षाकडून जमलेल्या लोकांस शरबत पाजण्यांत येतें, व यथाशक्ति

पानसुपारी, विडी, तमाखू, इत्यादिकांनीं त्यांचा सत्कार झाल्यावर वरपक्षाच्या निवडक मंडळीखेरीज इतरांस रजा देण्यांत येते. वरपक्षाच्या मंडळीस एखादा दिवस राहवून घेतात.

मंगनीतील भेदाभेद.

मंगनीच्या वेळेस कन्येला वरपक्षाकडून वस्त्रभूषणें वगैरे जें जें देण्यांत येतें, त्यासंबंधानें सर्व पोटजातींमध्यें सारखेपणा नाहीं.

सुनींची मंगनी.

सुनी पंथाच्या बोहरी लोकांमध्यें एखादी चांदीची किंवा सोन्याची जिन्नस सरासरी पंधरा बीस रुपयांपासून चाळीस पन्नास रुपयांपर्यंत किंमतीची देतात; आणि पुढें शादीं ह्मणजे लग्नाच्या वेळेस काय काय द्यावयाचें, त्याबद्दल अगाऊ खुलासा करून नक्की ठराव करण्यांत येतो.

शेखांची मंगनी.

शेख लोकांमध्यें मंगनी करण्यास जातांना वरपक्षास आपल्याबरोबर पांच नारळ, पांचशेर साकर, कुडती, इजार, रुमाली, हिरव्या रंगाच्या बांगड्यांचा एक जोड ह्मणजे आठ बांगड्या, एखाददुसरी चांदीची किंवा सोन्याची जिन्नस, आणि एक चर्मी जोडा इतकें सामान न्यावें लागतें. कन्येच्या आईबापास करणी करण्याची विशेष हौस असल्यास मंगनीच्या प्रसंगीं वराला समागमें घेऊन येण्यास सांगतात. वराला न्यावयाचें झालें, ह्मणजे अकरा नारळ आणि अकरा शेर साकर न्यावी लागते, इतका फरक आहे. तें सर्व सामान कन्येच्या घरीं नेऊन दिल्यावर कन्यापित्याकडून मंगनीसाठीं आलेल्या सर्व वरपक्षीयांस मिष्टान्नभोजन घालण्यांत येतें. नंतर वधूपक्षाकडून गांवांतील नातेवाइकांस निमंत्रण करण्यांत येतें. ती मंडळी एकत्र होऊन वर सांगितल्याप्रमाणें मंगनीची खबर सर्वांस जाहीर करण्यांत आली, ह्मणजे **मुल्ला** किंवा **काजी** असतील ते **कुराणां**तील **'फातिहा'** नांवाचा एक भाग आहे तो वाचितात. त्यांना वरपक्षाकडून आठ आणे देण्याचा शिरस्ता आहे. फातिहाचें पठन

झाल्यावर नवऱ्यामुलास कन्यापित्याकडून अंगरखा, पागोटें व रुमाल हा पोषाक देण्यांत येतो, आणि सर्व मंडळींस शरबत किंवा चहा पाजितात. सदरहू लोकांत कित्येक प्रसंगीं मंगनीचा सोहळा करीतही नाहींत. खाजगी रीतीनें ठराव होऊन लग्न लावण्यांत येतें.

सैय्यंदांची मंगनी.

सैय्यद लोकांमध्यें मंगनीच्या प्रसंगीं कन्येला बहुतकरून पायांत घालण्याचा सुमारें शें सवाशें रुपये भारांचा तोड्यांचा जोड देण्याचा रिवाज आहे. तथापि, वरपक्षास इतकी ऐपत नसल्यास त्याऐवजीं दुसरी एखादी हलक्या किंमतीची जिन्नस देतास. शिवाय कुडती, इजार, आठ बांगड्या, चर्मी जोडा, अकरा नारळ, अकरा शेर साकर, फुलें, टोपलीभर ताजा मेवा, आणि दोन रुपये नगद द्यावे लागतात.

पठाणांची मंगनी.

पठाण लोकांत वर सांगितल्याप्रमाणें कपडे, दागिना, नारळ आणि सवापांच शेर साकर. इतकें सामान कन्यापित्याला त्याच्या सर्व नातेवाइकांसमक्ष देण्यांत येतें; व त्याशिवाय तीस पासून साठ पर्यंत नगद रुपये द्यावे लागतात. पुढें कन्यापिता शादीच्या प्रसंगीं आपल्या मुलीला वस्त्रपात्रादि जे जिन्नस देतो, ते खरीदी करण्याकडे तो ह्या ऐवजाचा विनियोग करितो.

छीपी लोकांची मंगनी.

छीपी*लोकांत मंगनी करितेसमयीं कन्येला देण्यासाठीं म्हणून एक रुपया आणि जातिनिर्बंधाप्रमाणें कराबद्दल सवासहा रुपये, मिळून कन्यापित्याला सवासात रुपये द्यावे लागतात. तसेंच कन्येला एक रुप्याची सरी व सवाशेर साकरही द्यावी लागते.

---

* कपडे रंगवून त्यांवर वेलबुट्या छापण्याचें काम करणाऱ्या लोकांस छीपी असें ह्मणतात. हें काम करणारे कारागीर हिंदू तसे मुसलमानही आहेत. त्यांपैकीं वरील हकीकत फक्त मुसलमान छीपी यांचीच समजावी.

पांजणीगिरे लोकांत मंगनी करण्याकरितां पुरुषांसमागमें स्त्रियाही जातात.

पांजणीगिरे लोकांची मंगनी.

ह्यांस दोन नारळ, सवापांचशेर साकर, कन्येला पांघरण्याचें वस्त्र (ओढणी), सुमारें पंचवीस रुपये किमतीची चांदीची किंवा सोन्याची जिन्नस, आणि एक रुपया रोख इतकें सामान न्यावें लागतें. हें सामान वरपक्षाच्या स्त्रियांनीं वधूच्या घरांत नेऊन सोंपून द्यावयाचें.

खाटीक लोकांत मंगनी दोन प्रकारची असते. एक लहानी, व दुसरी

खाटिकांची मंगनी.

मोठी. पैकीं लहान मंगनीच्या समयीं मुलीला एक ओढणी, व दोन रुपयांची मिठाई नेतात. इतर वस्तु वर सांगितल्या-प्रमाणें यथाशक्ति न्यावयाच्या. मंगनीला गेलेल्या सर्व लोकांस जेवूं घालण्याचा रिवाज आहे. लहानी मंगनी झाल्यावर मोठी मंगनी सवडी-प्रमाणें कित्येक दिवसांनंतर करण्यांत येते. त्याप्रसंगीं नवरीला वस्त्रभूषणें जें कांहीं देण्याबद्दल पूर्वी ठराव झाला असेल, त्याप्रमाणें न्यावयाचें. परंतु, कन्या-पक्षाच्या लोकांवर पूर्ण विश्वास नसल्यास त्या जिनसांतून अल्प मोलाच्या कांहीं वस्तु देतात, व बाकीच्या कांहीं सबबीनें पुढें शादीच्या वेळीं देण्याबद्दल बोली करितात. मोठ्या मंगनीच्या समयीं कन्यापक्षाकडून वरपक्षाच्या सर्व लोकांस जेवूं घालण्यांत येतें.

हजामांची मंगनी.

हजाम लोकांत ह्या प्रसंगीं पांच नारळ, पांच शेर साकर, छिटाचा झगा व ओढणी देतात.

फकीर लोकांत वरप्रमाणें कपडे, नारळ, एक रुप्याची अगर सोन्याची

फकीरांची मंगनी.

जिन्नस, आणि पांच शेर साकर घेऊन जातात. समागमें स्त्रियांस नेण्याची चाल आहे. त्या स्त्रिया तें सामान घरांत नेऊन कन्यापक्षीयांस देतात. ह्या दिवशीं वरपक्षापैकीं दहा पांच मनुष्यांस जेवूं घालण्यांत येतें. जेवणामध्यें तूप आणि साकर मिळ-वून तयार केलेला भात ह्मणजे ‘ चोंगा ’ हें पक्वान्न अवश्य असावें लागतें.

ह्याप्रमाणें निरनिराळ्या पोटजातींत थोड्या बहुत भेदानें मंगनी करण्याचा रिवाज आहे. ही मंगनी, हिंदू लोकांतील साकरपुडा, वचनसुपारी, आणि अंशतः वाग्दान, ह्या कृत्यांसारखी दिसते. विशेषतः मराठ्यांतील 'मागणी' शीं तिचें फारच साम्य आहे. ह्यावरून हा रिवाज केवळ हिंदू रिवाजाचें अनुकरण आहे, असें उघड दिसतें. बादशाही अमलामध्यें हजारों हिंदूंचे मुसलमान करण्यांत आले. तेव्हां त्या लोकांच्या ज्या कित्येक मूळच्या रीतिभाती होत्या, त्या त्यांना धर्मांतर करावें लागलें तरीही, त्यांजमध्यें कायम राहिल्या. अशा रीतिभातीमध्यें 'मंगनी' ची गणना करण्यास हरकत दिसत नाहीं. असो.

मंगनीचें सामान्य स्वरूप.

वर सांगितल्याप्रमाणें मंगनी झाल्यानंतर शादीचा दिवस मुकरर करण्यांत येतो. त्याकरितां कन्येच्या वडिलांच्या शक्तीप्रमाणें वरपक्षाकडून लोक नेण्यांत येतात. तेथें गेल्यावर उभयपक्षांच्या विचारानें अमुक एक दिवशीं शादी करावी, असा ठराव होतो. दोन्ही पक्ष एकाच गांवचे रहिवासी नसल्यास ह्याप्रसंगीं आलेल्या वरपक्षाच्या पाहुण्यांस कन्यापित्याकडून जेवणावळ देण्यांत येते. मात्र ते एकाच गांवांतील असल्यास हा रिवाज नाहीं.

शादीचा दिवस मुकरर करणें.

शादीचा दिवस मुकरर करावयास जातांना कन्येला देण्यासाठीं वरपक्षीयांस आपल्याबरोबर कांहीं वस्तु न्याव्या लागतात. त्यासंबंधानें निरनिराळ्या पोटजातींत निरनिराळा रिवाज आहे. तो खालीं लिहिल्याप्रमाणें:—

शादीचा दिवस मुकरर करितांना द्यावयाची देणगी.

सुनी पंथाच्या बोहरी लोकांत मंगनीच्या वेळेस ज्या वस्तु देण्याचा ठराव झाला असेल, त्या सर्व वस्तु ह्या समयीं घेऊन जातात. ह्या वस्तूंस 'देज' अशी संज्ञा आहे. मंगनीच्या प्रसंगीं 'मेहेर' बांधण्याबद्दलही ठराव करावा लागतो. ती मेहेर सवाशें रुपयांपासून वर वाटेल त्या रकमेपर्यंत बांधण्यांत येते. त्या मेहेरच्या रकमेच्या किंमतीचे दागदागिने सदरहू प्रसंगीं घेऊन जातात. दागिने करून मेहेर

सुनी लोकांतील देज व मेहेर.

पैकीं कांहीं रकम बाकी उरल्यास ती देत नाहींत. ह्याप्रसंगीं वधूला जीं वस्त्रें देतात, त्यांची किंमत मात्र मेहेरमध्यें धरीत नाहींत. ती मेहेराशिवाय खर्चितात. वधूला कपडे कसे करावयाचे, व ते किती आणि काय काय करावयाचे, तें वरपक्षाच्या खुषीवर अवलंबून असतें. ह्याप्रसंगीं 'देज' घेऊन येणाऱ्या वरपक्षीयांस, आणि कन्यापक्षाच्या नातेवाइकांस जेवणावळ देण्यांत येते.

शेखलोकांची देज.

शेख लोकांत ह्याप्रसंगीं कन्येच्या पित्यास बत्तीस रुपये रोख देतात. ह्या रुपयांतून अजमासें निमे रकम भांड, भंवई, फकीर, पाणी भरणारे भिस्ती, पिंजारी, धोबी, माळी, वगैरे लोकांस देण्यांत, आणि मशीदीचा कर भरण्यांत खर्चिली जाते; व सुमारें निमे रकम, मुलीची शादी झाल्यावर तिच्याबरोबर पलंग, बिछाना, वगैरे ज्या वस्तु द्याव्या लागतात, त्या खरीदी करण्याकडे लावितात. आलेल्या वरपक्षीयांस कन्यापित्याकडून जेवणावळ देण्यांत येते.

सैय्यदांची देज.

सैय्यद लोकांत एक दुपेटा ह्मणजे मुलीस पांघरण्याचें वस्त्र आणि ताज्या मेव्याचा करंडा घेऊन जातात.

पठाण लोकांत देज नाहीं.

पठाण लोकांत ह्या प्रसंगीं वरपक्षाचे लोक कांहींएक घेऊन जात नाहींत. मात्र कन्यापित्याच्या ऐपतीप्रमाणें कमजास्त मंडळी नेण्यांत येते. त्यांस कन्यापिता जेवूं घालितो. वरपक्ष आणि कन्यापक्ष ग्रामबंधु असल्यास जेवणावळ देण्यांत येत नाहीं.

छीपी लोकांचा रिवाज.

छीपी लोकांत कन्यापक्षाकडून वरपक्षास आपण शादीचा दिवस मुकरर करण्यासाठीं अमुक दिवशीं यावें, असा निरोप पाठविण्यांत येतो. त्याप्रमाणें नेमिलेल्या दिवशीं वरपक्षाकडून एक दोन मनुष्यें येतात. त्यांजबरोबर दिवस नक्की करून त्याची खबर कन्यापिता वरपित्यास पत्रद्वारें कळवितो. कित्येक वेळां ह्या लोकांत शादीचा दिवस मंगनीच्या वेळींच मुकरर करण्यांत येतो.

पांजणीगिरे लोकांत ह्याच प्रसंगीं मेहेरचा ठराव करितात; व तिच्या रकमेपैकीं वरपिता गरीब असो की श्रीमंत असो, त्यास पंचवीस रुपये रोख द्यावे लागतात. वरपक्ष वधूपक्षाच्या गांवचा असो वा नसो त्यास जेवणावळ देण्यांत येते.

पांजणीगिरे लोकांचा रिवाज.

खाटिक लोकांत ह्या प्रसंगासाठीं जमलेल्या सर्व मनुष्यांस प्रत्येकीं चार चार बत्तासे वरपक्षानें देण्याचा रिवाज आहे.

खाटिकलोकांचा रिवाज.

हजाम लोकांत ह्या प्रसंगीं कांहींच देण्याघेण्याचा मार्ग नाहीं.

हजामांचा रिवाज.

फकीर लोकांत ह्या प्रसंगीं वरपक्षीयांस आपल्याबरोबर एकवीस शेर साकर एकवीस नारळ, आणि साडेबत्तीस रुपये रोख न्यावे लागतात. ते परगांवचे असल्यास त्यांना कन्यापिता जेवूं घालितो. वरील रकम कन्यापिता शादीच्या प्रसंगीं जातिबंधूंना जेवणावळ देण्यांत, कन्येला चांदीच्या किंवा सोन्याच्या बाळ्या देण्यांत, व तिजबरोबर पलंग, बिछाना, भांडीं, वगैरे जें द्यावें लागतें, तें खरीद करण्यांत खर्चून टाकितो.

फकीरांचा रिवाज.

अशा रीतीनें शादीचा दिवस मुकरर करण्यांत येतो. पुढें त्या दिवसाच्या अगाऊ चार पांच किंवा फार तर आठ दिवस, वधूवरांस आपापल्या घरीं ‘पिठी’ लावण्यांत येते. पिठी ह्मणजे, गहूं व मूग भाजून आणि दळून त्यांच्या पिठांत तिळाचें तेल व हळद कालवून अंगास लावण्याकरितां तयार केलेलें द्रव्य. ही पिठी दिवसांतून एक वेळ वधूवरांच्या अंगांस लावितात. पहिल्या दिवशीं सर्व पोटजातींत ती बहुधा नातेवाईक स्त्रियांकडून लावण्यांत येते; व ती लावितांना त्या गाणीं गातात. ह्या स्त्रियांस खजूर वांटण्याची चाल आहे. फक्त सैय्यद लोकांमध्यें जितके दिवस पिठी लावावयाची, तितके दिवस स्त्रिया

पिठी लावणें व कंगना करणें.

गाणीं ह्मणण्यास येतात; व त्यांस खजूर किंवा चार चार पांच पांच सुपाऱ्या वांटितात. छीपी लोकांत पहिला दिवस खेरीजकरून बाकीच्या दिवशीं वरास हजामाकडून व वधूस हजामाच्या बाईकडून पिठी लावितात. पहिल्या दिवशीं मात्र खजूर किंवा सुपाऱ्या वांटितात. पांजणगिरे लोकांत वर मोठा असल्यास त्याला स्त्रिया पिठी लावीत नाहींत. हजाम लावितो; आणि गाणीं गाण्याकरितां येणाऱ्या स्त्रियांस फक्त पहिल्या दिवशींच खजूर वांटितात. पिठी लावतांनाच वधूवरांच्या हातांत लाल रंगाच्या सुताचा 'कंगना' ह्मणजे कंकण बांधितात. हा कंगना फक्त शेख आणि फकीर लोकांत वराच्या हातांत मेहेंदीसहित बांधण्यांत येतो. बोहरी लोकांत कंगना बांधण्याची चाल नाहीं.

परगांवचें वऱ्हाड व त्याचें स्वागत.

कन्या बाहेरगांवची असल्यास शादीच्या प्रसंगीं किती मंडळी समागमें आणावयाची त्यासंबंधानें वरपक्षाकडून कन्यापित्याशीं अगाऊच ठराव करून घेण्यांत येतो. जितकी मंडळी नेण्याचें ठरलें असेल, तितक्यांना वरपक्षाकडून निमंत्रण केलें जातें. ती मंडळी प्रथमतः वराच्या घरीं जमा होतात. त्यांना वरपिता जेवूं घालितो; व नंतर सर्व मंडळीसह वरपक्ष वाजत गाजत शादीसाठीं निघतो. अशा बेतानें कीं, कन्येच्या गांवीं सायंकाळीं जाऊन पोहोंचतां यावें. हे वरपक्षाचे लोक कन्येच्या गांवीं दाखल झाले, ह्मणजे त्यांना घेण्यासाठीं कन्यापक्षाचे लोक सामोरे येतात; व त्यांना उतरण्यासाठीं जागा तयार करून ठेविली असेल, तेथें घेऊन जाऊन संध्याकाळीं जेवूं घालितात. वधूवर एकाच गांवचे असल्यास वर सांगितलेल्या प्रकाराचें कारण पडत नाहीं, हें निराळें सांगणें नकोच.

बरी.

वरपक्षाची जेवणीं झाल्यानंतर वधूकडे वाजत गाजत लग्नसंबंधीं कांहीं देणगी पाठविण्यांत येते. तीस 'बरी' अशी संज्ञा आहे. ही बरी बोहरी जातीखेरीज इतर सर्व मुसलमान लोकांत नेण्याची चाल आहे.

शेख लोकांत जी बरी नेतात तींत एकवीस नारळ, एकवीस शेर साकर, कपड्यांचे चार जोड, सोन्यारुप्याचे मिळून चार दागिने, डोकींत घालण्यासाठीं फुलें, आरसा, सुरमा, दांतवण, तेल, अत्तर, नाडा, हिरव्या रंगाच्या आठ बांगड्या, सुरमा व दांतवण ठेवण्यासाठीं दोन लहान लहान डब्या, वगैरे सामान दहा पांच मनुष्यें वाजत गाजत घेऊन जातात; व तें मुलीकडे सोंपून परत येतात.

शेखलोकांची बरी.

सैयद लोकांतील बरी शेख लोकांप्रमाणेंच आहे. मात्र तींत वरील पदार्थांशिवाय हरएक प्रकारचा सुकलेला मेवा प्रत्येकीं एकवीस शेर, आणि चार पांच रुपयांचा ताजा मेवा पाठविण्यांत येतो. कपडे खेरीजकरून बाकीच्या वस्तु पाठविण्याची सवड नसल्यास त्याऐवजीं पन्नास रुपये रोख पाठविले तरी चालतात.

सैयदांची बरी.

पठाण लोकांत मेहेरची रकम बहुधा एकशें साडेसत्तावीस रुपये ठरविण्यांत येते; व तितक्याच रकमेच्या किंमतीच्या वस्तु बरींत पाठविल्या जातात. त्यांतही मंगनीच्या वेळीं ज्या जिनसा नवरीच्या अंगावर घातल्या असतील, त्यांची किंमत वजा करून बाकीच्या किंमतीची बरी नेण्यांत येते. इतर किरकोळ वस्तु शेख लोकांच्या बरीप्रमाणेंच असतात.

पठाणांची बरी.

छीपी लोकांत सवादोनशें रुपये किंमतीचे दागिने, कपड्याबद्दल एकवीस रुपये रोख, फुलांचा हार, सवाशेर खारका, सवाशेर खोबरें, व शिवाय शेख लोकांच्या बरींत सांगितलेलें सर्व किरकोळ सामान ज्याला सौभाग्यपुडा अशा अर्थाची संज्ञा आहे तें, व थोडी वाटलेली मेहेंदी पाठविण्यांत येते.

छपीलोकांची बरी.

पांजणीगिरे लोकांत पूर्वी कपड्यासाठीं पंचवीस रुपये देण्यांत येतात. ह्मणून सांगितलें, त्याचे कपडे शिवून ते बरीच्या वेळेस नेतात. शिवाय शंभर रुपयांचे दागिने, सौभाग्यपुडा, व एक चर्मी जोडा, इतके जिन्नस न्यावे लागतात.

पांजणीगिरे लोकांची बरी.

खाटीक लोकांची बरी.

खाटीक लोकांत मोठ्या मंगनीच्या वेळी दिलेले कपडे, व दागिने परत मागून ते बरीमध्यें नेतात. त्यावेळीं कपडे व दागिने बेताबाताचेच दिले असल्यास बाकीचे ह्याप्रसंगीं घेऊन जातात. सौभाग्यपुडा, चर्मी जोडा, हेंही नेण्याची चाल आहे.

हजामांची बरी.

हजाम लोकांत कपडे व दागिने मिळून साठ रुपयांची बरी असते. खेरीज सौभाग्यपुडा व चर्मी जोडाही नेतात.

फकीरांची बरी.

फकीर लोकांत कपड्यांचे चार जोड, दहा पंधरा रुपयांचा कांहीं दागिना, सौभाग्यपुडा, अडीच शेर गूळ, व चर्मी जोडा, इतक्यांची बरीं जाते. बरी घेऊन येणारांस कन्येचा बाप शरबत पाजतो. येवढा रिवाज जास्त आहे.

मेहेंदी लावण्याचा सोहळा.

ह्याप्रमाणें निरनिराळ्या पोटजातींत जो बरीचा प्रकार आहे तो सांगितला. ही बरी नवरीकडे येऊन दाखल झाल्यानंतर कांहीं वेळानें कन्यापक्षाची मंडळी वराच्या हातापायांस लावण्यासाठीं वाटून तयार केलेली मेहेंदी व पोषाक वगैरे वस्तु मिरवत नेतात. मेहेंदी स्त्रियांकडून लावण्यांत येते, व ती लावितांना त्या मुखानें मंगलगीतें गातात. बोहरी, पठाण, व छीपी लोकांत वरास मेहेंदी लावण्याचा रिवाज नाहीं. शेख लोकांत मेहेंदीसोबत वर सांगितल्याप्रमाणें सुताच्या नाड्याचा कंगना (कंकण) रुमाल व पागोटें नेतात. सैयद लोकांत मंदील अथवा पागोटें, व ऐपतीप्रमाणें इतर कपडेही नेतात; व ते घेऊन येणारास वरपक्षाकडून दोन रुपये देण्यांत येतात. पांजणीगिरे लोकांत मेहेंदीबरोबर स्नान करिते वेळीं नेसण्याचें वस्त्र—‘लुंगी’— नेतात. मेहेंदी लावण्याकरितां अल्पवयस्क मुली येतात, व त्या बिनबोलतां मेहेंदी लावून जातात. खाटकांमध्ये मेहेंदीबरोबर पोषाक वगैरे कांहीं नेत नाहींत. मेहेंदी स्त्रिया लावितात. हजामांमध्यें वरपक्ष परगांवचा असल्यास मेहेंदीसोबत दोन मनुष्यांस पुरेल इतकी खिचडी वराकडे घेऊन जाण्याची चाल आहे. फकीर लोकांत वरास

लावण्याच्या मेहेंदीला ' अंगोल ' अशी संज्ञा आहे. अंगोलीबरोबर लुंगी, कंगना, शाल, पागोटें, आणि स्नानासाठीं तापविलेलें पाणी घेऊन जातात. पांजणीगिऱ्यांतील रिवाजाप्रमाणें ह्या लोकांतही स्त्रिया वरास मेहेंदी लावितांना बोलत नाहींत.

मंगलस्नान व नमाज.

ज्या लोकांत मेहेंदी लावण्याचा रिवाज आहे, त्यांच्यांत हा सोहळा झाल्यानंतर, आणि ज्यांच्यांत मेहेंदीचा रिवाज नाहीं त्यांच्यांत नवरामुलगा लग्नाला जाण्यापूर्वी वधूवरांस आपापल्या घरीं मंगलस्नान घालण्याची चाल आहे. नवऱ्यामुलास अभ्यंगानंतर पोषाक करवून मशीद नजीक असल्यास तेथें नेऊन अगर घरच्या घरींच नमाज पढवितात. नवरीला अभ्यंगानंतर स्त्रिया गाणीं ह्मणून वस्त्रभूषणांनीं शृंगारितात.

सबगस्त अथवा वरप्रस्थान.

वर सांगितलेलीं कृत्यें आटोपल्यावर सर्व मुसलमानांत नवऱ्यामुलास मोठ्या समारंभानें मिरवत वधूच्या घरीं लग्नासाठीं नेतात. ह्या मिरवणुकीला ' सबगस्त ' अशी संज्ञा आहे. सबगस्तीमध्यें दारूकाम सोडण्याची चाल आहे. नवरामुलगा घोड्यावरून मिरवत मिरवत नवरीच्या घराजवळ आला, ह्मणजे शेख लोकांत त्याचा भावी मेहुणा किंवा असाच कोणी नजीकचा नातेवाईक त्यास पिण्यासाठीं एका पेल्यांत शरबत घेऊन येतो. तें नवऱ्यामुलानें घेतल्यावर तो त्या पेल्यांत अर्धा रुपया टाकितो. नंतर त्यानें घोड्यावरून उतरावयाचें. सैय्यद, पठाण व पांजणीगिरे ह्या लोकांत सदरहू प्रसंगीं दूध पाजण्याचा रिवाज आहे. सैय्यद नवरा दुधाच्या पेल्यांत रुपया टाकितो. इतरांत कांहीं टाकण्याची चाल नाहीं. छीपी लोकांत वर नजीक आला, ह्मणजे कन्यापक्षाचे लोक त्यावर थोडेसें मीठ फेंकितात; व एका भांड्यांत दूध घेऊन जाऊन तें त्यास पिण्यास देतात. तो एखादा दुसरा घोंट घेऊन बाकीचें दूध आपल्या बरोबरच्या मंडळीस देतो.

नंतर सर्व मंडळी मंडपामध्यें किंवा घराच्या एखाद्या प्रशस्त जागेंत बैठक घातलेली असते तिजवर जाऊन बसतात. मग त्यांच्यांतून वरपक्षाचा पुढारी तीन असामींस निवडून घेतो. त्यापैकीं एकास **'वकील'** व दुसऱ्या दोघांस **'साक्षी'**, अशा संज्ञा देण्यांत येतात. ह्या त्रिवर्गास काजी किंवा मुल्ला घरांत पाठवून मुलगी मोठी असल्यास प्रत्यक्ष तिला, किंवा ती लहान असल्यास तिच्या आईबापांस असें विचारण्यास सांगतात कीं, अमक्याबरोबर (मुलीचा) **निकाह*** करण्यास तुमची कबूली आहे काय ? हा प्रश्न तीन वेळां विचारण्यांत येतो. त्यास कन्यापक्षाचा तीन वेळां रुकार मिळाला, ह्मणजे ते वकील व साक्षी बाहेर येऊन त्यांची कबूली काजीस किंवा मुल्लास कळवितात. नंतर मेहेरची रकम किती ठरली आहे, त्याबद्दल काजी किंवा मुल्ला तपास करितात. मग कुराणांतील पांच कलमा–तोबा व खुतबा–वराकडून पठन करविल्यावर अमुक स्त्री ही मला बायको कबूल आहे, असें विधान त्याच्या तोंडून तीनदां करवितात. तें झाल्यावर काजी किंवा मुल्ला आपल्या दफ्तरांत वधूवरांचीं नांवें, पत्ते, वकील व साक्षी यांचीं नांवें, आणि मेहेरची रकम,–तिच्यापैकीं दिली किती व बाकी देणें राहिली किती,–इत्यादि गोष्टींची नोंद करून तिच्या खालीं वर, वकील, व साक्षी ह्यांच्या सह्या घेतात. शेख लोकांत कन्यापक्षाच्या दूरच्या नातलगांपैकीं कोणा एकास वकील करितात; व वरपक्षांतून दोघांस साक्षी नेमितात. छीपी लोकांत वरील गोष्टी दफ्तरीं नोंदण्याचा रिवाज नाहीं. खेड्यापाड्यांतून ही नोंद विकल्पानें होते, किंवा होतही नाहीं. निकाह झाल्यावर शेख आणि छीपी लोकांत शरबत पाजितात; सैय्यद लोकांत वरावरून खारका व बत्तासे उधळितात किंवा सर्वजणांस

शादी अथवा लग्न, आणि खानपान.

---

* मुसलमानांत बहुधा प्रथम संबंधास **शादी**, व द्वितीय संबंधास **निकाह** असें ह्मणतात. तत्रापि, **निकाह** शब्दाचा उपयोग पुष्कळ वेळां **शादी** ह्या शब्दाऐवजींही केला जातो. आह्मांस ज्या यवन गृहस्थाकडून सदरहू विश्वसनीय माहिती मिळाली, त्यांनी शादीऐवजीं निकाह शब्दच वापरिला आहे.

वांटितात; पठाणांत खारका अथवा बत्तासे वांटून नंतर शरबत पाजितात; पांजणीगिरे लोकांत वरावरून बत्तासे उधळतात, फकीरांत तांदूळ तूप व साकर एकत्र शिजवून तें पक्वान्न थोडथोडें वांटून देतात, व नंतर पान-सुपारी, विडी, तमाखू, वगैरे दिल्यावर मजलस बरखास्त होते. सैय्यद लोकांत निकाह झाल्यावर कन्येच्या मांडवांत वरपक्षाकडून कसबिणीचा नाच करविण्यांत येतो, व त्यांत सर्व रात्र घालवितात.

मेहेर-देणगी.

मेहेरचा ठराव सर्व मुसलमानांत सारखा होत नाहीं. बोहरी लोकांत तो एकशें पंचवीस रुपयांच्या खालीं नसतो. त्यावर यथाशक्ति वाटेल तितकी रकम देण्यांत येते, व ती देज देतेसमयींच पुरी चुकती करितात. शेख लोकांत मेहेरची रकम उभयपक्षांच्या सल्ल्यानें ठरवितात. ती अमुकच असावी असा नियम नाहीं; व जी रकम ठरेल, तिच्यांतून मुलीच्या अंगावर घातलेल्या दागिन्यांची किंमत वजा जातां जी बाकी उरेल ती मेहेर ह्मणून देतात. सैय्यदांत ही रकम सातशें पन्नास रुपयांहून कमी असत नाहीं. वरपक्ष श्रीमान् असल्यास ती ह्याहून जास्तही असते. पण ती बहुतकरून निकाह होण्यापूर्वी चुकती केली जात नाहीं. बाकी राहते. पठाणांत ही रकम एकशें साडेसत्तावीस रुपयांचीच असते; व हा ऐवज निकाहाअगाऊ चुकता करण्यांत येतो. छीपी लोकांत फक्त चाळीस रुपयांची मेहेर असून ती निकाहापूर्वींच देतात. पांजणीगिरे लोकांत ती बहुधा एकशें साडेसत्तावीस रुपयांची असते. पण वरपक्षाची साख नसल्यास ती ह्याहून जास्त ठरविण्यांत येऊन अवलनिकाह तिची भरपाई करून घेतात. हजामांतही एकशें साडेसत्तावीस रुपयांचीच मेहेर असते. पण बरीच्या वेळेस साठ रुपये किंमतीचीं जीं वस्त्रभूषणें मुलीस दिलीं जातात, त्यांचा ऐवज ह्या रकमेंतून कपात करून बाकीची मेहेर देतात. खाटकांत एकशेंसत्तावीस रुपयांची मेहेर दागिन्यांचा ऐवज कापून देतात. फकीरांतही ह्याच रकमेची मेहेर असते. तीहून कमजास्त ठरत नाहीं, व ती बहुधा देणें बाकीच राहते.

जेवणावळ.

निकाहाच्या दुसऱ्या दिवशीं कन्यापक्षाकडून जातिबांधवांस जेवणावळ देण्यांत येते. ह्या संबंधानें सैय्यद लोकांत इतकाच फरक आहे कीं, कन्येच्या घरीं कांहीं अन्न तयार करून तें वरगृहीं पाठवितात; व तेथें वरपक्षाकडून त्यांत भर घालून सर्वत्रांस जेवूं घालितात.

जुलवा नांवाचा सोहळा.

ह्याच दिवशीं भोजनोत्तर नवरामुलगा आपल्या पक्षाच्या स्त्रियांसहवर्तमान वाजत गाजत नवरीच्या घरीं जातो, व तो तेथें गेल्यावर जुलवा नांवाचा एक सोहळा करण्यांत येतो. तो असा कीं, नवरानवरीस बिछायतीवर समारासमोर बसवितात. बोहरी व पठाण लोकांत त्यांस एकमेकांशेजारीं बसविण्याची चाल आहे. अशा रीतीनें त्यांस बसविल्यानंतर बोहरी लोकांत त्या वधूवरांच्या हातांत स्त्रिया सूत्रकंकणें व सुपाऱ्या बांधितात; व त्या उभयतांवरून चार मातीचे कुंभ, कीं ज्यांत तांदळांच्या अक्षता ठेविलेल्या असतात ते, उतरितात; आणि वरपक्षाच्या स्त्रिया आपापल्या नात्याप्रमाणें आणि स्वकीय आचारांस अनुसरून कन्येवरून आंगठ्या किंवा रोकड पैसे उतरून तत्पक्षाच्या कुंभांत टाकितात, तसेंच कन्यापक्षाच्या स्त्रिया वरावरून आंगठ्या किंवा रोकड पैसे उतरून ते तत्पक्षाच्या कुंभांत टाकितात. शेख लोकांत वधूवरांस कुराणांतील 'कलमें शरीफ' हा भाग उघडून दाखविण्यांत येतो. नंतर एका भांड्यांत पाणी घालून व त्यांत चांदीची किंवा सोन्याची आंगठी टाकून ती वधूवरांस काढून घेण्यास सांगतात. हा प्रकार सात वेळां करण्यांत येतो, व तो चालू असतां उभय पक्षांच्या स्त्रिया एकमेकांचा विनोद करितात. सैय्यद लोकांत ह्या प्रसंगीं वराकडून कन्येस, व तिच्या कडून वरास, बदाम व खडीसाकर खाऊं घालितात. नंतर नृत्यगीताचा धंदा करणाऱ्या डोमणींकडून नाच व गाणें करवितात. फुलछडीनें वरास मारण्याचें मिष करितात. तें झाल्यावर उभयतांस कोणी एकजण पूर्वोक्त 'कलमें शरीफ' उघडून दाखवितो. त्यास वरपक्षानें चार किंवा आठ आणे देण्याची चाल आहे. नंतर कन्यापक्षाकडून वरास व तत्पक्षीयांस यथाशक्ति पोषाक देण्यांत येतात; आणि

मग नवरा नवरीला आपल्या घरीं घेऊन जातो. तेथें गेल्यावर तिला ज्या ज्या वस्तु द्यावयाच्या त्या देण्यांत येतात. पठाण लोकांत सदरहू प्रसंगीं ' कलमें शरीफ ' न उघडतां नुसताच दाखवितात. नंतर ज्यांच्या त्यांच्या मर्जी आणि व्यवहाराप्रमाणें उभयतां वधूवरांवरून पैसे ओंवाळून ते हजाम, कुंभार, माळी, वगैरे जे लोक तेथें उभे असतील, त्यांस वांटून देतात. पांजणीगिरे लोकांत वधूवरांकडून एकमेकांच्या तोंडांत खडीसाकर घालवितात; व नंतर उभय पक्षांत अरसपरस पोषाक वगैरे यथाशक्ति देणगी देतात. छीपी लोकांत जुलव्याचा सोहळा करण्याची चाल नाहीं. ते लोक वरास दरवाजांत उभा करून कन्यापक्षाच्या सर्व स्त्रिया त्याच्या तोंडांत थोडथोडी साकर घालून त्यावरून एकेक पैसा ओंवाळून टाकितात. हे पैसे वरपक्षाचा कोणी मनुष्य गोळाकरून हजामास देतो. खाटकांत डोमणीचें गाणें करवितात. ती फुलछडीनें वरास मारण्याचा भाव करिते. उभयतां वधूवरांस ' कलमें शरीफ ' बंद असतां दाखविण्यांत येतो. हजामांत ह्या प्रसंगीं वधूवरें एकमेकांस तूपसाकर चाटवितात; व उभय पक्षांत अरसपरस यथाचार पैसे देतात. फकीर लोकांत वधूवरांस 'कलमें शरीफ' दाखवून कन्या सासरीं जाण्यास निघाली, ह्मणजे उभय पक्षांत अरसपरस यथाचार पैसे वांटितात.

कन्येची बिदागी.

वर सांगितल्याप्रमाणें जुलव्याचा सोहळा झाल्यानंतर कन्यापक्षाकडून कन्येला सासरीं बिदा करण्यांत येते. त्यावेळेस शेख, पांजणीगिरे व फकीर लोकांत तिच्याबरोबर पलंग, गादी, उशा, चादर, तिवई, पेटी, ताटें, लोटे, प्याले, पातेलीं, वगैरे वस्तु देण्याची चाल आहे. शेख लोकांत वराला कन्यापिता पुष्पालंकार घालितो; आणि सर्व मंडळींच्या अंगांवर रंग उडविण्यांत येतो. बोहरी, सैय्यद, पठाण, छीपी, खाटीक आणि हजाम ह्या लोकांत कन्येची पाठवणी करितेसमयीं तिला कांहीं एक देण्याचा रिवाज नाहीं.

बोहरी लोकांत कन्या सासरीं गेल्यावर ती अगदींच लहान असल्यास तिला लागलीच तिचे आईबाप परत घेऊन जातात, व मोठी असल्यास कित्येक दिवसपर्यंत तेथें ठेवून नंतर परत बोलावितात. पण त्या संबंधानें कांहीं चाल वगैरे नाहीं. इतर लोकांत ती लहान असल्यास तिला सासरीं न नेतां माहेरींच ठेवून जातात.

माहेरवास.

लग्नानंतर तिसऱ्या किंवा दहाव्या दिवशीं वधूवरांच्या हातांत बांधिलेलीं सूत्रकंकणें सोडण्याचा सोहळा करण्यांत येतो. बोहरी लोकांत कंकणें बांधण्याचा तसा सोडण्याचाही सोहळा नाहीं. सैय्यद शिवायकरून इतर लोकांत स्त्रिया गाणीं गाऊन कन्येचें कंकण वराकडून, व त्याचें कन्येकडून सोडवितात. सैय्यद लोकांत वधूवरांस समोरासमोर बसवून स्त्रिया आसपास उभ्या राहतात. नंतर वधूवरांमध्यें एक भांडें, कीं ज्यांत पाणी व दूर्वा घातलेल्या आहेत असें आणून ठेवून, त्यांत एक दोन अंगठ्या टाकितात; व नवरानवरींतून त्या ज्याच्या हातीं लागतील त्यास घेण्यास सांगतात. हा प्रकार तीन वेळां झाल्यावर पूर्वोक्त रीतीनें एकमेकांकडून कंगना सोडवितात.

कंगना (कंकण) सोडणें.

कन्या वराबरोबर सासरीं गेल्यावर शेख, सैय्यद, पठाण, पांजणीगिरे, छीपी, हजाम, खाटीक व फकीर ह्या लोकांत तिला आणि वराला तिसऱ्या दिवशीं कन्यापक्षाचें बोलावणें जातें. बोलावणें करण्यास कन्यापित्याकडून चार, पांच, दहा, अथवा कित्येक वेळां ह्याहूनही जास्त मनुष्यें पाठविण्यांत येतात. वरपिता त्यांस दोन दिवस आपल्या घरीं ठेवून घेऊन तिसऱ्या दिवशीं त्यांजबरोबर वधूवरांची रवानगी करितो. कन्यापित्याच्या घरीं गेल्यावर तेथें उभयतां वधूवरांस दहा बारा दिवस ठेवून नंतर वरपिता त्यांनां परत घेऊन येण्यासाठीं दोन तीन माणसें बोलावूं पाठवितो. तीं तेथें दोन तीन दिवस राहून वधूवरांस परत घरीं घेऊन येतात.

सासुरवाडीस जाणें-येणें.

येथपर्यंत गुजरातेंतील हिंदूंच्या कित्येक जाति व पोटजाति, पारशी लोक, आणि मुसलमान व त्यांच्या कांहीं पोटजाति, ह्यांच्या लग्नविधि व सोहळ्यांचें वर्णन झालें. पारशी लोकांत जातिभेदाची भानगड नसल्यामुळें त्यांचा लग्नविधि हिंदुस्थानाच्या कोणत्याही भागांतील त्यांच्या जातिबांधवांत एक सारखाच असेल, अशी आमची समजूत आहे. परंतु हिंदु आणि मुसलमान ह्यांची गोष्ट तशी नाहीं. उपलब्ध झालेल्या माहितीवरून असें उघड दिसून येतें कीं, ह्या दोन्ही लोकांत लग्नसंबंधीं रीतरिवाज त्यांच्या जाति, पोटजाति, आणि पोटजातींचे पोटभेद* ह्या दर एकागणिक थोड्या फार अंशानें भिन्नच आहेत! आतां त्या सर्वांचें वर्णन कोठवर करावें! प्रस्तुत आकाराच्या ग्रंथांत तसें होणें शक्य नाहीं. तथापि, स्थूलमानानें पाहिलें असतां, सर्व गुर्जर हिंदूंच्या लग्नांत पल्लापहेरामणीचे ठराव, विवाह, मुहूर्तनिश्चय, वरघोडा, हस्तमेळाप, कन्यादान, होमहवन, सप्तपदी किंवा मंगलफेरे, आणि ज्ञातिभोजनें हीं कृत्यें मुख्य होत; आणि मुसलमानांमध्यें मंगनी, फातिहाचें पठन, शादीचा दिवस मुकरर करणें, मेहेर बांधणें, बरी, मंगलस्नान व नमाज, सबगस्त, वधूवरांची औपचारिक संमति घेणें, कुराणांतील कलमांचें पठन, शादी, व तिजसंबंधीं नोंद आणि मेजवान्या हीं कृत्यें मुख्य होत. ह्या सर्वांचीं वर्णनें मागें आलींच आहेत. त्यांवरून वाचकांस वरील दोन्ही लोकांच्या लग्नरीतींची सामान्य कल्पना करितां येईल. आतां जातिभेदागणिक जे कमजास्त रिवाज असतील, त्यांच्या संबंधानें स्थलसंकोचास्तव निरुपायानें मौन स्वीकारून आम्ही **काठेवाडां**तील लोकांच्या लग्नांकडे वळतों.

गुजरातेंतील भिन्न लोकांच्या लग्नरीतींचें पर्यालोचन.

---

* गुर्जर हिंदूंचे हे भेद तर, केवळ 'गुणकर्मविभागशः 'च झालेले नसून स्थलपरत्वेंही झालेले आहेत! उदाहरणार्थ नुसते नागर ब्राह्मणच पहा!

भाटिया लोकांचा लग्नविधि.

वसतिस्थान.

ह्या लोकांची वसती **काठेवाडांत गायकवाडी** अमलाखालीं जो **उखामंडळ** महाल आहे त्यांत, आणि विशेषेंकरून पोटमहाल **बेट शंखोद्धार** येथें आहे. तथापि ह्या जातीचे पुष्कळ लोक **कच्छ** संस्थानापैकीं **मांडवी** वगैरे शहरांतून रहात असून ते मोठे धनाढ्य आणि प्रख्यात आहेत, व गायकवाडी अमलांतील तज्ज्ञातीच्या लोकांशीं त्यांचे सोयरीक संबंध आहेत.

वर्ण.

हे लोक आपणांस क्षत्रिय वर्णाचे ह्मणवितात.

विवाहविधीचे ग्रंथाधार, विवाहकाल, वगैरे.

ह्यांचे विवाह शुक्ल यजुर्वेदीय माध्यंदिन शाखेच्या ब्राह्मणांप्रमाणेंच होतात. त्यांत जे शास्त्रोक्त विधि आहेत, ते 'संस्कारभास्कर,' 'विवाहकौस्तुभ,' व 'लज्जाशंकरी' वगैरे ग्रंथांच्या आधारें करण्यांत येतात. वराच्या किंवा त्याच्या मातुलाच्या गोत्रांतील कन्येशीं लग्न होऊं शकत नाहीं. लग्नांत सामान्यतः वधूवरांचीं वयें अनुक्रमें बारा व वीस वर्षांचीं असतात. अलीकडील सुधारलेल्या लोकांच्या मताप्रमाणें पाहूं जातां ह्या लोकांतील विवाहकाल योग्य वाटतो. ह्यांच्यांत लग्नापूर्वीं कित्येक वर्षें वाङ्निश्चय करण्यांत येतो. त्यास 'सगपण' अथवा 'बेसवाल' असें ह्मणतात. हा विधि झाल्यानें ह्या लोकांस मुलामुलींचे बालविवाह करण्याचें प्रयोजन रहात नाहीं, व त्यामुळें पुनर्विवाह करण्याचा

प्रसंग फार क्वचितच येतो. पुनर्विवाह शास्त्रसंमत नसल्यानें तो करण्याला वस्तुतः जातीची मनाई आहे. तत्रापि, ब्राह्मणांप्रमाणें ह्यांच्यांतही कोठें कोठें पुनर्विवाह लाविल्याचें ऐकण्यांत येतें.

मुली मिळण्यासाठीं खर्च, व त्याचें कारण.

ह्या लोकांत मुलींची उत्पत्ति थोडी असल्यानें त्या मिळण्यास अडचण पडते; व त्यांच्यासाठीं बरेच पैसे खर्च करावे लागतात. हे लोक बुद्धिमान् व व्यापाराच्या कामांत साहसी आहेत. त्यांच्या आयुष्याचा बराच काल परदेशीं व्यापार करण्यामध्यें जातो, व ह्या गोष्टीचा प्रजोत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत असावा असें वाटतें.

तिथिनिश्चयांतील कृत्यें.

तिथिनिश्चयः—हा कन्यापित्याच्या घरीं करण्यांत येतो. त्यासाठीं एखाद्या विद्वान् ज्योतिष्याला बोलावून वधूवरांसंबंधीं आवश्यक माहिती त्यास सांगतात; व तो त्यांच्या ग्रहानुरोधानें त्यांस अनुकूल अशी लग्नवेळा व इतर अंगकर्मांचे मुहूर्त काढून देतो. हे मुहूर्त लग्नपत्रिकेंत लिहून दिले जातात. ती पत्रिका तयार झाल्यावर कन्यापिता वरपित्याला व तत्पक्षीय इतर लोकांना बोलावणें पाठवितो. ती मंडळी वाजत गाजत मुलीच्या घरीं येते. नंतर जोशीबोवा सर्वासमक्ष पत्रिका वाचून दाखवितात. मग त्या पत्रिकेंत सुपाऱ्या, हळद, जोंधळे, दूर्वा, इत्यादि मंगलद्रव्यें रंगविलेल्या सुतानें गुंडाळून कुंकू लाविलेल्या श्रीफलासह मुलीचा बाप ती असल पत्रिका मुलाच्या बापास देतो, व तिची एक नक्कल आपल्यापाशीं ठेवितो.

जयगोपाळ विधिभेटींतील कृत्यें.

जयगोपाळ विधिभेटः—वर सांगितल्याप्रमाणें पत्रिका देण्याचा विधि झाल्यानंतर कन्येचा बाप वराच्या कुलदेवतेला, वरपित्याला, व तत्पक्षाच्या प्रत्येक इसमाला श्रीफलें व दोन दोन रुपये देतो. ह्यास ' जयगोपाळविधिभेट ' अशी संज्ञा आहे. लग्नपत्रिका तयार करणाऱ्या जोशीबोवांसही नारळ व दक्षिणा देण्यांत येते; व जमलेल्या इतर सर्व मनुष्यांस नुसते नारळ वांटितात. वरपक्षाची मंडळी

घरीं परत जातेवेळीं अंगणामध्यें उभयपक्ष एकमेकांच्या अंगावर मौजेखातर गुलाल टाकितात. वरपक्ष परगांवचा असून सदर प्रसंगीं हाजर नसला, तर लग्नपत्रिका व जयगोपाळविधिभेट उपाध्याया (गोर) सोबत वराच्या गांवीं पाठवावी लागते.

इच्छ, व त्यांतील कृत्यें.

इच्छ नांवाचा सोहळा:—वरपिता किंवा उपाध्याय लग्नपत्रिका व जयगोपाळविधिभेट वरगृहीं घेऊन आल्यानंतर वराला एका सुंदर आसनावर गव्हांच्या पिठाचें स्वस्तिक काढून त्यावर पूर्वाभिमुख बसवितात. नंतर सुवासिनी स्त्रिया त्याच्या कपाळीं तेलांत भिजविलेलें कुंकू व अक्षता ह्यांचा तिलक (चांदलो) करून त्याच्या हातीं ती लग्नपत्रिका, श्रीफळ, मिठाई, व एक रुपया देतात. ह्या सोहळ्यास **इच्छ** अशी संज्ञा आहे. इच्छच्या प्रसंगीं केलेला मंगलतिलक लग्नविधि समाप्त होईपर्यंत वराच्या कपाळीं कायम ठेवावा लागतो. मुलीची आई व इतर सुवासिनी स्त्रिया मुलीलाही इच्छ करितात. पूर्वोक्त रीतीनें तिला आसनावर बसवून कुंकमतिलक करून लग्नपत्रिकेची नकल व श्रीफल तिच्या ओंटींत घालितात, व मिठाई आणि रुपया हातीं देतात, म्हणजे मुलीचें इच्छ झालें.

लग्ननिमंत्रण.

ह्यानंतर उभय पक्षांकडून आपापल्या इष्टमित्रांस लग्नसमारंभाला येण्यासाठीं निमंत्रण केलें जातें. दूरदूरस्थ इष्टमित्रांना कुंकुमपत्रिका पाठविण्याची चाल आहे.

मेजवानी संबंधी रिवाज.

तिथिनिश्चयाच्या दिवशीं वधूच्या आणि वराच्या घरीं रात्रौ मेजवान्या होतात. ह्या मेजवान्यांत कोणत्याही पदार्थामध्यें साकर न वापरतां तिच्या ऐवजीं गूळ घालितात; आणि कढीसारखा उकळून तयार करण्याचा कोणताही पदार्थ करण्यांत येत नाहीं. या दिवसापासून मंडपस्थापना होईपर्यंत दररोज रात्रीं दोन्ही घरीं सुवासिनी स्त्रियांस मंगलगीतें गाण्यासाठीं बोलावितात. त्या बायका वाद्यांवर

सुस्वर गीतें गात असतात. प्रत्येक गाणारणीला एक रुपयापावेतों यथा-शक्ति कांहीं पैसे देण्याची चाल आहे.

चाक वधाववूं:—तिथिनिश्चय झाल्यानंतर उभयपक्षीं आपापलीं घरें दुरुस्त करून त्यांस रंगरोगण देऊन शोभिवंत करण्याचें काम सुरू होतें. दरम्यान एखादा सुमुहूर्त पाहून सुवासिनी स्त्रिया कुंभाराच्या येथें वाजत गाजत जाऊन त्याच्या चाकाची पूजा करितात; व त्यास नारळ, सुपारी, सात खारका, आणि सवातीन शेर मूग देऊन त्याजपासून चांगली माती व मृत्तिकापात्रें घेऊन येतात. ह्या कृत्याला ‘ चाक वधाववूं ’ अशी संज्ञा आहे.

चाक वधाववूं.

मंडपस्थापना—हा विधि दोन्हीकडे होतो. तथापि, कन्येकडे तो अगोदर करितात. त्यांतील बहुतेक कर्म ब्राह्मणांच्या चाली-प्रमाणें असतें. लौकिकी रीतीनें तयार केलेल्या लग्नमंडपांत सूर्यसंक्रांतीला अनुकूल अशा दिशेला एक खळगा करून त्याच्या जवळ शमीच्या वृक्षाची एक मेढ, व एक रंगित खांब ज्याला **माणेकस्तंभ** अशी संज्ञा असते, तो उभा करून ठेवितात. तसेच आम्रपल्लव आणि इतर सर्व पूजाद्रव्यें आणून ठेवितात. नंतर कन्यापिता आपल्या इष्ट-मित्रांसहवर्तमान गणपतिवरुणांची आणि त्या खळग्याची यथाविधि पूजा करितो. ती झाल्यावर पांच सगोत्र पुरुष, कन्या, व तिचा पिता इतकीं मिळून ती शमीची मेढ, व माणेकस्तंभ खळग्यांत उभा करितात. सदरहू खांबाजवळ खळग्यामध्येंच एका मृत्तिकापात्रांत दूध, दहीं, मध, जल, व गंधाक्षतपुष्प हीं द्रव्यें घालून तें पात्र ठेवितात. माणेकस्तंभासभोंवतीं रंगित सुतांत ओंविलेल्या आम्रपल्लवांची माला गुंडाळितात, आणि नंतर खळग्यांत माती लोटून तो पुरून टाकितात. मग पुरोहित त्या स्तंभाची पूजा करितो; व सुवासिनी स्त्रिया त्यास कुंकुमतिलक आणि अक्षता लावितात. ह्याप्रमाणें विधिविधानानें **स्तंभरोपण** चालू असतां मंगलवाद्यें वाजत असतात, व स्त्रिया मंडपांत बसून गाणीं गात असतात.

मंडपस्थापनें-तील कृत्यें.

कन्येचें मांगलिक, (पिठी)—वर 'इच्छ' म्हणून जो मांगलिक करण्याचा प्रकार सांगितला आहे, त्याचप्रमाणें सुवासिनी स्त्रिया मंडपस्थापनेनंतर वधूचें फिरून मांगलिक करितात. तें झाल्यावर पुरोहित तिच्या उजव्या हातांत एका रंगित सुतामध्यें 'मींढळ' नांवाचें फळ, मुरडशेंग, आणि हस्तिदंताची मुदी ह्या वस्तु ओंवून त्यांचें कंकण बांधितो; व तिच्या हातीं कण्हेरीची लहान काडी व चाकू रंगित सूत्रांत वेष्टन करून देतो. नंतर सुवासिनी तिच्या अंगास तेलांत कालविलेली हळद लावितात.

पिठी लावणें व कंकणबंधन.

कन्यापित्याच्या घरीं वर सांगितल्याप्रमाणें मंडपस्थापना झाल्यावर पुरोहित दुसरा एक माणेकस्तंभ व पूजाद्रव्यें घेऊन वरगृहीं जातो; व तेथें पूर्वोक्त रीतीनें मंडपस्थापना करितो. ती झाल्यावर सर्व मंडळीस श्रीफळें व खारका वांटण्यांत येतात.

वराकडील मंडपस्थापना.

ह्याप्रमाणें उभयपक्षांकडे मंडपस्थापना झाल्यावर लागलीच **ग्रहशांति स्वस्तिवाचन** आणि **वृद्धिश्राद्ध** (अथवा **नांदीश्राद्ध**) हे शास्त्रोक्त विधि करण्यांत येतात. त्यांचें वर्णन पूर्वी येऊन गेलेंच आहे. सबब, येथें त्याची पुनरुक्ति करणें नलगे.

ग्रहशांति वगैरे विधि.


विनवा:—मंडपस्थापना झाल्यादिवसापासून तों लग्न दिवसापावेतों उभयपक्षांच्या इष्टमित्र मंडळीस त्या त्या पक्षाच्या मंडपांत दररोज सांजसकाळीं मेजवान्या देण्यांत येतात. ह्या मेजवान्यांस 'विनवा' अशी संज्ञा आहे. तसेंच कन्यापक्षाच्या सुवासिनी प्रत्यहीं सकाळीं वाजत गाजत वरगृहीं जाऊन वरास दूध पाजून येतात.

विनवा—मेजवानी.

गोत्रदेवतास्थापन—स्तंभरोपणाच्या दिवशीं रात्रौ वधूवरांच्या घरीं त्यांचे पुरोहित ओसरीच्या भिंतीला गोमयाच्या पांच चांदक्या (गोवऱ्या) लावून त्यांवर सरक्या आणि सात प्रकारचीं धान्यें चिकटवितात. नंतर त्याच्या आजूबाजूला कुंकवाचीं

गोत्रदेवतास्थापनेचा प्रकार.

स्वस्तिकें (साथिया) काढितात; व खालच्या बाजूस कुंकवाचे ठिपके एका पासून तों कोनाकृतीनें सातांच्या हारीपर्यंत देतात. सर्व ठिपक्यांची संख्या अठ्ठावीस असते; आणि ह्या सर्वांस **गोत्रदेवता** असें ह्मणतात. विशेष स्पष्टीकरणासाठीं त्यांची आकृति खालीं दिली आहे, तीवरून वाचकांच्या सहज ध्यानांत येईल:—



ह्याप्रमाणें गोत्रदेवतांची आकृति तयार झाल्यावर तिच्या मध्यभागीं भिंतींत एक चूक ठोकून तिला रंगित दोऱ्यानें वेष्टिलेली एक खारीक लटकती बांधितात. नंतर वधूवरांचे पिते आपापल्या घरीं ह्या गोत्रदेवतांची यथाविधि पूजा करितात, आणि गोत्रदेवतांवर चिकटविण्यासाठीं जीं सात प्रकारचीं धान्यें आणलेलीं असतात, त्यांपैकीं देवतांस चिकटवून बाकी उरलेलीं सातही प्रकारचीं धान्यें रंगित सूत्रानें वेष्टन केलेल्या एका खलबत्त्यांत घालून सात सुवासिनी मंगलगीतें गात गात कांडितात, व नंतर तो खलबत्त्ता तसाच गोत्रदेवतांजवळ लग्नविधि समाप्त होईपर्यंत ठेवितात.

इच्छनी माटली:—वधूवरांच्या घरीं कुंभार कच्च्या मातीचीं दोन मोठालीं पात्रें, व पांच लहान लहान बोळकीं देतो. त्यांवर कुंकवाचीं स्वस्तिकें काढून तीं पात्रें गोत्रदेवतांजवळ ठेवून त्यांची देवतांबरोबर पूजा करण्यांत येते. ह्या मृत्तिकापात्रांस ' इच्छनी माटली ' अशी संज्ञा आहे.

इच्छनी माटली (मृत्तिका पात्र.)

रक्षाबंधन:—वरील कृत्यें आटोपल्यानंतर, वधूवरांना नजर लागूं नये ह्मणून उपाध्याय त्या उभयतांस रक्षाबंधन करितात. तें असें कीं, तांबड्या अगर काळ्या लोंकरीच्या फडक्यांत गांवच्या चवाठ्यावरील थोडीशी धूळ, लोखंडाचा कीस, सर्षप (पांढऱ्या मोहऱ्या) आणि मारुतीवरील शेंदूर इतक्या वस्तु घालून त्यांची एक लहान पुरचुंडी करून ती वधूवरांच्या उजव्या हातांत बांधितात.

रक्षाबंधनाचा प्रकार.

लग्नपूर्वदिनकृत्यें. (जुबो–टीको):—लग्नाच्या आदले दिवशीं रात्रीं वराकडील सुवासिनी स्त्रिया कन्येचा पोषाक व दागिने घेऊन वाजत गाजत तिच्या येथें जातात. पोषाकांत रेशमी जरतारी साडी, व चोळी हीं दोन वस्त्रें असतात. दागिने म्हटले ह्मणजे एक चांदीची आंगठी,—जिला 'खिरोलानी वींटी' असें म्हणतात ती,— हस्तिदंताचे दोन चुडे, व नथ ह्मणजे 'वींदडी' इतके जिन्नस असतात. शिवाय ज्याच्या त्याच्या शक्तीप्रमाणें आणखीही नानाप्रकारचीं भूषणें असतात. पण वरील जिन्नस मात्र असलेच पाहिजेत. पोषाक व दागिन्यांखेरीज खडीसाकर, पिठीसाकर, द्राक्षें, बदाम, इत्यादि मेवा, हिंगूळ, चांदला (मुलीला देण्याचें कांहीं नाणें), सुगंधी पदार्थांचा पुडा वगैरे जिन्नस असतात. हा नजराणा घेऊन वरपक्षाच्या स्त्रिया वधूच्या मांडवांत आल्यावर कन्येला ' इच्छ ' सारखेंच मांगलीक करून वरील नजराणा देतात; व तो देतांना मंगलगीतें गातात. नंतर कन्यापक्षाच्या सुवासिनी त्या सर्वांस श्रीफळें, व संबंध असेल त्याप्रमाणें दर एकीला दोन दोन रुपयेपावेतों यथाशक्ति कांहीं नाणें

जुबो–टीको–अलंकार परिधान व मांगलिक.

देतात. हा जुबो-टीको नांवाचा सोहळा फक्त स्त्रियांतच होतो. त्यांत कोणत्याही पक्षाच्या पुरुषास हाजर राहण्याचें कारण नसतें.

मत्नुं सोहळ्याचें वर्णन.

मत्नुं-काची पाकी माटलीयोः—वरील सोहळा उरकून वरपक्षाच्या स्त्रिया वरगृहीं परत गेल्यावर कन्येकडील स्त्रिया एका काथ्याच्या शिंक्यांत (?) सात पापड किंवा कांहीं एखादें पक्वान्न ठेवून तें शिंकें आपल्या गोत्रदेवतांजवळ भिंतीस ठोकलेल्या खिळ्यास अडकवितात. नंतर दोन लहान लहान मृत्तिकापात्रें घेऊन त्यांत दहीं व दूध भरून वर गुलाल छाटितात; व तीं पात्रें, आणि लाडू किंवा शिरा घातलेलें एक ताट, (ह्या ताटांतील पक्वान्नावरही गुलाल छाटून त्यांत एक चिमुकली ध्वजा रोंविण्याची चाल आहे.) घेऊन वाजत गाजत व गीतें गात वरगृहीं जातात; आणि त्यांच्या गोत्रदेवतांपुढें त्य वस्तु ठेवितात. तसेंच त्यांबरोबर एक मण खजूर, साकरेचें एक पोतें, व सात नारळ ठेवितात. ह्या पदार्थांतील अर्धा भाग वरपित्याचा, आणि बाकीच्या अर्ध्या भागाचा निमे हिस्सा वराच्या आईच्या बापाचा, आणि निमे हिस्सा वराच्या बापाच्या बापाचा असतो. हा नजराणा क्षात्र धर्माप्रमाणें केलेल्या मृगयेचा द्योतक आहे, असें भाटिये लोक ह्मणतात.

छकीः—वरील सोहळ्यानंतर 'छकी' ह्मणून एक लोकाचार आहे, तो करितात. त्यासाठीं कन्येचा बाप एक मेणा आणवून त्यांत कन्येला बसवितो; आणि आपल्या पक्षाचीं स्त्रीपुरुषें, ती कन्या, एक दुधाचें भांडें, आणि आम्रपल्लव अशा साहित्यानिशीं वाजत गाजत वरगृहीं जातो. रस्त्यांतून मिरवतांना स्त्रिया मंगलगीतें गातात. वरगृहीं वरपिता आपल्या इष्टमित्रांसह कन्यापक्षाच्या लोकांची मार्गप्रतीक्षा करीत मंडपामध्यें बसलेला असतो. त्यानें आपल्याजवळ रुपयांनीं भरलेली एक थैली ठेविलेली असते. वधूवराच्या मंडपांत आल्यावर आपल्या मेण्यांतून उतरते, आणि वरपित्याजवळ जाऊन त्याजवर आम्रपल्लवांनीं थोडेसें दूध शिंपडिते. मग तो आपल्यापाशीं असलेली रुपयांची थैली तिला दाखवितो. तींतून ती एक रुपया उचलून घेऊन

परत आपल्या मेण्यांत जाऊन बसते, व घरीं जावयास निघते. तिचा मेणा दरवाजाबाहेर जातांच वरमाता पुढें होऊन तिला त्या ठिकाणीं मेण्यांतून पुन्हां खालीं उतरविते; आणि उपाध्यायांकडून तिला समंत्रक प्रोक्षण करवून आपण तिजवर अक्षत टाकिते. नंतर ती वधू फिरून मेण्यांत बसते व तिच्या पक्षाची मंडळी तिला घेऊन वाजत गाजत परत घरीं जातात. लग्नाच्या पूर्वी वधूनें वरगृहीं येण्याची चाल जशी ह्या लोकांत आहे, तशी ब्राह्मणलोकांत नाहीं. त्यांच्यामध्यें वधूप्रवेशासाठीं स्वतंत्र मुहूर्त लागत असतो, आणि वधूप्रवेश हमेषा लग्नानंतर करितात. सबब, येथें भाटिये लोकांच्या लग्नविधींत विसंगतपणा दिसून येतो. असो.

दिख अथवा वाग्दानविधि.

दिख अथवा वाग्दान:—छकीचा सोहळा झाल्यानंतर अगाऊ निश्चित करून ठेविलेल्या सुमुहूर्तावर '**दिख**' ह्मणजे वाग्दानाचा विधि करण्यांत येतो. त्यासाठीं नवरामुलगा वस्त्रालंकार परिधान करून घोड्यावर बसून आपल्या पक्षाच्या स्त्रीपुरुषांसह वाद्यघोषपूर्वक मिरवत मिरवत कन्येच्या घरीं जातो. तो दरवाजापाशीं येतांच कन्येची आई त्याचा सत्कार करिते, व उपाध्यायांकडून त्याचें समंत्रक प्रोक्षण करविते. नंतर तो ओसरीवरील गोत्रदेवतांजवळ जाऊन बसतो. वाग्दानाचा मुहूर्त टळूं नये, ह्मणून त्या विधीसाठीं लागणारी सर्व तयारी पूर्वीपासून करून ठेविलेली असते. इष्टकाल प्राप्त होतांच कन्येला आणून वराच्या उजव्या बाजूस बसवितात; व त्या उभयतांच्या वस्त्रांच्या पदरांस गांठ मारितात. नंतर पुरोहित कन्येच्या डोकीस 'छापेली घाटडी' ह्मणून एक वस्त्र (?) गुंडाळितात. ह्या घाटडीवर आणि वराच्या पागोट्यावर 'शिंदरी' नांवाच्या झाडाची एकेक डहाळी लग्नाचा तुरा ह्मणून खोंवितात. तसेंच उभयतांच्या हातांत पूर्वी बांधिलेल्या कंकणांशेजारींच आणखी एकेक मींढळाचें कंकण बांधितात. तदनंतर श्री गणपति, वरुण, मातृका, गृहगोत्र (गोत्रदेवता ?) वगैरेंची पंचोपचार पूजा होते. ही पूजा वधू, तिचीं मातापितरें, आणि वर, इतक्यांच्या हस्तें

पुरोहित करवितात. ती झाल्यावर वधूचीं मातापितरें वधूवरांची पूजा करितात; व कन्यापिता कन्येचें शास्त्रोक्तविधीनें वाग्दान करितो. तें आटोपल्यावर वधूवरांच्या मांडीवरून एक वस्त्र घालितात. त्या वस्त्राखाल्दन वर वधूच्या हातीं पानसुपारी, खारीक, लवंगावेलदोडे, आणि यथाशक्ति कांहीं द्रव्य गुप्त रीतीनें देतो. हा प्रकार झाल्यावर जमलेल्या सर्व मंडळीस पानसुपारी, नारळ, वगैरे वांटून शिरस्त्याप्रमाणें त्यांचा सत्कार करण्यांत येतो; आणि वरपक्षाच्या कांहीं विशिष्ट व्यक्तींस मागें जयगोपाळविधिभेटीच्या कलमांत सांगितल्याप्रमाणें कांहीं रोकड रुपयेही वांटितात. नंतर वधूवरांच्या डोकींचे तुरे, व हातांतील कंकणें काढून घेऊन तीं गोत्रदेवतांजवळ ठेवितात; आणि वरपक्षाची सर्व मंडळी वरासुद्धां आपल्या घरीं वाजत गाजत परत जाते. हा वाग्दानविधि व सोहळा रात्रौ होतो, व तो आटोपतां आटोपतां सर्व रात्र संपून दिवस उजेडण्याची वेळ येते! 'गृह्यसूत्र'कारांनीं वाग्दानाच्या प्रसंगीं वरानेंही आपल्या मंडळीसमागमें वधूगृहीं जावें, असें पर्यायानें सांगितलें आहे; व त्याचा वास्तविक उद्देश वराला कन्येचें निरीक्षण करितां यावें, असाच आहे. भाटिये लोकांनीं त्या पर्यायाचा फायदा घेतलेला दिसतो. तथापि, वाग्दानांत जे कांहीं सोहळ्यांचे प्रकार घुसडिले आहेत, ते निरर्थक होत. वाग्दानाशीं त्यांचा वस्तुतः कांहीं देखील संबंध नसून ते त्यांत उगाच कालक्षेप करण्यास मात्र कारणीभूत होतात! असो.

विवाहदिनकृत्यें.

विवाहदिन—विवाहाच्या दिवशीं दुपारीं कन्यापक्षाच्या सुवासिनी स्त्रिया सुवासिक तैलादि अभ्यंगसाहित्य घेऊन वाजतगाजत आणि मंगलगीतें गात वरगृहीं जातात. तेथें गेल्यावर त्या गोत्रदेवतांजवळ एक तांब्याचें काथवट अथवा परात ठेवून त्यांत एक पाट मांडितात; आणि त्या पाटावर नवरदेवास बसवून त्यास अभ्यंगस्नान घालितात. तें झाल्यानंतर नवरा पाटावर तसाच ओल्या वस्त्रानिशी उभा राहून आपल्या उजव्या हाताचा आंगठा उजव्या कानावर ठेवितो. नंतर कन्येची आई जांवयाच्या उजव्या पायाचा आंगठा,

आणि त्यानें कानावर ठेविलेला उजव्या हाताचा आंगठा, ह्या सभोंवतीं कच्च्या सुताचे तीनशेंसाठ वेढे घेऊन तें सूत काढून घेते, आणि त्याची एक माळ करून ती नवरदेवाच्या गळ्यांत घालिते! नवरा तीच माळ आपल्या गळ्यांतून काढून सासूच्या गळ्यांत घालितो! व सासूबाई ती माळ विवाहविधि पुरा होईपर्यंत आपल्या गळ्यांत ठेवितात. हें झाल्यानंतर वरास कोरडीं वस्त्रें परिधान करवून त्याला वर सांगितलेल्या 'इच्छ'प्रमाणेंच मांगलिक करितात, व दूध पाजितात. मग त्या स्त्रिया परत आपल्या घरीं येऊन कन्येला मंगलस्नान घालितात; आणि पांढरीं वस्त्रें व हस्तिदंती पांढरे चुडे घालून विवाहासाठीं तयार करून बसवितात. हा वधूवरांचा मंगलस्नानसमारंभ वर 'जुबो-टीको'विषयीं सांगितल्याप्रमाणें केवळ स्त्रीजनांमध्येंच होतो; व त्यांत कन्यापक्षाच्या स्त्रियांस वराच्या आनखशिखान्त शरीराचें सम्यक् निरीक्षण करण्यास सांपडतें.

वरप्रस्थान (वरघोडा.)

वरप्रस्थान—तदनंतर लग्नमुहूर्त बरोबर साधेल अशा बेतानें नवऱ्यामुलास वस्त्रालंकार परिधान करवून व त्याच्या हातीं वर सांगितलेली लग्नपत्रिकेची पुरचुंडी व कुंकुमचर्चित श्रीफळ देऊन त्यास घोड्यावर बसवितात; आणि वरपक्षाचीं सर्व स्त्रीपुरुषें वाद्यघोषपूर्वक मोठ्या थाटानें मिरवत मिरवत, व स्त्रीजनांचीं मंगलगीतें ऐकत ऐकत, कन्यापित्याच्या घरीं लग्नासाठीं येतात. नवरामुलगा दरवाजापाशीं येतांच कन्येची आई, मागें वाग्दानाच्या वेळीं सांगितल्याप्रमाणेंच त्याचा सत्कार करिते; व पुरोहिताकरवीं त्यास मंत्रोक्त प्रोक्षण करवून मंडपांत आणिते; आणि 'चोरी' मध्यें (बहुल्यावर) बसविते. मग तेथें श्रीगणपतिवरुणांची पूजा व नवऱ्यामुलाची मधुपर्कपूजा करितात. ती झाल्यावर वरघोड्यासमागमें आलेल्या बहुजनसमाजास नारळ व पानसुपारी वांटतात, ह्मणजे ते आपापल्या घरीं परत जातात. लग्नविधीकरितां वरपक्षाचे सोयरेधायरे व इष्टमित्र ह्यानांच फक्त–त्यांची मर्जी असल्यास–ठेवून घेण्यांत येतें. लग्नाकरितां बोलाविलेल्या मंडळींना लग्न लागण्यापूर्वीच बिदा

करण्याचा हा प्रकार कांहींसा चमत्कारिक दिसतो! अशी चाल अन्यत्र कोठें व कोणत्याच लोकांत आढळत नाहीं.

विवाह.

विवाहः—इष्टकाल प्राप्त होतांच वरास गोत्रदेवतांजवळ आणून बसवितात. कन्येचीं मातापितरें कन्येला घेऊन येऊन वराच्या उजव्या बाजूस बसवितात; व त्या उभयतांची पूजा करितात. नंतर आरंभीं निर्दिष्ट केलेल्या ग्रंथाधारें यथाविधि **कन्यादान** करण्यांत येतें.

मायरोचा सोहळा.

मायरोः—त्यानंतर वधूवरांस कांहीं आराम घेण्यासाठीं मंडपांत बसवितात. तेथें त्यांस वर सांगितल्याप्रमाणें वस्त्राखालून गुप्त रीतीनें पानसुपारी व यथाशक्ति द्रव्य देण्याची चाल आहे. त्यास 'मायरो' असें ह्मणतात. पुढें कांहीं वेळानें **लाजाहोम, सप्तपदी,** वगैरे बाकीचे विधि 'पाकी चोरी' (बहुल्या—) वर करून लग्नाची परिसमाप्ति करण्यांत येते. त्यानंतर प्रत्येक धर्मकृत्यामध्यें वधूला रीतीप्रमाणें वराच्या डाव्या बाजूस बसवितात.

पउरा, पोषाक व वधूप्रवेश.

पउरा पोषाक आणि वधूप्रवेशः—सर्व लग्नविधि पूर्ण झाल्यावर वधूला उत्तम वस्त्रालंकार घालून तिचें 'इच्छ'-सारखें मांगलिक करून वधूवरांस गोत्रदेवतांच्या पायां पडवितात; व तेथें त्यांस कंसार खाऊं घालून त्यांच्याकडून एकमेकांचीं विवाहकंकणें सोडवितात; आणि नंतर त्या उभयतांस घेऊन दोन्ही पक्षांची मंडळी मोठया समारंभानें वाजत गाजत, व मंगलगीतें गात वरगृहीं जातात. तेथें गेल्यावर उभयतां वधूवरांकडून गोत्रदेवतांस आणि वडिलांस नमस्कार करवितात, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

वाघेर लोकांचा लग्नविधि.

वाघेर लोकांविषयीं संक्षिप्त माहिती.

काठेवाडांत **गायकवाडी** अमलाखालीं जो **उखामंडळ** महाल आहे, तो ह्या **वाघेर** लोकांचें मूल उत्पत्तिस्थान होय. हे लोक आपणांस क्षत्रिय वर्णाचे समजतात. त्यांच्या जातींत सोमवंशी, यादववंशी, आणि जाडेजा रजपूत, असे तीन पोटभेद आहेत. हे वाघेर धनुर्विद्येंत फार निष्णात असून एके कालीं उन्नतावस्थेंत होते. परंतु, हल्लीं त्यांची अवनति आहे. त्यांचा मोठा वर्ग अक्षरशून्य असून त्यावर क्षत्रिय वर्णास शोभणारे आचारविचारादि कांहींच संस्कार दिसून येत नाहींत. तथापि, विस्तव कोजळून गेला तरी त्याची धग जशी अवशिष्ट रहावी, तसें ह्या लोकांतील तेज आजमित्तीस नष्ट झालें असतांही त्यांचा कडवा स्वभाव अद्यापि कायम आहे. बादशाही अमलांत रजपूत आणि मुसलमान ह्यांच्यांत शरीरसंबंध करण्याचा प्रघात सुरू झाला; व त्या प्रघातानें ह्या लोकांच्या कित्येक निर्मल कुलांस ग्रहण लाविलें. तो रिवाज थोड्या बहुत प्रमाणानें अझूनही ह्यांच्यांत चालू आहे. तथापि, कांहीं कुटुंबें आजमित्तीपावेतों निष्कलंक राहिलीं आहेत असें ह्मणतात; आणि वरील रिवाज जरी अद्यापि अस्तित्वांत असला, तरी तो बहुमतानें नापसंत समजला जातो.

वाघेर लोकांच्या उपाध्यायांविषयीं दोन शब्द.

ह्या वाघेर लोकांच्या उपाध्यायांस **'राजगोर'** अथवा **'राजगर ब्राह्मण'** असें ह्मणतात. हे ब्राह्मण निरक्षर असून त्यांची गृहस्थिति व आचारविचार ब्राह्मण वर्णाला शोभण्याजोगे नाहींत. ते कळाहीन दिसतात. ब्राह्मणेतर वाघेरांशीं त्यांचा अन्न-

व्यवहार होतो. सारांश, त्यांच्यांत ब्राह्मण ह्मणविण्याजोगें कांहींच लक्षण दिसत नाहीं. त्यामुळें लग्नविधि यथाशास्त्र चालविण्यासाठीं केव्हां केव्हां दुसऱ्या चांगल्या ब्राह्मणांस बोलावून आणावें लागतें! तथापि, कालमानानें ज्याप्रमाणें धर्मश्रद्धेचा अन्य जातींत लोप झाला आहे, तसा तो वाघेरांतही आहेच. सबब, पुष्कळ कुटुंबांत लग्नें, हीं ब्राह्मणांवांचून व कांहीं एक धर्मसंस्कार केल्यावांचून, घरांतील वृद्ध स्त्रीपुरुषांकडून केवळ रूढीप्रमाणें लावण्यांत येतात असें समजतें. लग्नविधि सांगण्याला यदाकदाचित् ब्राह्मण बोलाविलाच तर तोही केवळ पुराणोक्त आणि आचारोक्त रीतीनें विधि सांगतो. वेदमंत्रांचें पठन मुळींच होत नाहीं.

वाक्दान अथवा सगपण.

वाक्दानाला, ' सगपण ' अशी संज्ञा आहे. हें सगपण कन्येच्या बाळपणींच होतें. त्याचा विधि केवळ तांत्रिक असतो. ह्मणजे त्यांतील बहुतेक भाग रूढीचाच आहे. वर पसंत करावयाचा, तो कन्यापित्याच्या कुटुंबाशिवाय इतर कोणत्याही कुटुंबांतील असावा, एवढा मात्र निर्बंध आहे. तथापि, मामेबहिणीबरोबर सगपण करण्यास हरकत मानीत नाहींत. सगपण करण्यास वर शिवायकरून तत्पक्षाचीं स्त्रीपुरुषें कन्यापित्याच्या घरीं मिरवत जातात. मिरवणुकींत वाद्यवादन व सुवासिनींचें मंगल गायन होत असतें. कन्येच्या घरीं गेल्यावर तिला पाटावर बसवून ब्राह्मण कुंकमतिलक आणि अक्षत लावितो. नंतर वरपक्षाच्या सुवासिनी तिला यथाशक्ति वस्त्रालंकार, श्रीफळ, आणि सौभाग्यपुडा देतात. ह्या पुड्यांत कुंकूं, खडीसाकर, साकर, सुपारी, व लवंगावेलदोडे इत्यादि वस्तूंचा समावेश होतो. कन्यापित्याच्या हातीं सवारुपयाच्या किंमतीच्या पांच ' कोरी'* देण्याची चाल आहे. हें झाल्यावर नवऱ्यामुलाचा बाप जमलेल्या मंडळीस खडीसाकर, साकर, खजूर, व श्रीफळें वांटितो. मग कन्यापित्याकडून वरपक्षास जेवणावळ देण्यांत येते, ह्मणजे सगपणाचें कृत्य संपलें. पुढें वधू-

---

* कोरी हें चार आण्यांच्या किंमतीचें काठेवाडांत चालणारें एक नाणें आहे.

वरांचें लग्न होईपावेतों वरपक्षाकडून सणावारांच्या दिवशीं वधूला मिष्टान्न-भोजन व हिरडे वगैरे फळांची भेट देण्यांत येते. तसेंच कन्यापक्षाकडून वरास श्रीफळ, मेवामिठाई, व 'कोथळी' देण्याची चाल आहे. ह्या कोथळींत सुपारी, लवंगा, वेलदोडे, वगैरे वस्तूंचा समावेश होतो.

सगपणाचा परिणाम.

सगपणानें केलेला सोयरीक संबंध कायमचा मानिला जातो. त्यानंतर, आणि लग्न होण्यापूर्वी दुर्दैवानें जर भावी नवरा मरण पावला, तर ती कन्या त्याच वराच्या नातेवाईकांपैकीं कोणा-तरुण पुरुषास देण्यांत येते. अथवा ती अविवाहित रहाते! पण त्या कुळाशिवाय इतर पुरुषाशीं तिचें लग्न करण्याची चाल नाहीं. तसेंच लग्न झाल्यावरही त्याच चालीचें अवलंबन करितात. पुनर्विवाह होत नाहींत.

विवाहकाल.

वराचें वय वीस वर्षांवर, आणि वधूचें बारा वर्षांवर झालें, ह्मणजे तीं विवाहाला योग्य मानिलीं जातात. मग खालीं लिहिल्याप्रमाणें सुमुहूर्तावर त्यांचें लग्न करण्यांत येतें.

लग्नतिथिनिश्चय.

लग्नतिथि ठरविण्यासाठीं कन्येचा बाप आपल्या इष्टमित्रांपैकीं प्रौढ मनुष्यांस बरोबर घेऊन जोशीबोवांकडे अथवा कोणी पंचांग जाणणारा भिक्षुक ब्राह्मण असेल त्याकडे जातो. अगाऊ मिळालेल्या सूचनेवरून त्या ठिकाणीं वरपिताही आपल्या इष्टमित्रांस घेऊन येतो. ब्राह्मणानें सुमुहूर्त पाहून मुकरर केला, ह्मणजे त्याकडून लग्नपत्रिका तयार करवितात; व तिच्यांतील मुहूर्त वगैरेची माहिती सर्वत्रांस देतात. नंतर कन्यापिता ती पत्रिका व श्रीफळ ब्राह्मणासोबत वराच्या घरीं पाठवितो, व आपल्या स्मरणार्थ ब्राह्मणाजवळ तिचें टांचण करून ठेववितो. वराच्या घरीं ब्राह्मण लग्नपत्रिका घेऊन गेला, ह्मणजे वरमाता त्यास पाटावर बसविते; व ती आणि घरांतील इतर सुवासिनी स्त्रिया त्या ब्राह्मणाची व लग्नपत्रिकेची कुंकुमाक्षतांनीं पूजा करितात. मग तो ब्राह्मण श्रीफळासहित

पत्रिका वरमातेच्या हातीं देतो, व ती तो मंगल लेख शिरसा वंदन करून घरांत नेऊन ठेविते. नंतर ब्राह्मणास एक ' कोरी ' देऊन विदा करितात. ह्या कृत्यांतही केवळ रूढीचें अंग आहे. मंत्र नाहींत.

मंडपरोपण.

लग्नतिथीपूर्वी सुमारें चार दिवस, वधूवरांच्या घरीं अगाऊ लौकिकी रीतीनें तयार करून ठेविलेल्या मंडपांत मुहूर्तमेढ रोंवण्यांत येते; व त्या कृत्यास ' मंडपरोपण ' असें ह्मणतात. ज्या मुहूर्ताला जी दिशा अनुकूल असेल त्या दिशेस, अथवा घरांतून बाहेर येतांना उजव्या बाजूस, मंगलवाद्यें वाजत असतां एक खळगा करून त्यांत शमीच्या लांकडाचा खांब वेळूसहित उभा करितात. त्या स्तंभास आंब्याचे किंवा पिंपळाचे पल्लव सुतानें गुंडाळिलेले असतात. सदरहू खळग्यांत एक मातीचें बोळकें, दहीं, दूध, पाणी, हळद, कुंकूं, व पैसासुपारी टाकून नंतर तो पुरून टाकितात. ह्या स्तंभास ' **माणेकस्तंभ** ' अशी संज्ञा आहे. वधूवरांचीं मातापितरें त्या माणेकस्तंभाची पूजा करितात; व सुवासिनी स्त्रिया त्यास कुंकुमाचा तिलक आणि अक्षत वाहतात. मंडपरोपणाच्या प्रसंगींच वधूवरांच्या घरांतील सुवासिनी वाजत गाजत कुंभाराच्या घरीं जाऊन त्यानें केलेला मृण्मय ' **गणेश** ' घेऊन येतात; व त्याचीही माणेकस्तंभाबरोबर पूजा करण्यांत येते. मंडपरोपणाच्या दिवशीं दोन्हीकडील मांडवांत आपापल्या इष्टमित्रांस जेवणावळ देण्याची चाल आहे.

वरप्रस्थान मांगलिक व लग्न.

लग्नदिवशीं वरपिता वरास व इष्टमित्रजातिबांधवांस बरोबर घेऊन वाजत गाजत कन्येच्या घरीं जातो. वऱ्हाडी परगांवचे असल्यास त्यांचे स्वागत करण्यासाठीं कन्यापक्षाचीं स्त्रीपुरुषें वाजत गाजत गांवाच्या वेशीपर्यंत सामोरां जातात; व त्यांस आपल्या मंडपांत घेऊन येतात. ह्या कृत्यास ' **सामोरें** ' अशी अन्वर्थक संज्ञा आहे. नवरामुलगा मिरवत मिरवत वधूच्या मंडपद्वाराशीं आला, ह्मणजे नवरीची आई त्याचें पाण्यानें प्रोक्षण करून व त्याच्या

कपाळीं कुंकवाचा टिळा लावून मस्तकावर अक्षत टाकिते. लग्नमुहूर्त नजीक आला, ह्मणजे वरपक्षाच्या सुवासिनी मंगलवाद्यें वाजत असतां कन्येच्या घरांत जाऊन तिला यथाशक्ति मौल्यवान् वस्त्राभरणें घालितात. नंतर वधूवरांचें लग्न लावण्यांत येतें. त्याचा प्रकार बहुतेक ब्राह्मणांच्या रिवाजाप्रमाणेंच आहे. फरक इतकाच कीं, वधूवरांस पाटांवर बसवून लग्न लावितात. तें लागल्यावर त्या उभतांच्या पदरांस गांठ देतात, व पाणिग्रहण ह्मणजे '**हस्तमेळाप**' करितांना वधूच्या उजव्या हातांत लग्नपत्रिका ठेवून नंतर त्यावर वराचा उजवा हात ठेवितात. उभयतांच्या गळ्यांत सुताच्या 'वरमाळा' घालण्याचा रिवाज आहे. ह्या सर्वांत, हातामध्यें लग्नपत्रिका ठेवून पाणिग्रहण करण्याची चाल फार पसंत व अनुकरणीय आहे. तिचा उद्देश स्पष्ट असल्यानें तो येथें निराळा सांगण्याची जरूर नाहीं. कन्यादानविधि पुराणोक्त मंत्रांशिवाय ब्राह्मणांप्रमाणेंच होतो.

द्वितीयदिन-कृत्यें व लग्नसमाप्ति.

लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं मंगलवाद्यें वाजत असतां ब्राह्मण वधूवरांकडून मंडपांत गणपतिवरुणपूजा, होम, व अग्निप्रदक्षिणा हीं कृत्यें करवितात. त्यांचें वर्णन अन्यत्र येऊन गेलें असल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करणें नलगे. मात्र ह्या लोकांत अग्निप्रदक्षिणा करवितेवेळीं मंगलाष्टकें ह्मणण्याची चाल विशेष आहे. हीं कृत्यें झाल्यावर कन्यापिता वरास आणि तत्पक्षीयांस यथाशक्ति पोषाक व देणगी देतो, ह्मणजे लग्नविधि संपला. ह्याच दिवशीं कन्यापिता उभयपक्षांच्या मंडळीस मेजवानी देतो, व नंतर वरपक्षाचे लोक कन्येस घेऊन वाजत गाजत आपल्या घरीं परत जातात.

सिंधी मुसलमानांची लग्नरीति.

ह्या लोकांत वाक्निश्चयाचा विधि मुलांच्या पंधराव्या वर्षी आणि मुलींच्या बाराव्या वर्षीं होतो. श्रीमंत लोकांत बालविवाह करण्याची चाल आहे. परंतु मुलींचीं लग्नें जितकीं लौकर होतील तितकीं चांगलीं, असा सर्वसाधारण समज आहे. वाग्निश्चयानंतर विवाह बऱ्याच कालानें होतो. वाक्निश्चय रूढीनें आवश्यक मानिला गेला आहे. लग्नकार्यांत आपल्या स्थितीप्रमाणें खर्च केला नाहीं, तर तो मनुष्य कृपण व दरिद्री आहे, अशी त्याची लोकांत चर्चा होते. ती न व्हावी ह्मणून लोक लग्नकार्यासाठीं कर्ज देखील काढितात! प्रथमविवाहालाच फार खर्च लागतो. दुसरें लग्न करण्याचा प्रसंग आल्यास त्या वेळीं येवढा खर्च करीत नाहींत. लग्नामध्यें जास्त खर्च करण्याची चाल, ही बहुतकरून लोकांच्या मनांत धर्माचें महत्व बिंबविण्याकरितां, व अनेक क्रिया करणें अयोग्य आहे असें दर्शविण्याकरितां पडली असावी असें ह्मणतात. वाग्निश्चयानंतर नवरा-नवरीची भेट न होऊं देण्याविषयीं सुज्ञ लोक खबरदारी ठेवितात. त्यांच्या नातलगांना मात्र एकमेकांस भेटण्याची मोकळीक आहे. परंतु केव्हां केव्हां गुप्त रीतीनें नवरानवरीही एकमेकांस भेटतात. वाग्निश्चयाचा समारंभ करण्याची रीति अशी आहे कीं, त्यासाठीं एखादा शुभ दिवस नेमण्यांत येतो. रमजान, रजीब, रवी व शाहाबान ह्या महिन्यांतील सोमवार,

वाग्निश्चयाचा विधि.

बुधवार, गुरुवार व शुक्रवार हे दिवस शुभ मानिले आहेत. ह्या कार्यासाठीं एखादा मध्यस्थ नेमितात. त्याला **वकील** अशी संज्ञा आहे.

ह्या वकील मुलीच्या घरीं जाऊन तिच्या बापास भेटतो, व त्याची बरीच निरर्थक प्रशंसा करून, व अनेक वचनें देऊन, शेवटीं त्यास आपला उद्देश सांगतो. पहिल्याच मागणीला रुकार देणें, हें सभ्यतेचें लक्षण नव्हे, अशी ह्या लोकांची समजूत आहे. सबब, वकीलाच्या पहिल्या विनंतीचा प्रतिकार केला जातो. त्यानंतर सुमारें एक महिन्यानें वकील पुनः येऊन मागणी करितो. ह्यावेळींही जर ती नाकबूल करण्यांत आली, तर वकीलास त्या स्थळासंबंधानें आशा सोडावी लागते. परंतु संशयात्मक उत्तर आलें, ह्मणजे मुलीच्या बापाच्या मनांतून ती गोष्ट करणें आहे, असें समजावयाचें. बहुतकरून तें उत्तर, "येवढ्यांतच तिच्या लग्नाची घाई करण्याचा विचार नाहीं. इतक्यावर देवाची मर्जी! त्याच्याच मनांतून असेल, तर कांहीं योगायोग चुकायचा नाहीं." अशा मासल्याचें असतें. तें वकीलानें मुलाच्या बापास कळविलें, ह्मणजे तो मघून मघून आपल्या वाडवडिलांसह किंवा मित्रमंडळीसह मुलीच्या घरीं जाऊन तिच्या बापास भेटतो. मुलीचे वडीलही मुलाच्या वडिलांस भेटतात. ह्या भेटींचा उद्देश त्या भावी वधूवरांचें कुलशील, शिक्षण, संवयी, व एकंदर चालचलणूक ह्याचें निरीक्षण करण्याचा असतो; व तो स्तुत्य आणि अनुकरणीय आहे. मुलामुलींची प्रत्यक्ष भेट मात्र होत नाहीं. ह्या भेटीच्या प्रसंगीं घरांतील पुरस्कर्त्याकडून वयस्क मनुष्यांस सभ्यतेनें वागण्याबद्दल सूचना होते; लहान मंडळीस त्याबद्दल बजावून सांगण्यांत येतें, व शेजाऱ्यापाजाऱ्यांस त्या कुटुंबांतील माणसांची तारीफ करण्याविषयीं सूचना केली जाते. अखेरीस उभयपक्षांचा एकमेकांशीं परिचय होऊन सोयरीक करण्याचा विचार ठरला, ह्मणजे मुलाचे वडील वाग्निश्चयाचा दिवस नेमितात. त्या दिवशीं नेमिलेल्या वेळीं मुलाकडील मंडळी मुलीकरितां वस्त्रें, कांहीं दागिने, व पांच सहा रुपयांची भिठाई घेऊन मोठ्या समारंभानें

वकीलाची वकीली.

तिच्या घरीं जातात. तेथें स्त्रीपुरुषांनां बसण्याकरितां निरनिराळ्या जागा तयार केलेल्या असतात; त्यांत वरपक्षाची आलेली मंडळी सत्कारपूर्वक बसविली गेल्यानंतर त्यांनीं आणिलेलीं वस्त्राभरणें मुलीच्या अंगावर घालून तिला स्त्रियांच्या मध्यभागीं बसवितात. मग मुलाकडील स्त्रियांसमागमें जी न्हाव्याची बाई आलेली असते, तिच्यापाशीं मुलीची आई एक दुधाचें भांडें देऊन तिला मुलाच्या बापाकडे पाठविते. तो तिजकडून सर्व मंडळींना तें दूध पिण्याविषयीं आग्रह करवितो. तसेंच, नेलेल्या मिठाईतूनही कांहीं भाग पुरुष मंडळीस वांटून बाकी राहील ती स्त्रियांकडे पाठवितो. तो अल्पाहार झाल्यावर सर्व पुरुष हात वर करून कुराणांतील ' **फातेहा** ' नांवाचा पहिला भाग आहे तो ह्मणतात. ह्या भागांत वस्तुत: मृत मनुष्यासंबंधानें ईश्वराची प्रार्थना, दानें, आणि अन्नशांति हीं प्रकरणें आहेत. असें असून तो भाग ह्या मंगल प्रसंगीं काय समजून पठन करण्यांत येतो तें कळत नाहीं. असो. फातेहाचें पठन झाल्यावर मुलीच्या बापास लग्नकाल निश्चित करण्याविषयीं सांगतात. तो त्यानें मुकरर केला, ह्मणजे सर्व मंडळी उठून आपापल्या घरीं जातात. ह्या समारंभ झाल्यावर सोयरीक मोडणें, हें असभ्यतेचें व नीचपणाचें वर्तन मानिलें जातें. कदाचित् मुलाचा बाप ती सोयरीक मोडूं शकतो. पण मुलीच्या बापानें तसें केल्यास त्यावर निंदापर कविता रचून त्या ठिकठिकाणीं गातात. श्रीमंत लोकांत ह्या प्रसंगीं सतत सात आठ दिवसपर्यंत नाच, बैठका, व मेजवान्या चालू असतात; आणि अशा रीतीनें विनाकारण पुष्कळ खर्च करण्यांत येतो.

वाग्निश्चय व लग्नदिवस ठरविणें.

वाग्निश्चयानंतर आणि विवाहाच्या पूर्वी मुलाचे वडील व इष्टमित्र सणावारांच्या दिवशीं मुलीकडे वस्त्रें, भूषणें व मिठाई पाठवितात. किंवा तिच्यासाठीं इतरांनीं कांहीं पाठविल्यास त्याचा स्वीकार करितात. लग्नाच्या पूर्वी सुमारें एक महिना नवरीला नानाप्रकारचे शृंगारिक उपचार करण्याची चाल

वाग्निश्चया नंतरचीं कांहीं कृत्यें.

आहे. त्यासाठीं मुलाकडील मंडळी मिठाई, लोणी, सुगंधी तेल, अत्तर व बुरखा ह्या वस्तु घेऊन जातात. ह्यावेळीं मुलीचें तोंड पाहण्याची मनाई असते. मुलीला बुरखा दिल्यानंतर लग्न होईपर्यंत तिला कारागृहाप्रमाणें घरांत कोंडून राहावें लागतें. वराकडून आलेली मिठाई व लोणी तिला खावयास देतात. त्यापासून अंग नरम होऊन वर्णीतही सुधारणा होते, अशी ह्या लोकांची समजूत आहे. न्हाव्याची बाई रोज येऊन तिला तेलहळद आणि मागें सांगितलेली पिठी (पहा पान २८५.) लावून मंगल स्नान घालिते. तसेंच तिच्या अंगास कांहीं औषधें चोळून सर्व लव काढून टाकितात. मेहेंदी लावून हातपाय रंगवितात. ओंठ आक्रोडाच्या सालीनें रंगवितात, व डोळ्यांत काजळ घालून ते भुंग्यांसारखे शोभायमान करितात. केंसांस तेल लावून भांग पाडितात. सारांश, नानाप्रकारांनीं तिचीं अंगें शोभिवंत व मोहक करण्याचा प्रयत्न चाललेला असतो. लग्न होण्याला जितका अवधि असतो, तितक्या कालांत मुलीच्या माहेरीं बरीच मंडळी मेजवान्या घेऊन जाते. नवऱ्यामुलास लग्नाच्या अगाऊ तीन दिवस मंगलस्नानें घालून मौल्यवान् वस्त्रालंकारांनीं सजवितात, आणि इष्टमित्रांस नाच, बैठकी, व मेजवान्या देऊन त्यांचें आदरातिथ्य करितात.

वरील सोहळे झाल्यापासून तिसऱ्या दिवशीं लग्नविधीला सुरुवात होते.

लग्नरीति.

लग्नविधि बहुतकरून रात्रीं होतो. सूर्यास्त झाला, ह्मणजे लागलीच न्हावी मुलाच्या घरीं जाऊन त्याला मांगलिक स्नान घालून सासऱ्याकडून आलेलीं वस्त्रें परिधान करण्यास देतो. त्याचप्रमाणें न्हावीण मुलीकडे जाऊन तिला सासऱ्याच्या घरचीं आलेलीं वस्त्रभूषणें घालून सजविते. नंतर वधूवरांवरून पैसे ओंवाळून टाकण्याची चाल आहे. त्यांचीं जुनीं वस्त्रें न्हाव्यास मिळतात. पोषाक करण्याचें काम बहुतकरून मध्यरात्रींपर्यंत चालतें! तो करणें झाल्यावर मुलीचा बाप मुलाकडे असा निरोप पाठवितो कीं, 'नवरी नवऱ्याकडे यावयास तयार आहे.' निरोप गेल्यानंतर तो स्वतः

वराकडे जातो. तेथें आप्तस्वकीय, मुल्ला, व इतर मंडळी जमलेली असते. वधूवरांच्या पित्यांच्या मध्यभागीं मुल्लाजी बसतात. येथें वधूकडून तिच्या वतीचा कोणी मुखत्यार नेमून घेण्याचा एक उपचार आहे. त्यासाठीं दोन साक्षीदार वधूकडे पाठविण्यांत येतात. त्यांस वधूनें आपल्या पुरस्कर्त्या मुखत्याराचें नांव सांगावयाचें. पण त्या कृत्याला बराच वेळ लागतो. कारण, वधूला पुरुषांसमोर यावयाचें नसतें. सबब, कांहीं लज्जा, कांहीं बेदरकारी, व कांहीं विनाकरण आढेवेढे घेण्यांत ती पुष्कळ वेळ घालविते. अखेरीस मोठ्या मिनतवारीनें ती त्या कामीं आपल्या बापाची योजना करिते! ह्याप्रमाणें मुखत्यार नेमिला जातांच साक्षीदार तो निरोप घेऊन परत मुलाकडे येतात. नंतर मुल्लाजी वकीलांस असा प्रश्न करितात कीं, " तुह्मी आपली मुलगी व अबची नात, ही **आयते**चा मुलगा व **केएल**चा नातू **सीडी** याला देण्याला तयार आहांत काय? " त्यास वकील आपला रुकार देतात. अशीं प्रश्नोत्तरें तीन वेळां होतात. नंतर मुल्ला नवऱ्यामुलास विचारितो कीं, " तुह्मी **जी एच इफ**ची नात **सीडी** इच्याशीं लग्न लावण्यास तयार आहांत काय? " त्याला त्यानें आपला रुकार द्यावयाचा. हीं प्रश्नोत्तरेंही तीन वेळां होतात. नंतर नवऱ्यामुलीच्या स्त्रीधनाचा निर्णय होतो. कायदेशीर साक्षीदारांसमक्ष त्याची रकम मुकरर केली जाते. तसेंच लग्नापूर्वी दिलेले दागिने तीं, दोघें एकमेकांपासून विभक्त झालीं, अथवा त्यांचा 'छुटे छुटका' झाला, तर नवऱ्याच्या मालकीचे समजावेत किंवा बायकोच्या, ह्याबद्दल वाटाघाट होऊन ठराव होतो. मग मुल्ला **'इमाइनी'** ह्मणून प्रार्थना-आहे ती, करितो; व त्यानें उच्चारिलेल्या शब्दांची जमलेल्या मंडळीकडून पुनरुक्ति करण्यांत येते. पुढें त्या वधूवरांची जीवनयात्रा सुखकर व्हावी, एतदर्थ परमेश्वराचें स्तवन होतें. त्यांत **आदम व ईव** आणि **अब्राहाम** व **सारा** ह्यांचीं आयुष्यें सुखांत गेलीं व त्यामुळेंच लग्नसंबंध सर्व लोकांस अनुकरणीय झालेला आहे, इत्यादि विधानें असतात. तीं झाल्यानंतर विवाहापासून फायदे व त्याची पवित्रता ह्या विषयावर एक उपदेशपर व्याख्यान देतात; व सर्व मंडळी वर सांगि-

तल्याप्रमाणें हात वर करून 'फातेहा' ह्मणतात. त्यानंतर मुल्ला व इतर मंडळी वराला कांहीं विवक्षित शब्दांमध्यें आपला आनंद प्रदर्शित करितात. तो त्या सर्वांस 'सलामत' असें प्रत्युत्तर देतो. मग वरपिता आपल्या इभ्रती-प्रमाणें मुल्लांस बिदागी व सर्वत्रांस पोषाक देतो.

वर सांगितलेलीं कृत्यें होण्याला पहांटेचे दोन वाजण्याचा सुमार होतो!

वरातीची मिरवणूक.

नंतर वराची मिरणूक निघते! त्यास घोड्यावर बसवून इतर मंडळी पायीं चालतात. ह्या मिरवणुकींत वाद्यांशिवाय स्त्रियांचीं गाणीं, आणि पुरुषांचे दांडपट्याचे खेळ, हे प्रकार विशेष आहेत. दारू सोडण्याचा रिवाज आहे. मिरवणूक निघाल्यापासून सुमारें एक तासानें मंडळी वधूच्या घरीं जाऊन पोहोंचते. वधूचा जवळचा नातलग असेल, तो वरास घोड्यावरून खालीं उतरवितो. नवरामुलगा व स्त्रिया घरांत जातात. पुरुष मंडळी थोडा वेळपावेतों बाहेर बसून मग आपापल्या घरीं परत जातात.

वराला घरांत नेल्यावर कांहीं क्षुल्लक आचारकृत्यें करण्यांत येतात. तथापि, तीं आमच्या वाचकांस मनोरंजक होतीलसें वाटल्यावरून ह्या खालीं देत आहोंत.

लादियानाचा सोहळा.

प्रथमतः 'सोहागन' ह्मणून कोणी स्त्री असते, ती 'लादियान' नांवाचा एक सोहळा करिते. तो असा कीं, 'चंद्र व अप्सरा ह्यांच्या डोक्यांचा स्पर्श हा पहिल्यानेंच होत आहे;' 'आपल्या बापाची मुलगी नेहमीं सांकळ्या घालून चालो!' अशा अर्थाचीं विधानें करून वधूवरांचीं डोकीं एकमेकांस सात वेळां लावावयाचीं. हा लादियानाचा सोहळा नवऱ्यामुलास नवरीसमोर पलंगावर पश्चिमाभिमुख बसवून करण्यांत येतो.

फुलचंदनाचा सोहळा.

लादियान झाल्यावर 'फुलचंदन' हा दुसरा सोहळा करितात. ह्यांत सोहागन वधूच्या अंगावर हळदीनें किंवा केशरानें रंगविलेलीं कापसाचीं बोंडें फेंकिते. तीं वरानें झेलून घेऊन एका बाजूस ठेवावयाचीं.

तदनंतर वधूच्या मुठीमध्यें एक सुकें अंजीर ठेवून तें वरास एका हातानें घ्यावयास सांगतात. तें त्यास घेतां आलें नाहीं, ह्मणजे सर्वजणी हांसतात. त्याजबरोबर नवरामुलगाही हांसला, तर त्यापासून पांच रुपये दंड घेऊन त्याची मिठाई आणून वांटितात!

नवऱ्यामुलास दंड!

हें झाल्यावर 'तीरमन' चा सोहळा होतो. तो असा कीं, एका ताटलींत पांढरे तीळ घालून ती वधूपुढें ठेवितात. तिनें त्यांतील तीळ आपल्या ओंजळींत घेऊन ते वराच्या ओंजळींत टाकावयाचे. हा प्रकार सातवेळां होतो; व तो होत असतां सोहागन एक गाणें गाते. त्या गाण्यांत तूं जितके तीळ टाकिलेस तितका तुला मुलें होतील! असा भाव आहे.

तीरमनचा सोहळा.

तीरमनाच्या उलट 'चनवारामनु' हा सोहळा होतो. त्यांत एक ताटलीमध्यें मीठ व तांदूळ सारख्या प्रमाणानें घालून तें ताट वरापुढें ठेवितात. ते दोन्ही पदार्थ वरानें आपल्या हातानें वधूच्या हातांत पांच सहा वेळां द्यावयाचे. हा प्रकार होत असतां सोहागन गाणें ह्मणते. त्यांतील आशय असा आहे. कीं, हें मीठ व मिठानें रुचिकर केलेलें धान्य आहे. तें वर देतो व वधू घेते. ह्या कृत्याचा उद्देश वधूनें वराच्या इच्छेनुरूप वागावें असा दिसतो.

चनवारामनु.

वरील प्रकारांशिवाय कधीं कधीं वरापुढें एक मातीचा कुंभ ठेवून तो त्याला आपल्या पायाच्या दाबानें फोडावयास सांगतात. तो त्याकडून फुटला गेला, तर तो शूर निपजेल अशा अर्थाचीं स्त्रिया गाणीं गातात. तसेंच केव्हां केव्हां वरापुढें एखाद्या कांटेरी झाडाची खांदी ठेवून त्यास तरवारीनें तिचे दोन तुकडे करण्यास सांगतात.

वराच्या शौर्याची परीक्षा.

हीं कृत्यें झाल्यावर वधूवरांस त्यांच्या निजण्याच्या खोलींत घेऊन जातात. तेथें दरवाज्याजवळ वधूची बहीण उभी असते. तिला वरानें कांहीं बक्षीस देण्याची चाल आहे. तें दिल्यावर त्या नूतन जोडप्यास आंत ठेवून खोलीचें दार बंद करितात.

वधूवरांचें शयन.

वधूवरांनीं ती अवशिष्ट राहिलेली रात्र खानपानांत, आणि गीतसंभाषणादिकांत घालवावयाची. सूर्योदय झाला, ह्मणजे वधूची माता आंत जाऊन 'आतां स्नान करून कपडे घालण्याची वेळ झाली!' असें सांगून वधूवरांस उठण्याची सूचना देते. मुसलमानी अदबीला हा प्रकार बराच विलग दिसतो. अस्तु.

सासुरवास.

सिंधी लोकांत जांवई सासऱ्याच्या घरीं सात दिवस राहून नंतर आपल्या घरीं परत येतो. लहानपणीं लग्नें झालीं, तरी वधूवरें एकत्र राहून एकशय्येवर निजतात! पहिलें मूल होईपर्यंत मुलगी आपल्या बापाच्या घरीं आठवड्यांतून एक दिवस—दर शुक्रवारीं—जाते. नंतर इदीच्या दिवशीं किंवा अशाच मोठ्या सणावाराच्या दिवशीं जाते. ह्या लोकांत स्त्रियांना वर सांगितल्यापेक्षां बरेंच जास्त स्वातंत्र्य देण्यांत येतें, परंतु नवऱ्याच्या परवानगीवांचून, घराबाहेर जाणें हा मोठा अपराध समजला जातो, व त्यास त्यांच्या धर्मशास्त्रांत कडक शिक्षा सांगितल्या आहेत.

शीख लोकांचीं लग्नें.

शीखांची सामान्य माहिती.

शीख ही कांहीं विशिष्ट जाति नव्हे. परंतु, ते एका विशिष्ट धर्मपंथाचे लोक असून त्यांच्यांत नाना जातींचें मिश्रण आहे. **पंजाबांत** ईसवी सनाच्या पंधराव्या शतकांत **नानकशहा** ह्मणून कोणी एक प्रख्यात धर्मसंस्थापक पुरुष होऊन गेला. त्यानें हिंदू आणि मुसलमानी धर्मांचें संशोधन करून, त्या दोहोंमध्यें ज्या समजुती त्याला वेडगळपणाच्या वाटल्या, त्यांस त्यानें फांटा दिला; आणि उभय धर्मांतील सारभूत तत्त्वांचें एकीकरण करून, त्या तत्त्वांच्या पायावर आपला एक तृतीय पंथ काढिला. तो काढण्यांत त्याचा मुख्य व स्तुत्य उद्देश असा होता कीं, हिंदूमुसलमानांतील धर्मविषयक विरोधभाव नाहींसा करून त्यांच्यांत एकी आणि प्रेम उत्पन्न करावें. सबब, त्यानें प्रथमत: दोन्ही विरुद्ध धर्मांच्या लोकांस आपल्या मतांचा उपदेश करून आपल्याभोंवतीं बरेच अनुयायी जमविले. अर्थात् ह्या अनुयायांत हिंदू तसे मुसलमानही होते. तेव्हां त्यांचा भिन्नपणा काढून टाकण्यासाठीं त्यानें त्यांस **शीख** अशी सामान्य संज्ञा दिली. अर्थात् शीख ह्मणजे शिष्य, अथवा नानकशाही मतांचा अनुयायी. **अमृतसर** येथें ह्या लोकांचें अत्यंत पूज्य असें एक सुवर्णदेवालय आहे. त्यांत ह्यांचें धर्मपुस्तक—ज्यास **आदिग्रंथ** अशी संज्ञा आहे, तें—मोठ्या बंदोबस्तानें सुरक्षित ठेविलें आहे. त्यांतील वचनें फार मनोवेधक, उदात्त, आणि पवित्र आहेत. ईश्वर एक आहे, त्याला आकार नाहीं, त्याची पूजा अगदीं साधी व परमार्थनिष्ठेनेंच केली पाहिजे, शारीरिक आणि मानसिक पवित्रता राखिली पाहिजे, इत्यादि तत्त्वें त्यांत मोठ्या जोरदार

भाषेनें आणि शीखांच्या मनांत चांगलीं ठसावीं एतदर्थ वारंवार सांगितलीं आहेत. शीख लोक, हे हिंदुस्थानांतील इतर सर्व लोकांत कट्टे स्वधर्माभिमानी, बलाढ्य, मृगया करण्यांत चतुर, व निर्भय आणि पराक्रमी वीर आहेत. ते केवळ शरीरानेंच सशक्त व सुंदर आहेत असें नव्हे. तर मनानेंही मोठे विचारी आणि दृढनिश्चयी आहेत. त्यांच्या स्त्रियाही मोठ्या हुशार, अत्यंत प्रेमळ, आणि तरवारीच्या धारेप्रमाणें प्रखर पातिव्रत्य पाळणाऱ्या आहेत. त्यांना पडदा असल्यामुळें त्या अक्षय्य बंदीवासांत आणि नवऱ्याच्या गुलामगिरींत रावत असतील, अशी कोणाची समजूत असल्यास ती निखालस चुकीची होय. आदिग्रंथांत त्यांची योग्यता आणि त्यांचे हक्क सबळ रीतीनें स्थापित केल्यामुळें शीख लोकांत स्त्रियांचें वर्चस्व आणि मान फार मोठा आहे. असो. आतां आपण ह्या लोकांच्या लग्नसंबंधीं माहितीकडे वळूं.

विवाहकाल.

शीख लोकांत बालविवाह धर्मसंमत मानिला जातो. सबब, मुलें आणि विशेषतः मुली लहान असतांच ते त्यांचीं लग्नें करून टाकितात. परंतु इंग्रजी अंमल बसल्यापासून ही चाल दिवसानुदिवस मोडत चालली आहे; आणि हल्लीं शीख वधूवरें पूर्वीपेक्षां वयानें बरींच मोठीं असतात.

लग्नसराई, बरात, तिला जाण्याची हौस, आणि लग्नाप्रीत्यर्थ खर्चवेंच.

चैत्र महिना लागला, कीं शीख लोकांच्या मुलखांत लग्नाची एकच गर्दी उडून जाते! शेंकडों शीख मुलामुलींचे विवाह होत असतात. प्रत्येक कुटुंबांत जरी लग्न व्हावयाचें नसलें, तरी त्यांतील मनुष्यें आपल्या नातलगांच्या किंवा इष्टमित्रांच्या घरीं लग्नास जाण्यायेण्याच्या धादलींत असावयाचींच! लग्नसराईत कोणाच्याही बरातीला आला गेला नाहीं, असा मनुष्य विरळा. हे लोक एकंदर लग्नकार्यास **बरात** असें ह्मणतात. तथापि, वस्तुतः महाराष्ट्रीय लोकांप्रमाणें वधूप्रवेशाच्या मिरवणुकीसच ती संज्ञा देण्यांत येते. शीख लोकांस बरातीला जाण्याची मनापासून हौस असते. बरात परगांवीं कितीही लांबच्या पल्ल्यावर असली, तरी तिजसाठीं ते आपला

अवजड पोषाक—खलात—चढवून चैत्रमासाच्या प्रखर उन्हांतून तळत, आणि खुशाल लग्नगीतें गात गात जातील! हीं लग्नगीतें ऐकिलीं, ह्मणजे त्यांत गोंविलेले ह्या लोकांचे श्रीमंती विचार आणि चोचले कोणाही सत्य-प्रिय मनुष्यास अतिशयोक्तीचे व आश्चर्यजनक वाटल्यावांचून राहणार नाहींत. खर्चासंबंधानें पाहूं जातां ह्या लोकांचीं लग्नें, आणि विशेषतः त्यांच्या लग्नांतील मेजवान्या, ह्यांना जितका जास्त पैसा लागतो, तितका इतर लोकांच्या लग्नांस व मेजवान्यांस, क्वचितच लागत असेल. ह्यांच्यांतील हा खर्च, ह्मणजे एखाद्यास खराही वाटावयाचा नाहीं, इतका तो जबरदस्त व फाजील असतो; आणि अनेक बाबतींच्या रूपांनीं त्यापैकीं बरीच मोठी रकम उपाध्याय अथवा धर्मोपदेशक ह्यांस द्यावी लागते. ह्या उपाध्यायांचें प्रस्थ फारच मोठें असतें; व ते आपल्या मोठाईच्या जोरावर आपणांस मिळणाऱ्या बाबती फुगवतील तितक्या फुगवून लोकांपासून द्रव्य-शोषण करीत असतात. त्यामुळें शीख गृहस्थास आपल्या मुलाचें अथवा मुलीचें लग्न ह्मटलें, कीं पांचावर धारण बसते! लग्नकार्य होण्यापूर्वी तो नुसता फिकीरींतच असतो; परंतु तें झाल्यावर त्याची स्थिति सांगतां पुरवत नाहीं! बरें. केवळ उपाध्यायाच्या दक्षिणा व संभावना यांनीं खर्चाच्या बाबती संपतात असें नव्हे. त्यांखेरीज थाटामाटाच्या मिरवणुकी, आणि बहुजनसमुदायास द्याव्या लागणाऱ्या श्रीमंती डौलाच्या मेजवान्या, ह्याही मनस्वी खर्चाच्या आणखी दोन बाबती असतात. एखाद्या मध्यम स्थितींतल्या गृहस्थाच्या घरीं देखील लग्नाची मेजवानी झोडण्यास चार चार हजार मनुष्यांस निमंत्रण केलें जातें! ज्याला दरमहा सगळी दहाच रुपयांची प्राप्ति, आणि ज्याचीं मुलेंबाळें घरांत भुकेनें कळवळत आहेत, असा एखादा शीख मजूरही आपल्या मुलाच्या लग्नाप्रीत्यर्थ दीडशें पासून दोनशें रुपयेपर्यंत खर्च करितो! मग श्रीमान् गृहस्थ किती खर्च करीत असतील तें निराळें सांगणें नकोच. ह्या गतानुगतिक भयंकर चालीमुळें शेंकडों शीख कुटुंबें कायमचीं विपन्नावस्थेंत पडलीं आहेत! लग्नाच्या मेजवानींतील प्रमुख पदार्थ, ह्मणजे नाना प्रकारचीं

मिष्ट पक्वान्नें असतात; आणि तीं कार्यापूर्वी तयार करून ठेवण्यासाठीं लग्नघरच्या अंगणांत हलवाई लोकांची एकच धांदल उडून रहाते. ते लोक आपले चुले पेटवून पक्वान्नांचे घाण्यावर घाणे काढून त्यांच्या राशी घालीत असतात.

शीखविवाहाचीं किल्येक अंगें व दीक्षादान.

शीख पंथाच्या नियमाप्रमाणें कोणाही मुलाला अथवा मुलीला त्या पंथाची दीक्षा दिल्यावांचून त्यांचें लग्न करितां येत नाहीं; आणि ज्या अर्थी लग्नें लहानपणीं करण्याची चाल आहे, त्या अर्थी दीक्षा देण्याचा विधि बहुतकरून लग्नसमयींच करण्यांत येतो. कदाचित् मुलाचा तो अगाऊ झाला असला, तरी मुलीला त्या पंथाची दीक्षा देणें, ती लग्नप्रसंगींच देतात; आणि ह्याच कारणास्तव दीक्षादान, 'बरात' अथवा वधूप्रवेशाची मिरवणूक, आणि मेजवान्या, हीं विवाहाचीं मुख्य अंगें समजून तीं सर्व शीखांच्या लग्नांत केलीं जातात. ह्या मुख्यांगांतही पहिलें ह्मणजे दीक्षादान, हें तर लग्नाचें अत्यावश्यक असें पूर्वांग असतें. परंतु, त्यासंबंधीं माहिती येथें दिली असतां कदाचित् कित्येकांच्या मतें विषयान्तर केल्याचा दोष येईल; असें जाणून आह्मीं ती जिज्ञासु वाचकांसाठीं ह्या खालीं टीपेंत दिली आहे.

शीख पंथाची दीक्षा देण्यासाठीं दोन प्रकारचे संस्कार ठेविले आहेत. एक **पदसंस्कार** व दुसरा **खड्गसंस्कार**. पैकीं पहिला संस्कार **नानक**प्रणीत व दुसरा **गोविंदसिंग**प्रणीत आहे. पदसंस्कार हा फारकरून स्त्रीला दीक्षा देण्याच्या कामीं योजिला जातो. अर्थात् दुसरा ह्मणजे खड्गसंस्कार, हा केवळ पुरुषांसाठींच योजिला आहे. दीक्षा देण्याच्या विधीला **पलियाळ** अथवा **पलियाळ घेणें** असें ह्मणतात. हा विधि अगदीं साधा असतो. त्यांत विशेष भानगडीचें व लांबलचक कर्म मुळींच नाहीं. शीख होणारानें प्रथमतः आपली इच्छा पांच किंवा अधिक शीख जमवून त्यांस व्यक्त करावयाची. ती अमुक एका ठिकाणींच केली पाहिजे असें नाहीं. देवळांत, घरांत, अथवा भररस्त्यावर कोठेंही दर्शविली तरी चालते. मात्र ती इच्छा मनापासून असली, ह्मणजे झालें. ती तशी असल्याबद्दल जमलेल्या शीखांची खात्री झाली, ह्मणजे ते थोडेसे बत्तासे आणून ते स्वच्छ पाण्यांत मिसळून त्यांचें शरबत तयार करितात, आणि तें दीक्षा घेणाऱ्या मनुष्याच्या अंगावर व मुख्यत्वेंकरून त्याच्या डोळ्यांवर खूब शिंपडितात. नंतर **पदसंस्कार** करावयाचा असल्यास त्या व्यक्तीचा उजवा पाय त्या पाण्यानें

धुतात. हें कृत्य चालू असतां जमलेल्या शीख मंडळींत जो सुशिक्षित असेल तो, दीक्षा घेणारा मनुष्य समजेल अशा कोणत्याही भाषेंत त्याला शीख पंथाचीं मुख्य तत्त्वें सांगतो. नंतर त्या तत्त्वांप्रमाणें वागण्याविषयीं दीक्षा घेणारानें शपथ घ्यावयाची, ह्मणजे पदसंस्कार झाला. पुढें त्या नवीन शीखानें आपणास वाटेल तो गुरु करावा, ह्मणजे तो त्यास धर्मपुस्तक–**आदिग्रंथ**–शिकवितो. **खड्गसंस्कार** करावयाचा असल्यास उपाध्याय एक लहानसें ईशस्तोत्र ह्मणून आपल्या शिरस्त्राणांतून एक सुरी काढितो. (ही सुरी खऱ्या शीख पंथाभिमान्यास आपल्या शिरस्त्राणांत हमेष बाळगावी लागते.) नंतर दीक्षा घेणारा पुरुष, त्याचा मुख्य जबाबदार, अथवा धर्मोपदेशक, ह्यांतून कोणा एकाच्या हातीं दीक्षा देणारा पुरोहित एक पेला देतो, व त्यांत तें बत्ताशांचें पवित्रोदक घालून तें आपल्या सुरीनें ढवळितो. नंतर धर्मोपदेशक असेल, तो **ग्रंथां**तून कांहीं निवडक भाग वाचितो; व जमलेली शीख मंडळी त्याची आवृत्ति करितात. नंतर दीक्षा घेणारास कांहीं विधानें करावीं लागतात, तीं अशीं:—' ईश्वर सत्यनाम आहे. तो सर्वशक्तिमान् , निर्भय, निर्वैर, अमर–अजरामर–आहे. तो सर्वोत्तम आहे. त्याचें अस्तित्व सदासर्वकाळ आहे. गुरूचा जयजयकार असो ! शीखांचा जयजयकार असो ! ' हीं विधानें केल्यावर दीक्षा घेणारानें तें पेल्यांतील पोलादी शरबत पांच वेळां प्राशन करावयाचें. मात्र तें पेल्यानेंच न पितां ओंजळींत घेऊन प्यावें अशी पद्धति आहे. हें झाल्यावर दीक्षा देणारा पुरोहित अथवा धर्मगुरु तें शरबत त्या मनुष्यावर पांच वेळां शिंपडितो. अशा रीतीनें कीं, त्यायोगें त्या मनुष्याचें तोंड, डोकें, व दाढी भिजली जावी. नंतर धर्मगुरु त्यास लांब केंस ठेवणें, एका विशिष्ट रीतीचा भांग पाडणें, गुडघी घालणें, आणि सुरी व लोहवलयें धारण करणें, ह्या ज्या अस्सल शीखाच्या पांच खुणा, त्य नेहमीं बाळगण्यास सांगतो. तसेंच त्यास आपल्या अंगावर सदोदित निळ्या रंगाचें एक वस्त्र, व तरवार, बंदूक, धनुष्य, बाण, व कुठार हीं पवित्र पंचायुधें धारण करण्यास सांगतात. नंतर धर्मगुरु दीक्षा घेणारास ह्मणतो, ' गुरु हा तुझा धर्मोपदेष्टा होय; आणि तूं त्याचा शीख अथवा शिष्य आहेस.' ह्यानंतर जमलेली शीख मंडळी ' गुरुराजकी जय !' ' गुरूकी जय !' असा पांच वेळां जयघोष करितात. मग पुरोहित दीक्षा घेणारास ह्मणतो, ' हें शरबत साक्षात् अमृत, जीवाचें जीवन, लोहाचें आसव, आणि बलवर्धक मद्य होय ! तें प्राशन कर ! आणि दीर्घायु व बलिष्ठ हो !' हें झाल्यावर दीक्षा घेणारा तें शरबत एकदा धर्मगुरूच्या ओंजळीनें पितो. मग धर्मगुरु त्यास विचारितो कीं, ' शीख पंथ व गुरुवचनें तुला मान्य आहेत ना ?' ह्या प्रश्नास ' होय ! तीं मला मान्य आहेत.' असें तो मनुष्य पांच वेळां प्रतिवचन देतो. नंतर शीख पंथानें बहिष्कृत मानिलेल्या अशा पांच अन्य पंथांतील व्यक्तींशीं त्यानें अन्नपानादि व्यवहार करूं नये, अशी धर्मगुरु त्यास आज्ञा करितात; ह्मणजे खड्गसंस्कारानें शीख पंथाची दीक्षा देण्याचा विधि संपला.

निरनिराळ्या जातीच्या लोकांनीं हा पंथ स्वीकारिल्यामुळें केवळ शीख येवढ्या विशेषणावर चुकून विजातीय वधूवरांचीं लग्नें लागण्याचा संभव असतो. सबब, सगाई अथवा सोयरीक जमवितांना वधूवरांच्या जातीकडे विशेष लक्ष्य देतात, आणि दोन्ही पक्ष सजातीय आहेत अशी खात्री झाली, तरच त्यांच्यांत शरीरसंबंध होऊं शकतो.

संबंधास जातीची अनुकूलता लागते.

लग्नरीति.

लग्नसमारंभ पुष्कळ दिवस पर्यंत चालू असतो, व त्यांत मुख्य ह्मणजे लग्नाच्या दिवशीं आपापल्या घरीं बराच वेळपर्यंत वधूवरांचें मोठ्या थाटानें मंगलस्नान होतें. नंतर अनुकूल असेल त्याप्रमाणें नवरामुलगा सुंदर पोषाक करून आपल्या इष्टमित्रांसह नवरीच्या घरीं वाजत गाजत लग्नासाठीं जातो. नवरी लग्नप्रसंगीं तांबडें वस्त्र परिधान करून तोंडावरून बुरखा घेते; व तिच्या डोकीस एक प्रकारचें शिरोभूषण घातलेलें असतें. लग्नमंडपामध्यें हाजर असलेले धर्मगुरु व उपाध्याय परमेश्वरप्रार्थनेचे व आशीर्वादाचे मंत्र ह्मणतात. नवरी नवऱ्याच्या मणगटास, व तो तिच्या मणगटास तांबड्या दोऱ्याचें लग्नकंकण बांधितो. नंतर विवाहहोम करण्यांत येतो, व एकंदर कार्याची परिसमाप्ति मेजवानीनें होते. इतर एखादा दुसरा किरकोळ विधि अथवा सोहळा न केला, तरी चालतो. परंतु मेजवानी ही झालीच पाहिजे. तिच्यावांचून कार्याला सांगताच नाहीं! भिन्न जातींचे लोक ह्या पंथांत असल्यामुळें शीखांच्या लग्नकार्यास कोणतीही ठरीव पद्धति नाहीं. नवरानवरी ज्या जातीचीं असतील, त्या जातीचे पिढीजाद चालत आलेले रीतिरिवाज त्यांच्या लग्नप्रसंगीं केले जातात. अर्थात् ह्या रीतिरिवाजांचा शीख पंथाशीं कांहीं एक संबंध नसतो. सबब, शीख पंथाचा ह्मणून विशिष्ट असा कोणताच लग्नविधि आह्मीं सांगूं शकत नाहीं. आपापल्या रिवाजाप्रमाणें लग्न लावण्यांत आलें, ह्मणजे हिंदू शीख मोठ्या थाटानें बरात अथवा वधूप्रवेशाची मिरवणूक काढितात, आणि नवरा नवरीला आपल्या घरीं घेऊन जातो.

बंगाल्यांतील हिंदू लोकांची लग्नरीति.

बंगाली लोकांविषयीं माहिती व सोयरीक जमविण्याची रीति.

बंगाल्यांत हिंदूंच्या मूळच्या चार जाति आहेत. त्यांत **कुलीन**, **श्रोत्रिय**, आणि **वंशज** ह्या तीन प्रमुख आहेत. ह्या तिन्ही जातींत जे आचार आजमित्तीस प्रचलित आहेत, ते **राजावल्लभसेन** ह्यानें अस्तित्वांत आणिले. वरील तिन्ही जातींचा इतिहास, आणि त्या त्या जातीचे आचार, हे **'मिश्र'** नामक ग्रंथांत सांगितले आहेत. आरंभीं ह्या कुलाचारनियमांच्या पुस्तकाचें अध्ययन करून ते ते आचार त्या त्या कुलांत घडवून आणण्याची जरूर पडली. हें काम करण्याचें ज्या लोकांनीं पतकरिलें त्यांना **'घटक'** अशी अन्वर्थक संज्ञा देण्यांत आली. प्रत्येक जातीचे घटक आहेत. ते मिश्रनामक ग्रंथाचा अभ्यास करून लग्नविधि सांगतात; आणि यजमानांकडून जी दक्षिणा प्राप्त होईल, तिच्यावर आपला चरितार्थ करितात. अर्थात् घटक हे तिकडील लोकांचे उपाध्यायच होत. हे लोक लग्नाच्या कामांत मध्यस्थ होऊन दोन्ही पक्षांकडून पैसे उपटून त्यांस फसवितात. मुलामुलींचे आईबाप त्यांच्या लग्नाच्या तजवीजीस लागण्यापूर्वींच घटक त्या खटपटीस लागतात ! ते प्रथमतः आपल्या ठिकाणींच स्थलयोजना करून ठेवितात; व असें करणें त्यांना अगदीं सहज असतें. कारण, त्यांचा संचार सर्वत्र असतो ! मुलाचें वय सतरा अठरा वर्षांचें झालें, ह्मणजे घटक त्याच्या आईबापांकडे जाऊन त्या मुलाच्या लग्नासंबंधीं वाटाघाट सुरू करितात. आपल्या धंद्यांत आपणांस चांगलें यश यावें, ह्मणून ते उभयपक्षांच्या पुरस्कर्त्यांचीं मनें वळविण्याच्या कामीं आपली

पराकाष्ठा करून सोडितात. त्यांची वर्णन करण्याची शैली मोठी विलक्षण असते. मुलीची तारीफ करून सांगतांना ते ह्मणतात, 'अहो! काय सांगावें! तिचें मुख पूर्णचंद्रासारखें आहे. बांधा किती नीटस! दाळिंबाच्या बियांसारख्या तिच्या दंतपंक्ति आहेत. आवाज ह्मणजे प्रति कोकिळा! राजहंसासारखी ठुमकत चालते! वर्णन कोठवर करावें! खरोखर, तिच्या एकंदर चालचर्येवरून ती ज्याची गृहलक्ष्मी होईल, त्याला श्रीमान् करून सोडील!' तसेंच मुलाचें वर्णन करितांना ते ह्मणतात, 'गंधर्वासारखा देखणा, सरदारासारखी चालचलणूक, व्यसनापासून दूर, आणि रात्रंदिवस विद्याभ्यासांत निमग्न! खरोखर तो केवळ एक पुरुषरत्न आहे! आपण बिनदिक्कत त्यास आपली मुलगी द्या. ह्या दोघांचा जोडा रतिमदनासारखा शोभेल!' वगैरे. तथापि, आतां ह्या घटकांच्या लाघवी बोलण्याची किंमत लोकांना समजून चुकल्यामुळें त्यांच्या ह्मणण्यावर कोणी फारसा विश्वास ठेवीत नाहींत. अलीकडे ह्या घटकांचा धंदा अगदीं खालावला आहे. लग्न जुळविण्याचें काम हल्लीं स्त्रियांच्या मार्फतीनें होतें. त्यांना कोठेंही जाण्याला आडकाठी नसते. मोठमोठ्या गृहस्थांच्या अंतःपुरांत त्यांचा प्रवेश सहज होऊं शकतो. तेणेंकरून एखाद्या मुलीसंबंधानें स्त्रिया जी माहिती देतात, ती पुष्कळ अंशीं खरी मानण्यांत येते, व त्यांच्या सांगण्यावरून बरींच लग्नें घडूनही येतात. सबब, हल्लीं स्त्रीवर्गाचे घटक अस्तित्वांत येऊं लागले आहेत. जेव्हां घटकी एखाद्या मुलाविषयीं मुलीच्या बापाला हकीकत कळविते, तेव्हां 'तो कोणत्या परीक्षेंत उतरला आहे?' हा प्रश्न तिला प्रथमतः विचारण्यांत येतो. तसेंच, परीक्षा उतरला असल्यास, त्याला कांहीं विद्यावेतन मिळतें किंवा कसें हेंही विचारितात. कारण, अशा योग्यतेच्या मुलास पुष्कळ द्रव्य द्यावें लागतें, व तें देण्याची ऐपत नसली, ह्मणजे भारी अडचण पडते. तथापि, आपली मुलगी सुस्थळीं पडावी, अशी मुलीच्या बापाची साहजिकच इच्छा असल्यानें त्याला चांगल्या स्थळासाठीं आपल्या ऐपतीबाहेर खर्च करणें प्राप्त येतें; आणि तेणेंकरून त्याची स्थिति खालावून पुढें त्यास फार

विपत्ति व त्रास भोगावा लागतो. तेव्हां मध्यम किंवा गरीब स्थितीच्या मनुष्यास मुलगी असणें, हें त्या बिचाऱ्याच्या पदरीं एक मोठें पापच ह्मणावयाचें! असो. लग्नासंबंधीं बोलणें सुरू झालें, ह्मणजे उभयपक्षांत एकमेकांची जात, कुल व स्थिति ह्या संबंधानें चौकशी करितात. त्याविषयीं कांहीं संशय राहिला नाहीं,—खात्री होऊन चुकली,—ह्मणजे मुलाचा बाप '**बराभरन**' व '**फुलशय्या**' ह्याबद्दल काय द्याल ह्मणून मुलीच्या बापाकडून खुलासा मागवितो. पैकीं बराभरन ह्या सदराखालीं बहुतेक करणीचा समावेश होतो; आणि फुलशय्येबद्दल रोकड रकमेची मागणी असते. दोहोंसंबंधानें तडजोड होऊन एकदाचा अखेर ठराव झाला, ह्मणजे वधूवरांचें निरीक्षण करितात. प्रथमतः वरपक्ष वधूला पाहण्यास जातो. तेथें गेल्यावर ते बाहेरील खोलीमध्यें बसतात. नंतर थोड्या वेळानें चांगलीं वस्त्राभरणें घातलेली वधू, घटकी व मोलकरिणीसहवर्तमान बाहेर येऊन सर्वांस नमस्कार करून मर्यादेनें खालीं बसते. मग वरपक्षापैकीं कोणी एक तिला "तुमचें नांव काय? येथें बसले आहेत हे तुमचे कोण? तुह्मांला लिहितां वाचतां येतें कीं नाहीं?" वगैरे प्रश्न विचारितो; व ती त्यांचीं भीत भीत, कांपऱ्या आवाजानें, पण समर्पक उत्तरें देते. तीं ऐकून घटकी त्या उपवर मुलीचा करवेल तेवढा स्तुतिपाठ करीत असते, व मुलीची आई दाराच्या आडून आपल्या मुलीची परीक्षा कशी काय उतरते, तें मोठ्या उत्कंठेनें न्याहाळून पहात असते. अशारीतीनें तिची परीक्षा झाल्यावर ती उठून घरांत जाऊं लागतांच मुलाचा बाप किंवा भाऊ तिच्या हातांत मोहोर ठेवतो, व नंतर तिला जावयास सांगतो. असें झालें, ह्मणजे वरपक्षास मुलगी पसंत पडली ह्मणून समजावें. सदरहू प्रसंगीं हाजर असलेल्या ब्राह्मणांना, घटकांना व कुलीनांना वरपक्षाकडून प्रत्येकीं दोन दोन किंवा चार चार रुपये दक्षिणा देण्यांत येते; व कन्येच्या घरांतील नोकरचाकरांस एकेक रुपया इनाम वांटण्यांत येतो. हें कृत्य सकाळीं झालें, तर मंडळी तशीच घरीं परत येते. पण रात्रीं झाल्यास कन्यापिता त्यांस मिठाई, दहीं, फळें,

वगैरे पदार्थांचा फराळ घालून नंतर जाऊं देतो. ह्याच रीतीनें कन्या-पक्षाची मंडळी वरगृहीं जाऊन मुलाचें निरीक्षण करितात. ते त्याची परीक्षा घेण्यासाठीं आपल्या समागमें मुद्दाम एखादा पदवीधर नेत असतात. मुलगा प्रवेशपरीक्षेंत उत्तीर्ण झाला असल्यास त्याची परीक्षा फारशी कडक होत नाहीं. पण तो तसा नसल्यास मात्र व्याकरण, शब्दरचना, काव्येतिहास, इत्यादि विषयांत तो पदवीधर त्याची कसून कसोटी पहातो. तींत मुलगा पसंत ठरला, ह्मणजे त्यास मोहोर बक्षीस करितात. मंडळीला फराळाचा आग्रह करण्यांत येतो. ब्राह्मणांस दक्षिणा वांटणें वगैरे प्रकार वर सांगितल्या-प्रमाणेंच होतो; व नंतर कन्यापक्षाची मंडळी घरीं परत जाते.

लग्नासंबंधीं लेखी करार.

लग्नलेख—ह्याप्रमाणें निरीक्षण व परीक्षण होऊन वधूवरें पसंत पडलीं, आणि उभयपक्ष लग्न करण्यास कबूल असले, ह्मणजे एखादा शुभ दिवस पाहून दोन्हींकडील पुरस्कर्त्यांमध्यें त्या लग्नासंबंधीं लेखी करार करण्यांत येतो. हा लग्नलेख देशी कागदावर देशी शाई व लेखणीनें लिहिण्याचा रिवाज आहे; व त्यांतील पंक्तींची संख्या हमेषां विषम, ह्मणजे सात किंवा नऊ असली पाहिजे, अशी समजूत आहे. लग्नलेखांतील मुद्याचा मतलब असा असतो कीं, ' माझे चिरंजीव गोपीनाथ (वराचें नांव) यांनीं श्रीयुत इसनचंद्र दत्त ह्यांची वडील मुलगी कमल-कुमारी (वधूचें नांव) इच्याशीं, पुढें ठरवूं त्या सुमुहूर्तावर विवाह करावा. सदरहू लग्न लावण्यासंबंधानें मी रामचंद्र बोस, व श्रीयुत इसनचंद्र दत्त, असे दोघेही ह्या लेखानें बांधले गेलों आहों.' वगैरे. नंतर त्या लग्नलेखासभोंवतीं लाल सूत गुंडाळितात, व वधूचा बाप आणि वराचा बाप ह्यांतून जो ज्ञाति-कुलादिकांनीं श्रेष्ठ असेल, त्यास दुसऱ्यानें हा लेख द्यावयाचा; आणि त्याच्या श्रेष्ठत्वाबद्दल त्यास पन्नास रुपये द्यावयाचे, अशी चाल आहे. लग्नकरार समं-त्रक करण्यांत येतो; व त्यासाठीं तांदूळ, दूर्वा, हळद, सुपाऱ्या, पानें, चंदन, कवड्या, आणि अळिता असें उपसाहित्य लागतें. समंत्रक लग्नलेख झाल्यावर वधूपक्षाच्या स्त्रिया एकदा वधूकरितां, व वरपक्षाच्या स्त्रिया एकदा वराकरितां,

असा दोन वेळां शंखनाद करितात. शंखनाद हा तद्देशीय लोकांत अद्यापि मंगलसूचक ध्वनि मानण्यांत येतो, असें यावरून सिद्ध होतें. तसेंच शंखनाद झाला, म्हणजे वरील कृत्य निर्विघ्नपणें पार पडलें,असेंही समजलें जातें. त्यानंतर सर्व मंडळीस एक मोठी मेजवानी देण्यांत येते. ब्राह्मणांस भोजनोत्तर यथाशक्ति दक्षिणा देऊन बिदा करितात.

गात्र्यहरिद्रेचा सोहळा.

गात्र्यहरिद्रा—हा सोहळा महाराष्ट्रीयांतील उष्टया हळदीचा प्रतिसोहळा आहे. तो करण्यासाठीं एखादा शुभ दिन पाहून नक्की करितात. मग नेमिलेल्या सुमुहूर्तावर नवऱ्यामुलास मंगलस्नान घालून उत्तम वस्त्रें परिधान करवून केळीच्या खांबांनीं वेष्टिलेल्या जात्यावर त्यास उभा करितात; व त्याच्या सभोंवतीं पांच सुवासिनी स्त्रिया (अन्य जातीचा विवाह असल्यास ह्या स्त्रियांत एक तरी ब्राह्मणीण असलीच पाहिजे असा नियम आहे.) पांच किंवा सात प्रदक्षिणा घालितात. नंतर वराच्या अंगास हळद लावून त्याच्या मस्तकास तीर्थ, तांबूल, ' श्री ' (तांदळाच्या पिठाचें बदामपोळीसारखें केलेलें एक पक्कान्न), दाळी, तांदूळ, चांदी, सोनें, इत्यादि वीस मंगलपदार्थांचा स्पर्श करितात. नंतर वरास लावून अवशिष्ट राहिलेली 'गात्र्यहरिद्रा' एका चांदीच्या वाटींत घालून ती न्हाव्यासोबत वधूकडे तिच्या अंगास लावण्यासाठीं पाठवितात. शिवाय, तेलाचें पितळी भांडें, कांहीं सुगंधि द्रव्यें, तीन साड्या, एक लहानशी सतरंजी, दोन चटया, मश्रूची गादी, दोन तसल्याच उशा, डोकीस घालण्याचे दागिने, मिठाईचे डबे, मासे, दूध, दहीं, व पुष्पहार वगैरे सामानही गात्र्यहरिद्रेबरोबर पाठविण्याची चाल आहे. हें सामान म्हणजे सुमारें दोन तीन हजारांचा ऐवज असतो ! वधूला समारंभानें गात्र्यहरिद्रा लावून मंगलस्नान घालून मांगलिक केल्यावर वरील वस्तु तिला नजर करण्यांत येतात. हा सोहळा झाल्या दिवसापासून उभयतांसही भूतबाधा न व्हावी म्हणून वराच्या हातांत एक अडकिता व वधूच्या हातांत काजळाची डबी सतत ठेवण्याची चाल आहे।

अहिवराभाट.—गात्र्यहरिद्रा लागल्यानंतर आणि लग्नाच्या दोन तीन दिवस पूर्वी उभय पक्षांकडे 'अहिवराभाट' नांवाची मेजवानी होते. ती कांहीं अंशीं महाराष्ट्रीयांतील गडगनेरासारखीच ह्मणतां येईल. वराकडे तत्पक्षीय पुरुषवर्गाच्या इष्टमित्रांस आणि वधूकडे तत्पक्षीय स्त्रीवर्गाच्या इष्टमित्रांस मोठी मेजवानी देण्यांत येते. ह्या मेजवानीस बोलाविलेल्या मंडळीस घेऊन येण्यासाठीं पालख्या पाठविण्याची चाल आहे! पात्रांची संख्या कमींत कमी दोनशें पर्यंत असते. भोजनास लूची, कचोरी, नाना प्रकारच्या भाज्या, फळफळावळ, व इतर मिष्ट पक्वान्नें करण्यांत येतात; व घरें शृंगारण्यांत, हंड्याझुंबरांची आरास करण्यांत, नृत्यगीताच्या मजलसी देण्यांत, शेंकडों रुपयांचा खर्च केला जातो! शिवाय, नोकरचाकरांस वस्त्रें व चांदी सोन्याचीं कडीं बक्षिसादाखल देण्यांत येतात! तसेंच ब्राह्मणांस व नातलगांना ह्या मंगल प्रसंगाच्या स्मरणार्थ तेल भरून पितळेचीं भांडीं, मिठाई भरून ताटें, फळें, आणि वस्त्रें वांटण्यांत येतात. सदरहू उपायनांस **समाजिक** अशी संज्ञा आहे. त्याचा प्रतिकार ब्राह्मण आपल्या आशीर्वादानें, व नातेवाईक उलट आहेरानें करितात. ह्या प्रसंगीं घराच्या दरवाज्यापुढें रस्त्यावर तऱ्हेतऱ्हेच्या कमानी करून त्यांच्या शिरोभागीं 'ईश्वर वधूवरांस सुखी ठेवो!' वगैरे शुभवाक्यें मोठमोठया शोभिवंत अक्षरांनीं लिहिण्याचा प्रघात पडला आहे.

अहिवराभाट—मेजवानी व समाजिक.

लग्नाच्या आदले दिवशीं रात्रीं घरांतील सर्व स्त्रिया दुसऱ्या दिवसाची तयारी करण्यांत गुंतलेल्या असतात. त्यांना बहुतेक रात्रभर अलोचन जागरणच होतें. प्रातःकाळ होतांच पांच सुवासिनी एका ताटांत दिवा, सुरी, श्री, कांहीं तांदूळ, पानें, सुपारी, तेल, हळद, वगैरे साहित्य घालून शंखनाद करीत जवळच्या जलाशयावर जातात! व पाण्याला सुरीचा स्पर्श करून नंतर एक भांडें पाण्यानें भरून कांठाशीं ठेवितात, आणि त्याच्यापुढें ताटांत नेलेल्या वस्तु

लग्नपूर्वदिनकृत्यें व जलपूजन.

समर्पण करितात; व तेथेंही शंखवादन करून घरीं परत येतात. त्यांस थोडथोडी मिठाई देण्याची चाल आहे.

लग्नदिनकृत्यें.

लग्नदिवशीं वधूवरें, वधूचा बाप, व दोन्हीपक्षांकडील उपाध्याय फक्त दूध व फळें ह्यांचा आहार करितात. **मलिक** व **कुलीन** ह्या कुटुंबांचा संबंध होणें असल्यास कुलीनाची श्रेष्ठता दर्शविण्यासाठीं त्यांजकडे लग्नदिवशीं बारा वाजण्याच्या सुमारास मलिकाकडून वस्त्रें, मिठाई, मासे, दहीं, दूध व पंचवीस रुपये नजराणा ह्मणून पाठविण्यांत येतात. ह्या नजराण्यास **अधिभाषी** अशी संज्ञा आहे. ह्याच दिवशीं उभय पक्षांकडे **नर्नीमुख** नांवाचें एक मंगलश्राद्ध करण्यांत येतें. त्यास कोणी **विधिश्राद्ध** असेंही ह्मणतात. ह्या श्राद्धांत मिठाईचे पिंड देऊन ते ब्राह्मणांस वांटून देण्याची चाल आहे. हें श्राद्ध करण्याचा उद्देश संततीची अभिवृद्धि आणि संरक्षण व्हावें असा आहे. त्यानंतर वधूवरांस आपापल्या घरीं स्नानें घालून मूल्यवान् वस्त्रें परिधान करवितात, आणि पांच सुवासिनी स्त्रिया त्यांच्या मस्तकांस अक्षत व पानसुपारी ह्यांचा स्पर्श करणें, वगैरे कांहीं रूढीचीं कृत्यें करितात. सदरहू दिवशीं वरमाता, आपली सून घरीं आल्यावर ती आपणांस पोटभर जेवूं घालणार नाहीं, अशा समजुतीनें दिवसांतून सात वेळां जेवते ! तसेंच कन्येची आई, कन्या घरांतून गेल्यावर आपणांस पुष्कळ खावयास मिळेल, व जणूं काय त्यामुळें अजीर्णही होईल ह्मणून निराहार करिते ! ज्या जागेवर वधूस बसवावयाची तिच्या पाठीमागें एकवीस बाईलबुद्ध्या नवऱ्यांचीं नांवें लिहून त्या जागेला सात प्रदक्षिणा घालितात. लग्नाच्या वेळीं वधू जी साडी नेसणार तिच्यावर दुर्गेचें नांव लिहितात. कारण, तिच्यावर शिवाचें अप्रतिम प्रेम होतें; तेव्हां तिचें नांव साडीवर लिहून ती वधूकडून परिधान करविली, ह्मणजे तीही आपल्या नवऱ्याची फार आवडती होईल अशी समजूत. नंतर वधूपुढें **चंदीपोथी** नांवाचें एक पुस्तक ठेवून तिला तांबूल चावावयास देतात. हा वधूनें

चाविलेला तांबूल पुढें वराला नकळत त्यास खाऊं घालण्याची चाल आहे। तिकडे वरगृहीं वरप्रस्थानाची तयारी मोठ्या थाटाची करण्यांत येते. दरवाज्याजवळ रंगीबेरंगी कागदांचे डोंगर करून त्यावर तसल्याच कागदांचे शोभामयूर करून बसवितात. बाजूस चोपदार चांदीच्या छड्या घेऊन उभे असतात. तसेंच दरवान, शिपाई, वगैरे परिचारक गण चांगले पोषाक करून उभे राहतात. इंग्रजी 'ब्यांड'चें सुस्वर वादन चालू असतें. दिवाणखान्यांत उत्तम बैठक व हंडयाझुंबरांची आरास केलेली असते. वारांगनेच्या पैंजणांचे झणत्कार आणि गायनांचे आलाप चालू असतात. बैठकीच्या प्रमुखस्थानीं वरास बसण्याकरितां एक शोभिवंत सिंहासन करून त्याच्या दोहों बाजूस भपकेदार पोषाक केलेलीं जयविजयासारखीं दोन मुलें हातीं चामरें देऊन उभीं करितात. नवरामुलगा मंगलस्नान करून किनखापी किंवा भरगची पोषाक करून व जवाहिर आणि पुष्पहार गळ्यांत घालून त्या सिंहासनावर येऊन बसतो. त्यावर तीं मुलें चामरें वारूं लागतात. ह्याप्रमाणें कांहीं वेळ मजलसीचा समारंभ होऊन नंतर मोठ्या थाटानें वरप्रस्थानाची मिरवणूक काढितात. नवरामुलगा दुर्गेची प्रार्थना करितो. मग त्यास त्याची आई विचारिते, 'बेटा, तूं कोठें जातोस?' ह्मणजे त्यानें ह्मणावयाचें कीं, 'मी तुला दासी आणण्याकरितां जातो. नंतर त्यानें सासुरवाडीस गेल्यावर कसें वागावें, ह्या विषयीं त्याची आई त्यास थोडासा उपदेश करिते. तसेंच **कनकांगुली** ह्मणून कांहीं कृत्य असतें, तें त्याजकडून करवितात. लागलीच घरांतून कोणी सुवासिनी एका लहानशा तबकांत थोडे तांदूळ, कुंकवाची डबी, व एक रुपया आणून तें तबक वरासन्निध असलेल्या वरमातेच्या पदरांत घालिते. हें कृत्य वरास प्रस्थान करण्याविषयीं एक सूचनाच होय. तें होतांच तो गाडीमध्यें जाऊन बसतो. अंधार पडला असल्यास मशाली पेटवून त्यांच्या उजेडांतून मिरवणूक निघते. तिच्या अग्रभागीं एक दोन युरोपियन 'कॉनस्टेबल' व धिप्पाड असे दरवान लोक चालविण्याचा रिवाज

पडला आहे. मजुरांनीं खांद्यावर घेतलेल्या तक्त्यावर नाचणारणी नाचत किंवा गात जातात. रंगीबेरंगी दारूकामही सोडिलें जातें. मिरवणुकींतील इतर गृहस्थही गाड्यांतूनच मिरवतात. मिरवणूक मोठी प्रेक्षणीय असते, व ती पाहण्यासाठीं हौशी स्त्रीपुरुषें खिडक्यांतून किंवा गच्च्यांवरून बसतात.

लग्नविधि व सोहळे.

वर मिरवत मिरवत वधूच्या घरीं पोचतांच तत्पक्षाचे चार पांच गृहस्थ सामोरे येऊन सर्वांचे स्वागत करितात. न्हाव्याकडून दिवा, व आणखी कांहीं वस्तु घातलेलें एक मृत्तिकापात्र रस्त्यावर आणून ठेवितात. नंतर नवरामुलगा आपल्यासाठीं घातलेल्या उत्तम आसनावर जाऊन बसतो. इतर मंडळींचेंही यथायोग्य स्वागत करून त्यांनां मंडपांतील बैठकीवर बसविण्यांत येतें. सर्वत्र धुराच्या दिव्यांची आरास केलेली असते. मंडळी बसल्यावर वधूचा भाऊ दोन सुपाऱ्या आणून त्या वराकडून त्याच्या हातीं असलेल्या अडकित्त्यानें फोडवितो. नंतर **वादी** (भाट) उभे राहून दोन्ही कुटुंबांतील वंशावळींचे, आणि त्यांच्या थोर कृत्यांचे पोवाडे गातात. ठाकूरदालनांत ह्मणजे देवघरांत, वरास देण्याच्या सर्व वस्तु व्यवस्थित रीतीनें मांडून ठेवितात. ह्या वस्तु ह्मणजे सतरंजी, बिछाना, सोन्याचें घड्याळ, सांखळी, हिऱ्याची आंगठी, चांदीचीं व पितळेचीं भांडीं, कलाबतूचा जोडा, वगैरे होत. तसेंच गंध, फुलें, दूर्वा, दर्भ, इत्यादि पूजासाहित्यही उपाध्यायांजवळ तयार ठेविलेलें असतें. लग्नविधि ह्या ठाकूरदालनांतच करण्यांत येतो. मुहूर्त नजीक येतांच वरास मंडपांतून आणून त्याचा पोषाक उतरवितात, व एक रेशमी वस्त्र नेसावयास देऊन त्यास वरील ठिकाणीं आणून पाटावर बसवितात. नंतर वर सांगितल्याप्रमाणें वधूला दुर्गानामानें अंकित केलेली साडी नेसवून वराच्या डाव्या बाजूस पाटावर बसवितात; व तिच्या अंगावर दागिने घालितात. मग उपाध्याय वराच्या हातीं चवदा दर्भांच्या दोन जुड्या व गंगोदक देऊन सासऱ्याकडून कांहीं मंत्र ह्मणवितो, आणि वराकडून तें पाणी सोडवितो. नंतर वराकडून तांदूळ, फुलें, व दूर्वा ह्या

द्रव्यांनीं तांब्याच्या कलशाची पूजा करवून त्या कलशावर त्यास हात ठेवण्यास सांगतात. त्याच्या हातावर वधूचा हात ठेवितात, व त्यासभोंवतीं पुष्पमाला गुंडाळितात. मग कन्यापिता 'अमुक कुटुंबांतील अमुकाची पणती, अमुकाची नात, अमुकाची कन्या, अमुक वस्त्रालंकार परिधान केलेली ही, अमुक कुटुंबांतील अमुकाचा पणतू, अमुकाचा नातू, अमुकाचा मुलगा जो तूं वर त्या तुला देतों.' असा संकल्प करून कन्या दान करितो; व वर तिचें ग्रहण करितो. हें झाल्यावर कन्यापिता त्या नवदंपत्याच्या हाताभोंवतील पुष्पमाला काढून त्या उभयतांच्या मस्तकावर पाण्यानें प्रोक्षण करून त्यांस आशीर्वाद देतो. नंतर वधूवरांच्या डोक्यावर लज्जावस्त्र धरितात. अर्थात् तें त्यांनीं एकमेकांकडे प्रेमभावानें पहावें, अशा उद्देशानें धरिलें जातें. ह्या समयीं वराच्या डोकीस एक वर्खाची उभी टोपी घालण्याची चाल आहे. ह्याप्रमाणें परस्परांचें निरीक्षण झाल्यावर वरपक्षाचा न्हावी उपाध्यायास तूप व पोहे देतो. उपाध्याय ते घेऊन दूर्वांसह ब्रह्मदेवास अर्पण करितात. नंतर एका रुमालांत एकवीस सुपाऱ्या व खारका बांधून तो रुमाल, वराचा शेला, आणि वधूची साडी, ह्यांची एकत्र गांठ देतात; व त्या उभयतांस घरांतील एका खोलींत घेऊन जातात. तें जोडपें खोलींत येतांच स्त्रिया शंखनाद करितात! ह्या खोलींत आढ्यास छत देऊन व त्या खालीं केळीचे खांब उभे करून एक जागा शोभिवंत केलेली असते. तेथें तें जोडपें आलें, ह्मणजे वधूच्या बहिणी विनोदार्थ वराचे कान उपटतात! आणि वयोवृद्ध स्त्रिया आनंद प्रदर्शनार्थ '**उलूउलू**' (?) असे उद्गार काढितात. त्या सर्वांस हा समय मोठा मौजेचा, आनंदाचा, व सुखाचा असतो. त्या वराच्या करांगुलींतून वेलीच्या आंगठ्या घालितात; आणि त्याच्या हातांत कोष्टयांचा धोटा ठेवून दोन्ही हात दोरीनें बांधून टाकितात! मग सासू जांवईबोवांस ह्मणते, 'मी तुह्मांला दोरीनें बद्ध केलें, कवड्या देऊन विकत घेतलें, व तुमच्या हातीं धोटा दिला. बाबू! आतां तुह्मी कोंकरासारखे खुशाल ओरडा! नंतर ती त्याच्या तोंडाला कुलपाचा स्पर्श करिते व टांचण्यांनीं तें

शिवल्यासारखें दाखवितें. हें कृत्य त्यानें आपल्या मुलीला रागें भरूं नये, व कडक रीतीनें वागवूं नये, एतदर्थ करण्याचा प्रघात पडला आहे. तें झाल्यावर सासू वेळूची एक ल्हानशी नळी घेऊन ती वराच्या नाकास लावून मोडून टाकिते; आणि त्याच्या अंगावर तांदूळ, साकरेचें पाणी व कांडिलेल्या मसाल्याचा भुगा टाकिते. तसेंच त्यानें आपल्या बायकोशीं गोड बोलावें, तिला गोडीगुलाबीनें वागवावें, ह्मणून सासूबाई त्याच्या तोंडास मध व साकरेचीं चित्रें लावितात; व इतर सुवासिनी स्त्रिया त्याच्या मस्तकास श्री, पंखा, केळीं व पानसुपारी इत्यादि वस्तूंचा स्पर्श करितात. नंतर वधूच्या साडीशीं गांठ दिलेला वराचा शेला त्याजपासून घेऊन तो वधूजवळ आठ दिवस ठेवण्यासाठीं देतात. पुढें तो शेला, मिठाई मासे व दहीं ह्या नजराण्यासह वराकडे परत पाठवितात.

शुभदर्शन.

सदरहू कृत्य आटोपल्यावर नवऱ्यामुलास एका दगडावर उभा करून दोन पुरुष असामी वधूस वराच्या डोक्यापेक्षां जास्त उंच उचलून धरितात, व त्या सभोंवतीं तीन फेरे करून जमलेल्या स्त्रियांना 'दोघांतून उंच कोण!' ह्मणून विचारितात. अर्थातच त्या 'नवरी उंच आहे' असें उत्तर देतात. नंतर त्या उभयतांच्या डोक्यावर एक वस्त्र घालून त्यांस एकमेकांकडे पाहण्यास सांगतात. नवरी नवऱ्याकडे पाहण्यास लाजते. तथापि, तो तिचा मुखचंद्र पाहून आनंद पावतो. ह्या कृत्यास **शुभदर्शन** अशी संज्ञा आहे.

विधिसमाप्ति, व उपाध्यायांची संभावना.

रूढीचे वरील प्रकार आटोपल्यानंतर लग्नविधि पुरा करण्यासाठीं वरास फिरून ठाकूरदालनांत घेऊन येतात. तेथें उपाध्याय समंत्रक होम करून विधि समाप्त करितात. नंतर उभय पक्षांच्या उपध्यायांस दक्षिणा देण्यांत येते. वर **मलिक** जातीचा असला, आणि कन्या **कुलीना**ची असली, तर मलिकानें कुलीनाच्या दुप्पट दक्षिणा उपाध्यास द्यावी, असा रिवाज आहे. ती बहुतकरून

सोळा व आठ रुपये ह्या प्रमाणानें दिली जाते. महाराष्ट्रीयांतही बहुधा वधू-पक्षाच्या दुप्पट वरपक्षानें उपाध्यायाची संभावना करावी लागते. असो.

लग्नविधि आटोपण्यापूर्वी वधूपक्षाच्या शेजाऱ्यांचीं मुलें वरपित्याजवळ **ग्रामावती** व **बारावारी**च्या पूजेबद्दल रकमेची मागणी करितात. ही मागणी प्रथम सभ्यतेनें केली जाते. वरपिता समंजस असला, तर तो त्या मुलांचा संतोष ठेवितो. नाहींपेक्षां पोरें हट्टास पेटून त्याजपासून बलात्कारानें वरील बाबती काढून घेतात. वरपित्याला तत्प्रीत्यर्थ सुमारें बत्तीस रुपये द्यावे लागतात. त्यांतून कांहीं रुपये बारावारीच्या पूजेस ठेवून बाकीच्या रकमेनें बाळगोपाळ मंडळी एक चमचमीत मेजवानी उडविते.

ग्रामावती व बारावारी.

लग्नविधि पूर्ण झाल्यानंतर कांहीं वेळानें वधूपक्षाचा पुरस्कर्ता जमलेल्या मंडळीसमोर उभा राहून **मालचंदन** नांवाचा समारंभ करण्याची परवानगी मागतो. मंडळीचें अनुमोदन मिळतांच प्रथमतः 'दलपति', ह्मणजे जातींतील प्रमुख गृहस्थास चंदनानें सिंचित केलेली पुष्पमाला घालून नंतर यथाक्रमानें जमलेल्या सर्व मंडळीस हार घालण्यांत येतात. महाराष्ट्रीय ब्राह्मणांतील भिक्षुकवर्गांत ज्याप्रमाणें प्रथम गंध लावण्याचा मान कित्येक विशिष्ट व्यक्तींनाच दिला जातो, त्याप्रमाणें बंगाली लोकांतही मालाचंदनाचा सत्कार हा प्रथमतः जो गृहस्थ दलपति असेल, त्यासच करावा लागतो; आणि ह्मणूनच पूर्वी जे लोक मानाचे भुकेले असत; ते प्रसंगोपात्त पैसे खर्चूनही आपणांस दलपति करून घेत होते, व नंतर त्या पदाचा मान उपभोगीत होते. परंतु, अलीकडे विद्वान् आणि समाजाच्या हितासाठीं कळकळीनें झटणारे हेच खरे लोकाग्रणी अशी समाजाची समजूत झाल्यानें दलपतीचें पद विकत घेण्याला कोणी धजत नाहींत.

मालचंदनाचा सत्कार.

मालाचंदनाचा समारंभ आटोपल्यानंतर मेजवानी देण्यांत येते. प्रथमतः ब्राह्मणांचीं जेवणीं होतात, व मागून इतर मंडळींची पंगत बसते. आपणांला वराची थट्टामस्करी करण्यास संधी मिळावी, ह्मणून स्त्रिया जांवईबोवांना अंतःपुरांत जेवण्याचा भारी आग्रह करितात. परंतु, त्या बिचाऱ्यास पूर्वी चांगला अनुभव आलेला असतो. सबब, तो त्या भानगडींत न पडतां मुकाट्यानें बाहेर पुरुष मंडळी मध्येंच बसतो. ह्या प्रसंगीं बरेच प्रतिष्ठित आगंतुक येऊन जांवयाच्या पंक्तीचा लाभ घेतात! हा त्यांचा धंदाच असतो. ते नुसते जेवून जातात इतकेंच नव्हे. पण जातांना सांपडतील तितक्या पुऱ्या व मिठाई गुंडाळून पसार होतात! तथापि, रस्त्यांत अन्नार्थी भंगिणी उभ्या असतात, त्या सदरहू संभावितांना ताबडतोब ओळखून त्यांस आडव्या येतात; आणि विटाळ करण्याचा आविर्भाव दाखवून चोरावर मोर ह्या न्यायानें त्या आगंतुकांच्या 'प्रातीचा अर्धा वांटा' मागतात. अर्थात् बिचारे आगंतुक उघडकीस येऊन त्यांची फारच त्रेधा उडते! असो. भोजनोत्तर सर्व पुरुष मंडळी संतुष्ट होत्साती आपापल्या घरीं जाते, लग्न घरची बहुतेक गडबड कमी होते, आणि जांवईबोवा पुरतेपणीं भवचक्रांत सांपडतात!

मेजवानी.

बासरघरांतील सोहळे.—निजावयाच्या खोलीला बंगाली भाषेंत **बासरघर** असें ह्मणतात. वर सांगितल्याप्रमाणें लग्नघरीं शांतता होतांच, स्त्रिया वराला हळूच ह्या बासरघरांत आणवितात. तेथें वधू, तिची आई, व इतर सुंदर युवतींची एकच गर्दी झालेली असते. कित्येक स्त्रिया कृष्णलीलेचीं गाणीं मंजुळ स्वरानें गात असतात, व कित्येक अल्लड तरुणी लज्जा व मर्यादा ह्यांना त्या समयीं रजा देऊन फारच बीभत्स अशी थट्टामस्करी करितात. सासूबाई आपण होऊन किंवा इतर स्त्रियांच्या मार्फतीनें जांवयाशीं परिचय करून घेतात. मेहुण्या व इतर तरुणी नवऱ्यामुलाचे

बासरघरांतील विलक्षण विलास!

कान उपटतात, आणि वाटेल तशी थट्टा करितात. त्याची होत असलेली फजीती पाहून सर्वजणी पोट धरधरून हांसतात. तो बिचारा ह्या बाष्कळ-पणास कंटाळून जातो; व ' आतां मला माफ करा ! माझें डोकें दुखावयास लागलें ! ' अशी त्या प्रमदांची विनवणी करितो. परंतु व्यर्थ ! त्यानें अशी सबब सांगितली, तर त्या लागलीच त्यास विनोदानें ह्मणतात:–'अहो थोडा सोडा घ्या! कोलन वॉटर, नाहींतर गुलाबपाणी डोक्यावर शिंपडा ! ह्मणजे डोकें उतरेल. पण असे कंटाळता काय हो !' इतक्यांत कोणी चतुर असते, ती चटसरशी नवरीस आणून नवऱ्यामुलाच्या मांडीवर बसविते, व तिच्या तोंडावरचा बुरखा काढून त्यास विचारते, ' अहो ! ही पहा, ही तुह्मांला आवडतेना ? ' नवरी बिचारी लाजून पुन्हां बुरखा घेण्याचा प्रयत्न करिते, पण तिच्या बहिणी तिला तो घेऊं देत नाहींत. उलट त्या नवऱ्याच्या कानीं कपाळीं एक सारखी टकळी सुरू ठेवितात कीं, ' ही बायको तुह्मांला आव-डते कीं नाहीं सांगा ! ' अखेरीस तो त्रासून सांगतो ' हो, आवडते–आव-डते ! आतां पुरें करा ! ' पण येवढ्यानें त्या लीलावतींचें समाधान होत नाहीं. नवऱ्यामुलानें कंटाळूं नये–निजूं नये–ह्मणून त्या त्यास अनेक उप-चार देखील करितात. पण चावटपणाचा कळस झाल्यावाचून–आपली सर्व प्रकारच्या थट्टेची हौस पुरी झाल्यावाचून–त्या वरास सोडीत नाहींत. हा चावटपणाचा कळस ह्मणजे नवऱ्यामुलानें बायको मला आव-डते असें कबूल करितांच त्या उभयतांस एकशय्येवर निजविणें ! नवरा-मुलगा पाहुणाच असतो, आणि त्यांतून अंतःपुरांत परकीय स्त्रियांच्या आधीन बनलेला असतो, तेव्हां त्याचें कांहीं चालत नाहीं. त्यास काय ! त्या सांगतील तेथें निजलेंच पाहिजे. तो निजला, ह्मणजे त्याच्या शेजारीं नवरीला निज-ण्यास सांगतात ! लज्जा आणि भीति ह्या दोन मनोविकारांनीं तिचा कोंडमारा होतो. पण उच्छृंखल झालेल्या सर्व स्त्रियांपुढें तिचें काय चाल-णार! तिलाही निरुपायानें त्या सांगतील तसें करणें भाग पडतें. ती आपले हातपाय पोटाशीं धरून शय्येच्या एका कडाशीं पडून राहते, व सारी रात्र

मोठ्या संकटानें कंठून उजेडल्याबरोबर गोरेंमोरें तोंड करून आपल्या मावशीजवळ जाऊन दडते. मावशी तिचें सांत्वन करितात,—'बेटा, असेंच करावें लागतें. तुझी बहीण 'सरोजिनी' हिलाही लग्नांत ह्याप्रमाणें करणें भाग पडलें.' वगैरे वगैरे.

सर्जेतोलानी.

सर्जेतोलानी—नवरामुलगा सकाळीं उठून बाहेर जावयास लागला, ह्मणजे त्याच्या मेहुण्या त्याचा पदर धरून त्यास **सर्जेतोलानी** देण्याबद्दल अडवितात. सर्जेतोलानी ह्मणजे रात्रभर जागल्याबद्दल आणि बिछाना काढिल्याबद्दलचा एक कर आहे, तो नवऱ्यामुलानें मेहुण्यांस द्यावा लागतो. त्याची रकम बत्तीसपासून पन्नास रुपयांपर्यंत असते. ती नवऱ्यामुलानें आपल्या पक्षाच्या मनुष्यास हांक मारून त्याजकडून चुकती करविली, ह्मणजे मेहुण्या संतोष पावून त्याची सुटका करितात.

बासीविवाह.

बासीविवाह—नंतर कांहीं वेळ विश्रांति घेतल्यावर नवऱ्यामुलाचा श्मश्रु व स्नान होतें. पुढें स्त्रियांच्या प्रमुखतेखालीं **बासीविवाह** ह्मणून कांहीं कृत्य करण्यांत येतें. त्यांत आदले दिवशीं रात्रीं जे सोहळे अंतर्गृहांतील खोलींत होतात ह्मणून वर सांगितलें आहे, त्या बहुतेकांची आवृत्ति असते. स्त्रिया वधूवरांस तीं दीर्घायुषी व सुखी होवोत ह्मणून आशीर्वाद देतात; आणि त्या उभतांकडून 'आह्मीं ब्रह्मचर्यव्रत सोडून गृहस्थाश्रमी झालों,' अशा अर्थाचें विधान करवितात. बासीविवाह करण्याचा मुख्य उद्देश हाच होय.

वधूवरक्रीडा.

वधूवरांचे कांहीं खेळ—नंतर वधूवरांना एका खोलींत नेऊन त्यांजकडून पुढील खेळ खेळवितातः—नवऱ्यामुलीच्या डाव्या हातांत मावतील तितक्या कवड्या देऊन त्या तिला वरापुढें ठेवण्यास सांगतात. नंतर वराच्या उजव्या हातीं मावतील तितक्या त्यास देऊन त्या वधूपुढें ठेवण्यास सांगतात. अर्थात् वरानें ठेविलेल्या कवड्यांची

संख्या जास्त भरते. त्यावरून तो बायकोला पुष्कळ पैसे मिळवून देईल परंतु, ती त्या पैशांचा खर्च काटकसरीनें करील असें त्या खुळ्या स्त्रिया मानितात. नंतर दाळतांदुळांनीं भरलेलीं चार सुगडें वधूपुढें ठेवितात; व त्यांतील धान्य तिला सुपांत काढून टाकण्यास सांगतात. तिनें त्याप्रमाणें केल्यावर वराकडून तें फिरून ज्यांतलें त्यांत भरवितात; आणि वधूकडून नवऱ्याचें नांव घेववून त्या सुगडांच्या तोंडांवर झांकणें ठेववितात. ह्यावरून ती नवऱ्याचें तोंड असेंच बंद करील, त्यास आपणांला रागें भरूं देणार नाहीं--शिवीगाळ करूं देणार नाहीं--असें समजलें जातें!

फराळ, व मेजवानी.

वधूवरांचा फराळ आणि जेवण--नंतर वधूवरांचा फराळ होतो. त्यांत फळें व मिठाई हे पदार्थ असतात. ह्या लोकांत वधूवरांनीं एकमेकांस घांस घालण्याचा प्रचार नाहीं. फार तर वरानें घांस वधूच्या हातीं द्यावयाचा, व तिनें तो आपल्या हातानें खावयाचा. ह्याप्रमाणें वधूनें घांस घेतल्यावर स्त्रिया विनोदार्थ तिला ह्मणतात, 'अशीच नवऱ्याच्या हातानें नेहमीं जेवीत जा हो!' फराळ झाल्यावर स्त्रीपुरुष मंडळी वधूवरांवर दूर्वा, अक्षता, वगैरे टाकून त्यांस आशीर्वाद देतात. नंतर कांहीं वेळानें वरण, भात, भाज्या, मासे, मिठाई, दहीं, दूध, इत्यादि पदार्थांची वरास मेजवानी देतात. मेजवानीमध्यें नवरा मुलगा जेवावयास लाजतो, ह्मणून त्याच्या मेहुण्या त्यास आग्रह कर-करून वाढितात; व त्याचें जेवण झाल्यावर त्याचें ताट दुसऱ्या एका खोलींत नेऊन त्यांतच वधूला जेवावयास वाढितात. नवऱ्याच्या उष्ट्या ताटांत जेवल्यानें त्या परस्परांमध्यें प्रीति वृद्धिंगत होऊन ती दृढ होते, अशी समजूत आहे.

वरातीच्या पूर्वींचीं कृत्यें.

वरातीच्या पूर्वींचीं कांहीं कृत्यें:--जेवणीं झाल्यावर वरातीची मिरवणूक काढण्याच्या तयारीस लागतात. ह्याप्रसंगीं वरपिता वराच्या बहिणींना **ननंदखयमी** ह्मणून पन्नास रुपये बक्षीस करितो. तसेंच वधूच्या बहिणींना पूर्वी सांगितलेली **सर्जे तोलानी** दिली नसल्यास ती ह्या समयीं चुकती करण्यांत

येते. भटभिक्षुकांस दक्षिणा, व फकीरांस खैरात वांटली जाते; आणि 'वधूवरें चिरायु होवोत ! त्यांचा जयजयकार असो ! ' वगैरे आशीर्वचनें देणाऱ्या भाट लोकांस यथाशक्ति बक्षिसें देतात. नंतर वधूवरांस पाटांवर बसवून त्यांच्यापुढें एका पात्रांत गंगोदक व एका डबींत कुंकूं घालून ठेवितात. स्त्रिया त्यांच्या कपाळीं दहीं, ताग, व दुर्गादेवीचा अर्घ्या लावितात. हा अर्घ्या ह्या पूर्वी आठ दिवस पर्यंत वधूच्या वेणींत ठेविलेला असतो. तसेंच वधूच्या कपाळीं कुंकूं सिंदूर वगैरे सौभाग्यद्रव्यें लावून **कनकांजलि** ह्मणून कांहीं कृत्य करण्यांत येतें.

' सासरची पाठवणी. '

सासरच्या पाठवणीचा देखावा:—त्यानंतर वधूगृहीं जिकडे तिकडे शांतता आणि उदासीनता दिसून येते. वधूचीं मातापितरें अंत:पुरांत स्त्रियांच्या समुदायामध्यें अश्रुपात करीत होत्सातीं उभीं असतात. वधूचा बाप वराचा हात धरून सद्गदित कंठानें त्यास ह्मणतो:– ' बाबू ! आजपर्यंत ही आमची मुलगी आमच्या देखरेखीखालीं होती; ती आतां ईश्वरसत्तेनें आपल्या पदरांत घातली आहे,–आपल्या ताब्यांत दिली आहे,–तिचें सर्वस्वी संरक्षण करणार आपण आहां. तेव्हां तिच्या अपराधांबद्दल क्षमा करून तिला संभाळून घ्या,–प्रेमानें वागवा,–येवढीच प्रार्थना आहे! ' हें त्याचें ह्मणणें नवरामुलगा गंभीर चर्येनें ऐकून घेतो. वधूच्या सर्व नातेवाईक स्त्रिया सजल नेत्रांनीं आणि करुण मुद्रांनीं वधूवरांकडे बघत असतात. त्यांतून वयोवृद्ध असतात, त्या आपापल्या परी वरास ' मुलीला प्रेमानें वागवा ! ' असें काकूळतीनें सांगतात. ह्या वेळीं मुलीच्या आईची स्थिति काय विचारावी ! ती स्फुंदून स्फुंदून रडत असते. तिला आपल्या कन्येचें भावी विरहदु:ख असह्य होतें. विशेषत: वधू, ही जर तिची एकुलती एक मुलगी असली, तर मग तिच्या खेदास पारावारच राहत नाहीं ! संसारांत मुलीची ' सासरची पाठवणी ' हा प्रसंग मोठा दु:सह आहे ! जर कोणास वत्सल आणि करुण ह्या दोन नाजुक रसांच्या मिश्रणाचें नाजुक चित्र पहाणें असेल, तर तें हेंच होय!

जनकासारखे विदेही आणि कण्वासारखे तपस्वी देखील ह्या प्रसंगीं मायाजालांत बद्ध होऊन,– मोहानें मूढ होऊन,–अश्रुपात करिते झाले ! मग प्राकृत संसारी जनांची त्या वेळची स्थिति काय विचारावी ! असो. मुलीची आई दुःख करितांना पाहून इतर स्त्रिया तिचें सांत्वन करितात; व तिला घेऊन मिरवणूक पाहण्यासाठीं माडीवरील खिडकीशीं किंवा गच्चीवर जाऊन बसतात.

वरातीची मिरवणूक.

वरातीची मिरवणूकः—वरातीची मिरवणूक, ही वरप्रस्थानाच्या मिरवणुकी प्रमाणेंच मोठ्या थाटानें काढण्यांत येते. ती पाहण्याकरितां हजारों पुरुष रस्त्यावरून, व स्त्रिया वातायनांतून बसलेल्या असतात. मिरवणूक वरगृहीं पोहोंचल्यावर वरास आपल्या वाहनावरून, व वधूस मेण्यांतून खालीं उतरवितात, आणि त्यांच्या सन्मानासाठीं रस्त्यांत पाण्याची धागर ओतितात. नंतर वधूला स्त्रीनातलगाच्या कडेवर देऊन आणि गोषाऐवजीं वराचा शेला तिच्या भोंवतीं धरून त्या नवीन जोडप्यास अंतःपुरांतील खोलींत घेऊन जातात.

वधूप्रवेशानंतरचीं कृत्यें.

वधूप्रवेशानंतरचीं कृत्यें.—पुढें वरास एका रंगित पाटावर, आणि वधूला एका ताटांत दूध व अळित्याचें पाणी ह्यांचें मिश्रण करून त्यांत उभी करितात; व तिच्या हातीं 'सोल' नांवाचा मासा देतात. जवळच विस्तवावर एका भांड्यांत दूध तापत ठेविलेलें असतें. तें उतास आलें, ह्मणजे वधूचा बुरखा काढून तिला तो ऊत पाहण्यास सांगतात, व तिजकडून ' माझ्या सासऱ्याच्या संपत्तीला असाच ऊत येवो ! ' असें त्रिवार ह्मणवितात. नंतर तिची सासू तिच्या कपाळीं कुंकू लावून व तिच्या डाव्या हातांत एक लोखंडाची बांगडी घालून ती आपल्या नवऱ्यासह सुखानें नांदो ! असा तिला आशीर्वाद देते. मग एका टोपलींत तांदूळ घालून व त्यांवर कुंकवाची डबी ठेवून ती टोपली वधूच्या डोकीवर ठेवितात; आणि वरास आपला डावा हात तिच्या मस्तकास लावावयास सांगतात. पुन्हां वरमाता त्या उभतांच्या मस्तकांस कित्येक मंगळ

द्रव्यें जीं वर अनेक ठिकाणीं येऊन गेलीं आहेत, तीं लावून वराकडून त्याच्या हातीं असलेल्या अडकित्यानें कांहीं तांदूळ जमीनीवर टाकविते. पुढें रेशमी कपड्याच्या पायघड्यांवरून वधूवरांस दुसऱ्या एका दालनांत नेतात. त्यांच्या पाठीशीं दोन स्त्रिया चालत असतात. त्यांपैकीं एक शंखनाद करिते, व दुसरी त्यांजवर पाण्यानें प्रोक्षण करिते. अशा रीतीनें तें जोडपें दालनांतील बिछायतीवर आलें, ह्मणजे स्त्रियांच्या मध्यभागी बसतें. नंतर त्यांजकडून कवड्यांनीं **जातुक** नांवाचा एक खेळ खेळवितात. तो झाल्यावर त्यांजवर अक्षता व दूर्वा वगैरे टाकून स्त्रिया त्यांस आशीर्वाद देतात. सुनेनें आपल्याशीं गोड बोलावें, व आपण सांगूं तें प्रेमानें ऐकून त्याप्रमाणें वागत जावें, एतदर्थ सासूबाई तिच्या तोंडांत साकर आणि कानांत मध घालितात ! नंतर कोणी स्त्री वराच्या मांडीवर एखादें बालक देऊन तें त्यास वधूच्या जवळ देण्यास सांगते. त्यांतील उद्देश स्पष्टच आहे ! हें कृत्य झाल्यावर सासू व इतर नातेवाईक स्त्रिया नवीन सूनबाईला यथाशक्ति सौभाग्यालंकारांचा आहेर करितात. पुढें त्या उभयतांस स्वयंपाक घरांत नेऊन वधूला सर्व पक्वान्नांकडे पाहण्यास सांगतात; व तिजकडून ' माझा सासरा नेहमीं असाच सुखसंपत्तींत राहो! ' अशी परमेश्वराची प्रार्थना करवितात. स्वयंपाक घरांतून निघतांना नवरामुलगा नवरीला एक साडी व पक्वान्नांनीं भरलेलें ताट देतो, व 'मी तुला आजपासून अन्नवस्त्र देत जाईन.' असें ह्मणतो. नवरी सुंदर नसली, तर नवऱ्यामुलाच्या भावजया त्या संबंधानें त्यास विनोदानें चिडवितात.

बौभात–मेजवानी व आहेर.

बौभात—वधूप्रवेशासंबंधीं सर्व सोहळे आटोपल्यावर वरपक्षाकडून जवळच्या नातेवाइकांस आणि इष्टमित्रांस **बौभात** नांवाच्या मेजवानीला बोलावण्यांत येतें. ह्या मेजवानींत वरण, भात, भाज्या, मासे, पुलाव, वगैरे पदार्थ असतात. ह्याप्रसंगीं वधू कुटुंबांतील एक मनुष्य झाली, असें दाखविण्याकरितां तिजकडून एखादें

पक्वान्न वाढवितात. जेवणार मंडळींतून प्रत्येकजण वधूला दोन, चार, किंवा अधिक रुपये आहेरादाखल देतो.

फुलशय्येचा सोहळा.

फुलशय्या:—दुसऱ्या दिवशीं रात्रौ वधूचा बाप जांवयाला नानाप्रकारचीं पक्वान्नें, मिठाई, फळफळावळ, लोणी, खडीसाकर, अत्तरें, हार, धोतरजोडा, वधूसाठीं साडी, बिछाना, तांब्यापितळेचीं किंवा चांदीचीं भांडीं, वगैरे अनेक संसारोपयोगी व उपभोग्य वस्तूंचा नजराणा पाठवितो. ह्या वस्तु ठाकूरदालनांत व्यवस्थेनें मांडून त्या पाहण्याकरितां इष्टमित्रांस बोलावितात. ते सर्व वस्तूंची तारीफ करितात. तत्रापि, असमाधानी स्त्रिया त्या नजराण्यांत कांहींना कांहीं व्यंगें काढून घरांत नाकें तोंडें मुरडतात व टीका करितात. असो. हा नजराणा घेऊन येणाऱ्या मनुष्यांस जेवूं घालून त्यांस वरपक्षाकडून प्रत्येकीं रुपया किंवा दीड रुपया बक्षीस देण्यांत येतो. नंतर वधूवरांस तीं वस्त्रें परिधान करवून, चंदन लावून, पुष्पहार घालून, एकमेकांच्या सांगत बसवून त्या नजराण्यांतील पदार्थ खाऊं घालितात. घांस देववितात. स्त्रिया त्यांचें कौतुक पाहण्यास जवळ उभ्या राहतात; व एकीमेकींस विनोदानें ह्मणतात,'पहा! राधाकृष्णाचें जोडपें कसें एकत्र जेवीत आहे! उभयतां चिरायु असोत, व एकमेकांसंगतीं अशीच आनंदानें कालक्रमणा करोत!' वगैरे. वरमाता त्या नवीन जोडप्याचा हा सोहळा पाहून फार आनंद पावते. भोजनोत्तर, बासरघरांत नानाप्रकारच्या सुवासिक द्रव्यांनीं आणि पुष्पास्तरणानें एक शय्या शृंगारून ठेविलेली असते, तीवर तें नवविवाहित जोडपें शयन करितें. शय्यागृह बंद झालें, तरी नवऱ्यामुलाच्या बहिणी, भावजया, वगैरे ज्या तरुण स्त्रिया बाहेर असतात, त्या फटींतून आंतील विलासाचे प्रकार पाहून व उभयतांचीं भाषणें ऐकून त्यांची थट्टामस्करी करितात. ह्या कृत्यास त्यांच्यामध्यें **अरिपाटो** अशी पारिभाषिक संज्ञा आहे. अशा रीतीनें ती फुलशय्येची रात्र मौजेंत आणि हास्यविनोदांत घालविण्यांत येते.

माहेरची पाठवणीः–दुसऱ्या दिवशीं सकाळीं वेणीफणी, स्नान, व फराळ करून, आणि इतर समवयस्क मुलींबरोबर पत्ते वगैरे करमणुकीचे खेळ खेळून माहेरची पालखी व बोलावणें आल्यावर ती नववधू चांगलीं वस्त्रें परिधान करिते, आणि वडिलांना नमस्कार करून आपल्या आईकडे जावयास निघते. तेव्हां कोणी स्त्री तिचे पाय धुते, व 'सासऱ्याच्या येथें राहून चिरसावित्री हो!' असा तिला आशीर्वाद देते. नंतर सासूबाई तिला मेण्यांत बसवून तिची रवानगी करितात. माहेरीं गेल्यावर आई मुलीला मोठ्या प्रेमानें कुरवाळून ह्मणते, 'बेटा, माझे चन्द्रानने! तूं कुठे गेली होतीस! तुला आमची आठवण नाहीं का झाली! तूं गेल्यामुळं आह्मांला घरांत करमेनासं झालं! बरं, आह्मी पाठविलेली फुलशय्या (अर्थात् ह्या नांवाखालीं तत्संबंधीं सर्व वस्तूंचा अंतर्भाव होतो.) तुझ्या घरच्या मंडळींना पसंत पडली का? का त्यांनीं आमची टर उडविली?' वगैरे. ह्या प्रश्नांचीं मुलीनें उत्तरें दिल्यावर तिची आई व इतर इष्टमित्र स्त्रिया मुलीच्या अंगावरील प्रत्येक दागिना निरखून पाहून व त्या दागिन्यांची इतरांच्या तसल्याच दागिन्याशीं तुलना करून आपल्या कल्पनेनें किंमत ठरवितात. बनेल तेथपावेतों मुलीचे दागिने आपले सरासरीच आहेत, असें ठरविण्याकडे त्या स्त्रियांचा कल विशेष असतो! असो. नंतर हातांतील सोन्याच्या बांगड्या, व गळ्यांतील सरी, येवढे दागिने तिच्या अंगावर ठेवून बाकीचे काढून घेऊन आई ते आपल्यापाशीं ठेविते; व नवरी मुलगी एखादी साधी साडी नेसून आपल्या मैत्रिणीसंगतीं गप्पागोष्टींत व हास्यविनोदांत रममाण होते.

घरबासथः—घरबासथ ह्मणजे सासरीं राहणें. ह्या लोकांत लग्नापासून आठ दिवसांच्या आंत मुलगी सासरीं गेली नाहीं, तर पुढें रूढीनें एक वर्षभर तिला तेथें जाण्याला प्रतिबंध असतो. सबब, त्या मुदतीच्या आंत तिचा घरबासथ हा सोहळा करून घेतात. मुलीला घ्यावयास तिच्या माहेरीं मेणा व मोलकरणी पाठवितात. ती सासरीं

माहेरची पाठवणी.

घरबासथ व लग्नसमाप्ति.

आल्यावरचा बहुतेक प्रकार साधारणतः फुलशय्येच्या सोहळ्यासारखाच असतो. सबब, त्याची पुनरुक्ति करणें नलगे. ह्या सोहळ्याच्या दुसऱ्या दिवशीं वधूवरांच्या हातांतील ' **चरक** ' ह्मणजे विवाहकंकणें सोडितात; आणि लग्नसोहळ्यांची समाप्ति होते.

वधूचा पितृगृहवास.

लग्नानंतर मुलगी एक दोन वर्षें आपल्या बापाच्या घरीं राहते. सदरहू मुदतींत केव्हां केव्हां कांहीं सण वगैरे असल्यास तिला तिच्या सासरचीं माणसें बोलावून नेतात. ह्या प्रमाणें तिचें माहेरीं वास्तव्य, ती ऋतुस्नात होईपावेतोंच असतें. पुढें नाहीं.

उपसंहार.

आह्मांला उपलब्ध झालेल्या सदरहू माहितीवरून पाहतां, बंगाली लोकांत आचार अथवा रूढि यांचेंच माहात्म्य विशेष दिसून येतें. एकंदर लग्नकार्यामध्यें विधीपेक्षां सोहळेच फार आहेत, व त्यांतून कित्येक तर अमर्यादेचे व अनीतीचेही आहेत; आणि ते बंगाली लोकांच्या विद्वत्तेला, वक्तृत्वाला, आणि देशसुधारणा करण्याच्या बाण्याला लांछन लाविणारे आहेत, असें मोठ्या दिलगिरीनें ह्मणावें लागतें! जोंपर्यंत हे लोक आपली कृति,—आपलें आचरण,—सुधारणार नाहींत, तोंपर्यंत ह्यांची वाचाळता व्यर्थ होय!

कुचबिहार व आसामांतील कांहीं लोकांच्या लग्नरीती.

ह्या लोकांविषयीं दोनशब्द, व त्यांची लग्नरीति.

राजबन्सी अथवा राजवंशी हे लोक **कुचबिहारचे** रहिवासी आहेत. ह्यांस **कोच** असेंही ह्मणतात. परंतु, हें नांव त्यांच्या **कुचबिहार** ह्या वसतिस्थानावरून इंग्रज लोकांनीं दिलें असावें, असें वाटतें. ह्या लोकांत प्रथमविवाह **गांधर्व** किंवा **ब्राह्म** पद्धतीनें केला जातो. विधवाविवाहाचीही चाल आहे.

चलनबत्तीचा सोहळा.

गांधर्व पद्धतीनें विवाह करावयाचा असला, ह्मणजे मुलीच्या पुढें **चलनबत्ती** ह्मणून एक प्रकारचा नजराणा ठेवावा लागतो. वरानें तिला एक नवें वस्त्र व मणगटावर घालण्याचे शंखाचे केलेले गोठ द्यावयाचे. वधूवरें एकमेकांस माळा घालितात. समंत्रक असा कोणताच विधि करावा लागत नाहीं. त्यामुळें लग्नकार्यांत उपाध्यायाची जरूर नसते. तरुण सुवासिनी मुलीच्या पुढें चलनबत्ती ठेवितात, ह्मणजे झालें. कनिष्ठ प्रतीच्या लोकांत असा विवाह क्वचितच होतो. परंतु, उच्च लोकांत मात्र तो फार आढळतो. अशा विवाहाची प्रतिष्ठा मानीत नाहींत. तथापि, तो रद्दही होत नाहीं.

ब्राह्मविवाह रीती.

ब्राह्म विवाहानें होणारें लग्न साधारणतः अन्यत्र होणाऱ्या तसल्या लग्नाप्रमाणेंच असतें. परंतु, त्यांतील पुष्कळ विधि गाळितात. कोणी कोणी सप्तपदी व विवाहहोम हे महत्वाचे भाग असूनही ते करीत नाहीत. मुलीला एका पाटावर बसवून नवऱ्यासभों-

वतीं सातवेळ फिरवितात, ह्मणजे सप्तपदी झाली ! हें कृत्य होत असतां न्हावी तिच्या डोक्यावर छत्री धरितो. हा ब्राह्मविवाहाचा प्रकार झाला.

विधवाविवाह करण्यास कोणताही विधि लागत नाहीं. त्यापासून झालेल्या मुलांस बापाच्या मालमिळकतीचे मालक मानितात. परंतु, अशा मुलास हिंदू लोक औरस मानीत नसतात. राजबन्सी लोक सुद्धां तीं मुलें कमी योग्यतेचीं समजतात.

विधवा विवाहाचे प्रकार.

पुनर्विवाहित स्त्रियांस त्यांचा पुनर्विवाह ज्या पद्धतीनें झाला असेल, त्या पद्धतीवरून निरनिराळीं नांवें देतात. उदाहरणार्थ डांग्वा, धोका, पाशुआ, वगैरे. डांग ह्मणजे लांब काठी अथवा तिनें दिलेला तडाका. जेव्हां एखादी विधवा स्वतंत्र राहते, आणि एखादा पुरुष डांग घेऊन तिच्या घरीं जातो, व ती तिच्या छपरावर मारून दार उघडून तिला बळकावतो, तेव्हां त्या स्त्रीस डांग्वा असें ह्मणतात. परंतु, असा विवाह त्या उभयतांचा पूर्वसंकेत असेल तरच होतो. धोका ह्मणजे आंत शिरणें. जेव्हां एखादी विधवा आपण होऊन एखाद्याच्या घरांत शिरते, तेव्हां तिला धोका असें ह्मणतात. पाशुआ अथवा पाश ह्या शब्दाचा अर्थ ‘ नंतर ’ असा आहे. एकदा विवाह होऊन विधवा झाल्यानंतर तिचा कोणीं स्वीकार केला, ह्मणजे ती पाशुआ झाली. अर्थात् पाशुआविवाह, हें पुनर्विवाहाचें दुसरें नांव आहे, असें ह्मटलें तरी चालेल.

सांतळ-ह्या लोकांत विवाहाच्या दिवशीं मुलगा मुलीच्या घरीं मंडळीसहवर्तमान जातो. तेथें त्यांस चटयांवर बसवितात. कांहीं फराळ झाल्यानंतर मुलीचा बाप मुलीचा हात उचलून वराच्या हातावर ठेवतो, व त्यानें तीस ममतेनें वागवावें, ह्या विषयीं त्याची प्रार्थना करून त्यास आपली मुलगी देतो. वर आपल्या करंगळीनें वधूच्या कपाळीं शेंदूर लावितो, आणि तिच्या करंगळींत आपली करंगळी अडकवून तीस आपल्या घरीं नेतो, ह्मणजे लग्नकार्य संपलें.

लग्नरीति.

ह्या लोकांत पुष्कळ बायका करण्याची चाल आहे. जर एखादा पुरुष मरून त्याच्या मागें पुष्कळ विधवा राहिल्या, तर त्या आपल्या सख्ख्या दीरांस अथवा चुलत दीरांस आपले नवरे करूं शकतात. सगळ्याच एकाच्या बायका होत नाहींत. परंतु, एकेक एकेकाची होते. कोणीही मनुष्य एखादी स्त्री जवळची आप्त असेल, तर तिला आपली बायको करूं शकत नाहीं.

बहुपत्नीकत्व, व पुनर्विवाह.

सदरहू लोकांत लग्नसमयीं उपाध्यायाची जरूर लागत नाहीं. वधूवरांनीं एके ठिकाणीं भोजन करणें, हाच मुख्य विधि समजतात. ह्या कृत्यानें मुलगी आपल्या बापाच्या गोत्रांतून तुटते, आणि नवऱ्याच्या गोत्रांत जाते, अशी समजूत आहे.

लग्नासंबंधीं एक समजूत.

आसाम प्रांतांतील कांहीं लोकांत वधूवरपक्षांनीं एकमेकांस पान-सुपारी दिली, ह्मणजे लग्नविधि आटोपतो. कित्येक जातींत उभय पक्षांची एक लटकी लढाई होऊन तींत वरपक्षाची ठरीव सरशी होते. नंतर वरपक्षाकडून वधूच्या बापाची संभावना होऊन लग्नसमारंभ संपतो. **संथळ** परगण्यांतील लोकांत सोळा वर्षांच्या आंतील मुलांची आणि पंधरा वर्षांच्या आंतील मुलींचीं लग्नें करीत नाहींत. वयांत आलेलीं मुलें व मुली एकमेकांत निःशंकपणें मिसळतात, व त्यांस आपल्या इच्छेनुरूप आपापल्या जन्माचे सोबती व सोबतिणी पसंत करून घेण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असतें. तथापि, आईबाप अथवा पालक यांनीं मुलाला नवरी पाहून देणें, हें अधिक चांगलें, असें समजतात. वरपक्षाकडून वधूच्या पित्यास अथवा पालकास मुलीबद्दल पांच रुपये देण्यांत येतात. वरानें वधूच्या कपाळीं शेंदूर लावून वधूवरें एका पात्रांत जेवलीं ह्मणजे लग्नविधि संपला.

आसामांतील कांहीं लोकांच्या लग्नरीती.

चितागंग व टिपरांतील कांहीं लोकांच्या लग्नरीती.

लग्नरीति.

चकमासः—हे लोक चितागंग प्रदेशांतील टेकड्यांत राहतात. त्यांच्यांत कोणाला लग्न करणें झालें, ह्मणजे तो मनुष्य आपल्या मित्रमंडळीसह आपल्याला पसंत असेल त्या वधूच्या घरीं जातो. घरांत प्रवेश झाल्यावर वधूवरें एका लहान चौरंगाजवळ बसतात.त्या चौरंगावर केळीच्या पानांवर कांहीं अंडीं, मिठाई, व फळफळावळ वगैरे पदार्थ ठेवितात. वराकडील पाठराखा पुरुष,—ह्यास **सोंवळा** असें ह्मणतात,—वराच्या पाठीमागें बसतो; व मुलीकडील पाठराखी बायको,—हिला **सोंवळी** अशी संज्ञा आहे,—वधूच्या पाठीमागें बसते. मग सोंवळा व सोंवळी हे दोघेजण वधूवरांच्या सभोंवतीं एक मखमालीचें कापड धरून जमलेल्या चकमास मंडळीस विचारितात:—'आपणांस हा विवाह पसंत पडतो काय ?' ह्या प्रश्नाला उत्तरादाखल व अनुमोदनादाखल सर्व चकमास 'त्यांस बांधा ! त्यांस बांधा !' असें ओरडतात. नंतर तीं वधूवरें एका पात्रावर जेवतात; व परस्परांस घांस देतात. भोजनोत्तर कोणी वृद्ध मनुष्य त्या जोडप्यावर नदींतील पाणी शिंपडतो; व तीं दोघें नवराबायको झालीं, असें सर्वांस सांगतो; आणि त्या स्त्रीला वांझपणा येऊं नये, ह्मणून एक मंत्र ह्मणतो, ह्मणजे लग्नकार्य आटोपलें.

ओरिसा, सिंगभम, मानभूम व लोहारडग्यांतील लोकांच्या लग्नरीती.

लग्नरीति.

भूया हे लोक बोनाई नांवाच्या संस्थानांत व ओरिसा प्रांतांत राहतात. त्यांचा विवाह अगदीं साध्या रीतीनें होतो. ओरिसा प्रांतांतील भूयांत प्रसिद्धपणें विवाह करणें, हें मान्य आहे. एखाद्या तरुण मुलाची एखाद्या तरुण मुलीवर प्रीति जडली, ह्मणजे तो आपल्या कांहीं मित्रांस तिजकडे बोलणें लावण्यास पाठवितो. जर ती कबूल झाली, तर एक दिवस नेमितात; व मुलाच्या तर्फेनें तिजकडे एक भाताचें ओझें पाठवितात. वर आपण स्वतः मुलीच्या घरीं जात नाहीं; परंतु, त्याचे मित्र जाऊन तीस आणि तिच्या मित्रांस घेऊन येतात. नंतर तीं सर्व माणसें नाचणें, जेवणें, व आनंद करणें, ह्यांत एक अहोरात्र घालवितात. दुसऱ्या दिवशीं सकाळीं वर वधूच्या मित्रांस प्रत्येकीं तीन मापें भात (साळी) व तीन मापें तांदूळ देऊन त्यांची रवानगी करितो, ह्मणजे लग्नकार्य संपलें. सामर्थ्य असल्यास पाहिजे त्यानें आपणांस वाटतील तितक्या बायका कराव्या. तत्रापि, दोहोंपेक्षां जास्त कोणीही करीत नाहीं. हा ओरिसा प्रांतांतील भूयांचा रिवाज झाला. बोनाईतील भूयांत तर ह्याही पेक्षां अगदींच साधा मार्ग आहे. ते आपल्या मुलास आजाचें नांव देतात, आणि तें दिल्यानंतर विवाहापर्यंत कोणतेच विधि होत नाहींत. वधूवरें वयांत आल्याखेरीज त्यांचा विवाह होत नाहीं; व तो विवाह त्यांच्या आईबापांकडून सहज ठरविण्यांत येतो. त्यांत विशेष असें कांहींच नसतें.

कुरु अथवा मुआसिस् लोकांत लग्नासंबंधीं मुख्य विधि साधारणतः सप्तपदीच्या धोरणावर आहे. हे लोक एका खांबाजवळ पाण्यानें भरलेलें एक भांडें व दिवा लावून ठेवितात. त्याजवळच एका धोंड्यावर तांदुळांच्या व हळदीच्या सात पुंज्या करितात. सर्व तयारी झाली, ह्मणजे मुलीकडील मुख्य करवली मुलीस, व मुलाकडील पाठराखणा मुलास घेऊन त्या खांबाभोंवतीं एक प्रदक्षिणा घालतात; व बाकीच्या प्रदक्षिणा फक्त त्या उभयतांकडूनच करवितात. जेव्हां जेव्हां ते त्या धोंड्याजवळ येतात, तेव्हां तेव्हां वर वधूकडून एक एक पुंजी लातेनें उडवितो. ह्याप्रमाणें सातवी रास उडविली गेली, ह्मणजे मुलाकडील मुख्य मनुष्य खांबास धरून जोरानें हालवितो. हा खांब केवळ काठीसारखा रोंविलेला असतो. तो हालविला, ह्मणजे 'तें आटोपलें!' असें सर्व ओरडतात. नंतर वधूवरांस एखाद्या खोलींत कांहीं वेळ एकांतांत ठेवितात; व तीं बाहेर आलीं, ह्मणजे जमलेली मंडळी त्यांस आपला आनंद प्रदर्शित करिते, व लग्नविधि संपतो.

लग्नविधि.

सिंगभम येथें कुरनू ह्या जातीचे कांहीं लोक आहेत. त्यांच्यांत लग्नसमयीं वधूवरें आपापल्या बोटांतील रक्त काढून तें एकमेकांच्या कपाळीं लावितात, ह्मणजे लग्न झालें.

कुरनिस हे लोक मानभूमचे राहणारे आहेत. त्यांच्यांत लग्नसमयीं वधूला सभेमध्यें आणितात. तिचा सासरा तिला द्यावयाच्या देणग्या आणितो. तिचा भावी नवराही तेथें येतो. नंतर वधूला तिच्या मैत्रिणी मोहाच्या झाडाजवळ नेऊन त्याच्याशीं तिचा विवाह लावितात. तसेंच आंब्याच्या झाडाशीं वराचा विवाह लावितात! मग वधूला एका टोपलींत घालून विवाहमंडपांत आणितात! वर तिच्या कपाळीं शेंदूर लावितो, व ललाटस्थळीं एक लाल चिन्ह करितो. नंतर सर्व मनुष्यें 'हरिबोल सिंदूर दान!' असें ओरडतात. कांहीं ठिकाणीं आपण दोघें रक्तमांसानें एक झालों,

लग्नरीति.

असें दर्शविण्यासाठीं वधूवरें एकमेकांस रक्ताचे टिळे लावितात; व हेंच 'सिंद्रदान' ह्मणजे सिंदूरदानाचें मूलतत्त्व असेल असें वाटतें. हें कृत्य झालें, ह्मणजे त्या उभयतांत नवराबायकोचें नातें जडतें. मग सर्वजण त्यांस आपला आनंद प्रदर्शित करितात; व दुसऱ्या दिवशीं प्रातःकाळीं वधू वरा-सह त्याच्या घरीं जाते. ह्या लोकांत लग्न लावण्यासाठीं उपाध्यायाची जरूर नसते. लग्न शुभप्रद होईल किंवा कसें, ह्या विषयीं जोशांस प्रश्न विचारितात, व त्यांजकडून चांगला दिवस कोणता तो ठरवून त्या दिवशीं लग्न लावि-तात. ह्याशिवाय जोशांची अथवा ब्राह्मणांची त्यांस जरूर नसते.

लग्नरीति.

बिरहोर—हे लोक **लोहारडगा** परगण्यांतील रहिवासी आहेत. त्यांचा विवाहसमारंभ अगदीं साधा असतो. नवरा नवरीचा पाठलाग करून तिला दूर पळवून नेतो. जेव्हां त्या दोघांचा विवाहाचा संकेत होतो, तेव्हां त्यांच्या घरचीं माणसें मेजवानीच्या तयारीस लागतात. उकडलेला डुक्कर, शिजविलेलें माकड, आणि चरबींत शिजवि-लेल्या वनस्पती व कंदमूळें ह्या पदार्थांची मेजवानी देण्यांत येते. तांदुळां-पासून केलेलें, अथवा तें नसेल तर खुलु आणि खसुना नांवाच्या झाडांपासून काढलेलें मद्य, ते पितात. जेव्हां जेवण तयार होतें, तेव्हां दोहों-कडील वऱ्हाडी दोन पंक्तींत समोरासमोर बसतात. नंतर वराचा बाप "माझा मुलगा चालण्यांत चपळ आहे व मुलीस बोलावीत आहे." असें मुलीच्या बापास ह्मणतो, आणि मुलगी किती चपळ आहे तें दाखवावयास सांगतो. हें झाल्यानंतर ती उठते, आणि बापाची आज्ञा झाली, ह्मणजे धांवाव-यास लागते. ती जंगलांत पळून जाते, व कांहीं मिनिटांनंतर वर तीस धरावयास जातो. तो तिचा पाठलाग करीत असतां वऱ्हाडी गाणें गात अथवा गोष्टी सांगत बसतात. कोणी मनुष्य मुलाच्या चपळतेची, व कोणी मुलीच्या चपळतेची प्रशंसा करितो. मुलगा आरोळी देईपर्यंत इकडे वऱ्हाड्यांत हा प्रकार चालू असतो. वरास मुलगी सांपडल्यानंतर

तो आरोळी ठोकितो. मग सर्व स्तब्ध राहतात, व ताबडतोब जंगलांत जाऊन तेथें त्या वधूवरांचा विवाह लावितात. मुलगी परत येऊन मंडळींत मिळाल्यावर बायका तिला नवी साडी नेसावितात. ही साडी नवरा देतो.

उरावण—हे लोकही **लोहारडग्यां**तीलच राहणारे आहेत. त्यांच्यांत

लग्नरीति.

लग्नसमयीं मुलीच्या घरासमोर डहाळ्यांनीं आच्छादिलेला एक मांडव घालितात, व तेथें बायका वधूवरांस नेतात. एका नांगरावर धान्याची लोंबी ठेवून तिच्यावर एक धोंडा ठेवितात, व त्यावर त्या दोघांस उभें राहावयास सांगतात. नवरा नवरीच्या पाठीमागें उभा राहतो. परंतु, बायकोला अग्रस्थान–श्रेष्ठत्व–दिलें असें वाटूं नये, ह्मणून नवऱ्यानें तिच्या टांचांवर उभें रहावें, असा रिवाज आहे! नंतर वर वधूच्या कपाळीं शेंदूर लावितो. त्याचप्रमाणें तीही वराच्या कपाळीं शेंदूर लाविते. परंतु तो लावितांना तिनें आपलें तोंड मागच्या बाजूस नवऱ्याकडे वळवावयाचें नाहीं. फक्त आपले हात मागें करून शेंदूर लावावयाचा. हें झाल्यानंतर एक बंदूक सोडितात. नंतर पाण्यानें भरलेलीं भांडीं वधूवरांच्या अंगावर रिचवून त्यांस स्नान घालितात. मग ते उभयतां जवळच एक खोली तयार केलेली असते, तींत वस्त्रें बदलण्यासाठीं जाऊन कांहीं वेळ तेथेंच राहतात. नंतर जेव्हां ते बाहेर येतात, तेव्हां त्यांस लोक नवराबायको असें समजून नमस्कार करितात.

मानभावांच्या लग्नरीती.

जाती व रीतीबद्दल दोन शब्द

वऱ्हाड आणि **मध्यप्रांतांत मानभाऊ** ह्मणून एका जातीचे लोक आहेत. त्यांच्यामध्यें अगदींजुन्या काळच्या व चमत्कारिक रीती अद्यापि चालू आहेत. त्यांच्या लग्नसंबंधीं सोहळ्यांमध्यें जे हास्यकारक प्रकार दृष्टीस पडतात, ते धर्मसंबंधीं इतर सर्व कृत्यांतही आढळतात.

लग्नरीति.

अविवाहित रहावें अशी जरी ह्या लोकांची शपथ असते, तरी त्यांजमध्यें पुष्कळ व्यभिचार होतो, असा त्यांजवर आरोप आहे. अविवाहित रहावें अशी शपथ असूनही ह्यांस विवाह करण्याची परवानगी आहे! ह्यांच्या विवाहाच्या दोन रीती आहेत. (१) वधू व वर आपल्या महन्तापुढें लोळतात; व असें करतांना एकमेकांचा एकमेकांस स्पर्श झाला, ह्मणजे त्यांचें लग्न लागलें, व तत्संबंधीं विधीही आटोपला! (२) दुसरा प्रकार असा आहे कीं, दोघेजण आपल्या भिक्षा मागावयाच्या झोळ्या घेऊन महंतापुढें जातात, व तो परस्परांच्या झोळ्यांची गांठ मारितो. ती गांठ मारिली, ह्मणजे त्या स्त्रीपुरुषांचें लग्न लागलें, व विधि संपला!

गोण्ड लोकांची लग्नरीति.

जातीसंबंधीं कांहीं माहिती व राक्षस विवाहाची चाल.

मध्य हिंदुस्थानांत **गोंड** लोकांच्या कांहीं जाती आहेत. त्यांच्या निरनिराळ्या पोटजातींची वसती विशेषतः **वण** अथवा **वणी** प्रांतांत आढळते. प्रत्येक जातींत निरनिराळीं गोत्रें आहेत, व प्रत्येक गोत्रास एक निराळें नांव असतें, तें त्या गोत्रांतील सर्व माणसांस सारखेंच लागू असतें. निरनिराळ्या गोत्रांत निरनिराळ्या देवांच्या पूजा करितात. (१) चार देवांची पूजा करणारे (२) पांच देवांची पूजा करणारे. (३) सहा देवांची पूजा करणारे, व (४) सात देवांची पूजा करणारे, अशीं ह्या गोंडांचीं गोत्रें आहेत. ज्यांचें गोत्र एक, अशा स्त्रीपुरुषांचा एकमेकांशीं विवाह होत नाहीं. हे लोक अद्यापि अगदीं रानटी स्थितींत आहेत. पुरुष व स्त्रिया निरनिराळ्या ठिकाणीं व अंतरावर काम करितात. एकत्र मिळून करीत नाहींत. त्यांच्यांत **राक्षस विवाहपद्धति** अद्यापि अस्तित्वांत आहे. एखाद्या पुरुषास लग्न करावें अशी इच्छा झाल्यास, तो शेजारच्या खेड्यांत बायको करण्याजोगी कोणती मुलगी आहे, ह्याविषयीं माहिती मिळवितो. नंतर जेथें ती आपल्या सोबतिणींबरोबर काम करीत असेल, तेथें तो आपल्या मित्रांस बरोबर घेऊन जातो. ती मुलगी आपल्या मंडळींत मिळून आपल्या गांवांत पळून जावयाच्या पूर्वी जर ह्या तिच्या हातास स्पर्श करूं शकेल, तरच त्याचे मित्र त्याच्या मदतीस जातात. एखाद्या वेळीं त्या मुलीच्या सोबतिणींबरोबर ह्याची व ह्याच्या मित्रांची मारा-

मारीही होते; व ती कित्येक वेळीं वराच्या हस्तस्पर्शानंतरही होते. तथापि, एकदा हस्तस्पर्श झाला, आणि मग जरी त्या बायकांच्या मदतीस त्यांच्या गांवांतले पुरुष आले, तरी त्यांचें कांहीं एक चालत नाहीं. मग त्या स्त्री-पुरुषांचा विवाह झालाच पाहिजे, अशी चाल आहे.

लग्नाविषयीं अनुकूल व प्रतिकूल गोष्टी.

जीं झाडें व ज्या वनस्पती ज्या जातींत पूज्य असतील, त्या त्या झाडांच्या व वनस्पतींच्या डहाळ्या विवाहसमयीं घरांत आणाव्या लागतात. लग्न लावावयास सगोत्रत्वाशिवाय इतर कोणत्याही प्रकारची हरकत नसते. दोन्ही घराण्यांत तेच वृक्ष व त्याच वनस्पती पूज्य आहेत, असें आढळल्यास त्या घराण्यांत शरीरसंबंध होत नाहीं. ज्या जातींत एकाच देवांची पूजा होत असेल, तिच्यांतील स्त्रीपुरुषांचा विवाह होऊं शकत नाहीं. बायकोच्या बहिणीबरोबर विवाह करितां येतो; परंतु, मेलेल्या नवऱ्याच्या भावाबरोबर करितां येत नाहीं, असाही प्रकार कित्येक गोण्ड जातींत आढळतो.

आर्यसमाजाचा लग्नविधि.

आर्यसमाजासंबंधीं दोन शब्द.

मागें आह्मीं ब्रह्म–आणि प्रार्थना-समाजांचे लग्नविधी सांगितले आहेत (पहा.–पान ९१ तें ११६). त्या दोन संस्थांप्रमाणें **आर्यसमाज** हीहि एक भिन्न मतांची संस्था हिंदुस्थानांत आजमित्तीस विद्यमान आहे. ही कोणी व केव्हां अस्तित्वांत आणिली, त्यासंबंधानें विश्वसनीय माहिती आह्मांस उपलब्ध झाली नाहीं; व ती येथें देण्याची विशेष आवश्यकताही दिसत नाहीं. तत्रापि, ती सुधारणेच्या उद्देशानें नवीन उत्पन्न झाली आहे, ह्यांत संशय नाहीं. सबब, तिची जन्मतिथीही एकोणविसाव्या शतकापलीकडे नसेल, असें आमचें अनुमान आहे. तिच्या अनुयायांची मोठी संख्या **राजपुताना** आणि **पंजाब** प्रांतांत असून **अजमीर** व **लाहोर** हीं तिच्या चळवळीचीं केंद्रस्थानें आहेत, असें समजतें. लोकप्रसिद्ध **स्वामी श्रीमद्दयानंद सरस्वती,** हे सदरहू संस्थेचे जरी मूळ उत्पादक नसले, तरी एक पुरस्कर्ते असले पाहिजेत. कारण, त्यांचीं मतें ह्या समाजास ग्राह्य आहेत. ह्या समाजानें जी विवाहपद्धति स्वीकारिली आहे, ती त्यानें पूर्वोक्त स्वामींच्या **संस्कारविधि** नामक ग्रंथांतूनच घेतली आहे; आणि आह्मी ह्या समाजाचा ह्मणून जो लग्नविधि पुढें सांगत आहोंत, तोही त्याच पद्धतीवरून तर्जुमा करून घेतला आहे. हा समाज एकेश्वरवादी आहे. ह्याला मूर्तिपूजा संमत नाहीं. वेद ईश्वरप्रणीत आहेत, असें हा समजतो. ह्यास वेदवेदांगें आणि तद्विहित असेच आचारधर्म मान्य आहेत;

वर्णव्यवस्था ग्राह्य आहे, अग्नीच्या द्वारें परमेश्वरास हविर्भाग पोहोंचतो, हें मत कबूल आहे; आणि ह्या सर्व गोष्टींचा प्रादुर्भाव ह्याच्या लग्नविधींत स्पष्ट दिसून येतो.

विवाहाची व्याख्या, विवाहमुहूर्त, वधूवरपरीक्षा, वयप्रमाण, विद्याध्ययन, विवाहकाल व संबंधास अनुकूल कुलें वगैरे.

श्रीमद्दयानंद सरस्वतींनीं विवाहाची व्याख्या अशी सांगितली आहे कीं, " पूर्ण ब्रह्मचर्य व्रताचें आचरण करून विद्या आणि बल ह्यांची प्राप्ति झाल्यानंतर, अनेक प्रकारचे सद्गुण, कर्में, आणि स्वभाव, ह्यांच्या परस्पर साम्यतेमुळें एकमेकांची प्रीति जमून संतानोत्पत्तीसाठीं, व आपापल्या वर्णाश्रमांना योग्य अशीं कृत्यें करण्यासाठीं स्त्रीपुरुषांचा जो संबंध होतो, त्यास विवाह असें ह्मणतात. " लग्नमुहूर्ताच्या संबंधानें त्यांचें मत असें आहे कीं, उत्तरायणांत आणि शुक्लपक्षांत ज्या दिवशीं सर्वथा प्रसन्नता असेल, त्या दिवशीं, सर्व शुभ गुणादिकांनीं उत्तम अशा स्त्रीशीं (अर्थात् लहान मुलगी नव्हे.) विवाह करावा. लग्नाच्या पूर्वीं वधू आणि वर ह्यांचें वय, कुल, राहण्याचें ठिकाण, शरीर आणि स्वभाव ह्यांचें परीक्षण अवश्य करावें. अर्थात् दोघेंही सज्ञान असून विवाह करण्याला उत्सुक असलीं पाहिजेत. वराचें वय वधूच्या वयापेक्षां कमींत कमी दीडपट व जास्तींत जास्ती दुप्पट असावें. ब्रह्मचर्यव्रत पाळून चार, तीन, दोन किंवा निदान एक तरी वेद यथायोग्य रीतीनें अवगत झाल्यानंतर गुरूच्या आज्ञेनें स्नान करून उत्तम लक्षणांनीं युक्त अशा स्ववर्णाच्या स्त्रीशीं लग्न लावून गृहस्थाश्रमाचा स्वीकार करावा. ज्या स्त्रीशीं लग्न करावयाचें, ती वराच्या मातृपक्षाच्या सहा पिढ्यापलीकडील असून त्याच्या स्वतःच्या गोत्रांतील नसावी. जेव्हां कन्या विवाह करण्याची इच्छा दर्शवील, तेव्हां ती रजस्वला झाल्या दिवसापासून तीन वर्षें सोडून चवथ्या वर्षी तिचा विवाह करावा. लवकर लग्न करणें झालें, तरी वेदांत सांगितल्याप्रमाणें **सोळा** वर्षांच्या आंतील मुलीचें किंवा **पंचवीस** वर्षांच्या आंतील मुलाचें लग्न करितां कामा नये. तसेंच, कन्या देववेल तितकी दूरच्या ठिकाणीं द्यावी. गांवांतल्या

गोत्रांत आणि आप्तस्वकीयांत शरीरसंबंध करणें, अगदीं अहितकारक आहे. अशा विवाहांत स्त्रीपुरुषांमध्यें जितकी प्रीति असावयास पाहिजे, तितकी नसते. कारण, दूरच्या आणि दुर्मिळ पदार्थाविषयीं जें एक साहजिक प्रेम व मनाची ओढ असते, ती नेहमींच्या साहचर्यांतील जवळच्या वस्तूविषयीं असत नाहीं. हा प्रेमाचा एक स्वभावगुण होय. दुसरें, समीपस्थ वधूवरांस एकमेकांच्या बाळपणचे गुणदोष माहीत असतात; व त्यामुळें त्यांच्या ठायीं परस्परांविषयीं जितका आदर असावयास पाहिजे, तितका असत नाहीं. शारीरशास्त्रदृष्टीनें पाहिलें, तरी संबंध जितका दूरचा तितका अधिक हितावह मानिला आहे. त्यापासून प्रजा अंगापिंडानें सशक्त व निरोगी निपजते. शिवाय, दूरच्या संबंधानें प्रीति, उन्नति व ऐश्वर्य हीं जितकीं वृद्धिंगत होतात, तितकीं तीं जवळच्या संबंधानें होत नाहींत; आणि ह्याच कारणांस्तव कन्येला संस्कृतांत **दुहिता** ह्मणजे **दूरे हिता** असें ह्मटलें आहे. आर्यधर्मांत वर्णव्यवस्था गुण व कर्म ह्यांवर अवलंबून आहे. सबब, वधूवरें समानगुणकर्मांचीं असावींत. विवाह करण्याचा समय निश्चित होऊन चुकला, ह्मणजे वधूनें चतुर पुरुषांकडून वराची, आणि वरानें चतुर स्त्रियांकडून वधूची परोक्षरीतीनें परीक्षा करावी. नंतर विद्वान् स्त्रीपुरुषांची सभा भरवून वधूवरांनीं एकमेकांस अनुलक्षून अशी प्रतिज्ञा करावी कीं, 'हें जगत् उत्पन्न होण्यापूर्वी खरें व यथार्थस्वरूप असें महत् तत्त्व उत्पन्न झालें; आणि त्या महत् तत्त्वांत सत्य, त्रिगुणात्मक, नाशरहित, अशी प्रकृति प्रतिष्ठित होती झाली. ज्याप्रमाणें त्या प्रकृति व पुरुषाच्या संयोगापासून सर्व विश्व निर्माण झालें, त्याचप्रमाणें ह्या समयीं मी कुमारी-प्रकृति, (वरानें ह्मणावयाचें, 'मी कुमार-पुरुष') आणि आपण कुमार-पुरुष, (वरानें ह्मणावयाचें, 'आणि तूं कुमारी-प्रकृति,') ह्या उभयतांमध्यें विवाह करण्याची सत्यप्रतिज्ञा करितें. (वरानें ह्मणावयाचें, 'करितों.') त्या विवाहास आपण वरानें (वरानें ह्मणावयाचें 'त्वां वधूनें') प्राप्त व्हावें, आणि आपली प्रतिज्ञा सत्य करण्यासाठीं दृढ उत्साहयुक्त रहावें."

येथपर्यंत स्वामींच्या आणि समाजाच्या मताप्रमाणें विवाह ह्मणजे काय, तो कोणत्या मुहूर्तावर करावा, वधू आणि वर ह्यांची कोणकोणत्या बाबतींत परीक्षा करावी, त्या उभयतांच्या वयांचें प्रमाण काय असावें, वरानें लग्न होण्यापूर्वी कोणतें व किती अध्ययन केलें पाहिजे, दोघांचा वेदसंमत खरा विवाहकाल कोणता, संबंधाला अनुकूल अशीं कुलें कोणतीं, आणि वधूवरांनीं एकमेकांची अप्रत्यक्ष रीतीनें मध्यस्थामार्फत अंतःपरीक्षा करवून भावी विवाहाची प्रतिज्ञा कशी करावी, वगैरे गोष्टींचा उल्लेख केला. ह्या सर्व गोष्टी लग्न होण्यापूर्वी विचार करण्याच्या आणि सोयरीक नक्की ठरविण्यासंबंधाच्या झाल्या. त्या अन्वयें सोयरीक जमल्यावर लग्न करावयाचें त्याची पद्धति* पुढें लिहिल्याप्रमाणें:—

वरील कलमाचा गोषवारा.

कन्या रजस्वला होऊन चवथ्या व पांचव्या दिवशीं स्नान करून रजरोगरहित व शुद्ध झाली, ह्मणजे ज्या दिवशीं रात्रीं गर्भाधान करावयाचें ठरलें असेल, त्या रात्रीं¶ विवाह करण्यासाठीं त्याला आवश्यक अशी सर्व सामग्री सिद्ध करून ठेवावयाची. ही सामग्री ह्मणजे, यज्ञशाला, सप्रमाण असें यज्ञकुंड, समिधा, होमद्रव्यें (सुगंधी, पुष्टिकारक, मिष्ट, व रोगनाशक अशीं चार प्रकारचीं,) यथाविधि सिद्ध केलेला स्थालीपाक ह्मणजे चरु आणि नाना प्रकारचीं पक्वान्नें, सप्रमाण अशीं यज्ञपात्रें, आणि यथोचित ऋत्विज्, ही होय. आतां ती कशी असावी, वगैरे प्रत्येक बाबतीला ग्रंथाधार आहेत, व ते मूळच्या 'विवाहपद्धतीं'त सविस्तर सांगितले आहेत. परंतु, ते सर्व सांगण्याइतकी ह्या ग्रंथाची मर्यादा विस्तृत नसल्यानें आह्मी ते येथें देऊं शकत नाहीं. एकंदर लग्नसाहित्य तयार झालें, ह्मणजे एक घटिका रात्र¶ भुक्त झाली असे

लग्नविधीस लागणारी सामग्री.

---

* ह्या पद्धतीप्रमाणें आर्यसमाजांत लग्नें होतात असें समजून आह्मी पुढील हकीकत लिहीत आहोंत.

¶ जर मध्यरात्रीपूर्वी सर्व कर्म समाप्त होऊं शकणार नाहीं असें दिसलें, तर विवाहविधीला मध्यान्हानंतर प्रारंभ करावा, आणि तो अर्धरात्रीपूर्वी संपवावा, असें सांगितलें आहे.

पाहून वधूवरें आपापल्या घरीं '**ओम् कामवेद०**' १ '**ओम् इमं त उपस्थं०**' २ आणि '**ओम् अग्निं क्रव्यादमकृण्वन्०**' ३ इत्यादि तीन मंत्रांनीं स्वच्छ व सुगंधि जलानें भरलेले कलश घेऊन स्नान करितात; आणि उत्तम वस्त्रालंकार परिधान करून यथोक्त आसनावर पूर्वाभिमुख बसतात. नंतर वधू अथवा वर ह्यासुद्धां जे जे कोणी यज्ञशालेंत यज्ञकरण्यासाठीं बसले असतील, ते सर्वजण आपापलीं जलपात्रें घेऊन अनुक्रमें 'ओम् अमृतोपस्तरणमसि स्वाहा।' १ 'ओम् अमृतापिधानमसि स्वाहा।' २ आणि 'ओम् सत्यं यशः श्रीर्मयि श्रीः श्रयतां स्वाहा।' ३ ह्या तीन मंत्रांनीं तीन आचमनें करितात. नंतर त्या त्या अंगाच्या मंत्रानें अंगस्पर्श आणि '**ओम् अरिष्टानि मे**' इ. मंत्रानें मार्जन करून परमेश्वराची 'स्तुति,' 'प्रार्थना' व 'उपासना' करितात. तत्संबंधीं मंत्र पुढें लिहिल्या प्रमाणें:—

"**ओम्। विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव।**
यद्भद्रन्तन्न आसुव॥ १॥" यजु० अ० ३० मं. ३।

ह्मणजे, हे सर्व जगताची उत्पत्ति करणाऱ्या, सर्व ऐश्वर्ययुक्त, शुद्धस्वरूप, आणि सुख देणाऱ्या परमेश्वरा! तूं कृपा करून आमचीं सर्व दुरितें (दुर्गुण, दुर्व्यसनें इ०), आणि दुःखें दूर कर, आणि जें जें ह्मणून कल्याणकारक असेल, तें तें आह्मांस प्राप्त करून दे!

"**ओम्। हिरण्यगर्भः समवर्तताग्रे भूतस्य जातः पतिरेक आसीत्॥ स दाधार पृथिवीं द्यामुतेमां कस्मै देवाय हविषा विधेम॥ २॥**" यजु० अ० १३ मं. ४।

ह्मणजे, जो स्वयंप्रकाश आहे, स्वरूप आहे, ज्यानें प्रकाश पाडण्यासाठीं सूर्य, चंद्र, इत्यादि पदार्थ उत्पन्न करून धारण केले, जो उत्पन्न झालेल्या संपूर्ण जगताचा चैतन्ययुक्त आणि प्रसिद्ध असा एकच स्वामी असता झाला, जो सर्व जगत् उत्पन्न होण्यापूर्वीं विद्यमान होता, आणि जो

ह्या पृथिवीला व सूर्यादिकांना धारण करून राहिला आहे, अशा सुखस्वरूप शुद्ध परमात्म्याकारणें आम्हीं ग्रहण करण्यायोग्य अशा योगाभ्यासानें व अति प्रेमानें विशेष भक्ति करीत राहूं.

> " ओम् । य आत्मदा बलदा यस्य विश्व उपासते प्रशिषं यस्य देवाः । यस्यच्छायाऽमृतं यस्य मृत्युः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ३ ॥ " यजु० अ० २५ मं० १३ ।

ह्मणजे, जो आत्मज्ञानाचा दाता, जो शरीरबल, आत्मबल, व समाजबल देणारा, ज्याची सर्व विद्वान् लोक उपासना करितात, ज्याचें प्रत्यक्ष सत्य-स्वरूप शासन आणि न्याय अर्थात् शिक्षा सर्व मानीत आहेत, ज्याचा आश्रयही मोक्षसुख देणारा आहे, ज्याचें शासन वगैरे न मानणें, अर्थात् भक्ति न करणें, हेंच मरणादि दुःखांना कारण आहे, 'अशा सुखस्वरूप आणि सर्व ज्ञान देणाऱ्या परमात्म्याच्या प्राप्तीसाठीं आम्ही आमच्या आत्म्यानें व अंतःकरणानें त्याची भक्ति करूं. अर्थात् त्याची आज्ञा पाळण्याविषयीं तत्पर राहूं.

> " ओम् । यः प्राणतो निमिषतो महित्वैक इद्राजा जगतो बभूव । य ईशे अस्य द्विपदश्चतुष्पदः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ४ ॥ " यजु० अ० २३ मं० ३ ।

ह्मणजे, जो प्राण धारण करणाऱ्या, व प्राण धारण न करणाऱ्या जग-ताचा आपल्या अनंत महिम्यानें एकच राजा विराजमान् असता झाला, जो मनुष्यादि द्विपदांच्या, व गवादि चतुष्पदांच्या शरीरांची रचना करितो, अशा सुखस्वरूप आणि सकलैश्वर्य देणाऱ्या परमात्म्याच्या ठायीं आम्हो आमच्या उत्तम प्रकारच्या सर्व साहित्यानें विशेष भक्ति करूं.

> " ओम् । येन द्यौरुग्रा पृथिवी च दृढा येन स्वः स्तभितं येन नाकः । यो अन्तरिक्षे रजसो विमानः कस्मै देवाय हविषा विधेम ॥ ५ ॥" यजु० अ० ३२ मं० ६ ।

ह्मणजे, ज्या परमात्म्यानें सूर्यादि तीक्ष्ण स्वभावाचे पदार्थ धारण केले, पृथिवी धारण केली, ज्या जगदीश्वरानें सुख धारण केलें, दुःखरहित मोक्ष

धारण केला, जो आकाशांत सर्व लोकलोकान्तरांना विशेष मानयुक्त- अर्थात् अंतरीक्षांत पक्षी उडतात त्याप्रमाणें सर्व लोकांस निर्माण करून भ्रमण करवितो; अशा सुखदायक देवाची, अशा कामना करण्यायोग्य परब्रह्माची, प्राप्ति होण्यासाठीं आह्मीं सर्व सामर्थ्यानें त्याची विशेष भक्ति करूं.

" ओम् । प्रजापते न त्वदेतान्यन्यो विश्वा जातानि परि ता
बभूव । यत्कामास्ते जुहुमस्तन्नो अस्तु वयं स्याम पतयो
रयीणाम् ॥ ६ ॥" ऋ० सू० १२१ मं० १० ।

ह्मणजे, हे सर्व प्रजेच्या स्वामिन्! परमात्मन्! आपल्यावांचून भिन्न असा दुसरा कोणीही त्या, (आणि) ह्या, सर्व उत्पन्न झालेल्या अचेतन-सचेतनादिकांचा तिरस्कार करणारा नाहीं. अर्थात् आपण सर्वश्रेष्ठ आहांत. ज्या ज्या पदार्थांची कामना धरून आह्मी लोक आपला आश्रय करूं, त्या त्या पदार्थांची आमची कामना सिद्ध होवो; (आणि तेणेंकरून) आह्मी धनैश्वर्यांचे स्वामी होवोंत !

" ओम् । स नो बन्धुर्जनिता स विधाता धामानि वेद भुवनानि
विश्वा । यत्र देवा अमृतमानशानास्तृतीये धामन्नध्यैरयन्त
॥ ७ ॥" यजु० अ० ३२ मं० १० ।

ह्मणजे, हे मनुष्यहो ! तो परमात्मा आपणांला बंधूसमान सुख देणारा, आणि सर्व जगताचा उत्पादक आहे. तो सर्व कामना पूर्ण करणारा आहे. तो सर्व भुवनें–त्यांचीं नांवें, स्थानें, व जन्म ह्यांस–जाणत आहे. ज्या संसार-सुखदुःखरहित, नित्यानंदयुक्त, आणि मोक्षस्वरूप धारण करणाऱ्या परमात्म्याच्या ठायीं, मोक्षास पावून विद्वान् लोक आपापल्या इच्छेनुरूप विचरतात, तोच परमात्मा आपला गुरु, आचार्य, राजा, आणि न्यायाधीश आहे. आपण सर्व मिळून त्याची सदैव भक्ति करीत असूं.

" ओम् । अग्ने नय सुपथा राये अस्मान् विश्वानि देव
वयुनानि विद्वान् । युयोध्यस्मज्जुहुराणमेनो भूयिष्ठान्ते नम
उक्तिं विधेम ॥ ८ ॥" यजु० अ० ४० मं० १६ ।

ह्मणजे, हे स्वयंप्रकाश, ज्ञानस्वरूप, सर्व जगताला प्रकाश देणाऱ्या, आणि सर्व सुखदात्या परमेश्वरा! ज्याअर्थी आपण संपूर्ण विद्यायुक्त आहांत, त्याअर्थी कृपाकरून आह्मांला विज्ञान आणि राज्यादि ऐश्वर्य प्राप्त होण्यासाठीं उत्तम धर्मयुक्त अशा आप्तांच्या द्वारें सर्व प्रज्ञान आणि उत्तम कर्म प्राप्त करून द्यावें; आणि आह्मांपासून कुटिलतायुक्त पापकर्म दूर करावें; व यासाठींच आम्ही आपली बहुत प्रकारच्या स्तुतिरूपानें नम्रतापूर्वक प्रशंसा सदैव करीत राहूं, आणि सर्वदा आनंदांत असूं.

वरील मंत्र साद्यंत व सार्थ देण्याचें प्रयोजन.

ह्याप्रमाणें एकंदर आठ वेदमंत्रांनीं ईश्वराची 'स्तुति,' 'प्रार्थना,' व 'उपासना' करण्यांत येते. हे आठही मंत्र संपूर्ण व सार्थ देऊन ग्रंथविस्तार करण्यांत आमचा हेतु येवढाच कीं, वाचकांना आर्यसमाजाची ईश्वरविषयक कल्पना काय आहे, ती कळून यावी; आणि लग्नासारख्या मंगलकार्याच्या आरंभीं इतर हिंदू लोकांत, तें कार्य निर्विघ्न सिद्धीस जावें ह्मणून जी गणपतीची पूजा व प्रार्थना करण्यांत येते, तिच्याऐवजीं ह्या समाजांत कोणतें कृत्य केलें जातें, त्याचाही बोध व्हावा. वर सांगितलेल्या ईश्वरस्तुति–प्रार्थना–व उपसनेच्या प्रकारावरून हा समाज मूर्तिपूजक नाहीं, एकेश्वरवादी आहे, व तो वाद पुरा करण्याकरितां त्यानें वरील मंत्रांचा जागोजाग अर्थविपर्यासही केला आहे, हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. असो.

स्वस्तिवाचन, शांति, अग्न्याधान, समिधान व होम.

वरील कृत्य आटोपल्यानंतर **स्वस्तिवाचन, शांति,** आणि **अग्न्याधान** व **समिधान** हीं कर्में करण्यांत येतात. पैकीं पहिलीं दोन, ह्मणजे स्वस्तिवाचन आणि शांति, ह्यांत चारही वेदांतून प्रसंगोचित असे मंत्र निवडून घेतलेले आहेत. परंतु, ते पुष्कळ असल्यानें विस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत. स्वस्तिवाचन आणि शांति हीं कर्में आटोपल्यानंतर अग्न्याधान ह्मणजे अग्नि सिद्ध करणें, व समिधान ह्मणजे समिधादि इंधनानें तो प्रज्वलित करणें, हीं दोन

कर्मे समंत्रक करण्यांत येतात. नंतर यथाविधि सिद्ध केलेलीं होमद्रव्यें, सुवर्ण, रौप्य, कांस्य अथवा काष्टनिर्मित पात्रांत वेदीजवळ सुरक्षित ठेवून वर सांगितल्याप्रमाणें उष्ण व सुगंधित केलेलें आज्य अथवा पक्वान्नें ह्यांच्या '**ओम् अयं त इध्म०**' इत्यादि मंत्रानें पांच आहुती देण्यांत येतात. नंतर वेदीच्या चारही दिशांस समंत्रक जल सिंचन करून तत्पश्चात् यथोक्त-रीतीनें सामान्य होमाहुती, आघारावाज्याहुती व आज्यभागाहुती दिल्या जातात. नंतर '**ओम् यदस्य कर्मणोऽत्यरीरिचं०**' इत्यादि मंत्रानें एक स्विष्टकृत् होमाहुति, व '**ओम् प्रजापतये०**' इत्यादि मंत्रानें एक प्रजापत्याहुति 'तूष्णीम्' ह्मणजे मौनानें देतात. पुढें निरनिराळ्या वेद-मंत्रांनीं एकदा चार, व एकदा आठ, अशा बारा आज्याहुती दिल्या जातात.

वरप्रस्थानापूर्वींचीं कांहीं कृत्यें, वरप्रस्थान व मधुपर्करीति.

वधूच्या घरीं वर सांगितलेलें कर्म आटोपतांच तत्पक्षाची मंडळी वरास लग्नाला घेऊन जाण्यासाठीं मूळ येतात. नंतर वर आपल्या घरांतील एकांत स्थलीं जाऊन उत्तम वस्त्रें व अलंकार परि-धान करून यज्ञशालेंत येतो, आणि तेथें त्याजकरितां ठेवि-लेल्या उत्तम आसनावर पूर्वाभिमुख बसून मागें सांगितल्या-प्रमाणें ईश्वराची 'स्तुति,' 'प्रार्थना' व 'उपासना' करितो. (पहा,-पान ३६६-९) ती झाल्यावर वेदीजवळ यथोक्त स्थालीपाकादि करून नंतर कन्येच्या घरीं लग्नास जाण्यासाठीं तयार होतो. मग उभयपक्षांची मंडळी मोठ्या समारं-भानें वरास मिरवीत मिरवीत वधूच्या घरीं घेऊन येतात. तेथें वधू आणि कार्यकर्ता पुरुष (अर्थात् लग्न लावणारा कन्यापिता अथवा पालक) हीं दोघें त्याचा मधुपर्कादि स्वागतसत्कार करितात. तत्संबंधीं बहुतेक प्रकार मागें सांगितलेल्या देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांच्या रीतीप्रमाणेंच आहे. सबब, येथें त्याची पुनरुक्ति करण्याचें प्रयोजन नाहीं. मात्र आर्यसमाजाच्या मधुपर्क-सत्कारांत भेद इतकाच कीं, वरास विष्टर ह्मणून द्यावयाचें आसन, पाद्य ह्मणजे पाय धण्याचें पाणी, अर्घ ह्मणजे मुखप्रक्षालनार्थ उदक, आचमनो-

दक, व मधुपर्क, ह्या सर्व वस्तु कार्यकर्त्या पुरुषानें घेऊन वधूच्या हातीं द्यावयाच्या, व त्या तिजकडून वरास समंत्रक देववावयाच्या. नंतर त्या उभयतांनीं वरास सभामंडपांतून घरांत नेऊन सुंदर आसनावर पूर्वाभिमुख बसवावयाचें. ही टूम नवीन आहे! वस्तुतः कन्यार्थी वर, हा कन्यापित्याच्या घरीं, व त्याजकडे आलेला, अथवा त्यानें बोलावून आणिलेला आहे. तेव्हां धर्मशास्त्रांत सांगितल्याप्रमाणें त्या वराचा मधुपर्कादि सत्कार कन्यापित्यानें, अथवा कार्यकर्त्या पुरुषानें स्वतःच केला पाहिजे. त्यांत वधूची दरम्यानगिरी कशास पाहिजे? ती शिष्टसांप्रदायास, तशी धर्मनियमासही विलग दिसते. असो.

कन्यादानरीति.

वरास घरांत नेऊन आसनावर पूर्वाभिमुख बसविल्यानंतर कन्यादानादि कृत्यें केलीं जातात. तीं अशीं कीं, कार्यकर्त्ता पुरुष कन्येला उत्तम आसनावर वरासन्मुख बसवून आपण उत्तराभिमुख बसतो. नंतर '**ओम् अमुक गोत्रोत्पन्नाम्०**' इत्यादि मंत्रानें वराच्या उजव्या तळहातावर वधूचा उजवा तळहात ठेवून तिचें दान करितो; आणि वर '**ओम् प्रतिगृह्णामि ।**' ह्मणून तिचा प्रतिग्रह करितो. नंतर वर '**ओम् जरां गच्छ परिधत्स्व वासो०**' इत्यादि मंत्रानें वधूला नेसण्याचें वस्त्र, आणि '**ओम् या अकृतन्न वयम्०**' इत्यादि मंत्रानें तिला पांघरण्याचें वस्त्र देतो. हीं वस्त्रें वधू परिधान करिते. नेसण्याच्या वस्त्राची पद्धति कशी असावी, ती स्वामींनीं सांगितली नाहीं. परंतु, पांघरण्याचें वस्त्र मात्र तिनें यज्ञोपवीतवत् धारण करावें, ह्मणून सांगितलें आहे. अर्थात् तेणेंकरून स्त्रीच्या मर्यादेस हरताळ फांसली! असो. वधूस वस्त्रदान झाल्यावर वरानें स्वतः '**ओम् परिधास्यै यशोधास्यै०**' इत्यादि मंत्रानें नेसण्याचें, आणि '**ओम् यशसा मा द्यावापृथिवी०**' इत्यादि मंत्रानें पांघरण्याचें वस्त्र परिधान करावयाचें. वधूवरें आपापलीं वस्त्रें धारण करीपर्यंत कार्यकर्त्ता अथवा कोणी दुसरा गृहस्थ यज्ञमंडपांत कुंडाजवळ जाऊन पूर्वी सांगितलेल्या समिधा, कापूर, अथवा घृत, ह्यांनीं कुंडांतील अग्नि

प्रदीप्त करितो; आणि सुगंधि पदार्थांनीं मिश्र केलेलें आज्य त्या अग्नीवर तापवून तें कांस्य पात्रांत काढून ठेवितो. तसेंच स्त्रुवादि होमपात्रें, स्वच्छ उदक, इत्यादि साहित्य यज्ञकुंडाजवळ सिद्ध करून ठेवितो. वरपक्षाचा कोणी पुरुष शुचिर्भूत होत्साता शुद्धोदकानें भरलेला एक कलश घेऊन, यज्ञकुंडास प्रदक्षिणा घालून, कुंडाच्या दक्षिणभागीं उत्तराभिमुख होऊन, तो कलश आपल्या पुढें स्थापन करून, विवाहकृत्य आटोपेपर्यंत तसाच उत्तराभिमुख बसून राहतो. त्याचप्रमाणें वरपक्षाचा दुसरा एक गृहस्थ हातांत काठी घेऊन विवाहसमाप्तीपर्यंत कुंडाच्या दक्षिणभागीं उत्तराभिमुख बसतो; आणि वधूचा सहोदर बंधु अथवा त्याच्या अभावीं चुलतभाऊ, मामेभाऊ, किंवा मावसभाऊ, ह्यांतून जो कोणी असेल, तो तांदूळ अथवा जोंधळ्याच्या लाह्या (जुवारकी धाणी), आणि शमीचा वाळलेला पाला चार चार ओंजळी घेऊन मिसळतो, व तें मिश्र द्रव्य एका सुपांत घालून तें सूप घेऊन यज्ञकुंडाच्या पश्चिमभागीं पूर्वाभिमुख होऊन बसतो. नंतर कार्यकर्त्ता पुरुष यज्ञकुंडाजवळ एक सपाट दगड, आणि वधूवरांस बसण्यासाठीं कुशादिकांचीं पवित्रासनें मांडवितो; आणि नूतन वस्त्रें परिधान केलेल्या वधूवरांस आपापल्या जागीं एकमेकांसमोर उभीं करितो. नंतर तीं दोघें यज्ञशालेंत बसलेल्या विद्वान् लोकांस अनुलक्षून '**ओम् । समञ्जन्तु विश्वे देवाः०**' इत्यादि विधान करितात. त्याचा अर्थ असा कीं, हे विद्वज्जनहो! आपण निश्चयें करून असें समजा कीं, आह्मी उभयतां आपल्या प्रसादानें गृहस्थाश्रमांत एकत्र राहण्यासाठीं परस्परांचा स्वीकार करीत आहोंत. आह्मां उभयतांचीं हृदयें जलाप्रमाणें शांत आणि एकजीव होऊन राहतील. प्राणवायूप्रमाणें आह्मी एकमेकांस प्रिय होऊन राहूं. जगद्विधाता परमात्मा हा जसा पदार्थमात्रांत व्यापून त्यांचें धारण करितो, त्याप्रमाणें आह्मीही एकमेकांस धारण करूं. ज्याप्रमाणें उपदेशक आपल्या श्रोत्यांवर प्रेम करितो, त्याप्रमाणें आह्मांतील प्रत्येकाचा आत्मा एकमेकाविषयीं दृढ प्रेम धारण करो! हें विधान झाल्यानंतर वर आपल्या उजव्या हातानें वधूचा उजवा हात धरून

'**ओम् यदैषि मनसा०**' इत्यादि मंत्र ह्मणून तिच्यासह घरांतून बाहेर यज्ञशालेंत कुंडाजवळ येतो. नंतर '**ओम् भूर्भुवः स्वः । अघोर चक्षुरपतिघ्न्येधि०**' व '**ओम् भूर्भुवः स्वः । सा नः पूषा शिवतमामैरयसा०**' इत्यादि मंत्र ह्मणून उभयतां यज्ञकुंडास प्रदक्षिणा करितात, आणि कुंडाच्या पश्चिमभागास घातलेल्या आसनावर, वराच्या उजव्या बाजूस वधू, अशा रीतीनें एकमेकांशेजारीं पूर्वाभिमुख होऊन बसतात.

तदनंतर वधू वरास अनुलक्षून '**ओम् । प्र मे पतियानः**'० इ० मंत्र ह्मणते; आणि तत्पश्चात् पुरोहितास यज्ञकुंडासमीप दक्षिणभागीं उत्तरेकडे तोंडकरून बसविण्यांत येतें. मग वधू, वर, पुरोहित, आणि कार्यकर्त्ता, असे चौघेही मागें सांगितल्याप्रमाणें '**ओम् अमृतोपस्तरणमसि स्वाहा ।**' वगैरे तीन मंत्रांनीं हात व तोंड धुवून आणि पुसून पूर्वोक्त '**ओम् । अयन्त इध्म०**' इत्यादि तीन मंत्रांनीं कुंडाच्या तीन बाजूस उजव्या हातीं पाणी घेऊन तें सिंचन करितात. नंतर कुंडांतील समिधा प्रज्वलित झाल्यावर चौघेही आज्यानें चार आघाराज्यभागाहुती देतात. नंतर चार व्याहृत्याहुती, व अष्टाहुती वगैरे मिळून एकंदर आज्याच्या सोळा आहुती देऊन मग प्रधान होमास प्रारंभ करितात. ह्यासमयीं वधूनें आपल्या उजव्या खांद्यास स्पर्श करून '**ओम् । भूर्भुवःस्वः । अग्न आयूंषि०**' वगैरे निरनिराळे चार वेदमंत्र ह्मणून चार, व '**ओम् भूर्भुवःस्वः । त्वमर्यमा भवसि०**' इत्यादि मंत्रानें एक, मिळून एकंदर पांच आज्याहुती द्यावयाच्या. नंतर '**ओम् ऋतषाड् ऋतधामाग्निर्गन्धर्वः ।**' वगैरे बारा मंत्रांनीं बारा आज्याहुती देऊन मग यथोक्तरीतीनें **जया होम** करण्यांत येतो; आणि '**ओम् । अग्निर्भूतानामधिपतिः**' वगैरे अठरा मंत्रांनीं आज्याहुती देऊन **अभ्यातन होम** करण्यांत येतो. तत्पश्चात् '**ओम् । अग्निरैतु प्रथमो देवताना०**' वगैरे आठ मंत्रांनीं आठ आज्याआहुती, आणि '**ओम् । भूरग्नये स्वाहा ।**' इत्यादि चार मंत्रांनीं चार आज्याहुती देण्यांत येतात.

निरनिराळे होम.

वर सांगितल्याप्रमाणें निरनिराळे होम झाल्यानंतर वधूवरें एकमेकांस वचनें देतात. विवाहविधींत हा भाग अत्यंत महत्वाचा आणि वधूवरांस परस्पर बंधनकारक होय. अतएव तो करण्यासाठीं वर प्रथमतः आपल्या आसनावरून उठून पूर्वाभिमुख बसलेल्या वधूसमोर, अर्थात् पश्चिमाभिमुख होत्साता उभा राहतो; आणि आपल्या डाव्या हातानें वधूचा उजवा हात उताणा करून कांहींसा वर उचलून उंच धरितो. नंतर तो वर उचलिलेला वधूचा अंगुष्ठसहित उताणा उजवा हात आपल्या उजव्या हातानें धरून पाणिग्रहणाचे सहा मंत्र ह्मणतो. ते मंत्र महत्वाचे असल्यानें आह्मी ह्या खालीं क्रमशः आणि अर्थसहित देत आहोंत:—

"ओम् । गृभ्णामि ते सौभागत्वाय हस्तं मया पत्त्या जरदष्टिर्यथासः । भगो अर्यमा सविता पुरन्धिर्मह्यं त्वा दुर्गार्हपत्याय देवाः ॥ १ ॥"

ह्मणजे, हे वरानने! ज्या अर्थी मी सुसन्तानादि ऐश्वर्यप्राप्तीसाठीं तुझें पाणिग्रहण करितों, त्या अर्थी तूं मज पतीसहवर्तमान वृद्धापकाळपर्यंत सुखानें ऐस. (येथपर्यंतचें वचन स्वामींनीं एकदा वधूकडूनही वदविलें आहे, व त्याचा अर्थ त्यांनीं असा दिला आहे कीं, ' हे वीर! मी सौभाग्यवृद्धीसाठीं आपला पाणि ग्रहण करितें. आपण मज पत्नीसहवर्तमान–अर्थात् वरील मंत्रांत ' मया पत्न्या ' असा फरक करावयाचा–वृद्धावस्थेपर्यंत प्रसन्न व अनुकूल असे रहा. आजपासून आपणांला मी पत्नी, व मला आपण पति, ह्या भावानें दोघेंही एकमेकांस प्राप्त झालों आहोंत.) सकल ऐश्वर्ययुक्त, न्यायकरणारा, सर्व जगताची उत्पत्ति करणारा, आणि नानाप्रकारच्या जगतांचें धारण करणारा परमात्मा, आणि सभामंडपांत बसलेले सर्व विद्वान् लोक, हे गृहस्थाश्रमांतील कर्मांचें अनुष्ठान व्हावें, एतदर्थ तुला मजप्रत देत आहेत. वस्तुतः येथपर्यंत मंत्रार्थ पुरा होत आहे. तत्रापि, ह्यापुढेंही स्वामींनीं मूळ मंत्रांत नाहीं असा कांहीं मजकूर वधूच्या तोंडीं घातला आहे. तो असा कीं, 'आजपासून मी आपल्या हातीं अर्पण केली गेलें आहे; व आपण माझ्या हातांत

विकले गेले आहांत (बिक चुके हैं.)! आपण दोघें एकमेकांस अप्रिय असें आचरण कधींही करणार नाहीं.' असो.

"ओम् । भगस्ते हस्तमग्रभीत् सविता हस्तमग्रभीत् ।
पत्नी त्वमसि धर्मणाहं गृहपतिस्तव ॥ २ ॥"

ह्मणजे, हे प्रिये ! ऐश्वर्ययुक्त असा जो मी, तो तुझें पाणिग्रहण करीत आहे; आणि धर्ममार्गांत प्रेरक असा जो मी, तो तुझें पाणिग्रहण करिता झालों. तूं धर्मानें माझी पत्नी अथवा भार्या आहेस, आणि मी तुझा गृहपति आहे. येथपर्यंत मंत्रार्थ झाला. आतां स्वामींनीं त्यास पुढें आणखी पुरवणी जोडिली आहे. ती अशी कीं, ' आपण दोघें मिळून गृहकार्यें पूर्ण करूं; आणि दोघांसही अप्रिय असें आचरण ह्मणजे व्यभिचार कधींही करणार नाहीं. जेणेंकरून सर्व गृहकृत्यें सिद्ध होतील, व उत्तम संतति, ऐश्वर्य, आणि सुख ह्यांची सदैव वृद्धि होत राहील.'

"ममेयमस्तु पोष्या मह्यं त्वादाद् बृहस्पतिः ।
मया पत्या प्रजावति शं जीव शरदः शतम् ॥ ३ ॥"

ह्मणजे, हे अनघे ! सर्व जगताचें पालन करणाऱ्या परमात्म्यानें ज्या तुला मजप्रत दिली आहे, ती ही तूं सर्व जगतांत माझी पोषण करण्यायोग्य पत्नी हो. हे प्रजावति ! तूं मज पतीसहवर्तमान शंभर शरद्ऋतु, अर्थात् शंभर वर्षेंपर्यंत, सुखानें वांच. ह्यापुढें वधूकडून प्रतिज्ञा करविली आहे. ती अशी कीं, ' हे भद्रवीर ! परमेश्वर कृपेनें आपण मला प्राप्त झाले आहांत. ह्या जगांत मजकरितां आपल्यावांचून दुसरा पति, अर्थात् पालन करणारा स्वामी, व सेव्य असा इष्ट देव, कोणीही नाहीं. आपणांवांचून मी दुसऱ्या कोणासही मानणार नाहीं. जसे आपण मजशिवाय अन्य स्त्रीवर प्रेम करणार नाहीं, तशीच मीही अन्य पुरुषाशीं प्रीतिभावानें वर्तत जाणार नाहीं. आपण माझ्यासह शंभर वर्षेंपर्यंत आनंदानें नांदा.'

"त्वष्टा वासो व्यदधाच्छुभे कं बृहस्पतेः प्रशिषा कवीनाम् ।
तेनेमां नारीं सविता भगश्च सूर्यामिव परिधत्तां प्रजया ॥ ४ ॥"

ह्मणजे, हे शुभानने! परमात्माच्या ह्या सृष्टींत, त्याच्या आणि विद्वान् बांधवांच्या आज्ञेनें दंपत्यें होत असतात. विद्युत्, ही ज्याप्रमाणें पदार्थमात्रास व्यापून राहिली आहे, त्याप्रमाणें तूंही मला प्रसन्न ठेवण्यासाठीं मजकडून सुंदर सुंदर वस्त्रें, अलंकार आणि सुख, हीं मिळवून मला प्राप्त हो! परमात्मा ही माझी व तुझी इच्छा पूर्ण करो! सर्व जगताची उत्पत्ति करणारा आणि ऐश्वर्ययुक्त असा परमेश्वर ह्या तुला–ह्मणजे मी जो नर त्याच्या स्त्रीला–जसा उत्तम प्रजेनें आच्छादित करील,–शोभायुक्त करील,–तसा मी तुला सूर्य किरणांसमान शोभादायक अशा वस्त्रभूषणादि सर्वांनीं सदैव सुशोभित राखीन. शुभाननेनेंही वरास वचन द्यावयाचें कीं, 'हे प्रिय! मीही आपल्याला ह्याचप्रमाणें सूर्यासमान सुशोभित अशा माझ्या आनंदी, अनुकूल, आणि प्रिय आचरणानें व ऐश्वर्यवस्त्राभूषणादिकांनीं सदा आनंदित ठेवीन!

"इन्द्राग्नी द्यावापृथिवी मातरिश्वा मित्रावरुणा भगो अश्विनोभा।
बृहस्पतिर्मरुतो ब्रह्म सोम इमां नारीं प्रजया वर्धयन्तु ॥ ५ ॥"

ह्मणजे, हे माझे संबंधी जनहो! विद्युत् आणि प्रसिद्ध अग्नि, सूर्य आणि भूमि, अंतरिक्षांतील वायु, प्राण व उदान तसेंच ऐश्वर्य, उभयतां सद्वैद्य आणि सत्योपदेशक, श्रेष्ठ न्यायकर्त्ता आणि प्रजापालक असा राजा, सभ्य मनुष्य, सर्वांहून थोर असा परमात्मा, आणि चंद्रमा व सोमलतादि ओषधी-गण, हे ज्याप्रमाणें सर्व प्रजेची वृद्धि आणि पालन करितात, त्याचप्रमाणें ते ह्या माझ्या स्त्रीलाही प्रजेनें वृद्धिंगत करीत आहेत, (अर्थात् करितील अशी खात्री आहे) व तुह्मीही करा! त्याचप्रमाणें मीही ह्या स्त्रीची प्रजादि-कांनीं सदैव बढती करीन. स्त्रीनेंही प्रतिज्ञा करावयाची कीं, 'मी ह्या माझ्या पतीला सदा आनंद, ऐश्वर्य, आणि प्रजेनें वृद्धिंगत करीन.' वगैरे.

"अहं विष्यामि मयिरूपमस्या वेददित्पश्यन्मनसा कुलायम्।
न स्तेयमद्मि मनसोदमुच्ये स्वयं श्रन्थानो वरुणस्य पाशान् ॥६॥"

ह्मणजे, हे कल्याणक्रीडे! मनानें कुलाची (भावी) वृद्धि पाहत असणारा मी, ज्याप्रमाणें ह्या तुझ्या रूपाला प्रीतीनें प्राप्त झालों आहे, व ह्या रूपांत

प्रेमाच्याद्वारें व्याप्त होत आहे, त्याचप्रमाणें तूंही माझ्याठायीं प्रेमानें व्याप्त होऊन अनुकूल व्यवहार करावास. ज्याप्रमाणें मी ह्या तुज वधूशीं चोरी करण्याचें सोडून देतों, आणि कोणत्याही उत्तम पदार्थाचा चोरून उपभोग घेत नाहीं, व पुरुषार्थ केल्यानें स्वतः थकून गेलों असतांही, विघ्नरूप अशा दुर्व्यसनी पुरुषांचीं बंधनें दूर करितों, तशी तूंही कर. ह्याचप्रमाणें कल्याणक्रीडेनेंही वरासमागमें शुद्धाचरण ठेवण्याविषयीं त्यास अभिवचन द्यावयाचें.

अश्मारोहण, लाजाहोम व अभिप्रदक्षिणा.

वर सांगितल्याप्रमाणें वधूवरांनीं परस्परांचें पाणिग्रहण, व प्रतिज्ञा केल्यानंतर, वर वधूचा हस्तांजलि धरून तिला उठवितो. मग तीं उभयतां, आणि कुंडाच्या दक्षिणेस कलशाजवळ बसलेला मनुष्य तो कलश हातीं घेऊन अग्नीला दोन प्रदक्षिणा घालितात. नंतर वधूवरें '**ओम्। अमोहमस्मि०**' इत्यादि मंत्रांनीं एकमेकांशीं प्रतिज्ञा करितात. ती झाल्यावर वर '**ओम्। आरोहेममश्मानमश्मेव०**' इत्यादि मंत्रोच्चार करितो, आणि वधू विधिपूर्वक पाषाणावर चढते. नंतर पुनः खालीं उतरून ती आणि वर दोघेंही कुंडासमीप येतात, व पूर्वाभिमुख उभे राहतात. मग अनुक्रमें '**ओम्। अर्यमणं देवं०**,' '**ओम्। इयं नायुपब्रूते०**,' व '**ओम्। इमाँल्लाजानावपाम्यग्नौ०**' इत्यादि मंत्रांनीं तीन वेळां यथोक्तरीतीनें लाह्यांच्या आहुती देऊन **ला जा हो म** करण्यांत येतो. तदनंतर वर '**ओम्। सरस्वति प्रेदमव०**' इत्यादि मंत्रोच्चार करून वधूचा हात आपल्या उजव्या हातानें धरितो, व '**ओम्। तुभ्यमग्रे पर्यवहन्त्सूर्यं०**' आणि '**ओम्। कन्यला पितृभ्यः०**' इत्यादि मंत्रांनीं तीं उभयतां कुंडास एक प्रदक्षिणा घालून त्याच्या पश्चिमेच्या बाजूस थोडा वेळ उभीं राहतात. नंतर पूर्वोक्त रीतीनें कलश घेणारा मनुष्य, व हीं दोघें, असे त्रिवर्ग कुंडास आणखी तीन वेळां, ह्मणजे एकंदर मिळून चार प्रदक्षिणा करितात. शेवटीं कुंडाच्या पश्चिमेस किंचित् उभे राहून वरील विधि आणखी दोन वेळां,

ह्मणजे एकंदर मिळून तीनदां करितात. नंतर यथोक्त रीतीनें वधूकडून **'ओम्। भगाय स्वाहा। इदं भगाय। इदन्न मम॥'** ह्या मंत्रानें एकदा तुपाची आहुति देववितात; ह्मणजे लाजाहोमाचें कृत्य आटोपलें.

वधूचें केशमोचन, सप्तपदी, अभिषेक, सूर्यदर्शन, प्रतिज्ञा, आशीर्वाद, व उत्तरविधि.

तदनंतर वर वधूला एकांतांत नेऊन **'प्र त्वा मुञ्चामि०'** आणि **'प्रेतो मुञ्चामि०'** इत्यादि दोन मंत्रांनीं तिचे बांधलेले केश सोडितो. मग तीं दोघेंही फिरून सभामंडपांत येतात; तेव्हां त्यांच्या उत्तरीय वस्त्रांस गांठ देण्यांत येते. नंतर कांहीं किरकोळ फेरफार खेरीजकरून मागें देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मणांच्या लग्नविधींत सांगितल्याप्रमाणेंच सप्तपदीचा विधि होतो. हे किरकोळ फेरफार ह्मणजे **'मा सव्येन दक्षिणमतिक्राम।'** ह्या मंत्रानें वधूकडून तिचा उजवा पाय उचलून तिला चालण्याची आज्ञा द्यावयाची, व तिच्यासह वरानें ईशान्य दिशेस सात पावलें चालवयाचें, वगैरे आहेत. बाकी सप्तपदीच्या मूळ मंत्रांत कांहीं फेरफार केलेला नाहीं. असो. यथोक्त रीतीनें सप्तपदी झाल्यावर वधूवरें जोडप्यानें आसनावर बसतात. नंतर कुंडाच्या दक्षिणेस कलशासह बसलेला मनुष्य त्या कलशांतील थोडेंसें उदक घेऊन आसनस्थ वधूवरांस **'ओम्। आपोहिष्ठा ०'** वगैरे चार मंत्रांनीं अभिषेक करितो. तत्पश्चात् वधूवरें आसनावरून उठून **'ओम्। तच्चक्षुर्देवहितं०'** ह्या मंत्रानें सूर्यदर्शन करितात. विवाहविधि हा तर गर्भाधानाच्या रात्रीं किंवा फार तर तद्दिवशीं मध्यान्होत्तर करावा, ह्मणून आरंभीं सांगितलें आहे. मग सूर्यदर्शन कसें करीत असतील तें कोण जाणे! असो. सूर्यदर्शनानंतर वर आपला उजवा हात वधूच्या उजव्या खांद्यावरून तिच्या हृदयास लावितो; आणि,

"ओम्। मम व्रते ते हृदयं दधामि मम चित्तमनु चित्तं ते अस्तु।
मम वाचमेकमना जुषस्व प्रजापतिष्ट्वा नियुनक्तु मह्यम्॥"

ह्या मंत्राचा उच्चार करितो. त्याचप्रमाणें वधूही आपला उजवा हात वराच्या हृदयास लावून वरील मंत्र ह्मणते. त्याचा अर्थ अनुक्रमें खाली लिहिल्याप्रमाणें:—

वरः—हे वधू! तुझें अंतःकरण, व आत्मा, हे मी माझ्या कर्मास अनुकूल असे धारण करितों. माझ्या चित्तास तुझें चित्त सदैव अनुकूल असो! माझी वाणी तूं एकाग्र मनानें सेवन करीत जा. प्रजापालन करणारा परमात्मा, तुला मजकारणें नियुक्त करो!

वधूः—हे प्रिय वीर, स्वामिन्! आपलें हृदय, आत्मा, व अंतःकरण मी माझ्या प्रियाचरणकर्मास्तव धारण करितें. माझ्या चित्तास आपलें चित्त सदैव अनुकूल राहो! मी आपणांस माझ्या वाणीनें जें कांहीं सांगत जाईन, तें आपण हमेष एकाग्रतेनें सेवन करावें. कारण, आजपासून प्रजापति जो परमात्मा, त्यानें ज्याप्रमाणें मला आपल्या आधीन केलें, त्याचप्रमाणें आपणांसही माझ्या आधीन केलें आहे. स्वामी ह्मणतात, अर्थात् ह्या प्रतिज्ञेनुसार दोघांनीं वर्तावयाचें. जेणेंकरून स्त्री, ही सर्वदा आनंदी व कीर्तिमान् पतिव्रता होईल; व पुरुषही अप्रिय भाषण, सर्व प्रकारचे व्यभिचार, वगैरे सोडून एकपत्नी होईल; आणि उभयतां प्रेमानें नांदतील. असो. सदरहू प्रतिज्ञा झाल्यावर वर वधूच्या मस्तकावर हात ठेवून कार्यार्थ आलेल्या सर्व लोकांस अनुलक्षून पुढील मंत्र ह्मणतोः—

“ **सुमङ्गलीरियं वधूरिमां समेत पश्यत।**
सौभाग्यमस्यै दत्वा याथास्तं विपरेतन॥ ”

व ते सर्वजण **“ओम् सौभाग्यमस्तु । ओम् शुभं भवतु।”** असे आशीर्वाद देतात. नंतर वधूवरें कुंडासमीप बसून यथोक्तरीतीनें स्विष्टकृत् होम वगैरे करून विवाहविधि पुरा करितात; आणि कांहीं वेळ विश्रांति घेतल्यानंतर वधूगृहाच्या ईशान्येस जें घर पूर्वी मुद्दाम तयार करून ठेविलेलें असतें, तेथें तीं उभयतां जाऊन विवाहाचा **उत्तरविधि** करितात.

उत्तरविधि झाल्यानंतर सूर्यास्त होऊन आकाशांत नक्षत्रें दिसूं लागलीं असें पाहून, वधूवरें यज्ञकुंडाच्या पश्चिमेस आसनावर पूर्वाभिमुख बसतात; व पूर्वोक्त रीतीनें **अग्न्याध्यान** व **समिधान** करून यथाविधि अग्नीला चार आघारावाज्यभागाहुती, व चार व्याहृत्याहुती मिळून एकंदर आठ आज्याहुती

देऊन '**ओम् । लेखासन्धिषु०**' वगैरे निरनिराळ्या सहा मंत्रांनीं प्रधान होम करितात. ह्या प्रधान होमांतील प्रत्येक मंत्रानें सहा, याप्रमाणें एकंदर छत्तीस आज्याहुती देण्यांत येतात; आणि हा होम वर सांगितलेला विवाहविधि चालू असतां वधूकडून जीं नानाप्रकारचीं पातकें घडलीं असतील, त्यांच्या शमनार्थ समंत्रक आज्यपूर्णाहुती देऊन पूर्ण करण्यांत येतो. तो झाल्यावर पुनः व्याहृति मंत्रांनीं चार आहुती देऊन वधूवरें सभामंडपाच्या बाहेर जाऊन यथोक्त रीतीनें ध्रुव व अरुंधती यांचें दर्शन करितात. नंतर वर वधूकडे पाहून व तिच्या मस्तकावर हात ठेवून '**ओम् । ध्रुवा द्यौर्ध्रुवा०**' आणि '**ओम् । ध्रुवमसि ध्रुवन्त्वा०**' इत्यादि दोन मंत्र ह्मणतो. ह्या मंत्रांचा तात्पर्यार्थ असा आहे कीं, वधूवरांनीं एकमेकांसह स्थिर राहून शतंजीव व्हावें, आणि उत्तम प्रजा उत्पन्न करावी. हेच मंत्र फिरून वरास अनुलक्षून वधूकडूनही वदविले जातात. नंतर वधूवरें कुंडाच्या पश्चिमेस पूर्वाभिमुख बसून पूर्वोक्त '**ओम् अमृतोपस्तरणमसि स्वाहा ।**' वगैरे तीन मंत्रांनीं तीन आचमनें करून पूर्वोक्त समिधा यज्ञकुंडांत घालून अग्नि प्रदीप्त करितात, व यथोक्त रीतीनें आज्य आणि स्थालीपाक सिद्ध करून मागें सांगितल्याप्रमाणें '**ओम् । अयन्तइध्म०**' इत्यादि चार मंत्रांनीं दोन्हीही समिधाहोम करून फिरून चार आघारावाज्यभागाहुती व चार व्याहृत्याहुती मिळून आठ आज्याहुती देतात. नंतर '**ओम् । अग्नये स्वाहा**' '**ओम् । प्रजापतये स्वाहा**' । '**ओम् विश्वेभ्यो देवेभ्यः स्वाहा**' व '**ओम् । अनुमतये स्वाहा**' इत्यादि चार मंत्रांनीं स्थालीपाकाच्या अर्थात् चरूच्या चार आहुती देतात. तत्पश्चात् मागें पान ३७० मध्यें सांगितल्याप्रमाणें पुनः निरनिराळ्या आज्याहुती देऊन '**ओम् । सर्वं वै पूर्ण ९ स्वाहा ।**' ह्या मंत्रानें स्रुवा आज्यानें भरून तीन पूर्णाहुती देतात. नंतर शेष स्थालीपाकावर अभिघार करून व उजवा हात ठेवून वर **ओम् । अन्नपाशेन०**' '**ओम् । यदेतद्हृदयं तव०**' आणि '**ओम् अन्नं प्राणस्य०**' इ० तीन मंत्र मनांत ह्मणून थोडासा भात खातो, व उरलेला उच्छिष्ट

भात वधूस खावयास देतो. तिनें तो खाल्ल्यावर उभयतां जोडप्यानें आपल्या आसनावर पूर्वाभिमुख बसून, **सामवेद** उत्तरार्चिक अध्याय पहिला, खंड तिसरें, ह्यांतील अनुक्रमें पहिला दुसरा व तिसरा असे तीन मंत्र यथोक्त रीतीनें गातात. ह्यास **महावामदेव्यगान** अशी संज्ञा आहे. तें गायन झाल्यावर पुनः पूर्वोक्त रीतीनें ईश्वर स्तुति, प्रार्थना, व उपासना, तसेंच स्वस्तिवाचन, शांति, वगैरे कर्म करून, नंतर आळणी परंतु सात्विक पदार्थांचें भोजन करितात. तत्पश्चात् पुरोहितप्रभृति कार्यार्थ आलेल्या सर्व मंडळीच्या सन्मानार्थ त्यांस मेजवानी देण्यांत येते; व त्यांचा यथाशक्ति आदरसत्कार झाल्यावर त्यांना बिदा करितात. पुढें विवाहाच्या रात्रीपासून एकंदर तीन रात्रपर्यंत वधूवरांनीं निरनिराळ्या जागीं जमिनीवर बिछाना अंथरून पूर्ण ब्रह्मचर्य व्रत पाळून शयन करावें, आणि चौथ्या दिवशीं रात्रीं यथाविधि गर्भाधान संस्कार करावा, वगैरे सांगितलें आहे. परंतु, त्याचा प्रस्तुत ग्रंथाशीं तादृश संबंध नसल्यानें त्याविषयीं येथें उल्लेख करण्याचें प्रयोजन नाहीं. गर्भाधान झाल्यावर पुनः पूर्ववत् होम वगैरे करून, आणि पुरोहित व वाडवडील यांचे आशीर्वाद घेऊन, यथोक्त रीतीनें वधूप्रवेश करण्यांत येतो; येवढें सांगून आह्मी हा आर्यसमाजाचा अवाढव्य लग्नविधि आटोपता घेतों !

मलय ब्राह्मणांचीं लग्नें.

लग्नासंबंधीं त्रोटक माहिती.

मलय ब्राह्मणांस नांबुरी ब्राह्मण असेंही ह्मणतात. त्यांच्यांत लग्नासंबंधानें कांहीं चमत्कारिक नियम आहेत. ते असे कीं, जो मुलगा सर्वांत वडील असेल, त्याचें मात्र लग्न करण्यांत येतें. त्याला एका स्त्रीपासून संतति न झाली, तर तीसाठीं अनेक स्त्रिया करण्याची मोकळीक असते. दुर्दैवानें तोच जर संततीवांचून मरण पावला, तर त्याच्या धाकट्या भावास लग्न करण्याची परवानगी आहे ! एखाद्या ज्येष्ठ बंधूस पुष्कळ भगिनी असून त्यांचीं लग्नें करण्याचें त्यास सामर्थ्य नसलें, तर तो त्यांना दुसऱ्या कुटुंबांत देऊन त्यांच्या विनियमानें स्वत:ला बायका करितो. त्यास अनेक बायका असल्या, तर त्यांपैकीं जिचा मुलगा सर्वांत वडील असेल, त्यालाच लग्न करण्याचा अधिकार असतो. एखाद्या गरीब कुटुंबांत पुष्कळ कन्या कुमारिका असल्या, तरी त्या सर्वांच्या विनिमयानें वडील मुलगा आपणांस बायका करूं शकत नाहीं. त्याला फक्त तीनच स्त्रिया करितां येतात. सबब, तीन बहिणी देऊन त्यांच्या मोबदल्यांत स्वत:ला तीन स्त्रिया केल्यावर आणखी कांहीं बहिणी अविवाहित राहिल्या, तर मग त्यांच्या विनिमयानें वडील बंधु आपल्यास एखाददुसरा धाकटा भाऊ असल्यास त्याला बायका करून देतो. मुली ऋतुस्नात होण्यापूर्वी त्यांचीं लग्नें करावीं लागतात. कोणी मुलगी न्हाण येईपर्यंत अविवाहित राहिली, तर तिला स्थळ मिळण्यासाठीं पुष्कळ हुंडा द्यावा लागतो. एखादा

मलय ब्राह्मण मरण पावला, आणि त्याच्या पश्चात् फक्त त्याची विधवा स्त्री, आणि एकुलती एक अविवाहित कन्या असली, तर ती विधवा एखाद्या तरुण ब्राह्मणाकडून आपल्या पतीचें श्राद्ध करवून नंतर त्यास आपली मुलगी देते. उच्च कुलांतील वरांना मोठमोठा हुंडा द्यावा लागतो. **कोचीन** येथील राजकुलास आपल्या मुली **मलय ब्राह्मणां**च्या घरीं पडाव्या अशी फार इच्छा असते. परंतु, अशा संबंधापासून ते ब्राह्मण जातिभ्रष्ट होऊन त्यांचें सर्वस्वी नुकसान होण्याचा संभव असतो. सबब, राजकन्येशीं लग्न लावणाऱ्या ब्राह्मणास घरजांवई करून राजेलोक त्याचा सर्व प्रपंच चालवितात.

मलय शूद्रांचीं लग्नें.

अनवस्थित लग्नसंस्था.

मलयशूद्रांस **नायर** असें ह्मणतात. ह्या जातींत लहानपणीं मुलामुलींचीं लग्नें नांवाला मात्र होतात! परंतु, त्यांपासून कोणत्याही प्रकारचे हक्क उत्पन्न होत नाहींत. मुलगी वयांत आल्यावर तिनें लग्नाच्या नवऱ्यापाशीं राहिलेंच पाहिजे, असा निर्बंध नसल्यामुळें ती आपल्या मर्जीस वाटेल त्या पुरुषासमागमें पत्नीच्या नात्यानें राहते; आणि त्या पुरुषांशींही मर्जीस वाटेल तेथपावेतोंच संबंध ठेविते. बेबनाव झाल्यास एकमेकांना एकमेकांचा पाहिजे तेव्हां त्याग करितां येतो. कधीं कधीं नायरकन्यांचीं लग्नें उच्च जातींतील मुलांशींही लावण्यांत येतात. परंतु, अशा संबंधांतही केवळ लग्न लाविलें ह्मणून कोणी स्त्री कोणा पुरुषाची खरी बायको होऊं शकत नाहीं! तशी होण्याला त्या पुरुषास तिच्याशीं वस्त्रदानविधि करावा लागतो. नियमान्वयें एका स्त्रीला अनेक पुरुषांशीं शरीरसंबंध करितां येत नाहीं. तत्रापि, ती अनेक बंधूंची साधारण पत्नी होऊं शकते. आपल्यापेक्षां हलक्या जातीच्या पुरुषांशीं संबंध करण्याची मनाई आहे. नायराचे वारस अनुक्रमें त्याची आई, भाऊ, बहिणी, व तिचीं मुलें, असे असतात. स्त्रीधनावर हक्क बायकोच्या मुलामुलींचा असतो.

वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक मुलीचें नांवाचें लग्न, हें ती अकरा वर्षांची होण्यापूर्वी करावेंच लागतें. नाहीं तर इष्टमित्र मुलीच्या आईबापांस नांवें ठेवितात. सबब, मुलीशीं लग्न लावण्यापुरता कोणी नवरा वेळेवर न मिळाल्यास तिचा विवाह तरवारीशींही लावण्यांत येतो. कित्येक वेळां नऊ दहा मुलींच्या ताफ्याचें एक समयावच्छेदानें लग्न लावण्यांत येतें. वधूवरांच्या पत्रिका जमतात, असें ज्योतिष्यानें सांगितल्यावर मुहूर्तनिश्चय होतो. मोठ्या लोकांच्या येथें लग्नकार्यासाठीं भव्य मंडप घालितात. लग्नाच्या आदले दिवशीं वस्त्र देण्याचा सोहळा होतो. त्या समयीं नवरीला यथाशक्ति वस्त्रालंकार परिधान करवून मंडपांत आणितात. नातेवाइकांतला एखादा मुलगा, अथवा कोणी मलयब्राह्मण लग्नाच्या वेळेपुरती वराची भूमिका घेतो; व ती घेण्याबद्दल त्याला वधूपक्षाकडून पैसेही मिळतात. मुहूर्तापूर्वी हा भाडोत्री नवरा मिरवीत मिरवीत वधूच्या घरीं आणितात. तेथें नवरीचे भाऊ त्याचें पादप्रक्षालन करितात. त्या भावांपैकीं प्रत्येकाला वराकडून एकेक वस्त्र देण्यांत येतें. नंतर वधूवरें बहुल्यावर शुभ्र वस्त्राच्छादित पाट मांडिलेले असतात, त्यावर जाऊन बसतात. अंगणांत अथवा मंडपामध्यें धान्यानें भरलेलें एक माप, नारळ, पानसुपारी, फुलें व दिवा ठेवून वधूवरांचे चुलतभाऊ व चुलतबहिणी कांहीं मंगलगीतें गातात, व शुभ मुहूर्तावर नवरा नवरीच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधितो, ह्मणजे लग्न लागलें. वर दर्शविल्याप्रमाणें नऊ दहा नवऱ्यामुलींच्या ताफ्याचें एके वेळीं लग्न व्हावयाचें असलें, आणि तेंही एकाच मलयब्राह्मणाशीं लावावयाचें असलें, तर तो ब्राह्मण सर्व मुलींच्या गळ्यांत मंगलसूत्र बांधून देतो; आणि आपण केलेल्या पापाच्या क्षालनार्थ आपले हात धुवून व घटकाभर नवरा झाल्याबद्दलचें आपलें भाडें घेऊन चालता होतो! मुलींचीं लग्नें नायर जातीच्याच मुलाबरोबर लावावयाचीं असलीं तर मात्र ताफ्यांतील प्रत्येक नवरीला स्वतंत्र नवरा असला पाहिजे असा नियम आहे. अशा

लग्नरीतीचा एक विलक्षण मासला.

प्रत्येक नवऱ्याला लग्न आटोपल्यावर नवरीकडून दोन दोन वस्त्रें मिळतात. लग्नसमारंभ चालू असतां, नृत्यगीतादि मनोरंजनाचे प्रकार होतात; व स्त्रिया आनंदप्रदर्शनार्थ 'कुरावा!' (?) असा उद्गार काढितात. लग्नानिमित्त चार दिवस मेजवान्या व नानाप्रकारच्या करमणुकी करण्यांत येतात. चवथ्या दिवशीं स्नानविधि व्हावयाचा असतो. त्यासाठीं वधूवरें इष्टमित्रमंडळीसह वाजत गाजत नदीवर जातात. हा विधि कोणत्या उद्देशानें करीत असतील ते असोत. वर आलेल्या एकंदर हकीकतीवरून पाहतां, वधूवरें लग्न लागल्याबद्दल स्नान करून मोकळीं होत असल्यास न कळे! ह्या अखेरच्या दिवशींही इतर सर्व गोष्टी प्रथम दिवसाप्रमाणेंच करण्यांत येतात.

वस्त्रदानाचा बीभत्स प्रकार, वगैरे.

वर सांगितल्याप्रमाणें लग्न झाल्यानंतर मुलगी आपल्या भावाच्या अथवा इतर नातलगाच्या घरीं राहते; व पुढें ती आपल्या इच्छेस येईल त्या पुरुषापासून केव्हांही वस्त्रदान घेऊन त्याची खरी पत्नी होते. ज्या पुरुषाशीं लग्न लाविलें, त्यानें वस्त्र दान करून त्या स्त्रीला आपली खरी बायको करूं नये, असा नियम नाहीं. पुष्कळ वेळां लग्न लावणारा, आणि वस्त्रदान करणारा पुरुष एकच असतो. वस्त्र देण्याचा विधि रात्रौ ठरलेल्या वेळीं, आणि नातलगांसमक्ष करण्यांत येतो. त्याचा प्रकारही विलक्षणच आहे. तो असा कीं, जमिनीवर बिछायत घालून तिजवर वस्त्र देणारा पुरुष, व घेणारी स्त्री, आपापल्या इष्टमित्रांसह बसतात. त्यांच्यापुढें स्त्रीपुरुषांच्या जननेंद्रियांच्या आकृती काढितात! सर्व मंडळीसमक्ष स्त्रीचा अंगिकार करणारा पुरुष तिला एक उंची वस्त्र देऊं लागतो. तेव्हां ती स्त्री आपल्या मामास व आईस हें वस्त्र मी घेऊं काय म्हणून विचारिते, व त्यांचा रुकार मिळतांच ती तें ग्रहण करिते. जिला वस्त्रदान करावयाचें त्या स्त्रीची आई, बाप, बहिणी, भाऊ, व इतर जवळचे आप्त, ह्यांनाही त्या पुरुषाकडून कमजास्त किंमतीचीं वस्त्रें देण्यांत येतात. तीं दिलीं, म्हणजे कृत्य आटोपलें. मग ती स्त्री त्या पुरुषासमागमें

राहण्यास जाते. पुढें त्या उभयतांस जी संतति होईल, तिचे वस्तुतः दोन पिते असतात! आईनें ज्याशीं लग्न लाविलें तो एक, व तिनें ज्याशीं शरीरसंबंध केला तो दुसरा. सबब, मुलें आपल्या पहिल्या पित्याला 'अप्पन्' आणि दुसऱ्याला ' अच्छन् , असें ह्मणतात.

नायरांच्या विवाहावरील आमचे उद्गार.

वरील एकंदर हकीकतीवरून **मलय शूद्र** अथवा **नायर** लोकांत लग्नसंस्था अगदींच अनवस्थेंत आहे, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. हिंदु धर्मांत विवाहानें स्त्रीपुरुषांत पतिपत्नी हा संबंध कायमचा होतो, असा सर्वसाधारण नियम आहे. परंतु, नायर लोकांचा विवाह, हा त्या नियमास एक अपवादच ह्मणावयाचा! त्यांच्या विवाहानें तो संबंध कायमचा होत नाहीं; आणि असें आहे, तर हे लोक लग्न ह्मणून जें कांहीं करितात, तें अगदींच अहेतुक आणि निरर्थक होय! बरें, वस्त्रदान हेंच ह्यांचें लग्न ह्मणावें, तर त्यापासून उत्पन्न होणाऱ्या संबंधालाही शाश्वती नसते! वारसाईचे हक्क पाहिले, तर तेही विलक्षणच आहेत. असे हक्क **टिपरा** संस्थानच्या राजघराण्यांत, सिलहट पर्वतांत राहणाऱ्या **कासिया** लोकांत, **सुमात्रा** बेटांतील लोकांत, आणि आफ्रिकेंतील कित्येक **हबशी** लोकांत मात्र चालू आहेत, असें समजतें. पण ते बहुतेक लोक रानटी स्थितींत आहेत. मलय शूद्रांची परिस्थिति त्यांच्यासारखी नाहीं. हे लोक, आचारविचारांनीं उन्नतावस्थेंत असलेल्या तद्देशीय ब्राह्मणांच्या समागमानें राहून ह्या संबंधानें अद्यापि इतक्या निकृष्ट दशेंत कसे राहिले, आणि ब्राह्मणांनींही त्यांना ह्या स्थितींत कसें राहूं दिलें ह्याचें नवल वाटतें!

मुदलियार लोकांची लग्नरीति.

सोयरीक जमविण्याची रीति, लग्नतिथि, आणि वाग्निश्चय.

मुदलियार जातीचे लोक **त्रावणकोर, कोचीन** व **मलबार** प्रांतांत राहतात. ह्या लोकांत मुलीला ऋतु प्राप्त झाल्यावर किंवा तत्पूर्वी तिचें एखाद्या योग्य वराशीं त्याच्या सवडीप्रमाणें लग्न लावण्यांत येतें. मुलांचीं लग्नें चवदापासून वीस वर्षांच्या वयापर्यंत करितात. आपल्या इच्छेप्रमाणें सर्व व्यवस्था घडून येऊन आपल्या डोळ्यांदेखत मुलाचें लग्न व्हावें, अशी बापाची फार इच्छा असते. मुलाचा बाप व मामा स्थळाविषयीं तपास करितात. एखादें सुस्थळ आढळून आलें, ह्मणजे त्या गृहस्थास पूर्वी कांहीं एक खबर न देतां ते अकस्मात् त्याच्या घरीं जातात. अर्थात् घरचा मालक त्यांना 'कां आलांत?' ह्मणून प्रश्न विचारितो. 'आपण आपली मुलगी आमच्या मुलाला द्याल काय? असें विचारण्यासाठीं आह्मीं आलों आहोंत!' ह्मणून ते सांगतात. 'कांहीं दिवसांनीं पुन्हां या, ह्मणजे आपण त्यासाठीं दिवस नक्की ठरवूं' असें मुलीचा बाप त्यांना ह्मणतो. नंतर मुलाचा बाप व मामा मुलीच्या आईस व मामास दोन तीन 'फनाम'* देऊन तेथें जेवणखाण करून जातात. कांहीं दिवस लोटल्यावर मुलाचा बाप मुलास कांहीं फनाम देऊन मुलीच्या घरीं पाठवितो. तो ते फनाम वधूपक्षास देऊन कित्येक दिवस त्यांच्या येथें राहून पाहुणचार घेतो. नंतर एखाद्या शुभ मुहूर्तावर मुलगा व त्याचे नातलग फिरून मुलीच्या घरीं

---

* $\frac{1}{5}$ रुपयाच्या किंमतीचें नाणें.

जाऊन लग्नतिथि ठरवितात. मुलाच्या नातलगांत जो मनुष्य वयोवृद्ध असेल, तो मुलीच्या बापास तीन फनाम रोख व दोन फनामांच्या किंमतीचे दोन मणि देऊन ह्या 'मुलाची ही मुलगी बायको होण्याचें आज नक्की ठरलें!' असें मोठ्यानें उच्चारितो. नंतर मुलीचा बाप मुलाच्या घरीं तीन शेर भात व एक भांडेंभर दारू पाठवितो. हा नजराणा त्यांनीं घेतला, ह्मणजे वाक्‌निश्चय झाला असें समजावयाचें.

लग्नदिवशीं द्यावयाच्या देणग्या व इतर किरकोळ आचार.

लग्नदिवशीं वरानें दिलेले कपडे वधूला परिधान करवितात. वरपक्षानें लग्नमध्यस्थाला सोळा किंवा बावीस फनाम द्यावे लागतात. मध्यस्थ ते घेऊन मुलीची आई आणि इतर नातलग ह्यांस वांटितो. मुलीची आई किंवा तिच्या बहिणी वराजवळ गेल्या असतां अशुभ मानिलें जातें! सबब, लग्नदिवशीं मुलीची आई आणि मावशी लग्नघरीं राहत नाहींत. सासूच्या मानाखातर जांवई विडा व पैसा ठेवून उठून जातो. ह्मणजे मग सासू येऊन तो उचलून घेते. लग्नाप्रीत्यर्थ केव्हां केव्हां वधूपक्षास वरपक्षानें गाय अथवा कांहीं इतर देणगी द्यावी लागते.

लग्नरीति.

लग्नमंडप मुलीच्या घरीं देण्यांत येतो. नातलगांना व मित्रमंडळींना आमंत्रण करितात. लग्नविधि सायंकाळपासून सकाळपर्यंत चालू असतो. प्रथम दारू पिऊन थोडा वेळ गप्पागोष्टी सांगतात. नंतर मेजवानीची तयारी होते. तीसाठीं वराचा बाप व नातलग बावीस एडुंगलीं* तांदूळ, टोपल्या, चटया, भांडीं, मसाले, वगैरे सामान आणून देतात. स्वयंपाक वरपक्षाकडील कोणी दोघे असामी करितात. भात वाढिला, ह्मणजे चार पांच माणसें वाद्यें वाजवून नाचतात. वराची बहीण वधूच्या गळ्यांत लग्नचिन्ह ह्मणून कांचेच्या मण्यांची माळ घालिते. नंतर स्त्रिया व पुरुष निरनिराळ्या जागेंत केळीच्या पानांवर जेवावयास

* हें त्या देशांतील एक माप आहे.

बसतात. नवरानवरींस एका पात्रांत जेवावयास बसवावयाची चाल आहे. मेजवानी मध्यरात्रीं होते. तदनंतर पानसुपारी खाऊन नाचण्याबागडण्यांत अथवा इतर करमणुकींत ती सर्व रात्र घालवितात. सूर्योदय होतांच एका सुपांत शंख ठेवून त्यावर सूत गुंडाळितात, आणि नंतर तें सूप पालथें करून तो शंख जमिनीवर पाडितात. जर तो पूर्व किंवा उत्तर दिशेस पडेल, तर झालेला लग्नसंबंध उभयपक्षीं चांगला सुखावह होईल, असें भाकितात. परंतु, जर तो पश्चिमेस किंवा दक्षिणेस पडेल, तर लग्नाचा परिणाम अनिष्ट होणार असें मानिलें जातें. शंखशकुन पाहिल्यावर मुली व इतर लहान मुलें सूर्याला व सर्व दिशांना नमस्कार करून बापास व मामास वंदन करितात. नंतर वधूकडील दोन तीन असामी वरपक्षास त्यांच्या घरीं पोचविण्यास जातात; व तेथें दारू प्याल्यावर आपल्या घरीं परत येतात.



कानिकार लोकांची लग्नरीति.

कानिकार लोकांची वसती **त्रावणकोर**च्या दक्षिण भागांत आहे. ह्या लोकांत मुलामुलींचीं लग्नें त्यांच्या अनुक्रमें सोळाव्या व सातव्या वर्षानंतर करण्यांत येतात.

तिथिनिश्चय व लग्नरीति.

तथापि, मुलींना पुष्कळ वेळां लवकर स्थळें मिळत नाहींत; व त्यामुळें त्या सोळा सोळा वर्षांच्या वयापावेतों अविवाहित असतात. ज्या पुरुषाला लग्न करण्याची इच्छा असेल, तो दोघे चौघे नातलग बरोबर घेऊन मुलीच्या चुलत्यास भेटतो. त्याचे नातलग त्याच्या लग्नाची गोष्ट काढितात. ती पसंत पडल्यास लागलीच तिथिनिश्चय होतो; व पानसुपारी पाठवून इष्टमित्रांस लग्नाचें निमंत्रण करण्यांत येतें. नवरा नवरीच्या घरीं गेल्याबरोबर आपल्या सासूला घरांत नेसण्याचें वस्त्र, ज्यास 'अम्मा विदु मुंदू' असें ह्मणतात, तें देतो; नंतर वधूला लग्नमंडपांत आणितात. तेथें वरपक्षाचा कोणी मनुष्य वराच्या हातीं चार 'चक्रम्' किमतीची एक माळ देतो. ती तो सूर्यास दाखवून वधूच्या कंठास लावितो. मग त्याची जवळ उभी असलेली बहीण ती माळ घेऊन वधूच्या गळ्यांत घालिते. तसेंच वर एक वस्त्र घेऊन आपल्या बहिणीजवळ देतो. तेंही ती वधूस देते. नंतर कोणी प्रौढ मनुष्य बायकोचें संगोपन कसें करावें, व तिला कसें वागवावें, ह्याविषयीं वरास कांहीं उपदेश करितो. त्यांतील आशय असा आहे कीं, बायकोनें कांहीं अपराध केला असतां प्रथम तिला शब्दांनीं सांगावें, दुसऱ्या प्रसंगीं कांहीं

शासन करावें, तिसऱ्या प्रसंगीं कडक शिक्षा करावी, आणि इतकेंही करून ती नीट न वागल्यास अखेरीस तिला टाकून द्यावी. लग्नदिवशीं वधूच्या घरीं आणि दुसऱ्या दिवशीं वराच्या घरीं मेजवानी होते. ह्या मेजवान्यांस पैसेवाले लोक शंभर फनामपर्यंत खर्च करितात. परंतु, गरीब असतात, ते मेजवान्या न देतां पानतमाखूवरच कार्यभाग करितात. वधूपक्षाकडून वधूबरोबर कुऱ्हाड, पावडें, विळा, प्याले, मातीचीं भांडीं, वगैरे वस्तु अंदण देण्यांत येतात.

इलावार छोगान व तीयार लोकांचीं लग्नें.

विवाहकाल, नांवाचीं लग्नें, आणि तत्संबंधीं पूर्वकृत्यें.

नायर लोकांप्रमाणें ह्या लोकांतही एक वर्षापासून नऊ वर्षांच्या वयापावेतों मुलींचीं नांवाचीं लग्नें करण्यांत येतात. त्यांचे नामधारी नवरे, हे जवळच्या नातलगांपैकींच असतात. ते मुलींशीं लग्न लावण्याचे मात्र धनी. बाकी लग्नानंतर ते आपल्या बायकांस घेऊन राहतील, अथवा बायका त्यांच्या जवळ राहतील असें मुळींच नाहीं. परंतु, आश्चर्य हें कीं, आपापल्या मुलींचीं अशीं नांवाचीं लग्नें आईबापांनीं त्या लहान असतांच करून दिलीं नाहींत, तर त्यांना जातीकडून बहिष्कार घालण्यांत येतो! विवाहापूर्वी सुमारें एक महिना जातीच्या पुढाऱ्यांना आणि नवरानवरींच्या मामांना पानतमाखू पाठवून लग्नाचें निमंत्रण द्यावें लागतें. तें दिल्यावर प्रथमतः चांगला दिवस पाहून मंडप घालण्यास मुहूर्त करितात; आणि मग तो हळू हळू आपल्या हौशीप्रमाणें उभारून नानाप्रकारच्या शोभिवंत वस्तूंनीं शृंगारून तयार ठेवितात. मांडवाच्या नैरृत्य दिशेस दगडांचें बहुलें घालून त्यास सफेता देतात. त्याच्या सभोंवतीं रंगीबेरंगी कापडांच्या कनाती, व कागदी फुलें आणि वेलपत्त्या लावून तें मोठें शोभायमान करण्यांत येतें. नंतर त्यावर रेशमी वस्त्रानें आच्छादिलेला एक प्रशस्त पाट ठेवून त्यावर आरसे, तरवारी, वगैरे वस्तु व्यवस्थेनें मांडितात. मंडपाच्या उत्तरेस व दक्षिणेस नवऱ्यामुलींना समोरासमोर बसण्याकरितां दोन उंच जागा तयार करून त्यांवर

पांढऱ्या स्वच्छ चादरी घालितात. खर्च आणि दगदग विशेष न व्हावी, एतदर्थ बऱ्याच नवऱ्यामुलींचे विवाह एक समयावच्छेदानें लावण्यांत येतात.

स्नान, मिरवणूक, व लग्नमंडपांतील कांहीं कृत्यें.

लग्नदिवशीं सर्व नवऱ्यामुलींना समुदायानें नदीवर नेऊन स्नान घालितात, आणि त्यांस उत्तम वस्त्रालंकार परिधान करवून मोठ्या समारंभानें मिरवीत मिरवीत परत आणितात. ह्या मिरवणुकींत न्हाव्याच्या स्त्रिया गाणीं गातात, आणि वाजंत्री नाना प्रकारचीं वाद्यें वाजवितात. मिरवणूक मंडपद्वारापाशीं येतांच वाद्यें बंद करितात. नंतर जी नवरी वयानें सर्वांत वडील असेल, तिला लग्नासाठीं तयार करितात. ती आपल्या तोंडावरून बुरखा घेते. नंतर तिचा चुलत अथवा मामेभाऊ तिला बहुल्यावर घेऊन जातो; व इतर नवऱ्या त्यांजकरितां जीं दोन उच्च आसनें करण्यांत येतात ह्मणून वर सांगितलें, त्या आसनांवर बसतात. त्या सर्वांच्या डोक्यांवर पांढऱ्या व तांबड्या रंगांचीं वस्त्रें घातलेलीं असतात. त्यांच्या डाव्या बाजूस कर्दळीच्या पानांवरून लांकडी आणि पितळी मापांत तांदूळ भरून ठेवितात, आणि श्रीफलांच्या अर्धशकलांतून तेलवाती घालून त्यांचे दीप शुभ्र वस्त्रांच्या घड्यांवरून ठेवितात. तसेंच पितळेचे दिवे, आणि दोऱ्यांत ओंविलेलीं लग्नकंकणें तेथें ठेवण्यांत येतात. नंतर न्हाव्याची बाई नवऱ्यामुलींच्या डाव्या कोंपरांखालून पानें ठेविते, आणि लग्नकंकणें घेऊन जमलेल्या मंडळीस अनुलक्षून विचारिते कीं, 'मी हीं कंकणें मुलींस घालूं काय?' त्यांचा रुकार मिळतांच ती मुलींस कंकणें घालिते. मुलींचे मामा आपल्या मुलांना त्यांच्या मामेबहिणींचीं नांवें आणि जन्मतिथी लिहून काढण्यास सांगतात, आणि वरांच्या मामांना पानतमाखू देतात. वर आपल्या मामेसासऱ्यांचें अनुमोदन घेऊन बाहेर जाऊन हजामती करवितात! नंतर स्नानें करून, गंध लावून, कडीं कंठ्या वगैरे अलंकार धारण करितात. हे अलंकार जवळ नसले, तरी भाड्यानें आणून घालण्याची चाल आहे.

ह्याप्रमाणें वर लग्नासाठीं तयार झाले, ह्मणजे वाजत गाजत लग्नमंडपांत परत येतात. मार्गांतून त्यांची मिरवणूक चालली असतां कुस्त्या, दांडपट्टे, वगैरे मर्दुमीचे खेळ करण्याचा रिवाज आहे. वर मिरवत मिरवत लग्नमंडपाच्या द्वारापाशीं येतांच ज्यांनीं मंडप घालण्याचें काम केलें असेल, त्या लोकांस विड्याच्या पानांचे पुडे बक्षीस देतात. नंतर सर्वांत वडील मुलीशीं लग्न लावणाऱ्या वरास बहुल्यावर नेऊन वधूशेजारीं तिच्या उजवीकडे बसवितात. इतर सर्व वरांसही मंडपांत आपापल्या वधूच्या उजव्या बाजूस पाटांवरून बसवितात. ह्याप्रमाणें सर्वजण स्थानापन्न झाल्यावर ज्योतिषी पुढें येऊन 'लग्नमुहूर्त नजीक आला.' असें सर्वांस सांगतो. मग न्हाव्याच्या बायका हातांत मंगलसूत्रें घेऊन उभ्या राहतात; आणि वधूंचीं नांवें व जन्मतिथी ह्यांचा उच्चार करून ज्योतिष्यानें सांगितलेल्या मुहूर्तावर तीं मंगलसूत्रें वधूंच्या गळ्यांत बांधण्याविषयीं त्या वधूंच्या नातलगांचें अनुमोदन घेतात. तें मिळाल्यावर त्या न्हाविणी तीं मंगलसूत्रें वरांच्या हातीं देऊन त्यांजकडून तीं आपापल्या वधूच्या गळ्यांत बांधवितात. नंतर ज्या त्या वराची सासू आपल्या जांवयाच्या हातीं 'चक्रम्' नांवाचीं दहा नाणीं देते; व इतर नातलग यथाशक्ति पांचापासून दहापर्यंत 'फनाम' नांवाचीं नाणीं तबकांत टाकितात. न्हावीणी त्यांपैकीं एकेक फनाम घेऊन बाकीचे ज्या त्या वधूच्या मामीजवळ देतात. नवविवाहित नामधारी वर आपल्या सासऱ्याच्या घरीं एक आठवडाभर राहतात. ह्या मुदतींत नाना प्रकारचे खेळ वगैरे करून त्यांची करमणूक करण्यांत येते. विवाहाच्या सातव्या दिवशीं लग्नकंकणाचें विसर्जन करितात, ह्मणजे कार्य संपलें. नामधारी वरास त्यानें मुलीशीं लग्न लाविल्याबद्दल कन्यापिता पंचवीस फनाम, केळांचा घड, पांच मापें तांदूळ, आणि यथाशक्ति पोषाक देऊन त्याच्या घरीं पोंचता करितो.

नामधारी वरांची मिरवणूक, लग्नरीति, इतर रिवाज व कार्यसमाप्ति.

खऱ्या नवऱ्याच्या घरीं मुलींची बोळवण.

अशा रीतीनें लग्न झालेल्या मुली पुढें ऋतुस्नात झाल्यावर त्यांच्या नातलग पुरुषांपैकीं जे कोणी त्यांस आपल्या बायका करूं इच्छितील, त्यांच्याजवळ त्या जाऊन राहतात. लग्नसमयीं नामधारी नवऱ्याकडून जें कांहीं मिळालें असेल, तें त्या आपल्या खऱ्या नवऱ्याच्या घरीं जातांना बरोबर घेऊन जातात. शिवाय त्यांचे पिते त्यांना यथाशक्ति अलंकार, भांडींकुंडीं, गाई, म्हशी, वगैरे भोग्य व संसारोपयोग्य वस्तु अंदण देतात.

शानार लोकांची लग्नरीति.

सोयरीक जमविण्याची रीति, हुंडा, तिथिनिश्चय वगैरे.

अमुक एका मुलाला मुलगी देण्याविषयीं कन्येच्या आईबापांचा निश्चय झाला, ह्मणजे ते वरपिताप्रभृति तत्पक्षाच्या मंडळीस आपल्या घरीं भोजनास बोलावितात. वरपिता आपल्या इष्टमित्रांस घेऊन जेवावयास जातो. ही जेवणावळ झाली, ह्मणजे उभय पक्षांत सोयरीक ठरली असें समजतात. ह्या जेवणावळीच्या दिवशींच वरानें वधूस काय हुंडा द्यावयाचा, व तो कधीं द्यावयाचा, त्याबद्दल ठराव करण्यांत येतो. पुढें लग्नतिथि मुकरर करण्यांत आल्यावर तिच्या आदले दिवशीं वराकडे भात आणि तांदळांच्या पिठाच्या भाकरी करून ठेवितात; आणि त्या दिवशीं वरास उपोषण घालण्यांत येतें.

मंडपस्थापना वरप्रस्थान व लग्नरीति.

लग्नदिवशीं वधूपक्षाची मंडळी आपल्याकडे मंडप घालितात. त्याची रीति अशी आहे कीं, ताडाचीं झाडें कापून त्याचे नऊ खांब अंगणांत उभे करावयाचे. त्यांपैकीं पहिला, ह्मणजे नैऋत्य दिशेचा खांब उभा करितांना त्यापुढें एक मापभर तांदूळ, पानसुपारी व चार चक्रम् इतकी बाबत ठेवण्याची चाल आहे. ही बाबत ठेवून तो खांब उभा केल्यावर रीतीप्रमाणें सर्व मंडप घालण्यांत येतो. नंतर कन्यापिता वरील बाबतीसुद्धां, शिजलेल्या भाताचें एक भांडें गांवच्या पाटलाकडे पाठवून देतो, आणि आपल्या इष्टमित्रांस मेजवानी देतो.

सुमुहूर्तापूर्वी वराचा श्मश्रु करवून त्याला स्नान घालितात. नंतर त्यास वर सांगितलेला शिळा भात खावयास देतात! मग न्हावी त्याला गंध लावून आणि वस्त्रालंकार घालून लग्नास नेण्यासाठीं तयार करितो. वधूगृहीं वराला घोड्यावर किंवा पालखींत बसवून नेण्याची चाल आहे. प्रस्थानाची मिरवणूक निघण्यापूर्वी वर आपल्या मातापितरांस नमस्कार करून नंतर वाहनारूढ होतो. त्याच्या हातीं तरवार आणि नारळ दिलेला असतो. मिरवणुकीपुढें नाना प्रकारचीं वाद्यें वाजविणें, खेळ करविणें, दारू सोडणें, नारळ फोडणें, वगैरे सर्व प्रकार करण्यांत येतात. मिरवणूक वधूच्या घरानजीक येतांच तत्पक्षाचे वाजंत्री वाद्यें वाजवीत वराला सामोरे येतात.- वर मंडपांत आल्यावर कन्यापिता त्याला आसनावर बसवून गंध लावून त्याच्या गळ्यांत पुष्पहार घालितो; आणि त्यास व इतर मंडळींना गुळाचें शरबत, पानसुपारी, वगैरे देऊन सर्वांचा सत्कार करण्यांत येतो. वराच्या मामास मंडपामध्यें दूध व फळें ह्यांचा फराळ घालण्याची चाल आहे. फराळ झाल्यावर त्यास एका केळीच्या खांबापाशीं पाटावर बसवितात; आणि त्यापुढें टोपलीभर तांदूळ, कांहीं वस्त्र, नारळ, केळीं, आणि विड्याचीं पानें, ह्या वस्तूंचा नजराणा आणून ठेवितात. मग वरपक्षाचा कोणी मनुष्य वधूस देण्याचे वस्त्रालंकार, मंगळसूत्र, वगैरे जिन्नस एका टोपलींत घालून ते मामापुढें आणून ठेवितो. मामा ती टोपली वराच्या हातीं देऊन त्याच्या डोकीच्या रुमालाच्या पदरीं चार चक्रम् बांधून त्यास आशीर्वाद देतो. नंतर नवरा ती टोपली घेऊन आपल्या बहिणीजवळ देतो. बहीण कांहीं वेळानें ती टोपली व एक लहानसें तेलाचें भांडें घेऊन वधू ज्या खोलींत बसली असेल तेथें जाते. वधू तिला दोन विडे देते; आणि ती वधूच्या डोकीवर तीन वेळां तेल घालून नंतर तिला टोपलींतील वस्त्रालंकार देते. इकडे मंडपांत वरपिता कन्यापित्याला न्हावी, धोबी, वाजंत्री, वगैरे लोकांस देण्यासाठीं ह्मणून यथाशक्ति कांहीं रकम देतो; आणि ग्रामदेवता व ग्रामणी ह्यांना देण्यासाठीं अनुक्रमें सात व पांच फनाम देतो. वराच्या बहि-

णीलाही कांहीं पैसे व पानसुपारी देण्यांत येते. मुलीची आई एका मोठ्या नव्या भांडयामध्यें एकवीस मापें तांदूळ घालून त्या भांडयाचें तोंड आपल्या नातेवाइकांपैकीं कोणा एकाकडून बांधवून तें भांडें वरास देते. नंतर वधूवरांस मंडपामध्यें एका पाटावर उभे करून कन्यापिता वराला वधूचा उजवा हात धरण्यास सांगतो. लग्नाचें चिन्ह असें जें मंगलसूत्र, तें वर वधूच्या गळ्याशीं धरितो, व त्याची बहीण तें घेऊन वधूच्या गळ्यांत बांधिते. नंतर तांदूळ कांडण्याच्या उखळींत कांहीं सरक्या व तेल टाकून तें पेटवितात; आणि वराचा भाऊ ती उखळी घेऊन एका खांबासभोंवतीं तीन प्रदक्षिणा घालितो. वधूवरेंही त्याच्या पाठीमागून त्या खांबास तीन फेरे घालितात. पुढें त्या नवीन जोडप्यास पाटावर एकमेकांशेजारीं बसवितात; आणि एका भांडयांत थोडेसें तेल व कांहीं चक्रम् टाकून तें वरास देतात. वर त्यांतील तेलास तीनदां स्पर्श करून तें थोडेसें घेऊन वधूच्या डोकीवर घालितो. त्याचप्रमाणें वधूही वराच्या डोकीवर तेल घालिते. तत्पश्चात् त्या उभयतांस दोन साधीं वस्त्रें नेसावयास देऊन मंगलस्नान घालितात; आणि नंतर भात खावयास देतात. इतर सर्व मंडळीस कन्यापक्षाकडून जेवणावळ देण्यांत येते. पुढें वधूवरांवरून चुना व हळद ह्यांचें मिश्रण तीनदां ओंवाळून फेंकून देतात. वधू आपल्या सासूला नमस्कार करून आपल्या बापानें आपणांस दिलेल्या सर्व वस्तु तिच्या स्वाधीन करिते. सासूबाई सुनेच्या हातांत कंकण घालून तिला मिठाच्या भांडयास नमस्कार करावयास सांगतात! ह्मणजे लग्नसमारंभ संपला. पुढें लग्नानिमित्त उभयपक्षांकडे एकेक मेजवानी होते.

गोमांतकांतील ख्रिस्ती लोकांचा लग्नविधि.

ह्या भागांतील उच्च वर्गाच्या लोकांनीं आपले राज्यकर्ते जे **फिरंगी** त्यांच्या पोषाकाचें, भाषेचें, व सामाजिक रीतीभातींचें अनुकरण केलें आहे; व तें साहजिक होय. तथापि, कामकरी वर्गानें ख्रिस्ती धर्म स्वीकारिला असूनही आपले मूळचे रीतिरिवाज सोडिले नाहींत.

रीतीभाती-विषयीं.

लग्ननिश्चय—हा नेहमीं वडिलांच्या मार्फत होतो. तो वधूवरांकडून प्रत्यक्ष रीतीनें कधींही होत नाहीं. तसेंच, वधूवरें एकाच गांवांत रहात असलीं, तरी देखील तीं परस्परांना विवाहास अनुकूल करून घेण्याकरितां एकमेकांची मनधरणी करीत नाहींत. वधू आपल्या लौकिकी स्थितीच्या मानानें नवऱ्याच्या घरीं जातांना जवाहिराच्या किंवा द्रव्याच्या रूपानें थोडें बहुत स्त्रीधन घेऊन जाते.

सोयरीक व स्त्रीधन वगैरे.

वधूवरप्रतिज्ञा—बहुतकरून ज्या गांवची वधू असेल, त्या गांवच्या देवळामध्यें तीं वधूवरें जातात. नंतर तेथील धर्मोपदेशक वधूस एकीकडे नेऊन " मी केवळ आपल्या खुषीनें लग्न करीत आहे, जबरदस्तीनें करीत नाहीं; व दुसऱ्या कोणाही पुरुषास, तुजबरोबर लग्न लावीन असें मी वचन दिलें नाहीं, " अशा मतलबाची तिला धर्मग्रंथाच्या शपथेवर प्रतिज्ञा करण्यास सांगतो. वराकडूनही अशीच प्रतिज्ञा करवितात. हा प्रतिज्ञाविधि संपला, ह्मणजे वधूवरांस एकमेकांशीं संभाषण करण्यास मोकळीक देतात. ह्या प्रसंगीं, तांदळाच्या

प्रतिज्ञा व मेजवानीचा चमत्कारिक प्रकार.

पिठाच्या पोळ्या, आणि त्याच पिठाच्या कोंबड्या, कांसवें, मासे, वगैरे नानाप्रकारच्या प्राण्यांसारख्या आकृती करून त्यांत खवलेला नारळ व गूळ यांचे सारण घालून पक्वान्नें तयार करितात, व त्यांची मेजवानी देतात.

लग्नाची जाहिरात—वधूवरांकडून प्रतिज्ञा करवितात, ह्मणून वर सांगितलें. त्या प्रतिज्ञा नोंदण्याचें एक पुस्तक असतें. त्यांत त्या नोंदितात, व त्या नोंदीची एक नक्कल धर्मसभेकडे पाठविण्यांत येते. धर्मसभेकडून वधू आणि वर ज्या ज्या गांवचे असतील, त्या त्या गांवच्या धर्मोपदेशकांस, त्यांच्या लग्नासंबंधीं जाहिरात अगाऊ तीन वेळां प्रसिद्ध करण्याविषयीं हुकूम जातो. हुकुमाप्रमाणें त्या त्या गांवच्या देवळांतून तेथील धर्मोपदेशक तीन वेळां जाहिरात प्रसिद्ध करितात; व तें लग्न होण्याला कोणीही आडकाठी घातली नाहीं, ह्मणजे धर्मसभेस त्याप्रमाणें कळवितात. मग तिकडून हें लग्न लावण्यास कोणाचीही हरकत नाहीं, अशा अर्थाचा दाखला, व लग्न समारंभ साजरा करण्याबद्दल परवाना येतो. त्यांतील सारांश वधूवरांस कळवितात. पण मुख्य कटाक्ष लग्न सूर्योदयानंतर व सूर्यास्तापूर्वी लाविलें पाहिजे, आणि त्या प्रसंगीं वधूनें आपलें मुख उघडें ठेविलें पाहिजे, ह्या दोन गोष्टींवर असतो. पैकीं शेवटची बाबत मुद्याची समजली जाऊन तिजविषयीं खबरदारी ठेवण्यास सांगतात. कारण, वधूवरांनीं परस्परांस बहुधा एकदाच, ह्मणजे प्रतिज्ञा करितेसमयीं पाहिलेलें असतें; व देवळांत एके दिवशीं आणखी कित्येक लग्नें व्हावयाचीं असतात. त्यामुळें भलत्या वधूचें भलत्याच वराशीं चुकून लग्न लागण्याचा संभव असतो; आणि एकदा लग्न लागलें, ह्मणजे तीं वधूवरें गफलतीनें जन्माचीं बांधलीं जातात. तसें होऊं नये, ह्मणून लग्नसमयीं वधूनें आपल्या डोक्यावरून बुरखा न घेण्याविषयीं तिला अगाऊ मुद्दाम बजावून सांगतात.

प्रतिज्ञांची नोंद, व लग्नाच्या जाहिरातीसंबंधीं नियम वगैरे.

लग्नविधि—हा बहुतकरून वराच्या गांवीं होतो, व तो दिवस असतांच झाला पहिजे, अशी ताकीद असते. ही वेळ ह्मणजे कामकरी लोक आपापल्या कामावर असण्याची. त्यांना लग्ना-

लग्नविधि.

साठीं एकत्र जमण्याला सवड मिळूं शकत नाहीं. सबब, वधूवरें देवळांत जाऊन लग्नविधि तेवढा उरकून घेतात, व गृहप्रवेशाचा विधि इष्टमित्रांच्या येण्यावर बाकी ठेवितात. ते येईपर्यंत त्या विवाहित जोडप्यास एखाद्या शेजाऱ्याच्या घरीं त्यांची वाट पहात बसावें लागतें. मंडळी जमली, ह्मणजे सर्वांसहवर्तमान तें जोडपें थाटानें गृहप्रवेश करितें. त्या प्रसंगीं वधू-कडील प्रौढ बायकोनें, किंवा जमलेल्या मंडळींपैकीं जी बाई सर्वांत वडील असेल तिनें, दोघांची सांगड घालावयाची. ती वराच्या उजव्या हाताची, व वधूच्या डाव्या हाताची करांगुली एकमेकांत सांखळीप्रमाणें अडक-विते. मग अशा रीतीनें एकमेकांचें पाणिग्रहण करणारें तें जोडपें समारंभानें गृहप्रवेश करितें. घरांत गेल्यावर उभयतां ┼ अशा आकृतीच्या क्रूसापुढें गुडघे टेंकून नमतात. नंतर नवरा, बाहेर त्या समारंभासाठीं आलेल्या मंडळींत जाऊन बसतो; व नवरीला कुमारिकेचा वेष बदलून विवाहित स्त्रीचा वेष धारण करण्यासाठीं स्त्रिया आंत घेऊन जातात. दोन्ही वेषांत अंतर ह्मणून इतकेंच कीं, कुमारिकेच्या साडीचा पदर तिच्या कमरेभोंवतीं गुंडा-ळिलेला असतो, व लग्न झाल्यावर तो (दक्षिणी स्त्रियांप्रमाणें) खांद्यावरून घ्यावयाचा. त्याप्रमाणें नवरीला पदर दिला, ह्मणजे जमलेल्या मंडळीस मेज-वानी देतात. ह्या मेजवानीस नवरी पडद्याऐवजीं आपल्या डोळ्यांपुढें हातरुमालाची घडी धरून येते.

वधूविनोद, व लग्नसमाप्ति.

नंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं वधूस, व तिच्या करवलीस भेटण्याकरितां (अर्थात् त्यांच्याशीं विनोद करण्याकरितां) एक नकल्या शस्त्रवैद्य येतो. त्याजपाशीं नारळीच्या पानांचा एक प्रचंड चस्मा, लांब-लचक काठीस गुंडाळिलेली एक चटई, फासणीच्या ऐवजीं एक मोठा थोरला सुरा, आणि एका पाटींत औषधें ह्मणून कांहीं हाडें व झाड-पाला असतो. मद्य येईपावेतों ह्या शस्त्रवैद्याच्या नकला चालतात. नंतर नवरीस इष्टमित्रांकडून नजराणे होतात. ते होत असतांना गाणीं ह्मणण्याची चाल आहे. ह्या गाण्यांत नजराणे देणाऱ्यांचा स्नेहसंबंध किंवा आभार प्रदर्शित करितात. तें झालें कीं, लग्नसमारंभ आटोपला. मग पुढें कित्येक

दिवसांनीं नवरीच्या माहेरीं वर सांगितल्याप्रमाणेंच एक मेजवानी होते. त्या प्रसंगीं नकले शस्त्रवैद्य, वराकडील करवला असतो त्याचा पूर्वोक्त रीतीनें विनोद करितात.

बडी मेजवानी.

लग्नप्रीत्यर्थ एक बडी मेजवानी—द्यावी लागते, व ती देण्याच्या कामीं शेजारीपाजारी मनुष्यांच्या मदतीची जरूर असते. त्या माणसांनीं मदत केल्याबद्दल त्यांस पैसे देणें बरें दिसत नाहीं. सबब, त्यांना खुषी ठेवण्याची पद्धति आहे, ती अशी:—

(१) ते लोक तांदूळ नीट करूं लागले, ह्मणजे त्यांस ओल्या खोबऱ्याचे तुकडे व गूळ वांटितात. (२) तांदूळ धुवूं लागले, ह्मणजे एके-प्रकारची मिठाई वांटितात. (३) पुऱ्या करण्यासाठीं तांदूळ दळूं लागले, व कढीसाठीं मसाला तयार करूं लागले, ह्मणजे रोट्या वांटावयाच्या; व (४) पुऱ्या लाटून तळूं लागले, ह्मणजे त्या पुऱ्याच वांटावयाच्या! वरील प्रत्येक काम चाललें असतां त्याबरोबर गाणीं गातात. ह्या गाण्यांत मेजवानीस येणाऱ्या प्रत्येक मनुष्याची तारीफ किंवा व्याजस्तुति असते. मेजवानीमध्यें कढी आणि पुऱ्या हे दोन पदार्थ मुख्य असतात, हें निराळें सांगावयास नकोच! अस्तु.

एक सूचना.

येथपर्यंत हिंदुस्थानांतील ज्या ज्या लोकांच्या लग्नासंबंधीं थोडी फार माहिती आह्मांस उपलब्ध झाली, ती वाचकांस सादर केली आहे. आतां आम्ही हिंदुस्थान सोडून क्रमशः इतर पौर्वात्य देशांतील लोकांच्या लग्नविधि व सोहळ्यांकडे वळतों. परंतु, तत्पूर्वी येथें प्रांजलपणें इतकें नमूद करणें भाग आहे कीं, अद्यापि खुद्द आमच्या देशांतच अशा आणखी किती तरी जाती व पोटजाती आहेत कीं, ज्यांच्या लग्नाची माहिती, यत्न केला असतांही आह्मांस मिळूं शकली नाहीं. ती मिळविण्याच्या दुराशेस गुंतल्यामुळें ग्रंथरचनेंत आह्मांला कांहींसा द्राविडी प्राणायामही करावा लागला. परंतु व्यर्थ! असो. यत्ने कृते यदि न सिध्यति, कोऽत्र दोषः ?

चिंगुलय लोकांची लग्नरीति.

चिंगुलय लोक, हे सिंहलद्वीप अथवा लंका येथील राहणारे आहेत. ह्या लोकांत कोणाही पुरुषास लग्न करणें झालें, ह्मणजे तो ज्या स्त्रीशीं संबंध करावयाचा, तिला आपल्या येथें बोलावून आणितो; व तिच्या आवडीप्रमाणें तिजसाठीं कांहीं वस्त्रें खरीद करितो. हीं वस्त्रें कुमारिकेस देणें, ह्मणजेच तिला वरणें होय. अशा रीतीनें तिला वरण्याबद्दल तिजकडून त्या पुरुषास हुंड्यादाखल कांहीं द्रव्य मिळतें. नंतर तो पुरुष तीं वस्त्रें घेऊन कुमारीच्या घरीं जातो; व एक रात्र तिच्या समागमसुखांत घालवितो. दुसऱ्या दिवशीं सकाळीं लग्नतिथि ठरवितात! नेमिलेल्या दिवशीं उभयपक्षांच्या इष्टमित्रांस वराकडून मेजवानी देण्यांत येते. त्याचप्रमाणें वधूच्या घरींही जेवणावळ होते. वधूवरांस एकाच ताटांत भोजनास बसविण्याची चाल आहे. वरगृहीं वधूवरांचे आंगठे एकत्र बांधून त्यांजकडून त्या स्थितींत एकमेकांसंगतीं एक रात्र काढवितात! व दुसऱ्या दिवशीं सगळीं मिळून वधूला घेऊन तिच्या माहेरीं जातात, ह्मणजे लग्न सोहळा संपला.

लग्नरीति.

ब्रह्मी लोकांची लग्नरीति.

विवाहकाल, प्रियाराधनाचा निद्य प्रकार, उलट हुंडा, व लग्नरीति.

ब्रह्म देशांत राहणाऱ्या लोकांस ब्रह्मी असें ह्मणतात. त्यांच्यांत मुली व मुलें वयांत आल्याखेरीज त्यांचीं लग्नें करीत नाहींत. औपचारिक रीतीनें लग्न जमवून आणण्याचें काम मुलामुलींचे आईबाप करितात. पण वस्तुतः तें मुलामुलींनीं अगोदरच करून ठेविलेलें असतें! कारण, ह्या लोकांत लग्ननिश्चय होण्यापूर्वी भावी वधूवरांनीं परस्परांची प्रीति संपादन करण्याची चाल आहे. रात्रीं नऊ वाजून घरांतील वडील माणसांची निजानीज झाली, ह्मणजे अविवाहित तरुण स्त्रीपुरुषांमध्यें ह्या प्रीतिसंपादनाच्या खटपटीला सुरुवात होते! ज्या तरुणाचें ज्या तरुणीवर मन गेलें असेल, तिची गांठ घेण्यासाठीं तो आपल्या एक दोन समवयस्क मित्रांसह भपकेदार पोषाक करून तिच्या घराच्या दरवाज्यावरून खेपा घालितो; व आपला इष्ट हेतु सिद्धीस नेण्याला अनुकूल अशी संधि पाहून तिच्या घराच्या अंगणांत प्रवेश करितो. तेथें पूर्वसंकेतानुसार सुंदर वस्त्रें परिधान केलेली, आणि फुलांच्या हारगजऱ्यांनीं अलंकृत अशी त्याची प्रिया त्याला भेट देण्याकरितां उभी असते. तसेंच पानसुपारी, विड्या, वगैरे करमणुकीचें उपसाहित्यही त्या ठिकाणीं तयार ठेविलेलें असतें. आपल्या मित्रांसह आंत प्रवेश केल्यावर तो प्रियाराधक भावी वर तेथें बसतो, व कांहीं वेळपर्यंत आपल्या प्रियेशीं संभाषण आणि करमणूक करून नंतर आपल्या मित्रांसमागमें त्यांच्या प्रियकरणींकडे जातो. ह्याप्रमाणें भावी वधूवरांच्या अनेक प्रसंगीं भेटी होऊन त्या उभयतांमध्यें लग्न करण्याविषयींचा

निश्चय बहुतेक झालेलाच असतो. मग आईबापांनीं सोयरीक जमविणें, हें केवळ एक औपचारिक कृत्य बाकी राहतें, आणि तें त्यांजकडून योग्यप्रसंगीं करविण्यांत येतें. लग्नसमयीं वरानें वधूस, अगाऊ ठरला असेल त्याप्रमाणें हुंडा देण्याची चाल आहे. ज्या दिवशीं लग्न व्हावयाचें असेल, त्या दिवशीं सकाळीं वरपक्षाकडून वधूकडे कांहीं वस्त्रें पाठविण्यांत येतात. नंतर वधूपक्षाची मंडळी वरपक्षास एक मेजवानी देते. तींत नवरानवरी एका ताटांत बसून जेवतात; आणि तेलांत बुडविलेलीं चहाचीं पानें एकमेकांस खावयास देतात. हें कृत्य एकंदर लग्नसोहळा परिपूर्ण झाल्याचें द्योतक समजलें जातें.

ब्रह्मीलोकांच्या प्रियाराधनासंबंधीं दोन शब्द.

आह्मांस उपलब्ध झालेल्या वरील माहितीवरून पाहतां, ब्रह्मी लोकांत सोयरीक जमविण्याची पद्धति फारच निंद्य आहे. वडील मनुष्यांच्या परोक्ष वधूवरांनीं अशा रीतीनें प्रियाराधन करणें, हें संभावितपणाला अगदींच प्रतिकूल आणि अप्रशस्त होय! तरुण वयांत विचारापेक्षां विकाराचेंच प्राबल्य अधिक असतें; आणि वरील रूढीमध्यें साऱ्याच गोष्टी विकारास उत्तेजन देणाऱ्या आहेत. तेव्हां त्यांत विचाराचा लोप होणें साहजिक आहे. अर्थात् तरुण स्त्रीपुरुषांनीं केवळ विकारवश होऊन केलेलीं लग्नें, हीं कितीशीं टिकाऊ असणार, तें निराळें सांगणें नकोच! आणि बहुतकरून ह्याच कारणासुळें ब्रह्मी लोकांतील विवाहसंबंधाला शाश्वती नाहीं. पतिपत्नी हें नातें जोंपर्यंत उभयतांस सोइस्कर आणि सुखावह वाटेल, तोंपर्यंतच ठेवण्यांत येतें. तरी पण त्यापासून प्राप्त होणारे हक्क त्यांस मिळूं शकतात!

घटस्फोट अथवा त्याग करण्याच्या तऱ्हा.

नवराबायकोचा कांहीं कारणावरून बेबनाव होऊन एकमेकांना एकमेकांचा त्याग करणें असल्यास, तो अगदीं सहज करितां येतो. त्याच्या पद्धती दोन प्रकारच्या आहेत. एक तर स्त्री पंचासमक्ष नवऱ्यापासून आपली सुटका करून घेते;

त्या प्रसंगीं पंचांस तिला तिचें स्त्रीधन व कुटुंबाच्या सामाईक मिळकतीचा कांहीं भाग नवऱ्याकडून देववावा लागतो. दुसरी पद्धति मात्र विलक्षण आहे. ती अशी कीं, उभयतां नवराबायको आपल्या घराचीं दारें व खिडक्या बंद करून दोन मेणबत्त्या एके वेळीं पेटवितात, आणि त्या जळून संपेपर्यंत आंत निमूटपणें बसून राहतात. नवऱ्याची मेणबत्ती अगोदर संपल्यास तो, अथवा बायकोची संपल्यास ती, एकदम उठून घर सोडून कायमची चालती होते. कोणीही निघून जातेवेळीं आपल्या अंगावरील कपड्यांखेरीज बरोबर कांहीं एक चीजवस्त न्यावयाची नाहीं, असा नियम आहे! अर्थात् घरांतील सर्व मालमत्ता, मेणबत्ती न संपल्यामुळें दोघांतून जें कोणी मागें राहील त्याची समजली जाते!

पेगू प्रांतांतील अनाचार.

पेगू हा **दक्षिण ब्रह्म**देशाचा एक भाग आहे. ह्या प्रांतांतील लोकांत

मुलींस आई-बापांचेंअनीति-शिक्षण.

प्रत्यक्ष आईबापच आपल्या मुलींचें कौमार्य भ्रष्ट करण्याला उत्तेजन देतात! ते परक्या पुरुषांना आपल्या उपवर मुलींस प्रेमानें गोंजारण्याची खुशाल मोकळीक देतात! त्यांना कन्याविक्रयाचा तर विधिनिषेधच नसतो! ते हमेष वरांपासून करार करून घेऊन त्यांस आपले कन्यारूपी दागिने कांहीं कालपर्यंत भाड्यानें देतात. ठरीव मुदत पुरी होतांच त्या भाड्याच्या बायकांस त्यांच्या माहेरीं परत पाठविल्या, म्हणजे झालें. अशा प्रकारें व्यवहार करून आलेल्या कोणाही मुलीची लोक निंदा करीत नाहींत, अथवा तीस लांछन लावीत नाहींत. परंतु पुढें कोणा पुरुषाबरोबर तिचा विवाह झाला, आणि तिला प्रथम भाड्यानें ठेवणारा पुरुष ती असेल तेथें जर दैववशात् फिरून प्राप्त झाला, तर तो तिला पुन्हां नेऊन आपल्यापाशीं वाटेल तितके दिवस ठेवितो. तिच्याशीं पतीच्या नात्यानें वागण्याची त्याला सदर परवानगी असते!

कोणाही पुरुषास लग्न करणें झाल्यास तो मुलीच्या बापाजवळ मुलीबद्दल बहुमोल किंमतीची कांहीं जिन्नस अथवा नगद रकम अनामत ठेवितो, व त्या मुलीशीं लग्न लावितो. पुढें कांहीं कारणावरून त्यानें तिचा त्याग केल्यास त्याला त्या अमानतीवरील आपला हक्क सोडावा लागतो.

लग्न अथवा स्त्री खरीद करणें.

त्याग करण्याचा प्रघात फार आहे. नवऱ्यास बायकोचा त्याग करणें झाल्यास तो तिची निर्भर्त्सना करून तिला आपल्या माहेरीं घालवून देतो. परंतु बायकोला नवऱ्याचा त्याग करणें असेल, तर तिला त्याची अनामत रकम त्यास परत द्यावी लागते.

त्यागरीति.

ह्या एकंदर हकीकतीवरून आह्मांस मोठ्या दिलगिरीनें असें ह्मणणें भाग येतें कीं, पेगूमध्यें शुद्ध कौमार्य, आणि पातिव्रत्य, ह्या दोहोंचाही पूर्ण अभाव आहे! सारांश, हा देश ह्मणजे ‘ मन्मथ-व्यापाराचा बाजार,’ एतद्देशीय कन्यापिते हे प्रतिष्ठित व्यापारी, आणि कन्या ह्या त्यांच्या देयमूल्य वस्तूच होत!

वरील अनाचाराविषयीं दोन शब्द.

तांग्किंग्च्या लोकांची लग्नरीति.

लग्नास आईबापांची संमति, लग्नाचा करार, बहुपत्नीकत्व, तत्संबंधीं नियम, लग्नांतील व कांहीं इतर चाली, वगैरे.

ब्रह्मदेशाच्या पूर्वेस आणि **चीन**च्या दक्षिणेस **तांग्किंग्** अथवा **तांकिन्** ह्मणून एक प्रांत आहे. त्यांतील मुलामुलींना आपल्या आईबापांच्या संमतीवांचून लग्न करितां येत नाहीं. ते विद्यमान नसले, तर निकटच्या आप्तांस विचारावें लागतें. लग्नाच्या करारावर प्रांताच्या अधिकाऱ्यासमक्ष सह्या करून तो करार त्याच्या कचेरींत नोंदवावा लागतो. कोणाही मनुष्यास वाटतील तितक्या स्त्रिया करण्याची परवानगी आहे. परंतु, तो जितक्या बायका करील, तितक्यांचें पोषण करण्याचें त्याला सामर्थ्य असलें पाहिजे. तें नसलें, आणि त्या स्त्रियांच्या चरितार्थाचा बोजा समाजावर पडला, तर अशा असमर्थ मनुष्यानें जास्त बायका केल्याबद्दल त्याला सरकारास दंड द्यावा लागतो. लग्नदिवशीं सायंकाळीं नवरीचे नातलग तिला नवऱ्याच्या घरीं नेऊन पोहोंचवितात. तेथें गेल्यावर तिचें पहिलें कृत्य ह्मटलें ह्मणजे, स्वयंपाक घरांत जाऊन चुलीचें चुंबन घेणें हें होय! त्यांतील हेतु स्पष्टच आहे. तें झाल्यावर ती आपल्या नवऱ्यास साष्टांग प्रणिपात करून त्याला आपली नम्रता व आज्ञाधारकपणा व्यक्त करिते. उभयपक्ष श्रीमान् असले, तर लग्नाप्रीत्यर्थ मेजवान्या वगैरे उत्सव बहुधा नऊ दिवसपर्यंत चालतो. परंतु, ते गरीब असल्यास सर्व कार्य तीन दिवसांतच आटोपतात. नवऱ्यास कायदेशीर रीतीनें आपल्या बायकोचा त्याग करितां

येतो. परंतु स्त्रीला मात्र नवऱ्याचा त्याग करणें कठिण असतें. कदाचित् तिनें तसें केलेंच, तर त्यापासून तिला पुष्कळ संकटें भोगावीं लागतात. कोणी स्त्री व्यभिचाराबद्दल अपराधांत सांपडल्यास, तिला घरांतून काढून देऊन ज्या स्थळाभोंवतीं मदोन्मत्त हत्तींचें वास्तव्य आहे, अशा ठिकाणीं नेऊन ठेवितात, व तेथें तिला उपासमार घडवितात. परंतु, ह्याच अपराधाबद्दल पुरुषास फक्त दंडाची शिक्षा आहे. दंड दिला, ह्मणजे तो दोषमुक्त होतो!

काडी मोडून देण्याची पद्धति.

तांग्किंगमध्यें काडी मोडून देण्याची पद्धति अशी आहे कीं, एखाद्या मनुष्यास बायकोचा त्याग करणें झालें, ह्मणजे तो एक धातूची सळई घेऊन तिचे दोन सारखे तुकडे करितो. ह्या तुकड्यांपैकीं एक नवऱ्यानें व दुसरा बायकोनें घ्यावयाचा. नंतर ते उभयतां आपापला तुकडा रेशमी वस्त्रांत गुंडाळितात. हें झाल्यावर नवऱ्याला लग्नसमयीं कन्यापित्याकडून जो हुंडा मिळाला असेल, तो बायकोस परत द्यावा लागतो; आणि त्या स्त्रीपासून त्याला जी संतति प्राप्त झाली असेल, तिचें पालन करण्याबद्दल बायकोस एक दस्तऐवज लिहून द्यावा लागतो. तो दिला, ह्मणजे एकमेकांचा संबंध तुटला.

तालीन लोकांची लग्नरीति.

प्रीति संपादनाची विलक्षण रीति.

तालीन लोक, हे हिंदी चीन द्वीपकल्पांतलेच रहिवासी आहेत, असें समजतें. ह्या लोकांत लग्नापूर्वी स्त्रीची प्रीति संपादन करण्याची चाल तर फारच विचित्र आहे! अविवाहित स्त्री ज्या जागीं निजते, त्या जागेवरील छपराच्या वांशाला ती एक रुमाल बांधून तो लटकत ठेवीत असते. त्या खुणेवरून तिची मर्जी संपादन करणारा अविवाहित पुरुष रात्रीं बिनचुक त्या ठिकाणीं जातो; व आपला हात फटींतून आंत घालून त्यानें त्या रमणीचा हात चांचपून शोधून काढितो. नंतर तिचा हात आपल्या हातांत धरून ठेवितो. एक दोन वेळां ती आपला हात त्याच्या हातांत फारसा राहूं न देतां हिसकून परत घेते. पण नंतर ती तो बराच वेळ राहूं देते. असें झालें, ह्मणजे तो पुरुष तिला पसंत पडून त्याशीं लग्न लावण्याची तिची खुषी आहे ह्मणून समजावें. केव्हां केव्हां एखादा तरुण पुरुष एखाद्या युवतीला न आवडला, किंवा चुकून त्यानें भलत्याच स्त्रीच्या अंगास स्पर्श केला, तर त्याचा हात पकडला जाऊन तो छपराच्या वांशाशीं बांधून टाकण्यांत येतो. स्त्रिया तो सोडतां सोडीत नाहींत; व तरुण मुली त्या प्रीतिसंपादकाची फारच थट्टा करितात!

सोयरीक जमविणें व लग्नरीति.

वर सांगितल्याप्रमाणें प्रीति संपादन केल्यानंतर वर आपल्या घरांतील वडील मनुष्यांस आपल्या प्रिय तरुणीच्या मातापितरांशीं लग्नासंबंधीं बोलणें लावण्यास पाठवितो. वधूच्या मातापितरांस ती गोष्ट पसंत पडली, ह्मणजे लागलीच तो भावी

जांवई आपल्या सासऱ्याच्या घरीं जाऊन आपल्या प्रियेशीं पतीप्रमाणें वागण्यास आरंभ करितो! व तेथें एक दोन वर्षे राहून नंतर आपल्या बायकोला घरीं घेऊन जातो; व स्वतंत्र राहूं लागतो. स्त्रीपुरुष एका ताटांत जेवून उघड रीतीनें नवराबायकोप्रमाणें वागूं लागले, ह्मणजे त्यांचें लग्न झालें असें समजतात. कधीं कधीं लग्नाप्रीत्यर्थ मेजवानी देण्यांत येते. लग्नाची खबर कळतांच आसपासचीं कोणी टवाळ पोरें लग्नरात्रीं वधूच्या घराभोंवतीं जमून छपरावर माती दगड फेंकितात. त्या पोरांचा हा उपाधि सकाळ पावेतों चालू असतो. त्यामुळें कित्येक प्रसंगीं मोठें नुकसान होतें! सबब, लग्नाची गोष्ट होईल तितकी गुप्त ठेवण्याची खबरदारी घेतली जाते!

ह्या लोकांत एखाद्या श्रीमान् मनुष्याचें लग्न असलें, ह्मणजे दुसरी एक विलक्षण व त्रासदायक चाल दिसून येते. ती अशी कीं, लग्नाच्या दिवशीं सकाळीं नवरा आपल्या पक्षाच्या मंडळी-जवळ पानसुपारी, रुमाल, व नवरीला देण्याचीं वस्त्रें देऊन त्यांसह मोठ्या समारंभानें रस्त्यांतून मिरवत चालला, ह्मणजे जागोजाग पोरांच्या व स्त्रियांच्या टोळ्या दृष्टीस पडतात. ह्या टोळ्या मिरवणुकीपुढें रस्त्यांत एक दोरी आडवी धरून पुढें जाण्याला प्रतिबंध करितात, व नवऱ्यापासून कांहीं सोनें किंवा चांदी मागतात. ती दिली नाहीं, तर ते वधूवरें सुखानें वागणार नाहींत असा शाप देऊन ती दोरी तोडून टाकितात. कधीं कधीं ह्या टोळ्या लग्नाप्रीत्यर्थ बक्षीस मिळविण्याच्या उद्देशानें वरपक्षास रस्त्यांत अभद्रवाणीं मडकीं फोडण्याचा धाक घालितात. मग कोणी वृद्ध पुरुष मध्यें पडून काय द्यावयाचें तें ठरवून तें त्यांस देतो, ह्मणजे ती मंडळी मिरवणूक निर्विघ्नपणें जाऊं देते!

श्रीमान् ताली-तांचें त्रासदा-यक वरप्रस्थान.

सयामी लोकांची लग्नरीति.

कुमारिकांस नजर कैद, आणि लग्नरीति.

ब्रह्म देशाच्या पूर्वेस सयाम हें एक लहानसें राज्य आहे. ह्यांतील लोक बौद्ध धर्म पाळितात. त्यांच्यामध्यें अविवाहित मुलींना सक्त नजर कैदेंत ठेवण्यांत येतें. लग्न होईपर्यंत त्यांना तरुण पुरुषांच्या वाऱ्यास देखील राहूं देत नाहींत. एखाद्या मनुष्यास लग्न करावयाचें असलें, ह्मणजे त्याचे आप्त मुलीच्या आप्तांजवळ तिची मागणी करितात. ती कबूल करण्यांत आली, ह्मणजे एखादी वयोवृद्ध व सुज्ञ स्त्री वधूवरांना सद्वर्तन करण्याविषयीं उपदेश करिते. लग्नाच्या पूर्वीं तीन दिवस उभयपक्षांची नातेवाईक मंडळी एकत्र जमून वरपक्षानें वधूपक्षापासून किती हुंडा घ्यावा, तें वरासमक्ष व त्याच्या संमतीनें ठरवितात. सर्वानुमतें ठराव पसंत होऊन सोयरीक जमली; व लग्नतिथि नक्की करण्यांत आली, ह्मणजे वधूच्या घरीं सर्वांस एक मोठी मेजवानी देण्यांत येते. ह्या मेजवानीसाठीं नवऱ्याच्या खर्चानें एक दिवाणखाना मुद्दाम तयार करण्याची चाल आहे. जेवणीं झाल्यावर वधूवरांस घरालगतच्या एका अंधारकोठडींत नेऊन घालितात; व तेथें त्यांस कांहीं दिवसपर्यंत ठेवण्यांत येतें. ह्या मुदतींत त्यांना त्यांचे नातलग मात्र भेटण्यास जातात. इतरांना जाऊं देत नाहींत.

उपस्त्रिया करण्याची चाल, व घटस्फोट.

सयामी लोकांना उपस्त्रिया करण्याची मोकळीक आहे. परंतु, एके वेळीं एकीपेक्षां जास्त स्त्रिया मात्र करितां येत नाहींत. कोणाही जोडप्याचें एकमेकांशीं जमेनासें झालें, तर त्यांस घटस्फोट करण्याची मोकळीक असते. परंतु तो केल्यास, लग्नसमयीं स्त्रीकडून मिळालेला हुंडा तिला परत द्यावा लागतो. मुलें झालीं असून त्यांची संख्या सम असली, तर त्यांची आईबापांत सारखी वांटणी होते. नाहींपेक्षां सर्व मुलें त्यांच्या आईबरोबर जातात.

मलायी व जाकुन लोकांच्या लग्नरीती.

मलायी लोकांसंबंधीं कांहीं माहिती, त्यांच्यांत लग्नापासून उत्पन्न होणारे हक्क, व कांहीं रीतिरिवाज वगैरे.

मलायाचें द्वीपकल्प हें **ब्रह्म**देश आणि **सयाम** ह्यांच्या दक्षिणेस आहे. किंबहुना तें सयामचा दक्षिण भागच होय. एतद्देशीय लोकांस **मलायी** असें ह्मणतात. हे लोक कट्टे मुसलमान आहेत; आणि ते मुसलमानी धर्माचे नियम फार आस्थापूर्वक पाळितात. **महंमदानें** जे जे सूक्ष्म आणि कडक असे आचारनियम घालून दिले आहेत, त्या सर्वांमध्यें स्त्रियांचे हक्क संरक्षिणारे नियम, हे विशेषेंकरून चमत्कारिक आहेत. मुसलमान लोकांत स्त्रियांना एकांतवासांत आणि पडद्यांत ठेवण्यांत येतें, येवढ्यावरून त्यांना कांहीं ठराविक हक्क नाहींत, अथवा त्यांची बाजू अगदींच लंगडी आहे, असें जर कोणी समजत असतील, तर ती त्यांची मोठी चूक होय. सामाजिक स्वातंत्र्य आणि मानपानादि नानाप्रकारचे हक्क ह्यांच्या संबंधानें पौर्वात्य आणि पाश्चात्य स्त्रिया सारख्याच योग्यतेच्या आहेत, असें एका फिरस्त्या पाश्चात्य ग्रंथकारानें प्रांजलपणें म्हटलें आहे. मलायी लोकांत लग्नसंबंधीं ठराव, हे अगदीं स्पष्ट असतात, व त्यांत स्त्रीच्या हक्काविषयींचीं कलमें तर फारच सबळ असतात. लग्न झाल्या दिवसापासून स्थावर जंगमात्मक कोणत्याही मालमत्तेवर स्त्रीपुरुषांचा वारसा समसमान असतो. काडी मोडून देणें झाल्यास एकंदर मालमत्तेचे तंतोतंत सारखे, असे दोन भाग करून ते दोघांत वांटून दिले जातात. त्यांतून देखील, जर नवरा काडी मोडून

देईल, किंवा कांहीं सबळ कारणावरून स्त्रीला तसें करणें भाग पडेल, तर तिच्या भागाखेरीज नवऱ्याला आपल्या भागांतून तिनें लग्नसमयीं दिलेली हुंड्याची रकम, आणि माहेराहून आपल्या बरोबर आणिलेल्या वस्त्रपात्रादि वस्तूंची पुरी किंमत तिला द्यावी लागते. हा मुसलमानी कायदा केवळ मलायांतच आहे, असें नव्हे. तो सर्व आफ्रिकाखंडांत आणि दक्षिण अमेरिकेच्या मध्यप्रदेशांत व दक्षिणभागांतही आढळून येतो. मलायी लोक मोठे कडकडीत आणि शुद्ध बुद्धीचे एकेश्वरवादी आहेत. ते निष्ठापूर्वक एक पत्नीव्रत पाळितात. आतां, मुसलमानी रिवाजाप्रमाणें त्यांच्यांतही बहुपत्नीकत्वाची कल्पना आहे. नाहीं असें नाहीं. परंतु, राजघराण्यांतील पुरुषांशिवाय कोणीही अनेक स्त्रिया करीत नाहींत. ते पुष्कळ सुधारलेले आहेत. प्रतिष्ठितपणाचे जे जे रीतिरिवाज त्यांच्यांत दिसून येतात, ते सर्व चिनी लोकांचे होत. अर्थात् त्यांच्यांत लग्नासंबंधीं अगोदर किंवा मागून करावयाचीं सर्व कृत्यें चिनी लोकांप्रमाणेंच अतिशय खटाटोपाचीं व पोकळ डामडौलाचीं असतात. लग्न होईपर्यंत नवरा आपल्या बायकोला पाहूं शकत नाहीं. निदान उच्च वर्गाच्या आणि श्रीमान् लोकांत तरी नवऱ्याला नवरीचें मुखावलोकन वस्तुतः होत नसतें. गरीब लोकांत त्यासंबंधानें इतका निर्बंध राहूं शकत नाहीं. कारण, दारिद्र्यामुळें मलायांतच काय, पण पूर्वेकडील सर्व मुसलमानी देशांतील स्त्रियांना आपला पडदा आपल्या इच्छेविरुद्ध दूर करण्याचा प्रसंग वारंवार येतो. असो.

विवाहकाल, सोयरीक जमविण्याची रीत व नजराणा.

चवदावें वर्ष हा मुलींचा विवाहकाल समजला जातो, आणि त्या अन्वयें त्यांचीं लग्नें करण्यांत येतात. अगदीं लहान वयांच्या मुलींचे विवाह क्वचितच होतात, व झाले तरी, त्या मुली ऋतु प्राप्त होऊन चांगल्या वयांत येईपर्यंत आपल्या माहेरीं राहतात. सारांश, मुलें व मुली ह्यांचा समागम, तीं भर ज्वानींत आल्याखेरीज होत नाहीं. सोयरीक जमविणें असलें, ह्मणजे नवरानवरीकडील नातेवाईक स्त्रिया अगर मैत्रिणी प्रथमतः एकंदर बारीक सारीक

बाबतींविषयीं बोलणें करून साधारणतः लग्न जमवून ठेवितात. नंतर नवऱ्याकडील इष्टमित्र पुरुष नवरीच्या बापाकडे जाऊन त्याच्या ओसरीवर घातलेल्या शोभिवंत चटयांवर बसतात, सुपारी खातात, व हुंड्यासंबंधीं ठराव करितात. मलायामध्यें जर अतिशय चित्त व्यग्र करणारा कांहीं उद्योग बायकांना असेल, तर तो इष्टमित्रांतील मुलामुलींचीं लग्नें जमविणें हाच होय! आणि पुरुषांना असेल, तर तो हुंड्याची रकम ठरविण्या इतका महत्वाचा दुसरा कोणताच नाहीं! हुंड्याच्या प्रश्नाची वाटाघाट करण्यासाठीं ओसरीवर ज्या 'सामाजिक परिषदा' भरत असतात, त्या नेहमीं रात्रींच्या भरतात; कारण, मलायी लोकांना सूर्यास्त झाल्याखेरीज उजाडतच नाहीं! ह्या सभांच्या बैठका कित्येक रात्रीपर्यंत चालू असतात. त्यांत हुंड्याची रकम, लग्नाचा कार्यक्रम, आणि खर्चवेंच ह्या संबंधीं ठराव उभयपक्षीं मंजूर झाले, ह्मणजे सोयरीक जमली,—अमुक नवरा आणि अमुक नवरी नक्की झाली,—असें समजतात. पुढें कित्येक दिवस गेल्यानंतर एखाद्या दिवशीं सायंकाळीं नवऱ्याकडील इष्टमित्र मंडळी फिरून नवरीच्या बापाकडे जाऊन त्यास, व त्याच्या मुलीस ह्मणजे वधूला एक नजराणा देतात. लग्नासंबंधीं जो कांहीं खर्चवेंच देणें असेल, तो मलायी लोक अगाऊच देऊन टाकितात. ते स्वभावानें अगदीं भोळे आहेत; तथापि, कन्यापित्याशीं कबूल केलेला ऐवज त्यास चुकता केल्याखेरीज त्याकडून मेजवानी किंवा पोषाक घेणें, ही गोष्ट मलायी रिवाजाप्रमाणें मोठी लांछनास्पद समजली जाते. सबब, लग्नाप्रीत्यर्थ होणाऱ्या खर्चाची सर्व रकम विवाहापूर्वी वर आपल्या इष्टमित्रांसोबत आपल्या भावी सासऱ्याला पोंचती करितो.

लग्नघर आणि वधूवरें यांचा शृंगार.

मलायी लोकांत लग्नप्रसंगीं वधूचें घर, आणि वधूवरें, हीं विलक्षण रीतीनें सजविण्याची चाल आहे. तऱ्हेतऱ्हेच्या शिंपा, जवाहिर, फुलें, कशिद्याचीं व कलाबतूचीं वस्त्रें, मणी आणि गोंडे, ह्या वस्तूंनीं त्यांस शृंगारण्यांत येतें. विशेषतः वधू-

वरांच्या अंगांवर मणी आणि गोंडे इतके घालितात कीं, त्या शृंगारभारानें तीं घाबरून जातात! वंशपरंपरा चालत आलेले वस्त्रें विणण्याचे मूल्यवान् माग, तऱ्हेतऱ्हेच्या चटयांचे पडदे, गुढ्या, तोरणें, सांखळ्या, नानाप्रकारचे दगड एकमेकांत पच्ची करून त्यांच्या बनविलेल्या सुंदर सुंदर वस्तू, रानांतील तऱ्हेतऱ्हेचीं पुष्कळ फुलें आणि गवतें, हीं लग्नप्रसंगींचीं गृहमंडनें असतात; व तीं एका खोलींत आणि तिच्या पुढील ओसरीवरून मोठ्या व्यवस्थेनें मांडण्यांत येतात. त्या योगानें लग्नघर खरोखरच फार शोभिवंत आणि भपकेदार दिसतें, व तें मलायी लोकांची अभिरुचि आणि कलाकौशल्यांतील हुशारी व्यक्त करितें.

वधूचे केंस कातरणें, मेहेंदी लावणें, दांत कानसणें, वगैरे; आणि त्यावर आमची टीका.

लग्नाच्या पूर्वी तीन दिवस मलयवधूचे अलक, अथवा कपाळावरील केंस कातरून ते आंखूड, सरळ आणि विरळ करून ठेवितात; आणि तिच्या हातापायांच्या बोटांचीं नखें मेहेंदीनें लाल भडक रंगवितात. मलय कुमारिकांना त्यांचे आईबाप कधींही सुपारी खाऊं देत नाहींत. त्यामुळें त्यांचे दांत निरोगी आणि मोत्यांसारखे स्वच्छ असतात; व ते जात्या आकारानेंही सुंदर असतात. परंतु, लग्नाच्या पूर्वदिवशीं हे दांत कानसून ते मूळच्या आकारापेक्षां तिप्पट किंवा चौपट आंखूड आणि निरुंद करण्याची घातक चाल पडली आहे! हा दांत कानसण्याचा सुखसोहळा पोलादी कानशीनें व सुमात्रा बेटांतील कानशी सारख्याच एका जातीच्या दगडानें करण्यांत येतो; आणि तो बराच वेळपर्यंत चालू असतो. त्यांत होणाऱ्या वधूच्या जीवाच्या हालअपेष्टा काय सांगाव्या! ती असह्य वेदनांनीं विव्हळ होऊन किंकाळ्या मारीत असते, व त्या ऐकूं येऊं नयेत, ह्मणून तिच्या मायेचीं माणसें मोठ्या कडाक्याचे वाजेगाजे सुरू ठेवितात, आणि परोपरीच्या पक्वान्नांची मेजवानी झोडण्यांत गर्क होतात! वधूचे दांत तिरकस आणि बुटके करण्याच्या ह्या हौशीचा परिणाम काय होतो ह्मणाल, तर तिच्या हिरड्या तोंडल्यायेव-

ढाल्या सुजून येतात, त्यांची सूज कित्येक दिवसपर्यंत ओसरत नाहीं, भाषण आणि चर्वण ह्या दोन्ही क्रिया वेदनास्पद होतात, तिला झोंप येत नाहीं, आणि हें सारें केव्हां ? तर मुसलमानी रिवाजाप्रमाणें तरुण वधूवरांनीं आपल्या यौवनसुखाचा ऐन उपभोग घेण्याच्या वेळेस ! अहाहा ! स्त्रियांनों ! काय ह्या तुमच्या विपरीत अभिरुची ! काय ह्या तुमच्या हिडीस हौशी ! आणि काय हे तुमच्या जीवाचे घातक सोहळे-चोचले ! कोठें तुह्मी आपले कान बिदारून घेतां, कोठें दांत कानसून तोंडांचीं बोळकीं करून घेतां, आणि कोठें आपलीं पावलें खुरांयेव-ढाली करून मुद्दाम लंगड्या होऊन बसतां ! खरोखर, तुह्मां पौर्वात्य आणि मागासलेल्या राष्ट्रांतील अशिक्षित व कहाती बायकांचें सारेंच कांहीं असंबद्ध आणि असमंजस होय ! पण असें ह्मणावें, तर आजकाल सुधा-रणेच्या शिखरास गेलेल्या आणि सुशिक्षित अशा पाश्चात्य स्त्रियाही वरील बाबतींत तुमच्यापेक्षां कमी उपहासास्पद आहेत, असें नव्हे ! त्या, केवळ लोकांनीं आपणांला सुंदर ह्मणावें, ह्यासाठीं नटांप्रमाणें आपल्या गालांना सफेता फांसतात, ओंठांस गुलाबी छटा देतात, विशेष नाजुक-पणा दाखविण्यासाठीं, ज्यांच्या टांचांचा जमिनीस स्पर्श होतो न होतो, असे उटंगळ व मनस्वी अवळ 'बूट' घालून चवड्यांवर चालतात, दंत-वैद्यांकडून आपले सर्व नैसर्गिक दांत उपटून त्यांच्या जागीं शोभिवंत परंतु कृत्रिम दंतपंक्ती बसवितात, इतकेंच नव्हे, परंतु आणखी नाना प्रकारांनीं आपली विलक्षण अभिरुचि व हौस पूर्ण करण्यासाठीं, आणि आपल्या जीवाचे सोहळे चोचले करण्यासाठींच जणूं काय, ह्या पाश्चिमात्य स्त्रियांनीं आपल्या कंबरा कसून बांधिलेल्या असतात ! त्यांचा बहुतेक वेळ परोपरीनें नटण्यामध्यें जातो. परंतु, हें त्यांचें सारें नटणें आमच्या पौर्वात्य महाकवीच्या "**प्रियेषु सौभाग्यफला हि चारुता।**" ह्या उदात्त व अनुकरणीय वचनाच्या अगदीं उलट असतें ! असो.

लग्न आणि मेजवानी.

वर सांगितल्याप्रमाणें लग्नाच्या आदल्या दिवशीं मलयवधूचे दांत कानसण्यांत आल्यावर दुसऱ्या दिवशीं मुसलमानी रीतीप्रमाणें वधूवरांचें लग्न लावण्यांत येतें. त्या रीतीचें वर्णन मागें हिंदुस्थानांतील मुसलमानांच्या लग्नाच्या हकीकतींत येऊन गेलें असल्यानें येथें त्याची पुनरुक्ति करणें नलगे. इतकें सांगितलें ह्मणजे पुरें आहे कीं, इतर मुसलमानांप्रमाणें मलायी मुसलमानांतही लग्नसमयीं धार्मिक विधि व करार करण्यांत येतो. विधि झाल्यानंतर व वरातीच्यापूर्वी लग्नाप्रीत्यर्थ मोठी मेजवानी दिली जाते. ह्या मेजवानीसाठीं पशु, पक्षी, व मत्स्य, ह्या तिन्ही वर्गांतील शेंकडों जीवांचा संहार होतो! मणोगणती पक्वान्नें, मिठाया, व शरबतें पस्त केलीं जातात, आणि सुपारी किती खपते, तिची तर मोजदादच नसते! लग्न लागल्यानंतर वधूवरें वर सांगितल्याप्रमाणें शृंगारून ठेविलेल्या एका खोलींत उंच आसनावर जोडप्यानें बसतात. नवरा सुपारी खातो, व नवरी आपल्या जाया झालेल्या दांतांनीं ती उगीच खाल्ल्यासारखी दाखविते. ह्या स्थलीं उभयपक्षांचे इष्टमित्र व ओळखीपाळखीचे लोक त्या नवविवाहित दंपत्याच्या भेटीस येतात. त्यांचें अभिनंदन करितात, व त्यांस नजराणे देतात. ह्यावेळीं लग्नघरांत आणि त्याच्या अंगणांत जिकडे तिकडे खानपानाची व वाद्यगजराची एकच गर्दी उसळून राहिलेली असते. वधूवरांस जादूटोणा होऊं नये, ह्मणून धूप जाळून मंत्रतंत्र चाललेले असतात. लग्नघरीं कोणींही आल्यास त्याचा स्वागतसत्कार चालू असतो, आणि अंगणामध्यें तर निवळ एक जत्राच भरून तींत नानाप्रकारचे खेळ आणि विशेषतः कोंबड्यांच्या झुंजा लागून राहतात! ह्याप्रमाणें परोपरीच्या उत्सवांनीं तें लग्नघर दणाणून जातें; व शेवटीं वर दर्शविल्याप्रमाणें बडी मेजवानी उडाल्यानंतर नवरा नवरीस घेऊन उभयपक्षांच्या इष्टमित्रसमुदायासह मोठ्या कडाक्यानें वाजत गाजत आपल्या घरीं जातो, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

मलयद्वीपकल्पांत **जाकुन** ह्मणून एका जातीचे लोक आहेत. त्यांची लग्नरीति इतर मलायी लोकांहून निराळी आणि चमत्कारिक आहे. लग्नदिवशीं नवरा नवरीस देण्याचा हुंडा घेऊन तिच्या घरीं जातो, आणि तो सर्व आपल्या जातिबांधवां समक्ष नवरीला देतो. हुंडा दिल्यानंतर ह्यांच्यांत एक नाच करण्याची चाल आहे. हा नाच चालू असतांना नवरी घरांतून एकदम नाहींशी होऊन मोठ्या त्वरेनें पळून जाते, व नवरा तिचा पाठलाग करितो. जर नाच संपण्यापूर्वी तो तिला पकडून परत आणूं शकला नाहीं, तर ती नवरी त्याच्याशीं लग्नही लावीत नाहीं, व त्याला त्याचा हुंडाही परत देत नाहीं !. तो तिचा पाठलाग करण्यासाठीं पळत असतां जर दुर्दैवानें कोठें अडखळून पडला, तर त्यास आणखी दोन तीन 'सरांग' नामक वस्त्रें अगाऊ दिलेल्या हुंड्याच्या भरीस घालावीं लागतात! केव्हां केव्हां ही नवरानवरींतील शर्यत पाण्यामध्यें चालते. त्या समयीं नवरीला एक तीरासारखी जाणारी होडी देऊन शिवाय नवऱ्याच्या पूर्वी प्रस्थानाचा लाभ देण्यांत येतो. मलायी लोकांच्या दुसऱ्या एका जातींत नवऱ्यास नवरी मिळविण्यासाठीं थोडें बहुत पोहावें लागतें. प्रथमतः वधू एक लहानशी पडदणी लावून पाण्यांत उडी व बुडी मारिते. परंतु ती फार दूरवर जाण्याच्या भानगडींत पडत नाहीं. कारण, पोहण्याच्या कामांत पटाईत असलेल्या वरापुढें आपला कितीसा टिकाव लागेल, हें ती समजून असते. तिच्या मागून थोड्या वेळानें नवरा उडी टाकून लागलीच तिला हस्तगत करितो.

जाकुनांची लग्नरीति.

मलयद्वीपसमूहांतील भिन्नभिन्न लोकांच्या लग्नरीती.

पितृवधाची भयंकर चाल.

सुमात्रा:—ज्यांच्या पोटीं जन्म घेतला, त्या परम पूज्य आई-बापांचा प्रत्यक्ष त्यांचीं मुलेंच वध करितात, इतकेंच नव्हे, परंतु त्यांच्या मांसाची मेजवानी झोडितात! ही गोष्ट कोणाला सांगूं लागल्यास खरी देखील वाटावयाची नाहीं. परंतु, विश्वसनीय माहितीवरून असें समजतें कीं, **सुमात्रा** बेटांत पितृवध व पितृमांस भक्षण करण्याचा प्रघात आहे! जेव्हां एखादा गृहस्थ अत्यंत अशक्त होऊन त्याला जगाचा वीट येतो, तेव्हां तो आपल्या मुलांबाळांस जवळ बोलावून आपलें मांस भक्षण करण्यास सांगतो. ह्याप्रमाणें पित्याची आज्ञा झाल्यावर मीठ वगैरे पदार्थ स्वस्त आहेत असें पाहून, एखाद्या दिवशीं मुलें आपल्या पित्यास व इष्टमित्र मंडळीस बरोबर घेऊन घराबाहेर कोठें तरी एखाद्या झाडाजवळ जातात. नंतर तो अशक्त पिता झाडावर चढतो. मुलें आणि इष्टमित्र त्या झाडासभोंवतीं उभीं राहतात, व तें झाड खूब जोरानें हलवून एक शोकगीत गातात. त्यांतील मतलब असा कीं, 'ऋतु आला, फल परिपक्व झालें, तें आतां खालीं पडलेंच पाहिजे!' हें गीत ह्मटल्यावर मुलांच्या भक्ष्यस्थानीं पडणारा पिता खालीं उतरतो, व त्याचे निकट संबंधी आणि प्रियजन त्यास ठार करून त्याच्या कलेवराची समाराधना झोडितात! शिव! शिव! असले पितृघातक

नराधम जेथें निर्माण झाले, अथवा होत असतील, त्या अपवित्र **सुमात्रा** बेटांत मंगलकार्यें कशाचीं! व तीं असलीं, तरी न जाणों, त्यांतही मनुष्यपणास खग्रास ग्रहण लावणारे असेच कांहीं अमानुष प्रकार असतील! सबब, त्यांविषयीं जिज्ञासा न ठेवितां आह्मी **जावाबेटां**तील लोकांच्या लग्नरीतीकडे वळतों.

कांहीं चालीरीतींचें वर्णन.

जावा:—ह्या बेटांतील लोकांत लग्नप्रसंगीं वधूवरांच्या अंगावर घालवतील तितके दागिने भाड्यानें आणून घालण्याची चाल आहे! लग्नसमारंभ एक पंधरवडा अथवा त्याहूनही अधिक दिवसपर्यंत चालू राहतो! व त्यांत नवऱ्याला नवरीचें दर्शन देखील होऊं देत नाहींत! हे लोक **चिनी** लोकांचे वंशज असल्यामुळें त्यांच्या लग्नकार्यांतील बहुतेक सर्व कृत्यें चिनी लोकांच्या रिवाजाप्रमाणेंच आहेत. जावा बेटांतील कोणाही कुमारिकेचा विवाह झाल्यावर ती आपल्या बाहुल्या वगैरे सर्व खेळणीं चुलींत घालिते! असें करण्यांत तिचा उद्देश, आतां माझें कौमार्य संपून मला भार्यात्व प्राप्त झालें, व इतःपर त्या पदास अनुरूप असेंच वर्तन ठेवण्याचा मी निश्चय केला आहे, असें व्यक्त करण्याचा असतो. तिनें हें कृत्य केल्यावर इष्टमित्रमंडळी लग्न झाल्याबद्दल तिचें अभिनंदन करितात, आणि तिनें ज्या वस्तूंचा नाश केला असेल, त्यांच्या किंमतीइतक्या अथवा त्याहूनही जास्त मौल्यवान् अशा अनेक वस्तू तिला नजर करितात. जावा बेटांतील पुरुष आपल्या बायकांच्या वर्तनाविषयीं भारी संशयखोर असतात. ते आपल्या वयांत आलेल्या मुलांस देखील त्यांच्या आयांजवळ फारसे जाऊं देत नाहींत!

बालविवाह, कन्याविक्रय वगैरे.

अंबोयना:—ह्या बेटांस लवंगद्वीपें असेंही ह्मणतात. ह्यांतील लोक आपलीं अर्भकें पाळण्यांत असतांच त्यांचीं लग्नें जुळवून आणितात! वरपक्षाकडून कन्येच्या पित्याला द्रव्य देऊन कन्या विकत घेण्यांत येते. घटस्फोट आणि व्यभिचार ह्या दोन्ही गोष्टींचा सुकाळ आहे.

मोलक्का:—ह्या बेटांस मसाल्याचीं बेटें असें ह्मणतात. एतद्देशीय कोणीही कुमारकुमारी आपापल्या मातापितरांच्या संमतीनें एकमेकांशीं लग्न लावण्यास कबूल असलीं, ह्मणजे वरपिता वधूला कांहीं दागदागिने नजर करितो; आणि कन्यापिता वरपक्षास एक चांगली मेजवानी देतो. मेजवानीच्या वेळीं नानाप्रकारचीं वाद्यें वाजविण्यांत येतात, व नाच होतो. तदनंतर तें तरुण जोडपें आराम करण्यास जातें, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

त्यागरीति.

लग्नानंतर नवऱ्याबरोबर राहण्याला बायको खुषी नसली, तर तिला लग्नप्रसंगीं सासऱ्याकडून मिळालेले दागदागिने परत द्यावे लागतात. ते देऊन तिनें नवऱ्याच्या पायांवर पाणी सोडिलें, ह्मणजे मग त्याला व तिला आपल्या इच्छेनुरूप दुसरी बायको व नवरा करण्याला मोकळीक होते.

बहुपत्नीकत्व.

फिलिपाईन—ह्या द्वीपसमूहांतील लोकांत लग्नासंबंधानें विशेष असें कांहींच करावें लागत नाहीं. इकडील पुरुष अनेक स्त्रिया करणारे आहेत. त्या स्त्रियांपैकीं कोणी तरी एक श्रेष्ठ असते, व बाकीच्यांस कनिष्ठ मानितात.

सामान्य लग्नरीति.

मकास्सर—ह्या बेटांतील लोकांत उपाध्यायानें लग्नविधि पुरा करण्याबरोबर वधूवरांस एका खोलींत सतत तीन दिवसपर्यंत कोंडून ठेवितात, व कोणी मनुष्य त्यांस लागतील ते ते पदार्थ आणून देतो! ह्याप्रमाणें तीं नव वधूवरें कन्यापित्याच्या घरीं बंदीवासांतील सुखें भोगीत असतां इष्टमित्रांस कन्यापित्याच्या येथें मेजवान्या चालू असतात. बंदीवासाचे तीन दिवस पूर्ण होऊन वधूवरें मुक्त झालीं, ह्मणजे इष्टमित्र त्यांचें अभिनंदन करितात. नंतर नवरा नवरीला आपल्या घरीं घेऊन जातो. लागलीच बायको गृहिणी या नात्यानें संसार करूं लागते, व तोही आपला उद्योगधंदा करितो.

येथील कायद्याप्रमाणें ह्मटलें असतां, पंधरावें वर्ष हा वधूवरांचा विवाह-काल ठरलेला आहे. परंतु, मुलें युद्धकलेंत निष्णात झाल्या-खेरीज त्यांचें लग्न करीत नाहींत. लग्नाची मिरवणूक पाहिली, ह्मणजे जणूं काय युद्धास निघालेल्या शिपायांची पलटणच चालली आहे, असें वाटतें ! एतद्देशीय गृहस्थाच्या लग्नसमारंभास हाजर असलेल्या एका प्रतिष्टित प्रवाशानें त्या लग्नाचें वर्णन केलें आहे. तो ह्मणतो:—

विवाहकाल व एका विशिष्ट लग्नाचें संक्षिप्त वर्णन.

" धर्मोपदेशकानें वधूवरांचें लग्न लाविलें. त्या समयीं त्यानें वरास असें सांगितलें कीं, तूं ह्या वधूला घरदार, चाकरमाणसें, वगैरे संसारोपयोगी सर्व वस्तू पुरविल्या पाहिजेत. तसेंच त्यानें वधूला सांगितलें कीं, तूं इतर सर्व पुरुषांकडे दुर्लक्ष्य करून ह्या वराच्या आज्ञेंत वागत जा, व ह्यास आपला वरिष्ठ असें समज. नंतर वधूवरांनीं त्या धर्मोपदेशकाच्या उपदेशा-बद्दल आभारप्रदर्शनार्थ त्याला सलाम केले. तत्पश्चात् धर्मोपदेशक, ज्याला हे लोक **तुअन् हद्जी** असें ह्मणतात, त्यानें एकसुरावर कांहीं गायन केलें. तें सर्वोत्कृष्ट होतें; आणि तें केवळ लग्नप्रसंगींच गाइलें जातें. हें गायन संपविल्यावर तो धर्मगुरु समारंभास आलेल्या मंडळींत येऊन बसला. पुढें सर्व मंडळी उपहारास बसली. वधूवरें एका ताटांत, आणि बाकीच्या मंडळींतून तीन तीन चार चार असामी एकेका ताटांत फराळ करीत होते. फराळ झाल्यावर वधूवरांस चिटाच्या पडद्यांनीं शोभिवंत केलेल्य एका दालनांत नेलें, व तेथें तीं सात दिवसपर्यंत राहिलीं. त्यांना रात्रंदिवस खानपानाचे पदार्थ मनमुराद पुरविण्यांत येत असत. " सदरहू वर्णनावरून वाचकांस एतद्देशीय लोकांच्या लग्नकार्याची बरीच कल्पना येईल.

बोर्निओ:—ह्या बेटांत कोणाही तरुण मनुष्यानें आपल्या शत्रूंचीं, अथवा शत्रूसमान मानिले जाणाऱ्या परकीयांचीं शिरें उडवून तीं नजर केल्याखेरीज त्याला कोणीही तरुणी पतकरीत नाहीं ! वधूची मागणी करण्या-

पूर्वी, त्यानें आपल्या अंगांतील मर्दुमकी व्यक्त करून त्या वीरवधूचें येवढें कोड पुरविलें, म्हणजे तो वर होण्याला पात्र होतो! नंतर त्यानें तिला कांहीं इतर नजराणे पाठवावे लागतात. लग्नदिवशीं उभयपक्षांकडे आपापल्या इष्टमित्रांस मेजवान्या देण्यांत येतात. नंतर नवऱ्यास तत्पक्षाची मंडळी नवरीच्या घरीं घेऊन जातात. ही मंडळी नवरीच्या गृहद्वारापाशीं येतांच कोणी मनुष्य वराच्या अंगावर कोंबड्याचें, आणि वधूच्या अंगावर कोंबडीचें रक्त शिंपडतो. नंतर वरास घरांत नेऊन त्याचें वधूशीं लग्न लावितात, व तें झाल्या दिवसापासून नवरानवरीं एकत्र राहूं लागतात. पुढें सवडीप्रमाणें लग्नाप्रीत्यर्थ दुसरी एक मेजवानी देण्यांत येते, म्हणजे झालें.

लाड्रोनः—हीं बेटें फिलिपाइनच्या पूर्वेस आहेत. त्यांस **मारियान** द्वीपें असेंही म्हणतात. ह्या बेटांत स्त्रीपुरुषांच्या व्यवहाराला कोणत्याही प्रकारचा दाब नाहीं! स्त्रियांच्या उच्छृंखलपणावर पांघरूण काय तें रात्रीच्या काळोखाचेंच असतें! आणि हें पांघरूण काढणें, अथवा त्यांचीं निंद्य कर्में उघडकीस आणणें, हें काम फार भयंकर असतें!

आस्ट्रेलियांतील मूळच्या लोकांची लग्नरीति.

विनिमयविवाह, आणि राक्षस-विवाहपद्धति.

पासिफिक महासागरांत **आस्ट्रेलिया** ह्मणून एक फार मोठें बेट आहे. ह्यास कोणी **दक्षिण आशिया** असेंही ह्मणतात. ह्या बेटांतील मूळचे रहिवासी लोक अगदीं रानटी स्थितींत असावे, असें त्यांच्या लग्नपद्धतीवरून व्यक्त होत आहे. ती पद्धति अशी कीं, एखाद्या तरुण व शूर पुरुषास स्त्री मिळविण्याची इच्छा झाली, ह्मणजे तो बहुतकरून कोणा अन्य तरुण पुरुषास आपली बहीण अथवा एखादी नातेवाईक तरुणी देतो, व तिच्या मोबदल्यांत त्यापासून स्वतःला बायको मिळवितो. परंतु, अशा रीतीनें विनिमय करण्याला आपल्या नातेवाइकांत अगर जातीमध्यें कोणी अविवाहित तरुणी नसेल, तर तो अन्य जातींच्या वसतीमध्यें फिरून त्यांच्यांतील एखादी कुमारिका पाहून ठेवितो, व तिला धरून नेण्याच्या पाळतीवर असतो. तिला लग्नाचें मागणें घालण्याचा त्याचा प्रकार अगदीं साधा,—धोपट मार्गाचा,—परंतु काम फत्ते करणारा असतो! तो असा कीं, तो मनुष्य संधी साधून आपल्या प्रिय तरुणीला बडग्याचा असा एक तडाका देतो, कीं त्यासरशी ती एकदम बेसावधच होते! नंतर चपळाई करून तो तिला तसल्या स्थितींत एखाद्या एकांत स्थलीं ओढून नेतो! आणि तेथें ती कांहींवेळानें शुद्धीवर आली, ह्मणजे तो तिला मोठ्या शेखीनें आपल्या घरीं घेऊन येतो. अबला कुमारिकांवर चाल करून त्यांना आपल्या बायका करून आणण्याच्या कामीं, कधीं कधीं दोघे मर्द

बहादूर एकमत करून असतात! ते मोठ्या खुबीनें आपल्या येण्याचा सुगावा कोणासही लागूं देत नाहींत; आणि लपून छपून आपल्या इष्ट तरुणींच्या हालचालीवर सारखी नजर ठेवितात. ज्या कुमारिकांस धरून न्यावयाचें त्यांच्यासंबंधीं जरूर असलेली सर्व माहिती मिळाली, ह्मणजे ते आपला डाव साधण्यासाठीं एखाद्या काळोखाच्या व तुफानाच्या रात्रीची वाट पाहून असतात. तिचा योग आला, ह्मणजे ते उघडे बोडके होऊन हातांत फक्त लांब लांब भाले घेतात, आणि झाडांझुडपांतून दबत दबत वसतीमध्यें जाऊन आपल्या आवडत्या तरुणींच्या घरांपुढें येऊन थडकतात. तेथें अंगणांमध्यें आगट्या जळत ठेवून त्यांच्या आसपास ह्यांना पाहिजे असलेल्या कुमारिका निजलेल्या असतात. मग हे चकार शब्दही न काढितां हळू हळू इतके पुढें सरकतात कीं, तेथून प्रत्येकास आपापली इष्ट तरुणी स्पष्ट ओळखितां येते. नंतर त्या दोघांतून एकजण आपला भाला पुढें करून त्याचें बांकदार टोंक त्या तरुणीच्या दाट आणि वाऱ्यानें हलणाऱ्या केंसांमध्यें घालितो, व हातांतील भाला वाटोळा फिरवितो. त्यामुळें अर्थातच तिचे कांहीं केंस भाल्याच्या टोंकास लपेटले जातात. नंतर तो एका हिसक्यासरशी तिला सहज जागी करितो. ती आपले डोळे उघडून पाहते, इतक्यांत हा चलाखी करून दुसरें एक तीक्ष्ण शस्त्र तिच्या कंठास लावितो! अर्थात् अशा रीतीनें दोन्ही कडून पेंचांत आल्यावर तिला आपले डोळेही लावितां येत नाहींत, आणि ओरडतांही येत नाहीं. कारण, आरोळी मारिली, किंवा सुटून पळून जाण्याचा यत्किंचित्ही प्रयत्न केला, तर आपणांला तत्काळ यमसदनीं जावें लागेल, हें ती पूर्णपणें जाणून असते! मग ती शहाणपणा करून मुकाट्यानें उठते, व आपलें हरण करूं इच्छिणाराच्या स्वाधीन होते. नंतर ते तिला दूर अंतरावर नेऊन एका झाडाशीं बांधून टाकितात, आणि पुन्हां वसतींत जाऊन याचप्रमाणें दुसऱ्या कुमारीलाही पकडून आणितात. अशा रीतीनें उभयतांचे इष्ट हेतु सिद्धीस गेले, ह्मणजे ते मोठ्या तांतडीनें आपल्या स्त्रिया घेऊन घरीं जातात. तेथें सर्वांकडून त्यांची वाहवा होते, व ह्या मर्दुमकीच्या

कृत्याबद्दल त्यांचे मोठे मानपान होतात! कधींकधीं अशा प्रकारें स्त्रीहरण करणारे वर आपलें चातुर्य लढवीत असतां आसपासचे लोक जागे होऊन एकदम गलबला करितात, व ह्यांचें कार्य फिसकतें. मग ते त्या धाद-लींत सहज निसटून जातात. पण पुढें केव्हांना केव्हां तरी ते आपला मनोरथ पूर्ण केल्यावांचून राहत नाहींत. प्रसंगवशात् एखादा प्रसिद्ध हिंमतबहादर आपली वधू अशा रीतीनें मिळवून पलायन करीत असतां त्याचा आणि वधूपक्षाच्या लोकांचा सामनाही होतो. पण तो न डगमगतां, आणि आ-पल्यासाठीं आपल्या इष्टमित्रांस लढण्याची तसदी न देतां प्रतिपक्षाच्या भा-ल्यांचे आघात सहन करण्याची छाती दाखवितो. असें दिव्य केलें, ह्मणजे त्या जवामर्दानें आपली **कुब्रा**—बायको—नीतीनें मिळविली, व आपल्या अप-राधाचा प्रतिकार केला असें समजून उभयपक्षांत सलोखा होतो; व नंतर ते सर्व मिळून एक मेजवानी झोडितात, ह्मणजे झालें.

वरील विवाहपद्धतीसंबंधी दोन शब्द.

आमच्या धर्मशास्त्रकारांनीं विवाहाचे जे आठ प्रकार सांगितले आहेत, त्यांपैकीं वरील प्रकारास **'राक्षसो युद्धहरणात्'** ह्या व्याख्ये-प्रमाणें 'राक्षसविवाह' असें ह्मणतां येईल. आस्ट्रेलियांतील मूळचे रहिवासी अगदीं रानटी स्थितींत असल्यानें त्यांनीं ही पद्धति स्वीकारणें, हें साहजिक होय. परंतु, हल्लीं परमेश्वरी सत्तेनें हे लोक सुधारणेच्या शिखरास जाऊन पोहोंचलेल्या इंग्रज बहादुरांच्या कृपाछत्राखालीं आल्यानें ते आपलें पूर्वीचें सारेंच राक्षसी वर्तन विसरून जाऊन सुधारणेच्या वातावरणांत लवकरच उंच उडूं लागतील, व लग्नासाठीं प्रियाराधन करूं लागतील ह्यांत संशय नाहीं.

जपानी लोकांच्या लग्नरीती.

विवाहकाल अन्योन्यानिरीक्षण आणि प्रियाराधनाच्या रीती.

जपानी मुलें व मुली पूर्ण वयांत आल्याखेरीज त्यांचीं लग्नें होत नाहींत. लग्नापूर्वीं वरास उपवर वधूची प्रीति संपादन करावी लागते. ती संपादन करण्याची एक रीति अशी आहे कीं, वर प्रथमतः वधूकडे आपल्या काळ्याभोर, परंतु सौम्य नेत्र कटाक्षानें पाहतो. वधूही त्याच्या कटाक्षाचें निरीक्षण करून त्यावरून त्याचें सर्व मनोगत समजून घेते. ह्या कृत्यास ' अन्योन्यानिरीक्षण ' अशा अर्थाची एक संज्ञा आहे. हें निरीक्षण झाल्यावर एखाद्या वेळीं वधू आपल्या इष्टमित्रांच्या घरीं लग्नसमारंभास जाण्यासाठीं वाहनारूढ होत असतां वर संधि साधून तिच्या वाहनांत आदरपूर्वक एक पुष्पगुच्छ टाकितो. तो तिनें वाहनाखालीं काढून टाकिला, तर वरानें आपण तिला पसंत पडलों नाहीं, व तिनें आपला प्रतिकार केला ह्मणून समजावें; आणि जर तिनें तो झेंडा घेऊन आपल्या कंमरबंदांत खोंविला, तर तिनें आपल्याला वरिलें असें समजावें. जपानच्या कांहीं भागांत प्रियाराधन करण्याची दुसरी एक पद्धति आहे. ती अशी कीं, वर रात्रौ हळूच जाऊन आपल्या प्रिय कुमारीच्या गृहद्वारास एक पुष्पगुच्छ बांधून निघून जातो. तो गुच्छ त्या कुमारीनें काढून आंत नेला, किंवा त्यावर तिनें पाणी शिंपडलें, तर वरानें ती वधू आपणास प्राप्त होणार ह्मणून समजावें; आणि जर तो जागच्या जागीं राहून त्याच्या पाकळ्या गळून पडल्या तर त्यानें तिचा नाद सोडून द्यावा.

लग्नाच्या एकंदर अटी कोणा 'मध्यस्थ गृहस्था' च्या द्वारें ठरविण्यांत येतात. जपानांत लग्नमध्यस्थीचें काम नेहमीं पुरुष करितात. स्त्रिया करीत नाहींत. लग्न 'जमलें' ह्मणजे वधूनें आपणांस वरिल्याबद्दल आनंद प्रदर्शित करण्यासाठीं वर तिच्याकडे कांहीं नजराणा पाठवितो. त्याचा स्वीकार झाला, ह्मणजे सोयरीक संबंध पूर्णपणें ठरला, असें समजतात. ह्याप्रमाणें एकदा सोयरीक ठरली, ह्मणजे ती न मोडण्याविषयीं वधू आणि तिचे आप्त बांधिले जातात; आणि शिष्टाचारास अनुसरून ते ती मोडीतही नाहींत.

मध्यस्थाकडून सोयरीक जमविणें.

पुढें नवरा नवरीकडे नानाप्रकारच्या पुष्कळ देणग्या पाठवितो. किंबहुना तो तिच्यावर देणग्यांचा केवळ वर्षावच करितो, असें ह्मटलें तरी चालेल. अमुक एक वस्तु देण्याची बाकी अशी तो ठेवीत नाहीं. रेशमी आणि जिन्नसवार वस्त्रें, कलाबतूचा कमरबंद, रेशमाच्या थैल्या, अंगूरभात, मांसाचीं मिष्ट पक्वान्नें, मद्यानें भरलेलीं पात्रें, इत्यादि शेंकडों वस्तु लाखेरी तबकांत घालून वधूकडे वेळोवेळीं पाठविण्यांत येतात. मद्यपात्रांचा नजराणा आला, ह्मणजे वधू तो जसाचा तसा आपल्या आईबापांच्या हवालीं करिते; व ते अंगुस्तानायेवढाल्या पेल्यांनीं त्या मद्याचा बरेच दिवसपर्यंत स्वाद घेत असतात. एकंदर नजराण्यांत कलाबतूच्या कमरबंदाचें माहात्म्य फार असतें. इतर वस्तु न दिल्या, तरी एक वेळ चालेल. परंतु कमरबंद हा दिलाच पाहिजे. कारण, पाश्चिमात्यांत ज्याप्रमाणें आंगठ्या, त्याप्रमाणें जपानी लोकांत कमरबंद हें लग्नचिन्ह समजलें जातें. वधूनें आपल्या मर्जीस वाटेल तसा विवाहवेश तयार करून घ्यावा, ह्यासाठीं नवरा तिला एक पांढरें रेशमी वस्त्र पाठवीत असतो. जपानी वधूचा विवाहवेश, मग तो कोणत्याही पद्धतीचा असो, परंतु रंगानें पांढराच असला पाहिजे असा नियम आहे. पूर्वी ह्या देशांत कन्याविक्रयाचा प्रघात फार होता, परंतु हल्लीं तो मोडून त्याच्या ऐवजीं जांवयानें सासऱ्यास वाटतील

वधूस आणि तिच्या पित्यास नजरनजराणे.

तितके नजराणे देण्याची चाल अस्तित्वांत आली आहे; आणि ह्या नव्या चालीप्रमाणें हल्लीं जांवई आपल्या सासऱ्यांस नानाप्रकारच्या कलाकौशल्याच्या वस्तू आणि साजूक नाजूक पक्वान्नांच्या भेटी पाठवूं लागले आहेत, असें ह्मणतात. लग्नापूर्वी सर्व नजराणे वराकडून वधूकडे जातात. वधूकडून वराकडे कांहीं एक पाठविण्याची चाल नाहीं. लग्नदिवशीं मात्र नवरी-नवऱ्याकडे आपल्या प्रेमांच्या खुणा ह्मणून कित्येक मौल्यवान् वस्तू पाठविते.

लग्नासाठीं सुमुहूर्त पाहणें.

नजराण्यांच्या देवघेवीची भानगड संपली, ह्मणजे ज्योतिष्याकडून उभयपक्षीं सोइस्कर असा एखादा सुमुहूर्त काढवून त्या निश्चित मुहूर्तावर लग्न लावण्यांत येतें. कुमुहूर्तावर अथवा भलत्याच दिवशीं जपानी लोक कधींही लग्न करीत नाहींत.

दोन प्रकारच्या लग्नपद्धती.

निरनिराळ्या विश्वसनीय ग्रंथांवरून असें समजतें कीं, जपानी लोकांत दोन प्रकारच्या लग्नपद्धती प्रचलित आहेत; व कायद्याच्या दृष्टीनें त्या दोन्ही पद्धती स्त्रीपुरुषांना बंधनकारक मानिल्या जातात. पैकीं एक पद्धति कांहींशी धर्मतत्त्वावर आहे, आणि दुसरी कराराच्या तत्त्वावर आहे. मात्र ह्या करारावर प्रत्यक्ष वधूवरांच्या सह्या न होतां त्यांच्या वडिलांच्या अथवा पालकांच्या होतात. दोन्ही प्रकारांत वरास वधूबद्दल तिच्या बापाला हुंडा द्यावा लागतो. परंतु, ही चाल हल्लीं माजी पडली आहे, व त्या संबंधानें आह्मी वर नजराण्याच्या कलमांत उल्लेख केलाच आहे. असो. आतां ह्या लोकांच्या दोन्ही लग्नपद्धतींची क्रमशः थोडक्यांत माहिती सांगतों:—

धार्मिक विधीनें लग्न करण्याचा प्रकार.

पहिला ह्मणजे धार्मिक विधीनें लग्न करण्याचा प्रकार असा आहे कीं, वधूवरें आपापल्या इष्टमित्रांसह भिन्न मार्गांनीं मिरवत मिरवत गांवाबाहेर जातात, आणि पूर्वीं ठरल्याप्रमाणें एखाद्या टेकडीच्या पायथ्याशीं एकत्र जमतात. वराच्या मिरवणुकींत शिधासरंजामानें लादलेल्या बऱ्याच गाड्याही असतात. उभयपक्ष टेकडीच्या पायथ्याशीं दाखल झाल्यानंतर, वर चढून जाण्यासाठीं अगाऊ ज्या पायऱ्या

तयार करून ठेविल्या असतील त्यांनीं वधू, वर, आणि कांहीं नियमित व्यक्ती टेकडीच्या माथ्यावर जातात; व तेथें एक तंबू दिलेला असतो, त्यांत समोरासमोर बसतात. जणूं काय सख्य करण्यासाठीं निरनिराळ्या दोन राष्ट्रांचे सर्वसत्ताधीश प्रतिनिधीच एकमेकांसमोर बसले आहेत! वधूवरांचीं मातापितरें वधूच्या पाठीशीं, आणि बाजंत्री वराच्या पाठीमागें, परंतु तंबूबाहेर एका रांगेनें बसतात. उभय पक्षांकडील परिवार टेकडीच्या पायथ्याशींच राहतो. ह्याप्रमाणें सर्व स्थानापन्न झाल्यावर नवरानवरींच्या हातामध्यें एकेक कांकडा देण्यांत येतो. तो घेऊन ते लग्नाच्या अधिदेवतेसमोर येतात. ही अधिदेवता श्वानमुखी असून ती तंबूमध्यें एका स्थंडिलावर मांडिलेली असते. ती, गृहस्थाश्रमाचा स्वीकार केल्यानंतर स्त्रीपुरुषांमध्यें जी परस्पर निष्ठा व नैतिक वर्तन असावें लागतें, त्याची द्योतक ह्मणून कल्पिली जाते. तिच्या हातीं एक दोरी दिलेली असते. ही दोरी विवाहाचें बलवत्तर बंधन, आणि गृहस्थाश्रमांतील एकंदर जबाबदारीचें चिन्हच आहे, असें जपानी लोक मानितात. ह्या अधिदेवतेजवळ आणि उभयपक्षांच्या मध्यभागीं लग्नविधि सांगण्यासाठीं एक उपाध्याय उभे असतात. तंबूपासून थोड्या अंतरावर कित्येक कंदील लावून ठेविलेले असतात, त्यांपैकीं एका कंदिलांतील दिव्यावर नवरी आपला कांकडा पेटवून घेते, व तो पेटवितांना ती आपल्या मुखानें उपाध्यायानें सांगितलेलें कांहीं एक विधान करीत असते. नंतर नवरीच्या कांकड्यानें नवरा आपला कांकडा पेटवितो. हें कृत्य त्या उभयतांचें लग्न लागल्याचें द्योतक होय; व तें होत असतां उभयपक्षांचे जे इष्टमित्र तेथें हाजर असतात, ते मोठमोठयानें आनंदोद्गार काढून त्या नवविवाहित दंपत्यास आपलें अभिनंदन व्यक्त करितात; आणि उपाध्याय त्यांना आशीर्वाद देऊन घरीं जाण्याची आज्ञा देतो. तदनंतर वधूवरें टेकडी उतरून खालीं येतात. तेथें उभयपक्षांच्या परिवारानें एक मोठी आगटी पेटविलेली असते. तींत नवरीचीं लहानपणचीं सर्व खेळणीं फेंकून देण्यांत येतात. ह्याच प्रसंगीं कोणी एक मनुष्य नवरीला सूत कातण्याचीं साधनें

व थोडासा ताग आणून नजर करितो. ह्याचा उद्देश असा कीं, इतःपर तिनें समंजसपणानें एकंदर गृहकृत्यांची व्यवस्था पाहण्यास लागावें. हें झाल्यावर लग्नाच्या अधिदेवतेपुढें दोन बैलांचा यज्ञ करून विधीची समाप्ति केली जाते. तदनंतर नवरानवरी उभयपक्षांच्या इष्टमित्रांसह मोठ्या थाटानें मिरवत मिरवत वरगृहीं येतात. ही वरातीची मिरवणूक बहुधा सूर्यास्ताच्या वेळीं, ह्मणजे गोरज मुहूर्तानें काढण्यांत येते. तींत नवरी आपला पांढऱ्या रंगाचा रेशमी झगा घालून व तसल्याच वस्त्राचा बुरखा घेउन **कागांत** ह्मणजे मेण्यासारख्या वाहनांत बसलेली असते. तिच्या मेण्यामागून नवऱ्यास द्याव-याचे नजराणे लाखेरी तबकांत घेऊन चाकरमाणसांचा समुदाय चालत असतो. हे नजराणे ह्मणजे खिशांत ठेवण्यासारखीं सात पुस्तकें, एक नक्षी-दार उत्तम तरवार, एक पंखा, दोन कमरबंद, एकत्र शिवलेले दोन रेशमी झगे, आणि लग्नासंबंधीं एक विशेष पोषाक, इतक्या वस्तू असतात. त्यांतू-नही एका जातीच्या मत्स्याचें पक्वान्न आहे, तें तर अवश्यमेव असावें लागतें. हें पक्वान्न नवरानवरींनीं खाल्लें, ह्मणजे तीं उभयतां हमेष एकचित्तानें राह-तील अशी समजूत आहे! सबब, तें कोणी एक मनुष्य एका भांड्यांत घेऊन सर्व नजराण्याच्या अग्रभागीं चालत असतो. तसेंच जी नवरी आपल्या नवऱ्यास द्विकोष पक्षी नजर करिते, तिला सुंदर आणि आज्ञाधारक मुलें होतात, अशीही एक समज आहे! सबब, शक्य असल्यास ते पक्षी मिळवून नजराण्यांत मिरवीत नेतात. लग्नाप्रीत्यर्थ वरास देण्याच्या पोषाकाला जपानी लोकांत फार महत्व दिलें जातें. अतएव हा पोषाक फार काळजी-पूर्वक आणि शक्य तितकें कौशल्य वापरून तयार केलेला असतो. असो. नजराणे घेणाऱ्या चाकरमाणसांमागून नवरा आणि उभयपक्षांचे इष्टमित्र मिरवत जातात. एकंदरींत, मशाली, तऱ्हेतऱ्हेचे कंदील, वाद्यें, वगैरे सरंजा-मानें आणि सर्व मंडळींच्या मिसलवार चालण्यानें ही जपानी वरातीची मिर-वणूक फार प्रेक्षणीय दिसते. तींत चिनी रिवाजाप्रमाणें जरी श्रीमंती डाम-डौल आणि भपका नसला, तरी प्रत्येक बाबतींत उत्कृष्ट अभिरुचि वापर-

लेली असते. मिरवणूक वरगृहीं पोहोंचल्यावर तेथें नानाप्रकारचे लवलचकां आणि अखेरीस कंटाळा आणणारे सोहळे करण्यांत येतात. त्यांत वधूचें वर्चस्व आणि मानपान फारच मोठे असतात. लग्नघरांत जिकडे तिकडे व्यवस्थितपणा, टापटीप, आणि अभिरुचि दिसून येते. घराच्या उंबऱ्यावर आणि जमिनीवर नानाप्रकारचीं फुलें आणि वेलपत्त्या विखुरलेल्या असतात; आणि चहूंकडे ध्वजा पताका लावून उत्कृष्ट रोषनाई केलेली असते. सारांश, जपानी लोकांचें लग्न, मग तें एखाद्या बांबूच्या झोंपड्यांत होणारें असो, अथवा लाखेरी राजवाड्यांत होणारें असो, त्यांत उत्कृष्ट अभिरुचि वापरली जाते. तत्रापि, धार्मिक विधीनें होणाऱ्या लग्नांत विधीपेक्षां सोहळ्यांचेंच प्राबल्य विशेष असतें, व तें गौण आहे.

करारानें लग्न करण्याचा प्रकार.

दुसऱ्या ह्मणजे कराराच्या पद्धतीनें लग्न करणें असल्यास त्यांत सोहळ्यांची अथवा इतर कोणत्याही कृत्यांची फारशी भानगड ठेविली नाहीं. करार होतांना वधूवरें एकमेकांसमोर बसतात, आणि वधू ह्या प्रसंगासाठीं तिच्या मैत्रिणीनें मुद्दाम तयार केलेल्या दारूचा घोंट घेऊन वराचा स्वीकार करिते. नंतर चांदीसोन्याचा मुलामा केलेल्या दोन पेल्यांमध्यें वधूवरांकरितां कांहीं एक पेय ठेविलेलें असतें, त्याचें एका पेल्यांत मिश्रण करून तें लग्नस्थलींच्या व्यवस्थापकास देतात. तो तें घेऊन प्रथमतः वधूला व नंतर वराला देतो. त्यांनीं हें पेय प्राशन केलें, ह्मणजे कार्य आटोपलें. लग्नासंबंधीं सर्व व्यवस्था कोणी नवराबायको करीत असतात. लग्न होत असतां, ते वधूवरांसमोर एका कोनाड्यांत कबूतरांचा एक जोडा आणून ठेवितात. त्या नरमादींचें एकमेकांशीं होत असणारें वर्तन मोठें अनुकरणीय असतें. नर मादीला फार जीव लावितो, व ती त्याच्या इच्छेनुरूप वागत असते. त्यांचा कित्ता ह्या नवीन मानवी दंपत्यानें गिरवावा, असा ह्या योजनेचा उद्देश आहे. लग्नाचा करार आणि त्याचीं आनुषंगिक वरील कृत्यें आटोपल्याबरोबर आपणांत नवराबायकोचें नातें जडलें, असें समजून वधूवरें आपापलीं कर्तव्यकर्में करावयास लागतात.

बहुपत्नीकत्व, स्त्रियांची पतिवशता, आणि त्यागाचें लांछन.

जपानी लोकांत बहुपत्नीकत्वाची चाल आहे. तथापि, खरी पत्नी अशी एकच असते. तिच्या शिवाय इतर स्त्रियांस उपस्त्रियांप्रमाणें समजतात. पत्नीला सर्वस्वी पतीच्या आधीन रहावें लागतें. पतीची इतराजी झाल्यास कायद्यानें पत्नीला कोणतेच हक्क मिळूं शकत नाहींत! त्यामुळें जपानांत स्त्रियांना जरी बंदीवास नाहीं, तत्रापि त्यांच्या हातून पापकर्म क्वचितच होतें. नवऱ्यानें बायकोचा त्याग केल्यास तिला नेहमीं लांछनास्पद असें वपन करून राहावें लागतें!

चिनी लोकांची लग्नरीति.

सगोत्र विवाहाची सक्त मनाई, स्त्रीमध्यस्थाकडून वधूची तारीफ, कन्याविक्रय, आणि लग्नाचा करार.

चिनी लोकांच्या लग्नासंबंधीं एकंदर निर्बंध फोही यानें करून ठेविले आहेत. सगोत्र वधूवरांचीं लग्नें लावण्याचा त्यानें इतका कडक प्रतिबंध केला आहे कीं, दोन सारख्या नांवाच्या कुटुंबांतही शरीरसंबंध होऊं शकत नाहीं. मग त्यांच्यांत कांहीं नातें असो वा नसो. हा प्रतिबंध आजतागाईत तंतोतंत पाळिला जात आहे. मुलामुलींचे आईबाप आपलीं अर्भकें पाळण्यांत आहेत तोंच पुढें त्यांचें लग्न लावण्याविषयीं आपणांस करारानें बांधून घेतात. वरपक्षास वधूचें वर्णन तिखटमीठ लावून सांगण्यासाठीं कन्यापिता स्त्रीमध्यस्थाची योजना करितो; व त्या स्त्रीनें आपली कामगिरी उत्तम रीतीनें बजाविल्यास तिला चांगलें बक्षिस देतो. स्त्रीमध्यस्थानें केलेल्या वर्णनावरून वरपक्षास वधू ज्या मानानें पसंत पडेल, त्या मानानें उलट त्यांना कन्यापित्याला कमजास्त हुंडा द्यावा लागतो. हा हुंडा नगद द्रव्याच्या रूपानें अथवा वस्त्राभरणादिकांच्या रूपानेंही देण्यांत येतो. ह्यावरून चीन देशांत कन्याविक्रयाची चाल आहे, हें निराळें सांगणें नकोच. हुंड्याची रकम आणि सोयरीक नक्की झाल्यावर त्यासंबंधानें उभयपक्षांत सह्यानिशी लेखी करार होतो, आणि हुंड्याची रकम—अथवा वधूची किंमत—लग्न होईपर्यंत अमानत ठेवण्यांत येते. अनेक क्रिया करण्याची चाल असल्यानें

कोणा पुरुषास पुनः लग्न करणें झालें, तरी सोयरीक जमविण्याची रीति वर प्रमाणेंच समजावी. लग्नापूर्वी वराला वधूचें दर्शन होत नाहीं. कदाचित् ती प्रत्यक्ष पाहून करावी अशी त्याची इच्छा असली, तर तसें करण्याला त्याला वधूच्या वाडवडिलांची संमति घ्यावी लागते. कारण, आईबापांच्या विचाराशिवाय लग्नासंबंधीं कोणतीच गोष्ट करितां येत नाहीं. अविवाहित तरुण मुलांमुलींना एकमेकांस भेटण्याची तर काय, परंतु आपल्या लग्नाविषयीं चकार शब्द काढण्याचीही परवानगी नसते.

विवाहसूतक!

लग्नापूर्वी तीन दिवसपर्यंत वरपक्षाकडून सूतक पाळण्यांत येतें! आपल्या डोळ्यांदेखत मुलानें लग्न लावून प्रपंच करण्यास तयार व्हावयाचें, तेव्हां आपण जींवंत असून मेल्यादाखलच आहोंत, अशी चिनी आईबापांची समजूत असते, व तीस अनुसरून हें सूतक पाळण्याचीं अभद्र चाल पडली आहे! सूतकामध्यें भावी लग्नासंबंधानें वरपक्षास त्यांच्या इष्टमित्रांकडून नजरनजराणे अथवा आनंदप्रदर्शन केलें जात नाहीं.

लग्नास अनुकूल असे दिवस आणि वधूवरांचे कांहीं सोहळे.

वसंतऋतु, हा लग्न लावण्याला अतिशय सुखाचा आणि योग्य समय समजला जातो. त्यांतही चिनी वर्षाची प्रतिपदा फार उत्तम मानितात. इंग्रजी वर्षाप्रमाणें ह्मटलें असतां हा समय फेब्रुआरी महिन्यांत येतो. ह्यावेळीं पीच वृक्ष पुष्पगुच्छांनीं लवलेले असतात. लग्नतिथीपूर्वी वरास पोषाक व टोपीसारखें एक शिरोभूषण देऊन त्याचा मोठ्या समारंभानें कांहींएक संस्कार करण्यांत येतो; व त्यास त्याच्या मूळच्या नांवाखेरीज आणखी एक विशेषनाम ठेवण्यांत येतें. ह्याचसमयीं वधूचा केशपाश, जो पूर्वी पाठीवर मोकळा सोडिलेला असतो, तो विवाहित स्त्रीच्या पद्धतीप्रमाणें बांधून त्याचा बुचडा घालण्याचा सोहळा करितात.

लग्नदिवशीं प्रातःकाळीं वराचे इष्टमित्र त्यास अभिनंदनपूर्वक नजराणे पाठवितात. ह्या नजराण्यांत जीवंत बदकें असतात; व तीं लग्नाचा निश्चय झाल्याचीं द्योतक समजलीं जातात. लग्नाची मिरवणूक निघाली, ह्मणजे तींत हे पक्षीही मिरवीत नेण्याची चाल आहे. वधूचे नातलगही तिजकडे नजराणे पाठवितात. त्यांत मुख्यत्वेंकरून स्त्रियांस घालण्याचे जाळीदार झगे वगैरे वस्त्रें असतात. वधू, आतां आपणांस बापाचें घर सोडून नवऱ्याच्या घरीं जावें लागणार, असें समजून अश्रुपात करीत बसते, व तिच्या मैत्रिणीही तिजभोंवतीं जमून तिच्या दुःखाच्या वांटेकरिणी होतात. अर्थात् तिला आपली सहानुभूति व्यक्त करितात. शेवटीं संध्याकाळ होते, आकाशांत नक्षत्रें चमकूं लागतात, आणि वर सुंदर वस्त्रालंकार घालून, आपल्या बरोबर आपले इष्टमित्र, तऱ्हेतऱ्हेचे कंदील व निशाणें घेऊन वाजत गाजत वधूला नेण्यासाठीं येतो.

नजराणे, वधूचें दुःख, व तिच्या मैत्रिणींची सहानुभूति.

कोणी ग्रंथकार असें ह्मणतो कीं, वरातीच्या वेळीं नवरीस नकली फुलांनीं अतिरिक्त शृंगारिलेल्या मेण्यांत बसवून वरगृहीं मिरवीत नेतात. तिचीं वस्त्रभूषणें पेटाऱ्यांत घालून, व ते पेटारे नोकरचाकरांच्या अथवा मजूरांच्या डोक्यांवर देऊन त्यांस तिच्या मेण्यामागें चालवितात. ह्या माणसांच्या हातीं भरदोनप्रहर दिवस असला तरी मशाली पेटवून दिलेल्या असतात! नवरीच्या पुढें वाजंत्री वाद्यें वाजवीत चालतात, आणि नजराणे नेणाऱ्या चाकरमाणसांमागें नवरीचे इष्टमित्र असतात. नवरीच्या मेण्याच्या जाळीच्या खिडक्या आणि दरवाजे बंद करून त्यांस कुलपें लाविलेलीं असतात! जो नातलग अगदीं निकटचा असेल, त्याच्या जवळ त्या मेण्याची किल्ली असते. नवरी नवऱ्याच्या गृहद्वाराशीं आणिली जातांच तिचें स्वागत करून तिला घरांत नेण्यासाठीं नवरा उभाच असतो. त्यास तो नातलग मेण्याची किल्ली देतो. हा प्रसंग नवरानवरींनीं एकमेकांस प्रथमतः पाहण्याचा असतो. तेव्हां नवरा मेण्याचा दरवाजा किती त्वरेनें व किती जिज्ञासेनें उघडीत असेल हें निराळें सांगा-

वधूप्रवेशाची मिरवणूक.

वयास नकोच. क्वचित् असें होतें कीं, नवरा नवरीस पाहून नाखुष होतो, आणि मेण्याचे दरवाजे एकदम बंद करून नवरीच्या इष्टमित्रांस तिला तशीच परत घेऊन जाण्यास सांगतो. अर्थात् त्यानें त्या नवरीप्रीत्यर्थ खर्चिलेला सर्व पैसा व्यर्थ जातो; परंतु, त्यासाठीं तो, जी आपणास पसंत नाहीं, अशा नवरीस कशी तरी पतकरीत नाहीं. तत्रापि, असे बनाव फार क्वचित् बनून येतात. असो. नवऱ्यास नवरी पसंत पडली, ह्मणजे ती मेण्यांतून बाहेर येते. नवरा तिला हात देतो; आणि तिच्यासह घरांतील एका विशिष्ट दालनांत जातो. तेथें खास त्या उभयतांकरितांच एक मेज ठेविलेलें असतें, त्याजपाशीं ते जाऊन बसतात. इतर मंडळी दुसऱ्या मेजांजवळून बसतात. पुरुष दालनाच्या एका बाजूस आणि स्त्रिया दुसऱ्या बाजूस बसतात. परंतु नवरा-नवरीं बसण्यापूर्वी ते सर्वजण **ताएन** (Tien) नामक एका देवतेस चार वेळ नमन करितात. दुसरा ग्रंथकार असें ह्मणतो कीं, वधू वरातीनें मिरवत मिरवत वरगृहाच्या दरवाज्यापाशीं येतांच तिच्या सख्या तिला हातीं धरून वरांत नेतात. ह्यासमयीं कोणी स्त्री निखाऱ्यांनीं भरलेली एक शेगडी घेऊन दरवाज्या-पाशीं उभी असते. तिच्या जवळून वधूला नेतात. ह्या कृत्याचा उद्देश स्पष्ट कळत नाहीं. तथापि, येथपासून वधूनें गृहिणीच्या नात्यानें स्वयंपाकादि गृहकृत्यें सांभाळावींत असें तिला सुचविण्यासाठीं वरील कृत्य करीत असतील असें वाटतें. असो. वधू घरांत दाखल झाल्यानंतर थोड्या वेळानें, ती फोडून तयार केलेली सुपारी घेऊन आपल्या सोबतिणींसह एका मोठ्या दालनांत येते, व तेथें बसलेल्या मंडळीस ती वांटून देते. नंतर उभयतां वधूवरांकडून कांहीं सोहळे करविण्यांत आल्यावर वधूला एका खोलींत घेऊन जातात. तेथें तिचा नवरा येऊन तिचा बुरखा काढून टाकितो. हें झाल्यावर मेजां-वरून मेजवानीचे पदार्थ मांडण्यांत येतात, आणि सर्व मंडळी भोजनास बसते. सदरहू मेजवानींत वधूवरें जोडप्यानें बसून एका पेल्यांतून कांहीं पेय पितात. नंतर कोणी सौभाग्यवती व पुत्रवती स्त्री वधूवरांस आशीर्वाद देते, आणि त्यांस एकशय्येवर शयन करण्याचा सोहळा उरकून घेण्याविषयीं सूचना

करिते. ह्यावेळीं तेथें जमलेली मंडळी मोठा आनंद प्रदर्शित करितात. नवराही त्यांच्या आनंदाचा वांटेकरी होतो. नंतर त्या मंडळींतून कोणी मोठ्या इभ्रतीचे व दर्जाचे गृहस्थ वरास मद्य पिण्याचा आग्रह करितात, अथवा करीतही नाहींत. निजावयास जाण्याची वेळ होतांच सर्वजण मिळून वरास शय्यागृहाच्या दरवाज्यापाशीं आणून सोडितात, व नंतर आपापल्या घरीं जातात.

दुसऱ्या दिवसाचीं कृत्यें वगैरे.

लग्नाच्या दुसऱ्यादिवशीं तें नवीन जोडपें एका विस्तीर्ण दालनांत येऊन तेथें गृहदेवतांची पूजा करितें, व मातापितरप्रभृति सर्व वाडवडिलांस प्रणाम करितें. तदनंतर उभयतां आपल्या खोलींत परत जातात. तेथें त्यांची समवयस्क मित्रमंडळी जाऊन त्यांस भेटतात. लग्न झाल्यापासून एक महिना पावेतों तें नवविवाहित दंपत्य सर्वकाल ऐषआरामांत आणि नानाप्रकारच्या करमणुकींत घालवितें.

चिनी लोकांच्या कित्येक चालीरीती.

श्रीमान् लोकांत व राजघराण्यांत अनेक स्त्रिया करण्याची चाल आहे. अशा स्त्रियांपैकीं फक्त एक खरी पत्नी असून बाकीच्या उपस्त्रियांप्रमाणें समजल्या जातात. विधवापुनर्विवाहाची चाल आहे. व्यभिचारिणी स्त्रियांस बाजारांत नेऊन विकितात, व त्यांच्या किंमतीनें दुसऱ्या स्त्रिया करितात! कोणी स्त्री एक नवरा जीवंत असून दुसऱ्याशीं लग्न लावील, तर पहिल्या नवऱ्यास तिचा गळा दाबून वध करण्याची सदर परवानगी आहे! जर कोणी मनुष्य आपल्या बायकामुलांचा त्याग करून चालता झाला, तर बायकोनें तीन वर्षपर्यंत त्याची वाट पाहून नंतर सरकारांत अर्ज करावा, आणि आपली स्थिति कळवावी. ह्मणजे तिला दुसरा नवरा करण्याची परवानगी मिळते. परंतु, अशी परवानगी मिळविल्यावांचून जर तिनें पुन्हां लग्न केलें, तर ती कडक शिक्षेस पात्र होते. कोणी स्त्री वंध्या असली, दुष्ट स्वभावाची असली, चोरटी असली, किंवा तिला कांहीं स्पर्शजन्य रोग असला, तर नवरा तिला घरांतून घालवून देतो. स्त्रीचा त्याग करण्याची चाल श्रीमंतांत तशी गरीबांतही क्वचितच आढळते.

चिनई तार्तरी व तिबेटांतील चालीरीति.

चिनई तार्तरीमध्यें जे **तिबेटी** लोक राहतात, त्यांच्यांत एका स्त्रीनें अनेक पुरुषांशीं शरीरसंबंध करण्याची चाल आहे; व असे संबंध लोकांत फार प्रतिष्ठितपणाचे समजले जातात!

बहुभर्तृकत्व.

तिबेटामध्यें लग्नकार्य हें मुळींच घोटाळ्याचें किंवा त्रासदायक नसतें. एतद्देशीय लोकांना आपली लग्नें जमवून आणण्याला विशेष असें कांहींच करावें लागत नाहीं. तीं तेव्हांच जमून येऊन उरकलीं जातात. नवरानवरींची परस्पर संमति हीच काय ती त्या उभयतांची रेशमाची गांठ मारण्याला आवश्यक असते, व ती असली, ह्मणजे केवळ उपचारार्थ नवरा नवरीच्या आईबापाजवळ मुलीबद्दल मागणी करितो. आईबापांना त्या दोघांचा संबंध होणें पसंत पडतांच ते आपल्या इष्टमित्रांनिशी वरगृहीं जातात; व तेथें तत्पक्षाच्या स्त्रीपुरुष इष्टमित्रांस भेटून तीन दिवस मनसोक्त खानपानांत व नृत्यगीतांत घालवितात. हें झालें, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

स्त्रीपुरुषसंमति आणि मेजवान्या.

तिबेटामध्येंही फारकरून बहुभर्तृकत्वाचीच चाल आहे. अनेक बंधूंमध्यें एक सामाईक स्त्री असलेली पुष्कळ वेळां पाहण्यांत येते; आणि त्या स्त्रीचे सर्व पति तिच्याशीं मिळून मिसळून सुखानें राहतात. त्यांच्यांत कलह क्वचितच होतो. कधीं कधीं मात्र पुरुष एकपत्नीक आणि स्त्री एकभर्तृका असते.

तिबेटांतील बहुभर्तृकत्व.

लग्नाप्रमाणें काडी मोडून देण्यालाही नवराबायकोच्या परस्पर संमतीची आवश्यकता असते. संमतीखेरीज त्यांना एकमेकांचा त्याग करितां येत नाहीं; व त्याग केल्यावर दोघांतून कोणालाही द्वितीय संबंध करण्याची मोकळीक नसते. व्यभिचाराच्या अपराधाबद्दल स्त्रियांस देहदंड आणि पुरुषांस द्रव्यदंड ठेविला आहे.

त्याग, द्वितीय-संबंधाची मनाई, व व्यभिचारार्थ दंड.

तिबेटांतील धर्मगुरु जे **लामा** त्यांचें लग्नकार्यांत मुळींच अंग नसतें. कारण, ते स्त्रियांचा सहवास मुद्दाम टाळीत असतात. पण असें ह्मणावें, तर ते कुटुंबवत्सल असल्याचींही उदाहरणें सांपडतात. **तायशू लामा** ह्याच्या सहा पुतण्यांमध्यें एक सामाईक स्त्री होती असें ह्मणतात !

लामांचा अलिप्तपणा.

कालमक व तार्तर लोकांच्या लग्नरीती.

लग्नरीति वगैरे.

कालमक हे लोक **तार्तरी** व **मोंगोलियां**तील राहणारे आहेत. हे सामान्यतः **तार्तर,** या संज्ञेखालीं येतात. ह्यांच्यांत लग्न ह्मणजे एक शर्यतच आहे. कुमारिका घोड्यावर बसून तो घोडा भरधांव फेंकिते. तिच्यामागून तिला वरण्याची इच्छा करणारा तरुण मनुष्य आपला घोडा सोडितो. मागून जाऊनही त्यानें तिला गांठिलें, ह्मणजे ती त्याची वधू होते; व ज्या जागेवर तो तिला गांठील त्या ठिकाणीं त्या उभयतांचें लग्न लागतें. तथापि, एकंदरीनें पहातां ह्या लोकांत नीतीचें मान शून्य अंशावर आहे, असें ह्मणावें लागतें! ह्या लोकांचे उपाध्याय लग्नें करीत नाहींत. पण समाजांतील वाटेल त्या स्त्रीशीं एक रात्र गमन करण्यास त्यांना मुळींच प्रत्यवाय नसतो! उलट उपाध्यायाशीं गमन करणें, हा एक मोठा मान समजला जातो! मोंगल व कालमक तार्तर लोकांत शरीरसंबंध कोणाशीं करावा, व कोणाशीं करूं नये, ह्याविषयीं कांहींच निर्बंध नाहीं. कोणीही स्त्री निपुत्रिक राहूं नये, येवढाच काय तो त्यांचा पुरुषार्थ आहे; व त्याअन्वयें ते पशुवत् पाहिजे त्या स्त्रीशीं गमन करितात!

श्रीमान् तार्तर लोकांची लग्नरीति.

श्रीमान् **तार्तर** लोकांच्या लग्नप्रसंगीं आसपासच्या गांवोगांवच्या लोकांस जेवणावळी देण्याची चाल आहे. दोन तीन गांवचे लोक एके दिवशीं, ह्याप्रमाणें सारखीं पंधरा पंधरा दिवस हीं गांवप्रयोजनें चालू असतात! भोजनास येणारी मंडळी आपापल्या ऐपतीप्रमाणें आहेर घेऊन येतात. लग्नाच्या पूर्वदिवशीं हे लोक वधूला नाना प्रकारें सजविण्याचा केवळ अतिरेक करितात; आणि

शिवाय तिला बुरख्यांत गुरफटून ठेवितात! वधूच्या प्रियसख्या, आतां तिचा व आपला वियोग होणार असें समजून तिजपाशीं अश्रुभराण्या रडत बसतात! नंतर त्या तिच्या हातांपायांचीं बोटें, नखें, आणि केंस रंगवितात. मग ती निजावयासाठीं बिछान्यावर जाते; त्यावेळीं धर्मगुरु तिच्या खोलीच्या खिडकीपाशीं जाऊन लग्न करण्याविषयीं तिची संमति घेतो. ती तिनें व्यक्त केली, ह्मणजे तो ईश्वराची प्रार्थना करून त्या भावी स्त्रीपुरुषांस आशीर्वाद देतो; व ह्या कृत्याबद्दल एखादा घोडा, मेंढरूं किंवा यथाशक्ति द्रव्य दक्षिणा देण्यांत आल्यावर तो निघून जातो. लग्नाचा मुख्य आणि मोठा समारंभ वधूप्रवेशाच्या दिवशीं असतो. प्रथमतः सर्व इष्टमित्र मंडळी वरगृहीं जमून तेथें मेजवानी झोडितात, व शर्यती वगैरे करमणुकीचे खेळ करितात. नंतर सायंकाळच्या सुमारास सर्वजण मोठ्या थाटानें वधूगृहीं येऊन तिचें अभिनंदन करितात. रात्रौ सर्व मंडळी मेजवानी उडविण्यांत गर्क झाली असतां वधूचा पिता व बंधू वधूला तिच्या सासरीं नेऊन पोंचवितो. तेथें तिला मिठाई, शरबत, व भेटीदाखल एक बकरा देण्यांत येतो. नंतर तिचा भाऊ तिच्याप्रमाणें आपणही एक बुरखा घेऊन तिला जनानखान्यांत नेतो, व पडदेनशीन करून बाहेर येतो. तदनंतर तिची आई व इष्ट मैत्रिणी तिच्या अंगावर सुंदर वस्त्राभरणें घालितात. वर हजामत व स्नान करून आणि वस्त्रालंकार घालून मध्यरात्रीं वधूच्या खोलींत तिला भेटावयास जातो. मग तें नवीन जोडपें बाकीची रात्र ऐषआरामांत घालवितें.

भेटी, नजराणे व लग्नसमाप्ति.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं नवरा, नवरीनें तयार केलेले शिवण कामाचे मासले बरोबर घेऊन आपल्या इष्टमित्रांस भेटावयास जातो, व त्यांस त्या वस्तू नजर करून येतो. इष्टमित्रही नवरीला भेटावयास येतात. ती प्रत्येकांस उत्थापन देऊन त्याचा स्वागतसत्कार करिते. नंतर वधूवरांच्या मनोरंजनार्थ घोड्यांच्या शर्यती वगैरे खेळ करण्यांत येऊन लग्नसमारंभ आटोपतो.

अफगाण लोकांच्या लग्नाविषयीं कांहीं माहिती.

कन्याविक्रय, त्याचा समाजावर परिणाम, स्त्रियांची योग्यता, दीराशीं पुनर्विवाह, वगैरे.

अफगाण लोकांत बायका विकत घेण्याची चाल आहे. त्यांच्या किंमतीचें प्रमाण नवऱ्याच्या सांपत्तिक स्थितीवर अवलंबून असतें. ह्या चालीचा परिणाम असा झाला आहे कीं, अफगाणी स्त्रियांस त्यांचे पति जरी चांगल्या रीतीनें वागवितात, तरी स्त्रिया ह्या कांहीं अंशीं पुरुषांच्या जंगम मालमत्तेप्रमाणें लेखिल्या जातात. पुरुषास आपल्या स्त्रीचा वाटेल तेव्हां आणि कांहींएक कारण न सांगता त्याग करितां येतो. परंतु स्त्रीला मात्र तसें करितां येत नाहीं. तिनें पाहिजे असल्यास त्यासंबंधानें काजीकडे अर्जी करून आपली दाद मागावी. परंतु हा रिवाजही फारसा दिसून येत नाहीं. नवरा आपल्या बायकोच्या पूर्वीं मरण पावला, आणि त्याची विधवा स्त्री पुनर्विवाह करण्यास इच्छीत असली, तर तिजसाठीं नवऱ्यानें लग्नसमयीं जें द्रव्य खर्चिलें असेल, तें नवऱ्याचे वारस तिजपासून परत घेतात; व तें तिनें दिल्यावर तिला पुनर्विवाह करण्याची मोकळीक असते. परंतु, इस्रायलांप्रमाणें अफगाण लोकांतही गतभर्तृकेशीं तिच्या दीरास लग्न लावावें लागतें; आणि जर कोणी तिऱ्हाईत पुरुष दीराच्या संमतीवांचून त्याच्या गतभर्तृका भावजईशीं लग्न लावील, तर त्यानें त्या दीराचा फार भयंकर गुन्हा केला असें समजतात. तत्रापि, कोणाही विधवेस तिच्या मर्जीविरुद्ध, आणि जो पुरुष तिला आवडत नसेल त्याशीं लग्न लावण्याची फरज पाडीत नाहींत. उलट तिला संतति असून जर ती वैधव्यांत राहण्यास कबूल असेल, तर तिचें करणें फार पसंत समजलें जातें.

सर्व अफगाणिस्तानांत, अनुक्रमें विसावें आणि पंधरापासून सोळावें वर्ष हा मुलामुलींचा योग्य विवाहकाल समजला जातो. परंतु, ज्याला स्त्री खरीदी करण्याचें सामर्थ्य नसतें, असा पुरुष वेळवर चाळीस वर्षांचा होईपर्यंत देखील अविवाहित राहतो. तसेंच, वर न मिळाल्यामुळें कधीं कधीं स्त्रियाही पंचवीस वर्षांच्या होईपावेतों 'बेगम' राहतात. जे श्रीमान् आहेत, त्यांना द्रव्याची कमताई नसल्यानें ते आपलीं मुलें वयांत येण्यापूर्वीच त्यांना बायका करून देतात. शहरांत राहणाऱ्या लोकांमध्यें मुलगा पंधरा वर्षांचा आणि मुलगी बारा वर्षांची झाल्यावर, किंवा खर्चाचें सामर्थ्य असल्यास ह्या वयांपूर्वीही त्यांचीं लग्नें करण्यांत येतात. अफगाणिस्तानच्या पश्चिम भागांतील लोकांत मुलगा पूर्ण वयांत येऊन त्याची दाढी वाढल्याखेरीज त्याचा विवाह करीत नाहींत. **गिलचे** लोक तर ह्याहीपेक्षां उशीरां लग्नें करितात. तथापि, ठोकळ मानानें पाहूं जातां, एकंदर अफगाणांत पुरुषाचा विवाह, हा त्याच्या अंगीं स्त्री संपादन करण्याचें व कुटुंब पोषणकरण्याचें सामर्थ्य येण्यावर असतो.

विवाहकाल.

हे लोक शक्य असेल तेथपर्यंत आपापल्या जातींमध्यें शरीरसंबंध करितात. परंतु न जमल्यास पुरुष, **इराण** वगैरे अन्य देशांतून स्त्रिया करून आणितात; व तसें करण्यास त्यांना कोणताही प्रत्यवाय नसतो. परंतु, अफगाणांतील मुलगी परक्या देशांत देणें, हें मात्र फारच गौण समजलें जातें. सबब, एतद्देशीय संभावित गृहस्थ, किंबहुना कोणीही **दुराणी** मनुष्य आपली मुलगी परदेशीं देण्यास कधींही कबूल होत नाहीं!

शरीरसंबंध.

शहरांतून स्त्रिया पुरुषांच्या दृष्टीस मुळींच पडत नाहींत. त्यामुळें नागरिक अफगाणांचीं लग्नें बहुतकरून स्त्रीमध्यस्थांच्या द्वारें आणि युक्तिप्रयुक्तीनें जमविण्यांत येतात. अमुक एका गृहस्थाची मुलगी उपवर आहे, असा एखादा अविवाहित पुरुषास सुगावा लागला, ह्मणजे तो आपल्या नातलग स्त्रीस अथवा शेजा-

सोयरीक जमविण्याची रीति.

रीण बाईस त्या मुलीच्या घरीं पाठवितो, व तिच्या मार्फत त्या बेगमेची एकंदर माहिती मिळवितो. त्या स्त्रीनें केलेल्या वर्णनावरून ती बेगम त्यास पसंत पडली, तर तो त्याच स्त्रीस आपलें लग्न जमवून देण्याविषयीं विनंति करितो. मग ती बाई जाऊन मुलीच्या आईची भेट घेते; आणि मुलीचे वाडवडील तिला त्या मनुष्यास देण्याला कबूल होतील किंवा कसें, ह्याबद्दल खुलासा काढिते. जर मुलीच्या वडिलांस ती गोष्ट मंजूर होईल असें कळलें, तर मग मध्यस्थ बाई त्यांजपाशीं उघड रीतीनें मुलीची मागणी करितात; आणि चारचौघांच्या विचारानें तें लग्न जमविण्याचा दिवस मुकरर करून परत येतात. नंतर नेमिलेल्या दिवशीं मुलाचा बाप आपल्या कित्येक इष्टमित्रांसह मुलीच्या बापाकडे जातो. त्याचप्रमाणें मुलाची आईही कित्येक स्त्रियांसह मुलीच्या आईकडे जाते; आणि तो वरपक्ष औपचारिक रीतीनें वधूची मागणी करितो. अर्थात् ती कबूल केली जाते. मग वरपक्षाकडून वधूला एक आंगठी, शाल, वगैरे वस्तूंचा नजराणा देण्यांत येतो; आणि वरपिता कन्यापित्याला मोठ्यानें, परंतु विनयपूर्वक ह्मणतो कीं, "माझा मुलगा मी आपल्या सेवेस हाजर करितों त्याचा आपण स्वीकार करावा!" ह्या त्याच्या ह्मणण्यास कन्यापिता **'मुबारिक् बौषद्'** ह्मणजे हा संबंध मंगलप्रद होवो! अशा अर्थी आपला रुकार देतो. नंतर **कुराणां**तील **फातेहा** नामक कलमांचें पठन होऊन, व त्या भावी जोडप्याचें कल्याण होण्याविषयीं ईश्वराची प्रार्थना करून उभयपक्ष एकमेकांस मिठाई वांटितात; आणि मुलीचा बाप आपल्या भावी जामातास कांहीं किरकोळ वस्तूंचा नजराणा देतो. ह्या कृत्यानें उभयपक्षीं लग्न करण्याचा निश्चय झाला, असें समजलें जातें, व तें झाल्यानंतर पुष्कळ दिवसांनीं लग्नसमारंभ करण्यांत येतो.

अंदण देण्याच्या वस्तू आणि उलट हुंडा.

सगाई आणि शादी ह्यांच्या दरम्यान जी मुदत असते, तींत मुलीचा बाप मुलीबरोबर अंदण देण्याच्या संसारोपयोगी वस्तू तयार करून ठेवितो. ह्या वस्तू ह्मणजे सतरंज्या, ताटें, धातूचीं भांडीं, अंगावर घालण्याचे कांहीं दागिने वगैरे होत.

त्याचप्रमाणें तिकडे नवरा नवरीला देण्याच्या उलट हुंड्याची रक्कम जमवून ठेवीत असतो. अर्थात् ही उलट हुंड्याची रकम ह्मणजे नवरीच्या बापास नवरीबद्दल देण्याची किंमतच होय. ही किंमत त्यास अंदण मिळणाऱ्या वस्तूंच्या किंमतीपेक्षां किती तरी पटीनें अधिक असते, हें सांगणें नकोच! नवरीच्या किंमतीशिवाय, नवऱ्यास आपल्याला राहण्यासाठीं एखादें घर, आणि इतर आवश्यक वस्तूंचा संग्रह करावा लागतो. तो गरीब स्थितींत असला, तर त्या बिचाऱ्यास ही तयारी करण्यास एखाद दुसरें वर्षही लागतें. परंतु श्रीमान् असल्यास अल्पावकाशांत सर्व सिद्धता होऊन नंतर मुसलमानी रिवाजाप्रमाणें एखाद्या दिवशीं टोलेजंग लग्नसमारंभ करण्यांत येतो!

इराणांतील पारसीकांची लग्नरीति.

लग्नरीति.

लग्नदिवशीं वराचे इष्टमित्र समुदायानें वधूच्या घरीं जातात. तेथें गेल्यावर मिष्टान्नें व शरबत ह्यांची मेजवानी देऊन त्यांचें आदरआतिथ्य केलें जातें. नंतर वरपक्षीयांपैकीं जो गृहस्थ वयानें वडील असेल, तो वधूस विचारितो कीं, "अमुक एक मनुष्य आमच्या व तुमच्या कुटुंबांनीं पसंत करून तुह्मांला वर योजिला आहे. त्यास आपला नवरा करण्याची तुमची खुषी आहे काय?" ह्या प्रश्नास वधूनें रुकार दिला, ह्मणजे ती वरपक्षीय मंडळी वधूस आणि तत्पक्षीयांस बरोबर घेऊन आपल्या घरीं येते. ते सर्वजण येऊन जागेवर बसले, ह्मणजे त्यांत उपाध्याय असतो, तो वरासमोर उभा राहून त्यास 'दारी' भाषेमध्यें उपदेश करितो. त्यासमयीं वधू, तो उपदेश आपणास ऐकूं न येईल अशा जागीं दूर अंतरावर इतर स्त्रियांमध्यें जाऊन बसते. हा उपदेश "परमेश्वर आणि त्याचा अवतार यांच्या आज्ञा पाळा." वगैरे. आशयाचा असतो. नंतर लग्नविधि सांगणारा उपाध्याय पापाबद्दल पश्चात्तापदर्शक अशा कांहीं प्रार्थना करितो; व सर्वशक्तिमान् परमेश्वर जो '**आहुरा मज़्दा**' त्याचीं न्यायी कृत्यें व आज्ञा यांजबद्दलचीं स्तोत्रें ह्मणून, सर्व भूमंडळावर त्याची कृपा असावी, अशी त्याजपाशीं प्रार्थना करितो. ह्या प्रार्थना झाल्यानंतर तो उपाध्याय वधूच्या बापास, ती कन्या योजिलेल्या मनुष्यास देण्याची त्याची मर्जी आहे किंवा कसें, तें विचारितो. त्याचें उत्तर मिळाल्यावर, तो वरास,

गृहस्थ मुळींच समजत नाहीं! उलट, जर कोणी पुरुष आपल्या बायकोच्या अनीतीबद्दल चिडीस जाऊन तिचा सूड घेण्यास प्रवृत्त झाला, तर तो लोकांत निंदेला व तिरस्काराला पात्र होतो! सबब, अरब लोक आपल्या बायकांच्या अनीतीचा बंदोबस्त करण्याच्या भानगडींतच पडत नाहींत. त्यांना त्या बाबतीकडे कानाडोळा करणें भाग असतें. कारण, स्त्रियांप्रमाणें त्यांची स्वतःची नीतिमत्ताही बेताबाताचीच असते!

लग्नासाठीं वधूचें प्रस्थान.

अरब वधूवरें बहुतकरून एकमेकांपासून लांबच्या पल्ल्यावर राहणारी असतात. तत्रापि, लग्न लावण्यासाठीं नवऱ्याला प्रवास करून नवरीच्या गांवीं जावें लागत नाहीं. उलट तीच नवऱ्याच्या गांवीं येते. आपल्याला माळ घालण्यासाठीं गृहलक्ष्मी जितक्या लांबच्या पल्ल्यावरून आपल्या घरीं चालत येईल, तितकें अरब गृहस्थ आपलें भाग्य अधिक समजतो. कारण, त्यांत त्याला स्वतःला कांहीं एक दगदग न करितां जागच्याजागीं स्वस्थ बसून राहण्यास सांपडतें, व नवरीला मात्र आपल्या बापाचें घर सोडून रखरखीत वाळवंटांतून रखडत नवऱ्याच्या घरीं जाऊन त्याशीं लग्न लावावें लागतें! मुसलमानांचे पुष्कळ रीतिरिवाज हिंदूंच्या अगदीं उलट असतात. वरील रिवाजही त्यांपैकींच एक होय. आमच्या लग्नांत वरप्रस्थान, तर अरबी असल मुसलमानांच्या लग्नांत वधूप्रस्थान! असो.

शरीरसंबंध, व तो घडवून आणण्याची रीति.

नगरवासी अरब आपलीं मुलें लहान असतांच त्यांना दूर अंतरावर बिदोइन अरबांच्या तंबूंत राहण्यासाठीं पाठवितात. कारण, तेथें तीं बिदोइन मुलांसंगतीं लहानाचीं मोठीं होऊन शरीरानें त्यांच्याप्रमाणेंच काटक निपजावींत, अशी नागरिक मातापितरांची इच्छा असते. बिदोइन अरबांची शरीरसंपत्ति खरोखरच फार स्पृहणीय असतें, व ते आपल्या श्रमसहिष्णुतेचा मोठा अभिमान बाळगितात. शहरांतील मुलगा, आपली जोपासना करणाऱ्या बिदोइन बांधवांजवळ

चांगला वयांत येईपर्यंत राहतो. पुढें तो आपल्या घरीं परत आल्यावर त्याला स्वतःला व त्याच्या आप्तांनाही त्यानें लग्न करावें असें वाटतें. अर्थात् लग्नाची गोष्ट निघण्याबरोबर अगदीं प्रथमतः त्याच्या मनांत आपल्या पूर्वीच्या रहणीची कल्पना येणें साहजिक होय. ज्यांत आपण आपल्या आयुष्याचा अत्युत्तम भाग घालविला, असे ते घोड्याच्या केंसांनीं विणलेले तंबू, आणि मंदोष्ण शरीराची व आपणाकडे सौम्य कटाक्षानें पाहणारी ती बिदोइनी कुमारी त्याच्या दृष्टीसमोर दिसूं लागते! दीर्घ परिचयामुळें त्याला अझूनही असा भास होतो कीं, जणूं काय आपण शिळोप्याच्या वेळीं त्या तंबूसमोरील वाळवंटावरच बसलें आहोंत, आपली ती आवडती बिदोइनी बेगम आपल्या जवळ आहे, आणि तिला खूष करण्यासाठीं आपण खजूराचे नानाकृती हार गुंफीत आहोंत! अशा रीतीनें त्याचें मन तिजवर जडल्यामुळें बायको करीन तर तीच करीन, अशी त्यानें गांठ बांधून ठेविलेली असते. त्याच्या नागरिक माता-पितरांनाही सशक्त अशा बिदोइनी कुमारीशीं आपल्या मुलाचा शरीरसंबंध होणें फार हितावह आणि चांगलें वाटतें. सबब, ते बहुतकरून आपल्या मुलाचा कल पाहून त्याच्या आवडत्या बिदोइनी बेगमेलाच लग्नाचें मागणें घालितात. मग काय? दुधांत साकर पडल्यासारखेंच होतें! मुलीकडे तिज-बद्दलची मागणी जाण्याचा अवकाश! की लागली ती मुलगी मोठ्या डौलानें आपल्या वरातीच्या उंटावर बसून नवरी होऊनच येते!

वधूप्रस्थानाच्या मिरवणुकीचें वर्णन.

उंटाच्या पाठीवर एक डोली चढविलेली असते, व तिच्यावरून एक बुरखा घातलेला असतो. बुरख्याचें कापड रेशमाचें असून त्यावर कलाबतूनें कशिदा काढिलेला असतो. मधून मधून सोनेरी जरीनें कुराणांतील वाक्यें काढिलेलीं असतात. कशियांत टिकल्या अथवा लहान लहान भिंगें बसविलेलीं असतात. तसेंच बुरख्याला ठिकठिकाणीं गोंडे लाविलेले असतात. उंटाच्या नाकावर शहामृगाच्या पिसांचा एक ऐटदार तुरा लाविलेला असतो. त्याची वांकडी आणि लांबलचक मान मेहेंदीनें लालभडक रंगविलेली असते; आणि त्याच्या तोंडावर चोहींकडे लहान लहान आरशा लाविलेल्या अस-

तात, ती सूर्यकिरणांनीं सारख्या चमकत असतात. त्यांच्या गर्दीमध्यें उंटाचे डोळे अगदींच फिके पडून ते केवळ अपारदर्शक स्फटिकांसारखे दिसतात! त्या प्राण्याच्या ओबडधोबड शरीरावरून पायांपर्यंत लोंबणारी एक फुलकरीची झूल घातलेली असते. डोलीमध्यें नवरीसमागमें तिची एखादी मैत्रीण असते. रस्त्यानें नवरीला संभाळून नेण्याकरितां तिच्या बरोबर कांहीं पुरुषमाणसें दिलेलीं असतात. तीं नवरीच्या मागेंपुढें साध्या झुली घातलेल्या उंटावर बसून मार्ग क्रमीत असतात. त्यांच्या उंटांवर नवरीला अंदण दिलेल्या वस्तू–वस्त्रें, पात्रें, रोकड रकम, वगैरे–लादलेल्या असतात. ह्या वधूप्रस्थानाच्या मिरवणुकीमागें उष्ट्रारूढ होऊन कांहीं नगारजी चाललेले असतात. ते आपले नगारे रस्त्यानें सारखे बडवीत जातात. नगारे ह्मटले असतां फारसे मोठे नसतात, परंतु त्यांचा आवाज मात्र कानटाळीं बसविण्याइतका कर्कश असतो! असो.

लग्न आणि स्नान सोहळ्याची मिरवणूक.

ह्याप्रमाणें वधू आपल्या गांवाहून मिरवत मिरवत वराच्या गांवीं आल्यावर तिचें तिच्या सौंगड्याबरोबर मुसलमानी रिवाजांप्रमाणें लग्न होतें. लग्नानंतर नवरा स्नानसोहळ्यासाठीं वाजत गाजत स्नानागारास जात असतो. त्यावेळच्या मिरवणुकीपुढें एक दोन पोरें अगदीं जुन्या पद्धतीचीं डफडीं वाजवीत आणि त्यांच्या तालावर नाचत चालतात. त्यांच्या मागून कित्येक मंडळी बंदुका उडवीत जातात, आणि शेवटीं इष्टमित्रांच्या समुदायाबरोबर नवरा मिरवत जातो.

बहुपत्नीकत्व, त्याग, वगैरे.

अरब लोकांत अनेक स्त्रिया करण्याला सदर परवानगी आहे. परंतु, श्रीमान् लोकांखेरीज फारकरून कोणी बहुपत्नीक नसतात. जे पुष्कळ बायका करितात, ते लोकचर्चेला पात्र होतात. वास्तविक पाहतां जरी बहुपत्नीकत्वाची चाल पडली आहे, तरी अरब लोक ती प्रशस्त न मानितां उलटी त्रासदायक समजतात. बायकोचा त्याग करितां येतो. परंतु, तो क्षुल्लक बाबतीवरून कोणीही करीत नाहींत. विवाहित स्त्रीपुरुषांचे सर्व हक्क **कुराणांत** सांगितल्याप्रमाणें पाळण्यांत येतात.

बाबिलोनच्या लोकांची लग्नरीति.

बाबिलोन शहराविषयीं दोन शब्द.

बाबिलोन हें फार प्राचीन काळीं एका बलवत्तर राज्याच्या राजधानीचें शहर होतें. हल्लीं कालगतीनें तें होतें कीं नव्हतें अशा दशेस येऊन पोहोंचलें आहे! जगद्विख्यात **शिकंदर** बादशहा, हा ह्याच शहरीं ई. स. पूर्वी ३२३ च्या सालीं मरण पावला. हें शहर आशियांतील **तुर्कस्तान**चा **इराक अरबी** ह्मणून जो भाग आहे, त्यांत **युफ्रेतिस** नदीच्या कांठीं आहे. एके काळीं उन्नतीच्या केवळ कळसास पोहोंचलेलें असें जें हें बाबिलोन, त्यांतील लोकांच्या रीतीभाती, ज्या प्रस्तुत ग्रंथाच्या मर्यादेंत येण्यासारख्या दिसल्या, त्या आह्मी आमच्या जिज्ञासु वाचकांसाठीं ह्याखालीं देत आहोंत:—

अनीतीचा शरीरसंबंध.

बाबिलोनमधील लोकांच्या लग्नासंबंधीं तपशीलवार माहिती मुळींच उपलब्ध नाहीं. तथापि, त्यांच्यांत अनीतीचा स्त्रीपुरुषसंबंध होत असे; आणि तो क्षम्य होता इतकेंच नव्हे, परंतु, त्यास धर्मदृष्टयाही कांहीं बाध मानीत नसत!

उपवर मुलींचा लिलांव!

भरबाजारांत स्त्रियांचा लिलांव करण्याची चाल होती! आणि ही चाल उत्तम असें समजून **इलीरिया**च्या लोकांनीं व **हिरोडोटस** ह्यानेंही तिचें अनुकरण केलें होतें. मुली उपवर झाल्या, ह्मणजे त्यांस एका नियमित वेळीं व नियमित स्थळीं जावें लागे. तेथें तरुण पुरुषही जमत असत. बाजार भरल्यावर लिलांव बोलणारा

मनुष्य, एकंदर मुलींत जी फार सुंदर असे, तिचा लिलांव पहिल्यानें बोलून तिला विकून टाकी. नंतर बाकीच्या मुली, त्यांच्या रूपाच्या प्रमाणानें क्रमशः विकल्या जात होत्या. श्रीमान् गृहस्थांमध्यें सर्वोत्कृष्ट स्त्री खरेदी करण्याविषयीं चढाओढ चालत असे. अर्थात् जो कोणी जास्तींत जास्ती किंमत देईल, त्यालाच रूपवती स्त्री विकली जाई. ज्यांची ऐपत कमी, अशा तरुण पुरुषांना सुंदर स्त्रियांची इच्छा करण्यास मार्गच नव्हता. सबब, ते कुरूप स्त्रियांवरच संतोष मानून राहत असत; आणि असें करण्यांत त्यांचा एक प्रकारें फायदाही होत असे. तो असा कीं, लिलांव करणाऱ्यानें उत्तमोत्तम मुली विकून त्यांची किंमत गोळा केली, ह्मणजे तो अत्यंत कुरूप अशा मुली पुढें आणवून 'आतां ह्यांना घेण्याची कोणाची खुषी आहे ?!' ह्मणून विचारीत असे; व जे गृहस्थ असल्या स्त्रियांना आपल्या बायका करण्यास खुषी असतील, त्यांस लिलांव बोलणाराकडून प्रत्येकीच्या पाठीमागें थोडथोडी रकम दिली जाई. ह्याप्रमाणें चांगल्या मुलींच्या किंमतींतून कुरूप अथवा अपंग मुलींवर थोडथोड्या रकमा देऊन त्या गिऱ्हाइकांत खपविल्या जात होत्या. कन्यापित्याला वाटेल त्याशीं आपल्या मुलीचें लग्न लावितां येत नव्हतें. तसेंच जे कोणी मुली विकत घेत असत, त्यांना त्या मुलींशीं लग्न लावण्याचा करार लिहून द्यावा लागे. त्याशिवाय त्यांना त्या मुली घरीं नेऊं देत नसत. परंतु, विक्री झाल्यावर जर कोणी स्त्रीपुरुषें एकमेकांस आवडेनाशीं झालीं, तर त्या पुरुषानें ती स्त्री परत आणून द्यावी, व तिजबद्दल दिलेली किंमत घेऊन जावी, असा नियम होता. बाबिलोनच्या अमलाखालील कोणत्याही ठिकाणच्या पुरुषांस कोणत्याही ठिकाणच्या बाजारांतून बायका खरीदी करण्याची मोकळीक असे.

एका लग्नाचें वर्णन.

लयार्ड नामक ग्रंथकारानें आपल्या 'निनव्ही आणि बाबिलोन' नांवाच्या पुस्तकांत **निमरूद**नजीक झालेल्या एका लग्नाचें वर्णन केलें आहे. तो ह्मणतो, "सभोंवतीं नृत्यादि उत्सव चालला असतां साक्षीदारांसमक्ष उभयपक्षांचा लग्न करण्या-

विषयीं करार झाला. दुसऱ्या दिवशीं वधूच्या इष्टमित्रांनीं चांगले भपकेदार पोषाक केले, आणि बुरख्यानें नखशिखान्त झांकलेल्या वधूसमागमें वाजत गाजत जाऊन त्यांनीं तिला तिच्या नवऱ्याच्या घरीं पोंचती केली. तेथें गेल्यावर तीन दिवसपर्यंत त्या वधूला एका अंधारकोठडीच्या कोंपऱ्यांत बसवून कोंडून ठेवण्यांत आलें ! ह्या तिन्ही दिवशीं वरगृहीं इष्टमित्रांस मेजवान्या चालू होत्या. त्या आटोपल्यावर नवऱ्यास आपल्या बायकोकडे जाण्याची मोकळीक मिळाली. दोन दिवस घराच्या अंगणांत खंजिऱ्या व पांवे वाजविणाऱ्या, आणि नाचणाऱ्या लोकांनीं अहोरात्र जलशा चालविला होता ! तिसऱ्या दिवशीं कांहीं किरकोळ देणग्या मिळविण्यासाठीं नवऱ्याला त्याच्या इष्टमित्रांनीं गांवांत घरोघर फिरवून आणिलें ! नंतर नाचणाऱ्या लोकांच्या कड्यामध्यें त्यास उभा केला. मग जमलेल्या मंडळींनीं त्याच्या कपाळीं लहानलहान नाणीं लाविलीं. कपाळींचें नाणें खालीं पडलें, ह्मणजे तें घेण्यासाठीं नवऱ्याच्या हनवटीखालीं एक रुमाल धरिला होता. नाणीं गोळा करण्याचा हा प्रकार झाल्यावर कित्येक तरुण पुरुष एकदम मंडळींत येऊन घुसले, व त्यांनीं त्या समुदायांत जे कोणी फार मातबर होते, त्यांना ओढून नेऊन एका अंधारकोठडींत कोंडून घातलें, व त्यांना आपली सुटका करून घेण्यासाठीं कांहीं रकम द्यावयास लाविली. ह्याप्रमाणें जितका पैसा गोळा झाला, तितका सर्व हुंड्याच्या भरतीस घातला. नंतर मेजवानी, रक्तप्राशन, व नाच, हीं कृत्यें करण्यांत येऊन लग्नसोहळा संपविला."

यहूदी लोकांचा लग्नविधि

हा सांगण्यापूर्वी, केवळ मराठी वाचकांसाठीं **यहूदी** लोकांची थोडीशी माहिती सांगणें आवश्यक वाटल्यावरून ती येथें संक्षेपानें देत आहोंत.

ह्या लोकांविषयीं माहिती.

ख्रिस्तीधर्माचा संस्थापक **येशूख्रिस्त** याच्या सांप्रदायाचे जे कित्येक महापुरुष होऊन गेले, त्यांत **जेकब** ह्मणून कोणी एक होता. त्याला **यहूद** या नांवाचा एक मुलगा असे. तो कांहीं काल-पर्यंत **बाबिलोन**च्या कारागृहांत होता. तेथून सुटका झाल्या-वर त्यानें जी शिष्यशाखा जमविली, तिला तिच्या पुरस्कर्त्यांच्या नांवावरून यहूदी असें ह्मणतात. ह्याच लोकांस **हीब्रू** किंवा **इस्रायल** अशा आणखी दोन संज्ञा आहेत, व त्याही त्यांच्या धर्मगुरूंच्या नांवांवरूनच प्राप्त झाल्या आहेत. हे लोक मूळचे आशियांतील **तुर्कस्तानां**त जो **पालिस्ताईन** प्रांत आहे, तेथील रहिवासी होत. परंतु, सार्वजनिक हिंदुस्थानामध्यें हल्लीं ह्या लोकांचाही समावेश झाला आहे. असो. आतां ह्यांच्या लग्नविधीकडे वळूं.

लग्नाचा करार.

यहूदी लोकांत कोणाही स्त्रीपुरुषांमध्यें एकमेकांशीं लग्न लावण्याचा निश्चय झाला, तरी तेवढ्यावरून त्यांचा कायदेशीर लग्न–करार झाला, असें मानीत नाहींत. लग्नाविषयीं उभयतांची संमति व्यक्त होण्यासाठीं कांहीं विधि करावा लागतो. त्याचे दोन प्रकार आहेत. एक '**काशेफ**' व दुसरा '**पतार**.' पहिल्या प्रकारामध्यें नवरा दोन साक्षी-

दारांसमक्ष आपल्या भावी पत्नीला कांहीं रोकड रकम अथवा एखादी मौल्यवान् वस्तु देतो; व ती देतांना 'तूं माझी सहचारिणी हो!' अशा अर्थाचें विधान करितो. दुसऱ्या प्रकारामध्यें नवरा स्त्रीला लग्नलेख लिहून देतो. त्या लेखांत काशेफमध्यें जें विधान तोंडीं करावयाचें, तें लिहून दिलेलें असतें. येवढाच काय तो फरक आहे. हल्लीं बहुतकरून 'काशेफ' हाच प्रकार प्रचारांत आहे. 'षतारा'चा उपयोग क्वचित्‌च करण्यांत येतो. मध्यम कालीं रोकड रकमेच्या ऐवजीं सोन्याची आंगठी देण्याचा प्रघात पडला; व तोच हल्लीं चालू आहे. ही आंगठी स्त्रीपुरुषांच्या अप्रतिम प्रेमाचें व एकनिष्ठ वर्त्तनाचें द्योतक ह्मणून मानिलें जातें. काशेफ व षतार हे दोन्ही प्रकार टॉलमड कायद्यानें मंजूर ठेविले आहेत. तथापि, केवळ ह्या विधीनेंच लग्नाला सांगता येते, असें मात्र तो कायदा सांगत नाहीं. ज्या अर्थीं विवाहसंबंध पवित्र असून त्यापासून मनुष्यांची जीवनयात्रा सुखानें व आनंदानें पार पडते, त्या अर्थीं विवाहप्रसंगीं ईश्वराची स्तुति करण्यांत येते. त्या स्तुतीला 'बरशाथ कि दुसीन' किंवा 'अरुशीन' असें ह्मणतात. वर सांगितलेला लग्नाचा करार झाल्यावर फार तर एक वर्षानें वधूवरांचें लग्न होतें. हा अवधि वधूचा पोषाक व लग्नसंबंधीं इतर तयारी करण्यासाठीं लागतो; व त्यांत वधू आपल्या नातलगांच्या घरीं राहते. तिचा आणि वराचा सदरहू मुदतींत एकांत होत नाहीं.

विवाहाला 'निशीन' असें ह्मणतात. त्याचा अर्थ 'पत्नी करणें' असा आहे. पूर्वी ज्या खोलींत वधूवरें निजावयाचीं, व ज्या खोलीच्या आसपास नानाप्रकारचीं गम्मत व आनंदोत्सव व्हावयाचा, तिला 'छप्पा' असें ह्मणत असत. अलीकडे तें नांव लग्नमंडपाला देतात, व त्यावरून तें लग्नबोधकही आहे.

लग्नविधि.

विवाह बहुतकरून तिसऱ्या प्रहरीं होतो. नेमिलेल्या वेळीं तिसऱ्या प्रहराची प्रार्थना करण्यांत येते; व वधूवरांना आपल्या पूर्वीच्या जीवनक्रमाचा विचार करण्यास सांगतात. ह्मणजे, ते धर्म-

पुस्तक घेऊन त्या मध्यें ज्या भागांत, केलेल्या पापाची क्षमा करण्याबद्दल ईश्वराची प्रार्थना आहे, तो भाग वाचितात. नंतर चार खांबावर एखाद्या रेशमी कापडाची अथवा मश्रूची मंडपी उभारितात. विवाह प्रार्थनामंदिरांत झाला, तर ज्या होर्डींत धर्मपुस्तक ठेविलेलें असेल, तिच्यासमोर मंडपी उभारण्यांत येते; व तो इतर ठिकाणीं झाल्यास ती मंडपी त्या जागेच्या मध्यभागीं उभी करितात. मग वधूवरें, दोन पुरुष व दोन स्त्रियांसह त्या मंडपीखालीं उभीं राहतात. ते स्त्रीपुरुष वधूवरांच्या आप्तांपैकींच कोणी तरी असतात, अथवा त्यांचे प्रत्यक्ष आईबापच असतात. त्यांशिवाय विवाहविधि सांगणारा धर्मोपदेशकही तेथें असतो. ह्या प्रसंगीं वधूनें आपल्या तोंडावरून मर्यादासूचक बुरखा घेतलेला असतो. तीं वधूवरें धर्मोपदेशकासमोर उभीं राहिल्यावर ईश्वराची स्तुति होते. नंतर मुख्य धर्मोपदेशक असतील, ते 'हीब्रू' भाषेंत त्या नवीन जोडप्याला त्यांचा पवित्र संबंध व त्यापासून उत्पन्न होणाऱ्या जबाबदाऱ्या यांविषयीं व्याख्यान देतात. नंतर ते आपल्या हातांत दारूचा पेला घेऊन ज्याच्या पवित्र आज्ञेमुळें पातिव्रत्य पाळिलें जातें, त्या परमेश्वराची प्रार्थना करून तें पेय वधूवरांस पिण्यास देतात. हा मद्यपानविधि आटोपला, म्हणजे नवरा सर्व मंडळीसमक्ष आणि विशेषेंकरून नेमिलेल्या दोन साक्षीदारांसमक्ष एक सोन्याची आंगठी नवरीच्या बोटांत घालितो. ती घालण्यापूर्वीं त्यास एक विधान करावें लागतें. त्याचा मतलब, "**मोझेस** व **इस्रायल** यांच्या कायद्याअन्वयें ह्या आंगठीनें मी तुझें पाणिग्रहण करितों" असा आहे.

केतुबाचें वाचन.

हें झाल्यावर लग्नसंबंधीं झालेला करार, ज्याला '**केतुबा**' असें ह्मणतात, तो वाचून दाखविला जातो. तो केतुबा पुढील आशयाचा असतो "**अ** हा **ब**शीं कायदेशीर विवाह करतो; व तो **ब**चें पालन करणें, तिला योग्य मान देणें, तिच्यावर प्रीति करणें, व धर्मांत सांगितलेलीं नवऱ्याचीं इतर सर्व कर्त्तव्यकर्मे करणें, ह्या गोष्टींला तयार आहे." हा केतुबा तयार करून लग्नसमयीं सर्वांसमक्ष वाचून दाखवि-

ण्याचा रिवाज प्राचीनकालापासून आहे. तसेंच, त्यांत वर सांगितलेल्या लग्नसंबंधीं मजकुराशिवाय कांहीं निरनिराळ्या गोष्टी, व कायदेशीर अटीही नमूद करण्यांत येतात. स्त्री विधवा झाली, किंवा तिच्याशीं काडी मोडून देण्याचा प्रसंग आला, तर त्या अटींच्या योगानें तिचा बचाव होतो. हल्लींचें लग्न, हा जर तिचा पुनर्विवाह असेल, तर तिला ह्या पुनर्विवाहाच्या नवऱ्यानें कमींत कमी शंभर दिनार, आणि जर हा तिचा पहिलाच विवाह असेल, तर किमानपक्ष दोनशें दिनार लिहून द्यावे लागतात. तथापि, ही रकम ज्याच्या त्याच्या ऐपतीप्रमाणें कमजास्त लिहून देण्यांत येते. सांप्रत ह्या लग्नाच्या दस्तऐवजांत नवऱ्याचीं कर्त्तव्यें, त्यास नवरीनें दिलेला हुंडा, वगैरे बाबतींचाही उल्लेख येऊं लागला आहे; हा केतुबा 'अरमीनियन' भाषेंत लिहिला जातो; व त्यावर दोन साक्षीदारांच्या सह्या असतात.

सप्ताशीर्वचनें व लग्नसमाप्ति.

केतुबाचें वाचन झाल्यावर मुख्य धर्मोपदेशक वधूवरांस सप्ताशीर्वचनें (Seven Blessings) देतो. तीं देतांना प्रथमतः ज्या **प्रभूनें** आपलें वैभव प्रगट करण्याकरितां जगांतील सर्व प्रकारच्या वस्तू निर्माण केल्या, ज्यानें मनुष्यास आपल्यासारखा बनवून त्याचा आत्मा नित्य केला, त्या सर्वशक्तिमान् **प्रभूची** प्रार्थना होते. नंतर, वधूवरें सुखानें नांदोत, **ईडनच्या** बागांत त्यांच्या पूर्वजांना जसें सुखी केलें तसें ह्यांनाही करावें, **इस्रायल** लोकांचें जें मूळस्थान **झायन** त्याची पूर्ववत् भरभराट होऊन त्यांतील लोक तेथें पुन्हां आनंदानें वास करोत, इत्यादि प्रार्थना झाल्यावर शेवटीं वर्तमान आणि भावी सुखासंबंधानें परमेश्वराजवळ प्रार्थना करितात. ह्याप्रमाणें प्रार्थनाविधि उरकल्यावर पुन्हां वधूवरांस दारूचा पेला देतात, ह्मणजे लग्नविधि आटोपला. मंडपांतून निघतांना जमिनीवर एक कांचेचा पेला ठेविलेला असतो, तो वरानें लात मारून फोडावा, अशी एक रूढि पडलेली आहे. तिचा उद्देश, आपल्या अतिशय सुखाच्या व आनंदाच्या वेळींही हें जग क्षणभंगुर आहे, अशी जागृति आणण्याचा दिसतो. वरानें पेला जसा कांहींएक श्रम न लागतां सहज

फोडून टाकिला, त्याप्रमाणें ईश्वर मनुष्याचा वाटेल तेव्हां सहज नाश करूं शकतो. ह्मणून, मनुष्यांनीं ह्या जगाच्या मायेला भुलून न जातां, सावध राहून परिणामावर लक्ष ठेवून ईश्वराचें आराधन करीत असावें, असा ह्या रूढीचा मथितार्थ आहे. यानंतर सर्व मंडळी 'मोझेल टूर!' ह्मणजे दोघांचा झालेला संबंध सुखदायक होवो! असा वधूवरांस आशीर्वाद देतात.

अभिनंदन व मेजवानी.

वरील कृत्य आटोपल्यानंतर वधूवरांना त्यांचे इष्टमित्र त्या मंगल प्रसंगासंबंधानें आनंद प्रदर्शित करितात. मग त्यांना मेजवानी देण्यांत येते. त्यावेळींही वर सांगितलेल्या प्रार्थना करितात. त्याचें कारण इतकेंच कीं, मेजवानीमध्यें कोणीही उच्छृंखल होऊन खानपानाचा अतिरेक करूं नये! आपल्या कृत्यांस ईश्वर साक्षीभूत आहे, असें समजून सर्वांनीं आपलें वर्तन गंभीरपणाचें ठेवावें!

सीरियाच्या ख्रिस्तीलोकांची लग्नरीति.

सीरिया व तद्देशीय लोक ह्यां विषयीं.

सीरिया हा आशियांतील **तुर्कस्तान**चाच एक प्रांत असून तो आशियामायनरच्या दक्षिणेस व **पालिस्ताईन** प्रांताच्या उत्तरेस आहे. हे दोन्ही प्रांत ह्मणजे ख्रिस्ती धर्माचीं उत्पत्तिस्थानेंच होत. पैकीं पालिस्ताईनमध्यें तर **श्रीयेशू**चा अवतारच झाला. ह्या दोन्ही प्रांतांत पूर्वी **यहुदी** लोक राहत असत; व त्यांनाच ख्रिस्तीधर्माच्या दीक्षेचा अवल लाभ मिळाला. हल्लीं हे लोक सर्वत्र पांगले आहेत. सीरियांतील महात्मा **टॉमस** ह्याच्या सांप्रदायाचे कित्येक ख्रिस्ती तर हिंदुस्थानांतही आहेत. त्यांनीं इकडे येऊन प्रथमतः **त्रावणकोरां**त वास्तव्य केलें असें ह्मणतात. सीरियांतील ख्रिस्ती, रोमनक्याथोलिक मताचे आहेत असें समजतें. त्यांच्या लग्नासंबंधीं आह्मांस जी माहिती उपलब्ध झाली, ती ह्याखालीं देत आहोंत:—

विवाहकाल, सोयरीक जमविण्याची रीति व हुंडा.

ह्या लोकांत मुलाचा विवाहकाल बारापासून अठरा वर्षांच्या वयापर्यंत व मुलीचा बारा वर्षांच्या वयापर्यंत मानिलेला आहे. सोयरीकसंबंध आईबापांकडून जमविण्यांत येतो. प्रथमतः मुलीचा बाप मुलाच्या बापास, त्याच्या मुलाचें आपल्या मुलीशीं लग्न लावण्याविषयीं विनंति करितो. त्या उभयतांचा संबंध इष्टपरिणामक होईल किंवा कसें, याबद्दल आधीं अनुमान काढण्यांत येतें. त्यासाठीं वधूवरांच्या जन्मपत्रिका धर्मगुरूकडे घेऊन जातात. त्यांजपाशीं

ग्रहांची फलश्रुति सांगण्याकरितां '**दैवग्रंथ**' म्हणून एक पुस्तक असतें. त्याच्या आधारें ते वधूवरांची वयें आणि जन्मपत्रिका पाहून त्यावरून त्यांचा संबंध कसा काय होईल हें वर्तवितात. अर्थात् तो इष्टपरिणामक असण्याचें भाकित झालें, तरच वराचा बाप वधूच्या बापाची विनंति मान्य करितो. ती विनंति मान्य झाल्यावर लग्नतिथि आणि हुंड्याची रकम ठरविण्या-करितां दोन्ही पक्ष वधूच्या घरीं एकत्र जमतात. हुंडा, जमीन दागिने किंवा रोकड रकम ह्यांतून कोणत्याही एका स्वरूपानें देण्याची चाल आहे; पण सामान्यतः तो रोकड रकमेनेंच देतात. लग्नाच्या पूर्वी आठ दिवस मुलीचा बाप कांहीं मंडळीसोबत हुंड्याची तोंडबंद थैली मुलाच्या बापाकडे पाठवितो. ती तशीच घेण्यांत येते. नंतर मागून तिचें तोंड उघडून आंतील रकम मोजून पाहतात. ती ठरल्याप्रमाणें बरोबर असली, तर ठीकच आहे. पण जर कमी भरली, तर मुलाचा बाप मुलाला लग्नासाठीं देवळांत पाठवीत नाहीं.

लग्नाची जाहिरात, लग्नदिवस, क्रूसबंधन, वधूप्रवेश व प्रथम दिवशींचे सोहळे.

लग्नापूर्वी आठ दिवस लग्नसंबंधीं जाहिरात देवळांत एकवेळां प्रसिद्ध केली जाते. विवाह **रविवारीं** होतो. इतर दिवशीं किंवा उपवासाच्या दिवशीं तो होत नाहीं. लग्नाच्यापूर्वी कांहीं वेळ वधूवरांनीं देवळांत जाऊन प्रार्थना केली पाहिजे, असा नियम आहे. तो मोडिल्यास त्याबद्दल त्यांना दंड द्यावा लागतो. वधूवरें चांगलीं वस्त्राभरणें घालून देवळांत एक-मेकांसमागमें प्रवेश करितात. नंतर सोन्याच्या सुतांत किंवा तारेंत एक लहानशी 'क्रॉस'ची आकृति † अटकविलेली असते. ती मंगलसूत्राप्रमाणें नवरा नवरीच्या गळ्यांत बांधितो. लग्नदिवशीं सर्व विधि आटोपेपर्यंत उभ-यतां वधूवरांस उपवास करावा लागतो. प्रार्थनेच्या वेळीं वधूवरांखेरीज बाकीची सर्व मंडळी उभी राहते. लग्नविधि संपल्यावर त्या जोडप्यास देवळांतल्यादेवळांतच कांहीं उपहाराचें देतात. पण तें कोणीही खात नाहींत. कदाचित् खाल्लेंच तर थोडें खातात। मंदिरांतून परत आल्यावर 'भातपाणी' नांवाचा सोहळा झाल्याखेरीज वधूवरें घरांत प्रवेश करीत नाहींत. तीं

घराच्या दरवाजासमोर येऊन उभीं राहिलीं, ह्मणजे कोणी नातेवाईक स्त्री घरांतून आपल्या डाव्या हातांत दिवा, व उजव्या हातांत एक पात्र घेऊन येते. त्या पात्रांत तांदळाचें पीठ पाण्यांत कालवून त्यांचें मिश्रण घातलेलें असतें. ती स्त्री वधूवरांच्या कपाळीं त्या पिठाचे टिळे लाविते, व तीं उभयतां त्या स्त्रीस नमन करितात. हा सोहळा केल्यावांचून नवरानवरी घरांत गेल्यास तीं दरिद्री होतात, अशी समजूत आहे! असो. नंतर जमलेल्या स्त्रीपुरुषांच्या जयघोषांत त्या वधूवरांचा गृहप्रवेश होतो. घरांत त्यांना बसण्यासाठीं तांदळाच्या पिठाच्या चित्रविचित्र आकृतींनीं शोभिवंत केलेलें एक आसन ठेविलेलें असतें. त्या आसनाच्या आसपासही त्याच पिठाच्या आकृती मांडिलेल्या असतात. नवरानवरी त्या आसनावर विराजमान झालीं, ह्मणजे जमलेल्या मंडळीस मोठ्या समारंभानें मेजवानी देण्यांत येते. पुरुषांचीं जेवणीं झाल्यावर घरांत स्त्रियांची पंगत बसते. ह्या लोकांत सदरहू मेजवानीस बसण्यापूर्वी पानसुपारी व तमाखू खाण्याची चाल आहे; व ती कांहीं विलक्षणच आहे. एक मनुष्य एका टोपलींत पानें, सुपारी, तमाखू वगैरे घालून ती टोपली घेऊन मंडपांत उभा राहतो, व ती मंडळींस देण्याची तीन वेळ परवानगी मागतो. ती मिळाल्यावर तो ती टोपली मंडळींतील प्रमुख मनुष्याच्या पुढें ठेवितो. मग सर्व मंडळी पानसुपारी खाऊन बाहेर येतात, व तोंडहात धुवून फिरून घरांत जाऊन आपापल्या दर्जाप्रमाणें जागेवरून बसतात. सर्व मंडळी बसल्यावर त्यांच्या पुढें केळीचीं पानें मांडून त्यांवर मीठ, भाज्या, भात व इतर पक्वान्नें वाढितात. नंतर ताक वाढण्यांत येतें. ज्याचें जेवण आटोपेल, तो तद्दर्शक खूण ह्मणून आपली मूठ वळून बसतो. ह्याप्रमाणें सर्वांनीं आपापल्या मुठी बंद केल्या, ह्मणजे सर्वांचें झालें काय? ह्मणून विचारितात. नंतर सर्वजण उठून हात तोंड धुवून फिरून पानसुपारी खाऊन मग आपापल्या घरीं जातात. ह्याप्रमाणें सर्वांचीं जेवणीं झाल्यावर मागून वधूवरें जेवावयास बसतात!

लग्नाच्या दुसऱ्या दिवशीं रात्रौ उभयपक्षांची लहानथोर स्त्रीपुरुषमंडळी उंची वस्त्रालंकारांनीं मनोहर शृंगार करून एकत्र जमतात; व नृत्यगीतांनीं मनोरंजन करितात. पुरुष नाचतात, व स्त्रिया नानाप्रकारचीं गाणीं गातात. नंतर नवीन जोडप्यास मंडपाच्या मध्यभागीं बसवून कन्येचा बाप आपल्या जांवयास, त्याच्या आईस, आजीस, बापास आणि चुलत्यास पोषाक देतो. ते दिल्यावर प्रत्येकजण वरास आलिंगन देतो; व संभावित पुरुष आणि स्त्रिया वधूस आलिंगनें देतात! नंतर फिरून नृत्यगीतादि करमणुकींत अवशिष्ट असलेली रात्र घालवून सूर्योदयाला सर्व मंडळी घरोघर जाते. ह्या प्रसंगीं कन्यापक्षाकडून सर्वत्रांस 'छुमती' नांवाची मिठाई वांटण्यांत येते.

दुसऱ्या दिवशींचे सोहळे.

तिसऱ्या दिवशीं सायंकाळीं पुन्हां सर्व मंडळी एकत्र जमते; व आदल्यादिवसाप्रमाणेंच करमणुकीचे प्रकार होतात. ह्या दिवशीं वधूची कोणी नातलग स्त्री वराची हंगामी सासू बनते! व तिच्याकडे वराच्या स्नानपानाची बरदास्त ठेवणें, आणि वधूवरांच्या शयनमंदिराची व्यवस्था ठेवणें, हीं कामें सोंपण्यांत येतात.

तिसऱ्या दिवशींचे सोहळे.

चवथ्या दिवशीं रात्रीं, जी हंगामी सासू असते, ती वधूवरांच्या खोलीच्या दाराशीं जाऊन उभी राहते, आणि मोठ्या काकुळतीस येऊन दरवाजा उघडाहो! असें ह्मणते. ह्यावेळीं खोलींत बरीच खुषमस्करी मंडळी जमलेली असून त्यांनीं तो दरवाजा मुद्दाम बंद केलेला असतो. तो उघडण्याबद्दल हंगामी सासू जों जों विनवण्या करिते, तों तों आंतील मंडळी तिच्याकडून नानाप्रकारचीं वचनें घेतात. ती तितकींही देते. अखेरीस दार ठोठावून ह्मणते, "माझ्या बाळा! माझे लाडके! दार उघडा बरं! मी तुह्मांला दूध खायला गाय देईन, वासरूं देईन, मुलांच्या भाताकरितां पितळेचें भांडें देईन, तुह्मांला हात धुण्याला तस्त देईन; पण दार तर उघडा!" ह्याप्रमाणें बराच विनोद होऊन जांवई खुष झाले, ह्मणजे ते दार उघडण्याला परवानगी देतात. अशा रीतीनें लग्नानंतर बरेच दिवसपर्यंत तमाशे, खेळ, नाटकें, वगैरे मनोरंजनाचे विविध प्रकार झाल्यावर लग्नसोहळा संपतो!

चवथ्या दिवशींचे सोहळे व लग्नसमाप्ति.

अर्मीनियांतील लोकांची लग्नरीति.

अर्मीनियांतील लग्नरीति.

अर्मीनिया हाही आशियांतील **तुर्कस्तान**चाच एक भाग आहे. परंतु, तो **रूस**च्या बादशहानें तुर्कस्तानच्या सुलतानापासून जिंकून घेतल्यानें हल्लीं रूसच्या ताब्यांत आहे. हा प्रांत तुर्कस्तानच्या ईशान्य कोणांत आहे. एतद्देशीय लोकांत लग्नदिवशीं रात्रीं वधू आपल्या इष्टमित्रपरिवारासह मोठ्या समारंभानें वरगृहीं येते. तेथें आल्यावर तिला स्त्रियांनीं गजबजलेल्या एका खोलींत नेऊन घालितात. दुसऱ्या खोलींत वर आणि पुरुष मंडळी बसलेली असते. वधू आल्यानंतर वरगृहीं भेजवानीचा थाट उडतो. तत्पश्चात् वराशिवाय इतर सर्व मंडळी वधूस भेटून तिचें अभिनंदन करितात. पण, ती कांहीं उलट उत्तरानें त्यांचे आभार मानीत नाहीं. कारण, तिनें तसें केलें, तर ती असभ्य अथवा उद्धट आहे, असें समजलें जातें! असो. अभिनंदन करून मंडळी निघून गेली, ह्मणजे वरपक्षाच्या स्त्रिया वधूला शय्यागृहांत दाखल करितात. तेथें ती आपला बुरखा काढून घेते. मग वर तेथें येतो, आणि वधूवरांचें प्रथम दर्शन होतें. लागलीच वधू आपली कर्तव्यदक्षता दर्शविण्यासाठीं मद्यानें एक पेला भरून तो वरास देते; व नंतर आपणही एक ग्रहण करिते. पुढें तीं नवविवाहित स्त्रीपुरुषें ऐषआरामांत निमग्न होतात. त्यांच्या शय्यागृहानजीकच्या दालनांत गाणारे गुणिजन बसलेले असतात. ते वराची सूचना होतांच संगीत सुरू करितात. अर्थात् हें गायन शृंगारपरिप्लुत असून तें कामदेवाच्या सन्मानार्थ, व त्या नवदंपत्याच्या उत्तेजनार्थ गायिलें जातें!

तुर्क लोकांचा लग्नसोहळा.

कन्यानिरीक्षण व सोयरीक जमविण्याची रीति.

तुर्क लोकांचें राज्य आशियांत तसें यूरोपांतही आहे; व दोन्ही खंडांतील तुर्कांचे लग्नासंबंधीं रीतिरिवाज पुष्कळ अंशीं एक सारखेच असतात. मुलगी उपवर झाली, ह्मणजे ती आणि तिचीं मातापितरें कमजास्त योग्यतेच्या वरांकडून मागणें घालण्यासाठीं येणाऱ्या मध्यस्थ स्त्रियांची मोठया उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करूं लागतात. ह्यासमयीं कन्यापिता आपलें घर स्वच्छ झाडून नानाप्रकारच्या रंगी बेरंगी फुलांनीं शोभिवंत करून ठेवितो. जमिनिवरील बिछायती काढून त्या साफ व सुगंधित करून पुन्हां अंथरितो, व पेय बनविण्यासाठीं उत्तम प्रकारचा बुंद अगदीं तयार ठेवितो. उपवर कन्या आपल्याला फारच खुलणारीं व सपोत अशीं वस्त्रें परिधान करिते, आपल्या हातापायांचीं नखें मेहेंदीनें लाल भडक रंगविते, व डोळ्यांत सुरमा घालिते. ज्यांचा मुलगा तारुण्यांत आला आहे, अशीं मातापितरें उपवर मुलीच्या शोधांत असतात, व तींच आपल्या मुलासाठीं नवरी पाहून पसंत करितात. प्रथमतः वराची आई वर सांगितल्याप्रमाणें मार्गप्रतीक्षा करणाऱ्या उपवर मुलीच्या घरीं आपल्या मैत्रिणी व लग्न जुळविणाऱ्या मध्यस्थ स्त्रीसहवर्तमान जाते. ह्या स्त्रीस 'कौलवौं' (Koulavouz) अशी संज्ञा आहे. हें वरमातेचें उपवर कन्येच्या घरीं जाणें केवळ औपचारिक असतें, आणि त्याचा मुख्य उद्देश, कन्या कशी आहे, व तिचीं मातापितरें योग्यतेनें व संपत्तीनें आपल्या बरोबरीचीं आहेत किंवा नाहींत,

तें पाहण्याचा असतो. लग्नासंबंधीं बाटाघाट करण्यांत, लग्न जमवून देण्यांत, तें नक्की करण्यांत, आणि तत्संबंधीं सर्व सोहळ्यांत कौलवौ हाजर असते. ह्या कृत्यांत हाजर असणें हा तिचा धंदाच होय; व तिच्या धंद्यावरून ती स्त्री तेव्हांच ओळखितां येते. कन्येच्या जनान्यांत जाण्यापूर्वी वरमातेकडून ह्या कौलवौमार्फत सूचना पाठविण्यांत येते. वरपक्षाच्या स्त्रिया आंत येतांच वधूपक्षाच्या स्त्रिया त्यांचें आगतस्वागत करितात. त्यांना योग्यस्थळीं बसविल्यावर कुटुंबांतील सर्वांत वडील अविवाहित मुलगी असेल, ती एका तबकांत सुवासिक बुंदानें भरलेले पेले घेऊन येते; ते आलेल्या स्त्रियांस अदबीनें देते, त्यांच्या हातांचीं चुंबनें घेते, व त्या बुंद पिईतोंपर्यंत मुकाट्यानें खालीं पहात उभी राहते. त्या स्त्रिया तें स्वादिष्ट पेय लवकरच प्राशन करितात. कारण, तसें न करणें, हें तुर्क लोकांच्या शिष्टाचाराविरुद्ध समजलें जातें. सर्वांनीं बुंद पिऊन पेले रिकामे केल्यावर ते घेऊन उपवर मुलगी घरांत परत जाते, आणि नंतर त्या स्त्रिया आहेत तोंपर्यंत ती फिरून त्या स्थळीं येत नाहीं. ह्याप्रमाणें नवऱ्यामुलाची आई चार चौघी उपवर कन्यांच्या कुटुंबांत फिरून आल्यावर प्रत्येक ठिकाणची व तेथील मुलींची यथातथ्य हकीकत आपल्या नवऱ्यास व मुलास सांगते. नंतर ते आईबाप आणि मुलगा ह्या त्रिवर्गांत कोणती मुलगी सर्वांत पसंत आहे ह्याबद्दलचा निर्णय होतो. मग जी मुलगी त्रिवर्गाच्या मतें पसंत ठरेल, तिच्या घरीं कौलवौस पाठवितात; व तिजमार्फत ती मुलगी आमच्या मुलास देता काय? असें कन्यापक्षास विचारितात. तसेंच ते मुलगी देण्यास कबूल असले, तर लग्नासंबंधीं अगाऊ ठरविण्याच्या सर्व बाबती जमल्यास नक्कीच करून येण्याविषयीं त्या कौलवौस सांगतात.

लग्नापूर्वी सोयरीक जमविण्यासंबंधानें उभयपक्षांत जें बोलणें चालणें होतें, त्यास **निकाह** (*Nekyah*) असें ह्मणतात; व त्यावरून तें ज्या मुदतीपर्यंत चालू असतें, त्या मुदतीलाही निकाह अशीच संज्ञा पडली आहे. परंतु, ही बरोबर असेल असें

निकाह, हुंडा, आणि स्त्रीधन.

वाटत नाहीं. असो. निकाहानें सोयरीक जमविल्यावर नवऱ्यानें नवरीस हुंडा द्यावा लागतो. मग तो कोणत्याही रूपानें असो. तसेंच सासरीं येतांना नवरीला आपल्याबरोबर आपलीं सर्व मौल्यवान् वस्त्रप्रावरणें, दागदागिने, आणि इतर संसारोपयोगी वस्तू आणाव्या लागतात. तथापि, त्या सर्वांवर तिचें पूर्ण स्वामित्व असतें.

दुहून, व नजर नजराणे.

लग्नदिवसास आणि लग्नसमारंभाच्या एकंदर मुदतीस **दुहून** (*Duhun*) असें ह्मणतात. दुहूनच्या पूर्वी आठ दिवस नवरा आपल्या आईबरोबर नवरीकडे कांहीं देणग्या पाठवितो. ह्या देणग्यांत नवरीनें लग्नसमयीं घालण्याचा एक पोपाक असतो, किरमिजी रंगाचें रेशमी वस्त्र असतें (यावर नवरी लग्नसमयीं गुडघे टेंकून आपल्या सासूबाईचें स्वागत करिते.), तसेंच मुख्य पोषाकाच्या आंतून घालण्याचे कांहीं जिन्नसवार कपडे, व मेवामिठाईची एक थैली असते. ह्या मेवामिठाईचा अर्धा हिस्सा नवरी नवऱ्याकडे परत पाठविते; व तेणेंकरून त्यास असें सुचविते कीं, लग्नानंतर मी सदैव आपल्या आज्ञेंत वागून आपणांस ह्या मिठाईइतकीच गोड होईन!

वधूची संमति घेणें.

लग्नापूर्वी लग्न करण्यासंबंधानें तुर्क नवरीची, उपचारार्थ कां होईना? पण संमति ही अवश्यमेव घ्यावी लागते; व ती जोंपर्यंत तिनें दिली नाहीं, आणि मुख्य धर्मगुरूला त्यासंबंधानें आपली खुषी त्रिवार व्यक्त केली नाहीं, तोंपर्यंत तिच्या लग्नासंबंधीं करण्यांत आलेला कोणताही ठराव तिला बंधनकारक नसतो.

लग्नांतील खर्चवेंच.

खरा लग्नसोहळा आठ दिवसपर्यंत चालतो. इतर पौर्वात्य लोकांप्रमाणें तुर्कही आपल्या मुलांच्या लग्नकार्यांत अतोनात खर्च करितात; व तितका खर्च न करणें, हें त्यांच्यांत शिष्टाचाराविरुद्ध समजलें जातें. सबब, अब्रूखातर आईबापांस ऐपतीबाहेर खर्च करावा लागतो, व त्यामुळें तीं हयात आहेत तोंपर्यंत त्यांच्या

गळ्यांत कर्जाचें लोढणें पडतें! ज्याप्रमाणें एखादा चिनी गृहस्थ आपला अंत्यविधि श्रीमंती थाटाचा व्हावा म्हणून सारा जन्मभर धडपड करून द्रव्यसंग्रह करून ठेवितो, त्याप्रमाणें तुर्क मनुष्य आपल्या मुलीचें लग्न टोलेजंग करण्याकरितां द्रव्याचा हव्यास करीत असतो.

दुहूनचा प्रारंभ व सोमवारचीं कृत्यें.

दुहूनचा आरंभ हमेषा **सोमवारीं** प्रातःकाळीं करण्यांत येतो; आणि बहुधा **रविवाराच्या** समाप्तीबरोबर त्याचीही समाप्ति होते. त्यांतील पहिलें कृत्य म्हटलें, म्हणजे नवरीनें आपलीं वस्त्र-प्रावरणें नवऱ्याच्या घरीं पाठविणें हें होय. हीं वस्त्रें नवरीच्या मैत्रिणी व भ्रमरासारखी सर्वत्र परिभ्रमण करणारी कौलवौ ह्यांच्या सोबत मजूरांजवळ देऊन वरगृहीं पाठविण्याची चाल आहे. मजूरांनीं वस्त्रांचीं वासनें तेथें नेऊन उतरिलीं, म्हणजे वधूच्या मैत्रिणी व कौलवौ तीं वरमातेला सोंपून देतात. मग वरमाता त्या स्त्रियांस यथेच्छ मेवामिठाई खाऊं घालून शरबतें व बुंद पाजिते; आणि नंतर नवरीसाठीं शृंगारून ठेविलेल्या खोल्या त्यांस स्वस्थतेनें पाहण्यास सांगते. मग ह्या स्त्रिया त्या खोल्यांत आपल्या अभिरुचीप्रमाणें कमजास्त व्यवस्था करून त्यांस विशेष शोभा आणण्याचा प्रयत्न करितात. त्या बहुतकरून सोमवारची सर्व अहोरात्र तो नवरीचा जनानखाना आणि विशेषतः तिचें शय्यागृह सजविण्यामध्यें घालवितात! त्या भिंतीवर नकली फुलांच्या माळा टांगितात, व नवरीच्या शाली, झगे, लोंकरीच्या अस्तरांचे कपडे, गळपट्टे, कवजे, व जाळीचीं कशिद्याचीं आणि कलाबतूचीं शेंकडों उंचीं वस्त्रप्रावरणें, ह्यांचें जणूंकाय एक प्रदर्शनच मांडून ठेवितात! त्यांतूनही त्या आपली बहुतेक वेळ आणि अभिरुचि विशेषतः नवरीच्या जनान्यांतील एक कोंपरा शृंगारण्यांत खर्च करितात. त्या तेथील भिंतींवरून रेशमी पडदे, व गोंडे लावितात, वर कागदांच्या नकली फुलांची एक चांदणी देतात. कांचेच्या करंड्यांतून नवरीचे डागदागिने मांडून ठेवितात, तसेंच जमिनीवर अतिशय मऊ व भपकेदार असे रुजामे, गालिचे व तकिये वगैरे

मांडून बैठक तयार करितात. सारांश, प्रत्येक मौल्यवान् व चमत्कारिक वस्तूच्या व्यवस्थित मांडणीनें ती जागा शृंगारण्याच्या कामीं त्या स्त्रिया आपली पराकाष्ठा करून सोडितात! याप्रमाणें सजविलेल्या ह्या जागेस **वधू-मंडप** अशा अर्थाची संज्ञा देण्यांत येते.

मंगळवारचें कृत्य.

मंगळवारीं नवरीचें मंगलस्नान होतें. हा सोहळा मोठा लांबलचक व पुष्कळ खर्चाचा असतो; व तो नवरीचा उपभोग नसून केवळ एक भोग आहे असें ह्मटलें असतां अधिक शोभेल! त्यासंबंधीं सर्व खर्च वरपक्षाकडून करण्यांत येतो.

बुधवारचीं कृत्यें.

बुधवारच्या दिवशीं वरमाता कित्येक स्त्रियांसह वधूला भेटण्यास जाते. त्या सर्वांचा कन्यापक्षाच्या स्त्रियांकडून वर सांगितल्याप्रमाणेंच सत्कार होतो. नंतर वधूकडील स्त्रिया त्यांस फराळ घालून बुंद पाजितात. पण ह्या वेळचा बुंद नेहमींच्या रिवाजाप्रमाणें फिका न करितां मीठा करितात. खानपान झाल्यावर पहिल्या लग्नाच्या दोन स्त्रिया नवरीला वरपक्षाच्या बायकांत घेऊन येतात. नंतर सासूबाई आपल्या भावी सूनबाईचें चुंबन घेतात, व तें घेत असतां दोघीही आपापल्या तोंडांतील अर्धचर्वित खडीसाकरेचे खडे परस्परांच्या तोंडांत सोडितात. हें कृत्य सासू आणि सून पुढें हमेषा अशाच एकदिलानें वागतील, व त्यांस आपापलें आयुष्य मोठें मधुर वाटेल, असें सुचविण्याच्या उद्देशानें करण्यांत येतें. परंतु, हा सर्व केवळ बाह्योपचार होय! त्यानें आमच्या महाकवीचें **'न खलु बहिरुपाधीन्प्रीतयः संश्रयन्ते ।'** हें अनुभवसिद्ध वचन कधींही अन्यथा व्हावयाचें नाहीं. निदान, सासवासुनांच्या संबंधांत तर तें अन्यथा होण्याची शंकासुद्धां घ्यावयास नको! कारण, त्यांच्यांत कितपत प्रेमभाव असतो, तो जगजाहीर होऊन चुकला आहे! असो. वर सांगितल्याप्रमाणें भावी सासूसुनांनीं एकीमेकींस मृगजलासारखें निर्मल आणि उज्ज्वल प्रेम व्यक्त केल्यावर नवरीकडील कोणी बायका नवरीस घरांत घेऊन जातात, आणि वरमाताप्रभृति इतर सर्व स्त्रिया दिवाणखा-

न्यांत आणखी बुंद व धूम्रपान करीत व मनसोक्त गप्पा मारीत बसतात. कांहीं वेळानें वरमाता आपल्या सहचरींसहवर्तमान परत घरीं जाण्यास निघते. त्याप्रसंगीं नवरी घराच्या प्रवेशद्वारापाशीं येऊन त्या स्त्रियांस पुनः भेटते; व त्या स्त्रिया तिजवर नाणीं उधळितात. तीं नाणीं वेंचून घेण्यासाठीं रस्त्यांतील भिकाऱ्यांची झुंड लोटून त्यांची आपआपसांत एकच झोंबा-झोंबी चालते!

केना, व केना-रात्रींचे विलास.

बुधवारच्या रात्रीं आणि गुरुवार उजेडतां केना करण्यांत येतो. केना ह्मणजे नवरीच्या हातापायांस मेहेंदी लावण्याचा सोहळा. ह्या सोहळ्याच्या नांवावरून तो ज्या रात्रीं करण्यांत येतो, त्या रात्रीलाही 'केनारात' असें ह्मणण्याचा परिपाठ पडला आहे. ह्या रात्रींस नवरी आणि तिच्या मैत्रिणी नानातऱ्हेचे भपकेदार पोषाक करून आणि हातीं मेणबत्यांचे दिवे घेऊन बागेंतून बागडत फिरतात. बगीचा तुर्कस्तानांतील परोपरीच्या पुष्पपरिमलानें जिकडे तिकडे सुगंधित झालेला असतो, व त्यांत विहार करणाऱ्या तरुणींसह मेणबत्त्यांचा मंद प्रकाश इकडून तिकडे झळकत असतो. मधून मधून कर्णमनोहर असें संगीत—अर्थात् वाद्य, नृत्य, आणि गीत—चालू असतें, आणि शरबतें व मेवामिठाईच्या भारानें लादलेलीं तबकें हातीं घेऊन दासीजन आपल्या तरुण यजमानिणींच्या सेवेंत सर्वत्र हाजर असतात. ह्याप्रमाणें ही 'केनारात' मन-सोक्त उपभोगांत घालवून प्रातःकालच्या सुमारास ती उपवर कन्या अगदीं बारिक वस्त्रें परिधान करून कांहीं सहचरींबरोबर एका खोलींत येते. तेथें तिची सासू तिची वाट पहात बसलेलीच असते. ती सूनबाईच्या हाता-पायांस दाट मेहेंदी लाविते. ती मेहेंदी सुकेपर्यंत नवरीला एखाद्या शय्येवर आराम घेण्यास सांगतात; व ह्यासमयीं तिची करमणूक करण्यासाठीं एक अवर्णनीय नृत्य करविण्यांत येतें. त्यांतील शृंगारिक अंगविक्षेप आणि मैत्रि-णींचीं नानाविध विनोदसंभाषणें हीं नवरीच्या मनांत कामोद्दीपन कर-णारीं असतात!

गुरुवारचीं कृत्यें, लग्नसोहळा, आणि त्याची समाप्ति.

गुरुवारीं सकाळीं नवरी आपल्या नवऱ्याच्या घरीं जावयाची असते. ती तिकडे जावयास निघण्यापूर्वीं तिचा बाप तिच्या खोलीमध्यें येतो. ती त्याच्या हातांचें व पायांचें चुंबन घेते, आणि तो तिच्या कमरेस एक शोभिवंत कमरबंद बांधितो. ह्या प्रसंगीं तीं दोघेंही गहिंवरून येतात; बाप मुलीला पोटाशीं धरितो, आणि कमळपत्रावरून निर्मल दंवाचे बिंदू जसे खळाखळ ओघळून पडावे, त्याप्रमाणें त्या उभयतांच्या नेत्रांतून शुद्ध प्रेमाश्रू वाहूं लागतात. पृथ्वीच्या पाठीवर कोठेंही जा, मानवी अंतःकरण हें सर्वदा सारखेंच असावयाचें! व त्याप्रमाणें तें तुर्कस्तानांतही आहेच. असो. ह्याप्रमाणें कन्या व पिता ह्यांची भेट झाल्यावर नवरीला मोठ्या थाटानें मिरवीत मिरवीत तिच्या सासरीं नेऊन पोहोंचवितात. परंतु, तेथें नवरा सायंकाळीं मशीदींतून परत येईपर्यंत त्याची व तिची भेट होत नाहीं. तो मशीदींतून आला, ह्मणजे कौलवी त्यास नवरीच्या खोलींत घेऊन जाते, व नवरीचा बुरखा काढून त्या वधूवरांची पहिली भेट करिते. नवरी नवऱ्याचें हस्तचुंबन करिते. नंतर ती जवळ उभी असतां नवरा तिजपुढें जमीनीवर लोळणाऱ्या तिच्या बुरख्यावर गुडघे टेंकतो, आणि आह्मां उभयतांचें इतःपर कल्याण व्हावें, ह्मणून परमेश्वराची प्रार्थना करितो. नंतर नवरा आपल्या तोंडांतील मिठाईचा घांस नवरीच्या तोंडांत देतो, व तीही त्याचप्रमाणें करिते. मग दोघेंही बुंद पितात. ह्यासमयीं कौलवी त्या उभयतांस एकांतांत ठेवून खोलीबाहेर जाते. हा त्यांचा पहिलाच एकांत असतो. नवरी जोंपर्यंत नवऱ्याशीं बोलली नाहीं, तोंपर्यंत पत्नी या नात्यानें ती आपल्या नवऱ्याच्या इच्छेप्रमाणें वागण्यास बांधिली जात नाहीं. ह्मणून तिला बोलावयास लावण्यासाठीं तो अनेक नाजूक युक्त्या योजितो, व ती बोलेपर्यंत त्यास धीर धरून असेंच प्रियाराधन करीत बसावें लागतें. ती भाषण करितांच नवरा भिंतीवर थाप मारितो, ह्मणजे कौलवी त्या खोलींत दिवा आणि स्वादिष्ट पक्कान्नांनीं भरलेलें ताट घेऊन येते. नंतर तीं दोघें एकत्र बसून जेवतात. हें जेवण झाल्यावर नवरीचें तोंड धुण्याचा सोहळा होतो.

त्यासंबंधानें यूरोपांतील तुर्कस्तानच्या ईशान्य भागांत अशी चाल आहे कीं, ह्यावेळीं नवरीचें तोंड नवऱ्यानें धुवावयाचें. परंतु, इतर सर्व भागांत हा सोहळा कौलवौकडूनच करवितात. प्रथमदर्शनीं नवरीचा चेहरा चमकून नवऱ्याच्या डोळ्यांत भरावा, ह्मणून ह्या प्रसंगीं तो कृत्रिम उपायांनीं सजवून ठेवण्याची तुर्क लोकांत चाल आहे. ते तिच्या चेहऱ्याला गोंदाचें पाणी लावून त्यावर अभ्रक, किंवा सोनेरी वर्खाची पूड चोळितात, तिच्या भिवयांस दाट रंग देऊन त्या ललाटभागीं नासिकेवर आणून एकीमेकींशी मिळवितात; व दांतांस मिश्री लावून ते काळे करितात. अशा कृत्रिम उपायांनीं नटविलेला तो नवरीचा चेहरा भोजनोत्तर धुण्यासाठीं नवरा एका पेल्यांत गुलाबपाणी, अत्तराच्या साबूची वडी, व एक रेशमी रुमाल घेऊन येतो. तो पेला घेऊन उभा राहतो, व कौलवौ नवरीचें तोंड धुते. मग नवरा तें रेशमी रुमालानें पुसून काढितो, आणि नंतर तीं उभयतां एकमेकांस लग्न झाल्याप्रीत्यर्थ चुंबन देतात. नंतर कौलवौ नवरीच्या अंगावरील शृंगार काढून ठेवून निघून जाते; व तें नवविवाहित दंपत्य एकांतांत राहून गृहस्थाश्रमाचा सुखास्वाद घेऊं लागतें. पुढें दोन तीन दिवसपर्यंत नानाप्रकारचे सोहळे व इष्टमित्रांस मेजवान्या झाल्या, ह्मणजे लग्नसमारंभ संपतो.

तुर्कांच्या लग्नासंबंधीं आणखी कांहीं मुद्याच्या गोष्टी, खीधन वगैरे.

येथवर तुर्क लोकांत सोयरीक जमविण्याची रीति कशी असते, व त्याच्या लग्नांत कोणकोणते सोहळे करण्यांत येतात, वगैरे गोष्टींचें वर्णन झालें. आतां, त्यांच्या लग्नासंबंधीं आणखी एक दोन मुद्याच्या गोष्टी सांगून आह्मी आफ्रिकेंतील यवनांच्या लग्नरीतीकडे वळतों. तुर्क लोक हे कट्टे मुसलमान आहेत. तेव्हां मुसलमानी आचारनियमांप्रमाणें त्यांचें लग्नही कराराच्या तत्त्वावरच होतें. इतर व्यावहारिक करारांप्रमाणें लग्न, हाही एक दिवाणी करार आहे, असें ते समजतात. हा करार जरी न्यायाधीशासमक्ष करण्यांत येतो, तरी त्यासाठीं वधूवरांस त्या अधिकाऱ्यापुढें जावें

लागत नाहीं; अथवा त्या दस्तऐवजावर खुद्द त्या उभयतांना आपल्या सह्या कराव्या लागत नाहींत. त्यावर उभय पक्षांचे वडील अथवा वकील, आणि कोणी जवळचे आप्त अगर मित्र ह्यांच्या सह्या साक्ष्या असतात. काजी, मुल्ला, वगैरे धर्माधिकाऱ्यांचें कर्तव्य फक्त वधू-वरांना दुवा देण्यापुरतेंच असतें. लग्नानंतर त्यासंबंधीं काजीच्या दफ्तरीं नोंद ठेविली जाते. विवाह झाल्यावर नवरा मेला, अथवा स्त्री त्यापासून विभक्त राहिली, तर तिला मिळण्याची रकम करारांत नमूद केलेली असते. तसेंच लग्नसमयीं तिच्या पित्यानें तिला अंदण दिलेल्या एकंदर वस्तूंचा त्यांत स्पष्ट उल्लेख असतो. ह्या वस्तू ती स्त्री मरण पावली, अथवा विभक्त राहिली, तर नवऱ्याला ज्याच्या त्याला परत द्याव्या लागतात. करारावर सह्या होऊन तो रीतसर नोंदिला गेला, म्हणजे नंतर नवरीस नवऱ्याच्या घरीं मिरवीत नेऊन त्याच्या स्वाधीन करितात.

अर्वाचीन शिद्दी लोकांची लग्नरीति.

आफ्रिका खंडांतील उच्चवर्गाच्या **शिद्दी** लोकांत लग्नासंबंधानें जे रीतिरिवाज हल्लीं प्रचलित आहेत, ते खालीं लिहिल्याप्रमाणें:—

विवाहकाल, लग्नमध्यस्थी, व कन्यावर्णन.

बहुतेक मुली बारा तेरा वर्षांच्या झाल्या, ह्मणजे त्यांचें लग्न करण्यांत येतें. सोळा वर्षांपलीकडे कोणीही कुमारिका राहत नाहींत. विधवा झालेल्या, अथवा काडी मोडून दिलेल्या स्त्रीचें पुनर्लग्न अगदीं साधें असतें. त्यांत विधि अथवा सोहळे यांची भानगड मुळींच नाही ह्मटलें तरी चालेल. परंतु, कुमारिकेच्या लग्नाचें तसें नाहीं. तें करण्याची रीति अशी कीं, सामान्यतः ज्या तरुणास लग्न करावयाचें असेल, त्याची आई अथवा कोणी जवळची आप्त स्त्री आपल्या ओळखीच्या एखाद्या कुमारिकेचे शारीरिक व मानसिक गुण त्या तरुणास वर्णन करून सांगते, व ती मुलगी पसंत करून तूं तिच्याशीं लग्न लाव, अशी त्यास सल्ला देते. अथवा, मुली पाहून त्यांची हकीकत कळविण्यासाठीं नवराच लग्नमध्यस्थी करणाऱ्या एखाद्या स्त्रीची योजना करितो. हा धंदा करणाऱ्या ज्या बायका असतात, त्यास **खत्बीह** (*Khat'beh*) असें ह्मणतात. ती गुप्त रीतीनें नवऱ्यामुलास निरनिराळ्या मुलींचें वर्णन करून सांगते.

वर पसंत करणें, वगैरे.

जेव्हां मुलगी वयांत आली नसेल, तेव्हां तिचे आईबाप आपल्या पसंतीप्रमाणें एखादा नवरा शोधून काढून त्याशीं तिचें लग्न लावण्यास मुखत्यार असतात. परंतु, ती वयांत आल्यानंतर तिनें आपणांस हवा तो नवरा पसंत करून घ्यावा,

आणि वाटेल त्या गृहस्थास मध्यस्थ योजून त्याच्या मार्फत त्या गृहस्थाशीं आपलें लग्न लावून घ्यावें, अशी चाल आहे. आपला भावी जांवई आपल्या सारखा उदीमधंदा करीत नसल्यास त्याला मुलगी देण्याबद्दल, आणि वडील मुलीपूर्वी धाकट्या मुलीचें लग्न करण्याबद्दल कन्यापिता पुष्कळ वेळां हरकत घेतो. मुलगी श्रीमान् घराण्यांतील असल्यास, तिशीं लग्न होऊन ती नवऱ्याच्या ताब्यांत जाण्यापूर्वी त्याच्या ओझरती देखील पाहण्यांत येत नाहीं; आली तरी फारच विरळा. परंतु, खालच्या वर्गाच्या लोकांत असा प्रतिबंध नाहीं. त्यांच्यांतील नवऱ्यास लग्नापूर्वी आपल्या नवरीचें मुखावलोकन सहज होऊं शकतें.

वकीलामार्फत सोयरीक जमविणें.

कोणाही उपवर मुलीस लग्न करणें झाल्यास, तत्संबंधीं एकंदर बाबती आपल्या भावी नवऱ्याशीं ठरवून कार्य घडवून आणण्याच्या कामीं ती एखाद्या गृहस्थाची योजना करिते. त्या गृहस्थास 'वकील' अशी संज्ञा आहे. कोणाही तरुण गृहस्थानें आपल्या मर्जीप्रमाणें एखादी नवरी पसंत केली, व तिच्याशीं लग्न लावण्यास तो तयार असला, ह्मणजे तो नवरीच्या वकीलाकडे जाऊन त्यास भेटतो; व त्या मुलीचें आपल्याशीं लग्न होण्याला वकीलाची संमति आहे किंवा कसें, आणि संमति असल्यास तिला काय मेहेर (हुंडा) द्यावी लागेल, ह्या प्रश्नाची बाटाघाट करून कांहीं एक ठराव करून घेतो. कारण, मेहेर दिल्याखेरीज लग्नच होऊं शकत नाहीं.

मेहेर अथवा हुंड्याची रकम.

उभय पक्ष खाऊन पिऊन चांगले सुखी असल्यास मेहेरची रकम एक हजार *रुजलपर्यंत देण्यांत येते! श्रीमान् लोकांत ही मेहेर थैल्यांनीं मोजण्याची चाल आहे. प्रत्येक थैलींत पांच हजार **पियास्टर** असतात, व अशा थैल्या दहा किंवा त्याहूनही अधिक द्याव्या लागतात!

---

* एक रुजलची किंमत २२ पौंड १० शिलिंग ह्मणजे सरासरी दोनशें साडेबीस रुपये असते.

मेहेरची रकम ठरविण्यांत आली, व ती जमलेल्या सर्व मंडळीस (ही मंडळी ह्या प्रसंगीं कुराणाचा पहिला भाग ज्यास 'फातेहा' अशी संज्ञा आहे, तो प्रठन करीत असतात.) मान्य झाली, ह्मणजे ती चुकती करण्याकरितां, व लग्नविधि करण्यासाठीं एक नजीकचा दिवस नेमण्यांत येतो. मग त्या दिवशीं दुपारच्या सुमारास नवरा आपल्या दोन तीन मित्रां-सहवर्तमान ती ठरलेली मेहेरची रकम घेऊन नवरीच्या घरीं जातो. तेथें नवरीचे वकील आपल्या नियमित मित्रांसह हाजरच असतात. ते ह्या गृह-स्थांचें आगतस्वागत करितात. मुसलमानी धर्मशास्त्राप्रमाणें लग्न जमवि-ण्याच्याकामीं निदान दोन साक्षीदार तरी अवश्य असावेच लागतात. मग जास्त असोत किंवा नसोत. जमलेली सर्व मंडळी फातेहा ह्मणूं लागते, व नवरा मेहेरची रकम चुकती करितो. हें झाल्यावर लग्नसंबंधी करार कर-ण्यांत येतो. त्याची रीति अशी आहे कीं, नवरामुलगा व नवरीचा वकील जमिनीवर एकमेकांसमोर तोंडें करून बसतात. त्या प्रत्येकानें आपला एक गुडघा जमिनीस लाविलेला असतो, व दुसरा उभा ठेविलेला असतो. मग प्रत्येकजण आपला उजवा हात आंगठा वर ठेवून दुसऱ्याच्या उजव्या हातांत घालून तो घट्ट धरितो. अशा रीतीनें ते दोघे समोरासमोर बसल्यावर त्यांनीं काय विधानें करावयाचीं, तीं त्यांस सांगण्यासाठीं बहुधा एका '**फिकी**'–पंतोजी–ची योजना करण्यांत येते. फिकी त्या दोघांच्या हस्तयुग्मावर एक हातरुमाल गुंडाळितो, व बहुतकरून लग्नकराराचें वाक्य बोलण्यापूर्वी प्रस्तावनेदाखल एखादा **खुत्बेह** (Khutbeh) ह्मणत असतो. नंतर तो पंतोजी नवरीच्या वकीलास ह्मणावयास सांगतो कीं, "मी यांस माझी कुमारिका मुलगी (अर्थात् जिनें मला आपला वकील नेमिलें आहे ती); जिचें नांव............आहे अशी, अमुक एक रकमेच्या ऐवजीं देतो" ह्याप्रमाणें नवरीच्या वकीलाची प्रतिज्ञा झाल्यावर फिकी त्यांजला उद्देशून नवऱ्यास ह्मणावयास सांगतो कीं, "मी आपणांपासून अमुक कुमारीचा

लग्नदिवशीं मेहेर चुकती करणें, फातेहाचें पठन व लग्नाचा करार.

माझी वधू ह्या नात्यानें स्वीकार करितों, व तिला आपल्या ताब्यांत घेतो, व तिचें संरक्षण करण्याबद्दल मला स्वतःस बांधून घेतों, व आपण जे सर्व येथें हजार आहांत, ते ह्या कृत्यास साक्षी आहांत." ह्याप्रमाणें दोघांमध्यें आणखी दोन वेळां वचनें प्रतिवचनें होतात. नंतर बहुधा सर्वजण पुढें लिहिलेलें विधान करितात. "वधूवरांस आशीर्वाद असो! परमेश्वराची स्तुति होवो! तो सर्व जीवांचा स्वामी आहे! तथास्तु!" हें विधान झाल्यावर हाजर असलेली मंडळी आणखी एकदा फातेहाचें पठन करितात; ह्मणजे करारानें कृत्य आटोपलें. मग नवरा आपल्या मित्रांच्या व जमलेल्या मंडळींच्या हातांचीं चुंबनें घेतो. पण हा प्रकार फारच नीच वर्गांत व क्वचित् करण्यांत येतो; उच्च वर्गांत तो मुळींच करीत नाहींत. नंतर सर्वत्रांस शरबत पाजून भोजनासाठीं ठेवून घेण्यांत येतें. मग त्या मंडळीस कन्यापक्षाकडून प्रत्येकीं कलाबतूचें काम केलेला एकेक रुमाल वांटण्यांत येतो. फकीला तो वरपक्षाकडून मिळतो व त्याच्या पदरीं एक सोन्याचें नाणें बांधिलेलें असतें.

नजरनजराणे, आणि वधूप्रवेशाची तयारी.

बहुधा लग्नाचा करार झाल्यापासून आठ दहा दिवसानंतर नवरी नवऱ्याच्या घरीं जाते. या दरम्यानच्या मुदतींत नवरा तिला दोन, तीन अथवा अधिक वेळां मिठाई व फळफळावळीचे नजराणे पाठवितो; आणि कदाचित् आपल्या सामर्थ्यानुरूप तिला एखादी शाल किंवा इतर मूल्यवान् वस्तु नजर करितो. ह्या मुदतींत नवरीचीं माणसें नवरीला सासरीं पाठवितेवेळीं देण्याचा पोषाक व संसारोपयोगी वस्तू तयार करीत असतात. ह्या वस्तू, पोषाक व दागिने खरीदी करण्याकडे नवऱ्यानें दिलेल्या हुंड्यांपैकीं बरीच मोठी रकम खर्च करण्यांत येते.

वधूप्रवेशासाठीं मुहूर्त, रोषनाई वगैरे.

मुसलमानी रिवाजाप्रमाणें नवऱ्यानें **शुक्रवारीं** किंवा **सोमवारीं** सायंकाळीं आपल्या पत्नीचा स्वीकार करावा असें आहे. तत्रापि **शुक्रवारचा सायंकाळ** हा मुहूर्त अधिक शुभ व प्रशस्त मानिला जातो. ज्या रात्रीं नवरी नवऱ्याच्या घरीं यावयाची, तत्पूर्वी दोन

तीन रात्रींस, नवरा ज्या रस्त्यावर राहत असेल, त्या रस्त्यावर आणि आजू-बाजूच्या व खुद्द नवऱ्याच्या घरीं, शामदानें, कंदील, वगैरेची रोषनाई करितात, व तांबड्या आणि हिरव्या रंगाचीं निशाणें लावितात, आणि ह्या रात्रींस नवऱ्याच्या घरीं इष्टमित्रांस मेजवान्या होतात.

वधूला स्नानागारांत नेण्याची मिरवणूक.

लग्नसमारंभ **शुक्रवारीं** सायंकाळीं आटोपावयाचा असल्यास तत्पूर्वीच्या **बुधवारीं** दुपारीं, किंवा तो **सोमवारीं** सायंकाळीं आटोपावयाचा असल्यास **शनिवारीं** दुपारीं, नवरी मिरवत मिरवत स्नानागारास जाते. मिरवणुकीच्या अग्रभागीं वाजंत्र्यांचा ताफा वाद्यें वाजवीत चालतो. त्यांत नानाप्रकारचे नगारे असतात. केव्हां केव्हां नवरीच्या मंडळीपुढें दोन असामी स्नानागारांत लागणारीं भांडीं व वस्त्रें, दोन वर्तुलाकृतीच्या तबकांत ठेवून व त्यांवरून रेशमी रुमाल आच्छादून तीं तबकें घेऊन चालतात. तसेंच मिरवणुकींतील माणसांनीं पाणी मागितल्यास तें देणारी 'सक्का' (?) ही पुढेंच चालते. शिवाय दुसऱ्या दोन असामी असतात, त्यांपैकीं एकीच्या हातीं चांदीची किंवा चिनी मातीची गुलाबदानी असते, तींतून ती सर्वांच्या अंगावर मधून मधून गुलाबपाणी छाटीत चालते; आणि दुसरीच्या हातीं चांदीची अत्तरदानी असते, तींतून ती अत्तर देते. बहुतकरून हीं अग्रभागींचीं माणसें नवरीच्या इष्टमित्र स्त्रिया असून त्या विवाहित असतात; आणि त्या जोडीनें व्यवस्थेशीर चालतात. त्यांच्या मागून कुमारिकांचा समुदाय चालतो. त्याच्यामागून मोतिया, गुलाबी, पिंवळा, वगैरे रंगीबेरंगी आणि भपकेदार रेशमी वस्त्रांच्या एका लहानशा मंडपीखालीं नवरी मिरवत येते. ही मंडपी चारी कोंपऱ्यास चार इसमांनीं काठयांनीं वर उचलून धरिलेली असते; व तिचा फक्त अग्रभाग मात्र उघडा असून बाकीच्या बाजूंस पडदे सोडिलेले असतात. नवरीच्या डोकीस बाशिंगाप्रमाणें कागदी व नकली काम केलेली एक टोपी अथवा मुकुट घातलेला असतो; व त्यावरून शाल पांघरविलेली असते. ती अशा रीतीनें कीं, तिच्या अंगावर

घातलेले मौल्यवान् अलंकार व तिचा चेहरा लोकांच्या दृष्टीस पडूं नये! तिच्या कपाळावर शालीचा जो भाग येतो, त्यास बिजवऱ्यासारखा एक मोठा अलंकार लटकत ठेविलेला असतो. तो मात्र उघडा असून लोकांस दिसे असाच लाविलेला असतो. मिरवणूक फार सावकाश चालते; व तिच्या शेवटींही, आरंभीं सांगितल्याप्रमाणेंच वाजंत्र्यांचा ताफा किंवा निदान दोन तीन नगारजी नगारे पिटीत चालतात. स्नानागारांतील कृत्यांत कांहीं वेळ गेल्यानंतर तेथून वर सांगितलेल्या मिसलींनेंच परत मिरवणूक निघून नवरीच्या घरीं येते; व तेथें नवरी आणि तिच्या मैत्रिणी एकत्र उपहार करितात.

नवरीला मेहेंदी लावण्याचा सोहळा व नगद आहेर.

ह्याप्रमाणें नवरी व तिचे इष्टमित्र ह्यांचा फराळ झाल्यानंतर मेहेंदीचा सोहळा होतो. तो असा कीं, पुष्कळशी मेहेंदी वाटून ती कसल्याशा एका चिकण खळींत मिसळितात. मग नवरी त्यांतून एक लहानसा हुंडा काढून घेऊन तो आपल्या हातास थापटते. ह्या हुंड्यास जमलेल्या मंडळींतून कोणी असामी एक सोन्याचें नाणें चिकटवितो. तें नाणें त्या मेहेंदीस चांगलें चिकटलें, ह्मणजे नवरी नाण्यासुद्धां ती हातावरील मेहेंदी पाण्यानें भरलेल्या एका उथळ पात्राच्या कडेनें खरडून काढून त्यांत टाकिते. ह्याप्रमाणें नवरीला माणसागणित सोन्याचें नाणें नजर करावें लागतें, व तिला पुष्कळ प्राप्ति होते. वस्तुतः हा एक प्रकारचा आहेरच होय. तो सर्वजणांकडून मिळाला, ह्मणजे मग उरलेली पुष्कळशी मेहेंदी नवरीच्या हातापायांस थापून तीवरून कपडे लपेटून बांधितात; व ह्या स्थितींत नवरीला सकाळ उजाडेपर्यंत रहावें लागतें. प्रातःकाळीं तिचे हात पाय मेहेंदीनें लाल भडक रंगलेले दिसून येतात. मग जमलेल्या स्त्रिया बाकी उरलेल्या मेहेंदींतून आपापले हात रंगवून घेतात! बायकांची हौस ह्मणून कधींच फिटावयाची नाहीं! असो.

वधूप्रवेश.

दुसऱ्या दिवशीं नवरी मिरवत मिरवत आपल्या नवऱ्याच्या घरीं जाते. ह्याही मिरवणुकीची सर्व मिसल स्नानागारास जातेसमयींच्या मिरवणुकीप्रमाणेंच असते. नवरी व तिच्या

पक्षाची मंडळी वरगृहीं आल्यावर तेथें फराळास बसतात. फराळ झाल्यावर नवरीच्या मैत्रिणी लवकरच आपापल्या घरीं निघून जातात. नवरीपाशीं फक्त तिची आई, बहीण, एखादी निकट संबंधी स्त्री, व आणखी एखाद-दुसरी बाई येवढीं निवडक माणसें राहतात. ह्या सर्व स्त्रिया माडीवर जनानखान्यांत बसलेल्या असतात.

नवरा आपल्या पुरुषवर्गाच्या इष्टमित्रांसह खालींच बसलेला असतो.

वराचें स्नानागारास व मसजिदींत जाणें, ईशप्रार्थना व झेफेह नामक सोहळा.

सूर्यास्तापूर्वी तो स्नानागारास जाऊन तेथें आपले कपडे बदलून येतो; आणि नंतर आपल्या इष्टमित्रांसह फराळ करितो. मग रात्रींच्या प्रार्थनेला थोडासा अवकाश राहीपर्यंत, अथवा तीन चार तास रात्र जाईपर्यंत तो स्वस्थ बसून असतो. नंतर योग्य समय प्राप्त होतांच, तो एखाद्या नजीकच्या मस्जिदींत जाऊन ईश्वराची प्रार्थना करितो. नवरामुलगा लहान असल्यास ह्याप्रसंगीं त्याचा **झेफेह** (Zeffeh) नामक सोहळ्यानें मान-पान करण्यांत येतो. तो असा कीं, त्यास वाजत गाजत मशीदींत नेतात. ह्यावेळीं वाजंत्र्यांच्या ताफ्यांत वाजंत्री, नगारजी, व एक दोन किंवा जास्त शिंगाडे असतात. वरासमागमें बरीच इष्टमित्र मंडळी व कित्येक मशालजी *मशाली पेटवून जातात. ह्या वेळची प्रार्थना ह्मणजे केवळ एक सोहळ्यादाखल असते. ती करावयाची ह्मणून करितात, इतकेंच. ती झाल्यानंतर सर्व मंडळी फार मोठ्या थाटामाटानें व अगदीं सावकाशपणें मिरवत घरीं परत येते.

तेथें आल्यावर नवरामुलगा आपल्या इष्टमित्रांस तळमजल्यावरील

जनान्यांतील कृत्यें.

जागेंत बुंद व हुक्का पीत बसवून आपण वर जनान-खान्यांत जातो. तो अल्पवयस्क असल्यास त्यानें व नवरीनें ह्या प्रथम भेटीच्या प्रसंगीं थोडी तरी लज्जा प्रगट करावी,

---

* इकडील मशाली ह्मणजे नुसतें एक जळाऊ लांकूड असून त्याच्या टोंकाशीं लोखंडाचें एक नळकांडें घातलेलें असतें. हें लांकूड असें असतें कीं, तें पेटवितांच दिवटीप्रमाणें धडधड जळूं लागतें.

अशी मंडळींची इच्छा असते! सबब, जनान्यांत कसा काय प्रकार होतो, तो पाहण्यासाठी नवऱ्याचा कोणी संवगडी त्याजबरोबर मुद्दाम त्यास पोंचविण्याच्या मिषानें जनानखान्यापर्यंत जात असतो. असो. नवरा जनानखान्यांत पोहोंचतांच तेथें बेल्लांक (bellanch) ह्मणून कोणी एक स्त्री असते, तिला तो कांहीं बक्षीस देतो, ह्मणजे लागलीच ती तेथून निघून जाते. ह्या समयीं नवरीनें आपल्या डोकीवरून शालीचा बुरखा घेतलेला असतो. तो काढण्याबद्दल नवऱ्यानें तिला कांहीं द्रव्य द्यावें लागतें. ह्या रकमेस 'बुरखा काढणावळ' अशा अर्थाची एक एतद्देशीय परिभाषा आहे. ही बुरखा काढणावळ दिल्यानंतर नवरा नवरीचा बुरखा काढण्याचा प्रयत्न करितो. परंतु, नवरी मग उगीच ओढूनताढून चंद्रबळ आणून त्यास तसें करूं देत नाहीं. तीं एखाद्या वात्रट पोरीसारखी भारीच लाजते! शेवटीं नवरा, "ईश्वराखातर!— त्या दयाळू व मायाळू ईश्वराखातर!" अशा अर्थाचें वाक्य बोलून बुरखा काढतोच; आणि "आजच्या रात्रीला दुवा असो!" असें ह्मणून नवरीला अदबीनें सलाम करितो. ती त्याचा प्रतिकार ईश्वर तुह्माला सुखी ठेवो! अशा आशयाच्या वाक्यानें करिते. ह्यासमयीं नवरा आपल्या बायकोचा चेहरा काय तो पहिल्यानेंच पाहतो; व बहुतकरून तो पूर्वी मध्यस्थ स्त्रीनें केलेल्या वर्णनाप्रमाणें, व आपण अटकळ करीत होतों तसाच आहे, असें त्यास आढळून येतें. असो. ह्याच प्रसंगीं एक चमत्कारिक सोहळा बरेच वेळां करण्यांत येतो. तो असा कीं, नवरा नवरीच्या अंगावरील अगदीं आंतल्या वस्त्राखेरीज बाकीचे सर्व कपडे काढून टाकितो, व तिला एखाद्या चटईवर किंवा बिछान्यावर अशा रीतीनें बसवितो कीं, तिची पाठ मक्केच्या बाजूस व्हावी. बिछान्याचें उसेंही त्याच दिशेस केलेलें असतें. अशा रीतीनें तिला बसविल्यावर तो तिच्या अंगावर अवशिष्ट राहिलेल्या वस्त्राचा घोळ पुढें ओढून बिछान्यावर पसरितो, व सुमारें दोन हातांच्या अंतरावर नवरीसमोर राहून परमेश्वराची थोडीशी प्रार्थना करितो. ती करितांना त्याचे दोन्ही हात व डोकें नवरीच्या मांडीपुढें पसरिलेल्या घोळावर आदरपूर्वक टेंकिलेलें असतें! हा प्रार्थनाप्रकार झाल्यानंतर तो तिजपाशीं फार वेळ रहात नाहीं.

तिचें लावण्य कसें असेल! ही जी त्याची पूर्वीची जिज्ञासा, ती तृप्त होतांच तो जनानखान्यांतून बाहेरील स्त्रियांस हांक मारितो. त्या स्त्रिया दरवाज्यापाशीं ह्या दोघांच्या पहिल्या भेटीचा परिणाम कसा काय होतो, तो जाणण्यासाठीं मोठ्या उत्कंठेनें नवऱ्यानें हांका मारण्याची वाट पहातच उभ्या असतात. त्याची हांक ऐकूं येतांच त्या मोठ्यानें आनंदाचा गजर करितात. तो ऐकून शेजारीपाजारी लोक नवऱ्याला नवरी पसंत पडली असें समजतात. नंतर लागलीच दार उघडून नवरा खालीं उतरून मंडळींत येऊन बसतो; व त्यांच्या समागमें एक दोन तास राहून नंतर फिरून आपल्या बायकोकडे जातो. पहिल्या भेटीच्या वेळीं जरी कदाचित् बायको नापसंत झाली; तरी कोणीही नवरा लागलीच तिचा पाणउतारा करून तिच्याशीं काडी मोडून देत नाहीं. तो बहुधा तिला एक दोन आठवडे तरी ठेवून घेतो.

खेड्यांतील झेफेहची रीति.

खेड्यापाड्यांतील लोकांमध्यें झेफेह करण्याची सामान्य रीत वर सांगितलेल्या पद्धतीहून भिन्न आहे. ती अशी कीं, नवरीला शाल पांघरवून उंटावर बसवितात, आणि नवऱ्याच्या घरीं घेऊन जातात. केव्हां केव्हां ह्या प्रसंगीं नवरीसमागमें त्याच उंटावर चार किंवा पांच स्त्रिया अथवा मुली बसत असतात. त्यांपैकीं दोन तिच्या दोन्ही बाजूस आणि बाकीच्या तिघी मागें बसतात. बैठक चांगली रुंद केलेली असते, व ती सतरंज्या अथवा त्यांसारख्याच इतर वस्त्रांनीं आच्छादिलेली असते. नवरीच्या उंटामागून स्त्रीसमुदाय गात गात चालत असतो. लग्नदिवशीं सायंकाळीं आणि बहुतकरून तत्पूर्वींच्या कित्येक सायंकाळीं उभयपक्षांचे स्त्री व पुरुष इष्टमित्र वरगृहीं एकत्र जमून मोकळ्या हवेंत बसतात; व गाणीं ह्मणून आणि ग्राम्य रीतीचा एक नाच आहे, तो 'तंबोरिन'. नांवाच्या डफावर नाचून रात्रौ कित्येक तासपर्यंत आपली करमणूक करून घेतात. हें नृत्य एकट्या स्त्रियाच करितात. पुरुष नाचत नाहींत.

आफ्रिकेंतील भिन्न भिन्न ठिकाणच्या लग्नरीती.

सोयरीक जमविण्याची रीति, उलट हुंडा, व कन्याहरणाचा भाव.

केरो:-हें **मिसर** देशाच्या राजधानीचें शहर होय. ह्या शहरीं सार्वजनिक स्नानागारें बांधिलेलीं आहेत. त्यांत स्त्रिया व पुरुष स्नाना-करितां जातात. तेणेंकरून निरनिराळ्या कुटुंबांतील माणसांच्या अनायासें गांठी होतात. मग तेथें इतर विषयांबरोबर सोयरीक संबंध जुळविण्या-विषयीही बोलणें चालतें. ज्या तरुण कुमारिका तेथें पाहण्यांत येतात, त्यांच्या गुणरूपांची वरपक्षास तारीफ करून सांगितली जाते. मध्यस्थानें केलेल्या वर्णनावरून त्यांना ती मुलगी पसंत पडली, ह्मणजे मुलीच्या बापाला ती गोष्ट कळवितात. वरपक्षानें वधूपक्षास हुंडा वगैरे देण्याची चाल आहे. त्याचा ऐवज मुलीच्या बापास मान्य झाला, ह्मणजे तो वरपक्षाकडून त्याज-कडे पाठविण्यांत येतो. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं लग्न जमवून आणणारीं माणसें मुलीकडे जाऊन तिला तिच्या आईपासून बलात्कारानें ओढून घेण्याचा भाव करितात; आणि तिला वरगृहीं घेऊन येतात. हें कृत्य आईची खुषी नसतां बापास द्रव्य देऊन मुलगी हरण करण्यासारखें दिसतें; परंतु, तें केवळ उपचारार्थ करण्याची चाल पडली आहे. असो.

वरातीची मिरवणूक.

वरातीची मिरवणूक बहुतकरून सायंकाळीं निघते. तिच्या अग्रभागीं मंगल-वाद्यांच्या सुरांवर कांहीं लोक नाचत चालतात. वराकडील मंडळी श्रीमान् असल्यास ह्या मिरवणुकीसमागमें वधूला श्रीमंती उपचार करणारे दास व दासीही असतात. चार

मजूरांनीं चोहीकडून उंच धरिलेल्या चांदणीखालीं वधू फार मौल्यवान् वस्त्राचा बुरखा घेऊन चालते. मशालजी मोठमोठ्या मशाली पेटवून दुतर्फा रांगेनें चाललेले असतात. त्या योगानें मिरवणुकीवर सुप्रकाश पडून ती प्रेक्षणीय दिसते. सर्व मंडळी वरगृहीं आल्यावर स्त्रिया व पुरुष निरनिराळ्या दालनांतून बसतात. हीं दालनें अशीं सोइस्कर असतात कीं, पुरुषांच्या बैठकींत होत असलेलीं सर्व कृत्यें स्त्रियांना आपल्या जागेंतून दिसावींत. ह्या प्रमाणें सर्वजण व्यवस्थित रीतीनें बसल्यानंतर नृत्यकलेंतील वाकबगार लोक हावभावांसहित नाच करून जमलेल्या प्रेक्षकांचें मनोरंजन करितात. वराला आपलें मोहक सौंदर्य व ऐश्वर्य दाखविण्याचा उद्देशानें वधू अनेक कारणें काढून त्याच्यासमोर वारंवार विलसत असते.

लग्नपर्यवसान.

रात्रीं सर्व मंडळी निजावयास गेल्यानंतर नवरा शयनमंदिरांत प्रवेश करितो. त्याच्या मागून नवरी आपला बुरखा काढून जाते, व आपल्या श्यामसुंदरतेनें त्याच्या चित्तवृत्ती एकदम उल्लसित करून सोडिते!

नाच व फ्लिघत.

लग्न लागल्यानंतर दुसऱ्या दिवशीं सकाळीं वरगृहासमोर नाचणारिणी नृत्य करितात. नवरा तरुण मनुष्य असल्यास हें नृत्य लग्नदिवशी सकाळींच होतें; आणि ज्या गृहस्थानें नवऱ्यास जनानखान्यांत पोंचविलें असेल, तो नवऱ्यास आणि त्याच्या कित्येक इष्टमित्रांस घेऊन त्याच दिवशीं वनभोजनास जातो. तेथें ती मंडळी सर्व दिवस मौजेंत घालवून सायंकाळीं परत येतात. ह्या सोहळ्यास **फ्लिघत्** (Flight) अशी तद्देशीय संज्ञा आहे. सामान्य वर्गांत नवरा वनभोजनानंतर घरीं परत येतांना त्यास वाजत गाजत आणितात. लग्नरात्रींच्या खेपेहमध्यें, आणि ह्यावेळींही त्याच्या इष्टमित्रांपैकीं प्रत्येकाच्या हातीं एकेक पुष्पगुच्छ असतो. मिरवणूक येण्यास रात्र झाली असतां मशाली व दिवे लावून गांवांत थाटानें येतात. वराच्या मित्रांनीं हातांतील पुष्पगुच्छांबरोबर एक एक मेणबत्तीही लावून धरिलेली असते!

हबसाण:—आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर **अबिसीनिया** ह्मणून एक देश आहे. ह्यास **हबशी देश** अथवा अपभ्रंशानें आपण **हबसाण** असेंही ह्मणतों. एतद्देशीय लोकांत संमतितत्त्वावर लग्नें केलीं जातात. परंतु, त्यांना शाश्वती मुळींच नसते! कोणीही स्त्रीपुरुषें आपल्या खुषीस वाटेल तितके दिवस एकत्र राहतात, आणि वाटेल तेव्हां एकमेकांचा त्याग करून चालतीं होतात! अशा रीतीनें कोणीही उत्तम प्रतीचा हबशी गृहस्थ कित्येक वधूंचा नवरा झालेला असतो, व हबशीण कित्येक वरांची वधू झालेली असते! त्याग करितेसमयीं, स्त्रीपासून जी संतति झाली असेल, ती उभयतांत विभागून घेण्यांत येते. सर्वांत वडील मुलगा आईच्या वांट्यास जातो, आणि मुलगी बापाच्या वांट्यास येते. फक्त एकच मुलगी आणि बाकी सर्व मुलगे असले, तर मुलगी तेवढी बाप ठेवितो; आणि एकच मुलगा व बाकी सर्व मुली असल्या, तर मुलगा आई ठेवून घेते, व मुली तितक्या बापाच्या गळ्यांत बांधिते! पहिली वांटणी होऊन शिलक राहिलेली अपत्यांची संख्या विषम असेल, तर त्यांची हिस्सेरशी उभयतां स्त्रीपुरुषांच्या खुषीप्रमाणें होते. हबसाणांत रावापासून तों रंकापर्यंत सर्व समाजांत औरस आणि दासीपुत्र ह्यांच्या संबंधानें न्यूनाधिक्य मुळींच मानीत नाहीत!

स्त्रीपुरुषसंमति अशाश्वत संबंध आणि त्यापासून प्राप्त होणाऱ्या संततीवरील हक्क.

मध्य आफ्रिका—आफ्रिकेच्या मध्य प्रदेशांतील शिद्दी लोकांत लग्नसंबंधी पूर्वी बोलणें चालणें होऊन ठराव झाला, ह्मणजे नवरा आपल्या मित्रसमुदायानिशी रात्रीं घरांतून निघतो, व नवरीच्या घरास वेढा घालितो. जणुं काय त्यास तिला जबरदस्तीनें हरण करूनच न्यावयाची आहे. असा वेढा पडला, ह्मणजे नवरी व तिच्याजवळ असलेल्या स्त्रिया त्या मंडळीस हरकत करण्याचा शक्य तितका आव घालितात; आणि आपल्या सोडवणुकीस कोणी यावें, ह्मणून मोठा कोलाहल करितात. परंतु कोणीही येत नाहीं. अर्थातच नवरा आपल्या बायकोस हस्तगत करून घरीं घेऊन जातो.

वधूहरण.

काफरारिया:—दक्षिण आफ्रिकेंत '**केपकॉलनी**'मध्यें **काफरारिया** ह्मणजे **काफरी** लोकांचा कांहीं मुलूख आहे. हल्लीं **बटरवर्थ** ही त्याची राजधानी ह्मटली जाते. ह्या मुलखांतील काफरी मनुष्याला लग्न करावयाचें असलें, ह्मणजे जी मुलगी त्यानें पसंत केली असेल, तिला तिच्या इष्टमित्रांसह तो आपल्या घरीं बोलावितो; व तेथें वधूपक्षास मेजवानी देण्यांत येते. नंतर वधूच्या पित्यानें वराला हुंड्याऐवजीं किती जनावरें द्यावयाचीं, त्यासंबंधानें ठराव होतो. तो ठराव पसंत पडला, ह्मणजे लग्नाचा दिवस निश्चित करितात. मग वधू त्या दिवशीं सकाळीं एक विशिष्ट प्रकारचा पोषाक करून आपल्या मैत्रिणींसह जमलेल्या जातिबांधवांजवळून जाते. मात्र ती आपल्या बापाजवळून जातांना त्याकडे चेहरा न करितां पाठ फिरविते. यांतील हेतु वडिलांची अदब ठेवावी असा दिसतो. हा पोषाक कुमारिकेला फक्त तिच्या लग्नदिवशींच घालण्यांत येतो. नंतर कोणीही स्त्री तो घालीत नाहीं. ह्यावरून त्यांत कांहीं तरी अविनयाचा प्रकार असावा असें वाटतें. असो. हें कृत्य झाल्यावर जमलेल्या मंडळीस मांसाची मेजवानी व नाच देण्यांत येतो, ह्मणजे लग्न समारंभ संपला.

हाटेंटाट:—हा प्रदेश **केप ऑफ गुड होप**च्या आसमंतात आहे. त्याच्या नांवावरून एतद्देशीय लोकांसही हाटेंटाट असेंच ह्मणतात. ह्या लोकांत बाप किंवा जवळचे नातलग लग्नें करून देतात. नवरीला नवरा पसंत न पडला, तरी जो वडिलांनीं पाहून दिला, त्याच्या समागमें तिला एक रात्र तरी कंठावी लागते!

वडिलांच्या संमतीचें प्राबल्य, नापसंत नवऱ्याशीं एकरात्र समागम.

नवऱ्यानें आपल्या कर्तबगारीनें इतर प्रतिस्पर्ध्यांवर जय मिळविला, तर मात्र त्या स्त्रीला त्या पुरुषाची पत्नी होऊन त्याच्या संगतीं जन्म काढावा लागतो. परंतु, ही कर्तबगारी नवऱ्यांत नसली, व तो नवरीला आवडत नसला, तर केवळ वडिलांच्या करण्यास मान देण्याखातर त्या उभयतांचा एक रात्र समागम होऊन पुढें तीं एकमेकांपासून कायमचीं विभक्त होतात!

वडिलांनी लग्न करून दिल्यावर दुसरे दिवशीं एक बैल मारून त्याच्या मासांची सर्व इष्टमित्रांस मेजवानी देण्यांत येते. मांस भक्षण करून बैलाच्या चरबीचें व रक्ताचें वधूवरांच्या अंगांस अनुलेपन करितात! व त्यावर 'बुक्का' नांवाची एक भुकणी असते, ती भुरभुरून गेरूच्या रंगानें त्यांचीं तोंडें रंगवितात! ह्याप्रमाणें वधुवरें रंगलीं गेलीं, ह्मणजे पुरुषांचें एक, व स्त्रियांचें एक ह्याप्रमाणें दोन वर्तुळें करून त्यांच्या मध्यभागीं अनुक्रमें वरास व वधूस बसवितात. नंतर उपाध्याय पुरुषांच्या वर्तुळांत जाऊन नवरदेवाच्या मस्तकावर थोडीशी लघुशंका करितो, व तदनंतर स्त्रियांच्या वर्तुळांत नवरीच्या डोकीवरही त्या अवशिष्ट तीर्थाचा अभिषेक करितो! हें अमोल तीर्थ आपापल्या कपाळीं लावण्यासाठीं वधूवरें कपाळास लाविलेल्या चरबीच्या अंगरागांत नखांनीं रेघा ओढितात, व त्या रेघांत तें उपाध्यायांचें मूत्रतीर्थ लावितात! हा अलौकिक सोहळा झाल्यावर उपाध्याय त्या नवीन जोडप्यास 'तुह्मी सुखानें एकत्र रहा, एक वर्षाच्या आंत तुह्माला पुत्र होवो, व तो पुत्र चांगला शिकारी आणि लढवय्या निपजो!' असे आशीर्वाद देतात. पुढें भोजन होतें. त्यानंतर हुक्कयांत तंबाकू भरून व तो 'तेज' करून सर्व मंडळी पाळीपाळीनें एकदा हुक्का पितात, ह्मणजे लग्नसोहळा संपला. हे लोक दारूचे व गीतवाद्यादिकांचे फार शौकीन आहेत. तथापि, वर सांगितलेल्या लग्नसमारंभांत ते त्यांपैकीं कशाचाही उपयोग करीत नाहींत.

रानटी आणि बीभत्स लग्नरीति.

वन्यजनप्रदेशः—दक्षिण आफ्रिकेंत **'बुशमन लँड'** अथवा वन्यजनप्रदेश ह्मणून एक भाग आहे. त्यांतील जंगली लोकांत कोणाही अविवाहित तरुण पुरुषाचें एखाद्या अविवाहित स्त्रीवर प्रेम जडलें, ह्मणजे तो तिला रात्रींच्या समयीं भेटून तूं मला आपला नवरा कर, असा आग्रह करितो. केव्हां केव्हां तर उपवर कन्या आपल्या झोंपडींत झोंपीं गेली असली, तरी तिला बलात्कारानें उठवून व बाहेर आणून तिची संमति मिळेपर्यंत तिला वर सांगि-

लग्नरीति.

तलेला आग्रह उर्फ जबरदस्ती करण्यांत येते. ह्या कृत्यास तिच्या आईबापांचा मुळींच प्रत्यवाय नसतो. किंबहुना अमुक तरुण पुरुष स्वतःशीं लग्न लावण्याविषयीं आपल्या मुलीवर अशी जबरदस्ती करीत आहे, ह्याविषयीं त्यांना खबर देखील नसते! तथापि, लग्न झाल्यानंतर वराकडून त्यांना भेजवानी देण्यांत येते, व कन्यापित्यास धनुष्यबाण व एक कातड्याचा भाता नजर करण्यांत येतो, ह्मणजे झालें.

दक्षिण गिनीः—आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर **'खालचा गिनी'** अथवा दक्षिण गिनी ह्मणून एक प्रदेश आहे. त्यांत **कांगो**

लग्नसोहळा.

अंगोला व **मुंडिंगो** वगैरे ठिकाणचे शिद्दी लोक बहुतकरून स्त्रिया खरीदी करून आणितात. अर्थात् वरापासून कन्येचा हुंडा अथवा किंमत मिळाल्यावर कन्येला तिचा बाप आणि इतर नातेवाईक मंडळी एका झोंपडींत एकटीच ठेवितात; आणि तिच्या अंगास नानाप्रकारचीं उटणीं लावितात. तसेंच ती सुखी व प्रजावती व्हावी, ह्मणून त्या झोंपडींत धूप जाळितात. मग कित्येक दिवसानंतर तिला त्या झोंपडींतून काढून दुसऱ्या एका झोंपडींत नेतात, व तेथें तिचे आप्त तिजवर घालूं शकतील तितके उंची वस्त्रालंकार घालितात. नंतर तिला बाहेर आणून लोकांत जणूं काय तिचें प्रदर्शनच करितात! अशा रीतीनें वस्त्राभरणांनीं भाराक्रांत झालेल्या त्या नवरीस, तेथें हाजर असलेले लोक मोठ्या अदबीनें सलाम करितात. ह्या प्रसंगीं तिला नजर मिळालेल्या सर्व वस्तु तिजभोंवतीं मांडून ठेविलेल्या असतात. हें वधूचें प्रदर्शन आटोपल्यावर तिला तिच्या नवऱ्याच्या घरीं पोंचविण्यांत येतें. ती तेथें गेल्यावरही तिला रहावयास एक स्वतंत्र झोंपडी देण्याची चाल आहे. नवरी घरीं आल्यावर नवऱ्याकडे कित्येक दिवसपर्यंत इष्टमित्रांस नाच व मेजवान्या होऊन लग्नसमारंभ संपतो.

कांगो व मुंडिंगो:—येथील लोकांत बालविवाहाची फार चाल आहे. कित्येक वेळां तर मुलें व मुली जन्मतांच आईबाप त्यांच्या लग्नासंबंधीं करार करून टाकितात, व तो त्यांना मोडितां येत नाहीं. नवऱ्यानें बायकोला घरीं आणण्यापूर्वीं तिच्या बापाला 'कोला' नांवाचीं दोनशें फळें, दोन लोखंडी गज, व दोन गाई द्याव्या लागतात; व ती घरीं आल्यावर वधूपक्षास एक मोठी मेजवानी द्यावी लागते. ह्या मेजवानीस पुष्कळ मंडळी आमंत्रणावाचून येतात. वधूला वरगृहीं नेतेसमयीं एखाद्या मनुष्याच्या खांद्यावर बसवून नेतात. तिनें आपल्या तोंडावरून बुरखा घेतलेला असतो. तो ती पतीशीं आपला समागम होईपर्यंत काढीत नाहीं. वधूवरांचा संयोग होईपावेतों जमलेली मंडळी नृत्यगीत व हास्यविनोद करून आपलें मनोरंजन करून घेतात.

लग्नरीति.

एतद्देशीय सर्व लोकांत बहुपत्नीकत्वाची चाल आहे. बायकोस नवऱ्याला काडी मोडून देणें झाल्यास, नवऱ्यानें लग्नापूर्वी तिजबद्दल जो हुंडा उर्फ किंमत दिली असेल, ती तिच्या आईबापांनीं नवऱ्यास परत द्यावी लागते.

बहुपत्नीकत्व आणि त्याग.

उत्तरगिनी—हा प्रदेश पश्चिम आफ्रिकेच्या किनाऱ्यावर आहे. ह्यास **'वरचा गिनी'** असें ह्मणतात. एतद्देशीय लोकांची लग्नपद्धति अगदीं साधी आहे. कोणाही पुरुषाच्या मनांतून एखाद्या कुमारीशीं लग्न करावयाचें असलें, ह्मणजे तो तिच्या बापाची संमति घेतो. ही संमति लागलीच देण्यांत येते. नंतर नवऱ्याकडून नवरीला वस्त्रभूषणें व तत्पक्षीयांस मेजवानी देतात, ह्मणजे लग्न आटोपलें.

वधूच्या वडिलांची संमति व मेजवानी.

सिएरा लिओनः—हें संस्थान आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर **सेनिगॅम्बिया** ह्मणून जो प्रांत आहे, त्यांत असून तें इंग्रजांच्या ताब्यांत आहे. ह्या संस्थानांत जे शिद्दी राहतात, ते आपल्या इतर देशबांधवांपेक्षां पुष्कळ सुधारलेले आहेत. त्यांच्यांत मुली जन्मण्या-

लग्नरीति.

बरोबर त्या कोणांस द्यावयाच्या, तें नक्की करून ठेवितात. पुढें त्या वयांत आल्यानंतर उभयपक्षांच्या संमतीनें एखादा लग्नदिवस ठरविण्यांत येतो. मग त्या दिवशीं नवरीला ज्या रस्त्यावरून न्यावयाची, त्या रस्त्यावर वधूपक्षाच्या लोकांसाठीं वरपक्षाकडून ठिकठिकाणीं मद्य व फराळाचे पदार्थ ठेवण्यांत येतात. वरपक्षाकडून ही व्यवस्था मनाजोगी न झाल्यास वधूबरोबर येणारे लोक पुढें पाऊलही टाकीत नाहींत. कदाचित् ते अर्धा अधिक रस्ता चालून आले असले, तरी रुसून वधूला घेऊन परत जातात! वराच्या गांवाच्या वेशीजवळ येतांच, ते कांहीं वेळ थांबतात. इतक्यांत वराकडील मंडळी त्यांस सामोरी येते, व तेथें उभयपक्ष आपापल्या बंदुका उडवून आणि जयघोष व मद्यपान करून परस्परांस आनंद प्रदर्शित करितात. ह्यावेळीं कोणी पोक्त बाई वधूला आपल्या खांद्यांवर घेते, आणि दुसऱ्या स्त्रिया तिजवर बुरखा घालितात. कारण, ह्यावेळेपासून लग्न होईपर्यंत कोणाही पुरुषानें नवरीचें मुखावलोकन केलें न पाहिजे, असा नियम आहे. तसेंच ती बाई वधूला घेऊन चालूं लागतांच जमीनीस तिचा चरणस्पर्श होऊं नये असें आहे! सबब, तिच्या पुढें चटयांच्या पायघड्या घालीत चालतात. अशा रीतीनें उभयपक्षांकडील इष्टमित्रमंडळी वाटेनें नृत्यगीत करीत आणि बंदुका उडवीत नवरीला नवऱ्याच्या घरीं घेऊन येतात. मग सायंकाळीं नवरा नवरीच्या खोलींत जातो, व तिच्या कौमार्याबद्दल कांहीं एक संशय आला नाहीं, तर तो तिजसमागमें रात्रभर ऐषआराम करितो. उभयपक्षांची इष्टमित्रमंडळीही ती रात्र आनंदांत घालवितात, आणि दुसऱ्या दिवशीं नवरानवरींच्या बिछान्यावरील चादर गांवांतून मोठ्या थाटानें मिरवून आणितात. परंतु प्रथमदर्शनीं नवऱ्यास नवरीच्या कौमार्याबद्दल संशय आला असतां तो खोलींतून लागलाच बाहेर येतो, व ती गोष्ट नवरीच्या नातेवाइकांस कळतांच ते शरमिंदे होऊन रडत ओरडत वरपक्षाच्या दृष्टीआड होतात. नवरीचें कौमार्य भ्रष्ट झालें असलें, तरी नवरा केव्हां केव्हां तिला ठेवून घेतो. परंतु त्यानें तिचा त्याग केल्यास नवरी ज्या वस्तू आपणाबरोबर अंदण ह्मणून आणिते, त्या त्याला परत कराव्या लागतात.

बांबुक—हें संस्थान **इथोपियामध्यें** आहे. त्यांतील लोकांत, वधू-वराच्या घराजवळ आली ह्मणजे दरवाज्यापाशीं आपला जोडा काढून ठेविते. नंतर तिच्या दासी किंवा सख्या तिला पाण्यानें भरलेला एक पेला देतात; व दरवाज्यावर थाप मारितात. लागलीच दार उघडण्यांत येतें. मग वधू आपल्या सोबतिणींसह आंत प्रवेश करिते. तेथें तिचा नवरा आपल्या वडिलांसमागमें बसलेला असतो. त्याला वधू साष्टांग नमस्कार करून पेल्यांतील पाण्यानें त्याचे पाय धुते; व आपल्या नेसत्या वस्त्राच्या पदरानें ते पुसून टाकिते. मग तीं वधूवरें त्यांना रहाण्यासाठीं तयार केलेल्या घरांत पाठविण्यांत येतात. ह्या घरांत त्या उभयतांना संसारोपयोगी व सुखदायक अशा वस्तूंची सिद्धता असते.

वधूप्रवेश.

मोरोको:—ह्या देशामध्यें **मूर** ह्मणून एका जातीचे लोक आहेत. ते रंगारूपानें बहुतेक शिद्यांसारखेच दिसतात. ह्या लोकांत कन्येचा विवाहकाल बारा पासून पंधरा वर्षांच्या वयापर्यंत ठरलेला आहे. पंधरा वर्षांवरील वयाची कोणीही स्त्री अविवाहित नसते. वधूप्रमाणें वराच्या वयाची इयत्ता मात्र ठरींव नाहीं. लग्न नेहमीं सायंकाळीं करण्यांत येतें; व त्यांत वधूप्रवेशाची थाटदार मिरवणूक, हें कृत्य फार महत्वाचें व अत्यावश्यक समजलें जातें. ह्या मिरवणुकींत मूर लोक नवरीला एका जाळीदार अथवा चिटाच्या बुरख्यांत अगदीं गुरफटून टाकितात. इतकेंच नव्हे, तर ते तिला तांबड्या रंगाच्या एका लहानशा पेटींत निर्जीव बाहुलीप्रमाणें दडपून ठेवून पेटी लावून घेतात! मग त्या पेटींतून तिला श्वासोच्छ्वास करण्यापुरता तरी मार्ग ठेवितात कीं नाहीं कोण जाणे! ह्याप्रमाणें वधूची बंगी बंदोबस्तानें केल्यावर ती एखाद्या घोड्याच्या किंवा खेचराच्या पाठीवर आवळून बांधितात, व नंतर तिची मिरवणूक काढितात! मिरवणुकीबरोबर उभयपक्षांचे इष्टमित्र घोड्यांवर बसून अथवा पायीं चालतात. वाद्यें असतात, तीं नांवाला मात्र मंगलवाद्यें!

लग्नरीति.

बाकी त्यांचा आवाज इतका कर्कश आणि भेसूर असतो कीं, त्यानें कपाळ कलकलून कांहीं सुचेनासें होतें! असल्या ह्या रणवाद्यांच्या आवाजांत आणखी स्त्रिया ओरडवेल तितक्या मोठ्यानें "लू लू लू लू" "ली ली ली ली" अशी मंगलगीतें ऊर्फ कोल्हेकुई करीत चालतात! शिवाय, थोरांमोठ्यांचें लग्न असल्यास, एकंदर तुमुल रवांत पुरवणीला आणखी बंदुकाही सोडीत चालतात. अशा रीतीनें वाजत गाजत एकदाची ती वरात वरगृहीं जाऊन पोहोंचते, तों पुढें थट्टा मस्करीचा एकच हजिम्मा माजून राहतो; व त्यांतच वरपक्षाकडून सर्व मंडळीस 'खाना' देण्यांत येतो. लग्नानिमित्त हे खाने आणखी सतत आठ रात्रींपर्यंत चालू असतात. एकंदर कार्यांत धार्मिक विधीचें नांवसुद्धां नसतें! लग्न नोंदण्याची मात्र चाल आहे. सारांश, मूर लोकांत लग्नाची कल्पना ह्मणजे 'खाना, पीना, और मस्त रहना!' ह्या पलीकडे कांहींच नाहीं!

अलजीरिया:-ह्या प्रांतांतील लोकांत एखाद्या मनुष्याचा लग्न करण्याचा विचार झाला, ह्मणजे तो जेथें आपली आवडती कुमारिका रहात असेल, तेथें आपलीं गुरें हांकीत नेतो. तीं मुलीच्या आईबापांनीं पाहिलीं, ह्मणजे ते व ती कुमारिका त्या पुरुषास लग्न करण्या-बद्दल आपली खुषी दर्शवितात. नंतर जातींतील सर्व स्त्रियांस जेवणावळ देण्यांत येते. भोजनोत्तर वधू वराच्या घोड्यावर बसून त्याच्या घरीं जाते. घराच्या दरवाज्यापाशीं ती उतरतांच तिला एक काठी देतात. ती, ती जमिनींत रोंविते, व एक गाणें ह्मणते. त्यांतील आशय असा कीं, ज्याप्र-माणें ही काठी जमिनींत पक्की बसली आहे, त्याप्रमाणें मी माझ्या नवऱ्याला पक्की बांधली गेलें आहे. बळाचा उपयोग केल्यावाचून ही जशी भुईंतून बाहेर निघणार नाहीं, तशीच मीही मरण आल्याशिवाय नवऱ्याच्या ताब्यां-तून निघणार नाहीं; अथवा त्याच्या माझ्या प्रीतींत अंतर पडणार नाहीं. नंतर नवऱ्यानें सांगितलेली कोणतीही गोष्ट करण्यास मी तयार आहे, असें

लग्नरीति.

दाखविण्याकरितांच कीं काय, ती वधू नवऱ्याचीं गुरें पाण्यावर घेऊन जाते, व त्यांस पाणी पाजून आणिल्यावर घरांत प्रवेश करिते. मग उभयतां खानपानांत व आनंदांत कालक्रमणा करितात. सदरहू लोकांत लग्नाचा ठराव मित्रांच्या मध्यस्थीनें होतो. लग्न ठरलें, ह्मणजे वराकडून वधूकडे नजराणे पाठविण्यांत येतात; व तिच्या नातलगांना मेजवान्या दिल्या जातात. वर सांगितल्याप्रमाणें लग्नकृत्य आटोपल्यावर त्या सर्वांस वरपक्षाकडून आणखी एक मोठी जेवणावळ देण्याची चाल आहे. ती जेवणावळ झाली, ह्मणजे समारंभ संपला.

सिंहावलोकन.

येथवर दिलेल्या माहितीवरून आफ्रिकेंतील कित्येक ठिकाणच्या लोकांमध्यें लग्नासंबंधीं चालीरीती कशा काय आहेत, त्या वाचकांच्या ध्यानीं येतील. पूर्व गोलार्धांत विस्ताराच्या मानानें आफ्रिका खंड हें आशियाच्या खालोखाल आहे. परंतु, शिक्षण आणि आचारविचार, ह्या संबंधानें पाहूं जातां त्याचा दर्जा पृथ्वीवरील सर्व खंडांत शेवटचा लागेल ! एतद्देशीय सर्व लोक जरी मुसलमानी धर्माचे आहेत, तरी ते भूगोलाच्या अन्य भागांतील आपल्या धर्मबंधूंइतकेही सुधारलेले नाहींत. इतकेंच नव्हे, पण त्यांच्यापैकीं कित्येक तर अद्यापि अगदींच रानटी स्थितींत आहेत, असें त्यांच्या पूर्वोक्त रीतीभातींवरून व्यक्त होतें. इतर मुसलमानांप्रमाणें त्यांची लग्नसंस्था जरी कराराच्या किंवा संमतीच्या तत्त्वावर असली, तरी तिला तादृश शाश्वती नाहीं. उजव्या हातीं करार आणि डाव्या हातीं फारखत अशी एतद्देशीय लग्न—कराराची दशा आहे! अर्थात् पुरुषानें मर्जीस येईल त्या स्त्रीशीं व स्त्रीनें मर्जीस येईल त्या पुरुषाशीं वाटेल तेथपर्यंत सहवास करावा, आणि वाटेल तेव्हां एकमेकांनीं एकमेकांचा संबंध तोडून टाकावा, हाच प्रकार इकडे बहुतकरून दिसून येतो. बहुपत्नीकत्व, बहुभर्तृकत्व, आणि नीतिशैथिल्य ह्या गोष्टींचा तर एतद्देशीय स्त्रीपुरुषांस विधिनिषेधच नाहीं ! स्त्रिया ह्मणजे शारीरिक अपेक्षा दूर करण्याचीं साधनें, अहोरात्र काबाडकष्ट करणारे मानवपशू, अथवा एक जंगम-

जिंदगी! ह्या पलीकडे शिद्दी लोक त्यांची किंमत समजत नाहींत. तेणें-करून इकडील स्त्रिया मोठ्या शोचनीय निकृष्टावस्थेंत आहेत. पुरुषांनीं वारंवार त्याग केल्यामुळें व ममतेनें न वागविल्यामुळें चारितार्थासाठीं व स्वसंरक्षणासाठीं त्यांना अर्थातच पुनः पुनः लग्नें करावीं लागतात, वाटेल त्याच्या गुलामगिरींत सारें आयुष्य कंठावें लागतें, किंवा अखेर धर्मभ्रष्ट होऊन परपुरुषाश्रय करणें नशीबीं येतें! लग्नसंबंध असा अशाश्वत असल्यानें संततीचीही दुर्दशाच आहे. आतां ह्या स्थितीस अपवादही आढळून येतात; परंतु त्यांची संख्या फार नाहीं. सारांश, आफ्रिकेंतील लग्नसंस्था अगदींच अनवस्थेंत आहे, व तिच्यांत निदान आह्मांला अनुकरणीय असें कांहीं आढळून येत नाहीं; येवढें सांगून आह्मी ह्या रुक्ष प्रदेशांतून आपला पाय लवकरच काढता घेतों!

लग्नविधि व सोहळे.

भाग २ रा.

पाश्चात्य लोकांचीं लग्नें.

विषयप्रवेश.

मागील भागांत पौर्वात्य लोकांचे लग्नसंबंधी धार्मिक विधि, देशाचार किंवा लोकाचार, आणि त्यांच्या कित्येक वेडगळपणाच्या समजुती वगैरे गोष्टींचें वर्णन व क्वचित् प्रसंगीं विवेचनही करण्यांत आलें. आतां, ह्या भागांत **यूरोप** आणि **अमेरिका** ह्या दोन खंडांतील निरनिराळ्या लोकांच्या लग्नसंस्थेविषयीं विचार करणें आहे. एतद्देशीयांस आह्मी **पाश्चात्य** लोक असें ह्मणतों. कालगतीनें, दीर्घोद्योगानें, दैवानुकूलतेनें, किंवा अगाध अशा परमेश्वरी मायेनें व कृपेनें, कोणत्याही कारणानें कां होईना ? पण आजकाल त्यांची चढती व बढती झालेली आहे. तेव्हां **'सर्वे गुणाः काञ्चनमाश्रयन्ते'** ह्या न्यायानें हे लोक ह्मणजे सर्वतोपरी चांगले, असें समजून आह्मीं हल्लीं प्रत्येक बाबतींत त्यांचें अनुकरण करण्याविषयीं सारखे झटत आहोंत; व त्यांच्यासारखी आमची सुधारणा कधीं होईल! अशी मनांत अहोरात्र खंती बाळगीत आहोंत. धार्मिक, औद्योगिक, राजकीय आणि सामाजिक, ह्या विषयांतील प्रत्येक गोष्ट ह्या सुधार-

लेल्या लोकांची कशी, व आमची कशी, एतद्विषयीं आमचे आजकालचे सुशिक्षित देशबांधव तुलना करून राहिले आहेत. सबब, आह्मीं पौर्वात्य आणि पाश्चात्य लोकांच्या लग्नसंबंधी रीतीभाती त्यांजपुढें एकसमयावच्छेदानें सादर करून त्यांतील तारतम्यांचा प्रांजलपणें निर्णय करण्याविषयीं त्यांस विनंति करितों. पाश्चात्य लोक, हे कांहीं उन्नतीच्या शिखरावर एकदम भरारी मारून गेलेले नाहींत. निरनिराळ्या बाबतींत त्यांचें पाऊल क्रमाक्रमानेंच पुढें पडत आलें आहे; आणि त्यांच्या सांप्रतच्या अनेक सुधारणांबद्दल ते मुख्यतः आज अस्तंगत झालेल्या, 'आणि फार प्राचीन अशा **ग्रीक** व **रोमन** ह्या दोन राष्ट्रांचे ऋणी आहेत. कोणत्याही बाबतींत प्रथम सुधारणा ह्या दोन राष्ट्रांत झाली, व नंतर एकंदर पाश्चात्य राष्ट्रांत तिचा प्रसार होत गेला. ही गोष्ट इतिहासावरून व्यक्त होत आहे. प्रकृत विषयांतही त्याच अनुक्रमाचें अवलंबन करणें अधिक सोइस्कर होईल. सबब, आह्मीं प्रथमतः वरील दोन्ही राष्ट्रांत फार प्राचीनकाळीं लग्नासंबंधीं कोणकोणते विधि आणि सोहळे केले जात असत, ते सांगून नंतर आजकालच्या पाश्चात्य लग्नरीतींकडे वळतों.

प्राचीन ग्रीक लोकांची लग्नरीति.

वडिलांकडून वर योजना, देणें घेणें, वराचे गुण, वगैरे.

प्राचीनकालीं ऐन वीरश्रीच्या दिवसांत **ग्रीक** लोकांच्या चालीरीती हल्लींपेक्षां फार निराळ्या होत्या. त्यावेळीं कोणीही गृहस्थ आपल्या मुलीचें पाणिग्रहण आपल्या पसंतीस येईल त्या तरुणाकडून करविण्यास पूर्ण मुखत्यार असे. लग्नसमयीं उभयपक्ष आपापल्या ऐपतीप्रमाणें अरसपरस देणग्या देत घेत असत; आणि लग्नानंतर एखाद्या स्त्रीस तिच्या वास्तविक अपराधावाचून जर सासर सोडून माहेरीं राहण्याचा प्रसंग आला, तर तिला आपलें स्त्रीधन आपल्याबरोबर घेऊन जाण्याची सत्ता असे. ह्या मर्दुमकीच्या कालांत कन्येस मागणी घालणारा कोणीही वर केवळ आपल्या ताकतीनें, हिंमतीनें, जत्रामर्दीच्या खेळांतील आपल्या वाकबगारीनें व कवाइतीनेंच पसंत ठरला जाई! ह्या गुणांच्या प्राबल्यापुढें त्याच्या श्रीमंतीचें किंवा कुलीनतेचें बिलकुल तेज पडत नव्हतें! ग्रीस देशाच्या कित्येक भागांत तर, लग्नसोहळा ह्मणजे अमुक एकानें आपल्या सामर्थ्यानें अमक्या नवरीचें हरण केलें, हें जाहीर करण्याचाच एक प्रकार होता. ह्यावरून फार प्राचीन काळीं एखादें शिताबीचें किंवा धाडसाचें कृत्य करून त्याच्या बक्षिसादाखल **ग्रीक** नवऱ्यास नवरी मिळवावी लागत असे, हें सिद्ध होतें. ही चाल, विशेषेंकरून **स्पार्टन** लोकांमध्यें फार होती. एखाद्या तरुणानें नवरी घरास आणिली, ह्मणजे ती त्यानें बलात्कार किंवा कपटप्रयोग करून तिच्या बापाच्या घराहून पळवून आणिली आहे, असेंच ते लोक समजत असत. लग्नानंतर कोणीही स्त्री आपल्या नवऱ्याकडे येणाऱ्याजाणाऱ्या

लोकांच्या फारशी नजरेस पडत नसे. तथापि, ह्या लोकांत विवाहित स्त्रियांविषयीं एक प्रकारचा आदर होता, व त्याही नवऱ्यांवर आपलें वर्चस्व ठेवीत असत. ही गोष्ट ग्रीक लोकांना अत्याचाराची व घातक वाटे! तथापि, 'स्पार्टन' समाजाचा अर्वाचीन इतिहास अवलोकन करितां त्यांच्या बायकांत जसा प्रौढ व भारदस्तपणा दिसून येतो, तसा ग्रीक स्त्रियांत मुळींच दिसत नाहीं; व ह्यामुळें त्या स्त्रिया अतिशय प्रतिष्ठित अशा रोमन गृहिणींची बरोबरी करण्यास योग्य होत्या. असो. ग्रीस देशांतील बहुतेक संस्थानांत गृहस्थाश्रमाची चहा असे, आणि ब्रह्मचर्य निंद्य मानिलें जाई! तथापि, **लायकरगस्** ह्यानें स्त्रीपुरुष पूर्ण वयांत आल्याशिवाय त्यांस लग्न करण्याची मनाई ठेविली होती.

शरीरसंबंध, वाग्दान, त्याचीं विधानें, वधूवरवचन, व लग्ननिश्चय.

अथेनियन लोकांना परकीय लोकांशीं शरीरसंबंध करण्याची मोकळीक नव्हती. त्यांच्या लग्नकार्यामध्यें औपचारिक रीतीनें वाग्दान करणें, हें कृत्य अत्यावश्यक समजलें जात असे. ग्रीक लोकांत हें वाग्दान अथवा कन्यावरण करण्याच्या अनेक पद्धती होत्या. त्यांपैकीं एका पद्धतींत कन्येचा बाप वरास अनुलक्षून पुढील आशयाचें विधान करीत असे. "आपणांस इजपासून औरस अपत्यें प्राप्त व्हावींत एतदर्थ मी, ही माझी कन्या आपणांस देतों." केव्हां केव्हां ह्या विधानांत कन्येबरोबर ज्या वस्तू अंदण द्यावयाच्या, त्या व्यक्त करण्यांत येत असत. लग्नानंतर उभयतां वधूवरांनीं परस्परांविषयीं एकनिष्ठ आणि शुद्धाचरण ठेवण्याबद्दल त्यांस अगाऊ वचन द्यावें लागे. हें वचन देण्याच्या दोन पद्धती होत्या. एक तर नवरानवरींनीं एकमेकांस चुंबन द्यावें, अथवा उभयतांनीं आपापल्या उजव्या हातानें परस्परांचें पाणिग्रहण करावें. ह्या दोन्ही पद्धतींपैकीं विशेषतः दुसरीचेंच अवलंबन करीत असत, आणि वधूवरांनीं वचनादाखल चुंबन अथवा पाणिग्रहण केलें, म्हणजे त्यांच्या लग्नाचा निश्चय झाला, असें समजलें जाई.

अशा रीतीनें वधूवरांनीं एकमेकांस वरिल्यानंतर लग्नाच्या अधिदेवता प्रसन्न करण्याकरितां यज्ञ करीत असत. **हेमंत** ऋतु हा लग्न करण्याला फारच मंगल व प्रशस्त समय समजला जात होता. त्यांतूनही अथेनियन लोकांत कृष्णपक्ष, व कांहीं ग्रीक लोकांत शुक्लपक्ष अतिशय शुभदायक मानीत होते. लग्नदिवशीं वधूवरें एका विशिष्ट झऱ्याच्या पाण्यानें मंगलस्नान करून नंतर आपापल्या इष्टमित्रपरिवारांसह देवालयास जात असत. ह्या प्रसंगीं इष्टमित्र रस्त्यानें जातांना त्या नवदंपत्याचीं स्तुतिपर अशीं कांहीं गीतें गात असत. देवालयांत गेल्यावर वधूवरांना 'आयव्ही' नामक लतेची एकेक लहानशी फांदी नजर करण्याची चाल होती. ही फांदी दृढतर अशा लग्नसंबंधाचें द्योतक ह्मणून मानिली जाई. ती त्या उभयतांस दिल्यानंतर स्थंडिलावर पशुयज्ञ करीत होते. शुभशकुन पाहण्यासाठीं यज्ञीय पशूंचीं अंतरंगें तपासून पाहण्यांत येत असत.

यज्ञ, लग्नमुहूर्त, व लग्नदिनकृत्यें.

वधूप्रवेश सायंकाळीं अथवा गोरज मुहूर्तावर केला जात असे. तत्संबंधीं मिरवणुकींत वधूला, ज्यास बैल अथवा खेंचरें जोडिलीं आहेत, अशा रथांत एका खालपट आसनावर बसवून नेण्याची चाल होती. ह्या रथांत नवरीशेजारीं नवरा अथवा त्याचा कोणी निकटसंबंधी जन बसत असे. मिरवणूक मोठी थाटाची व प्रेक्षणीय काढीत असत. महाकवि **होमर** ह्यानें आपल्या अनुपम रसाळ वाणीनें ह्या मिरवणुकीचें व एकंदर ग्रीक लोकांच्या लग्नसमारंभाचें फारच मनोहर वर्णन केलें आहे.

वधूप्रवेशाची मिरवणूक.

अगदीं प्राचीन काळीं ग्रीक लोक आपल्या मुलींना कांहीं एक हुंडा-अंदण न देतां त्यांचीं लग्नें लावीत असत; इतकेंच नव्हे, परंतु वरपक्षाकडून उलट देणग्या घेत असत, व त्या देणग्याच वधूच्या अंदण वस्तू अथवा स्त्रीधन समजलें जाई. येवढ्यावरून **अरिस्टॉटल** ह्यानें प्राचीन ग्रीक लोक

कन्याविक्रय, तत्प्रतिबंध, व इतर कांहीं चालीरीती.

सुधारलेले नव्हते, कारण, ते कन्याविक्रय करीत असत; असा त्यांजवर आरोप ठेविला होता. परंतु पुढें लवकरच वरपक्षाकडून देणग्या स्वीकारण्याची चाल बंद पडली, व बाप आपल्या मुलींबरोबर यथाशक्ति हुंडा व अंदण देऊं लागले. मातापितरांच्या पश्चात् ज्या मुली अविवाहित रहात असत, त्यांचे जे कोणी निकट संबंधी असतील, त्यांनीं त्या मुलींस यथाशक्ति हुंडा, अंदण, वगैरे देऊन त्यांचीं लग्नें करावीं, असा रिवाज होता. परंतु, असें करण्यास कुमारिकांना जेव्हां कोणीच वाली नसे, तेव्हां त्यांच्यासंबंधीं सर्व व्यवस्था सरकारांतून केली जाई. अथेनियन कुमारिका आचारनियमांप्रमाणें लग्नास योग्य होण्यापूर्वी त्या **डायना**नामक देवीला अर्पण करण्याची चाल असे. ही देवी कुमारिकांची अधिदेवता आहे, असें मानीत होते. सबब, तिच्या परिचारिकांमधून निघण्याची आपणांस परवानगी मिळावी, एतदर्थ कुमारिका लग्नापूर्वी आपल्या स्वामिनीस एक टोपलीभर कांहीं चिमुकल्या व नवलपरी वस्तू नेऊन अर्पण करीत होत्या. **लॅसिडेमोनियन्** लोकांजवळ फार पुरातन असा एक **व्हीनस ज्यूनो**चा पुतळा होता. ह्या पुतळ्यापुढें आया आपल्या मुलींचीं लग्नें झाल्यावर होमहवन करीत असत.

रोमन लोकांच्या लग्नरीती.

जगत् प्रसिद्ध अशा रोमन लोकांमध्यें कायदेशीर लग्न करण्याच्या निरनिराळ्या तीन रीती होत्या. पहिली **यूसस**, दुसरी **कॉनफॅरेशिओ**,* आणि तिसरी **कोएम्प्शिओ.** ह्यांपैकीं पहिली ह्मणजे यूसस, ही वहिवाटी हक्काच्या

तीन लग्नपद्धती व त्यांपासून उत्पन्न होणारे स्त्रियांचे हक्क, वगैरे.

तत्त्वावर लागू केली होती. ह्मणजे कोणाही तरुणीनें एखाद्या पुरुषापाशीं पुरें एक वर्ष राहून वहिवाटीनें आपण त्याची बायको असल्याचा हक्क संपादन करावा. मात्र ह्या मुदतींत ती तरुणी त्या पुरुषापासून केव्हांही सतत तीन रात्रपर्यंत गैरहाजर असतां कामा नये. ती गैरहाजर राहिली, तर तिनें आपली वहिवाट मोडून पत्नीत्वाच्या हक्कास बाध आणिला, असें समजलें जाई. कॉनफॅरेशिओ नामक पद्धतींत वरिष्ट धर्मगुरु, हे निदान दहा साक्षीदारांसमक्ष वधूवरांस एकत्र करून,—अर्थात् त्या एकमेकांचे हातांत हात घालून—त्यांजकडून कांहीं एक विधान करवीत असत; आणि देवतांना यज्ञामध्यें अजापुत्रासह अवदान दिलेल्या 'फार' नामक खाऱ्या रोटीचा पुरोडाश वधूवरांकडून भक्षण करवून त्यांचें लग्न लावीत असत. ही पद्धति सर्वांत चांगली व उदात्त होती; आणि तिनें लावण्यांत आलेलें लग्न **डिफॅरेशिओ** नामक दुसरा यज्ञ केल्याखेरीज मोडिलें जात नसे. कॉनफॅरेशिओ नांवाचा यज्ञ केल्यानें धर्मनियमांप्रमाणें स्त्री आपल्या पतीच्या स्वाधीन होत असे; आणि

* वस्तुतः ही संज्ञा विवाहहोमाची आहे. तत्रापि, तो होम ज्या विवाहपद्धतींत केला जात असे, तिलाही कॉनफॅरेशिओ असेंच ह्मणत होते.

नंतर ती त्याच्या सर्व मालमत्तेंत, व त्यानें करावयाच्या धर्मकृत्यांत त्याची वांटेकरीण समजली जाई. जर तिचा नवरा निपुत्रिक आणि निवारशी होत्साता मरण पावला, तर त्याच्याशीं कॉनफॅरेशिओ पद्धतीनें विवाहित असलेली त्याची बायको, ही त्याच्या सर्वस्वाची मुलीप्रमाणें वारस मानिली जाई; आणि जर नवऱ्यास पुत्रसंतान असलें, तर त्याच्या मालमत्तेंत त्याच्या मुलाचा आणि अशा स्त्रीचा भाग समसमान असे. अशा रीतीनें ह्या विवाह-पद्धतीनें स्त्रीचे हक्क स्थापित केले होते. परंतु पुढें ही विवाहपद्धति प्रचारांत राहिली नाहीं; आणि ह्मणूनच **सिसरो** ह्यानें फक्त यूसस आणि कोएम्प्-शिओ अशा दोनच लग्नरीती सांगितल्या आहेत. **कोएम्प्शिओ** नामक पद्धतीत नवरानवरीं एकमेकांस कांहीं द्रव्य देऊन व एक प्रकारचें विधान करून लग्न लावीत असत. हें विधान पुढील आशयाचें होतें. नवऱ्यानें नवरीस विचारावयाचें कीं, 'तूं माझी घरधनीण होण्याला खुषी आहेस काय?' ह्या प्रश्नास नवरीनें उत्तर द्यावयाचें कीं, 'होय, मी खुषी आहे.' तसेंच नवरीनें नवऱ्यास घरधनी होण्याबद्दल विचारावयाचें, व त्यानें तिला आपली खुषी व्यक्त करावयाची. ह्या पद्धतीनेंही स्त्रीला वरसांगितल्या-प्रमाणेंच वारसाईसंबंधीं मुलीचे सर्व हक्क प्राप्त होत असत. व्यवहारामध्यें ती आपल्या नांवापुढें नवऱ्याचें नांव लावीत असे; व आपली सर्व मालमत्ता-नवऱ्याच्या स्वाधीन करून त्यास आपला धनी--आपला देव--मानीत असे. हुंड्याखेरीज नवरी नवऱ्याच्या येथें जी चीजवस्त आणीत होती, तिला **पॅराफर्ना** अशी संज्ञा होती. प्रजासत्ताक राज्य झाल्यावर अगदीं पहिल्या पहिल्यानें जीं लग्नें झालीं, त्यांत हुंड्याची रकम फारच थोडी असे; व केव्हां केव्हां त्या रकमेचा कांहीं भाग, व एक दासी, इतकें स्त्री आपल्या स्वाधीन ठेवीत होती. त्यावर नवऱ्याची मालकी नसे. कोणी ह्मणतात कीं, कोएम्प्शिओ ही लग्नपद्धति कॉन्फॅरेशिओच्या मागून अस्तित्वांत आली, व तिच्या अभावीं चालू राहिली. विवाहित स्त्रीला बहुमानार्थ **मेट्रोनी** अशी संज्ञा होती. दासदासी ह्यांच्या लग्नास **कॉन्टयुबरनियम्**, आणि लग्न झालेल्या गुलाम नवराबायकोस **कॉन्टयुबरनेल्स** असें ह्मणत असत.

रोमन लोकांचे शरीरसंबंध फक्त **रोम** शहरांत राहणारांशींच होत असत. त्यां व्यतिरिक्त इतर संबंध न्याय्य मानिले जात नव्हते. असे संबंध करण्याला लोकांची, एका विशिष्ट सभेची, व पुढें पुढें तर खुद्द बादशहाची परवानगी मिळवावी लागे। तसेंच दास्यमुक्त झालेल्या स्त्रीशीं विवाह करण्याची मनाई होती; आणि ह्मणूनच **अँटनीनें फलव्हियाशीं** लग्न लाविल्याबद्दल **सिसरो** ह्यानें त्याचा उपहास केला होता. दासीशीं लग्न तर राहूंच द्या, परंतु एकाच प्रांताच्या आसपासच्या भागांतील प्रतिष्ठित गृहस्थाच्या कन्येशीं केलेला शरीरसंबंध देखील फारसा खपत नसे! इतकेंच नव्हे, परंतु **इतालीं**तील कित्येक संस्थानांमध्यें तर लोकांस व्यवहारांत **लॅटिन** भाषा नुसती बोलूंही देत नसत! कोण हा स्वाभिमान! काय ही स्वदेशभक्ति!! रोमन मुलांमुलींनीं परकीयांबरोबर लग्न लाविल्यास त्यांजपासून जी संतति होई, तिला रोमन लोक असल मानीत नसत! व त्या संततीची योग्यता गुलामांपेक्षां मुळींच अधिक नसे!

शरीरसंबंध.

बहुपत्नीकत्वाची सक्त मनाई होती! परंतु पुनर्विवाहास मात्र प्रतिबंध नसे.

बहुपत्नीकत्व, व पुनर्विवाह.

कोणाही तरुणास अथवा तरुणीस आपल्या मातापितरांच्या किंवा पालकांच्या संमतीवाचून लग्न करण्याचा प्रतिबंध असे. लग्नकराराच्या शर्ती ठरविण्यासाठीं हमेष मुलीच्या बापाच्या घरीं उभयपक्षांच्या इष्टमित्रांची सभा भरत असे, व त्या सभेंत कराराच्या एकंदर अटी कोष्टकरूपानें लिहून त्यावर मोहोर केली जात होती. ह्या वरणलेखास **स्पॉन्सॅलिया** अशी संज्ञा होती; आणि त्या अन्वयें जो तरुण वरिला गेला, त्यास **स्पॉन्सस्** व जी तरुणी वरिली गेली, तिला **स्पॉन्सा** असें ह्मणत असत. सदरहू करार, संकेत अथवा वायद्याप्रमाणें लिहीत असत. ह्मणजे ठरलेला हुंडा लग्नदिवशीं अगर त्यानंतर वेगवेगळ्या तीन हप्त्यांनीं देऊं, अशी त्यांत बोली करीत असत. करार होण्याच्या

सोयरीक जमविण्याची रीति.

दिवशीं एक मेजवानी देण्यांत येत असे; व नवरा नवरीच्या डाव्या अनामिकेंत 'विवाहवचन' ह्मणून एक आंगठी घालीत असे. ती ह्याच बोटांत घालण्याचा उद्देश असा कीं, त्या बोटांतून हृदयापर्यंत एक मज्जातंतु गेला आहे; सबब, तो तंतु नवऱ्यानें प्रेमपूर्वक दिलेलें लग्नवचन नवरीच्या अंतःकरणास पोंचवील,—त्यावर तें वचन कोरून ठेवील,—अशी समजूत. करार झाल्यावर उभय पक्षांतून कोणी लग्नास माघार घेतली, तर त्यास नकार अथवा त्याग अशा अर्थाची '**रेप्यूडिअम्**' अशी संज्ञा होती.

लग्नमुहूर्त.

वर सांगितल्याप्रमाणें 'स्पॉन्सॅलिया' नामक लग्न—करार झाल्यावर लग्नमुहूर्त नेमिला जाई. वर्षांतील कित्येक दिवस मंगलप्रद मानीत नसत. विशेषेंकरून इंग्रज ज्याला मे असें ह्मणतात, तो सर्व महिना आणि कित्येक '**ॲट्री**' संज्ञक दिवस, हे रोमन पंचांगांत कृष्ण चिन्ह करून अशुभ मानिले जात होते. तसेंच, कित्येक दिवस उत्सवाचे असूनही ते मंगलकार्यास वर्ज्य ह्मटले होते. अशा दिवशीं पुनर्विवाह करण्याला मात्र हरकत नसे. ह्यावरून विधवापुनर्विवाह रोमन लोकांच्या मतेंही गौणच होता, असें उघड दिसून येतें. जून महिन्यांतील कित्येक दिवस फारच मंगलप्रद व प्रशस्त धरण्यांत आले होते; व बहुधा ह्याच दिवसांत प्रथमवधूवरांचीं लग्नें लावीत असत.

वधूवेश.

लग्नदिवशीं नवरी एक पांढऱ्या रंगाचा लांब झगा घालीत असे. ह्या झग्यास जांबळ्या अथवा जरतारी फितींची झालरवजा किनार लाविलेली असे. ह्या झग्यावरून एक लोंकरीचा कमरबंद बांधण्याची चाल होती. त्याची गांठ पुढें नवऱ्यानें सोडावयाची. नवरी आपल्या तोंडावरून मर्यादेसाठीं तांबड्या अथवा शेंदरी रंगाचा एक बुरखा घेत असे. तिचे केंस भाल्याच्या टोंकानें निरनिराळ्या सहा पदरांत विभागून त्यांवर फुलें गुंफीत असत. तिचे जोडे बुरख्याप्रमाणेंच लाल रंगाचे असत.

दिनशुद्धि पाहिल्यावांचून आणि लग्नकार्याची अधिदेवता जी ज्यूनो, तिला यज्ञहविर्भाग दिल्यावाचून कोणतेंच लग्न होत नसे. प्राचीन काळीं ह्या लोकांत लग्नसमयीं शूकरयज्ञ करून त्या पशूच्या पित्ताशय बाहेर काढून फेंकून देत होते. समजूत अशी कीं, तो फेंकून दिल्यानें लग्नकार्यांतून एकंदर कडू दूर होतें. लग्नसमारंभ कन्यापित्याच्या घरीं किंवा त्याच्या निकट

ज्यूनोला यज्ञहविर्भाग देणें, शूकरयज्ञ, वधूप्रवेश व तत्संबंधी सोहळे.

आप्ताच्या घरीं होत असे. सायंकाळीं अथवा गोरज मुहूर्तावर नवरीला मिरवीत नेऊन नवऱ्याच्या घरीं पोंचवीत असत. प्रथम तिला तिच्या आईच्या अथवा आप्त स्त्रीच्या मिठींतून बलात्कारें ओढिल्यासारखी करून नंतर तिची मिरवणूक काढीत होते. हें कृत्य इतालींतील 'सेबाइन' जातीच्या स्त्रियांवर जो जुलूम केला जात असे, त्याचें द्योतक ह्मणून करण्याची चाल पडली होती. नवरीसमागमें ज्यांचीं आईबापें जीवमान आहेत, अशीं तीन मुलें जात असत. त्यांपैकीं दोघे तिचे हात धरीत, व तिसरा तिच्यापुढें देवदाराच्या लांकडाची मशाल पेटवून चाले. तिच्या अग्रभागीं आणखी पांच मशाली चालवीत असत, व तिच्या मागून मोलकरणी स्त्रिया सूत कातण्याचीं आयुधें व लोंकर घेऊन चालत असत. ह्याचा उद्देश असा कीं, जुन्या काळच्या रोमन स्त्रिया जशा आपल्या घरीं सूत कातण्याचा धंदा करीत होत्या, त्याप्रमाणें ही नवी नवरीही आपल्या नवऱ्याच्या घरीं गेल्यावर सूत कातीत जाईल, असें समजावें. त्याचप्रमाणें ती घरीं गेल्यावर घराच्या किल्ल्या तिच्या हवालीं करण्याची चाल होती. त्यांतील उद्देश असा कीं, घराची सर्व व्यवस्था आतां तिच्या स्वाधीन केली आहे, असें दाखवावयाचें. तिनें लोंकर पिंजण्याचा धंदा करावा, असें सुचविण्यासाठीं तिला बसावयास मेंढराचें कातडें अंथरीत असत. नंतर ती व तिचा नवरा असे उभयतां पाण्याला व अग्नीला स्पर्श करीत असत. कारण, ह्या दोन महाभूतांपासून सर्व वस्तूंची उत्पत्ति होते, अशी त्यावेळची समजूत असे. हें झाल्यावर तीं उभयतां आपापलें पादप्रक्षालन करीत. ह्याप्रसंगीं नवरा नवरीच्या

इष्टमित्रांस व मोलकरणींस एक मेजवानी देत असे. मेजवानी चालू असता वाजंत्री वाद्यांतून एक लग्नगीत ह्मणत असत. कोणी असें ह्मणतात कीं, प्राचीनकाळीं रोमन नवरानवरींच्या मानेवर एक जूं अथवा जोखड देण्याची चाल होती! व तें दिल्यामुळेच त्या उभयतांस 'युग्म' ह्या अर्थाची **कॉन्जुग्ज** अशी संज्ञा होती. इतरांच्या मतें ही संज्ञा केवळ लाक्षणिक होय. असो. ह्याप्रमाणें प्राचीनकाळीं रोमन लोकांत लग्नासंबंधीं विधि व सोहळे केले जात होते. त्यांच्या पुष्कळ चालीरीती ग्रीक लोकांच्या व आमच्या चालीरीतींशीं मिळत्या येतात, असें मार्मिक वाचकांच्या ध्यानांत आल्याशिवाय राहणार नाहीं.

रोमन कॅथलिक पंथाचा लग्नविधि.

प्राचीन ग्रीक व रोमन लोकांच्या विवाहाचीं तत्त्वें.

अगदीं प्राचीन काळीं, ह्मणजे ख्रिस्ति धर्माचा प्रसार होण्यापूर्वी **ग्रीक** व **रोमन** लोकांच्या लग्नरीती कशा होत्या त्यांची माहिती वर दिली आहे. तीवरून असें दिसून येईल कीं, ग्रीक लोकांत प्रथमतः **शुल्क** अथवा **आसुर** विवाह रूढ होता. ह्मणजे ग्रीक पिता वरापासून द्रव्य घेऊन त्यास कन्या देत असे. परंतु पुढें जसजशी सुधारणा होत गेली, तसतशी त्यांच्यांतील ही कन्याविक्रयाची चाल नाहींशी होऊन उलट बापच मुलींबरोबर अंदण ह्मणून यथाशक्ति कांहीं द्रव्य अथवा अलंकार देऊं लागले. ह्मणजे **ब्राह्म** पद्धतीनें विवाह करूं लागले, असें ह्मणण्यास फारशी हरकत नाहीं. रोमन लोकांतील लग्नसंस्था बहुधा कराराच्या तत्त्वावर होती. तत्रापि, कराराशिवाय त्यांच्या लग्नांतील बरींच कृत्यें ग्रीक लोकांप्रमाणेंच केलीं जात असत. असो.

रोमन कॅथलिक पंथाच्या लग्नविषयक कल्पना व निर्बंध.

नंतर पुढें **प्रभुसत्तेनें** ख्रिस्ति धर्माचें बीजारोपण झालें, व परिस्थिति अनुकूल होतांच तो धर्मांकुर वाढीस लागून खुद्द **रोम** शहरामध्येंच त्याचा वृक्ष झाला. येथें त्या धर्माची जी आदि संस्था स्थापन झाली, तिला **रोमन कॅथलिक चर्च** अशी संज्ञा देण्यांत आली, व **पोप** हे तिचे मुख्य धर्माध्यक्ष अथवा महंत बनले. मग त्यांनीं आपल्या अनुयायिवर्गास आचारनियम घालून दिले. त्यांत लग्नासंबंधीं त्यांच्या ज्या कल्पना व निर्बंध आहेत, ते पुढें लिहिल्याप्रमाणें:—

लग्न हा एक **धर्मसंस्कार** होय; व तो पौरुषेय नसून **तारकप्रणीत** आहे. स्त्रीपुरुषांचा पवित्र संयोग व्हावा, त्यांनीं प्रजा निर्माण करावी, त्या प्रजेच्या ठायीं ईश्वराविषयीं भीति व प्रीति उत्पन्न व्हावी, तसेंच स्त्रीपुरुषांनीं परस्परांस साहाय्य आणि सुख द्यावें, आणि आपल्या औरस संततीला यथायोग्य आत्मज्ञान व शिक्षण देऊन त्यांच्या द्वारें ख्रिस्तिधर्मसंवर्धनास हातभार लावावा, हे लग्नाचे मुख्य उद्दिष्ट हेतू होत; आणि ह्याच हेतूंनीं **तारक प्रभु** जो **श्रीयेशू** त्यानें ही लग्नसंस्था निर्माण केली आहे, असें **पोपादि** रोमन कथलिक समजतात. त्यांच्यांत लग्नापूर्वी वधूवरांनीं एकमेकांस पसंत करून स्वीकारण्यांत येतें. ह्या कृत्यास '**बिट्रॉथल**' अशी संज्ञा आहे. तें झाल्यानंतर लग्नासंबंधीं एकंदर शर्तीचा लेख, अथवा रीतसर करार करण्यांत येतो. नंतर ज्या ज्या गांवीं वधू आणि वर रहात असतील, तेथील देवालयांमधून **मास**प्रार्थना चालू असतां, जमलेल्या भक्तमंडळीमध्यें भावी लग्नासंबंधीं जाहिरात निरनिराळ्या तीन प्रसंगीं प्रसिद्ध केली जाते. ह्या जाहिरातींस **बान्स** असें ह्मणतात, व ते प्रसिद्ध करण्याचा उद्देश असा कीं, भक्तमंडळींतून कोणाला त्या भावी लग्नास कांहीं हरकत करावयाची असल्यास, ती त्यानें लग्नाची जाहिरात प्रसिद्ध होत असतां कारणांसहित पुढें आणावी. पातिव्रत्य व एकपत्नीव्रत पाळणें, मनुष्यवध न करणें, धर्मभ्रष्ट न होणें, इत्यादि एकंदर चवदा निर्बंधनें आहेत, व तीं पाळण्याविषयीं वधूवरांना लग्नापूर्वी शपथ घ्यावी लागते. ती घेतल्याशिवाय लग्न होण्याला हरकत असते. त्याचप्रमाणें ज्या वधूनें अथवा वरानें बाप्तिस्मा घेतला नसेल, त्याचें लग्न होऊं शकत नाहीं. पूर्वी वरामध्यें प्रजोत्पादनाचें सामर्थ्य आहे किंवा नाहीं, याविषयीं एखाद्या ख्रिस्तिधर्मशास्त्र्या-पुढें अथवा वृद्ध कुलीन स्त्रीपुढें चौकशी करण्याची चाल होती. परंतु ही चाल सुमारें शें सवाशें वर्षे चालून नंतर सतराव्या शतकांत बंद पडली. असो. येथपर्यंत ह्या पंथाची लग्नविषयक कल्पना व लग्नासंबंधीं कित्येक निर्बंध सांगितले. आतां पोपविहित लग्नविधीकडे वळतों.

लग्नविधि.

धर्मोपदेशक मुख्य धर्माधिकाऱ्याचा वेश धारण करून व्यासपीठावर जातात. त्यांच्या अग्रभागीं देवालयाचे दोन कारकून आपापल्या हुद्यांचीं वस्त्रें परिधान करून चालत असतात. त्या कारकुनांच्या हातीं पवित्रोदकानें भरलेलें एक विशिष्ट असें पात्र, तें उदक सिंचन करण्याचें उपकरण, लग्नसंस्काराचा ग्रंथ, आणि आंगठीचें अभिमंत्रण करितांना ती ठेवण्यासाठीं एक तबकडी, येवढें साहित्य असतें. प्रथमतः धर्मोपदेशक वधूवरांसाठीं परमेश्वराची एक ठरींव प्रार्थना करितात. ती आटोपल्यावर ते व्यासपीठाच्या सरतेशेवटच्या पायरीवर येऊन उभे राहतात. मग त्यांच्या समोर वधूवरें उभीं राहतात. अशा रीतीनें कीं, वराच्या डाव्या हातास वधू, अथवा तिच्या उजव्या हातास वर असावा. उभयपक्षांचे इष्ट-मित्र वधूवरांच्या पाठीमागें उभे असतात. ह्याप्रमाणें सर्वजण आपापल्या ठिकाणीं उभे राहिल्यावर धर्मोपदेशक नवरानवरींस त्यांचीं नांवें आणि आडनांवें विचारितात. वस्तुतः हीं नांवें अगाऊ लग्नाच्या जाहिराती प्रसिद्ध करितांना, व त्या केल्याबद्दल वधूवरांस दाखला देतांना धर्मगुरूंस माहीत झालेलीं असतात. तत्रापि, ह्याप्रसंगीं तीं केवळ उपचारार्थ विचारण्याची चाल आहे. असो. आपल्या लग्नास कोणाचीही आडकाठी नाहीं, अशा आशयाचा दाखला वधूवरांना ह्याच वेळीं सादर करावा लागतो. तो त्यांनीं केल्यानंतर धर्मगुरु त्यांस त्यांच्या नांवांनीं संबोधून त्यांच्या भाषेंत वेगवेगळें विचारितात कीं, 'ही बायको व हा नवरा तुह्मांला पसंत आहे काय?' ह्या गोष्टीस त्या उभयतांचा रुकार अवश्यमेव असावा लागतो. तो न मिळाल्यास लग्न होतच नाहीं, व झालें, तरी तें व्यर्थ होय. अर्थात् वधूची तशीच वराची संमति, हें विवाहाचें प्रमुखांग समजलें जातें. ही संमति त्यांनीं 'होय' ह्मणून शब्दांनीं अथवा तद्दर्शक अशा कांहीं चिन्हांनीं व्यक्त केली, ह्मणजे नंतर धर्मोपदेशक आपल्या अंगावरील मुख्य धर्माध्यक्षाचा जो पोषाक असतो, तो काढून ठेवितात, आणि नवरानवरींचे हात घेऊन ते एकमेकांत घालितात. ह्याप्रमाणें वधू-

वरांनी परस्परांचें पाणिग्रहण केल्यावर धर्मोपदेशक त्या उभयतांस अनुलक्षून "Ego jungo vos in matrimonium &c." ह्मणजे 'मी परमेश्वराला स्मरून विवाहानें तुह्मां दोघांचें एकीकरण करितों,' इत्यादि विधान करितात. तदनंतर ते त्यांजवर क्रूसचें चिन्ह करून पवित्रोदकाचें अभिषिंचन करितात. हें झाल्यावर धर्मगुरु लग्नमुद्रिका ह्मणजे लग्नप्रसंगीं वरानें वधूस घालावयाची आंगठी घेऊन तिजवरही क्रूसच्या आकृतीप्रमाणेंच त्या पवित्रोदकाचें सिंचन करितात. मग ती मुद्रिका वराच्या हातीं देऊन त्याजकडून ती वधूच्या डाव्या हाताच्या अनामिकेंत घालवितात. ही लग्नमुद्रिका वधूच्या पातिव्रत्याची,—एकनिष्ठ वर्तनाची,—एक मूर्तिमंत प्रतिज्ञाच आहे असें समजतात. मुद्रिकाधारण झाल्यावर धर्मोपदेष्टे ईशप्रार्थना करितात; व तत्पश्चात् त्या नवविवाहीत दंपत्यास व एकंदर जमलेल्या मंडळीस कांहीं हितोपदेश करून नंतर **मास** नामक प्रार्थना करितात.

आशीर्वाद विधि, उपदेशपर व्याख्यान व प्रोक्षण.

चालू विवाह हा वधूचा प्रथमविवाह असल्यास, व तिच्या ठायीं पातिव्रत्याविषयीं आदरबुद्धि असल्यास, स्तोत्रगायन होऊन 'मास' आटोपल्यावर धर्मगुरु त्या नवदंपत्यास आशीर्वाद देण्यासाठीं कांहीं विधि करीत असतात. ते व्यासपीठाच्या पायऱ्यांजवळ उभे राहतात, आणि तेथें तें नवदंपत्य आपणांस योग्य वाटेल त्या प्रकारचें हवन करितें. हवनविधि पहिल्यानें नवऱ्याच्या हातून, व नंतर नवरीच्या हातून करविण्यांत येतो. तसेंच धर्मगुरु कांहीं स्तोत्रपाठ करितात, आणि वधूवरांस बुद्धिवाद सांगून एकंदर कृत्याची परिसमाप्ति करण्यांत येते. ह्या बुद्धिवादांत गृहस्थाश्रमांतील कर्तव्यकर्में, लग्नाचे उद्दिष्ट हेतू, परस्परप्रीति, इत्यादि गोष्टींविषयीं व्याख्यान असतें. तें झाल्यावर धर्मगुरु त्या नवदंपत्यास पवित्रोदकानें प्रोक्षण करितात.

रोमन कॅथलिक पंथांतील नियमान्वयें वधूवरांनी देवळांत जाऊन

ह्या पंथाच्या कांहीं चाली-रीती.

विधिविधानतः गुरूचे आशीर्वाद घेतल्याखेरीज त्यांस एका घरांत किंवा एकमेकांसंगतीं एकांतांत राहतां येत नाहीं; व त्यांनीं तसें केल्यास तो धर्मशास्त्रदृष्ट्या अपराध समजला जातो. तसेंच ह्या पंथांत, वधूवरांनीं प्रथमतः ज्या शय्येवर शयन करावयाचें, ती शय्या धर्मगुरूंकडून अभिमंत्रण व प्रोक्षण करून घ्यावी लागते. त्याची रीति अशी कीं, धर्मगुरु त्या जोडप्यास अनुलक्षून प्रजाभिवृद्धि करण्यास अनुमोदन देतात, व त्यांचा बिछाना पवित्रोदकानें प्रोक्षण करितात, ह्मणजे झालें.

ग्रीक देवालयाच्या पंथाचा लग्नविधि.

लग्नाच्या कचेरींतील कित्येक कृत्यें.

ग्रीस देशांत लग्नासंबंधीं कचेऱ्या आहेत. त्यांत वधूच्या कल्याणार्थ एक ईश्वरप्रार्थना करण्यांत येते. ही प्रार्थना होते असतां वधूनें आपल्या अंगावर एक मोठा थोरला बुरखा घेतलेला असतो. जो कुमार आणि जी कुमारी आपणांस विवाहबंधनांत एकत्र बांधून घेण्यास खुषी असतील, तीं लग्नाच्या कचेरींत **मास**ची प्रार्थना झाल्यावर आपला लग्नसंस्कार केला जाण्याविषयीं धर्मगुरूस अर्ज देऊन त्यांजपुढें उभीं राहतात. वर उजव्या बाजूस आणि वधू डाव्या बाजूस उभी राहते. तेथेंच एक मेज ठेविलेलें असतें. त्याच्या उजव्या अंगास दोन आंगठ्या ठेवितात. त्यांपैकीं एक सोन्याची व दुसरी चांदीची असते; आणि पहिली वराकडे व दुसरी वधूकडे सोयीची करून ठेवितात. विधि करणारा धर्मगुरु वधूवरांवर अनेक वेळां क्रूसचीं चिन्हें करितो, त्यांच्या हातीं प्रज्वलित मेणबत्त्या देतो, आणि क्रूसच्या आकृतीप्रमाणें त्यांजवरून धुपाटणें उतरून नंतर त्यांना घेऊन देवालयास जातो.

लग्नविधि.

तेथें अनुक्रमें मंदिरांतील वाजंत्र्यांचा ताफा (Choir), आणि धुपाटणें फिरविणें वगैरे कामें करणारा शेवटच्या दर्जाचा कोणी धर्माधिकारी (Deacon), ह्या उभयतांकडून नवरानवरींची सर्वतोपरी बढती व्हावी, व त्यांस सुप्रजा प्राप्त व्हावी, एतदर्थ ईश्वरप्रार्थना केल्या जातात. त्या झाल्यावर धर्मगुरु सोन्याची मुद्रिका नवऱ्याच्या हातीं व चांदीची नवरीच्या हातीं देऊन तीन वेळां पुढील विधान करितात. "I join (or I tie) M. and N. these servants of the

Almighty here present, in the name of the Father &c," ह्मणजे "मी, सर्वशक्तिमान् आणि सर्वसाक्षी अशा परमेश्वराला स्मरून त्याच्या (वधूवरांचीं नांवें घेऊन) ह्या सेवकांस एकत्र (अथवा बद्ध) करितों." हें विधान झाल्यावर धर्मगुरु नवऱ्याच्या हातांतील मुद्रिकेनें त्याच्या कपाळावर आणि नवरीच्या हातांतील मुद्रिकेनें तिच्या कपाळावर क्रूसचें चिन्ह करितात; आणि मग त्या मुद्रिका त्यांच्या उजव्या हातांच्या अनामिकांत घालितात. तदनंतर नवरीकडील करवला (paranymph, or brideman,) नवरा-नवरींच्या आंगठ्यांची अदलाबदल करितो, व धर्मगुरु एक लांबलचक पाठ वाचितात. (ह्या पाठांत लग्नमुद्रिकामाहात्म्य वर्णिलेलें आहे.) तो वाचून झाल्या-वर धर्मगुरु नवरानवरींस एकंदर परिवारासह मिरवीत मिरवीत देवाळयाच्या सभामंडपांत आणितात. ह्या मिरवणुकीच्या अग्रभागीं ते आपल्या परि-चारकगणासह चालत असतात. ह्या वेळीं ते स्वत: आपल्या हातीं धुपाटणें घेतात, व मुखानें १२८ वें स्तोत्र गात चालतात. ह्या स्तोत्रांत विश्वासू अशा **यहूदी** (Jew) लोकांस तुमची लग्नसंस्था वृद्धिंगत आणि सफल होईल असें वचन आहे. स्तोत्रांतील प्रत्येक श्लोकाच्या अंतीं एकंदर भक्तजन आपल्या **पित्याचा** जयजयकार (Doxology or the Gloria Patri) करितात. अशा रीतीनें स्तोत्र पुरें होतांच धुपाट-ण्यावरील धर्माधिकारी (Deacon) पुन: कांहीं प्रार्थना करितो, व मंदीरचे वाजंत्री त्या प्रार्थना वाद्यांतून वाजवितात. हें कृत्य आटोपल्यावर धर्मगुरु नवऱ्याच्या डोकीस लग्नमुकुट घालितात, व तो घालितांना पुढील विधान करितात. "This man, the servant of the Lord, is crowned, inorder to be married to this woman, &c." ह्मणजे, "ह्या पुरुषाचें—ह्या **प्रभु**सेवकाचें—ह्या स्त्रीशीं लग्न लावण्यासाठीं त्याच्या डोकीस मुकुट घातला आहे." ह्याचप्रमाणें धर्मगुरु नवरीसही मुकुट घालितात, आणि वरील आशयाचें विधान करितात. नंतर ते त्या जोडप्यास त्रिवार आशीर्वाद देऊन कांहीं पाठ व प्रार्थना करितात.

मद्यप्राशन, लग्न-मुकुटविसर्जन व विधिसमाप्ति.

तदनंतर ते पूर्वी अभिमंत्रण करून तयार असलेला एक मोठा मद्याचा पेला घेऊन तो नवरानवरींस देतात. त्या उभयतांनीं त्यांतील मद्य प्राशन केल्यावर गुरूजी त्यांच्या डोकींचे मुकुट उतरून ठेवितात. पुढें आणखी एक प्रार्थना, आशीर्वचन, आणि धन्यवाद हीं कृत्यें झाल्यानंतर लग्नविधि आटोपतो.

हा लग्नविधि जे खिस्ती लोक **ग्रीक देवालया**च्या सांप्रदायाचे आहेत, त्या सर्वांसही लागू आहे असें समजावें.

प्रॉटेस्टंट पंथाचा लग्नविधि.

जाहिराती देऊन लग्न निर्विघ्न व निश्चित करणें.

कोणी भलताच कुमार आणि भलतीच कुमारी विकारवश होत्सातीं चोरून परस्परांशीं लग्न करण्यास प्रवृत्त होऊं नयेत, आणि झाल्यास त्या लग्नाला त्यांच्या आईबापांस किंवा पालकांस हरकत करितां यावी, अशा उद्देशानें **'बान्स'** ह्मणजे लग्नाच्या जाहिराती देण्यांत येतात. त्या दिल्याशिवाय लग्नच होऊं शकत नाहीं; आणि कदाचित् झालें तर तें व्यभिचार अथवा कौमार्य भ्रष्ट करणें, ह्यांसारखें अन्याय्य समजें जातें. अर्थात् तें करणारांस त्या अपराधांबद्दल जी शिक्षा ठरलेली आहे, ती भोगावी लागते. वधूवरें ज्या ठिकाणीं रहात असतील, तेथील देवालयामध्येंच त्यांच्या लग्नाच्या जाहिराती द्याव्या लागतात, व ज्या देवालयांत त्या दिल्या, त्याच देवालयांत त्यांनीं लग्न लावावें, असा निर्बंध आहे. ज्या दिवशीं लग्नविधि व्हावयाचा, तत्पूर्वींच्या लागोपाठ तीन रविवारीं सकाळीं, देवालयांत धर्मोपदेशकांनीं दुसरा पाठ संपविला, ह्मणजे जाहिराती देण्यांत येतात. तसेंच जाहिरात देण्यापूर्वी वधूवरांचीं नांवें, पत्ते, आणि सदरहू ठिकाणीं तीं केव्हांपासून रहात आहेत, ह्या संबंधानें धर्मोपदेशकांस सात दिवस अगाऊ खबर द्यावी लागते. वधूवरांतून कोणाचेंही वय लग्नायोग्य झालें नसल्यास, जाहिरात दिली जातांना अल्पवयस्काच्या मातापितरांनीं किंवा पालकांनीं त्या लग्नास आपली नामंजुरी कळवावी, ह्मणजे ती जाहिरात रद्द होते, व लग्न मोडून पडतें. अल्पवयस्क वधू-

वरांच्या लग्नास रुकार देण्याचा अधिकार बाप, कायदेशीर पालक, अविवाहित माता! किंवा, जो गृहस्थ सरकारानें त्या अल्पवयस्काचा पालक ह्मणून नेमिला असेल तो, इतक्या इसमांतून क्रमाक्रमानें कोणाही एकालाच असतो; आणि रुकार देणारी व्यक्ति जर तसें करण्यास मनानें असमर्थ असेल, तर त्या व्यक्तीऐवजीं 'लॉर्ड चान्सेलर' ह्यांची संमति घेतली असतां चालते. पण अशी संमति न घेतल्याबद्दलचा बाध लग्न लागून चुकल्यावर त्यास येऊं शकत नाहीं. वधूवरें योग्य वयस्क असलीं, तरी **आंग्लदेवालया**च्या नियमान्वयें त्यांच्या लग्नास आणखी चार प्रकारच्या हरकती आहेत. (१) त्या दोघांतून कोणी प्रथम संबंध केलेला असणें, अथवा त्याविषयीं करार केलेला असणें. (२) उभयतांतून कोणावर पूर्वोक्त गोष्टीचा आरोप अथवा फिर्याद झालेली असणें. (३) वधूवरें एकमेकांची आप्त असणें. आणि (४) त्यांच्या संबंधास मातापितरांची किंवा पालकांची संमति नसणें. ह्या हरकतींतून कोणी एखादी पुढें आणिली, व ती खरी असल्याचें सिद्ध केलें, तर लग्न होऊं शकत नाहीं. पण कोणतीच हरकत न येतां जाहिराती निर्विघ्नपणें दिल्या गेल्या, ह्मणजे त्याबद्दल धर्मोपदेशकांचा दाखला घेण्यांत येतो. नंतर वधूवरें एकमेकांस वरितात. ह्या वरण्याच्या कृत्यास **'एसपाउझल्स'** अशी संज्ञा आहे, व तें खालीं लिहिल्याप्रमाणें होतें.

वधूवरांची परस्पर संमति, ती घेण्याची सोपपत्तिक पद्धति, गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें, व त्यांस वधूवरांचें अनुमोदन.

प्रथमतः धर्मगुरु वरास विचारितात कीं, परमेश्वराच्या आज्ञेनुसार, पवित्र अशा गृहस्थाश्रमांत एकमेकांसंगतीं राहण्यासाठीं, ह्या स्त्रीशीं लग्न लावून हिला तुह्मी आपली पत्नी ह्मणून स्वीकारण्यास इच्छिता काय ? (Will you have this woman to your wedded wife, to live together after God's Ordinance in the holy state of matrimony ?) ह्या प्रश्नास वराचा रुकार मिळाल्यावर गुरुजी वधूलाही असाच प्रश्न करून वर, हा आपला पति ह्मणून स्वीकारण्याविषयीं तिची संमति घेतात. ह्या प्रमाणें लग्नापूर्वी

धर्मोपदेशकांकडून वधूवरांची संमति घेण्यासंबंधें कोणी आंग्ल ग्रंथकार असें ह्मणतात कीं, धार्मिकविधि हें विवाहाचें केवळ औपचारिक बंधन होय ! त्याचें खरें बंधन ह्मणजे वधूवरसंमति. तिच्यावाचून लग्न चांगलें होत नाहीं. अतएव ती अवश्य विचारण्यांत येते. आतां, ती धर्मगुरूंकडूनच विचारविण्याचें कारण असें कीं, तो ईश्वरप्रेषित प्रतिनिधि आहे. तेव्हां त्यानें देवालयांत–ईश्वराच्या सान्निध्यांत–संमति विचारिली, ह्मणजे साहजिकच ती फार गंभीरपणानें दिली जावयाची ! असो. ही संमति मिळाल्यावर धर्मोपदेशक वधूवरांस गृहस्थाश्रमांतील कर्त्तव्यें कथन करितात. त्यांपैकीं नवऱ्याचीं कर्त्तव्यें ह्मटलीं, ह्मणजे (१) स्त्रीवर प्रीति करणें. (२) तिचें पालनपोषण करून तिला सुख देणें. (३) तिला मान देणें. (४) सर्व स्थितींत तिला आवश्यक अशा वस्तू पुरविणें. आणि (५) आमरण परस्त्री वर्ज्य करून एकट्या लग्नाच्या बायकोबरोबरच शुद्धाचरण ठेवणें, हीं होत. आणि स्त्रीचीं कर्त्तव्यें (१) पतीची आज्ञा पाळणें, व (२) त्याची सेवा करणें हीं आहेत ! तीं वधूवरांस समजावून सांगितलीं, ह्मणजे तीं त्यांस कबूल आहेत किंवा कसें, व त्याप्रमाणें ते उभयतां वर्तन करण्यास तयार आहेत कीं नाहींत, ह्या विषयीं धर्मगुरू त्या दोघांस नीट विचारपूर्वक उत्तर देण्यास सांगतात; व त्यांच्यांतून प्रत्येकाचें 'मी करीन' (I will) असेंच उत्तर येतें. तदनंतर गुरूजी प्रसंगानुरूप अशा कांहीं ईश्वरप्रार्थना करून नवरानवरींस आशीर्वाद देतात, ह्मणजे विवाहासंबंधीं प्राथमिक कृत्यें आटोपलीं.

लग्नाची वेळ, स्थळ, साक्षीदार, लग्नप्रसंगीं वधूवरांस उभें करण्याची रीति, आणि ह्या सर्वांचे हेतू.

लग्न लावणें, तें तत्संबंधीं जाहिराती दिल्यापासून तीन महिन्यांच्या आंत कोणत्याही दिवशीं सकाळीं आठ वाजल्यापासून बारा वाजेपर्यंत लाविलेंच पाहिजे, अशी फरज ठेविली आहे. कारण, ह्या समयीं वधूवरें प्रामाणिक व गंभीर असून तीं अन्याय्य शरीरसंबंध करण्यास प्रवृत्त होणार नाहींत, अशी समजूत आहे ! सर्व भक्तजनांच्या समक्ष, तसेंच परमेश्वराच्या अवर्णनीय सान्निध्यांत, व त्या सान्निध्याविषयीं आदरबुद्धि उत्पन्न

होऊन वधूवरांनीं प्रतिष्ठितपणें लग्न लावावें, असा प्रॉटेस्टंट पंथाचा उद्देश आहे. ह्यास्तव वधूवरांना विवाहविधीसाठीं देवालयाच्या सभामंडपांत दाखल करण्यांत येतें. परस्परांशीं लग्न करण्याला तीं उभयतां कबूल आहेत, ह्या गोष्टीला योग्य साक्षीदार असावे ह्मणून लग्नप्रसंगीं वधूवरांस आपापल्या इष्टमित्रांना मुद्दाम घेऊन येण्यास सांगतात. लग्न लावितांना नवऱ्यास नवरीच्या उजव्या हाताशीं, व तिला नवऱ्याच्या डाव्या हाताशीं उभी करितात. कारण, नवरा हा बायकोचा अधिपति आहे, सबब त्यास तिच्या दक्षिण भागच्या थोर पदाचा मान देण्यांत येतो. ह्यास कोणी असें कारण लावितात कीं, स्त्री ही अॅडमच्या डाव्या फांसळीपासून उत्पन्न झाली, ह्मणूनच वधूला वराच्या वामांगीं उभी करण्यांत येते. पण हें कारण वरच्या इतकें सबळ समजत नाहींत. तत्रापि, यहूदी लोकांत " At thy right hand did stand the queen, in a vesture of gold. " ह्या वचनांतील वर्णनानुसार प्रस्तुत प्रसंगीं वधूला वराच्या उजव्या हाताशीं उभी करितात. असो.

वधूवरांस एकमेकांच्या स्वाधीन करणें, पाणिग्रहण, नवरानवरीच्यां प्रतिज्ञा व त्यापासून त्यांस होणारें बंधन.

धर्मगुरु विवाहविधीला सुरुवात करण्यापूर्वी ते देवळांत गोळा झालेल्या सर्व भक्तजनांस अनुलक्षून मोठ्यानें विचारितात कीं, "ह्या मनुष्याशीं ह्या स्त्रीचें लग्न लावण्यासाठीं हिला कोण देतो?" (Who gives the woman to be married to the man?) मग नवरीचा बाप अथवा पालक पुढें होऊन 'मी देतों' असें सांगतो. ह्या प्रश्नासंबंधें आंग्ल ग्रंथकार ह्मणतात कीं, ह्यावरून स्त्रीला आपल्या खुषीप्रमाणें नवरा पाहून करितां येत नाहीं, तें काम तिच्या वडिलांचें अथवा पालकांचें आहे, व तिनें केवळ आपल्या मताप्रमाणें न चालतां वडिलांच्या आज्ञेप्रमाणें वर्तलें पाहिजे, असें सिद्ध होतें. तसेंच सदरहू प्रश्नांत दुसरा एक गर्भितार्थ त्यांनीं काढिला आहे. तो असा कीं, मुलगी देणारानें प्रथमतः ती धर्मगुरूस द्यावयाची, त्यांनीं ती ईश्वरास अर्पण करावयाची, आणि ईश्वर ती घेऊन आपल्या प्रतिनिधीच्या हस्तें वरास वस्तुलाभ व्हावा एतदर्थ त्यास

देववितो, असें समजावें. कारण, पूर्वी ईश्वरानें अॅडॅमलाही ह्याचप्रमाणें बायको करून दिली होती. असो. मुलीच्या वडिलांनीं अगर पालकानीं 'मी मुलगी देतों' असें सांगितल्यावर धर्मगुरु तिला घेऊन नवऱ्याच्या स्वाधीन करितात, व नवऱ्यालाही नवरीच्या ताब्यांत देतात. हें करण्याची पद्धति अशी कीं, एकमेकांकडून एकमेकांचें दक्षिणपाणिग्रहण करवावयाचें. दक्षिणपाणिग्रहण हें स्नेहाचें व कराराचें द्योतक समजून तें करविण्यांत येतें. उजवा हात खिस्ती धर्मावरील विश्वासाचा साक्षी आहे, असें हे लोक मानितात; व लग्नाच्याच काय, परंतु एकंदर करारांत तो ग्रहण करण्याची चाल आहे. हस्तग्रहण केल्यावर नवरानवरींकडून एक विधान करवितात. तें असें:—

नवरा:—मी (अमुक नांवाचा) आजपासून तों पुढें मृत्यु आह्मांस वियुक्त करीपर्यंत ह्या (अमुक नांवाच्या) स्त्रीशीं लग्न लावून हीस आपली बायको करण्यासाठीं इचा स्वीकार करितों, व हिला धारण करितों. मग हिच्यापासून मला सुख होवो वा न होवो! आणि हिचें वर्तन, स्वभाव, आणि शरीरप्रकृति कशीही असो!

नवरी:—मी (अमुक नांवाची) आजपासून तों पुढें मृत्यु आह्मांस वियुक्त करीपर्यंत ह्या (अमुक नांवाच्या) पुरुषाशीं लग्न लावून ह्यास आपला नवरा करण्यासाठीं ह्याचा स्वीकार करितें, व ह्यास धारण करितें. **प्रॉटेस्टंट** पंथाच्या समजुतीप्रमाणें वरील प्रतिज्ञा केल्यानें पुरुष सर्व स्थितींत आपल्या स्त्रीवर प्रीति करण्यास, व तिचें पोषण करण्यास बांधिला जातो! व स्त्री नवऱ्यावर प्रीति करून त्याच्या आज्ञेंत वागण्यास बांधिली जाते!

मुद्रिकाधारण व तें करविते वेळच्या सोपपत्तिक वधूवरप्रतिज्ञा.

ह्याप्रमाणें नवरानवरींनीं आपणांस बंधनकारक अशा प्रतिज्ञा केल्यानंतर नवरीच्या बोटांत मुद्रिका घालून नवरा तिच्याशीं लग्न लावितो. मुद्रिका, ही एकनिष्ठ वर्तन ठेवण्याबद्दलच्या वचनाचें द्योतक ह्मणून समजली जाते. कोणी असें ह्मणतात कीं, ती प्राचीनकाळच्या कन्याविक्रयाच्या (अर्थात् आसुरविवाहाच्या) चालीचा अवशेष होय. कारण, धर्मगुरु ती

अझूनही उलट हुंड्यादाखल, अथवा वधूला धरण्याबद्दलचें द्रव्य समजून वरापाशीं मागतात. त्यांनीं ती मागितली, ह्मणजे वर ती आपल्या जवळून काढून व प्रथमतः धर्मगुरु व इतर धर्माधिकारी ह्यांना योग्य सन्मान देऊन नंतर ती मुद्रिका धर्मपुस्तकावर ठेवितो. ह्यांतील उद्देश असा कीं, संसारांत आपणास ज्या ज्या वस्तूचा उपभोग घ्यावयाचा, ती ती वस्तु प्रथम परमेश्वरास—खऱ्या मालकास—अर्पण करून, व त्याजपासून प्राप्त झाली असें कल्पून नंतर त्याच्या वैभवार्थ आपण भोगितों असें दाखवावयाचें. असो. नंतर नवऱ्यानें नवरीस वरितांना ती मुद्रिका तिच्या डाव्या हाताच्या अनामिकेंत घालावयाची. ती ह्याच बोटांत कां घालावी, त्याचा उद्देश मागें "रोमन लोकांच्या लग्नरीतींत" सांगितलाच आहे. (पहाः—पान ५०८) सारांश, ह्या मुद्रिकेच्या रूपानें नवरा आपल्या बायकोस आपलें अत्यंत प्रेम व्यक्त करितो; व हें प्रेम बायकोच्या अंतःकरणास पोंचून तेथून त्यानें तिचें प्रेम उलट नवऱ्याकडे आकर्षण करावें, एतदर्थ मुद्रिका घालितात. ती घालितांना नवरा नवरीस उद्देशून पुढील विधानें करितोः—

(1) With this ring I thee wed.
(2) With my body I thee worship.
(3) With all my worldly goods I thee endow,—
(4) In the name of the Father, and of the Son, and of the Holy Ghost, Amen!

ह्मणजे "(१) ह्या मुद्रिकेनें मीं तुझ्याशीं लग्न लावितों." ह्या वेळेपासून कायदेशीर पत्नी ह्या नात्यानें सर्व हक्क तुला दिले आहेत. ते असे कीं, "(२) मी आपल्या कायेंकरून तुला भजेन."—अर्थात् तुला मान देईन. ह्या विधानावरून नवऱ्याच्या सर्व पदव्यांत व मानपानांत बायको वांटेकरीण आहे असें समजावयाचें. "(३) मी माझ्या एकंदर सांसारिक वस्तूंनीं तुला समृद्ध करीन." ह्यावरून स्त्री, ही आपल्या पतीच्या सर्वस्वाची एकटीच मालकीण आहे असें समजावयाचें नाहीं. परंतु ती अन्न-

वस्त्राची व त्याच्या पश्चात् त्याच्या संपत्तीचा जो कायद्यानें मिळूं शकेल तेवढ्याच हिश्शाची धनीण आहे, आणि त्याच्या मरणोत्तर त्याच्या घरांत ४० दिवस राहण्याची तिला परवानगी आहे, असा अर्थ घ्यावयाचा, असें मूळ ग्रंथकार ह्मणतात ! शेवटचें ह्मणजे चवथें विधान, हें वरील एकंदर विधानांची परिपूर्णता करण्यासाठीं वरानें अत्यंत गंभीरतेनें दिलेली संमतीच होय. कारण, त्यांत परमेश्वरास प्रस्तुत प्रसंगाला साक्षी होण्याविषयीं आव्हान केलें आहे; आणि जें जोडपें येवढा पक्का केलेला करार मोडील, तें ईश्वराच्या शिक्षेस व त्याकडून सूड घेतला जाण्यास पात्र होईल, असा त्यांत सखोलार्थ आहे, असें आंग्ल ग्रंथकार सांगतात.

आशीर्वाद व विवाहाचा उत्तरविधि.

ह्याप्रमाणें मुद्रिकाधारण व त्यासंबंधीं विधानें झाल्यावर आपल्या लग्नाचा करार पावन व्हावा, एतदर्थ वधूवरें गुडघे टेंकतात; व धर्मगुरु परमेश्वराचा आशीर्वाद मागतात कीं, **प्रभो** ! ह्या उभयतांनीं आतां जो करार केला आहे, तो कायम ठेवण्यास, व त्याप्रमाणें वागण्यास त्यांना बुद्धि दे ! हा आशीर्वाद मागितल्यावर धर्मगुरु त्या दोघांचे हातांत हात घालून पुढील विधान करितात.

"Those whom God hath joined together, let no man put asunder!"

ह्मणजे, ज्यांस ईश्वरानें संयुक्त केलें, त्यांस कोणीही मानव वियुक्त न करो ! हें झाल्यावर धर्मगुरु जमलेल्या एकंदर भक्तजनांस येवढा वेळ काय काय विधि झाले, ते सोपपत्तिक रीतीनें समजून सांगतात, व वधूवरांचा लग्नविधि परिपूर्ण झाल्याचें जाहीर करून ह्मणतात,

"They be man and wife together, in the name and by the authority of the Father, and of the Son, and of the Holy Ghost.

ह्मणजे; "**तो पिता, तो पुत्र**, आणि **तो पुण्यात्मा**, ह्यांना स्मरून, आणि त्यांच्या आज्ञेवरून हे उभयतां (वधूवर) पतिपत्नी होत्साते एकत्रित

आहेत." हें झाल्याबर वधूवरें धर्मगुरु व इतर धर्माधिकारी ह्यांसह परमेश्वराच्या मेजाजवळ जाऊन आपला भावी शरीरसंबंध प्रार्थनांच्या द्वारें पवित्र करून घेतात. त्या स्थलीं जाईपर्यंत गुरु व इतर धर्माधिकारी प्रसंगोचित स्तोत्रें गातात. मेजाजवळ गेल्यावर धर्मगुरु भोंवतीं वाद्यें वाजत असतां वधूवरां-साठीं कांहीं प्रार्थना करून त्यांस आशीर्वचनें देतात. नंतर शरीरसंबंध (communion) पवित्र करण्याचें विधिविधान सुरू होतें. प्रथमतः धर्मगुरु "Lord ! have mercy upon us ! &c" ह्मणजे **प्रभो!** आह्मांवर दया कर! इ० मंगलाचरण ह्मणून नंतर प्रार्थना करण्यास सुरुवात करितात. ह्या प्रार्थना ह्मणजे लहान लहान स्तोत्रें असून त्यांत वधूवरांचें कल्याण व्हावें, अशी परमेश्वरापाशीं अर्जी केलेली आहे; व ती धर्मगुरु करीत असतां सर्व मंडळीही त्यांजबरोबर करूं लागतात. सर्वांनीं हें प्रार्थनागायन केल्यावर फक्त धर्मगुरु आणखी तीन प्रार्थना करितात. त्यांत वधूवरांची आत्मोन्नति व्हावी, त्यांस सुप्रजा प्राप्त व्हावी, आणि त्यांच्याकरवीं गृहस्थाश्रमांतील कर्तव्यें यथासांग व्हावीं, हें तात्पर्य आहे. सरते शेवटीं वरील प्रार्थनांच्या पुष्टीकरणार्थ आणखी एक प्रार्थना केली जाते. नंतर धर्मगुरु वधूवरांस हितोपदेश करितात. त्यांत परमेश्वराच्या आज्ञा, कीं ज्या पाळण्याविषयीं वधूवरांनीं आपणांस बांधून घेतलें आहे, त्या काय काय आहेत तें समजावून सांगण्यांत येतें; ह्मणजे **प्रॉटेस्टंट पंथा**चा लग्नविधि सांगोपांग संपला. हा विधि हल्लीं **आंग्ल देवालया**-मध्यें प्रचलित आहे.

पाश्चात्यांच्या लग्नविधींची गुरुकिल्ली.

एकंदर पाश्चात्य राष्ट्रांत **रोमन कॅथलिक,-ग्रीक,**-आणि **आंग्ल-देवालय,** ह्या तीन धर्मसंस्था बलवत्तर व प्रमुख आहेत; आणि त्यांतील लग्नपद्धती ज्या वर अनुक्रमानें दिल्या आहेत, त्या वाचकांच्या नीट ध्यानीं आल्या, ह्मणजे बहुतेक पाश्चात्य लोकांच्या लग्नविधींची गुरुकिल्लीच त्यांच्या हातीं आली ह्मणून समजावें.

यूरोपांतील नाना देशच्या चालीरीती.

विवाहकाल, सोयरीक जमविण्यांत अपत्यांचा शिरजोरपणा व कांहीं चालीरीती.

स्पेन:-एतद्देशीय लोकांत अनुक्रमें चवदावें आणि बारावें वर्ष हा मुलामुलींचा विवाहकाल समजला जातो. लग्न जुळवितांना वधूवरांच्या विचारसाम्याकडे, अथवा स्वभावसादृश्याकडे मुळींच लक्ष्य देण्यांत येत नाहीं; आणि एकदम सोयरीक जमवून टाकितात. जणूं काय लग्नसंबंध हा एखाद्या दिवसापुरताच व्हावयाचा आहे! कायद्याच्या दृष्टीनें पाहतां **स्पेन** देशांत पंचविसावें वर्ष लागलेली व्यक्ति वयांत आली असें समजलें जातें; आणि त्या वयाच्या आंत लग्न करणें असल्यास त्याला कायद्याच्या दृष्टीनें बाध न येण्यासाठीं वडिलांची संमति घ्यावी लागते. तथापि, मुलगा चवदा वर्षांचा व मुलगी बारा वर्षांची होतांच तीं शिरजोरपणानें वडिलांस आपल्या लग्नाला संमति द्यावयास लावितात; आणि अशा रीतीनें वरील कायदा हितकर असूनही त्याची पायमल्ली करण्यांत येते! वधू अथवा वर ह्यांतून कोणाचेंही शिक्षण, नीतिमत्ता, अथवा रीतभात समाधानकारक नसल्यास अशा मुलामुलींच्या लग्नाला हरकत करण्याचा वडिलांस हक्क आहे. परंतु कोणा गृहस्थानें वरील कारणांस्तव आपल्या मुलास लग्नाची मनाई केली, तर चिरंजीव सरकार दरबार करून त्रासदायक व निंद्य रीतीनें वडिलांचा छळ करितात! कायदाही असा चमत्कारिक आहे, कीं तो असल्या प्रसंगीं उलटा मुलांच्याच लाभांत असतो! त्यामुळें बापाला मुलास लग्न लावण्यासाठीं यथाशक्ति कांहीं तरी हुंड्याची रकम निमूटपणें उचलून द्यावी लागते.

इतकेंच नव्हे, पण त्यासाठीं चिरंजीवांनीं फिर्याद केली असल्यास तिचा खर्चही द्यावा लागतो!

नवरा होण्याची जबरदस्ती!

असें ह्मणतात कीं, एतद्देशीय कायद्यानें स्त्रियांचा पक्ष फारच उचलून धरिला आहे. कोणीही मुलगी बारा वर्षांची झाली, ह्मणजे ती चवदा वर्षांच्या कोणाही मुलास आपल्याशीं लग्न लावण्याची फरज पाडिते! मात्र त्या मुलानें तिला कधीं काळीं एखादी आंगठी अथवा कांहीं वस्तु नजर केली असली पाहिजे. निदान एखादें शृंगारिक पत्र लिहिलें असलें, तरी तो हटकून तिच्या जाळ्यांत आलाच ह्मणून समजावा! मग त्या पत्रांत लग्नासंबंधीं अवाक्षर नसलें तरी ती, ह्या तरुणानें मजपासून पतीच्या हक्कांची अपेक्षा केली असें बळेंच ठरवून त्यास आपल्याशीं लग्न लावणें भाग पाडिते!

पुरुषत्वपरीक्षा, आणि स्पॅनिश कुमारिकांचें अखंड कौमार्य!

ह्या देशांत स्त्रियांना आणखी एक विलक्षण मुभा आहे. ती अशी कीं, लग्नासंबंधीं करार होऊन तिथिनिश्चय झाल्यावर नवरी आपल्या भावी नवऱ्यास आपणापाशीं पुरुषत्वाची परीक्षा देण्यास सांगते! ह्या परीक्षेंत तो तिच्या मर्जीपसंत उतरला, तर ठीकच आहे. नाहींपेक्षां ती लग्नाचा करार मोडून टाकिते. अशा रीतीनें ती वस्तुतः भ्रष्ट झाली असूनही लोक तिला कुमारिकाच समजतात! असो.

कुमारिकांची प्रीतिसंपादन करण्याची रीति.

कुमारिकांची प्रीति संपादन करण्यासाठीं स्पॅनिश वर बैलांच्या टकरा लावितात, व त्यांत आपल्या धाडसाची कमाल करून दाखवितात. वर विजयी झाला, ह्मणजे वधूसमोर जाऊन तिला आपली तरवार नजर करितो, व ती त्या तरवारीस मुजरा करून त्यास पसंत करिते.

व्हॅलेन्शिया येथील लोकांत लग्नकार्यामध्यें फार खर्च करण्याची चाल

पडली आहे; आणि ती लोकस्थितीच्या अगदीं विरुद्ध आहे.

लग्नासंबंधीं खर्च- वेंच आणि नव- रीच्या वस्त्रालं- कारांचें प्रदर्शन.

लग्नप्रसंगीं सारेच स्पॅनिश लोक मोठ्या स्वाभिमानानें श्रीमंती डामडौल करण्यास जातात; परंतु त्यांच्यांत वस्तुतः श्रीमंत असे थोडेच असतात. लग्नापूर्वी कित्येक दिवस झगे, रत्नालंकार, मुलीला अंदण देण्याच्या वस्तू, तसेंच तिला बक्षीस मिळालेले जिन्नस वगैरे एकेस्थळीं व्यवस्थेनें मांडून ठेवितात; व जो कोणी घरीं येईल त्यास त्या जिनसांचें जणूं काय प्रदर्शनच करितात. नवरीची कोणी आप्त स्त्री असते, ती आल्यागेल्यास सर्व वस्तूंचीं नांवनिशी सांगते, आणि त्यांतून कोणते जिन्नस स्वतः नवरीचे आहेत, कोणकोणते तिला तिच्या प्रियकरानें प्रेमानें दिले आहेत, व कोणकोणते तिच्या वडिलांनीं दिले आहेत, हा सर्व तपशील सांगत बसते. बहुधा एकंदर वस्तूंमध्यें मुलीस तिच्या वडिलांनीं दिलेल्या जिनसाच संख्येनें व मोलानें अधिक असतात. कारण, मुलीच्या लग्नांत आपण करणी फार चांगली केली, असा लौकिक मिळविण्याची स्पॅनिश आईबापांना भारी हाव असते. अंदण देण्याच्या वस्तूंशिवाय लग्नाप्रीत्यर्थ द्यावयाची मेजवानी, नाच, वगैरे कृत्यांतही अतोनात खर्च केला जातो.

लग्नविधि.

स्पॅनिश लोक रोमन कॅथलिक आहेत. तेव्हां ते आपलीं लग्नें त्या पंथाच्या विवाहपद्धतीनेंच करितात. ही पद्धति मागें सांगितलीच आहे.

वधूवरांचा पुष्प- मंडप, लग्नशय्या व लग्नसमाप्ति.

मध्यम स्थितींतील स्पॅनिश लोकांत अशी चाल आहे कीं, देवालयांत लग्नविधि आटोपल्यानंतर नवरी आपल्या माहेरीं जाते, आणि सर्व दिवस आपल्या इष्ट मैत्रिणींसंगतीं आनंदांत घालविते. पुढें मध्यरात्रीच्या सुमारास तिचा नवरा आपल्या नातेवाइकांसह तिला भेटावयास जातो. कन्यापक्षाची मंडळी, वर आणि तत्पक्षीय मंडळींचा आदरसत्कार करून त्यांस बसवितात. ह्या समयीं नवरीच्या माहेरघरच्या अंगणांत एक रमणीय पुष्पमंडप तयार करून त्याखालीं

वधूवरांची लग्नशय्या घातलेली असते. नवरा नवरीस घेऊन त्या पुष्पमंडपांत जातो, व तेथें तिजसंगतीं अवशिष्ट रात्र मौजेंत घालवून प्रातःकाळीं तें नव-दंपत्य घरांत येतें. तेथें न्याहारीची तयारीच असते. मग सर्व इष्टमित्र त्या जोडप्यास भेटून न्याहारी करितात. मुली असतात, त्या वेलींच्या लवचीक फांद्यांचा एक चिमुकला पाळणा बनवून तो नवरीस नजर करितात. त्याचा उद्देश उघड करून सांगण्याइतका तो गूढ नाहींच! उभय पक्षांची मंडळी हा विवाहाचा द्वितीय दिवस परोपरीच्या करमणुकींत घालवितात; ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

न्यावहारिक लग्नाची रीति.

फ्रान्सः—प्रथमतः कायदेशीर लग्न (civil marriage) करण्यासाठीं वधूवरें न्यायाधीशाच्या कचेरींत जातात. तेथें कारकून लग्नाची बारनिशी मांडून बसलेलेच असतात. हे कारकून, करार करणाऱ्या त्या दोन्ही पक्षकारांस—अर्थात् वधूवरांस—त्यांचीं नांवें, वयें आणि पत्ते विचारून ते बारनिशींत नोंदितात; आणि त्याशिवाय रीतीप्रमाणें जो मजकूर लिहावयाचा तो लिहितात. एकंदर दस्तऐवजांतील आशय असा असतो कीं, " सदरहू करार करणारे पक्षकार (contracting parties) आपापल्या आईबापांच्या पूर्ण अनुमोदनानें जन्मपर्यंत एकमेकांचा स्वीकार करण्यास, व एकमेकांसंगतीं नवराबायकोच्या नात्यानें राहण्यास कबूल आहेत. मशारनिल्हे पक्षकारांस सदरहू वचनांतून मुक्त करण्यास केवळ एक मृत्यूच समर्थ होईल," वगैरे. हें लिहिण्याचें कारण असें कीं, फ्रेंच कायद्याप्रमाणें नवराबायकोस काडी मोडून देतां येत नाहीं. क्वचित् प्रसंगीं एकमेकांपासून विभक्त राहण्याची परवानगी मिळते. परंतु त्या स्थितींत दोघांतून कोणी एक मयत झाल्याशिवाय दुसऱ्यास द्वितीय संबंध करण्याची सक्त मनाई आहे. असो. कारकुनांनीं वर सांगितल्याप्रमाणें लग्नाचा करारनामा लिहिला, ह्मणजे त्यावर ते वधूवरांस आपल्या सह्या करण्यास सांगतात. नंतर त्यांस न्यायाधीशापुढें दाखल करण्यांत येतें. न्यायाधीश त्या उभयतांस नेपोलियनकृत कायद्याचीं कलमें वाचून अथवा घडघडां पाठ ह्मणून दाखवि-

तात ! ह्या कलमांत बायकोनें सर्वस्वी नवऱ्याच्या आज्ञेंत वागलें पाहिजे, आणि तो जेथें नेईल तेथें गेलें पाहिजे, असा स्पष्ट उल्लेख आहे. कायद्याच्या कलमांचें पारायण झाल्यावर विवाहित स्त्रीपुरुषांचीं नागरिक या नात्यानें, आईबाप या नात्यानें, आणि अशाच इतर संबंधांनीं काय काय कर्त्तव्यकर्मे आहेत, त्यांची एक यादी वाचण्यांत येते. मग न्यायाधीश वरास अदबीनें सलाम करून व त्यास त्याच्या नांवानें संबोधून विचारितात कीं, "तुह्मी अमुक नांवाच्या ह्या कुमारीचा आपली बायको या नात्यानें शपथेवर स्वीकार करिता काय ?" या प्रश्नास वराचा रुकार मिळाल्यावर '**मेयॉर**' साहेब सदरहूप्रमाणें वधूचाही रुकार घेतात. तो तिनें लाजत लाजत नुसती मान डोलवून दिला, ह्मणजे त्या उभयतांस त्यांचें व्यावहारिक लग्न—संमति-तत्त्वावरील कायदेशीर लग्न—झाल्याबद्दलचा दाखला देण्यांत येतो.

लग्नासंबंधी फ्रेंच देवालयांतील धार्मिक विधि.

नंतर दुसऱ्या दिवशीं वर आपल्या पक्षाच्या मंडळीसह वधूच्या घरीं जातो; व नंतर तेथून वधूवरें उभयपक्षांच्या इष्टमित्रपरिवारासह मोठ्या थाटानें मिरवत लग्नासंबंधी धार्मिक विधि करण्यासाठीं देवालयास जातात. तेथें त्यांस आदल्या दिवशीं न्यायाधीशा-कडून मिळालेला दाखला सादर करावा लागतो. तदनंतर धर्मगुरु त्या वधूवरांचें धर्मशास्त्रविहित विधिविधानेंकरून लग्न लावितात. त्यांतील एकंदर प्रकार **आंग्ल देवालयां**तील विवाहपद्धतीप्रमाणेंच आहे. फरक इतकाच कीं, **फ्रेंच देवालयां**त लग्नसमयीं वधूवरांच्या डोकीवर एक रेशमी वस्त्राची चांदणी धरितात, व धर्मगुरु पवित्रोदकानें त्यांचें प्रोक्षण करितात. ईशप्रार्थना झाल्यावर मुख्य धर्माध्यक्ष (Bishop) वधूवरांस ठरींव हितोपदेश सांगून आशीर्वाद देतात, ह्मणजे लग्नविधि आटोपला. तदनंतर वधूवरें देवालयांतील धर्माधिकाऱ्यांचीं वस्त्रप्रावरणें ठेवण्याच्या खोली-(vestry)-मध्यें जाऊन बसतात, व तेथें सर्व इष्टमित्र त्यांस भेटून लग्न झाल्याबद्दल त्यांचें अभिनंदन करितात.

हॉलंड:—एतद्देशीय लोकांच्या लग्नाच्या जाहिराती कधीं कधीं न्यायाधीशांमार्फत प्रसिद्ध केल्या जातात, व नंतर न्यायाधीशच वधूवरांचें लग्न लावितात. लग्नप्रीत्यर्थ इष्टमित्रांकडे दोन दोन शिसे भरून मसालेदार व मधुर द्राक्षासव पाठविण्यांत येतें. हे द्राक्षासवाचे शिसे रंगी बेरंगी फितींनीं शोभिवंत केलेले असतात. पूर्वी एतद्देशीय लोकांत नवविवाहित दंपत्याच्या घराच्या उंबऱ्यावर नानाप्रकारचीं फुलें व सदैव हिरव्यागार राहणाऱ्या झुडपांचे पल्लव विखुरण्याची चाल असे. तसेंच उच्च वर्गातील लोकांच्या लग्नांत चांद अथवा पदकें यांजवर परोपरीचे नमुने खोदून तीं पदकें इष्टमित्रांस वांटण्यांत येत असत.

न्यायाधीशामार्फत लग्नें, व कांहीं चालीरीती.

जर्मनी:—धर्मगुरूंनीं नवरानवरीस आशीर्वाद दिल्यानंतर लग्नसमारंभासाठीं आलेला प्रत्येक गृहस्थ स्थंडिलापाशीं जाऊन त्यावर आपल्या इच्छेप्रमाणें आणि यथाशक्ति कांहीं नाणें नजराणा ह्मणून ठेवितो. ह्या देणगीकडे नवरानवरी साध्याभोळ्याच पण सस्पृह मुद्रेनें टक लावून पहात असतात! कारण, ही प्राप्ति त्यांची असते. ह्याप्रमाणें जमलेल्या सर्व मंडळींनी नगदी आहेर केला, ह्मणजे धर्मगुरु त्या आहेरांचें, ते देणारांचें, व ते घेणाऱ्या नवरानवरींचें अभिनंदन करितात. नंतर आहेराची सर्व रकम गोळा करून ठेवून देतात. मग नवरी आपण स्वतः तयार केलेला एखादा नक्षी कामाचा रुमाल व यथाशक्ति कांहीं रकम (सोन्याचें नाणें) धर्मगुरूंस अर्पण करिते.

नजराणा किंवा आहेर.

हें झाल्यावर नवरानवरी एकंदर इष्टमित्र समुदायासह देवळांतून मोठ्या समारंभानें आपल्या बिऱ्हाडीं (हें बिऱ्हाड बहुधा एखादा खाणावळींतच असतें.) जावयास निघतात. तेथें गेल्यावर सर्वांस स्वागतपूर्वक बसविण्यांत येतें; आणि तेथें लग्नाप्रीत्यर्थ मेजवानी, व नृत्यगीतादि मनोरंजनाचे प्रकार होतात. त्या कृत्यांत सुमारें तीन चार तास गेल्यावर

खाणावळींतील मेजवानी, नाच आणि वधूप्रवेशाची मिरवणूक.

नवरा नवरीस घेऊन मोठ्या समारंभानें खाणावळींतील विऱ्हाडाहून आपल्या घरीं जाण्यास निघतो. ही वधूप्रवेशाचीच मिरवणूक होय. तिच्या अग्रभागीं वाजंत्र्यांचा ताफा सुस्वर वाद्यें वाजवीत चालतो. त्यांच्या मागून नवरामुलगा मिरवत जातो. नवऱ्याच्या पाठीमागें एक घोड्याची गाडी चाललेली असते; तिच्यांत लग्नप्रसंगीं नवरानवरींस मिळालेल्या एकंदर देणग्या, आहेर, वगैरे वस्तू शिगोशीग भरलेल्या असतात! गाडी ओढणारा घोडा रंगीबेरंगी फितींनीं व कागदाच्या आणि खऱ्या पुष्पहारांनीं शृंगारिलेला असतो. जर्मन लोक केवळ प्रापंचिक आणि व्यवहारदक्ष असल्यामुळें त्यांच्या लग्नांतील आहेराच्या वस्तूही आहेराऊ नसून संसारांत प्रत्यहीं उपयोगी पडतील अशाच असतात! उदाहरणार्थ बिछाना, खुर्च्या, भांडीकुंडीं, कोंबड्यांचा हारा, सूत कातण्याचा रहाट, आणि पर्वतप्राय तागाचे गठ्ठे! (हा ताग बहुतकरून नवरीच्या आईनें आपल्या मुलीसाठीं, ती जन्मल्यापासून थोडथोडा गोळा करून ठेविलेला असतो, व तो तिच्या लग्नप्रसंगीं तिला अंदण देण्यांत येतो! असो.) ह्याप्रमाणें आहेराची गाडी गेल्यावर तिच्यामागून नवरी मिरवत येते. ती एकसारखी अश्रुपात करीत,--नव्हे, चांगली विलाप करीत, आणि बोटें मोडीत मिरवत असते! मंगलप्रसंगीं हा अमंगल प्रकार करण्याचें कारण असें सांगतात कीं, वधूप्रवेशाच्या मिरवणुकींत, अथवा आपल्या घरीं अगदीं पहिल्यानें जातांना जी स्त्री मनमुराद रडून घेईल, तिला पुढें घरीं गेल्यावर घरांत बसून रडण्याचा प्रसंग कधींही यावयाचा नाहीं, अशी समजूत आहे! सुधारलेल्या पाश्चात्य राष्ट्रांतील इतर उत्कृष्ट समजुतींस दृष्ट न लागावी, ह्मणून ही समजूत अद्यापि गालबोटाऐवजीं मुद्दामच ठेविली आहे कीं काय नकळे! असो. नवरीच्या मागून लग्नसमारंभासाठीं आलेलीं सर्व स्त्रीपुरुषें मिरवत जातात. त्यांच्या समुदायांत उभयपक्षांचे आप्त, मित्र, वाजंत्री, वगैरे सर्वांचा एक समयावच्छेदानें समावेश झालेला असतो; व त्यांत व्यवस्था अशी मुळींच नसते!

वधूप्रवेशा नंतरचीं कृत्यें, मेजवानी, स्मशानांतील प्रार्थना व लग्नसमाप्ति.

मिरवणूक वरगृहीं पोहोंचल्यावर कोणी एकजण मनोभावानें ईश्वराची थोडीशी प्रार्थना करितो. ती आटोपल्यावर जमलेली मंडळी आहेराच्या गाडींतून सर्व सामान काढून तें वराच्या घरांत नेऊन ठेवण्याच्या खटपटीस लागतात! प्रथमतः नवरामुलगा घराचा उंबरा ओलांडून आंत प्रवेश करितो, व पुन्हां मागें वळून आपल्या बायकोस हात देतो. ती त्याच्या हातांत हात घालून प्रवेश करिते. तिनें आपल्या एका हातांत एक लहानसा क्रूस धरिलेला असतो. अशा उद्देशानें कीं, पुढें उभयतांवर परमेश्वरी कृपा व्हावी, आणि दोघांनीं पवित्राचरण ठेवावें. तीं वधूवरें जोडप्यानें घरांत गेल्यावर थोडा वेळपर्यंत एकांतस्थळीं बसतात. इकडे लग्नांतील कृत्यांचा जो कोणी मुख्य व्यवस्थापक असतो, तो आहेराच्या गाडीचा घोडा सोडून व त्यावरील खोगीर वगैरे सामान काढून त्यास रस्त्याच्या बाजूवरील हिरवळ चारितो. जमलेली मंडळी गाडींतील सामान उचलून घरांत ठेवणार इतक्यांत नवरा घरांतून येऊन त्यांतील प्रत्येक वस्तूवर आणि विशेषतः नवरीच्या दरएक जिनसेवर देवळांत धर्मोपदेशकानें दिलेल्या खडूनें क्रूसाची आकृति काढितो. तो हें कृत्य करीत असतां तेथें हाजर असलेला उपाध्याय त्या सर्व वस्तूंवर थोडथोडें पवित्रोदक शिंपडितो. हें उदक इतक्या बेतानें शिंपडण्यांत येतें कीं, कोणत्याही वस्तूची खराबी न होतां ती पवित्र व्हावी. बिछान्यांतील वस्त्रप्रावरणांपैकीं दुलया, ह्या नवरीनें आपल्या हातानें तयार करून त्यांवर कशिद्यानें क्रूसांचीं चिन्हें काढिलेलीं असतात. एकंदर संसारोपयोगी वस्तूंचें क्रूसांच्या चिन्हांनीं व उपाध्यायानें शिंपडिलेल्या उदकानें शुद्धीकरण झालें, ह्मणजे जमलेल्या मंडळीस मिष्टान्न व बटाट्यांपासून तयार केलेल्या मद्याची मेजवानी देण्यांत येते. परंतु चमत्कार असा कीं, सर्व वऱ्हाडी मेजवानीस बसले असतां नवरानवरी हातांत हात घालून नजीकच्या स्मशानभूमीस जातात! व तेथें आपल्या वाडवडिलांच्या थडग्यांजवळ गुडघे टेंकून त्या मृतांची प्रार्थना करितात. ती संपून तें नवीन जोडपें जों आपल्या

घरीं परत येतें, तों सर्व मंडळी मेजवानीचें जेवण उरकून आपापल्या घरीं चालती झालेली असते ! आणि घर त्या उभयतांना मनसोक्त राज्यराम करण्यासाठीं शांत असें करून ठेविलेलें असतें ! धर्मोपदेशक; नवरानवरींच्या स्वर्गवासी वाडवडिलांच्या आत्म्यास शांति मिळावी, आणि गांवांतील गोर-गरिबांचा तरणोपाय व्हावा, ह्मणून जी ईश्वरोपासना करितो, तत्प्रीत्यर्थ वरपक्षाकडून त्याला बरीचशी रँकम मिळते. ती घेऊन तो आपल्या मठि-केची वाट धरितो; आणि मेजवानी झाल्यामुळें घरांत जो कांहीं केरकचरा पडला असेल, तो कोणी तरी गोळा करून घराबाहेर पशुपक्ष्यांच्या भक्ष्यस्थानीं टाकून देतो. सारांश, नवरानवरी स्मशानशांततेंतून घरीं येऊन पाहतात, तों तेथेंही जिकडे तिकडे तसेंच साफसूफ व शांत असतें ! ह्याचें नांव लग्नसमारंभ ! तथापि, ह्यांत जर्मन लोकांस नांवें ठेवण्याचें कारण नाहीं. आमच्या पौर्वात्य देशांतही **चीन, जपान** व **कोरियां**तील लोकांत लग्नप्रसंगीं आपल्या मृत वाडवडिलांच्या समाधीनजीक जाऊन त्यांची अशाच रीतीनें प्रार्थना वगैरे करितात, असें ऐकतों. मंगल आणि अमंगल समसमान मानणारे हरीचे लाल पाश्चात्यांत तसे पौर्वात्यांतही आहेतच !

जर्मन स्त्रीवर नवऱ्याचा वचक.

जर्मन स्त्री दागदागिन्यांचा शौक मुळींच करीत नाहीं. कारण, ती पक्कें जाणून असते कीं, मी एखादा मोत्यांचा हार मिळण्याबद्दल हट्ट धरून बसलें, तर तो मिळण्याऐवजीं नवरा त्यांतील मो-त्यांच्या संख्येइतकीं **टिपें** मला गाळावयास लावील !

लग्नरीति.

इटाली देशांतील बहुतेक संस्थानांत पूर्वी अशी चाल होती कीं, लग्नाचा करार धर्मोपदेशकासमक्ष करावयाचा. तथापि, हें कृत्य नेहमींच प्रार्थनामंदिरामध्यें होत नसे. लग्नाच्या जाहिराती लग्नसंबंधी करार झाल्यानंतर देत असत, व लग्न **रोमन कॅथलिक** देवाल्यांतील प्रचलित विधिविधानानें करण्यांत येई. थोरांमोठ्यांची लग्नें हमेष कांहीं एक डामडौल न करितां आणि सूर्योदयापूर्वी होत असत; परंतु खालच्या वर्गाच्या लोकांत मात्र तीं मोठ्या थाटामाटानें आणि दुपारीं करीत होते. ईश्वरोपासना व होम

हवनादि कर्म—ज्यास **मास** अशी संज्ञा आहे तें,—लग्न झाल्यानंतर करीत असत. **सिसिली** देशाच्या कित्येक भागांत पतिपत्नी ह्या नात्यानें उभयतांचा जो एक धर्मसंस्कार व्हावा लागतो, तो त्या दोघांपैकीं कोणीएक गत होईपर्यंत करीत नसत. ह्याचें कारण असें दिसतें कीं, **मास** नामक धर्मसंस्कार केल्याखेरीज, लग्न हें पतिपत्नींचें केवळ ऐहिक बंधन समजलें जात असावें; परंतु ज्याअर्थी त्या दोघांस पारमार्थिक दृष्टीनें एकमेकांशीं बद्ध करण्याची आवश्यकता मानीत असत, त्याअर्थी मरणसमयीं **मास** नामक धर्मसंस्कार अवश्यमेव केला जात असे.

जिनोवांतील लोकांचें लग्न ऊर्फ मारवाडी सौदा.

जिनोवा शहरांत पूर्वी कित्येक लोक लग्नदलालाचा धंदा करीत असत. ते हमेष आपल्या खिशांत एक चोपडी बाळगीत. ह्या चोपडींत निरनिराळ्या वर्गाच्या अविवाहित मुलींची नांवानिशी गुण, रूप, व संपत्ति वगैरे बाबतींची नोंद केलेली असे. अशा चोपड्या घेऊन हे लग्नदलाल सोयरिकी जमविण्याची खटपट करीत फिरत असत. त्यांच्या कामांत त्यांस यश आलें, ह्मणजे हुंड्याच्या रकमेवर त्यांना शेंकडा अमुक एक टके दलाली मिळत होती. एकंदरींत जिनोवांतील लोकांचें लग्न ह्मणजे शुद्ध मारवाडी सौदाच बनून राहिला होता. हा सौदा बहुधा नवरानवरींनीं एकमेकांचें मुखावलोकन करण्यापूर्वी त्यांचे वडीलच पटवून टाकीत! पतीची आपल्या जन्माच्या सोबतिणीशी पहिली जानपछान, ही पाश्चात्य रिवाजाविरुद्ध, लग्नाची सर्व तयारी होऊन चुकली, व लग्नदिवसाला अगदीं थोडा अवधि उरला, ह्मणजेच होत असे. पहिल्या भेटींत त्याला तिच्या रूपांत किंवा चालचलणुकींत कांहीं व्यंग दिसून आलें, तर वडिलांनीं ठरविलेला सौदा त्यास रद्द करितां येत असे. परंतु तो अशा अटीवर कीं, लग्नाची तयारी करण्यासाठीं जो खर्च लागला असेल, व दलालाची जी दलाली ठरली असेल, ती त्यानें चुकती करून द्यावी, व मग खुशाल सोयरीक मोडावी.

बॉसनिया:—ह्या देशांत ज्या तरुण कुमारिका मुसलमान असत, त्यांस बुरख्यावाचून रस्त्यांतून फिरण्याची मोकळीक होती. अशा एखाद्या कुमारीकेस पाहिल्यावर कोणा पुरुषाच्या मनांत तिजशीं लग्न लावावें असें आलें, तर तो तिजजवळून जातांना कलाबतूचें काम केलेला एक हातरुमाल अथवा आपल्या पोषाकापैकींच एखादें वस्त्र त्या कुमारिकेच्या डोकीवर अथवा मानेवर फेंकीत असे. मग ती तरुणी घरी जाई, व त्या पुरुषानें आपणास वरिलें असें समजून पूर्वीप्रमाणें लोकांत वागत नसे.

कुमारिकांस वरण्याची चमत्कारिक रीति.

ग्रीस:—अर्वाचीन ग्रीक लोकांत लग्नसंबंधीं अगदीं पहिलें कृत्य ह्मटलें, ह्मणजे **अरावन** (arra'von) अथवा प्रथम लग्ननिश्चय (first betrothal) हें होय. त्यांत उभयपक्षांच्या इष्टमित्रमंडळीसमक्ष नवरा शिष्टाचाराप्रमाणें मुलीच्या बापानें दिलेल्या हुंड्याची रकम मला पावली, व ती मला मान्य आहे असें सांगतो, आणि त्याचप्रमाणें नवरी मला पसंत आहे, व ती मी स्वीकारिली असें कबूल करितो. उभयपक्षांत झालेला हा 'अरावन' नामक व्यवहार फार महत्वाचा समजून मुलीचीं मातापितरें त्यावर पूर्ण विश्वसून राहतात. हा व्यवहार झाल्यावर त्या भावी नवऱ्यानें पसंत केलेल्या नवरीच्या घरीं वाटेल तितके वेळां खुशाल यावें व आपल्या भावी पत्नीची मनधरणी करावी. त्यास मुळींच हरकत नसते. मात्र नवऱ्यानें आपल्या वर्तनात कोणत्याही गोष्टीचा अत्याचार होऊं न देतां भलेपणा व सारासार विचार ठेविला ह्मणजे झालें. 'अरावन' झाल्यापासून नवरीचे व तिच्या भावी नवऱ्याचे शेकडों इष्टमित्र अभिनंदनार्थ तिच्या भेटीस येतात. नवरी त्या सर्वांची उभ्याउभ्या भेट घेते. व भेटीमध्यें ती त्या मंडळीस शक्य तितकी लीनता व भीडमर्यादा व्यक्त करिते. ती आपली मान सतत खालीं घालून उभी असते, आणि विचारिल्या प्रश्नांचीं हळूच व केवळ एकाक्षरी उत्तरें देते. तसेंच ती आपल्या भावी नातेवाईकांपुढें मोठ्या विनयानें लवून

लग्नापूर्वीचीं कांहीं कृत्यें.

त्यांचें हस्तचुंबन करिते. (मात्र नवऱ्याच्या नातलगांचे किंवा प्रियमित्रांचे हात दोन वेळ चुंबावयाचे व इतर सामान्य ओळखीपाळखीच्यांचे एकदाच चुंबावयाचे येवढा त्यांत फरक असतो.) भेटीस आलेली मंडळी सुभाषितांनीं तिला सुखवितात, तिचें कल्याण चिंतितात, व तिला सोन्याचीं नाणीं आणि तुळशीचे हार (garland of sweet basil) नजर करितात. लग्ननिश्चय झाल्यापासून तों लग्न होईपर्यंत नवऱ्यानें नवरीला परोपरीचे पुष्कळ नजराणे पाठवावे लागतात. त्यांतून तिच्या कौमार्याच्या शेवटच्या रविवारीं पाठवावा लागणारा नजराणा बराच मोठा असतो. त्यांत एक टोपलीभर मेवामिठाई, पुष्पांचा गुच्छ, (a bunch of carnations) मधुर द्राक्षासवानें भरलेला एक दुतोंडी शिसा, मेंदी, केशरंजन, गालांस व ओठांस लावण्याचा रंग (rouge) व सावण इतक्या वस्तू असतात; व सोमवारीं नवरी आणि तिच्या मैत्रिणी जमून गहूं निसतात, आणि ते गिरणींतून दळून आणवून त्याचें लग्नासाठीं एक पक्वान्न तयार करितात.

आथेन्सच्या ग्रीक लोकांतील कांहीं चाली.

आथेन्स शहरांतील तरुण कुमारिका आपल्या लग्नदिवसापूर्वी घरांतून कधींही बाहेर पडत नाहींत. त्यांचे भावी नवरे आपआपल्या प्रियेचें आराधन कोणा त्रयस्थामार्फत करितात. ही त्रयस्थ व्यक्ति नवरानवरींच्या इष्टमित्रांपैकींच कोणी तरी असून तिजवर उभयपक्षांचा विश्वास असावा लागतो. नवरा नवरीला लग्नदिवसापर्यंत प्रत्यक्ष भेटत नाहीं. त्या दिवशीं नवरीला भर रस्त्यांतून सावकाश व बराच वेळपर्यंत मिरवीत नेतात. देवाळयापासून नवऱ्याच्या घरास मिरवणूक पोहोंचण्याला निदान दोन तास तरी लागतात. ह्यावरून आमच्या स्त्रियांप्रमाणें **आथेन्स**मधील बायकांनाही मिरवण्याची हाव आहेच! असो. मिरवणुकीच्या अग्रभागीं वाजंत्री नानाप्रकारचीं वाद्यें वाजवीत चालतात. देवळांत लग्नविधि होत असतां, आणि वर सांगितलेल्या मिरवणुकींतही नवरीच्या डोक्यावर एक प्रकारचा मूल्यवान् व मोठा थोरला मुकुट असतो.

तो तिला इतका त्रासदायक होतो कीं, मिरवत असतां तिला सतत तीरासारखें ताठ राहून चालावें लागतें!

चमत्कारिक लग्नरीति.

निकारिया:–ग्रीस देशाच्या पूर्वेस **ईजियन** समुद्रामध्यें जो एक मोठा द्वीपसमुच्चय आहे, त्यांत **सॅमॉस्**नजीक **निकारिया** हें एक लहानसें बेट आहे. ह्या बेटांतील सर्व लोक पोहण्याच्या कलेंत फारच निष्णात आहेत, असें समजतें. ते आपल्या मुली चांगल्या पोहणाराखेरीज कोणासही देत नाहींत. ज्या मनुष्यास लग्न करावयाचें असेल, त्याला समुद्रामध्यें निदान आठ आठ वाव खोल बुडी मारितां येत असली पाहिजे! व पोहण्याच्या कलेंतील आपल्या हुशारीबद्दल दाखला मिळविला पाहिजे. कोणीही कन्यापिता अथवा एखादा श्रीमान् निकारियावासी गृहस्थ जेव्हां आपल्या मुलीचें लग्न करण्याचा निश्चय करितो, तेव्हां तो त्यासाठीं एक दिवस नेमून पुष्कळशा पोहणार उमेदवारांस निमंत्रण देतो. सर्व उमेदवार जमून 'पोहण्यासाठीं उघडे बंब होऊन उभे राहिले, ह्मणजे जी उपवर कन्या असेल, ती त्यांच्यासमोर येते. इतक्यांत सर्वजण समुद्रांत उड्या टाकितात. मग त्यांतून जो कोणी अतिदीर्घ काळपर्यंत तळाशीं बुडी देऊन बसेल, तो दैववान् कुमार त्या कुमारीचा नवरा ठरतो, व तो आपलें बक्षीस घेऊन जातो.

क्षणभंगुर पैशाच विवाह.

वॉलाशिया व मॉलडेव्हिया:—ह्या प्रांतांत अशी चाल होती कीं, तरुण मुलींस त्यांच्या आईबापांच्या अथवा पालकांच्या घरांतून जबरदस्तीनें चोरून नेऊन त्यांना वरणारांनीं आपल्या घरांत ठेवाव्या. त्या तेथें सदरहू पुरुषांसमागमें पत्नीच्या नात्यानें कांहीं काळपर्यंत राहून नंतर आपणांस चोरून आणणाऱ्या पुरुषांशीं उघड रीतीनें लग्न लावीत असत. परंतु, त्यांचे नवरे त्यांना अल्पस्वल्प अपराधांवरूनही घरांतून घालवून देत असत. मग त्या आहेत आणि त्यांचें नशीब आहे!

लग्नसोहळा.

रूस:—ह्या देशांतील लोकांच्या लग्नासंबंधीं चालीरीती कांहीं चमत्कारिकच आहेत. मुलामुलींच्या आईबापांचा आपल्या अपत्यांचें लग्न करण्याचा विचार ठरला, ह्मणजे बऱ्याचशा स्त्रिया वधूला कांहीं शारीरिक व्यंग आहे किंवा कसें तें पाहण्यासाठीं, व कांहीं व्यंग असून तें जाण्यासारखें असल्यास त्यास उपाय करण्यासाठीं तिच्याकडे जातात. विवाहित स्थितींत फार संकटें व त्रास आहे, किंबहुना ती स्थिति कडू जहर आहे, असें दर्शविण्यासाठीं लग्नदिवशीं एका कडव्या वेलीच्या फांदीचें वलय करून तें नवरीच्या डोक्याभोंवतीं गुंडाळितात. व्यासपीठापाशीं धर्मोपदेशकानें वधूवरांच्या वस्त्रांची गांठ मारिली, ह्मणजे त्याच्या हाताखालचा हुद्देदार 'हॉप' नांवाचें धान्य मूठभर घेऊन तें नवरीच्या डोक्यावर टाकितो; आणि ही वनस्पती जशी फलप्रचुर आहे, तशी तुलाही पुष्कळ मुलें होवोत! असा तिला आशीर्वाद देतो. नंतर कांहीं वयोवृद्ध स्त्रिया वधूच्या अंगावर एक मोठा थोरला बुरखा घालून तिला तिच्या सासरीं घेऊन जातात. त्यांच्या अग्रभागीं धर्मोपदेशक क्रूस घेऊन चालत असतो; व त्याचा मदतनीस आपल्या अंगावर एक सलोम मेषचर्म पांघरून सर्व रस्त्यानें वधूस असा आशीर्वाद देत चालतो कीं, माझ्या पांघरुणास जितके केंस आहेत, तितकीं मुलें हिला होवोत! वरगृहीं गेल्यावर तें नवविवाहित दंपत्य मेजावर भोजनास बसतें; आणि कित्येक मुलें व मुली त्यांजभोंवतीं जमून बीभत्स गाणीं गातात. भोजनोत्तर कोणी वृद्ध स्त्री त्या तरुण जोडप्यास शय्यागृहापर्यंत पोंचविण्यास जाते, व तेथें वधूला नवऱ्याच्या आज्ञेंत वागत जाण्याविषयीं उपदेश करून माघारीं येते. नंतर नवरा नवरीला असें सांगतो कीं, 'अमुक ठिकाणीं दोन उंच 'बूट' (buskins) ठेविले आहेत, त्यांपैकीं एकांत चाबूक आणि दुसऱ्यांत द्रव्य आहे. तूं त्या दोहोंतून जो 'बूट' तुझ्या हातीं लागेल, तो घेऊन ये.' तिच्या हातीं द्रव्याच्या पिशवीचा 'बूट' लागला, तर शुभ चिन्ह समजलें जातें. परंतु चाबकाचा लागला, तर अशुभ मानितात; व लागलीच नवरीचा

अन्य आपल्या समागमांत कसा जाणार त्याची प्रस्तावना करण्यासाठींच कीं काय नवरा तिच्यावर एक कोरडा गाजवितो! शय्यागृहांत तीं वधूवरें सुमारें दोन तास राहिल्यावर बाहेर येतात. नंतर कांहीं वृद्ध स्त्रिया नवरीचीं वस्त्रें तपासून पाहतात; व त्यांवर शरीरसंबंधाचीं चिन्हें आढळून आल्यास नवरीला आपले केंस बांधण्यास सांगतात. ह्या देशांत मुलींचें गर्भाधान होईपर्यंत त्यांचे केंस न बांधितां ते पाठीवर मोकळे सोडण्याचा रिवाज आहे. केंस बांधिल्यावर नवरी माहेरीं जाते, व आपल्या आईजवळ अंदण वस्तूंची मागणी करिते.

रूस देशांतील लोक **ग्रीक** देवालयाच्या सांप्रदायाचे आहेत. तेव्हां त्यांच्या लग्नांतील धार्मिक विधि, हे त्या देवालयांतील पद्धती-प्रमाणेंच करण्यांत येतात. ही पद्धति आह्मी मागें सांगितलीच आहे.

धार्मिक विधि-विषयीं.

लॅपलंड:—हा प्रदेश **रूस** देशाच्या वायव्येस आहे; एतद्देशीय लोकांत मुलीच्या बापानें मुलगी द्यावी, एतदर्थ त्याचें मन वळविण्या-करितां मित्रवर्गाकडून मध्यस्थी करविण्याची चाल आहे. लॅपलंडांतील हवा अतोनात थंड असल्यामुळें लग्नप्रसंगीं मद्याचा उपयोग विशेष करण्यांत येतो. नवरा आपल्या मित्रासह दारू पिऊन तर्र होऊन नवरीच्या बापाकडे लग्न ठरविण्यास जातो. तेथें गेल्यावरही पानपात्राला विश्रांति मिळत नाहीं. वधूच्या बापानें जेवढी दारू संकल्पून ठेविली असेल, तिचा फडशा उडाल्याखेरीज लग्ननिश्चयही होत नाहीं, आणि वरास वधूच्या घरांत प्रवेशही करतां येत नाहीं. मद्य संपलें, ह्मणजे नवरा आपल्या भावी सासऱ्याच्या घरांत जातो. तेथें नवरीचा बाप त्याला आपली मुलगी देण्याची इच्छा दर्शवून मुलीशीं प्रेमसंवाद करण्याविषयीं मोकळीक देतो. तथापि, येवढ्यांतच वधू वराच्या दृष्टीस पडत नाहीं. तिच्याशीं प्रेम-संवाद करण्याची वराला परवानगी मिळाल्यावर तो आपल्या घरीं जातो; व उत्तम पोषाक करून आणि वधूसाठीं कांहीं खाद्य बरोबर घेऊन पुन्हां

लग्नरीति.

तिच्या घरीं परत येतो. मग वधू त्याच्यापुढें दाखल होते. वरानें सकृत् दर्शनीं तिला प्रेमालिंगन व खाद्य द्यावयाचें! परंतु, तिच्याकडून आलिंगनाच्या ऐवजीं तें खाद्य स्वीकारण्यांतच फार संकोच दर्शविण्यांत येतो! सर्वांसमक्ष वरास ती खुशाल आलिंगूं देते. पण त्यानें पुढें केलेलें खाद्य घेण्यास ती फार लाजते! तथापि, ही लाज देखील फार वेळ टिकत नाहींच. थोडेसे आढेवेढे घेतल्यानंतर ती वराला घराबाहेर येण्याचा संकेत करते; व तो बाहेर आला, ह्मणजे त्याच्याजवळील पदार्थ ग्रहण करिते. मात्र हा पदार्थ न खातां जर तिनें तिरस्कारानें जमिनीवर फेंकून दिला, तर तिच्या मनांत त्या पुरुषाशीं लग्न करावयाचें नाहीं असें समजावें; आणि जर तो स्वीकारिला तर ती अनुकूल आहे असें समजावें. ह्याप्रमाणें तिची संमति मिळाली, कीं लागलींच नवरा नवरीच्या झोंपडींत विश्रांतीसाठीं अमळ आंग टाकण्याची परवानगी मागतो. ही परवानगी मागण्यापर्यंत कार्यक्रम आला, ह्मणजे परस्परांची प्रीति जमून तीं लग्नाला तयार आहेत, असें समजतात. नवरा नवरीच्या भेटीला जातांना तिच्या बापास नजराणा देण्यासाठीं, त्यास दारूचा एक शिसा बरोबर न्यावा लागतो. हा शिसा न मिळाल्यास त्याकरितां लग्नकार्य एक एक वर्ष पावेतों लांबणीवर टाकण्यांत येतें. धर्मोपदेशकांनीं विवाहविधि संपतांना वधूवरांस आशीर्वाद दिले, ह्मणजे त्या वेळेपासून एक वर्षपर्यंत जांवईबोवांस सासऱ्याच्या दिमतीस रहावें लागतें! हा एक वर्षाचा सासुरवास संपल्यानंतर ते नवरीला घेऊन आपल्या घरीं येतात. तेथें त्यांस इष्टमित्रांकडून आहेर होतात. यानंतर बायकोवर कडक जाबता ठेवण्यांत येतो. कोणाही परकीय मनुष्यास तिला भेटण्याची किंवा पाहण्याची सुद्धां परवानगी नसते.

स्वीडनः—**स्वीडन** आणि **नॉर्वे** ह्या देशांस **स्कँडिनेव्हियाचें** द्वीपकल्प अशी दुसरी संज्ञा आहे. प्राचीन कालीं एतद्देशीय लोकांच्या चालीरीती अगदीं रानटीपणाच्या होत्या. एखाद्या कुमारिकेला आपल्या आंगची मर्दुमकी दाखवून नंतर सौम्य

प्राचीनकालचा पैशाच विवाह.

रीतीनें तिचें आराधन करावें, अथवा तिची प्रीति संपादन करावी, हा मार्ग स्कँडिनेव्हियांतील तरुणांस मुळींच पसंत नसे. ते एखाद्या तरुणीचें कोणा पुरुषाबरोबर लग्न होऊं लागण्याची वाट पाहून असत; आणि आपल्या मनासारखा योग जमून आला, ह्मणजे आपल्या समवयस्क अनुयायांनिशी वऱ्हाडीमंडळावर हल्ला करून व त्यांस जिंकून कन्याहरण करीत असत. लग्नें रात्रौ लावावयाची चाल असल्यानें ती, वरील पैशाच विवाहाचा योग येण्याला फार अनुकूळ असे. **गोथलंड** बेटांतील **हसबी**च्या पुरातन देवालयांत अद्यापि कित्येक भाल्यांची एक मोठी थोरली रास जपून ठेवण्यांत आली आहे. ह्या भाल्यांसच त्यांजबरोबर मशाली रहाव्या अशी तजवीज केलेली आहे. लग्नकार्यामध्यें कित्येक मंडळी हे भाले घेऊन नवऱ्यापुढें उजेड व संरक्षण करीत चालत असत. वरपक्षीयांत जे कोणी वयानें तरुण, व शरीरानें बलाढ्य असत, व ज्यांस 'करवले' अशा अर्थाची संज्ञा असे, तेच सदरहू भाले घेऊन चालण्यास निवडले जात असत.

अर्वाचीन चालीरीती.

हल्लीं एतद्देशीय वधूवरांच्या लग्नासंबंधानें एकंदर मुखत्यारी त्यांच्या वडिलांकडे असते. कोणालाही चोरून लपून लग्न ठोकून टाकितां येत नाहीं. मुळीं जाहिराती प्रसिद्ध केल्याखेरीज लग्नच लावावयाचें नाहीं, असा एतद्देशीय धर्मसंस्थेनें निर्बंध करून टाकिला आहे. सामान्यतः स्त्रिया आणि पुरुष तीस वर्षांच्या अथवा त्याहूनही अधिक वयापर्यंत अविवाहित राहतात. कारण, लग्न करण्यास पैसा लागतो; व तो वडिलांच्या गांठीं असून त्यांजकडून मरेपर्यंत सुटत नाहीं! अर्थातच जोंपर्यंत त्यांचे डोळे झांकले नाहींत, तोंपर्यंत वडिलोपार्जित द्रव्यानें आपलें लग्न होईल अशी कोणाही वधूवरांस आशा नसते! हवें असल्यास त्यांनीं उद्योगधंदा करून पैसे मिळवावे, आणि आपलें लग्न करून घ्यावें. एतद्देशीय स्त्रियांचें कौमार्य निष्कलंक असतें, अशी आख्या आहे. परंतु लग्नानंतर पातिव्रत्य बेतावाताचेंच! खालच्या

वर्गांतील लोकांस घरींदारीं अतोनात काबाडकष्ट करावे लागतात. गृहकलह फारकरून होत नाहींत, व झाले तरी, हे लोक त्यांचा वाच्यांश करीत नसतात. सर्व गोष्टींचा अखत्यार नवऱ्यांच्या हातीं असतो; आणि बायकांचा कल बहुधा नवऱ्यांच्या धोरणानें चालण्याचा असतो. स्त्रीपुरुषांत त्याग, विभक्त राहणें, ह्या गोष्टी क्वचितच होतात; आणि झाल्यास जो पक्ष निरपराधी असेल, त्यासच द्वितीयसंबंध करण्याची परवानगी मिळते.

इंग्रज लोकांचा लग्नसोहळा.

प्राचीनकाळचे रीतिरिवाज.

प्राचीन काळीं इंग्रज लोकांमध्यें बापाचा आपल्या मुलीवर पूर्णपणें वचक असे; आणि तो जो नवरा पसंत करून देई, त्याशींच मुलीला लग्न लावावें लागे. अविवाहित तरुणास उपवर मुलीचें आराधन फारसें करावें लागत नसे; आणि लग्न उघड्या हवेंत एका विशिष्ट आकाराच्या शिलातलावर होत होतें. अग्नीला हविर्भाग देत असत. एकेकाळीं ह्याच लोकांत एका पुरुषानें अनेक स्त्रियांशीं लग्नें करण्याचा फार प्रघात होता. पण पुढें जसजशी सुधारणा होत गेली, तसतसें बहुपत्नीकत्व हें अप्रतिष्ठितपणाचें वाटून त्याचा रिवाज मोडला. तत्रापि,

शिंप्याची लग्नमध्यस्थी, वधूवरांचा एकांत, व त्यांच्या वडिलांचें खलबत.

इंग्लंडच्या दक्षिण भागांतील लोकांत अद्यापि पुरातनकालच्या कित्येक चालीरीती प्रचारांत आहेत. त्यांच्या लग्नांत गांवच्या शिंप्याचें फारच प्रस्त असतें! त्यास 'प्रियकराचा मित्र' (the lover's friend) असें नांव योजून दिलें आहे. हा शिंपी प्रथम उपवर कुमारीस भेटून लग्न करण्याविषयीं तिची संमति घेतो. नंतर तो तिच्या आईबापांस भेटतो व त्यांची मर्जी दिसून आली, तर लागलीच लग्नाच्या अटी ठरवून टाकितो. ह्यावर कोणी आंग्ल ग्रंथकार ह्मणतो, "इंग्लंडांत खऱ्या प्रेमाचा ओघ हा असा आहे! कार्य उभें करणें झालें, ह्मणजे अगोदर नवऱ्यानें शिंप्यास भेटावें, त्यानें नवरीची गांठ घ्यावी, आणि तिचा मानस दिसल्यानंतर तिच्या वडिलांकडे तत्संबंधीं बोलणें लावून त्यांचें मन वळवावें, ह्मणजे लग्नाचा

योग जुळून येतो." असो. वर सांगितल्याप्रमाणें मुलीची आणि तिच्या आईबापांची संमति मिळाली, ह्मणजे एक दिवस नेमितात. मग त्या दिवशीं वर औपचारिक रीतीनें वधूची व तिच्या मातापितरांची भेट घेऊन योग्य रीतीनें आपलें संक्षिप्तच परंतु उत्कट असें प्रियाराधन सुरू करितो. ह्या दिवशीं कन्यापित्यानें आपलें घर शृंगारून मेजवानीसाठीं ब्रँडी, द्राक्षासव, आणि सफेत रोटी ह्या पदार्थांची सिद्धता करून ठेविलेली असते. नवऱ्या-मुलाचें कौतुक पाहण्याच्या इच्छेनें त्याजबरोबर त्याचा बापही नवरीच्या घरीं येतो. तेथें त्या उभयतांचें आगतस्वागत करण्यासाठीं शिंपीदादा (Sir Tailor) हाजरच असतात. त्यांच्या हातीं एक फुलछडी असते, व त्यांनीं आपल्या प्रत्येक पायांत निराळ्या रंगाचा पायमोजा घातलेला असतो. उजव्यांत किरमिजी तर डाव्यांत जांबळी! स्वागत झाल्यावर नवरा आपल्या प्रियेसह एका खोलींत जातो, व तेथें त्या उभयतांचा पूर्वीं ह्मटल्या-प्रमाणें संक्षिप्त ऊर्फ दीर्घकालपर्यंत एकांत होतो! ह्यास कोणी औप-रोधिक भाषेनें तीं उभयतां '**बिट्रॉथल**'साठीं (ह्मणजे एकमेकांस वरण्या-साठीं) परस्परांची ओळख करून घेत आहेत ! असें ह्मणतात. हा वधूवरांचा एकांत वाटेल तितका वेळ झाला तरी हरकत नसते. त्यामध्यें पडण्याची, अथवा तिकडे जाऊन तो थांबविण्याची चाल नाहीं. उलट असें केल्यास त्यानें नवरी पुढें उधळी होते, व तिचीं मुलें काणीं, व मुली कुबड्या होतात, अशी भोळ्याभावाची—वेडगळ नव्हे हो !—समजूत आहे! असो. वधू-वरांचा हा एकांत होत असतां बाहेर वधूचीं मातापितरें आणि नवऱ्या-मुलाचा बाप ह्या त्रिवर्गाचें लग्नांतील एकंदर बाबतींविषयीं खलबत चालू असतें. नंतर बऱ्याच वेळानें त्या भावी तरुण जोडप्यास आपला एकांत पुरेसा वाटला, ह्मणजे ते बाहेर येऊन वडिलांजवळ बसतात. मग नवरीची आई रोटी मोडिते, व बाप ती संस्कृत करितो (blesses it). नंतर वरपिता आणि कन्यापिता ती रोटी मद्यांत बुचकळून पुन्हां संस्कृत करि-

तात; आणि मेजवानीला सुरुवात होते. वधूवरें एकाच ताटांत भोजन करितात व एकाच पेल्यांतून मद्य पितात.

इंग्लंडांत तसेंच वेल्सांतही लग्ननिमंत्रण करण्याचें बंड फार आहे. हें लग्ननिमंत्रणाचें कृत्य पोकळ डामडौलाचें आणि अत्यंत शिष्टाचाराचें असून तें इष्टमित्रांच्या घरोघर जाऊन तोंडीं करावें लागतें; व तें करण्यास कित्येक दिवस लागतात. वेळेवर त्यास एक आठवडाही पुरत नाहीं. त्यास **'इनव्हाइटिंग'** अशी इंग्रजी संज्ञा आहे. तें करण्यासाठीं कमींत कमी तीन असाम्या अवश्य असाव्या लागतात. एक निमंत्रण करणारा कोणी चांगला प्रतिष्ठित गृहस्थ, (हा एकंदर लग्नसोहळ्यांत पुढाकार घेणारा व कर्त्ता पुरुष असतो व त्याच्या हातीं त्याच्या पुढारीपणाचें द्योतक ह्मणून अक्षय्य एक पांढरी काठी असते.) दुसरा वरपक्षाकडून नेमण्यांत आलेला कोणी एक करवला **ग्रूम्समन्**, आणि तिसरी नवरीनें पसंत करून नेमिलेली करवली. हिला **'ब्राइड्स्मेड'** अशी संज्ञा आहे. ह्या त्रिवर्गास लग्ननिमंत्रण देण्यासाठीं घरोघर हिंडावें लागतें, आणि वेळेवर खेड्यापाड्यांत शेतेंचीं शेतें तुडवीत रखडावें लागतें; बोलावणें मोठ्या विनयानें, स्पष्ट, आणि यादीबरहुकूम माणसागणित निराळें करण्याची चाल आहे. निमंत्रण करण्यासाठीं वर सांगितलेल्या तीन व्यक्तींची तर आवश्यकता असतेच; परंतु त्यांशिवाय बहुधा आणखी त्यांजबरोबर भपकेदार पोषाक केलेली पुष्कळ मंडळी, 'फीडल' वाजविणारा मनुष्य, व परोपरीनें नटलेल्या व हांसतखिदळत जाणाऱ्या तरुण कुमारिकाही असतात. निमंत्रण केवळ उभयपक्षांच्या जवळच्या व दूरच्या नातेवाईकांसच करीत नाहींत; परंतु ओळखीपाळखीच्यांस, पाहुण्याराउळ्यांस, आंधळ्यापांगळ्यांस, सर्वांना करण्यांत येतें, आणि सगळे लग्नास जातात. अनमान मुळींच करीत नाहींत. असल फ्रेंच ह्मणविणारा गृहस्थ कोणाच्या अंत्यविधीस व इंग्रज कोणाच्याही लग्नविधीस बोलावणें आल्यास नकार मुळींच देत नाहीं. गरीब अथवा मातबर, वृद्ध अथवा तरुण, आणि श्रेष्ठ, बरोबरीचे,

अथवा कनिष्ठ ह्या सर्वांचा स्वागतसत्कार सारख्या रीतीनें कर-ण्यांत येतो. परंतु ह्या गोष्टींचें वाचकांस मोठेसें नवल वाटण्याचें कारण नाहीं. कांकीं, हें लग्ननिमंत्रण निरपेक्षबुद्धीनें मुळींच केलें जात नाहीं! त्यांत लोकांकडून नजरनजराणे गोळा करण्याचा अंतस्थ हेतु असतो; व तो पुढील कलमावरून दिसून येईलच. तेव्हां लग्नास जितके लोक जास्त येतील तितके इष्टच असतात! मूळ ग्रंथकारानें फ्रेंच लोक कोणाच्याही अंत्यविधीला जाण्यास, व इंग्रज, लग्नाला जाण्यास अनमान करीत नाहींत ह्मणून सांगितलें आहे. परंतु त्या बाबतींत सुद्धां इंग्रजांचा गुण मोठासा श्लाघ्य व अनुकरणीय आहे, असें नव्हे! लग्न, मेजवान्या, ह्या गोष्टी सुखाच्या झाल्या. त्यांसाठीं तर कोणीही पुढें होईल! परंतु दुःखाच्या प्रसंगीं मदतीसाठीं धांवून जाणारा ह्याच खरा स्तुतिपात्र होय. आमच्यांतही 'राजद्वारे श्मशाने च यस्तिष्ठति स बांधवः' ह्या वचनानें त्याचाच गौरव केला आहे. असो.

'व्हेलाडेन' चा सोहळा.

लग्नापूर्वी नवरीच्या घरीं '**व्हेलाडेन**' अथवा '**व्ह्यू**' (velladen or view ') ह्मणून एक सोहळा करण्यांत येतो. त्यांत सोयरीक-संबंध जुळल्याबद्दल गाणीं गातात, व नवरीचा पोषाक आणि इतर देणग्या ह्यांचें प्रदर्शन होतें. ज्या मनुष्यास लग्नाला जातां येईल, तोच ह्या सोहळ्यास जातो; व जे कोणी जातात ते उत्तम पोषाक करून जातात. ते वधूगृहीं आल्यावर नृत्य, गीत, हास्य, विनोद वगैरे प्रकार होतात. हें कृत्य थोडे दिवस लग्नापूर्वी होतें. कारण, ज्यांना ह्मणून नजराणे व आहेर करणें असतात, त्यांच्याकडून ते लग्नापूर्वीच्या रविवारीं पाठवि-ण्यांत येतात. लग्नाला अथवा मेजवानीला येणारी कोणीही व्यक्ति वधूस कांहीं आहेर केल्याशिवाय आणि दुवा दिल्याशिवाय रहात नाहीं. इंग्रज लोक हे पक्के प्रापंचिक आहेत. ते लग्नप्रसंगीं ज्या देणग्या देतात, त्या देखील केवळ दिखाऊ नसून संसारांत नित्य उपयोगास येतील अथवा निदान लग्नाच्या मेजवानीस तरी

उपयोगी पडतील अशाच असतात. आतां त्यांतून कांहीं नजराणे मौल्यवानही असतात. नाहीं असें नाहीं. दारूचा नजराणा करणें झाल्यास तो करणारास आपली ऐपत पाहून पुष्कळशा प्रमाणांत करावा लागतो! वधूला शिक्षण देणारी जी बाई असते, तिच्याकडून लग्नप्रसंगीं कांहींना कांहीं नजर येतेच. मग ती स्वल्प मोलाची कां असेना! पण त्या देणगीचा फारच बडेजाव होतो. तिला **नन**—Nun—ची देणगी असें ह्मणतात. ही देणगी एखाद्या पात्रांत घालून मेजावर ठेवितात, तिच्यावर पुष्पें रचितात, भोंवतीं मेणबत्त्या लावितात, धूप जाळितात, आणि आलागेला मनुष्य अगोदर तिजपाशीं जाऊन ती न्याहाळून पाहतो, व आपल्या खिशांतून यथाशक्ति हळूच कांहीं रकम काढून ती गुप्तदानाप्रमाणें त्या '**नन**'च्या देणगीवर घातलेल्या फुलांखालीं ठेवून देतो. ह्याप्रमाणें दर एकाकडून थोडें बहुत गुप्तदान होतां होतां बरीच रकम गोळा होते! इंग्रज नवरीचा पोषाक ती जन्मास आल्याबरोबर तिच्या आईकडून तयार करण्यांत येतो. नवरीला पोषाकाची मुळींच वाट पहावी लागत नाहीं, पण पोषाकाला मुलगी नवरी होण्याची वाट पहावी लागते! असो.

लग्नदिवशीं प्रातःकाळीं होणारे सोहळे.

लग्नदिवशीं प्रातःकाळीं नवरा आपल्या इष्टमित्रांसह नवरी मागण्यासाठीं तिच्या माहेरीं जातो, व तेथें **राक्षस**विवाहाचें (Marriage by capture) प्रहसन करितो. ह्यावेळीं नवरीच्या पक्षाची मंडळी घराचीं सर्व दारें व खिडक्या बंद करून आंत बसलेली असते. बाहेर जांवईबोवा येतात. त्यांच्याबरोबर त्यांचा एक मुख्य मदतनीस अथवा लढवय्या असतो. त्यास **स्पोक्समन ऑफ् लव्ह** (bazavalan or spokesman of love) असें ह्मणतात. तो आपल्या बडग्यानें घराचा दरवाज्या खूपच ठोकितो; आणि आह्मांला आंत येऊं द्या ह्मणून दरडावून बोलतो. पण त्याचें कोणीही ऐकत नाहींत. मग जांवईबोवा आपल्या बरोबरच्या तुतारीवाल्यांस तुतारी वाजविण्यास सांगतात. ह्या

तुताऱ्या अशा असतात कीं, त्या कितीही जोरानें फुंकिल्या तरी मोठ्यानें वाजत नाहींत. ह्याप्रमाणें तास दोन तास धट्टा झाल्यावर नवरीचे वडील एक खिडकी उघडतात व त्यांचे आणि 'स्पोक्समन' चें जंगी शब्दयुद्ध चालतें. हें शब्दयुद्ध हल्लीं आपल्याकडे जसे संगीतांत झगडे होतात, त्याप्रमाणें असतें. त्यांत 'स्पोक्समन' नवरीची मागणी करितो, व तिचे वडील ती नाकारितात. दोघांचा हा संगीत झगडा झाला, ह्मणजे कन्येचे वडील तिला स्वाधीन करण्याचें लटकेंच कबूल करून, खिडकीतून शांत जातात. थोड्या वेळानें घराचा दरवाजा अर्धवट उघडून नवरीचा कोणी नातलग बाहेर येतो. पण तो वरपक्षास आंतही जाऊं देत नाहीं, आणि नवरीला बाहेर आणून त्यांच्या स्वाधीनही करीत नाहीं. परंतु नवरी येते ह्मणून तो वरपक्षास पांच वेळां फसवितो. एकदां तिच्याऐवजीं एका ह्मातारीसच घेऊन येतो, एकदां एक तान्हें मूलच आणितो, व नंतर अनुक्रमें नवरीची आजी, व तिची बहीण ह्या दोघींस दाखवून वरपक्षास खजील करितो! अशारीतीनें, पांच वेळां लपंडाव झाल्यावर सहाव्या वेळीं मात्र घरांतून बऱ्याच उशीरानें हळू हळू नवरी दाराबाहेर येते. मग नवरानवरी परस्परांस पुष्पगुच्छ देतात; आणि घरापुढील हिरवळीवर एक नाच होतो. हा नाच रूढीस अनुसरून अवश्य करावाच लागतो. तो झाल्यावर सर्व मंडळी घरांत जातात; आणि गुडघे टेंकून नवरीच्या मृत व जीवंत वडिलांसाठीं ईश्वराची प्रार्थना करितात. मग नवरीचा बाप मुलीला आशीर्वाद देतो, आणि सांगतो कीं, बाळे! जरी तुझें लग्न होऊन तूं नवऱ्याच्या घरीं गेलीस, तरी हें घरही तुझेंच आहे असें समज! हें झाल्यावर देवालयांत लग्नास जाण्यासाठीं वरप्रभृति तत्पक्षीय मंडळी अगोदर जातात, आणि वधू व तिचे इष्टमित्र मागून जातात. दरम्यान वर देवालयाच्या दरवाज्यापाशीं वधूची फार उत्कंठेनें मार्गप्रतीक्षा करीत राहतो.

मुलीची तिच्या नवऱ्याकडे बोळवण.

लग्नप्रसंगीं नवरीला आपल्या झग्याच्या पुढील बाजूनें आणि कमरे-सभोंवतीं एक शोभिवंत रेशमी वस्त्र अवश्य गुंडाळावें लागतें. हें वस्त्र अशा रीतीनें गुंडाळिलेलें असतें कीं; त्याचे दोन्ही बाजूचे पदर वरतीं कमरपट्टयाखालीं दाबिलेले असतात, व खालच्या बाजूस ह्मणजे झग्याच्या घोळावर त्या वस्त्राची एक लांबलचक दुहेरी घडी पडते. जेव्हां सर्व वऱ्हाडी मंडळी लग्नासाठीं देवालयास मिरवत जाण्याकरितां निघते, तेव्हां वधूची आई येऊन ती मिरवणूक मध्येंच थांबविते. आणि वर सांगितलेल्या नवरीच्या परिकर वस्त्राची दुहेरी घडी कातरून (?) आपल्या मुलीला आलिंगिते, आशीर्वाद देते, आणि ह्मणते कीं, “माझे बाळे! आज इतके दिवस ज्या बंधनानें आपण दोघी एके जागीं बांधल्या गेलों होतों, तें आतां तुटलें! आणि परमेश्वरानें तुझ्यावर मला जी कांहीं सत्ता दिली होती, ती आतां मला तुझ्या नवऱ्याकडे सोपणं भाग आहे. (अर्थात् इतःपर तुजवर तुझ्या नवऱ्याची सत्ता आहे, माझी नाहीं.) मेरीच्या कृपेनं तूं सदा सुखी ऐस! आणि तशी असलीस, ह्मणजे हें घर तुला फिरून आपलंसं वाटणार नाहीं. पण कदाचित् तुला कांहीं दुःख झालं, तर मी तुझी आईच आहें असं समज. आईचे हात आपल्या मुलाबाळांना मिठी मारण्यास सदैव तयार असतात. बाळे, मलाही त्यांच्याबरोबर (अर्थात् नवऱ्याबरोबर) जाण्यासाठीं अस्संच आईला सोडावं लागलं! आणि तुलाही तुझ्या मुली अशाच सोडून जातील असं इथें जमलेल्यांतून कोणी कोणी ह्मणताहेत. पण मी तुला आतांपासून सांगून ठेवतें, कीं जेव्हां तो दिवस येईल, तेव्हां आज मी जशी तुला कुरवाळून आशीर्वाद देत आहें, तशीच तूंही तुझ्या मुलींना दे. पिलांना पंख फुटले, ह्मणजे त्यांचं जुनं घरटं त्या सगळ्यांचा समावेश करूं शकत नाहीं. तें फार संकुचित होतं. त्याला काय उपाय आहे? असो! माझे बाळे! ईश्वर आणि मेरी ह्या उभयतांचा तुला आशीर्वाद असो! तीं उभयतां आणि सगळे साधु

पुरुष तुझ्यावर दयामाया ठेवोत! आणि त्यांच्या कृपेनें तूं मला जशी सुख देणी झालीस, तशी तुलाही एक सुखविणारें मूल होवो ह्मणजे झालं!"— आई मुलीला पोटाशीं धरून ह्याप्रमाणें बोलत असतां त्या दोघी मायलेंकी स्फुंदूनस्फुंदून रडत असतात. आईचें हें भाषण पुरातन कालापासून पिढ्यानुपिढ्या चालत आलें आहे. मुलगी कोणत्याही वर्गांतील असो, विवाहानें तिची व आपली ताटातूट होण्याच्या प्रसंगीं ब्रिटिश आई तें आपल्या मुलीशीं बोलत असते; आणि मातापितरें आपल्या डोळ्यांना हात अथवा पदर लावून स्फुंदत असतात.

देवाळ्यामध्यें गेल्यावर तेथें **प्रॉटेस्टंट पंथा**च्या रीतीप्रमाणें जो विधि करण्यांत येतो, तो मागें सांगितलाच आहे. तो करून सर्व मंडळी नवरीच्या घरीं परत येतात, व तेथें मेजवानी, आणि नृत्यगीत होतें. त्यांत नवरा सर्वांचें आगतस्वागत करितो. हीं कृत्यें झालीं ह्मणजे लग्नसोहळा संपला.

मेजवानी, नृत्यगीतें व लग्नसमाप्ति.

जे लोक **आंग्लदेवालयास** मानीत नसून भिन्न मतांचे आहेत, त्यांच्यामध्यें लग्न करण्याची परवानगी मिळविण्याला पुढील गोष्टींची आवश्यकता असते. वधूवरांस लग्न लावण्याबद्दल जिल्ह्याच्या नोंदणी कामदारांचा दाखला मिळवावा लागतो. मग परवाना निराळा न मिळविला तरी हरकत नाहीं. तथापि, जिल्हाकामदारांचा दाखला असून शिवाय परवानाही असला, तर अधिक चांगलें. लग्न लावणें, तें अशा प्रसिद्ध ठिकाणीं लावावें लागतें कीं, जेथें उपासना करण्याची मोकळीक असून शिवाय तें स्थल लग्नविधि करण्यासाठीं नमूद केलें गेलें आहे. मात्र अशा स्थळीं लग्न लावणें झाल्यास त्या प्रसंगीं तेथें जिल्ह्याचे नोंदणी कामदार व दोन साक्षीदार हाजर असावे लागतात; आणि त्या लग्नास उभयतां वधूवरांची संमति असून कोणाही इतराची आडकाठी नाहीं, अशाविषयीं स्पष्ट कळवावें लागतें. भिन्न मतांच्या लोकांस जिल्हाकामदारांच्या कचेरींतही लग्न करितां येतें. मात्र

आंग्लदेवालयाच्या पंथाव्यतिरिक्त लोकांचीं लग्नें.

तेथें वधूवरांच्या संमतीविषयीं आणि इतरांचा अडथळा नसल्याविषयीं स्पष्ट विधानें करावीं लागतात. धार्मिक विधि करावा लागत नाहीं. मेहूनींच्या पद्धतीप्रमाणें देवळांत जाऊन तेथें लग्न करण्याची मर्जी असेल, तर तसेंही या भिन्न मतांच्या लोकांस करितां येतें. मात्र त्यासंबंधानें देवळाच्या अधिकाऱ्यास अगाऊ कळवून त्यांची संमति घेऊन ठेविली म्हणजे झालें.

राजघराण्यांतील लग्नें.

राजघराण्यांतील व्यक्तींच्या लग्नास वरील सामान्य नियम लागू नाहींत. त्यासाठीं खास निराळे नियम असतात.

इंग्रज लोकांच्या लग्नरीतीचें पर्यालोचन.

इंग्रज लोकांतील लग्नपद्धतीस प्रीतिविवाह हें नांव देणें वावगें होणार नाहीं. तरुण पुरुष व स्त्रिया यांच्या मनांत लग्न करण्याचा विचार आला, म्हणजे त्यांच्या नजरेखालून गेलेल्या व ओळखीच्या स्त्रीपुरुषांशीं त्यांच्या आईबापांच्या संमतीनें प्रथम बोलणेंचालणें होतें. आईबाप मुलाला चहा पिण्याकरितां, जेवणाकरितां, किंवा नाटक पाहण्याकरितां बोलावितात. ह्यांच्यांत स्त्रीस्वातंत्र्य असल्यामुळें स्त्रीपुरुष फिरावयास जातात, एकांतांत बराच वेळ घालवितात, व हा क्रम [illegible] दिवस चालतो. परस्परांना एकमेकांचा स्वभाव समजतो, व एकमेकांविषयीं बारीक माहिती होते. असें झाल्यावर त्या दोघांचीं मनें मिळालीं,—व हें त्यांना समजणें कठीण पडत नाहीं—म्हणजे एके दिवशीं वर गुडघे टेंकून वधूला ‘ तूं माझी गृहिणी हो ’ अशी प्रार्थना करतो; व ती तिनें कबूल केली, म्हणजे वर तिच्या बोटांत आंगठी घालितो. ह्या कृत्याला ‘एंगेजमेंट’ असें म्हणतात, व तें झालें म्हणजे त्यांचें एकमेकांशीं लग्न करण्याचें ठरलें असें समजतात. नंतर दोघांच्या सवडीप्रमाणें दिवस ठरवून त्या दिवशीं लग्न होतें. कधीं कधीं पुरुषांच्या मनांत एखाद्या स्त्रीविषयीं प्रेम उत्पन्न होऊन तो तिला पत्नी होण्याविषयीं प्रार्थना करितो, परंतु तिच्या मनांत नसलें, म्हणजे ती कबूल होत नाहीं; व यामुळें बऱ्याच मनुष्यांनीं आत्महत्या करून घेतल्याचीं उदाहरणें ऐकिवांत आहेत. लग्नदिवशीं

त्या प्रसंगासाठीं मुद्दाम केलेला उत्तम रेशमी पोषाक घालून व आभरणें परिधान करून **बेस्टमन्** व **ब्राइड्स्मेड** ह्यांसह देवळांत जातात, व तेथें वर सांगितल्याप्रमाणें लग्नविधि होतो. मुलीला तिचा बाप किंवा पालक नवऱ्याला अर्पण करितो. देवळांतून आल्यावर सासऱ्याच्या येथें सर्व मित्र-मंडळींना व आप्तसोयऱ्यांना मेजवानी होते. त्यांनीं दिलेलीं पारितोषिकें एका खोलींत लोकांना पाहण्याकरितां मांडिलेलीं असतात. लग्नदिवशींच वधूवरें नवीन प्राप्त झालेल्या स्थितीचा सुखास्वाद घेण्याकरितां एखाद्या मनोहर ठिकाणीं निघून जातात. ह्या कृत्यास (honey-moon) हनीमून अशी संज्ञा आहे.

केकर लोकांची लग्नरीति.

केकरः—ह्या पंथाच्या लोकांतील लग्नपद्धति अगदीं साधी असते. हे लोक शपथ घेत नाहींत, व लग्नमुद्रिका घालीत नाहींत. परंतु साक्षीदारांसमोर अशी प्रतिज्ञा करितात कीं, आह्मी पतिपत्नी ह्या नात्यानें एकत्र राहूं. असा त्या दोघांचा विचार ठरला, ह्मणजे प्रार्थना करण्याकरितां केकर पंथाचे लोक एकत्र जमतात, व वधूवरें सभेंत उभीं राहून आमचा विचार एकमेकांशीं लग्न करण्याचा आहे असें सांगतात. परस्परांत झालेला करार एखाद्या नक्षीदार कागदावर लिहितात, व त्यावर त्यांच्या व साक्षीदारांच्या सह्या होतात. हा करार स्त्रीच्या स्वाधीन करण्यांत येतो, व लग्नाचा दाखला समाजाच्या दफ्तरांत ठेवण्यांत येतो. ह्याशिवाय त्यांच्यांत विवाहासंबंधीं फारसें कांहींच करीत नाहींत.

प्राचीन व अर्वाचीन लग्नरीति.

वेल्सः—हा लहानसा देश **इंग्लंडच्या** पश्चिमेस असून तो हल्लीं इंग्लंडचाच एक भाग ह्मटला जातो. त्यांतील लोकांस वेल्श असें ह्मणतात. प्राचीनकाळीं ह्या लोकांत मुलामुलींच्या भावी लग्नासंबंधानें आपापल्या इष्टमित्रांशीं एक प्रकारचा पत्रव्यवहार करण्याची चाल होती. ह्या पत्रव्यवहारास विनंतिपत्रें (bidding letters) असें ह्मणत असत. त्यांतील मजकूर हिंदु लोकांत ज्या लग्नपत्रिका पाठविण्यांत येतात, त्यांतील मजकुराशीं मिळता येतो. योजिलेल्या कार्याची सूचना, त्याची तारीख, ज्या ठिकाणीं (बहुतकरून एखाद्या खाणावळींतच) लग्न व्हावयाचें

त्या स्थळाचें नांव, लग्नास येण्याविषयीं व मदत करण्याविषयीं विनंति, तसेंच ज्यांस विनंतिपत्र पाठवावयाचें त्यांच्याकडून लग्नप्रसंगीं ज्या कांहीं देणग्या देण्यांत येतील त्यांचा साभार स्वीकार करण्याची व योग्यप्रसंगीं त्या देणग्या परत करण्याची इच्छा, ह्या गोष्टींचा त्या विनंतिपत्रांत उल्लेख असे. कांहीं कलमें खेरीजकरून विनंतिपत्रांतील बहुतेक मजकूर आमच्या लग्नचिठ्ठीतील आशयाशीं मिळता येतो. सबब, वेल्श लोकांचीं हीं विनंतिपत्रें निदान आह्मांला नवलपरीचीं वाटण्याचा संभव नाहीं. तथापि, आजकालच्या सुधारलेल्या पाश्चात्य लोकांस ह्या पत्रांची चाल फारच चमत्कारिक वाटते. असो. हल्लीं वेल्सांत असलीं विनंतिपत्रें अगदीं खालच्या वर्गाच्या लोकांत पाठविलीं जातात. लग्नाच्या पूर्वदिवशीं नवऱ्यामुलीच्या कित्येक वस्तू तिच्या भावी नवऱ्याच्या घरीं नेऊन ठेवीत असत. ह्या वस्तु ह्मणजे ओकाच्या लांकडाची एक पेटी, परांची गादी, व इतर वस्त्रप्रावरणें होत. ह्याच दिवशीं सायंकाळीं नवरानवरीस आपापल्या इष्टमित्रांकडून कांहीं नजरनजराणे केले जात असत. ही चाल **ब्रिटिश** लोकांच्या ज्या कित्येक जुन्या चालीरीती आहेत, त्यांपैकींच एक होय; व तिला "**पर्स अँड गर्डल्**" (purse and girdle) अशी संज्ञा आहे. **कार्डिगनशायर**मधील विवाह फारकरून शनिवारीं होत असत. नवरानवरींच्या इष्टमित्रांचा मोठा थोरला समुदाय मिरवत मिरवत देवालयास जात असे. त्यांच्या मिरवणुकीच्या अग्रभागीं कोणी मनुष्य 'फीड्ल्' अथवा 'हार्प' नांवाचें वाद्य वाजवीत चालत असे. केव्हां केव्हां लग्नदिवशीं एक लटकेंच भांडण (sham-contest) करण्यांत येई. तें असें कीं, नवऱ्यामुलाचे दहा किंवा त्याहून अधिक मित्र घोड्यांवर बसून नवरीच्या घरीं जाऊन तिला आमच्या स्वाधीन करा ह्मणून तिची हक्कानें मागणी करीत असत. नवरीकडील मंडळी ह्या स्वारांशीं बराच वेळ शब्दयुद्ध करून नंतर त्यांच्या ह्मणण्याप्रमाणें नवरीला त्यांच्या हवालीं करीत असत. **ओवेन** नांवाचा कोणी एक शब्दकोशकर्त्ता आपल्या वेल्श भाषेच्या कोशांत ह्मणतो कीं, "वेल्समधील गरीबगुरीबांचीं लग्नें, हीं शुद्ध वर्गणीचीं असतात! लग्नास येणारा प्रत्येक गृहस्थ शिधासाहित्याच्यारूपानें

अथवा द्रव्याच्या रूपानें काहीं तरी नजराणा ऊर्फ वर्गणी देतो; व त्या वर्गणीवरच नवरानवरी आपला संसार आरंभितात!" देवळांतील कृत्य आटोपल्यानंतर नवरीच्या पक्षाची मंडळी ज्या घरीं अथवा खाणावळींत लग्नाप्रीत्यर्थ मेजवानी व्हावयाची असेल, तेथपर्यंत जाण्यासाठीं हमेश एक शर्यत लावीत असत. लॉर्ड केम्स ह्यांनीं वेल्श लोकांच्या लग्नांतील एक चमत्कारिक चाल सांगितली आहे. ती अशी कीं, लग्नदिवशीं प्रातःकाळीं नवरा आपल्या मित्रगणासह घोड्यावर बसून नवरीच्या घरीं जातो; व कन्यापित्याजवळ हक्कानें नवरीची मागणी करितो. नवरीचे इष्टमित्र घोड्यावरच असतात. ते नवऱ्यामुलास आम्हीं नवरी देत नाहीं असें साफ सांगतात. लागलींच उभयतांत लटकी झोंबाझोंबी सुरू होते! नवरी घोड्यावर बसून आपल्या एखाद्या निकट संबंधीजनाच्या पाठीशीं असते. तो गृहस्थ ह्या झटपटींत तिला घेऊन पळून जातो, व नवरा आणि त्याचे मित्र मोठा कोलाहल करून तडाक्यानें त्या गृहस्थाच्या पाठलागास निघतात. उभय पक्षांची मंडळी आणि त्यांचे घोडे थकले, ह्मणजे नवरीचा नातलग आपला आग्रह सोडून नवऱ्यास नवरीला जिंकू देतो. मग नवरा तिला घेऊन मोठ्या डौलानें परत येतो; आणि नंतर मेजवानी व आनंदोत्सव ह्यांनीं वरील कृत्याची परिसमाप्ति केली जाते.

लग्नसोहळा.

फेरोबेटें:—हीं स्कॉटलंडच्या उत्तरेस आहेत. त्यांतील कोणाही तरुणीवर एखादा तरुण अनुरक्त झाला, व त्या उभयतांच्या लग्नास कोणाची हरकत नसली, ह्मणजे त्यांचा विवाह होऊं शकतो. लग्नदिवशीं नवरा एक उंच टोपी घालून व हातांत एक काठी घेऊन नवरीच्या घरीं येतो. ती टोपी व काठी ह्या दोन्ही वस्तू लग्नकार्याचीं, व मंगलसूचक चिन्हें मानिलीं जातात. नवरा नवरीच्या घरीं आल्यावर सर्व मंडळी देवळांत लग्नाला जाण्यासाठीं निघतात. वरासमागमें पुरुष मंडळी जोडी जोडीनें जातात. देवळांत गेल्यावर पुरुष व स्त्रिया आपापल्या जागीं बसतात. प्रार्थना व लग्नविधि चालू असतां प्रार्थनापीठावर पुष्कळशा मेणबत्त्या लावितात; व तेथील कृत्य उरकल्यानंतर सर्व मंडळी घरीं परत येतात. तेथें एक मोठी थाटाची मेजवानी दिली जाते. तींत दारूची रगाडी

असते. भोजनोत्तर नाच होतो; व त्या मंगलकार्यास उद्देशून गाणीं गाण्यांत येतात. पुढें वधूवरांस शयनमंदिरांत जाण्याची सूचना देण्याकरितां कोणी मनुष्य खुणेचे तीन ठोके देतो. ते ऐकतांच वधू त्या प्रसंगास अनुरूप तेवढाच पोषाक ठेवून बाकीचा काढून टाकिते, व थोडासा अश्रुपात करून नंतर निजावयास जाते. तिच्या मागून तिचा पति जातो. ह्याप्रमाणें दोघेंही निजावयास गेलीं, ह्मणजे जमलेली मंडळी कांहीं गाणीं ह्मणून नाचतात; व त्यानंतर आपापल्या घरीं जातात. दुसऱ्या दिवशीं तें नवीन जोडपें बिछान्यांत आहे तोंच त्या उभयतांस त्यांच्या इष्टमित्रांकडून नजरनजराणे होतात, आणि तो सर्व दिवस खानपानांत व नृत्यगीतांत जातो. रात्रीं सर्व मंडळीस एक मोठी मेजवानी देण्यांत येते, ह्मणजे लग्नसोहळा संपला.

येथपर्यंत **यूरोप** खंडांतील ज्या ज्या ठिकाणच्या लोकांच्या लग्नाविषयीं थोडी फार माहिती उपलब्ध झाली, ती वाचकांस सादर केली आहे. आतां आह्मीं पश्चिम गोलार्धांतील ह्मणजे **अमेरिका** खंडांतील कित्येक मूळच्या लोकांच्या लग्नविषयक चालीरीतींकडे वळतों.

उत्तर अमेरिकेंतील भिन्नभिन्न लोकांच्या लग्नरीती.

ग्रीनलंडांतील लोक:—ग्रीनलंड हें एक मोठें द्वीपकल्प असून तें उत्तर अमेरिकेच्या ईशान्येस आहे. ह्या देशांतील युवयुवती-लग्न करण्याविषयीं आपल्या मातापितरांची संमति घेतात. ती मिळाल्यावर दोन तीन स्त्रिया जमून वधूला औपचारिक बळजबरीनें वरगृहीं घेऊन जातात. तेथें गेल्यावर ती लज्जेनें आपलें मुख दोन्ही हातांनीं झांकून घेते; व आपला केशकलाप पाठीवर मोकळा सोडून एका कोंपऱ्यांत बसून राहते. अशा रीतीनें तिनें ओढून चंद्रबळ आणिलें, ह्मणजे वरपक्षाची मंडळी लग्न लावण्याविषयीं मोठ्या मिनतवारीनें तिचें मन वळवितात. मग ती दुराग्रहाचें ढोंग सोडून मनांतील अनुकूलता व्यक्त करिते. सर्वांसमक्ष वरगृहीं येऊन वधूनें वरासंगती राहण्याविषयीं आपली संमति व्यक्त केली, ह्मणजे ती त्या नवऱ्याची बायको झाली, अशी सदरहू लोकांची लग्नविषयक कल्पना आहे.

लग्नरीति.

ट्रोकिओ:—ह्या लोकांत एखाद्या कुमारिकेच्या मनांत लग्न करावें असें आलें, ह्मणजे ती आपल्या घरांतील प्रमुख स्त्रीला किंवा एखाद्या नातेवाईक बाईला आपणासाठीं नवरा पाहण्यास सांगते. तिनें पाहिलेला नवरा मुलीस पसंत पडला, ह्मणजे उभयपक्षांचे नातलग एकत्र जमून लग्नासंबंधीं विचार करितात. बहुतकरून लग्न ठरण्यास फारसा प्रयास पडत नाहीं. तें तेव्हांच जुळविण्यांत येतें. नंतर वरपक्षाकडून वधूच्या घरीं घोंगडी, भांडीं, व दुसऱ्या कांहीं संसारोपयोगी वस्तू नजराणा ह्मणून पाठविल्या जातात. त्यांचा वधूकडून स्वीकार झाला, ह्मणजे लग्न झालें असें समजावयाचें.

लग्नरीति.

ह्या लोकांत एक गोष्ट विलक्षण असून ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. ती अशी कीं, लग्नानंतर स्त्री व पुरुष आपापल्या मूळच्या घरांत निरनिराळे राहतात. ह्मणजे मुलगी आपल्या आईबापांसमागमें माहेरींच राहते, व मुलगा आपल्या घरीं राहतो. उभयतांस जी प्रजा होईल, तिजवर स्त्रीचा हक्क असतो; आणि ती प्रजा मुलीच्या माहेरच्या कुटुंबांतील माणसें ह्मणून समजलीं जातात. नवराबायकोच्या मिळकती निरनिराळ्या राहतात. तथापि, पुरुषांच्या मिळकतीवर वारसाईचा हक्क स्त्रियांचा असतो. एकंदरींत ह्या देशांत स्त्रियांचेंच प्राबल्य जास्त दिसून येतें. येथें त्या अबला नसून प्रबला आहेत, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

काहीं विलक्षण चालीरीती.

शवानी:—ह्या लोकांत तरुण अविवाहित स्त्रीपुरुषांच्या मनांत लग्न करावयाचें आलें, ह्मणजे ते आपला बेत आपल्या आईबापांस कळवितात. वधूवरांनीं केलेल्या पसंतीस आईबापांना रुकार द्यावा लागतो. नंतर उभयपक्षांची मंडळी आपल्या जातींत जें घराणें सर्वांत जुनें व कुलीन असेल, तेथें जमतात. त्या ठिकाणीं मेजवानी व नाच होतो. तदनंतर दोन्ही पक्षांचे चार चार वृद्ध व समंजस पुरुष त्या नवीन जोडप्यास एका चटईवर उभें करून त्यांस विवाहित स्थितीमध्यें काय सौख्य आहे तें सांगतात; व प्रामाणिकपणानें आणि पवित्रतेनें वागण्याविषयीं त्यांस उपदेश करितात. मग वधूवरें एका काडीचे बारीक बारीक तुकडे करून ते जमलेल्या मंडळीस वांटितात. हे तुकडे लग्नाची खूण ह्मणून समजले जातात! व जोंपर्यंत ते एकत्र करितां येतात, तोंपर्यंत लग्न संबंधाचें अस्तित्व असतें, अशी समजूत आहे! हें कृत्य आटोपल्यावर सर्व जातिबांधवांस बोलावून खानपान, नृत्यगीत, इत्यादिकांनीं त्यांना संतुष्ट करण्यांत येतें, ह्मणजे लग्नसमारंभ संपला.

लग्नरीति.

पेन्‌सिल्व्हॅनियांतील लोक:—उत्तर अमेरिकेंत पेन्‌सिल्व्हॅनिया नांवाचें एक लहान संस्थान आहे. त्यांतील लोकांत वधूवरांस लग्न लावण्याविषयी त्यांच्या आईबापांची संमति न मिळाली, तर वधू पुढें आणि वर पाठीमागें अशा रीतीनें तें जोडपें घोड्या-

लग्नरीति.

घर असून न्यायाधीशाकडे जाते. तेथें गेल्यावर वधू न्यायाधीशास सांगते कीं, मी आपल्या प्रियकराशीं लग्न लावण्यासाठीं त्यास घेऊन पळून आलें आहे. नंतर न्यायाधीश त्या उभयतांचा कृतनिश्चय पाहून त्यांचे लग्न लावितो.

लग्नरीति.

मोरावी:—ह्या लोकांत कोणाही पुरुषाचा लग्न करण्याचा विचार ठरला, ह्मणजे तो धर्मगुरूंकडे जाऊन त्यांस आपली इच्छा दर्शवितो; व मला बायको करण्यासाठीं एखादी मुलगी पहा, ह्मणून त्यांस विनंति करितो. नंतर धर्मगुरु, तरुण मुलींवर देखरेख करणाऱ्या अधिकारिणीस ती गोष्ट कळवितात. ती बाई ज्या मुलीची विवाहाची पाळी असेल, तिला आणून रुजू करिते. मग धर्मगुरु तिची त्या पुरुषाशीं गांठ घालून देतात. सुमारें एक तासपर्यंत त्या दोघांचा एकांत झाल्यावर धर्मगुरु त्यांजकडे पुन्हां येतात; व त्यांची मर्जी कशी काय आहे त्याचा खुलासा घेतात. लग्न करण्यास तीं दोघें कबूल असलीं, तर लागलीं दुसऱ्याच दिवशीं त्यांचा विवाह लावण्यांत येतो. नाहीं तर मात्र त्या तरुणीची स्थिति मोठी शोचनीय होते. तिचें नांव लग्नाला उमेदवार असलेल्या कुमारिकांच्या पटांत सर्वांच्या शेवटीं दाखल केलें जातें, व पुढें तिचा अनुक्रम पहिला आला, तरी देखील तिला प्रथम भेटलेला पुरुष जर पुन्हां येईल, व तिच्याशीं लग्न करण्याचा आपला निश्चय दर्शवील, तरच त्या बिचारीचें लग्न होतें. नाहींपेक्षा तिला आजन्म बेगम रहावें लागतें! ह्या रिवाजामुळें सदरहू लोकांत पुष्कळ वृद्ध स्त्रियाही अविवाहित असलेल्या आढळतात. प्रथमग्रासीं मक्षिकापात न होतां जर वधूवरें विवाहास अनुकूल असलीं, व त्यांचें लग्न झालें, तर समाजाकडून त्या नवीन जोडप्यास राहण्यासाठीं एक टुमदार घर दिलें जातें. त्या घरापुढें एक छोटासा बागही असतो. उभयतांना जी संतति होईल, ती सहा वर्षांच्या वयाची होईपावेतों त्यांजपाशीं ठेवण्यांत येते. नंतर ती त्यांजकडून घेऊन मुलगा असल्यास त्यास मुलांच्या संस्थेंत, व मुलगी असल्यास तिला मुलींच्या संस्थेंत दाखल केलें जातें. पुरुष मरण पावून स्त्री विधवा झाली, ह्मणजे तिला विधवागृहांत जावें लागतें. तसेंच स्त्रीच्या पश्चात् तिच्या विधुर पतीलाही विधुरांच्या संस्थेंत दाखल करण्यांत येतें.

मध्य अमेरिकेंतील कांहीं लोकांच्या लग्नरीती.

स्मू लोकांचा आसुरविवाह, व द्वितीयसंबंध.

स्मू लोकः—स्मू ह्मणून मध्य अमेरिकेंत राहणारी इंडियन लोकांची एक जाति आहे. तींत लग्न करण्याची चालच नाहीं. अथवा लग्न ह्या संज्ञेस बऱ्याच अंशीं साजेल, असें कोणतेंच कृत्य ह्या लोकांत केलें जात नाहीं. तथापि, उप-
लब्ध झालेल्या हकीकतीवरून पाहतां सदरहू लोकांत आसुरविवाहाच्या
त्त्वावर उभयपक्षांत व्यवहार होतो, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कारण,
ग्नासंबंधानें कोणताही विधि न केला, तरी ह्या लोकांत मुलीबद्दल कन्या-
पेता मागेल ती रकम त्यास द्यावी लागते; आणि असें करणें, हा आसुर-
वेवाहच होय. असो. एखाद्या स्मू तरुणाची एखाद्या तरुणीवर लहर
फेरली, ह्मणजे तो तिच्या बापाकडे जाऊन त्या मुलीची मागणी करितो.
ी कन्यापित्यास पसंत पडली, ह्मणजे तो लागलीच हिजबद्दल तुह्मांस
अमुक एक रकम द्यावी लागेल, असें त्या वरास सांगतो. ती त्यानें दिली,
ह्मणजे कन्यापिता मुलीस थोडेबहुत कपडे देऊन लागलीच तिला तिच्या
ावी नवऱ्यासमागमें त्याच्या ताडपत्री झोपडींत रहावयास पाठवून देतो.
ाजबरोबर जाण्यास मुलगी फारकरून आढेवेढे घेत नाहीं; आणि कदा-
ित् तिनें नानूं केलेंच, तरी त्याचा ह्मात्रा तसा चांगला परिणाम होत नाहीं.
ल्ट तिनें दाखविलेली नाखुषी हें एक दुश्चिन्ह समजलें जाऊन तिचा बाप
ला थोडासा वाग्दंड व आपल्या 'पिमेंटोनें' ह्मणजे काठीनें पुष्कळसा देह-
ड करून तिला नवऱ्याच्या घरीं जावयास लावितो. कोणी स्त्री विधवा
ल्यास तिच्या नवऱ्याचे नातलग तिला त्याच्या मालमत्तेचा एक भाग असें
मजतात; आणि त्याअन्वयें ती त्या लोकांस आपली किंमत परत देईपर्यंत
ला फिरून अन्य पुरुषाबरोबर स्त्रीच्या नात्यानें राहण्याची परवानगी

मिळत नाहीं. विधवेनें आपल्या मृत नवऱ्याच्या नातलगांस जी रकम द्याव-याची, तिला सदरहू लोक ' पिआरका माना ' (Piarka mana) असें ह्मणतात. विधवामूल्य हा शब्द त्याचा समानार्थक होय.

लग्नरीति.

मेक्सिकोचे लोकः—मेक्सिको देशांतील लोकांचीं लग्नें त्यांच्या धर्मगुरूं-कडून लावण्यांत येतात. लग्नाच्या शर्ती उभयपक्षांस मंजूर झाल्या, ह्मणजे वधूच्या मालमिळकतीची यादी करण्यांत येते नंतर वधूवरें देवळांत जाऊन धर्मगुरूंस आपला निश्चय कळवितात. मग तो वराच्या वस्त्राची आणि वधूच्या प्रावरणाची गांठ मारितो; आणि त्यांना जोडप्यानें वधूगृहीं घेऊन जातो. तेथें ह्या प्रसंगासाठीं एक आगटी पेटविलेली असते. तिच्या सभोंवतीं गुरूंच्या मागून वधूवरें सात प्रदक्षिणा घालितात, व विस्तवापाशीं सर्वजण अशा रीतीनें बसतात कीं, सान्यांना सारखा शेक लागावा. हा प्रकार संध्याकाळपर्यंत होतो. रात्र झाल्यावर वधूच्या मैत्रिणी तिला मशालींच्या उजेडांत वरगृहीं पोहोंचती करितात तेथें खानपानादि कृत्य उरकलें, ह्मणजे तें नवीन जोडपें निजावयास जातें व लग्नसमारंभाची समाप्ति होते.

लग्नरीति.

पनामा, कुमाना, व कॅरॅकस्चे लोक—ह्या लोकांतील कुमारिकांस रजोदर्शन झालें, ह्मणजे त्या एक प्रकारचा लांब व ढिला पोषाख करितात. अर्थात् त्या पोषाकावरून त्या लग्नाला उमेदवार आहेत, असें समजलें जातें. लग्नापूर्वी असा वेश धारण करणाऱ्या वधूचें वरानें प्रीति संपादावी लागते. ती संपादन करणें, ह्मणजे तूं मला आपला नवरा करतेस काय ? असा प्रश्न विचारणें होय. लग्नकार्यात मेजवानीच्या प्रसंगीं वधूवरांचे पिते नृत्य करितात. नंतर नवरा आपल्या मित्रांसह शेतांत जातो, व ज्या ठिकाणीं रहाण्याचें त्यानें योजिलें असेल, तेथील झाडेंझुडें सोबत्यांच्या साहाय्यानें तोडून जमीन साफ करितो; व वधू आपल्या मैत्रिणीं सह धान्य पेरिते, ह्मणजे लग्नकार्य आटोपलें.

दक्षिण अमेरिकेंतील भिन्नभिन्न लोकांच्या लग्नरीती.

वधूवर संमेलन.

पेरूः—ह्या देशाचा राजा प्रतिवर्षी किंवा एक वर्षाआड एका नियमित वेळीं कझको शहरीं आपल्या घराण्यांतील जेवढे ह्मणून अविवाहित तरुण व तरुणी असतील त्यांस एकत्र जमवितो. मुलींचा विवाहकाल अठरापासून वीस वर्षांच्या वयापर्यंत, व मुलांचा चोविसाव्या वर्षी ठरलेला आहे. ह्यापेक्षां कमी वयाच्या मुलामुलींस लग्न करण्याची परवानगी नाहीं. कारण, पेरूंतील लोक असें ह्मणतात कीं, लग्नसमयीं वधूवरांचीं वयें त्यांना आपला घरसंसार चांगल्या रीतीनें चालविण्यास आवश्यक इतक्या बेताचीं असलीं, ह्मणजेच तीं योग्य होत. ह्यापेक्षां लौकर त्यांचीं लग्नें करणें, हा केवळ मूर्खपणा होय, अशी त्यांची दृढ समजूत आहे.

राजघराण्यांतील लग्नरीति वगैरे.

वर सांगितल्याप्रमाणें लग्नायोग्य कुमार व कुमारी एकत्र जमविण्यांत आल्यावर त्यांतून ज्यांचें ज्यांचें लग्न करण्याबद्दल जुळेलें, अशीं सर्व जोडपीं सभोंवार उभीं करून **इनका** (पेरूचा राजा) त्यांच्या मध्यभागीं बसतो. नंतर तो क्रमाक्रमानें एकेका जोडप्यास त्यांचीं नांवें घेऊन पुढें बोलावितो, व त्या दोघांचे हात आपल्या हातांत धरून त्यांना परस्परांशीं एकनिष्ठेनें वागण्याविषयींची प्रतिज्ञा करण्यास लावितो. ही प्रतिज्ञा झाल्यावर तो राजा त्या भावी नवराबायकोंचे हात तसेच धरून त्यांच्या वडिलांच्या हातांत घालितो; ह्मणजे राजानें त्या उभयतांचें लग्न लावून दिलें असें समजावयाचें. मग तें नवदंपत्य वरगृहीं जातें, व तेथें त्यांच्या निक-

ऱ्या नातेवाईकांस योग्य दिसेल त्याप्रमाणें ते त्या नवरानवरींचा तीन चार किंवा ह्यापेक्षां अधिक दिवस विवाहोत्सव करितात. ह्याप्रमाणे लग्न झालेल्या स्त्रिया आपल्या नवऱ्याच्या कायदेशीर बायका अथवा नवऱ्यास इनकाच्या हस्तें प्राप्त झालेल्या बायका म्हटल्या जातात. राजघराण्यांतील स्त्रीला केवळ बहुमान देण्यासाठीं इनकानें करून दिलेली बायको, ही पदवी दिली जाते. जो कोणी गादीचा वारस असेल, तो स्वतःच्या बहिणीशीं लग्न लावितो! हा बहिणीशीं लग्न लावण्याचा प्रघात पहिल्या इनकानें घालून दिला, व तेव्हांपासून तो तसाच अंधपरंपरेनें पिढ्यानुपिढ्या चालू आहे! वारस राजपुत्राला बहीण नसलीच, तर तो राजघराण्यापैकीं जी कुमारी त्याची अति निकट संबंधिनी असेल, तिच्याशीं विवाह करितो. ही स्त्री कोया म्हणजे राज्ञी अथवा महिषी म्हटली जाते.

ह्याप्रमाणें राजानें आपल्या आप्तांचीं लग्नें करून दिल्यावर दुसऱ्या

प्रजाजनांचीं लग्नें व इतर चाली.

दिवशीं जो कोणी मंत्री त्याजकडून नेमण्यांत येईल, तो कझको शहरांतील इतर रहिवाशांच्या अविवाहित मुलामुलींचीं वर सांगितलेल्या पद्धतीनेंच लग्नें लावून देतो. मात्र हीं लग्नें प्रदेशाच्या अनुक्रमानें लावण्यांत येतात. म्हणजे, ज्या भागास वरचा कझको अशी संज्ञा आहे, त्यांतील वधूवरांचीं आधीं, व खालच्या कझकोंतील वधूवरांचीं मागून लावण्यांत येतात. लग्न लागल्यानंतर वधूवरांसाठीं एक गृह समृद्ध करून द्यावयाचें असतें. सबब, त्यासाठीं त्यांच्या नातलगांतून कोणी कांहीं, कोणी कांहीं, वस्तु बक्षीस घेऊन येऊन त्यांनीं गृह संमृद्ध करून देतात. लग्नामध्यें होमहवनें अथवा अन्य कोणतेही विधी करीत नाहींत. प्रांताचे व गांवगन्नाचे अधिकारी आपल्या प्रदेशांतील वधूवरांचींही अशाच रीतीनें लग्नें लावितात. प्रत्येक शहरांतून मुद्दाम स्थापन केलेल्या मंडळीस आपल्या नवविवाहित नागरिकांना घरें द्यावीं लागतात; व विवाहितांचे जे निकटचे नातलग असतील, ते तीं तीं घरें संसारोपयोगी वस्तूंनीं समृद्ध करून देतात! एका शहरांतील किंवा प्रांतांतील रहिवासी दुसऱ्या शहरांतील किंवा प्रांतांतील रहिवासिणीशीं लग्न करूं म्हणाल्यास परवानगी नाहीं.